# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

**वर्ष ४३ वे** **अंक ३३ वा** **डिसेंबर २०२५**



**मुख्य संपादक**

**प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद
प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि. छत्रपती संभाजीनगर

**कार्यकारी संपादक**

**डॉ. प्रशांत सोनवणे**
**प्रा. डॉ. दिंगबर तंगलवाड**
**प्रा. डॉ. वाल्मिक इंदासे**

**संपादक समिती सदस्य**

डॉ. कालिदास भांगे, डॉ. नानासाहेब पाटील, डॉ. वाल्मिक इंदासे, डॉ. सतिश देसाई, डॉ. प्रशांत नारगुडे, डॉ. अनिल वानखेडे, डॉ. जयमाला लाडे, डॉ. राजू बुरीले, डॉ. प्रवीण घोडेस्वार, डॉ. पंढरी वाघ, डॉ. चंद्रकांत कांबळे, डॉ. प्रकाश काळवणे

**संपादकीय सल्लागार मंडळ**

प्रा. डॉ. उत्तम भोईटे, प्रा. डॉ. दा. धो. काचोळे, प्रा. डॉ. अरुण चव्हाण, प्रा. डॉ. स्मिता अवचार, प्रा. डॉ. संजय सांळुके, प्रा. डॉ. जगन कराडे



**संपर्क पत्ता**

**अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,**

**द्वारा:** समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४

**Website:** www.mspmonline.com **Email:** marathisocio@gmail.com



**सुचना: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.**

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सभासदांना अंक (ई-प्रत) विनामूल्य.**

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबी विषयीचे निवेदन (नियतकालिकांच्या नोंदणी संबंधी नियम ८ प्रमाणे)


## प्रकाशन स्थळ

## मराठी समाजशास्त्र परिषद

द्वारा: समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४

**नियतकाल: वार्षिक (ISSN 2230-7745)**

मुद्रकाचे नाव: सय्यद प्रिंटिग
राष्ट्रीयत्व: भारतीय
पत्ता: छत्रपती संभाजीनगर

**मुद्रण स्थळ :** छत्रपती संभाजीनगर.

**प्रकाशकाचे नाव : अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद.**
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : द्वारा - समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.

**संपादकाचे नाव : प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता: प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
जि. छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.

मालकाचे नाव : **मराठी समाजशास्त्र परिषद**
पत्ता : द्वारा - प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
जि. छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.

**अक्षर जुळवणी :** जयसिंग सिंगल


मी प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
प्रकाशक

# संपादकीय

मराठी समाजशास्त्र परिषदेने समाजशास्त्र संशोधन पत्रिकेची सुरुवात इ.स. १९८३ साली केली. त्या काळात समाजशास्त्र विषयावरील दर्जेदार आणि संशोधनाधारित साहित्य मराठी भाषेत मर्यादित प्रमाणात उपलब्ध होते. उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात इंग्रजी भाषेचे वर्चस्व असताना, मराठी माध्यमातील विद्यार्थी आणि अभ्यासकांना संकल्पना, सिद्धांत आणि समकालीन सामाजिक प्रश्न यांचा अभ्यास आपल्या मातृभाषेतून करण्याची गरज प्रकर्षाने जाणवत होती. या जाणिवेतूनच परिषदेने संशोधन पत्रिकेची निर्मिती केली आहे. समाजशास्त्राच्या स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील विविध अंगांचा- जसे की आदिवासी, ग्रामीण व शहरी समाजरचना, जात आणि वर्गव्यवस्था, लिंगभेद, शिक्षण, सामाजिक चळवळी, जागतिकीकरण, सांस्कृतिक परिवर्तन - चिकित्सक व शास्त्रीय अभ्यास या अंकातून सातत्याने मांडला गेला. गेल्या ३३ वर्षात समाजशास्त्र संशोधन पत्रिकेतून अनेक विषयावर शास्त्रीय, संशोधनात्मक व समीक्षणात्मक विषयावर विविध मान्यवरांच्या माध्यमातून लेख प्रकाशित केले आहेत.

मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र असलेले 'समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा' ३३ व्या अंकासाठी सामाजिक असमानता आणि शासकीय धोरणे हा ज्वलंत विषय मुख्य विषय म्हणून ठरविण्यात आला. तसेच २०२५ या अंकाचे प्रकाशन करण्यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक यांची मुख्य संपादक म्हणून तसेच कार्यकारी संपादक म्हणून डॉ. प्रशांत सोनवणे, प्रा. डॉ. वाल्मिक इंदासे व प्रा. डॉ दिगंबर तंगलवाड यांची निवड करण्यात आली आहे. मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र असलेल्या 'समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा' ३३ वा अंक दर्जेदार होण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. त्याला प्राध्यापक, संशोधक, मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांनीही चांगला प्रतिसाद दिला. संशोधन पत्रिका उत्तम व दर्जेदार पद्धतीने प्रकाशित व्हावी यासाठी समीक्षा समितीचे नव्याने गठण करण्यात आले. पत्रिकेचे कार्यकारी संपादक म्हणून म्हणून डॉ. प्रशांत सोनवणे, प्रा. डॉ. वाल्मिक इंदासे व प्रा. डॉ दिगंबर तंगलवाड याची निवड केली गेली.

समीक्षा समितीने सर्व संशोधनपर निबंधांचे वाचन करून समीक्षा केली आहे. ज्या संशोधनपर निबंधांमध्ये उणिवा दिसून आल्या ते संशोधनपर निबंध संशोधकांकडे योग्य सूचनांसह दुरुस्तीसाठी पाठवून पुन्हा मागविण्यात आले. परंतु आलेल्या संशोधन निबंधांची पुन्हा समीक्षा केली व त्यावर योग्य ते संस्कार करून संशोधनात्मक चौकटीत बसविण्यात मान्यवर समीक्षकांसह मुख्य संपादक प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक, कार्यकारी संपादक डॉ. प्रशांत सोनवणे, प्रा. डॉ. वाल्मिक इंदासे व प्रा. डॉ दिगंबर तंगलवाड यांनी अथक परिश्रम घेतले.

जळगाव येथील अधिवेशनाच्या आमसभेत पारित झालेल्या ठरावानुसार परिषदेच्या संशोधन पत्रिकेच्या छपाईतील खर्च कमी करण्यासाठी आपण समाजशास्त्र संशोधन पत्रिका ऑनलाइन स्वरूपात प्रसिद्ध करीत आहोत. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांना हा अंक वेबसाईटवर पीडीएफ स्वरूपात वाचता येईल. तसेच संशोधकांचे संशोधनपर निबंध या संशोधन पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत त्यांना या अंकाची हार्ड कॉपी त्यांनी दिलेल्या संपर्क पत्त्यावर लवकरच पाठविली जाईल. या अंकाच्या संदर्भात आपल्या प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. धन्यवाद!

**मुख्य संपादक**
**प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**

**कार्यकारी संपादक**
**प्रा. डॉ. दिंगबर तंगलवाड**   **डॉ. वाल्मिक इंदासे**   **डॉ. प्रशांत सोनवणे**

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

डिसेंबर २०२५, वर्ष ४३ वे, अंक ३३ वा

**ISSN 2230-7745** (SJIF Impact Factor - 7.88)

**समकक्ष समीक्षा समिती (Peer Review Committee)**

**प्रा. डॉ. बालाजी केंद्रे** - समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे** - कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव.

**प्रा. डॉ. संजय कोळेकर** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**प्रा. डॉ. अभय जायभाये** - आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे ता. जि. सातारा

**प्रा. डॉ. अरुण चव्हाण** - प्रतिभा विद्यानिकेतन महाविद्यालय, जि. अमरावती.

**प्रा. डॉ. मधुकर चाटसे** - राजर्षी शाहू महाविद्यालय वाळूज जि. छत्रपती संभाजीनगर

**प्रा. डॉ. नवनाथ शिंदे** - राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जि. जालना.

**प्रा. डॉ. चांगदेव मुंढे** - गोदावरी महाविद्यालय, अंबड, जि. जालना.

**प्रा. डॉ. रामचंद्र भिसे** - दिगंबर बिंदू महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड.

**प्रा. डॉ. मारोती बामणे** - वै. धुंडा महाराज देगलुरकर महाविद्यालय देगलूर. जि. नांदेड.

**प्रा. डॉ. अर्जुन जाधव** - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

**प्रा. डॉ. अनुराधा खाडे** - कै. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जि. भंडारा.

**प्रा. डॉ. सुधाकर जाधव** - आदर्श महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.

**प्रा. डॉ. श्रीनिवास पिलगुलवार** - लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

डिसेंबर २०२५ वर्ष ४३ वे अंक ३३ वा

**ISSN 2230-7745** (SJIF Impact Factor - 7.88)



| अ. क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक व लेखकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक असमानता आणि विकास: समाजशास्त्रीय अभ्यास** - डॉ. कालिदास मारुती भांगे आणि डॉ. प्रशांत विष्णू सोनवणे | ०१ |
| २ | **जात, वर्ग आणि लिंग असमानतेतून उद्भवणाऱ्या महिलांच्या तक्रारींना प्रतिसाद देणाऱ्या समुपदेशन केंद्रांचा आंतरसंबंधीय अभ्यास** - प्रा. इंदू चंद्रकांत साळुंके | ०७ |
| ३ | **महाराष्ट्र सरकारच्या धोरणांमधील सामाजिक असमानता: एक अध्ययन** - प्रा. डॉ. चांगदेव निवृती मुंढे | १३ |
| ४ | **जात, वर्ग आणि लिंग: भारतीय शासकीय धोरणे आणि तिहेरी असमानतेचा प्रश्न** - डॉ. ज्योती अरविंद पोटे | १७ |
| ५ | **सामाजिक असामानता: शासकीय धोरणांचे सिद्धांत, व्यवहार आणि प्रभाव** - डॉ. सुनील व्यंकटेश सामग | २३ |
| ६ | **भारतामधील दिव्यांग महिलांवरील लिंग, जात आणि दिव्यांगत्वाचा आंतरविभागीय परिणाम: एक समाजशास्त्रीय विश्लेषण** - जयसिंग पी. सिंगल | २६ |
| ७ | **सामाजिक असमानता आणि आदिवासी संदर्भातील शासकीय धोरणे: एक समाजशास्त्रीय अभ्यास** - डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे | ३१ |
| ८ | **लिंगभाव आधारित असमानता आणि महिला-केंद्रित शासकीय धोरणे: एक समाजशास्त्रीय विश्लेषण** - डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे | ३३ |
| ९ | **सामाजिक असमानता व शासकीय धोरणे** - डॉ. शिल्पा प्रकाश जाधव | ३६ |
| १० | **लिंग असमानता आणि महिलांच्या हक्काचा अभ्यास** - प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण | ४३ |
| ११ | **अनुसूचित जातींचे उप-वर्गीकरण: संवैधानिक विश्लेषण** - प्रा.कांबळे संजयकुमार | ४७ |
| १२ | **महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना: धोरणात्मक हस्तक्षेप आणि सामाजिक असमानता** - डॉ. समाधान एल. कुंभार | ५४ |
| १३ | **शासकीय शैक्षणिक धोरण आणि सामाजिक असमानता: समाजशास्त्रीय विश्लेषण** - मिलिंद आर. घाटे | ६२ |
| १४ | **जातीव्यवस्थेतील सामाजिक असमानता शासकीय धोरणे आणि उपाययोजना** - प्रा. अनिल गावंडे | ६६ |
| १५ | **ग्रामीण समाजव्यवस्थेतील असमानता आणि बदलती जीवनशैली** - डॉ. किशोर उत्तमराव राऊत | ६९ |
| १६ | **सामाजिक विषमता आणि आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण: भारतीय संदर्भातील समाजशास्त्रीय अभ्यास** - डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर | ७४ |
| १७ | **स्त्रियाविषयी विकृत धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन आणि शासकीय धोरण** - डॉ. माया बापुराव मसराम | ७९ |

| | | |
|---|---|---|
| १८ | **स्त्री भ्रूणहत्या समस्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण**<br>- प्रो. डॉ. दिगंबर तंगलवाड | ८२ |
| १९ | **नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषण व बालविवाह समस्या - एक चिकित्सक अभ्यास**<br>- डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे | ८६ |
| २० | **शिक्षण क्षेत्रात समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांचा वापर: परिणाम व उपाय**<br>- डॉ. गोपाल एम. गांगर्डे | ९० |
| २१ | **कौटुंबिक हिंसाचार: एक सामाजिक समस्या**<br>- डॉ. रामदास वैद्य | ९४ |
| २२ | **महिलांसाठी शासकीय योजना व कार्यक्रम: एक अभ्यास**<br>- डॉ. सोमा पी गोंडाणे | ९७ |
| २३ | **वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये सामाजिक कार्याचा हस्तक्षेप**<br>- रुचि अनिलराव बोरकर आणि अभिजीत अनिलराव बोरकर | १०१ |
| २४ | **नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील भटक्या विमुक्त जाती-जमातींना परिघावरून मुख्य प्रवाहात येण्याच्या प्रक्रियेतील अडथळयांचा समाजशास्त्रीय अभ्यास**<br>- प्रा.महेश अर्जुन शिंदे | १०७ |
| २५ | **भारतीय लोकशाही समोरील आव्हाने: समाजशास्त्रीय चिंतन**<br>- डॉ. जयमाला लाडे | १११ |
| २६ | **सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई यांनी विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान**<br>- डॉ. प्रेरणा दिलीप दीक्षित | ११७ |
| २७ | **गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या विवाह पद्धतीचे समाजशास्त्रीय अध्ययन**<br>- प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार | १२४ |
| २८ | **साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिकेच्या आधारे उच्य वर्ग आणि मध्यम वर्गातील जीवनशैलीचा दृश्य माध्यमातून तुलनात्मक अभ्यास**<br>- प्रा. मंजिता कुलकर्णी आणि डॉ. दिलीप खैरनार | १२६ |
| २९ | **समाजाचे मानसिक आरोग्य: समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून एक संशोधन**<br>- डॉ. अंजली जोशी टेंभुर्णीकर | १३१ |
| ३० | **सामाजिक असमानता निर्मूलनात शासकीय धोरणांची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास**<br>- डॉ. रमेश धोंडीराम राठोड | १३४ |
| ३१ | **ग्रंथ परिचय** | १३८ |

# भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक असमानता आणि विकास: समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.(डॉ.) कालिदास मारुती भांगे** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्री. आसारामजी भांडवलदार कला, वाणिज्य आणी विज्ञान महाविद्यालय, देवगाव (रं.) ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

**डॉ. प्रशांत विष्णू सोनवणे** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

**गोषवारा:** भारतातील सामाजिक-आर्थिक असमानता समाजातील नैसर्गिक संसाधनांच्या असमान वितरणामुळे स्थिती, स्थान आणि परिणामांमध्ये फरक निर्माण करते. समाजातील सामाजिक असमानता व्यक्ती, कुटुंबे आणि गटांमधील संसाधनांच्या आधारे निश्चित केली जाते. असमानता ही एक जागतिक घटना आहे, सर्वत्रच तीव्रता कमी—अधिक आहे.सामाजिक असमानता सतत निर्माण आणि पुनर्निर्मित केली जात आहे आणि तिचे स्वरूप बदलत आहे. सामाजिक, आर्थिक असमानता ही एक परिपूर्ण घटना नाही, तर ती काल सापेक्ष घटना आहे. समानता आणि असमानता समाज, समुदाय आणि कुटुंबांमध्ये एकत्र राहू शकतात. उत्पन्न, व्यवसाय, शिक्षण आणि स्पर्धा यासारखे घटक असमानतेचे संपूर्ण स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत. शिवाय, औद्योगिक दृष्ट्या प्रगत समाजामध्ये / देशामध्ये स्पर्धा आणि प्रायोजकत्व देखील असमानतेचे मुख्य मूल्य म्हणून प्रचलित आहे. सामाजिक-आर्थिक असमानतेचे निराकरण करण्यासाठी, त्याच्या स्पष्ट आणि वास्तविक पैलूंमधील संबंध ओळखणे आणि योग्य चौकट विकसित करणे आवश्यक आहे. समाजात प्रचलित असमानतेचे वर्तन आणि स्वरूप वेग-वेगळे असु शकतात. सध्या, सामाजिक स्थिती, शुद्धता-अशुद्धता, अस्पृश्यता, स्तरीकरण इत्यादी असमानतेच्या मूलभूत मूल्यांमध्येच बदल झाले नाहीत, तर या बदलांमुळे सामाजिक स्तरीकरणाच्या पारंपरिक व्यवस्थेतील विरोधाभास, विसंगती आणि विखंडन देखील दिसून येते. सध्या, जात, वर्ग, सत्ता आणि सामाजिक गतिशीलता यांच्यातील सातत्य एका नवीन, ऐतिहासिकदृष्ट्या संबंधित स्वरूपात उदयास आले आहे. सामाजिक-आर्थिक असमानता समजून घेण्यासाठी, प्राथमिक कारणे आणि घटकांसह, विविध घटक आणि प्रभावी शक्तीं यांना समजून घेणे आवश्यक आहे. सदरील शोध निबंध "भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक असमानता आणि विकास", याचे आवलोकन केलेले आहे. विकासाच्या नावाखाली श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढती दरी, सामाजिक-आर्थिक असमानता, असमानतेचे प्रचलित नमुने आणि लोकसंख्येसमोरील नव्याने निर्माण झालेली आव्हाने, दुय्यम सामग्रीच्या आधारे अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना:** भारतीय समाजात प्राचीन काळापासून सामाजिक, आर्थिक आणि लिंग विषयक असमानता असुन, आधुनिक भारतात आर्थिक, सामाजिक विषमते बरोबरच सांस्कृतिक विषमता ही निर्माण झालेली दिसून येते. आर्थिक विषमता ही सर्व विषमतेचे मूळ आहे असे म्हटले तर अतिशोक्ती ठरणार नाही. असमानता ही केवळ उच्च आणि निम्न संबंधाच्या कोणतेही स्पष्टीकरण देणारी वैचारिक घटना नाही. ती एक अस्तित्वात असलेल्या परिस्थितीशी आणि संसाधनाच्या वितरणाच्या व्यवस्था मधील फरक देखील दर्शवते. असमानताशी संबंधित सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध कसे विकसित होतात, बदलतात आणि प्रभावीत करतात यावर अवलंबून आहे. असमानता (विषमता) ही एक जागतिक पातळीवरची समस्या आहे. सामाजिक असमानता ही समाजशास्त्रातील एक मुलभूत संकल्पना आहे. समाजात सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे विषमपद्धतीने वितरण झालेले असते. त्यामुळे समाजातील व्यक्ती, समूहात व समाजात असमानता निर्माण होते. जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे खास वैशिष्ट्ये आहे. आजही जातीच्या आधारावर भारतीय समाजात भेदभाव केला जातो. सध्या भारतीय समाज बऱ्याच सामाजिक समस्यांनी ग्रस्त आहे. ज्याचे निराकरण करण्यासाठी, सरकार आणि समाजाकडून संयुक्तपणे प्रयत्न केले जात आहेत. भारतीय समाजात मुख्य समस्या ही लोकसंख्यावाढ, बेरोजगार, असमानता, निरक्षता, दहशतवाद, भ्रष्टाचार, नशा, हुंडा, बालविवाह, भ्रूणहत्या, जीवघेणे रोग, घटस्फोट या समस्यांचा समावेश आहे. सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, त्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

परिवर्तन हा समाजाचा नियम आहे. जितका समाज गतिमान आणि परिवर्तनशील असेल त्या प्रमाणात समस्या निर्माण होतील. वेगवेगळ्या युगात सामाजिक परिवर्तनाचे गति वेग-वेगळी होती. सध्या सामाजिक बदल अतिशय

वेगाने होत आहे. या बदलत्या आधुनिक समाजाच्या, सामाजिक समस्यांच्या निर्मूलनासाठी नेहमीच प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक विषमता नष्ट झाली तरच निरोगी समाजाची निर्मितीहोईल, असे मत ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांनी व्यक्त केलं आहे, आणि बरोबर आहे. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी "शिक्षण" खूप गरजेचं आहे, त्यामुळे आर्थिक सुबकता येते. गावा-गावात शिक्षण केंद्र असलेच पाहिजे. शिक्षण पद्धती पण "घोकम पद्धती" नको.त्या केंद्रांमध्ये "व्यावसायिक ट्रेनिंग" सारखे उपक्रम राबवले पाहिजेत, जेणेकरून व्यवसाय, लघुउद्योग, ग्रामीण भागापर्यंत पोहचतील. कोणीही काही डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक, शस्त्रज्ञ अशा मोठ-मोठ्या पदव्या घेवून जन्माला येत नाहीत. प्रत्येकालाच परीश्रम करावा लागते, त्यासाठी निती व नियोजन आवश्यक आहे.ग्रामीण भागात दवाखाने नाहीत. आज भारतात प्रत्येक हजार माणसांमागे एक डॉक्टर आहे, ग्रामीण भागात सोई नाहीत. सरकार किती ही नियम व कडक कायदे करू दे, तरी पण सर्वानां शहरांत दवाखाणे उभे करायचे असतात, मग आपल्या ग्रामीण भागाचं काय? ह्या सर्व गोष्टीचं विश्लेषण व नीति नियोजन करून प्रयत्न करायला हवे .

सामाजिक विषमता ही राहणारच, हा दुरावा कसा कमी करता येईल, या साठी प्रयत्न करण्याची गरज आहे. भारत, एक वैविध्यपूर्ण आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असलेला देश आहे, परंतु येथे सामाजिक असमानता एक गंभीर आणि वाढत चाललेली समस्या आहे. ही केवळ उत्पन्न किंवा संपत्तीच्या विषमतेपुरती मर्यादित नाही, तर शिक्षण, आरोग्य, संधी आणि सामाजिक स्थितीमध्येही खोलपर्यंत रुजत चाललेली असमानता आहे. यामुळे आपल्या समाजाचा पाया कमकुवत होउन सर्वसमावेशक विकासात अडथळे निर्माण होतात. भारतातील ऐतिहासिक जातीव्यवस्था सामाजिक असमानतेचे एक मूलभूत कारण राहिलेली आहे. या व्यवस्थेने शतकानुशतके समाजाला विविध स्तरांमध्ये विभागुण ठेवलेले आहे, ज्यामुळे काही गटांना विशेषाधिकार मिळाले तर इतरांना शिक्षण, संपत्ती आणि संधींपासून वंचित ठेवले गेले. उदारीकरण आणि जागतिकीकरण १९९१ च्या आर्थिक सुधारणांनी जलद आर्थिक वाढीस प्रोत्साहन दिले, परंतु त्याचा लाभ समान रीतीने वितरित झाला नाही. जागतिकीकरणाने उच्च व कुशल व्यावसायिक आणि मोठ्या व्यवसायांना फायदा दिला, तर अकुशल कामगार आणि छोटे व्यवसायीक मागे पडले, ज्यामुळे उत्पन्नातील अंतर वाढले. शिक्षणातील असमानता, दर्जेदार शिक्षणापर्यंत पोहोचण्यात मोठी असमानता आहे. खाजगी शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांच्या वाढत्या फीमुळे गरिबांना चांगले शिक्षण घेणे कठीण झाले आहे. याचा परिणाम म्हणून समाजातील खालच्या स्तरातील लोक चांगल्या नोकऱ्या आणि संधींपासून वंचित राहतात. ग्रामीण आणि शहरी भाग, तसेच श्रीमंत आणि गरीब यांच्या पर्यंत आरोग्य सेवा पोहोचण्यात मोठे अंतर आहे. गरिबांना अनेकदा दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळत नाहीत, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि उत्पादकतेवर परिणाम होतो.

**सामाजिक असमानता:** असमानता म्हणजे विषमता होय. थोडक्यात आपण म्हणू शकतो की, सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, धर्म, जात, वर्ग, वंश, वर्ग संपती, लिंग, स्थान या आधारे समाजात आढळून येणारी असमानता म्हणजेच विषमता होय. यामुळे आहेरे व नाहीरे असे दोन वर्ग तयार होतात. आहेरे म्हणजे काय? तो कसा आहेरे म्हणजे ज्याच्याकडे सर्व काही आहे. गरज नसताना ही त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती व संसाधने असतात. नाहीरे म्हणजे काय? तो कसा सामाजिक आणि आर्थिक असमानता यामुळे बनतो. समाजातील अशी व्यक्ती किंवा समूह ज्याकडे काहीच नाही श्रम करून जगणारी. जीवनावश्यक मुलभूत गोष्टीचा त्यांच्या कडे अभाव असतो. कोणत्याही प्रकारचे संपती व संसाधनाचा अभाव त्यांच्याकडे असतो.

**सामाजिक असमानता व्याख्या:** सामाजिक विषमता म्हणजे समाजातील व्यक्ति—व्यक्ती वा समूहा—समूहात विशेषाधिकार, भौतिक पारितोषिके, संधी, सत्ता, प्रतिष्ठा, प्रभाव यांचे होणारे विषम वितरण होय. टिशलेर, व्हायटन आणि हंटर यांनी केलेली सामाजिक असमानता यांची व्याख्या सामजिक विषमता जेव्हा समाज—संरचनेचा भाग बनते तेव्हा सामाजिक स्तरीकरण अस्तित्वात येते. समाजातील विविध सामाजिक संस्थांद्वारे अस्तित्वात आलेली स्तरीकरण व्यवस्था टिकवून ठेवली जाते आणि हि व्यवस्था टिकून ठेवण्याचे प्रयत्न हजारो वर्षापासून भारतात आहेत.

**सामाजिक असमानता आणि विविध स्थाने व दर्जा:** समाजात व्यक्तीला दोन पद्धतीने स्थान मिळत असते. एक जन्माने तर दुसरे हे स्वकष्टाने. जन्माने जे काही आपल्याला मिळते त्याला अर्पित दर्जा असे म्हणतात. स्वकष्टाने जे काही आपण मिळवतो त्याला अर्जित दर्जा असे म्हणतो. समाजात व्यक्तीने योग्य पद्धतीने त्याला दिलेली भूमिका किंवा जबाबदारी वठवावी म्हणून काही पारितोषिके दिली जातात. ही पारितोषिके पैशाच्या स्वरूपात जशी असतात (उदा. वेतन किंवा पगार) तशीच भौतिक वस्तूंच्या रूपात किंवा आत्मसन्मान, प्रतिष्ठा, सत्ता या स्वरूपातही असतात. या गोष्टी समाजातील सर्वांना सारख्या प्रमाण दिल्या जात नाहीत. त्यामुळे समाजात सामाजिक असमानता आढळून येते, सामाजिक विषमता भारताची ज्वलंत समस्या आहे. भारतात जन्म घेवून,

भारतीय नागरिक असून, आपल्याला असं काही आढळून येतं कि हे काय चाललंय आहे? असे प्रश्न निर्माण होतात.

**लिंग आणि असमानता**: भारतीय समाजात स्त्रियांचे उत्पादन ग्रहीत धरले जात नाही. अप्रत्यक्षमोठे आहे. या संदर्भात अमिताभ बेहर यांचे म्हणणे आहे की गेल्या तीन दशकांपासून जागतिक स्तरावर वांशिक आणि वांशिकतेवर आधारित असमानता कमी होत असताना, घरगुती उत्पन्नातील असमानता वाढली आहे. अनेक देशांमध्ये, विशेषतः आर्थिकदृष्ट्या प्रगत देशांमध्ये, लिंग-पक्षपाती अर्थव्यवस्था असमानतेच्या संकटाला खतपाणी घालत आहेत. सामान्य लोकांच्या आणि विशेषत गरीब महिला आणि मुलींच्या उपजीविकेच्या खर्चावर उच्चभ्रूंचे प्रमाण वाढत आहे. आपली विखुरलेले अर्थव्यवस्था सामान्य लोकांच्या उपजीविकेच्या खर्चावर अब्जाधीश आणि मोठे व्यवसायिक/मालकांचे खिसे भरत आहेत. अब्जाधीशांचे अस्तित्व आवश्यक आहे का? बेलाचा असा युक्तिवाद आहे की, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी असमानता दूर करणाऱ्या उद्देशपूर्ण धोरणे आणि कृतींबद्दल वचनबद्धते शिवाय भरता येत नाही. महिला आणि मुलींना सध्याच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात कमी फायदा होतो. महिला आपल्या समाजाच्या "अप्रत्यक्ष इंजिन" आहेत, स्वयंपाक करण्यात, साफसफाई करण्यात आणि पशुधन आणि गुरांची काळजी घेण्यात असंख्य तास घालवतात, अप्रत्यक्षपणे आपल्या समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था चालवतात. यामुळे महिला आणि मुलींना शिक्षण मिळविण्याच्या आणि चांगले जीवन जगण्याच्या मर्यादित संधी मिळतात. म्हणूनच महिला अर्थव्यवस्थेच्या तळाशी अडकल्या आहेत. आणि म्हणूनच, सामाजिक सुव्यवस्था राखण्यात महिलांचा सहभाग कमी होत आहे.

न्याय आणि अन्याय नाही, बेहर यांना असा विश्वास आहे की, उच्च उत्पन्न असलेल्या कंपन्या आणि महामंडळांवर सरकारकडून योग्य कर आकारणी केल्याने महिलांची स्थिती सुधारण्यास आणि गरिबी आणि असमानतेवर मात करण्यास मदत होऊ शकते. शिवाय, सरकारे कमी निधी असलेल्या सार्वजनिक सेवा आणि पायाभूत सुविधांवरील महिला आणि मुलींचा भार कमी करू शकतात. केवळ काही श्रीमंत आणि उच्च-स्तरीय व्यवसायांसाठी नव्हे तर अधिक समावेशक अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी सरकारांनी इतर महत्त्वाच्या क्षेत्रांप्रमाणे महिलांच्या काम आणि काळजी घेण्याच्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे.

**लोकशाही मूल्ये आणि विरोधाभास**: वाढत्या असमानतेबाबत परस्पर विरोधी मत प्रवाह आहेत. पहिला दृष्टिकोन असा आहे की, असमानता ही आर्थिक वाढ आणि जागतिक तांत्रिक प्रगतीचा अपरिहार्य परिणाम आहे. दुसरा दृष्टिकोन असा आहे की असमानता ही विकासाचा अपरिहार्य परिणाम नाही तर ती जाणीवपूर्वक केलेल्या आर्थिक आणि राजकीय धोरणांचा परिणाम आहे, जी व्यवस्था दोन घटकांनी चालवली जाते. बाजाराचे स्वरूप आणि उच्चभ्रू लोकांचे आर्थिक सत्तेवर नियंत्रण. भारतात दोन्हीचे पुरावे उपलब्ध आहेत. भारतातील यशस्वी सरकारांनी बाजार भांडवलदार वर्गाला पाठिंबा दिला आहे. सध्याचे आर्थिक धोरणकर्ते सरकारी खर्च कमी करून आर्थिक वाढीसाठी बाजारपेठ मुक्त करण्याचे समर्थन करतात. हे धोरण शिक्षण, पोषण आणि आरोग्यामध्ये सरकारी हस्तक्षेपाला विरोध करते, कर आकारणी वाढवते आणि कामगार संरक्षण आणि जमीन आणि जंगले संपादित करण्याचे आवाहन करते. या सर्व सरकारी धोरणामुळे असमानता वाढवते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टीन लाझार्ड यांच्या मते, अनेक देशांमध्ये, विकासाचे फायदे आतापर्यंत खूप कमी लोकांपर्यंत पोहोचले आहेत. हा स्थिरता आणि शाश्वततेचा मार्ग नाही. (हिंदू बिझनेस लाईन२०१४) असमान उत्पन्न वितरण वाढीची गती आणि शाश्वतता आणखी कमकुवत करू शकते, ज्यामुळे बहिष्काराची अर्थव्यवस्था निर्माण होते. अमेरिका आणि भारतातील वाढत्या असमानतेची तुलना करताना, लाझार्ड म्हणतात, "अमेरिकेत, महामंदीपूर्वी अस्तित्वात असलेली असमानता परत आली आहे आणि आता, २००९ पासून, श्रीमंतांनी उत्पन्न आणि नफ्यातील ९३ टक्के हिस्सा मिळवला आहे, तर तळातील ९० टक्के लोक गरीब झाले आहेत." भारतात, १५ वर्षांत अब्जाधीश समुदायाची एकूण संपत्ती १२ पटीने वाढली आहे, जी देशातील निरपेक्ष गरिबी दूर करण्यासाठी पुरेशी असू शकते. लाझार्डचा असा युक्तिवाद आहे की, प्रचलित आर्थिक रूढीवादाच्या विरुद्ध, संपत्ती वितरण आणि पुनर्वितरण धोरणे विकासासाठी हानिकारक नाहीत, कारण उत्पन्नात गरिबांचा वाटा वाढवल्याने विकासावर गुणाकार परिणाम होईल. तथापि, श्रीमंतांशी असे केल्याने देशाच्या आर्थिक वाढीवर कोणताही परिणाम होणार नाही.

निशा अग्रवाल (सीईओ, ऑक्सफॅम इंडिया) यांच्या मते, भारताच्या आर्थिक वाढीचे फायदे काही मोजक्या लोकाना होत आहेत, हा चिंतेचा विषय आहे. अब्जाधीशांची जलद वाढ ही वाढत्या अर्थव्यवस्थेचे लक्षण नाही, परंतु निश्चितच अपयशी अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. देशासाठी अन्न उत्पादन करण्यासाठी, पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी कठोर परिश्रम करणारे लोक त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी, कुटुंबातील सदस्यांसाठी औषधे खरेदी

करण्यासाठी आणि दिवसाचे दोन वेळचे जेवण परवडण्यासाठी संघर्ष करत आहेत. दुसरीकडे शोषण अधिक प्रमाणात आहे. ही लोकशाही मूल्यांना मारक आहे. त्यातून असंतोष वाढून अस्थिरता निर्माण होईल.

**लोकसंख्या आणि असमान संधीं:** सामाजिक आणि आर्थिक शिडीच्या तळाशी असलेल्यांवर असमानतेचा परिणाम झाला आहे. असमान जीवनाच्या संधी, लिंगभेद, संपत्ती आणि शैक्षणिक संधींमधील असमानता, तसेच उच्चभ्रू आणि उपेक्षितांमधील वाढती दरी यामुळे तळागाळात वाढत जाणारी निराशा हि धोकादायक आहे, तरुणांना संधींचा अभाव आहे. राष्ट्रीय सर्वेक्षण कार्यालयाच्या मते, भारतातील ६५ टक्के लोकसंख्येला काम करण्याच्या वयाची आहे, म्हणजेच भारत प्रगतीसाठी तरुण लोकसंख्या वापरू शकतो. तथापि, दुर्दैव अशी आहे की, या तरुण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी ५० टक्के लोक सध्या बेरोजगार आहेत आणि त्यांच्याकडे संधींचा अभाव आहे. बेरोजगारी वाढत आहे आणि देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात, कोणत्याही परिस्थितीत, काम करण्यास इच्छुक तरुणांची संख्या सतत वाढत आहे. सामाजिक-आर्थिक असमानता देखील लोकसंख्या-शास्त्रीय संक्रमणाचे संकट समोर करते, विशेषतः आर्थिक असमानता. भारत सध्या अशा टप्प्यातून जात आहे जिथे त्याच्या लोकसंख्येचा मोठा भाग काम करण्याच्या वयात आहे. अनेकांनी याला भारतासाठी लाभांश मानले आहे. याला युवा पिढीचा उदय असेही म्हणता येईल. या देशातील तरुणांना त्यांच्या जीवनात आणि त्यांच्या क्षमतेचा वापर करण्याच्या संधींमध्ये मोठ्या प्रमाणात असमानतेचा सामना करावा लागतो. भारतातील काम करणाऱ्या तरुणांची संख्या आणि असमानता याबद्दल काही दृष्टिकोन समोर आहेत.

भारतातील तरुण काम करणाऱ्या लोकसंख्येला त्यांच्या पूर्ण क्षमतेने अर्थव्यवस्था आणि समाजात योगदान देण्यासाठी आवश्यक असलेले पोषण, आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण आणि मनोबल प्रदान केले पाहिजे. शिवाय, सर्व तरुणांसाठी पुरेशा रोजगाराच्या संधी आवश्यक आहेत. या तरुणांना त्यांच्या क्षमतेचा वापर करून लक्षणीय वाढ साध्य करता येते, परंतु बहुतेक बेरोजगार राहतात. उच्च आर्थिक वाढीमुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे, काही नोकऱ्या कमी लक्ष्यित आणि कमी पगाराच्या असल्याने असुरक्षित बनत आहेत. सत्तेचे केंद्रीकरण काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित होत चालले आहे, ज्यामुळे इतर वर्गांसमोर आव्हान निर्माण होत आहे. मध्यमवर्गाच्या ऱ्हासामुळे कनिष्ठ वर्गाचे शोषण होत आहे, ज्यामुळे त्यांच्यातील दरी अधिक खोलवर जात आहेत. खाजगीकरणच्या धोरणांमुळे हे विभाजन वेगाने वाढत आहे.

**नैसर्गिक संसाधने आणि असमानता:** भारतात नैसर्गिक संसाधनांचे वितरण अजूनही असमान आहे. ते काही शक्तिशाली लोकांच्या हातात केंद्रित आहे, तर मोठ्या संख्येने लोक भूमिहीन आहेत किंवा त्यांच्याकडे खूप कमी संसाधने आहेत, ज्यामुळे त्यांची आर्थिक सुरक्षा प्रभावित होते. लैंगिक असमानता महिलांना अनेकदा शिक्षण, रोजगार आणि मालमत्तेच्या हक्कांच्या बाबतीत पुरुषांपेक्षा कमी संधी मिळतात. कामाच्या ठिकाणी वेतन असमानता आणि महिलांवरील भेदभाव देखील सामाजिक असमानता वाढवते. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामध्ये, ज्यांच्याकडे डिजिटल उपकरणे आणि इंटरनेटची सुविधा नाही, ते संधींपासून वंचित राहतात. ही डिजिटल दरी शिक्षण, रोजगार आणि माहितीपर्यंत पोहोचण्यात असमानता निर्माण करते. कमकुवत सामाजिक सुरक्षा जाळे: भारतात एक मजबूत आणि व्यापक सामाजिक सुरक्षा जाळे नाही जे सर्वात असुरक्षित वर्गांना बेरोजगारी, आजारपण किंवा वृद्धापकाळात आधार देऊ शकेल. मनरेगासारख्या योजना महत्त्वाच्या आहेत, परंतु त्या पुरेशा नाहीत.

**असमानतेची उदहरणे:** ऑक्सफॅम अहवालाचे विश्लेषण भारतात, व्यक्ती शिक्षण, संपत्ती आणि जीवनाच्या संधींचा सातत्य घेऊन जन्माला येतात. "रिवॉर्ड वर्क, नॉट वेल्थ" (२०१८) या ऑक्सफॅम अहवालानुसार, २०१७ मध्ये, जागतिक संपत्तीचा ८२ टक्के भाग फक्त १० टक्के श्रीमंतांच्या हातात केंद्रित झाला होता, तर जगभरातील ३.७ अब्ज लोक जे गरीब वर्गात येतात त्यांच्या उत्पन्नात कोणतीही वाढ झाली नाही. विविध क्षेत्रांमध्ये ही असमानता सतत वेगाने वाढत आहे. आज भारतात अब्जाधीशांची संख्या वाढली आहे, परंतु त्याच वेळी, जगातील एक तृतीयांश लोकसंख्येची उपासमार आणि गरिबीत जीवन जगत आहेत. २०१७ मध्ये भारताने १७ नवीन अब्जाधीशांची भर घातली, ज्यामुळे भारतातील अब्जाधीशांची एकूण संख्या १०१ झाली, ज्यात एका महिला अब्जाधीशांचा समावेश आहे. भारतीय अब्जाधीशांची संपत्ती एकाच वर्षात २०.७ लाख कोटींहून अधिक वाढली आहे, जी पूर्वी ४.८९ लाख कोटी होती. ही रक्कम सर्व राज्यांमध्ये आरोग्य आणि शिक्षणासाठी एकूण बजेटच्या ८५ टक्के भाग भागवण्यासाठी पुरेशी होती.

गरिबीचा भार विशेषतः जन्म, जात, लिंग, धर्म आणि जमातीमुळे वंचित असलेल्यांवर पडतो. अनुसूचित जाती नसलेल्या गटांच्या तुलनेत, ग्रामीण भागात अनुसूचित जमातींमध्ये गरिबीचा दर १४ टक्के जास्त आणि दलितांमध्ये ९ टक्के जास्त आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात, दलित आणि मुस्लिमांमध्ये गरिबीचा दर इतर गटांपेक्षा १४ टक्के जास्त आहे.

उच्चभ्रूंनी जबरदस्तीने सत्ता हस्तगत करणे ही सार्वजनिक जीवनातील एक कुप्रसिद्ध कथा आहे. उच्चभ्रू लोक राजकीय प्रभाव खरेदी करतात, ज्यामुळे त्यांना कर सवलती, जमीन सवलती, स्वस्त कर्जे आणि अनुदानित वीज आणि पाणी यांचा फायदा मिळतो. भारतातील कंपन्यांवरील कर सवलती दरवर्षी ५ लाख कोटींच्या आहेत, ज्यामुळे शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवेसाठी भारताची अर्थसंकल्पीय तफावत लक्षणीयरीत्या भरून काढता येईल. ऑक्सफॅमचा अंदाज आहे की, जगातील सर्व अब्जाधीशांच्या संपत्तीवर १.५ टक्के कर लावल्यानेही प्रत्येक मुलाला जागतिक स्तरावर शाळेत जाण्याची आणि जगातील सर्व गरीब देशांमध्ये आरोग्यसेवा पुरवण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे अंदाजे २.३ दशलक्ष जीव वाचू शकतात. शिक्षण, आरोग्य आणि जीवनाच्या संधींच्या बाबतीत ही असमानता जागतिक स्तरावर सतत वाढत आहे, जी अन्याय आणि चिंतेची बाब आहे. एकीकडे श्रीमंत लोक आहेत जे संपत्तीत जन्माला येतात आणि त्यांच्या भावी पिढ्यांना पिढ्या-नपिढ्या आर्थिक स्थितीचा वारसा मिळतो. दुसरीकडे गरीब लोक आहेत, जे गरिबीत जन्माला येतात आणि भावी पिढ्या, सक्षम आणि मेहनती असूनही, अपंगत्व, वंचितता आणि गरिबीचे जीवन जगण्यास भाग पाडले जाते. ऑक्सफॅमच्या आंतरराष्ट्रीय कार्यकारी संचालक विनी ब्यंग्रिमा यांच्या मते, 'सर्वात जास्त गरीब देशातही, श्रीमंत कुटुंबात जन्मलेल्या मुलाला सर्वोत्तम शाळांमध्ये जाण्याची आणि आजारी पडल्यास उच्च दर्जाची काळजी घेण्याची संधी मिळते, तर गरीब कुटुंबांना पैशाअभावी त्यांच्या मुलांना उपचारांअभावी मरताना पाहावे लागते. (ऑक्सफॅम २०१४) सीईओ अमिताभ बेहर म्हणतात की, श्रीमंत आणि गरिबांमधील दरी असमानता कमी करणाऱ्या धोरणांशिवाय दूर करता येणार नाही. यासाठी अधिक सरकारी प्रयत्नांची आवश्यकता आहे. देशातील ७० टक्के लोकसंख्या असलेल्या तळाच्या ९५.३ कोटी लोकांकडे भारतातील १० टक्के श्रीमंतांच्या संपत्तीपेक्षा चार पट जास्त संपत्ती आहे, तर उर्वरित सर्व श्रीमंत लोकांची एकत्रित संपत्ती संपूर्ण वर्षाच्या बजेटपेक्षा जास्त आहे. जगातील २,१५३ अब्जाधीशांकडे ४.६ अब्ज लोकांपेक्षा जास्त संपत्ती आहे, जे जगातील ६० टक्के लोक आहेत. जागतिक आर्थिक मंचाच्या मते, जागतिक असमानता चिंताजनक आणि व्यापक आहे, अब्जाधीशांच्या संख्येत घट होऊनही दर दशकात अब्जाधीशांची संख्या दुप्पट होत आहे.

जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक अहवालात (२०२०) असा इशारा देण्यात आला आहे की २०१९ मध्ये समष्टि आर्थिक असुरक्षितता आणि आर्थिक असमानता वाढल्यामुळे श्रीमंत आणि गरिबांमधील दरी आणखी वाढत आहे. असमानतेविरुद्ध लढा दिल्याने आर्थिक विकासाला धक्का बसेल या व्यापक समजुतीच्या विरुद्ध, ऑक्सफॅमच्या (२०१९) अहवालात असे सूचित केले आहे की अति गरिबी ही विकासासाठी हानिकारक आहे याचे पुरावे वाढत आहेत. मजबूत आणि शाश्वत विकासासाठी असमानता कमी करणे आवश्यक आहे, कारण गरिबीमुळे इतर काम करणाऱ्या आणि सक्षम लोकसंख्येची उत्पादकता आणि मनोबल कमी होते, त्यामुळे बाजारपेठ क्षेत्रात सहभागी होण्यास सक्षम लोकांची संख्या कमी होते. भारतात, मनरेगा योजनेसारख्या सार्वजनिक गुंतवणूकीमुळे गरीब लोकसंख्येला केवळ सामाजिक-आर्थिक सुरक्षा मिळत नाही, तर लाखो लोकांना उत्पादक उत्पन्न मिळविण्याची संधी देखील मिळते, जे तळागाळातील आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की. भारतातील आर्थिक सुधारणांचे मूल्यांकन आपल्याला हे मान्य करण्यास भाग पाडते की शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील सार्वजनिक तरतूद कमी करणे हे एक पाऊल आहे ज्यामुळे सार्वजनिक नुकसान होऊ शकते. आर्थिक वाढ ही सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचितांसाठी चांगल्या जीवनाची हमी नाही. संपत्ती आणि भांडवलाचे असमान वितरण कमी करून, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा सर्वांना उपलब्ध करून दिली जाऊ शकते. जीवनाच्या संधी आणि जगण्याची संधी आणि दर्जेदार शिक्षणाच्या संधींची उपलब्धता, उपासमार, नोकरीची अनिश्चितता, स्थलांतर आणि चांगल्या आरोग्यापासून वंचित राहण्यापासून रोखू शकते. या नवीन संकटांपासून भारताला मुक्त करण्यासाठी, दृढ इच्छाशक्ती आणि आर्थिक धोरणांची आवश्यकता आहे. तरच आपण पुन्हा एकदा राजकीय आणि नैतिक इच्छाशक्तीचे रूपांतर करू शकू जेणेकरून सर्वांना सन्माननीय रोजगार, पुरेशी आरोग्य सेवा, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षितता मिळेल. बाजारपेठ आणि खाजगीकरण या गोष्टींची हमी देऊ शकत नाही आणि जोपर्यंत ती सामायिक केली जात नाही तोपर्यंत संपत्ती वाढू शकत नाही.

भारताची उदयोन्मुख तरुण लोकसंख्या अशा संधी निर्माण करते ज्या आपोआप लोकसंख्याशास्त्रीय लाभांशात रूपांतरित होऊ शकत नाहीत. हे साध्य करण्यासाठी, आपल्याला लोकसंख्येच्या आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक संरक्षणावर अधिक सार्वजनिक खर्चाची आवश्यकता आहे. आपल्याला शेतीमध्ये अधिक गुंतवणूकीची आवश्यकता आहे आणि लाखो लोकांच्या हातात प्रभावी मागणी वाढवून आणि बाजारात अधिक लोकांना सहभागी करून तळापासून विकासाला प्रोत्साहन

देणे आवश्यक आहे. वाढती असमानता रोखण्यासाठी सध्या अनेक उपाययोजना सुरू आहेत: वैधानिक वेतन वाढवणे आणि अंमलात आणणे, श्रीमंतांवर कर वाढवणे, शिक्षण, आरोग्य आणि लघु-प्रमाणात शेतीमध्ये गुंतवणूक वाढवणे, वृद्ध आणि अपंगांसाठी सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करणे, मातृत्व आणि बाल लाभ वाढवणे, मोठ्या प्रमाणात वंचित गटांचे संरक्षण करणे, ग्रामीण भागात आणि शहरी झोपडपट्ट्यांमध्ये पाणी, स्वच्छता आणि मूलभूत सुविधा सुनिश्चित करणे आणि कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणे. परंतु केवळ भारतातच नाही तर जगातील बहुतेक भागात, बाजारातील कट्टरतावाद आणि शक्तिशाली आर्थिक करार अजूनही राज्य प्राधान्ये ठरवतात आणि अधिक समतावादी धोरणांना विरोध करतात. म्हणून आपण अशा जगात राहतो जिथे गरीब लोक, महिला आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समुदाय कठोर परिश्रम करतात, परंतु सन्मानाने जगणे हे केवळ एक दूरचे स्वप्नच नाही तर जवळजवळ अशक्य स्वप्न देखील आहे.

सर्वसमावेशक शिक्षण सर्वांसाठी दर्जेदार आणि समान शिक्षण सुनिश्चित करणे. आरोग्य सेवेत गुंतवणूक सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करणे. जमीनसुधारणा जमिनीचे अधिक न्यायपूर्ण वाटप. कौशल्य विकास बदलत्या बाजारानुसार कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे. सामाजिक सुरक्षा योजनांचा विस्तार गरीब आणि दुर्बळांसाठी सुरक्षा जाळे वाढवणे.लैंगिक समानतेला प्रोत्साहन महिलांना समान संधी आणि हक्क देणे. प्रगतिशील करप्रणाली श्रीमंतांवर अधिक कर लादून संपत्तीचे पुनर्वितरण. प्रादेशिक संतुलन ग्रामीण विकास आणि प्रादेशिक असमानता कमी करणे. उदाहरण ग्रामीण भागातील एक मूल, ज्याच्याकडे इंटरनेट नाही आणि जो केवळ सरकारी शाळेत शिकतो, तो शहरी मुलाच्या तुलनेत खूप मागे राहतो, ज्याच्याकडे खाजगी शाळा, कोचिंग आणि डिजिटल उपकरणांपर्यंत पोहोच आहे. हे शिक्षण आणि भविष्यातील संधींमधील स्पष्ट असमानता दर्शवते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. सुमित्रा शर्मा सहायक आचार्य, समाजशास्त्र विभाग, मोहनलाल सुखाडिया विश्वविद्यालय, उदयपुर
2. Unequal Life Chances: Equity & Demographic Transition in India New Delhi, Sage, Yoda Press Napa, R. 2012.
3. Verma, N.MP. &Srivastav, Alpana. 2021. The Routledge Handbook of Exclusion, Inequality & Stigma in India. India, Routledge
4. One Illness Away: Why People Become Poor and How They Escape Poverty UK, Oxford University Press. Mander, Harsh & et al. 2019.
5. Emma &Arendar, Caistor. 2014. Time to End Extreme Inequality.
6. Growth, Inequality & Social Development in India: Is Inclusive Growth Possible? Geneva, MacMillan. Odam. 2020.
7. Drops, et al. 2018. Reward Work, Not Wealth: To end the inequality crisis, we must build an economy for crdinary working people, not the rich and powerful, UK, Oxfam House "The Reproduction of Inequality: Occupation, Caste
8. Aseille Andre, 1999. & Family." Pp-127-156 in Social toequality in India: Profiles of Caste, Class & Social Mobility, ed. Jaipur, Rawat Publications V. M. 1999. "Nature of Class Conflict in Indian Society," Pp-298-329 in Social Inequality in India Profiles of Caste, Class & Social Mobility, ed. Jaipur, Rawat Publications
9. Pamat Emilio Granados, et al. 2020. The Global Risks Report 2020, Insight Report 15th Edition World Economic Forum.
10. Democracy: An Inevitable Possibility under Capitalism." Economic & Political Weekly 53(34): 104-111.a, Anirudh. 2010.
11. Sen. Amartya 2015. The Country of First Boys: And Other Essays. India, Oxford University Press. Seer

# जात, वर्ग आणि लिंग असमानतेतून उद्भवणाऱ्या महिलांच्या तक्रारींना प्रतिसाद देणाऱ्या समुपदेशन केंद्रांचा आंतरसंबंधीय अभ्यास

**प्रा. श्रीमती. इंदू चंद्रकांत साळुंके** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

**सारांश:** प्रस्तुत संशोधनात जात, वर्ग आणि लिंग असमानतेच्या आंतरसंबंधातून उद्भवणाऱ्या महिलांच्या तक्रारींचा आणि त्या संदर्भात समुपदेशन केंद्रांच्या भूमिकेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. आंतरसंबंधीय *(Intersectional)* दृष्टिकोनानुसार महिलांच्या समस्या केवळ एका घटकावर आधारित नसून जातीय, आर्थिक आणि लिंगाधारित असमानतेच्या एकत्रित परिणामातून निर्माण होतात. या संशोधनासाठी मराठवाडा विभागातील चार जिल्ह्यांतील समुपदेशन केंद्रात तक्रार नोंदविलेल्या १०४ महिलांकडून मुलाखत अनुसूचीद्वारे प्राथमिक माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करण्यात आले आहे.

अभ्यासातून पितृसत्ताक कुटुंबरचना, आर्थिक असमानता, हुंडा, कमी शिक्षण आणि सामाजिक भेदभाव हे महिलांच्या तक्रारींची प्रमुख कारणे असल्याचे दिसून आले. बहुसंख्य महिलांना कुटुंबात दुय्यम स्थान मिळत असून आर्थिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित असल्याचे आढळले. तथापि, समुपदेशन केंद्रांनी कौटुंबिक समायोजन, महिलांच्या सुरक्षिततेत वाढ आणि वैवाहिक संबंध सुधारण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे निष्कर्षातून स्पष्ट झाले. अभ्यासातून असे निष्पन्न होते की, महिलांच्या तक्रारींना प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी आंतरसंबंधीय दृष्टिकोन, शिक्षण, आर्थिक सबलीकरण, समुपदेशन सेवांचा विस्तार आणि समन्वित सहाय्ययंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे.

**कीवर्ड्स:** आंतरसंबंधीयता, जातीय असमानता, वर्गीय असमानता, लिंगभेद, महिला तक्रारी, समुपदेशन केंद्रे, पितृसत्ताक व्यवस्था, महिला सबलीकरण, कौटुंबिक समायोजन, सामाजिक न्याय.

**प्रस्तावना:** जात, वर्ग आणि लिंग असमानतेतून उद्भवणाऱ्या महिलांच्या तक्रारी या आजच्या सामाजिक वास्तवात अत्यंत गंभीर आणि तातडीच्या लक्षाची मागणी करणाऱ्या समस्या आहेत. या संदर्भात समुपदेशन केंद्रांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते *(Mrudula & Anne, n.d.)*. महिलांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांना मानसिक व सामाजिक आधार देणे या दृष्टीने समुपदेशन केंद्रे अग्रभागी कार्यरत आहेत. तथापि, या प्रयत्नांनंतरही अपेक्षित परिणाम पूर्णपणे साध्य झालेला दिसून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे महिलांच्या समस्यांकडे आंतरसंबंधीय *(Intersectional)* दृष्टिकोनातून पाहण्याची गरज अद्याप पुरेशी प्रमाणात लक्षात घेतली गेलेली नाही *(UN Women, n.d.)*. आंतरसंबंधीय दृष्टिकोनानुसार, महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या भेदभावांचा परस्परसंबंध असतो आणि केवळ एका घटकावर लक्ष केंद्रित करून त्या समस्यांचे निराकरण करणे शक्य होत नाही. विविध सामाजिक पार्श्वभूमीतील महिलांना त्यांच्या ओळखींचे स्वरूप समजून घेण्यासाठी आणि त्यानुसार सबलीकरणासाठी या दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

जात, वर्ग आणि लिंग हे घटक परस्पर गुंफलेले असून ते एकमेकांना बळकटी देत दडपशाहीची एक प्रभावी सामाजिक रचना निर्माण करतात. ही रचना प्रामुख्याने श्रेणीबद्ध स्वरूपाची असल्यामुळे खालच्या जातीतल्या महिलांना त्यांच्या लिंग आणि आर्थिक स्थितीमुळे अतिरिक्त भेदभावाचा सामना करावा लागतो. ऐतिहासिकदृष्ट्या, जातिव्यवस्था ही काही समाजांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक स्तरिकरणाची *(Social Stratification)* यंत्रणा राहिली आहे, ज्यामुळे खालच्या जातीतल्या महिलांना मोठ्या प्रमाणावर सामाजिक व आर्थिक वंचना सहन करावी लागली आहे. याचप्रमाणे, वर्गीय स्तररचना *(Class Hierarchy)* संसाधनांपर्यंत आणि संधींपर्यंत असमान प्रवेश निर्माण करून विषमता टिकवून ठेवते. लिंगभेद *(Gender Discrimination)* या समस्यांना अधिक तीव्र बनवितो, कारण महिलांना संरचनात्मक व संस्थात्मक पातळीवर दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे जात, वर्ग आणि लिंग या तिन्ही घटकांच्या परस्परसंबंधाचा विचार करूनच महिलांच्या तक्रारींना योग्य प्रतिसाद देणे शक्य होते.

या पार्श्वभूमीवर, समुपदेशन केंद्रांनी या घटकांच्या परस्परसंबंधाची जाणीव ठेवून महिलांच्या सबलीकरणावर भर देणे आवश्यक आहे *(Mrudula & Anne, n.d.)*. प्रकरण अभ्यासाच्या *(Case Study)* आधारे केलेल्या विश्लेषणातून समुपदेशन केंद्रांची सध्याची स्थिती आणि जात, वर्ग व लिंग असमानतेशी संबंधित महिलांच्या तक्रारी हाताळताना त्यांना भेडसावणाऱ्या मर्यादा स्पष्ट होतात.

म्हणूनच, महिलांना त्यांच्या ओळखीबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करता यावा आणि त्या सन्मानाने आपले

प्रश्न मांडू शकतील, यासाठी सुयोग्य व संवेदनशील शिफारसी करणे अत्यावश्यक ठरते.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनाचा आराखडा वर्णनात्मक *(Descriptive)* स्वरूपाचा असून तो महिला समुपदेशन केंद्राच्या महिला तक्रार निवारणातील भूमिकेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या संशोधनात मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, बीड आणि लातूर या चार जिल्ह्यांची निवड संशोधन क्षेत्र म्हणून करण्यात आली आहे. या जिल्ह्यांतील पोलिस स्टेशनच्या आवारात कार्यरत महिला समुपदेशन केंद्रात तक्रार नोंदविलेल्या महिलांच्या अनुभवांवर आधारित वस्तुनिष्ठ माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी एकूण १०४ महिला उत्तरदात्यांचा नमुना निश्चित करण्यात आला असून त्यांची निवड सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धतीने करण्यात आली आहे. या सर्व महिला त्या आहेत ज्यांनी संबंधित महिला समुपदेशन केंद्रांमध्ये कौटुंबिक हिंसाचार किंवा इतर वैवाहिक व सामाजिक समस्यांबाबत तक्रार नोंदविली होती. त्यामुळे या नमुन्याद्वारे संशोधन विषयाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या अनुभवाधारित माहितीचे संकलन शक्य झाले आहे. तथ्य संकलनासाठी १०४ महिला उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून प्राथमिक माहिती संकलित करण्यात आली आहे. संशोधकाने प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रश्न विचारून त्यांची उत्तरे अनुसूचीत नोंदविली आहेत. या अनुसूचीत महिलांची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती, तक्रारीचे स्वरूप, समुपदेशनानंतरची परिस्थिती आणि केंद्राविषयीची मते या विविध पैलूंशी संबंधित प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे संख्यात्मक तसेच गुणात्मक स्वरूपाची माहिती प्राप्त झाली आहे.

संशोधन आराखड्यात प्राथमिक तथ्य संकलनाला विशेष महत्त्व देण्यात आले असून, महिलांच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. संकलित माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण व सांख्यिकीय विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. यामुळे महिला समुपदेशन केंद्राची तक्रार निवारणातील भूमिका, समुपदेशनानंतर होणारे कौटुंबिक बदल आणि महिलांच्या सामाजिक स्थितीतील परिवर्तन यांचे वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट झाले आहे. अशा प्रकारे प्रस्तुत संशोधन आराखडा हा १०४ महिला उत्तरदात्यांच्या अनुभवाधारित प्राथमिक माहितीवर आधारित वर्णनात्मक व अनुभवजन्य *(empirical)* स्वरूपाचा असून, महिला समुपदेशन केंद्रांच्या कार्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरतो.

**उत्तरदात्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र | शिक्षण | स्त्री उत्तरदाते | |
|---|---|---|---|
| | | वारंवारिता | टक्केवारी |
| १ | प्राथमिक | १४ | १३.५ |
| २ | माध्यमिक | ४२ | ४०.४ |
| ३ | उच्च माध्यमिक | २० | १९.२ |
| ४ | पदवी | ०९ | ८.७ |
| ५ | पदव्युत्तर | ०७ | ६.७ |
| ६ | व्यावसायिक | ०२ | १.९ |
| ७ | निरक्षर | १० | ९.६ |
| **एकूण** | | **१०४** | **१००** |

उत्तरदात्यांमध्ये माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण सर्वाधिक (४०.४ टक्के) आहे, यावरून किमान शैक्षणिक पातळी असलेल्या महिलांमध्ये तक्रार नोंदविण्याची प्रवृत्ती अधिक असल्याचे दिसून येते. उच्च माध्यमिक व त्यापुढील शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण तुलनेने कमी आहे, ज्यामुळे उच्च शिक्षित महिलांकडे समस्या सोडविण्याचे पर्यायी मार्ग असू शकतात, असे सूचित होते. निरक्षर व प्राथमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे एकत्रित प्रमाण २३.१ टक्के असून, या गटाला माहिती व कायदेविषयक जाणीवेच्या अभावामुळे अडचणी येण्याची शक्यता असते. तरीही या महिलांनी समुपदेशन केंद्रांचा वापर केल्याचे दिसून येते, जे या सेवांचे महत्त्व अधोरेखित करते. एकूणच, शिक्षण आणि तक्रार नोंदविण्याची प्रवृत्ती यांमध्ये घनिष्ठ संबंध असल्याचे या तक्त्यातून स्पष्ट होते.

**स्त्री म्हणून कुटुंबात मिळणाऱ्या वागणूकीसंबंधी प्रतिक्रिया**

| क्र. | प्रतिक्रिया | वारंवारिता | एकूण |
|---|---|---|---|
| १ | दुय्यम | ५५ | ५२.९ |
| २ | समान | २३ | २२.१ |
| ३ | समाधानकारक | १६ | १५.४ |
| ४ | उच्च | ०६ | ९.६ |
| ५ | सांगता येत नाही | ०४ | ३.८ |
| **एकूण** | | **१०४** | **१००** |

तक्त्यानुसार उत्तरदात्यांपैकी ५२.९ टक्के महिलांना कुटुंबात दुय्यम वागणूक मिळत असल्याचे दिसून येते, जे लिंगाधारित असमानतेचे स्पष्ट निदर्शक आहे. केवळ २२.१ टक्के महिलांना समान वागणूक मिळत असल्याचे दिसते, तर १५.४ टक्के महिलांनी वागणूक समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. अत्यल्प म्हणजेच ५.८ टक्के महिलांना उच्च दर्जाची वागणूक मिळत असल्याचे आढळते. तसेच ३.८ टक्के महिलांना याबाबत ठाम मत व्यक्त करता आले नाही. या आकडेवारीवरून कुटुंबातील पितृसत्ताक मूल्यव्यवस्था

अद्याप प्रभावी असल्याचे आणि बहुसंख्य महिलांना दुय्यम स्थान दिले जात असल्याचे स्पष्ट होते.

**सैद्धांतिक चौकट:** आंतरसंबंधीयता सिद्धांतानुसार व्यक्तीचे सामाजिक अनुभव हे एकाच घटकावर आधारित नसून जात, वर्ग, लिंग, धर्म, भाषा आणि आर्थिक स्थिती यांसारख्या विविध ओळखींच्या परस्परसंयोगातून निर्माण होतात. किंबरली क्रेन्शॉ यांनी मांडलेल्या या संकल्पनेनुसार, महिलांवरील अन्याय केवळ लिंगाधारित नसून तो जातीय व आर्थिक असमानतेशीही निगडित असतो. उदाहरणार्थ, दलित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना भेडसावणाऱ्या समस्या उच्चवर्णीय किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांपेक्षा भिन्न आणि अधिक गुंतागुंतीच्या असतात. त्यामुळे महिलांच्या तक्रारींचे विश्लेषण करताना या सर्व सामाजिक घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक ठरते. समुपदेशन केंद्रांच्या कार्याचा अभ्यास करताना हा सिद्धांत महिलांच्या अनुभवातील विविध स्तरांवरील भेदभाव समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतो. स्त्रीवादी दृष्टिकोन समाजातील पितृसत्ताक रचनेमुळे निर्माण होणाऱ्या लिंगाधारित असमानतेवर प्रकाश टाकतो. या दृष्टिकोनानुसार महिलांवर होणारे अत्याचार, भेदभाव आणि सामाजिक दुय्यमत्व हे वैयक्तिक नसून संरचनात्मक आणि सांस्कृतिक घटकांशी संबंधित असतात. स्त्रीवादी सिद्धांत महिलांच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हक्क, स्वायत्तता आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष करण्यावर भर देतो. समुपदेशन केंद्रे ही महिलांना आवाज देणारी आणि त्यांना सामाजिक, मानसिक व कायदेशीर आधार देणारी संस्था म्हणून या दृष्टिकोनातून महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे स्त्रीवादी दृष्टिकोन समुपदेशन केंद्रांच्या भूमिकेचे मूल्यांकन करताना महिलांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करतो.

**जात, वर्ग आणि लिंगाचा ऐतिहासिक संदर्भ:** जात, वर्ग आणि लिंग हे सामाजिक स्तरिकरणाच्या परस्परसंबंधित प्रणाली आहेत, ज्यांचा प्रभाव अशा समाजांतील महिलांच्या जीवनावर अत्यंत खोलवर पडतो, जिथे या स्तररचना प्रभावीपणे कार्यरत असतात. जात ही जन्माधारित सामाजिक स्तरिकरणाची प्रणाली असून ती मुख्यतः दक्षिण आशियाई समाजांमध्ये आढळते. या व्यवस्थेमध्ये व्यक्तींचे श्रेणीबद्ध स्थान निश्चित केले जाते, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक दर्जा, संधी आणि जीवनमानावर थेट परिणाम होतो. खालच्या जातीतल्या महिलांना त्यांच्या लिंग आणि जात या दोन्ही आधारांवर दुहेरी भेदभावाचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक संधी, सामाजिक संबंध आणि वैयक्तिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो *(CLPR, 2019).*

वर्ग *(Class)* ही आर्थिक स्तररचनेशी संबंधित संकल्पना असून ती व्यक्तींच्या उत्पन्न, संपत्ती आणि संसाधनांवरील नियंत्रणाच्या आधारे समाजाचे विभाजन करते. आर्थिक स्तररचनेमुळे महिलांच्या जीवनातील विविध क्षेत्रांवर - जसे की शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगार - गंभीर परिणाम होतो. निम्न आर्थिक स्तरातील महिलांना मर्यादित आर्थिक साधनांमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्थिर रोजगाराच्या संधी मिळविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वर्गीय असमानतेमुळे निर्माण होणारे संघर्ष महिलांच्या अधिकारांवर आणि संधींवर थेट परिणाम करतात. लिंग स्तरिकरण *(Gender Stratification)* म्हणजे पुरुष आणि महिला यांच्यातील सत्ता, संसाधने आणि संधींचे असमान वितरण होय. यामुळे समाजातील महिलांच्या भूमिका, दर्जा आणि निर्णयक्षमतेवर मर्यादा येतात. पितृसत्ताक व्यवस्थेद्वारे *(Patriarchy)* घडविलेल्या लिंग संकेतांमुळे सर्व जाती आणि वर्गांतील महिलांना अधीनस्थ स्थान दिले जाते. महिलांना प्रामुख्याने गृहिणी आणि संगोपनकर्त्या म्हणूनच भूमिका देण्यात येते, ज्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य आणि सामाजिक आधार मर्यादित राहतात. याशिवाय, पितृसत्ताक मूल्यव्यवस्थेमुळे महिलांच्या तक्रारी उदा. शारीरिक अत्याचार किंवा कार्यस्थळावरील भेदभाव - यांकडे अनेक संस्थांकडून दुर्लक्ष केले जाते, कारण अशा समस्यांना अपेक्षित गांभीर्य आणि मान्यता दिली जात नाही. जात ही महिलांच्या अधिकारांपर्यंतच्या प्रवेशावर निर्णायक परिणाम करणारी बाब आहे. तथापि, भारतीय स्त्रीवादी चळवळींचा ऐतिहासिक प्रवास पाहता, त्या प्रामुख्याने उच्चवर्गीय किंवा उच्चजातीय महिलांच्या गरजा आणि समस्यांवर केंद्रित राहिल्या आहेत. परिणामी, वंचित आणि खालच्या जातीतल्या महिलांच्या समस्यांकडे अपेक्षित लक्ष दिले गेले नाही, ज्यामुळे त्यांच्या अडचणी अधिक गुंतागुंतीच्या स्वरूपात पुढे आल्या *(Mrudula & Anne, n.d.).* त्यामुळे खालच्या जातीतल्या महिलांवर जात आणि लिंग या दोन्ही घटकांचा होणारा परिणाम लक्षात घेऊन योग्य सहाय्य प्रणाली विकसित करणे आवश्यक ठरते. समुपदेशन प्रक्रियेत महिलांच्या तक्रारींवर परिणाम करणाऱ्या व्यापक सामाजिक घटकांचा विचार करणे आवश्यक आहे *(UN Women Intersectionality Resource Guide & Toolkit).* खालच्या जात आणि वर्गातील महिलांवरील ऐतिहासिक भेदभावाचे आकलन केल्यास अधिक प्रभावी आणि संवेदनशील सहाय्य प्रणाली विकसित करणे शक्य होईल.

**महिलांच्या सबलीकरणामध्ये समुपदेशन केंद्रांची भूमिका:** जात, वर्ग आणि लिंग यांच्या आधारे निर्माण होणाऱ्या संरचनात्मक असमानतेविषयी महिलांमध्ये

जाणीव निर्माण करणे आणि त्या समस्यांवर उपाय शोधण्याच्या प्रक्रियेत समुपदेशन केंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. ही केंद्रे महिलांना प्रणालीगत दडपशाहीमुळे उद्भवलेल्या तक्रारी मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतात आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्न करण्यास प्रेरित करतात. समुपदेशकांना या असमानतेमुळे महिलांना भेडसावणाऱ्या अडचणींची जाणीव असल्यामुळे ते महिलांना सामाजिक स्तररचनांचा त्यांच्यावर होणारा परिणाम समजावून सांगू शकतात आणि त्यांच्या स्थितीत बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करू शकतात *(Mrudula & Anne, n.d.)*. परिणामी, महिलांना त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्याची आणि समाजात अधिक स्वावलंबी होण्याची संधी प्राप्त होते.

तथापि, समुपदेशकांना आंतरसंबंधीय *(Intersectionality)* दृष्टिकोनाचे पुरेसे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे, कारण त्यावर महिलांना मिळणाऱ्या सहाय्याची गुणवत्ता अवलंबून असते. प्रशिक्षण असूनही काही वेळा समुपदेशक जात आणि वर्गावर आधारित सहाय्याच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे विविध प्रकारच्या परस्परसंबंधित भेदभावांचा विचार होत नाही *(Centre for Law and Policy Research [CLPR], 2019)*. त्यामुळे समुपदेशकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना सांस्कृतिक घटकांचे योग्य आकलन होईल आणि ते अधिक प्रभावी सहाय्य व सबलीकरणाची प्रक्रिया राबवू शकतील. एकूणच, समुपदेशन केंद्रे वैयक्तिक सहाय्य आणि सामूहिक सहभागाच्या माध्यमातून महिलांना संरचनात्मक दडपशाहीवर मात करण्यास सक्षम बनवितात. विविध सामाजिक पार्श्वभूमीतील सर्व महिलांचे संरक्षण व सबलीकरण करण्यासाठी ही केंद्रे प्रयत्नशील असतात.

संशोधनातून असे स्पष्ट दिसून येते की, महिला समुपदेशन केंद्रे कौटुंबिक समायोजन घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. एकूण स्त्री उत्तरदात्यांपैकी ७८.८ टक्के (८२) महिलांनी समुपदेशन केंद्रांमुळे कुटुंब विघटन टाळण्यास मदत होते, अशी सहमती दर्शविली आहे. तसेच ८६.५ टक्के (९०) स्त्री उत्तरदात्यांनी समुपदेशन केंद्रामुळे कौटुंबिक समायोजन होते, या विधानाला समर्थन दिले आहे. पुरुष उत्तरदात्यांपैकीही ५७.५ टक्के (६०) पुरुषांनी समुपदेशनानंतर पती-पत्नींच्या संबंधांमध्ये सुधारणा झाल्याचे सांगितले आहे. यावरून समुपदेशन केंद्रे कौटुंबिक संघर्ष कमी करून स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरत असल्याचे स्पष्ट होते. दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष असा की, समुपदेशन प्रक्रियेनंतर महिलांच्या सुरक्षिततेत आणि सन्मानात वाढ झाल्याचे दिसून येते. एकूण स्त्री उत्तरदात्यांपैकी ४१.३ टक्के (४३) महिलांनी समुपदेशनानंतर कुटुंबात सुरक्षितता असल्याचे सांगितले आहे. तसेच समुपदेशकांच्या प्रतिक्रियांनुसार ८१.३ टक्के प्रकरणांमध्ये समायोजनानंतर संबंधित महिलांना सन्मानपूर्वक वागणूक मिळत असल्याचे आढळते. यावरून समुपदेशन केंद्रे महिलांच्या मानसिक, सामाजिक आणि वैवाहिक सबलीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे दिसते. समुपदेशन केंद्रांची गरज समाजात मोठ्या प्रमाणावर जाणवते. एकूण स्त्री उत्तरदात्यांपैकी ८३.७ टक्के (८७) महिलांनी समुपदेशन केंद्रांची संख्या वाढविण्याची गरज व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे ७७.९ टक्के (८१) पुरुष उत्तरदात्यांनीही समुपदेशन केंद्रे असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. यावरून महिलांच्या तक्रार निवारण, कायदेविषयक मार्गदर्शन, मानसिक आधार आणि सामाजिक संरक्षणासाठी समुपदेशन केंद्रे अत्यंत आवश्यक असून त्यांच्या विस्ताराची गरज असल्याचे स्पष्ट होते.

**आंतरसंबंधीयता: एक संकल्पनात्मक चौकट:**

आंतरसंबंधीयता (Intersectionality) ही अशी संकल्पना आहे, जी महिलांच्या तक्रारी आणि समस्या या जात, वर्ग आणि लिंग यांसारख्या ओळख आणि सामाजिक स्थितीच्या परस्परसंबंधित स्तरांमधून निर्माण होतात, हे स्पष्ट करते *(Mrudula & Anne, n.d.)*. पारंपरिक स्तरित *(Stratified)* दृष्टिकोन या समस्यांकडे स्वतंत्र घटक म्हणून पाहतो; परंतु आंतरसंबंधीय दृष्टिकोन या सर्व घटकांच्या परस्परसंवादातून निर्माण होणाऱ्या वास्तवाचे समग्र आकलन करण्यावर भर देतो. उदाहरणार्थ, निम्न आर्थिक स्तरातील दलित महिला आणि उच्च आर्थिक स्तरातील उच्चवर्णीय महिला यांना भेडसावणाऱ्या भेदभावाचे स्वरूप आणि तीव्रता वेगवेगळी असते. परिणामी, पहिल्या गटातील महिलांना समुपदेशन सेवांपर्यंत पोहोचण्याच्या संधी अधिक मर्यादित असण्याची शक्यता असते, तर दुसऱ्या गटातील महिलांना तुलनेने अधिक सुविधा उपलब्ध असतात.

महिलांच्या ओळखीच्या विविध स्तरांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांच्या परस्परसंबंधित स्वरूपामुळे समुपदेशन केंद्रांमध्ये आंतरसंबंधीय दृष्टिकोनाचा अवलंब करणे अत्यावश्यक ठरते. हा दृष्टिकोन बहुआयामी असून व्यक्तीच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे—जसे की शिक्षणाची उपलब्धता, ज्ञानाची गुणवत्ता, तसेच घर आणि कार्यस्थळातील सुरक्षितता व सन्मानाची पातळी—समग्र आकलन करण्यावर आधारित असतो *(UN Women, n.d.)*. याशिवाय, *UN Women (n.d.)* च्या अहवालानुसार, महिलांशी संबंधित प्रश्नांवर प्रभावी

धोरणे तयार करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विभाजित व सूक्ष्म स्तरावरील माहिती *(Disaggregated Data)* उपलब्ध असणे आवश्यक आहे. यामुळे धोरणनिर्माते आणि अंमलबजावणी करणाऱ्या संस्था विविध सामाजिक गटांच्या विशिष्ट अडचणींचा योग्य विचार करू शकतात.

या संदर्भात, महिलांच्या समुपदेशन केंद्रांनी जातीय व सामाजिक वंचनेचा विचार करताना आंतरसंबंधीय दृष्टिकोनाचा अवलंब करणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनामुळे महिलांच्या सबलीकरणात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध सामाजिक घटकांचे समग्र विश्लेषण करणे शक्य होते. तसेच, लिंग, वर्ग आणि जात या घटकांशी संबंधित सामाजिक असमानतेला तोंड देण्यासाठी आवश्यक संसाधनांशी महिलांना जोडणाऱ्या संस्थात्मक रचना विकसित करणेही शक्य होते.

**समुपदेशन कार्यकर्त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी:** जात, वर्ग आणि लिंग असमानतेमुळे प्रभावित झालेल्या महिलांसोबत कार्य करणाऱ्या समुपदेशन कार्यकर्त्यांना विविध प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणींमुळे त्यांच्या उद्दिष्टपूर्तीच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. समुपदेशकांसमोरील प्रमुख समस्यांपैकी एक म्हणजे दडपशाहीच्या आंतरसंबंधीय स्वरूपाविषयी असलेले अपुरे आकलन होय *(Mrudula & Anne, n.d.).* यामुळे महिलांना एकाच वेळी अनेक प्रकारच्या भेदभावांना सामोरे जावे लागते, हे समजून घेण्यात अडथळे निर्माण होतात आणि विविध ओळखींच्या परस्परसंबंधामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष होते.

तसेच, लिंग आणि वर्गाशी संबंधित समस्यांवर कार्य करताना समुपदेशकांना अत्यंत मागणीपूर्ण वातावरणाचा सामना करावा लागतो. अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात समर्पण आणि प्रयत्नांची आवश्यकता असते. या प्रक्रियेत समुपदेशकांना मानसिक थकवा आणि ताण जाणवतो, ज्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. कार्यक्षमता घटल्यामुळे महिलांच्या गरजा आणि त्यांच्या समस्यांचे स्वरूप समजून घेण्यात अडचणी निर्माण होतात *(Mrudula & Anne, n.d.).* परिणामी, लिंग आणि सामाजिक स्तरांवर आधारित भेदभाव दूर करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देणे कठीण होते. याशिवाय, समुपदेशकांना महिलांच्या समस्यांवर काम करताना प्रभावी कायदेशीर सहाय्य यंत्रणांचा अभाव जाणवतो. अनेक सामाजिक व्यवस्था पारंपरिक सांस्कृतिक संकेतांवर आधारित असल्यामुळे महिलांना आवश्यक सहाय्य मिळण्यासाठी ठोस धोरणे तयार करणे कठीण जाते *(Centre for Law and Policy Research [CLPR], 2019).* सामाजिक आणि लिंगाधारित भेदभावाशी संबंधित समस्या अत्यंत गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांचे निराकरण करण्यासाठी उच्च स्तरावरील कौशल्य आणि तज्ज्ञता आवश्यक असते. त्यामुळे निर्धारित उद्दिष्टे साध्य करणे अनेकदा आव्हानात्मक ठरते.

**प्रमुख निष्कर्ष**

१. पितृसत्ताक कुटुंबरचनेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो, कारण ५२.९ टक्के महिलांनी कुटुंबात दुय्यम वागणूक मिळत असल्याचे सांगितले असून ६३.५ टक्के कुटुंबांमध्ये पती कुटुंबप्रमुख असल्याचे दिसून येते. शिक्षण घेतलेल्या महिलांची संख्या वाढत असली तरी कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित आहे, कारण ६२ महिलांच्या कुटुंबातील आर्थिक निर्णय पती घेतात, यावरून पारंपरिक लिंगाधारित सत्ताकेंद्र अजूनही पुरुषांकडे असल्याचे दिसते.

२. खालच्या आर्थिक स्तरातील कुटुंबांचे प्रमाण जास्त असून २६ ते ५० हजार वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांची संख्या अधिक आहे, तर ४५ कुटुंबांना मूलभूत गरजाही पूर्ण करता येत नाहीत, यावरून वर्गीय असमानतेचा महिलांच्या जीवनावर थेट परिणाम होत असल्याचे दिसते. तसेच ७७ महिलांनी विवाहावेळी हुंड्याची मागणी झाल्याचे सांगितले असून, हुंडा आणि आर्थिक कारणे कौटुंबिक संघर्षाची प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते.

३. शिक्षणाच्या सकारात्मक प्रभावाबाबत ५१.९ टक्के महिलांनी शिक्षणामुळे कुटुंबातील स्त्रियांचा दर्जा वाढतो असे मत व्यक्त केले, तर ७५ महिलांनी कुटुंबातील कमी साक्षरतेमुळे कौटुंबिक हिंसाचार वाढतो असे सांगितले आहे. यावरून शिक्षण, वर्गीय स्थिती आणि लिंगभेद यांचा परस्परसंबंध स्पष्ट होतो.

४. समुपदेशन केंद्रांच्या प्रभावाबाबत ७८.८ टक्के महिलांनी केंद्रामुळे कुटुंब विघटन टळते असे सांगितले, तर ८६.५ टक्के महिलांनी समुपदेशनामुळे कौटुंबिक समायोजन होते असे मान्य केले आहे. तसेच ८३.७ टक्के महिलांनी समुपदेशन केंद्रांची संख्या वाढवावी अशी मागणी केली आहे.

५. तथापि, तक्रार नोंदवल्यानंतर २९.८ टक्के महिलांना आर्थिक छळ आणि २५ टक्के महिलांना सामाजिक अवहेलना सहन करावी लागते, यावरून समाजातील पितृसत्ताक व वर्गाधारित मानसिकता अजूनही महिलांच्या न्यायप्रवेशात अडथळा ठरत असल्याचे स्पष्ट होते.

**शिफारशी:** महिलांच्या तक्रारींवरील आंतरसंबंधीय अभ्यासातून पुढील शिफारसी सुचविता येतात:

समुपदेशन केंद्रांची संख्या वाढवून प्रत्येक तालुका व ग्रामीण भागात त्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरून खालच्या आर्थिक व सामाजिक स्तरातील महिलांनाही या सेवांचा लाभ घेता येईल. महिलांच्या शिक्षणावर विशेष भर देऊन साक्षरता, कायदेविषयक जाणीव आणि अधिकारांविषयी जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे, कारण शिक्षणामुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जात वाढ होत असल्याचे निष्कर्षांमधून दिसून येते. कुटुंबातील आर्थिक निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला आर्थिक सबलीकरण, स्वयंरोजगार आणि कौशल्यविकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हुंडा, व्यसनाधीनता आणि आर्थिक असमानता यांसारख्या कौटुंबिक संघर्षाच्या प्रमुख कारणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेविषयक जनजागृती, पुनर्वसन कार्यक्रम आणि सामाजिक मोहिमा राबविणे गरजेचे आहे. समुपदेशन केंद्रात तक्रार करणाऱ्या महिलांना सामाजिक व कौटुंबिक दबावापासून संरक्षण देण्यासाठी गोपनीयता, कायदेशीर सहाय्य आणि समन्वित सहाय्य यंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे. समुपदेशकांना जात, वर्ग आणि लिंग या आंतरसंबंधीय घटकांविषयी विशेष प्रशिक्षण देऊन सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील आणि सर्वसमावेशक समुपदेशन पद्धती विकसित करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**


1. Mrudula, A. (2026). *Intersectionality: Experiences, views and visions for change*. Dag Hammarskjöld Foundation.
2. UN Women. (2021). *Intersectionality resource guide and toolkit: An intersectional approach to leave no one behind*. https://www.unwomen.org/
3. Intersectionality. (2025, February). In *Wikipedia*. https://en.wikipedia.org/wiki/Intersectionality
4. Maurel, M. (2025). *Taking intersectionality seriously: Teaching challenges and practices in the classroom*. Organizational Behavior Teaching Review, 49(6)
5. Anne, M., Callahan, J., & Kang, H. (2013). *Gender and caste intersectionality in the Indian context*. Human Resource Management.
6. Centre for Law and Policy Research. (2019). *Intersectionality: A report on discrimination based on caste with the intersections of sex, gender identity, and disability in Karnataka, Andhra Pradesh, Tamil Nadu, and Kerala*. https://clpr.org.in/wp-content

७. United Nations Human Rights Council. (2025). *Intersection of gender and other factors: Report of the Special Rapporteur on violence against women and girls, its causes and consequences* (A/HRC/59/62). United Nations.

# महाराष्ट्र सरकारच्या धोरणांमधील सामाजिक असमानता: एक अध्ययन

**प्रा. डॉ. चांगदेव निवृती मुंढे** समाजशास्त्र विभाग, गोदावरी कनिष्ठ व वरिष्ठ कला महाविद्यालय, अंबड

**गोषवारा:** भारतीय समाज व्यवस्थेत संतुलन ठेवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी वेळोवेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ध्येय धोरणे ठरवलेली आहेत. महाराष्ट्रासह सर्व राज्यांनी आपापल्या कल्याणकारी राज्यातील असमानता कमी करण्यासाठी विविध पातळीवर धोरणे ठरवले व त्या धोरणांची अंमलबजावणी ही केलेली आहे. परंतु ती धोरणे राज्यकर्ते त्यांच्या व विकसित समाजाच्या हिताचे अधिक असल्याचे दिसून येतात. मागासलेल्या भागातील सर्व सोयी सुविधांमधील, आरोग्य, शिक्षण, सामाजिक, आर्थिक असमतोल आजही काही प्रमाणात दिसून येतो. महाराष्ट्र सरकारच्या शासकीय धोरणांमधील असमानता ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी समस्या आहे. विभिन्न सामाजिक-आर्थिक वर्ग, भौगोलिक विभाग, लिंग व सामाजिक गटांमध्ये विविध स्वरूपाच्या विषमतेचा अनुभव येत आहे. परंतु, धोरणात्मक दिशा बदलून, पारदर्शक निर्णय प्रक्रियेद्वारे आणि सर्वसमावेशक विकास कार्यक्रम राबवून ही विषमता कमी करण्याचे मार्ग निश्चितपणे करणे गरजेचे वाटते.

**कीवर्ड्स:** सामाजिक असमानता, सामाजिक विषमता, सार्वजनिक धोरणे, संसाधनांचे वितरण, न्याय, धोरणात्मक पारदर्शकता.इ.

**प्रस्तावना:** सामाजिक असमानता तेव्हा उद्भवते जेव्हा समाजातील संसाधनांचे असमान वितरण केले जाते, बहुतेकदा असमान वाटप पद्धतींमुळे जे सामाजिकदृष्ट्या परिभाषित केलेल्या लोकांच्या श्रेणींवर आधारित वेगळे असमान नमुने तयार करतात. समाजातील सामाजिक वस्तूंपर्यंत पोहोचण्यातील फरक शक्ती, धर्म, नातेसंबंध, प्रतिष्ठा, वंश, वांशिकता, लिंग, वय, लैंगिक प्रवृत्ती, बुद्धिमत्ता आणि वर्ग यासारख्या घटकांमुळे प्रभावित होतात. सामाजिक असमानता ही आर्थिक असमानतेशी जोडलेली आहे.जी सहसा उत्पन्न किंवा संपत्तीच्या असमान वितरणाचा आधार म्हणून वर्णन केली जाते. जरी अर्थशास्त्र आणि समाजशास्त्राच्या शाखा सामान्यतः आर्थिक असमानतेचे परीक्षण आणि स्पष्टीकरण देण्यासाठी वेगवेगळ्या सैद्धांतिक दृष्टिकोनांचा वापर करतात, तरीही दोन्ही क्षेत्रे या असमानतेचा अभ्यास करण्यात सक्रियपणे सहभागी आहेत. तथापि, पूर्णपणे आर्थिक संसाधनां व्यतिरिक्त सामाजिक आणि नैसर्गिक संसाधने देखील बहुतेक समाजांमध्ये असमानपणे वितरित केली जातात आणि सामाजिक स्थितीत योगदान देऊ शकतात. वाटपाचे निकष अधिकार आणि सामाजिक शक्ती, विशेषाधिकारांचे वितरण, शिक्षण किंवा न्यायिक प्रणालीसारख्या सार्वजनिक वस्तूंमध्ये प्रवेश, पुरेसे गृहनिर्माण, वाहतूक, पत आणि बँकिंग आणि इतर सामाजिक वस्तू आणि सेवांसारख्या वित्तीय सेवांवर देखील परिणाम करू शकतात. सामाजिक असमानता ही भौगोलिक स्थान किंवा नागरिकत्व स्थिती यासारख्या विविध संरचनात्मक घटकांद्वारे आकार घेते आणि बहुतेकदा सांस्कृतिक प्रवचन आणि ओळखींद्वारे आधारलेली असते, उदाहरणार्थ, गरीब 'पात्र' आहेत की 'अपात्र' आहेत हे ही पाहिले जात नाही.

महाराष्ट्र हा भारतातील सर्वात लोकसंख्येने मोठा आणि आर्थिकदृष्ट्या सर्वात समृद्ध राज्यांपैकी एक आहे, परंतु त्याचबरोबर असंतुलित विकास, सामाजिक-आर्थिक विषमतांमध्ये वाढ, प्रादेशिक असमानता आणि निर्धनता या समस्यादेखील राज्याला भेडसावत आहेत. सार्वजनिक धोरणे तयार करणारा राज्य सरकाराचा प्रयत्न असला, तरी त्यातील असमानता कमी करण्यासाठी केलेले उपाय सर्व घटकांपर्यंत समान वेगाने पोहोचलेले नाहीत.सर्वप्रथम महाराष्ट्र सरकारच्या धोरणांमधील असमानता हा प्रश्न अतिशय व्यापक आणि गुंतागुंतीचा विषय आहे. यामध्ये भौगोलिक, सामाजिक-आर्थिक, धोरणात्मक, कौशल्य आणि आरक्षण-पर्यायाशी निगडित विविध स्तरांवरील असमानता यांचा सखोल अभ्यास आवश्यक आहे.

**उद्दिष्टे:**

१) असमानता म्हणजे काय ते समजून घेणे.

२) सामाजिक असमानतेचे विविध पैलू समजून घेणे.

३) सामाजिक असमानतेच्या धोरणांचा आढावा घेणे.

**गृहीतके:**

१) समाजातील विविध पैलूंमध्ये असमानता जाणवते.

२) सामाजिक असमानता विविध क्षेत्रात दिसून येते

३) समाजातील विविध घटकांतील सापेक्षता शासकीय धोरणात जाणवते.

**तथ्य संकलन:** सदरील संशोधन पेपर साठी जी काही तथ्ये आवश्यक आहेत ती तथ्ये संकलित करण्यासाठी दोन्हीही स्त्रोत्रांचा वापर न करता एकाच स्त्रोताचा वापर किंवा उपयोग केलेला आहे. संशोधन पेपर साठी दुय्यम स्त्रोताचा उपयोग करून पेपर तयार करण्यात आलेला आहे. काही अंशी संशोधकाने आपली निरीक्षणे दुय्यम साधनांच्या आधारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र सरकारने जी काही धोरणे ठरवलेली आहेत त्या धोरणांचा निरपेक्षतेने

आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु शासनाच्या धोरणांमध्ये निरपेक्षता न दिसता सापेक्षता दिसून येते. सदरील संशोधनासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले धोरणे, जीआर व परिपत्रके इत्यादींचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचे महत्त्व:** भारतीय समाजात विविधता फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. विविधतेचे पैलू वेगवेगळ्या आहेत. सर्व पैलूंचा आढावा घेतला असता समाजातील सामाजिक असमानता नष्ट करण्यासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र सारखे राज्य सरकार मिळून धोरणे ठरवते. सरकारची धोरणे ही नेहमी सामाजिक संतुलनासाठी किंवा असमानता नष्ट करण्यासाठीच तयार केले जातात. विविध प्रकारच्या धोरणांमधून सामाजिक असमानता कशी नष्ट होईल हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून धोरण तयार करणे व प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे याकडे लक्ष दिले जाते. अशाच बाबींचा आढावा घेऊन पुढील धोरण ठरवणे, अभ्यासकासमोर ठेवणे, संशोधकांना चालना देणे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करणे, राजकीय सामाजिक आर्थिक दृष्टिकोनातून समतोल साधण्यासाठी वेळोवेळी अभ्यास गट सुद्धा तयार केलेली जातात. अशा प्रकारच्या सर्वांना माहिती सहज उपलब्ध होईल हेच सदरील पेपरचे महत्त्व लक्षात घेता येईल.

**तथ्यांचे विश्लेषण:** सदरील संशोधनासाठी संकलित केलेली जी काही तथ्य आहेत किंवा जी काही माहिती आहे, त्या माहितीचे विश्लेषण खालील पैलूंच्या आधारे करण्यात आलेले आहे.

**असमानता म्हणजे काय?**

**महाराष्ट्रातील प्रकार:** भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, लैंगिकता इत्यादींच्या आधारित सरकारच्या धोरणांमधील असमान दिसून येते. महाराष्ट्र सरकारचे विद्यमान धोरणे आणि त्यांच्यातील सामाजिक असमानतेचे धोरणे सुधारण्यासाठी उपाय व शिफारसी दर्शवण्याचा प्रयत्न येथे केला गेला आहे. सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी अनेक धोरणे ठरवले व प्रत्यक्षात राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्या धोरणांमध्ये निरपेक्षता न दिसता सापेक्षता दिसून येते. अशाच सापेक्षतेतून सामाजिक असमानता अधिक वृद्धांगित होत असलेली जाणवते. सामाजिक विकासाची धोरणे ही असमानता दूर करणारी असावेत असे सर्वसामान्यांना वाटते. परंतु शासन अशा प्रकारचे वर्तन कधीही करत नाही हेही सत्य आहे.

**सामाजिक असमानता म्हणजे काय?** असमानता म्हणजे एकाच समाजातील विविध घटकांमध्ये संसाधने, संधी, सुविधा आणि अधिकार यांच्यातील दिसून येणारी विषमता, म्हणजे सामाजिक विषमता होय. सामाजिक विषमता ही केवळ आर्थिक घटकातच नाही तर सामाजिक स्टेटस, आरोग्य, शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग आणि न्यायालयीन प्रवेश इत्यादी घटकातही दिसते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सर्वोच्च न्यायालयातील माननीय सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी म्हटल्याप्रमाणे, "असमानता दूर केल्याशिवाय कोणताही देश किंवा समाज वास्तविक लोकशाहीवादी मानला जाऊ शकत नाही." वरील वाक्यांवरून आपणास समाजातील सामाजिक असमानतेचे नमुने सहज लक्षात येतील.

**असमानतेचे विविध पैलू:**

**१) भौगोलिक विषमता:** भारताप्रमाणेच महाराष्ट्र राज्यातही भौगोलिक दृष्ट्या विविधता दिसून येते. भौगोलिक दृष्ट्या डोंगररांगा, पठारी प्रदेश, नद्यांचे खोरे, कोकण किनारपट्टी, मराठवाड्यासारखा कोरडवाहू प्रदेश इत्यादी. अशा विविधतेने नटलेल्या राज्याला समतोल विकास साधण्यासाठी विविध धोरणांची आवश्यकता असते. तशा प्रकारची धोरणे शासन तयार करण्याचा प्रयत्नही करते. परंतु धोरणे तयार करत असताना जाणीवपूर्वक सापेक्ष धोरण तयार केले जात नाही. सरकार म्हणून सर्व धोरणे निरपेक्ष असायला पाहिजेत. परंतु महाराष्ट्रात असे कधीही झालेले नाही.विकसित व मागास प्रदेश यांच्यातील फरक सर्वसामान्य माणसांना सहज लक्षात येईल अशी अवस्था आहे.

महाराष्ट्राच्या विविध विभागांमध्ये विकासाचा असमान वेग स्पष्ट दिसतो. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे (मुंबई, पुणे, ठाणे, कोल्हापूर) आर्थिकदृष्ट्या समृद्ध आहेत. तुलनेत विदर्भ आणि मराठवाड्याचे जिल्हे मागास आहेत. या फरकामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा कमी आहेत. रोजगार व शिक्षण संधी अकार्यक्षम आहेत. आरोग्य, पाणीपुरवठा व मूलभूत सुविधांमध्ये प्रचंड फरक आहे. या विषमतेमुळे ग्रामीण-शहरी आणि विभागीय विषमता अधिक स्पष्ट होते.

**२) आर्थिक विषमता:** आर्थिक घटक हा च मुळात विषमतेचा मुख्य गाभा मानला तरीही चालेल. कारण आर्थिक घटक हेच मुख्यत: समाज व्यवस्थेतील सामाजिक संतुलन बिघडविण्यात महत्त्वाचा दुवा ठरला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न, संपत्ती, रोजगारात यात फार मोठा फरक दिसून येतो. महाराष्ट्राचा विचार केला असता पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, कोकण, मराठवाडा, खानदेश, विदर्भ अशा विभागातील उत्पन्नाचे साधने, रोजगार व त्याची साधने, उत्पन्न वृद्धीसाठी शासनाने वेळोवेळी केलेली जी धोरणे आहेत त्या धोरणातील दिसून येणारी सापेक्षता स्पष्ट दिसून येते. उदा. साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध महासंघ, सहकार क्षेत्राचे वाढते जाळे, शेती उपयोगी साहित्याची कारखाने, शेती उत्पन्नावरील कारखाने इत्यादींचा अभ्यास केला असता. महाराष्ट्रामध्ये

वरील सर्व घटकांचे समप्रमाण किंवा समप्रमाणातील विभागणी महाराष्ट्र सरकारने कधीही जाणीवपूर्वक केलेली नाही. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. परंतु कोणतेही कारणे कारणीभूत असले तरीही सरकार म्हणून जेव्हा धोरण ठरवले जाते तेव्हा निरपेक्षता असणे आवश्यक आहे ही गोष्ट सरकारने आजपर्यंत कधीही लक्षात घेतलेली नाही. जरी ही बाब लक्षात आली तरीही त्याचा फायदा तसा करून दिलेला नाही. आजही महाराष्ट्रातील प्रशासकीय दृष्ट्या सहा विभागातील व्यक्तींचे दरडोई उत्पन्न, रोजगार, रोजगार संधी किंवा रोजगारासाठी निर्माण केलेली ध्येय धोरणे यांचा आढावा घेतला असता सापेक्षता दिसून येते, कुठेही निरपेक्षता दिसत नाही हेही स्पष्ट आहे. येथे शासकीय धोरणातील निधीची आकडेवारी काही अपहार्य कारणामुळे उपलब्ध करून दिलेली नाही हेही सत्यता आहे.

**३) सामाजिक विषमता:** भारतीय समाज व्यवस्थेत सर्व जाती - जमाती, धर्म, पंथ वंश एकत्रित राहतात. सांस्कृतिक दृष्ट्या सर्व एकत्रित गुनिया गोविंदाने नांदतात. परंतु वरील सर्वा मध्ये विविधता दिसून येते नव्हे त्यामध्ये सामाजिक असमानता अर्थात विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. सामाजिक विषमता ही प्रत्येक जाती-जातीमध्ये, धर्माधर्मामध्ये, वंशा-वंशामध्ये, संस्कृतीमध्ये, संस्कृतीतील रीतीरीवाजांमध्ये, लिंग व वया मध्ये फरक दिसून येतो. वरील सर्व घटकांमध्ये दिसून येणारा फरक नष्ट करण्यासाठी शासनाने विविध धोरणे तयार केलेली आहेत. परंतु सर्व धोरणे हे सापेक्ष स्वरूपाची आहेत ती निरपेक्ष असणे गरजेचे असते. कारण समाज व्यवस्थेत संतुलन निर्माण करण्याचे वा ठेवण्याचे काम कल्याणकारी राज्याचे असते. कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे कार्य म्हणजे सर्व जाती - जमाती, धर्म, कुटुंब, संस्कृती इत्यादींचा समांतर विकास व समांतर उच्च जीवनमान निर्माण करणे गरजेचे असते. महाराष्ट्र सरकारने जाती जमाती निहाय ध्येय धोरणे तयार केलेली आहे. परंतु ती अतिशय विषमतेत असलेली दिसून येतात. उदा. सारथी, बार्टी, महाज्योती व टी आर टी इत्यादीच्या निधीमध्ये फार मोठा फरक दिसून येतो. वरील संस्थेअंतर्गत शिक्षण घेणारा विद्यार्थी समान असला पाहिजे. परंतु वरील सर्व संस्थांतर्गत मिळणारा विद्यार्थ्यांचा लाभ हा सुद्धा विसंगत आहे. महाराष्ट्रात सारथी या संस्थेला इतर संस्थांच्या तुलनेत अधिक निधी दिला जातो. अर्थात महाराष्ट्रात जात-धर्म-लिंगानुसार फरक दिसून येतो. महाराष्ट्रात राज्याच्या सत्तेवर येणारे कोणतेही सरकार असले तरी प्रभावी जातीसाठी अधिक निधी दिला जातो हेच यावरून स्पष्ट होते. सामाजिक असमानता जाती-जमाती, मागासवर्गीयता, लिंगानुसार समाजात असमानता दिसते. उदा. काही समुदायांना आरक्षणामुळे योजनाचे फायदे मिळतात, तर इतरांना त्या प्रमाणात फायदे मिळत नाहीत. या प्रकारची पद्धत सामाजिक-राजकीय पक्षवाद आणि भिन्न धोरणात्मक निर्णयांमुळे होत असल्याची टीका होते. उदा. मागासवर्गीय जाती जमातींच्या वस्त्या सुधार योजनेअंतर्गत एकदम स्वच्छ झालेल्या दिसतात. परंतु त्याच वस्त्यांची गावांची अवस्था फार बिकट दिसून येते. कारण शासनाने गाव विकास सुविधा त्या वस्त्यांप्रमाणे राबवलेल्या नाहीत.

**५) शिक्षण व आरोग्य सेवा विषमता:** भारतातील शिक्षण व आरोग्याची सुविधा असमान स्वरूपात वितरलेली आहे. एकाच राज्यातील विविध विभागात सुद्धा फार मोठा फरक दिसून येतो. महाराष्ट्रातील प्रशासकीय दृष्टिकोनातून जी सहा विभाग तयार झालेली आहेत किंवा भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्र विभागला गेलेला आहे. अशा विभाजित महाराष्ट्रामध्ये शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील असमानता आजही स्पष्ट दिसून येते. उदा. महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेतील इंजिनिअरिंग किंवा वैद्यकीय शिक्षणासाठी पश्चिम महाराष्ट्रामध्ये महाविद्यालयांची संख्या अधिक असल्याने त्या विभागातील राजकीय नेत्यांनी व शासनाने ठरवून दिलेला (७० सत्तर - ३० / तीस) असा कोठा मोठ्या प्रमाणावर असंतुलन निर्माण करणार आहे. वैद्यकीय क्षेत्रापुरता मर्यादित कोठा महाराष्ट्रातील इतर विभागातील विद्यार्थ्यांनी पालकांनी सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन तो नष्ट केला आहे. परंतु इंजिनिअरिंग क्षेत्रात आजही तो तसाच आहे. एवढेच नव्हे तर या विभागातील शाळा, महाविद्यालयामध्ये मिळणाऱ्या सोयी सुविधा इतर विभागातील सोयी सुविधांपेक्षा निश्चितच अधिक आहेत. महाराष्ट्रातील सर्व शाळा महाविद्यालय किंवा शिक्षण क्षेत्रासाठी सर्वसमावेशक धोरण जरी कागदोपत्री वर वर दिसणारे असले तरीसुद्धा आपण वर स्पष्ट केलेल्या भागांमध्ये सोयी सुविधांचे प्रमाण अधिक आहे. याशिवाय गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक असलेले पाऊले इतर क्षेत्रात फारसे उचलले जात नाहीत. आरोग्य क्षेत्रात सुद्धा महाराष्ट्रातल्या दुर्गम मागास क्षेत्रापेक्षा विकसित क्षेत्रामधल्या आरोग्य सोयीसुविधा अधिक व सक्षम बनवलेले आहेत. सर्वच क्षेत्रात समानता यावी यासाठी शासनाने अधिक प्रकर्षाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.लिंग-आधारित असमानता महाराष्ट्रातील समाज व्यवस्थेत दिसून येते. स्त्रियांच्या संदर्भातीलआरोग्य, रोजगार आणि सामाजिक सहभागात स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. एका अभ्यासानुसार महाराष्ट्रात स्त्रियांच्या आरोग्याच्या परिणामांमध्ये लैंगिक विषमता स्पष्ट आहे, आजही आरोग्याच्या संदर्भात विचार करता पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते ही वास्तवता नाकारता येत नाही. काही अंशी शहरी समुदायातील स्त्री-पुरुषांच्या आरोग्य व शिक्षणातील

फरकामध्ये निश्चित फरक पडलेला आहे. परंतु शंभर टक्के समानता असेलच अशी मात्र खात्री देता येणार नाही. महिलांच्या आरोग्य व शिक्षण या दोन्हीही घटकात पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या संदर्भात उच्च अस्वस्थतेची नोंद आहे.

**धोरणात्मक समस्या व त्यांच्या परिणामांचे विश्लेषण:**

**१. पायाभूत सुविधांचा अभाव:** केंद्र सरकारच्या अधिकारातील व राज्य सरकारच्या अधिकारातील जी काही धोरणे आहेत त्या धोरणांमध्ये फार मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भाग आणि मागास जिल्ह्यांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे यांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे मूलभूत सामाजिक अधिकारांमध्ये भेदभाव वाढलेला दिसतो. भौगोलिक प्रादेशिक असमतोलही पावलोपावली दिसून येतो. याशिवाय मूलभूत सुविधांमध्ये फार मोठी तफावत दिसून येते.

**२. रोजगार आणि कौशल्यातील विषमता:** सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून पाहिले असता विकसित आणि अविकसित अशा दोन्हीही भागांमध्ये फार मोठी तफावत दिसून येते. आर्थिक आणि सामाजिक विकासातून उत्पन्न वृद्धीतून तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु शहरी भागात उद्योग, तंत्रज्ञान आणि कौशल्य-आधारित रोजगार उपलब्ध आहेत, परंतु ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी खूपच कमी आहेत. त्यामुळे शहरीकडे स्थलांतर अधिक वाढते आणि ग्रामीण भागात भरती कमी होते.

**३. धोरणात्मक वापर व लाभ वितरणाची विसंगती:** केंद्र व राज्य सरकारांनी जी काही धोरणे ठरवलेली असतात ती धोरणे त्या त्या समाजापर्यंत, त्या त्या गटापर्यंत, त्या त्या क्षेत्रापर्यंत पोहोचून त्यांची परिपूर्ण अशी अंमलबजावणी करून घेणे हे सुद्धा सरकारचीच जबाबदारी असते. परंतु महाराष्ट्र सरकार ने तयार केलेले जे काही धोरणे आहेत त्या धोरणांचे पूर्ण फायदा सर्वांपर्यंत पोहोचत नाहीत. सार्वजनिक धोरणे संसाधनांचा कार्यक्षम आणि पारदर्शक वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**४.आरोग्य क्षेत्रातील असमतोल:** भारतातील सर्व राज्यांमध्ये वैद्यकीय सुविधांमध्ये दिसून येते. परंतु विकसित भागांमध्ये वैद्यकीय सुविधा अधिक आहेत व विदर्भ मराठवाड्या सारख्या मागास भागात वैद्यकीय सुविधा फारश्या विकसित झालेल्या नाहीत. त्याचबरोबर स्त्री-पुरुषांमध्ये फार मोठा फरकही दिसून येतो. आजही मागासलेल्या व ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न उपस्थित झालेले दिसून येतात. आपण आपण आजही ग्रामीण भागातील आदिवासी क्षेत्रातील महिलांच्या बाळंतपणाच्या किंवा आरोग्याच्या डोळ्या पेपरला वाचतो किंवा टीव्हीवर पाहतो. या क्षेत्राच्या विकासाकडे पाहिजे त्या प्रमाणात पाहिलं जात नाही. परिणामी समाजातील लोकांच्या मनात असंतोष किंवा असमतोल कसा केला जातो हे दिसून येते.

**५. शिक्षण क्षेत्रातील असमानता:** भारतातील सर्व राज्यांमध्ये शैक्षणिक असंतोलही दिसून येतो. आपण सर्व पाहतो की महाराष्ट्रातील सर्व विभागांचा शैक्षणिक विचार केला असता पुणे विभाग हा नेहमीच अग्रेसर असलेला दिसून येतो. महाराष्ट्रातील मुंबई पुणे ही दोन विभाग जर सोडली तर इतर विभागांमध्ये शैक्षणिक प्रगती फारसी समाधानकारक दिसून येत नाही. आजही पुणे या शहराला शिक्षणाचे माहेरघर म्हटले जाते. असामाजिक तेथून किंवा असमतोलातून इतरांच्या मनात दुजाभाव निर्माण झालेला दिसतो. सरकारची धोरणे सुद्धा असमतोलाला खतपालना खत पाणी घालणारे धोरणे व निर्णय राज्यातील इतर विभागातील समाजाच्या लक्षात येणारीच आहेत. याचे उत्तम उदाहरण द्यायचे असेल तर इंजिनीयर डॉक्टर होण्यासाठी लागणाऱ्या महाविद्यालयांची संख्या आणि त्यातील ७०/ - ३०/ टक्क्याच्या कोट्याचा विचार केला तर आजही दुधाभावच दिसून येतो.

**शिफारसी:** सार्वजनिक धोरणातील असमानता कमी करण्यासाठी खालील उपाय करणे आवश्यक वाटते. १) प्रादेशिक समतोल विकास - राज्याचे बजेट वाटप प्रादेशिक स्वरूपानुसार असावे, जेणेकरून मागास विभागाला विशेष निधी आणि प्रोत्साहन मिळावे.२) शिक्षण व कौशल्याची समतोल उपलब्धता - शासकीय शाळा, महाविद्यालये व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रांचा विकास सर्व भागात केला पाहिजे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विशेष आराखडे आणि आर्थिक सहाय्य आवश्यक आहे. ३) मागास, ग्रामीण आणि आदिवासी भागातील आरोग्य केंद्रे, मोबाईल आरोग्य सेवा व आरोग्य विमा योजना विस्तृत पद्धतीने राबवणे आवश्यक आहे. ४) सरकारी योजना व निधी यांचा वापर पारदर्शक आणि सामाजिक लेखापरीक्षणांद्वारे सार्वजनिकपणे खुले केले पाहिजे. यामुळे असमानतेच्या बाबतीत दोष शोधणे सुलभ होईल. वरील शिफारशीन शिवाय अनेक शिफारसी देण्यासारख्या आहेत परंतु संशोधन पेपरच्या काही मर्यादा येतात त्यामुळे इतर शिफारसी येथे टाळण्यात आलेले आहे.

## संदर्भ सूची:


१) रायखेलकर, दा. भारतीय अर्थव्यवस्था. विद्या बुक्स पब्लिशर्स.
२) रायखेलकर, दा. भारतीय अर्थव्यवस्था (भाग १ व २). विद्या बुक्स पब्लिशर्स.
३) कुलकर्णी, प्र. रा. भारतीय अर्थव्यवस्था. विद्या बुक्स पब्लिशर्स.
४) साबळे पाटील. भारतीय अर्थव्यवस्था. कैलास पब्लिकेशन.
५) झांबरे, दे. भारतीय अर्थशास्त्र. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स.
६) आगलावे, प्र. भारतीय समाज संरचना आणि समस्या. श्री साईनाथ प्रकाशन.
७) महाराष्ट्र शासन. https://www.maharashtra.gov.in

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# जात, वर्ग आणि लिंग: भारतीय शासकीय धोरणे आणि तिहेरी असमानतेचा प्रश्न

**डॉ. ज्योती अरविंद पोटे** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, पी.डी. कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ, ठाणे

**गोषवारा:** भारतातील सामाजिक संरचना जात, वर्ग आणि लिंग या तीन प्रमुख घटकांवर आधारित आहे, ज्यामुळे एक जटिल आणि बहुस्तरीय असमानता निर्माण होते. ही असमानता "तिहेरी असमानता" *(triple oppression)* म्हणून ओळखली जाते, जी केवळ सामाजिक पातळीवरच नाही तर आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतही प्रबळ आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सामाजिक न्यायाची हमी दिली आणि आरक्षण, स्त्री सक्षमीकरण योजना, कामगार कायदे, गरीबी निर्मूलन कार्यक्रम आणि मायक्रोफायनान्स यासारख्या विविध धोरणांची अंमलबजावणी केली. तरीही, दलित, आदिवासी आणि गरीब वर्गातील स्त्रिया आजही अत्यंत वंचित जीवन जगत आहेत. या स्त्रिया केवळ जातीय भेदभावाचा सामना करत नाहीत तर लिंगभेद आणि आर्थिक शोषण यांचाही बळी ठरतात.

हा संशोधन पेपर भारतीय शासकीय धोरणांच्या मर्यादा आणि तिहेरी असमानतेच्या संदर्भातील त्यांच्या अपयशांचा आलोचनात्मक आढावा घेतो. दुय्यम डेटा स्रोत जसे की राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण *(NFHS-5, 2019-21),* आवधिक श्रमशक्ती सर्वेक्षण *(PLFS 2022-23),* राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्यूरो *(NCRB 2022),* आणि ऑक्सफॅम इंडिया असमानता अहवाल (२०२३) यांचा वापर करून विश्लेषण करण्यात आले आहे. याशिवाय, केस स्टडीज आणि आशय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, सध्याची धोरणे "समावेशकता" (inclusion) दाखवतात पण "परिवर्तनकारी न्याय" *(transformative justice)* प्रदान करण्यात अपयशी ठरली आहेत. उदाहरणार्थ, *PLFS 2022-23* नुसार, स्त्रियांचा श्रमशक्ती सहभाग दर *(LFPR)* ३५.९ टक्के पर्यंत वाढला असला तरी दलित आणि आदिवासी स्त्रियांचा रोजगार मुख्यत्वे असंघटित क्षेत्रात आहे, जिथे मजुरी कमी आणि शोषण जास्त आहे. *NCRB 2022* च्या आकडेवारीनुसार, अनुसूचित जातींविरुद्ध ५७,५८२ गुन्हे नोंदवले गेले, ज्यात स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांचा वाटा मोठा आहे, जसे की बलात्कार आणि हिंसा. खरा सामाजिक न्याय मिळवण्यासाठी धोरणांमध्ये लिंग-जात-वर्ग यांचा छेदनबिंदू *(intersectionality)* विचारात घेणे आवश्यक आहे. हे धोरणे फक्त एका घटकाला लक्ष्य करतात, ज्यामुळे सर्वात खालच्या स्तरावरील स्त्रिया वंचित राहतात. या पेपरच्या आधारे असे सूचित करण्यात आले आहे की, ट्रिपल इंटरसेक्शनॅलिटी इंडेक्स *(Triple Intersectionality Index)* तयार करून योजनांची अंमलबजावणी करावी, जेणेकरून जात, लिंग आणि आर्थिक स्थिती यांचा एकत्रित विचार होईल. हा अभ्यास सामाजिक न्यायाच्या दृष्टीने नवीन दिशा दाखवतो आणि धोरण निर्मात्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो.

**मुख्य शब्द:** जात, वर्ग, लिंग, तिहेरी असमानता, आरक्षण धोरण, समावेशक विकास, सामाजिक न्याय, लिंग-आधारित भेदभाव, दलित स्त्रिया, आदिवासी स्त्रिया, आर्थिक असमानता, संरचनात्मक हिंसा, इंटरसेक्शनॅलिटी, दलित स्त्रीवाद, गरीबी निर्मूलन.

**प्रस्तावना:** भारतीय समाज ही एक जटिल आणि बहुस्तरीय रचना आहे, जी जात *(caste),* वर्ग *(class)* आणि लिंग *(gender)* या तीन मूलभूत घटकांवर आधारित आहे. हा समाज हजारो वर्षांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रक्रियेतून विकसित झाला आहे. प्राचीन काळातील वर्णव्यवस्था (varna system), जी मनुस्मृतीसारख्या ग्रंथांमध्ये वर्णन केली गेली आहे, ही जातीय पदानुक्रमाची मुळे आहे, ज्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण होते आणि दलित यांना या व्यवस्थेबाहेर ठेवले गेले. मध्ययुगीन आणि आधुनिक काळात सामंती अर्थव्यवस्था (*feudal economy)* ने वर्गीय असमानता वाढवली, ज्यात जमीनदार *(landlords)* आणि भूमिहीन मजूर *(landless laborers)* यांच्यातील संघर्ष केंद्रस्थानी होता. याशिवाय, पितृसत्ताक प्रथा *(patriarchal system)* ने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले, ज्यात संपत्ती हक्क, शिक्षण आणि निर्णय प्रक्रियेत त्यांना वंचित ठेवले गेले. या तीन घटकांच्या परस्परसंवादामुळे *(intersection)* एक बहुस्तरीय असमानता निर्माण झाली, जी केवळ सामाजिक पातळीवरच नाही तर आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतही प्रबळ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते, त्यांनी *"Annihilation of Caste" (1936)* या ग्रंथात जातीय व्यवस्थेची सखोल टीका केली. आंबेडकर म्हणतात, "जात हा वर्गाचा आधार आहे," म्हणजे जातीय पदानुक्रम हा आर्थिक आणि सामाजिक असमानतेचा मूल स्रोत आहे. त्यांच्या मते, जात ही एक बंद आणि कठोर व्यवस्था आहे, जी व्यक्तीच्या जन्मावर आधारित असते आणि त्याच्या सामाजिक गतिशीलतेला *(social mobility)* मर्यादित करते. उदाहरणार्थ, दलित आणि आदिवासी समुदायांना पारंपरिक व्यवसाय (जसे की स्वच्छता किंवा शेती मजुरी) मध्ये ढकलले गेले, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक आणि राजकीय संधींना बंधन घातले गेले. आंबेडकरांनी जातीय असमानतेच्या निर्मूलनासाठी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला.

मार्क्सवादी परंपरेत *(Marxist tradition)* वर्ग हा प्राथमिक विरोधाभास *(primary contradiction)* मानला जातो. कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांच्या "कम्युनिस्ट मॅनिफेस्टो" (१८४८) मध्ये वर्ग संघर्षाची संकल्पना मांडली गेली, ज्यात श्रम *(labor)* आणि भांडवल *(capital)* यांच्यातील संघर्ष केंद्रस्थानी आहे. भारतीय संदर्भात, हा संघर्ष भूमिहीन मजूर, शेतमजूर आणि भांडवलदार *(capitalists)* यांच्यात दिसतो, विशेषतः ग्रामीण भागात जिथे सामंती अवशेष अजूनही कायम आहेत. मात्र, लिंग हे तिसरे आयाम या दोन्ही संकल्पनांची गुंतागुंत वाढवते. दलित स्त्री ही केवळ दलित किंवा केवळ स्त्री नसते; ती जात, लिंग आणि वर्ग यांच्या तिहेरी शोषणाची *(triple oppression)* शिकार असते. उदाहरणार्थ, एक दलित स्त्री जातीय भेदभावाचा सामना करते, लिंगभेदाचा (जसे की घरगुती हिंसा किंवा कमी मजुरी) आणि वर्गीय शोषणाचा (जसे की असंघटित क्षेत्रातील कमी पगाराचे काम).

ही "तिहेरी असमानता" *(triple inequality)* ही संकल्पना किंबरले क्रेन्शॉ *(Kimberlé Crenshaw, 1989)* यांनी *"Demarginalizing the Intersection of Race and Sex"* या निबंधात अमेरिकेतील काळ्या स्त्रियांच्या संदर्भात प्रथम मांडली. क्रेन्शॉ म्हणतात, "भेदभावाच्या संरचनेत एकाच घटकाला अलग करून न्याय देता येत नाही; ते एकत्रित विचारात घ्यावे लागते." म्हणजे, वंश *(race)* आणि लिंग यांचा छेदनबिंदू *(intersection)* विचारात घेतल्याशिवाय काळ्या स्त्रियांच्या समस्या सोडवता येत नाहीत. ही संकल्पना इंटरसेक्शनॅलिटी *(intersectionality)* म्हणून ओळखली जाते, जी असमानतेच्या बहुविध आयामांचा अभ्यास करते. भारतीय संदर्भात, शर्मिला रेगे, गोपाल गुरु, आनंद तेलतुंबडे आणि गेल ऑम्वेट यांसारख्या अभ्यासकांनी या संकल्पनेचा विस्तार केला. रेगे यांच्या *"Writing Caste/Writing Gender" (2006)* मध्ये दलित स्त्रीवाद *(Dalit feminism)* हा मुख्यधारा स्त्रीवादापासून *(mainstream feminism)* वेगळा असल्याचे सांगितले आहे, कारण तो जात आणि लिंग यांचा एकत्रित विचार करतो आणि दलित स्त्रियांच्या विशिष्ट अनुभवांना (जसे की जातीय आणि लैंगिक हिंसा) केंद्रस्थानी ठेवतो. गोपाल गुरु यांनी *"Dalit Women Talk Differently" (1995)* मध्ये दलित स्त्रियांच्या वेगळ्या राजकीय आवाजावर *(distinct political voice)* भर दिला, ज्यात दलित समाजातील आंतरिक पितृसत्ता *(internal patriarchy)* आणि बाह्य जातीय भेदभाव *(external casteism)* यांचा उल्लेख आहे. आनंद तेलतुंबडे यांनी *"Dalits: Past, Present and Future" (2016)* मध्ये आरक्षणाच्या मर्यादांवर टीका केली, सांगितले की ते जातीय भेदभाव कमी करतात पण वर्गीय असमानता दूर करू शकत नाहीत. गेल ऑम्वेट यांनी ग्रामीण स्त्रियांच्या संघर्षांवर *(rural women's struggles)* प्रकाश टाकला, ज्यात वर्ग आणि लिंग यांचा संघर्ष दिसतो.

१९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर, भारतीय राज्याने सामाजिक न्याय *(social justice)* साध्य करण्यासाठी संविधानिक आणि धोरणात्मक पावले उचलली. संविधानाच्या प्रस्तावनेत समता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली गेली. यासाठी तीन प्रमुख धोरणात्मक दृष्टिकोन राबवले गेले:

(१) जातिनिहाय आरक्षण *(Caste-based Reservation):* अनुसूचित जाती *(SC)*, अनुसूचित जमाती *(ST)* आणि इतर मागासवर्गीय *(OBC)* साठी शिक्षण, नोकरी आणि राजकीय प्रतिनिधित्वात आरक्षण दिले गेले. संविधानाच्या कलम १५(समता) आणि १६(सार्वजनिक रोजगारात समान संधी) अंतर्गत *SC* साठी १५ टक्के आणि *ST* साठी ७.५ टक्के आरक्षण आहे. *OBC* साठी २७ टक्के आरक्षण मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार (१९९०) लागू झाले. यामुळे दलित आणि आदिवासींचे प्रतिनिधित्व वाढले, उदाहरणार्थ, सरकारी नोकऱ्यांत *SC/ST* चे प्रमाण १९५० च्या १ टक्के वरून २०२० पर्यंत २२ टक्के पर्यंत पोहोचले.

(२) लिंग-आधारित कल्याणकारी योजना: स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रम राबवले गेले, जसे की "बेटी बचाओ बेटी पढाओ" (२०१५, मुलींच्या शिक्षण आणि संरक्षणासाठी), "प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना" *(PMMVY, 2017*, गर्भवती स्त्रियांसाठी आर्थिक मदत), आणि लैंगिक गुन्ह्यांविरुद्ध कायदे जसे की "संरक्षण ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सेस ॲक्ट" *(POSCO, 2012)* आणि निर्भया फंड (२०१३, स्त्रियांविरुद्ध हिंसेच्या विरोधात). याशिवाय, "स्त्री शक्ती पॅकेज" आणि "वन स्टॉप सेंटर" सारख्या योजनांनी स्त्रियांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले.

(३) वर्ग-आधारित गरीबी निर्मूलन योजना *(Class-based Poverty Alleviation Schemes):* गरीब आणि वंचित वर्गांसाठी कार्यक्रम जसे की "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना" *(MGNREGA, 2005,* ग्रामीण भागात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी), "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" *(PMSBY, 2015,* अपघात विमा), आणि "आयुष्मान भारत" (२०१८, गरीबांसाठी मोफत आरोग्य विमा). या योजनांनी ग्रामीण गरीबी कमी करण्यात मदत केली. या धोरणांमुळे काही उल्लेखनीय प्रगती झाली आहे. उदाहरणार्थ, *MGNREGA* मध्ये २०२४ -२५ मध्ये स्त्रियांचा सहभाग ५८.१५ टक्के पर्यंत पोहोचला, जो २०१७-१८ च्या ५३.१९ टक्के पेक्षा जास्त आहे.आवधिक श्रमशक्ती सर्वेक्षण *(PLFS)* २०२४ नुसार,

स्त्रियांचा श्रमशक्ती सहभाग दर *(LFPR)* ४०.३ टक्के पर्यंत वाढला आहे, जो २०१२ च्या ३२.८ टक्के पेक्षा जास्त आहे. तरीही, ही प्रगती अपुरी आहे आणि तिहेरी असमानतेच्या केंद्रस्थानी असलेल्या दलित आणि आदिवासी स्त्रियांपर्यंत पोहोचलेली नाही. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण *(NFHS-5, 2019-21)* च्या आकडेवारीनुसार, दलित आणि आदिवासी स्त्रियांचा साक्षरता दर ४०-५० टक्के च्या आसपास आहे, तर सामान्य वर्गातील स्त्रियांचा ७० टक्के पेक्षा जास्त आहे.आरोग्य, रोजगार आणि मालमत्ता हक्कांत मोठी दरी आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्यूरो *(NCRB)* २०२३ नुसार, अनुसूचित जातींविरुद्ध ५७,७८९ गुन्हे नोंदवले गेले, ज्यात स्त्रियांविरुद्ध बलात्कार आणि हिंसेचे प्रमाण उच्च आहे (२,८३५ बलात्कार प्रकरणे SC स्त्रियांविरुद्ध). ऑक्सफॅम इंडिया असमानता अहवाल (२०२४) सांगतो की, भारतातील आर्थिक असमानता वाढत आहे, ज्यात १० टक्के लोकांकडे ७७ टक्के राष्ट्रीय संपत्ती आहे, आणि दलित आणि आदिवासी स्त्रिया सर्वाधिक प्रभावित आहेत. हा विरोधाभास - धोरणांची उपस्थिती तरीही कायम असलेली असमानता - या पेपरचा केंद्रबिंदू आहे. हा पेपर इंटरसेक्शनॅलिटीच्या दृष्टीने भारतीय शासकीय धोरणांचे विश्लेषण करतो, त्यांच्या मर्यादा उघड करतो.

**संबंधित साहित्याचा आढावा:**

**१. जात आणि लिंग:** शर्मिला रेगे यांच्या *"Writing Caste/Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonios" (2006)* मध्ये दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा अभ्यास आहे. रेगे दाखवतात की, दलित चळवळींनी जातीय मुद्द्याला प्राधान्य दिले पण लिंगप्रश्न दुय्यम ठेवला. दलित स्त्रियांच्या कथा जसे की उर्मिला पवारची "आयदान" किंवा लक्ष्मण माने यांची "उपरा" या पुस्तकांतून दलित स्त्रियांच्या दुहेरी शोषणाचे वर्णन आहे. रेगे म्हणतात, "दलित साहित्यात लिंग हा मुद्दा अदृश्य राहिला, ज्यामुळे दलित स्त्रीची ओळख अपूर्ण राहते."

**२. वर्ग आणि लिंग:** गेल ऑम्वेट यांच्या *"We Will Smash This Prison: Indian Women in Struggle" (1980)* मध्ये शेतमजूर आणि ग्रामीण स्त्रियांच्या संघर्षांचे वर्णन आहे. ऑम्वेट महाराष्ट्रातील शेतमजूर स्त्रियांच्या आंदोलनांचा अभ्यास करतात, ज्यात वर्ग आणि लिंग यांचा संघर्ष दिसतो. त्या सांगतात की, ग्रामीण भागातील स्त्रिया केवळ मजुरीसाठी नव्हे तर लैंगिक शोषणाविरुद्धही लढतात. महात्मा फुले यांच्या "शेतकऱ्याचा आसूड" (१८८३) सारख्या कार्याचा उल्लेख करून त्या ग्रामीण वर्गातील स्त्रियांच्या स्थितीचा आढावा घेतात.

**३. इंटरसेक्शनॅलिटी (Intersectionality):** गोपाल गुरु यांच्या *"Dalit Women Talk Differently" (1995)* मध्ये दलित स्त्रियांचा वेगळा राजकीय आवाज असल्याचे सांगितले आहे.**गोपाल** गुरु म्हणतात, "दलित स्त्रिया वेगळ्या बोलतात कारण त्यांचे शोषण जात आणि लिंग यांच्या छेदनबिंदूवर आहे." ते आंतरिक (दलित समाजातील पितृसत्ता) आणि बाह्य (उच्चजातीय भेदभाव) घटकांचा उल्लेख करतात. आनंद तेलतुंबडे यांच्या "Dalits: Past, Present and Future" (२०१६, २०२० संस्करण) मध्ये आरक्षणाने दलित मध्यमवर्ग तयार झाला पण गरीब दलित स्त्रियांना फायदा झाला नाही असे विश्लेषण आहे. तेलतुंबडे सांगतात, "आरक्षण हे वर्गीय असमानता दूर करू शकत नाही; ते जातीय भेदभाव कमी करते पण आर्थिक न्याय देत नाही."

**४. धोरण आलोचना:** नंदिनी सुंदर यांच्या *"The Burning Forest: India's War in Bastar" (2019)* मध्ये बस्तरमधील आदिवासी स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन आहे. नंदिनी सुंदर सांगतात की, नक्षलवाद आणि सुरक्षा दलांच्या संघर्षात आदिवासी स्त्रिया तिहेरी हिंसेला बळी पडतात. कल्याणी मेनन-सेन (२०२१) यांनी *MGNREGA* मध्ये स्त्रियांना कमी मजुरी आणि कमी दिवस मिळतात असे दाखवले. आदिवासी भागात योजना पोहोचत नाहीत.

**५. आंतरराष्ट्रीय संदर्भ:** क्रेन्शॉ (१९८९) आणि पेट्रीसिया हिल कॉलिन्स (२०००) यांच्या *"Black Feminist Thought"* ने इंटरसेक्शनॅलिटीचे साधन दिले. कॉलिन्स सांगतात, "असमानता एकत्रित अनुभव आहे; ती अलग करता येत नाही." हे भारतीय अभ्यासकांना लागू होते.

या साहित्यावरून स्पष्ट होते की, तिहेरी असमानता ही संकल्पनात्मक आणि व्यावहारिक आहे, ज्याचा धोरणांवर प्रभाव पडतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. भारतीय शासकीय धोरणांमध्ये जात, वर्ग, लिंग यांचा छेदनबिंदू कितपत विचारात घेतला गेला आहे याचा सखोल आढावा घेणे. उदाहरणार्थ, आरक्षण आणि *MGNREGA* यांच्यात इंटरसेक्शनल दृष्टिकोनाचा अभाव शोधणे.

२. दलित, आदिवासी, *OBC* आणि गरीब उच्चजातीय स्त्रियांच्या बाबतीत ही धोरणे किती प्रभावी ठरली याचे डेटा-आधारित विश्लेषण करणे. *NFHS*-५ *(National Family Health Survey - 5)* आणि *PLFS (Periodic Labour Force Survey)* यांचा वापर करून तुलनात्मक अभ्यास.

३. ऐतिहासिक आणि समकालीन संदर्भात इंटरसेक्शनॅलिटीचा वापर करून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करणे.

४. NGO अहवाल आणि केस स्टडीजद्वारे व्यावहारिक उदाहरणे देऊन धोरणांच्या अपयशांचे प्रमाणीकरण करणे.

**गृहीतके:**

१. भारतीय शासकीय धोरणे जात, वर्ग किंवा लिंग यापैकी फक्त एकाच घटकाला प्राधान्य देतात; तिन्हींचा एकत्रित विचार करीत नाहीत, ज्यामुळे तिहेरी असमानता कायम राहते.

२. आरक्षण धोरणाने दलित मध्यमवर्ग तयार झाला पण दलित स्त्रियांचे प्रमाण अत्यल्प आहे, जसे की सरकारी नोकऱ्यांत १६-१८ टक्के *(DoPT 2022).*

३. गरीबी निर्मूलन योजनांमध्ये लिंग-आधारित भेदभाव आणि जात-आधारित अपवर्जन कायम आहे, जसे की *MGNREGA* मध्ये आदिवासी स्त्रियांना कमी दिवस आणि मजुरी.

४. इंटरसेक्शनल दृष्टिकोन नसल्यामुळे धोरणे "equality" वर भर देतात पण "equity" देत नाहीत, ज्यामुळे गरीब दलित स्त्रिया वंचित राहतात.

५. *NCRB (National Crime Records Bureau)* आणि *CAG (Comptroller and Auditor General of India)* अहवालांनुसार, कायदे आणि योजना अंमलबजावणीत भ्रष्टाचार आणि विलंब यामुळे प्रभाव कमी होतो.

**संशोधन पद्धती:** हा अभ्यास **दुय्यम** स्रोतांवर आधारित आहे. तथ्य संकलन स्रोत: *NFHS-4 & NFHS-5* (शिक्षण, आरोग्य डेटा), *NSSO 68th & 76th Round* (आर्थिक असमानता), *PLFS 2022-23* (रोजगार दर: स्त्री WPR ३५.९ टक्के), *Census 2011 (SECC* डेटा), भारत सरकारचे अहवाल *(MoSPI, MoSJE, MoWCD), NGO* अहवाल *(Oxfam India 2023:* असमानता वाढ), *WGWLO, Dalit Women Fight.*

**पद्धत:** आशय विश्लेषण (धोरण दस्तऐवजांचे परीक्षण), तुलनात्मक विश्लेषण (जात-लिंग-वर्ग डेटाची तुलना), केस स्टडी (बस्तर, बीड, मुशहर).

**सैद्धांतिक चौकट:** इंटरसेक्शर्नॅलिटी *(Crenshaw),* सबाल्टर्न स्टडीज (स्पिवाक), आंबेडकरी स्त्रीवाद (आंबेडकर आणि रेगे). डेटा विश्लेषणासाठी सांख्यिकी पद्धती आणि गुणात्मक व्याख्या वापरली.

**आशय विश्लेषण:**

**१. आरक्षण धोरण आणि लिंग:** *SC/ST* मध्ये स्त्रियांचे प्रमाण सरकारी नोकऱ्यांमध्ये १६-१८ टक्के *(DoPT 2022). OBC* मध्ये "क्रीमी लेयर" मुळे गरीब *OBC* स्त्रियांना फायदा नाही. ११० व्या दुरुस्तीने पंचायतींमध्ये ५० टक्के स्त्री आरक्षण दिले, पण "सरपंचपती" प्रथा आणि दलित महिला सरपंचांवर हल्ले वाढले (राजस्थान २०२१:१२ हल्ले). तेलतुंबडे सांगतात, आरक्षण दलित मध्यमवर्ग तयार करतो पण गरीब स्त्रियांना नाही.

**२. गरीबी निर्मूलन आणि** *MGNREGA* **:** २०२२-२३ मध्ये *MGNREGA* मध्ये ५७.४७ टक्के स्त्रिया सहभागी, पण आदिवासी जिल्ह्यांत मजुरी १९० -२१० रुपये (राष्ट्रीय सरासरी २२७). शौचालय आणि क्रॅश अभावामुळे गरोदर स्त्रिया सोडतात. मेनन-सेन (२०२१) सांगतात, लिंग भेदभाव कायम.

**३. शिक्षण आणि स्टायपेंड:** *CAG Report* २०२१ नुसार, पोस्ट-मॅट्रिक स्कॉलरशिपमध्ये विलंब आणि भ्रष्टाचार. उच्च शिक्षणात दलित-आदिवासी मुली ४-६ टक्के. NFHS-५: SC/ST मुलींचा साक्षरता दर कमी.

**४. लैंगिक हिंसा आणि कायदा:** *NCRB 2022: SC/ST* विरुद्ध ५७,५८२ गुन्हे, १३ टक्के वाढ; दोषसिद्धी ८ टक्के. हाथरस, उन्नाव केसेस दाखवतात व्यवस्था अपयशी.

**५. व्यष्टी अध्ययन:** अ) छत्तीसगड बस्तर: गोंड स्त्रिया सलवा जुडूम आणि नक्षलवादात तिहेरी हिंसा (सुंदर, २०१९). ब) महाराष्ट्र बीड: ऊसतोड स्त्रियांमध्ये ९० टक्के हिस्टेरेक्टॉमी (वर्ग+लिंग+जात). क) बिहार मुशहर: *MGNREGA* मध्ये काम नाही; मातीची भांडी करतात.

या विश्लेषणातून स्पष्ट होते की, धोरणे इंटरसेक्शनल नाहीत.

**निष्कर्ष आणि शिफारसी:** हा संशोधन पेपर भारतीय समाजातील जात, वर्ग आणि लिंग यांच्या छेदनबिंदूवर *(intersectionality)* आधारित तिहेरी असमानतेचा *(triple oppression)* आलोचनात्मक अभ्यास करतो. विश्लेषणातून स्पष्ट होते की, स्वातंत्र्यानंतरच्या दशकांत भारतीय शासकीय धोरणांनी सामाजिक न्यायाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, तरीही ही धोरणे मुख्यत्वे "ॲडिटिव्ह" *(additive)* स्वरूपाची आहेत — म्हणजे ते जात, वर्ग किंवा लिंग यापैकी एकाच आयामाला प्राधान्य देतात, परंतु तिन्हींच्या परस्परसंवादाचा *(intersection)* विचार करत नाहीत. परिणामी, दलित, आदिवासी आणि गरीब वर्गातील स्त्रिया — ज्या या तिहेरी शोषणाच्या केंद्रस्थानी आहेत — आजही शिक्षण, रोजगार, आरोग्य, मालमत्ता हक्क आणि सुरक्षिततेमध्ये सर्वाधिक वंचित राहतात.

*PLFS (Periodic Labour Force Survey)* च्या नवीनतम आकडेवारीनुसार (२०२३-२४), स्त्रियांचा श्रमशक्ती सहभाग दर *(Female LFPR)* ४१.७ टक्के पर्यंत वाढला आहे, जो ग्रामीण भागातील वाढीमुळे प्रामुख्याने झाला आहे. तरीही, हा रोजगार मुख्यत्वे असंघटित आणि कमी मजुरीच्या क्षेत्रात आहे, विशेषतः दलित आणि आदिवासी स्त्रियांसाठी. *NCRB (National Crime Records Bureau)* च्या २०२३ अहवालानुसार, अनुसूचित जातींविरुद्ध ५७,७८९ गुन्हे नोंदवले गेले, ज्यात स्त्रियांविरुद्ध बलात्कार आणि हिंसेचे प्रमाण उच्च आहे. अनुसूचित जमातींविरुद्ध गुन्हे २८.८ टक्के ने वाढले आहेत. ऑक्सफॅमच्या नवीनतम अहवालांनुसार (२०२४-२५), भारतातील आर्थिक असमानता आणखी वाढली

आहे, ज्यात श्रीमंत १ टक्के लोकांकडे संपत्तीचा मोठा वाटा आहे, तर गरीब दलित आणि आदिवासी स्त्रिया सर्वाधिक प्रभावित आहेत. *MGNREGA* मध्ये स्त्रियांचा सहभाग २०२४-२५ मध्ये ५९ टक्के पर्यंत पोहोचला आहे, जो दशकातील सर्वोच्च आहे, पण आदिवासी आणि गरीब भागांत मजुरी आणि दिवसांच्या संख्येत भेदभाव कायम आहे.

हे आकडे आणि **व्यष्टी अध्ययन** (जसे की बस्तरमधील आदिवासी हिंसा, बीडमधील ऊसतोड स्त्रियांचे शोषण आणि बिहारमधील मुशहर समुदायाची गरीबी) दाखवतात की, सध्याची धोरणे "समावेशकता" *(inclusion)* दाखवतात पण "परिवर्तनकारी न्याय" *(transformative justice)* प्रदान करण्यात अपयशी ठरली आहेत. आरक्षणाने दलित मध्यमवर्ग तयार केला, पण गरीब दलित स्त्रियांना त्याचा फायदा झाला नाही. गरीबी निर्मूलन योजनांमध्ये लिंग आणि जातीय अपवर्जन कायम आहे, तर लैंगिक हिंसेच्या कायद्यांची अंमलबजावणी कमकुवत आहे. इंटरसेक्शनॅलिटीच्या अभावामुळे धोरणे "समानता" *(equality)* वर भर देतात पण "न्याय" *(equity)* देत नाहीत, ज्यामुळे सर्वात खालच्या स्तरावरील स्त्रिया वंचित राहतात. या पेपरच्या विश्लेषणावर आधारित खालील शिफारसी सुचवल्या जातात, ज्या धोरण निर्मात्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतात:

**१. ट्रिपल इंटरसेक्शनॅलिटी इंडेक्स (*TII*) तयार करणे**: जात, लिंग आणि उत्पन्न/वर्ग यांचा एकत्रित विचार करणारा हा इंडेक्स विकसित करावा. यात *NFHS*, *PLFS* आणि SECC सारख्या डेटा स्रोतांचा वापर करून एक स्कोअरिंग सिस्टीम तयार करावी. योजनांची पात्रता, लाभ वितरण आणि अंमलबजावणी या इंडेक्सवर आधारित करावी, जेणेकरून सर्वात वंचित (जसे की गरीब दलित स्त्रिया) प्राधान्य मिळेल.

**२. आरक्षणात सब-कोटा** *(Sub-Quota)* **लागू करणे:** *SC/ST/OBC* साठीच्या आरक्षणात स्त्रियांसाठी सब-कोटा (उदा. १६.५ टक्के किंवा ३३ टक्के पेक्षा जास्त) अनिवार्य करावा. सरकारी नोकऱ्या, शिक्षण आणि राजकीय प्रतिनिधित्वात हा लागू करावा. पंचायतींमध्ये ५० टक्के स्त्री आरक्षण असले तरी "सरपंचपती" प्रथा रोखण्यासाठी कठोर अंमलबजावणी आणि दलित/आदिवासी महिला नेत्यांसाठी विशेष संरक्षण.

**३.** *MGNREGA* **आणि गरीबी निर्मूलन योजनांचा विस्तार:** *MGNREGA* मध्ये १०० दिवसांऐवजी २०० दिवसांची हमी द्यावी, विशेषतः आदिवासी आणि दलित बहुल भागांत. क्रॅश, शौचालय आणि बालसंगोपन सुविधा अनिवार्य कराव्यात, जेणेकरून गरोदर आणि माता स्त्रिया सहभागी होऊ शकतील. मजुरी समान आणि वेळेवर देण्याची यंत्रणा मजबूत करावी. आदिवासी भागात विशेष फंड आणि योजना पोहोचवाव्यात.

**४. दलित-आदिवासी स्त्रियांसाठी विशेष आर्थिक पॅकेज आणि जमीन हक्क:** जमीन सुधारणा आणि वन हक्क कायद्याची कठोर अंमलबजावणी करून दलित/आदिवासी स्त्रियांना वैयक्तिक जमीन हक्क द्यावेत. मायक्रोफायनान्स, स्टार्टअप फंड आणि कौशल्य प्रशिक्षणात त्यांना प्राधान्य. गरीब उच्चजातीय स्त्रियांसाठीही वर्ग-आधारित मदत, पण जातीय भेदभाव रोखण्यासाठी इंटरसेक्शनल दृष्टिकोन.

**५. महिला नेत्यांसाठी संरक्षण कायदा आणि इंटरसेक्शनल ट्रेनिंग:** दलित/आदिवासी महिला सरपंच किंवा नेत्यांवर होणाऱ्या हल्ल्यांना रोखण्यासाठी विशेष कायदा. धोरण निर्माते, अधिकारी आणि न्यायव्यवस्थेसाठी इंटरसेक्शनॅलिटीवर आधारित प्रशिक्षण अनिवार्य करावे. *NCRB* आणि *CAG* सारख्या संस्थांच्या अहवालांवर आधारित भ्रष्टाचार आणि विलंब रोखण्यासाठी डिजिटल मॉनिटरिंग.

या शिफारसी अंमलात आणल्यास भारतीय धोरणे केवळ समावेशकच नव्हे तर परिवर्तनकारी होतील, ज्यामुळे तिहेरी असमानता कमी होईल आणि खरा सामाजिक न्याय साध्य होईल. हा अभ्यास इंटरसेक्शनॅलिटीच्या दृष्टीने नवीन संशोधन आणि धोरणांसाठी आधार प्रदान करतो.

**संदर्भ सूची:**


- Crenshaw, K. (1989). Demarginalizing the intersection of race and sex: A Black feminist critique of antidiscrimination doctrine, feminist theory and antiracist politics. University of Chicago Legal Forum, 1989(1), Article 8, 139–167.
- Guru, G. (1995). Dalit women talk differently: A critique of 'difference' and towards a Dalit feminist standpoint. Economic and Political Weekly, 30(41/42), 2548–2550.
- Marx, K., & Engels, F. (1848). Manifesto of the Communist Party. Workers' Educational Association.
- Ministry of Statistics and Programme Implementation. (2024). Periodic Labour Force Survey (PLFS) annual report: July 2023–June 2024. Government of India. https://www.mospi.gov.in/sites/default/files/press_release/Press_note_AR_PLFS_2023_24_22092024.pdf
- Ministry of Rural Development. (2024). Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act (MGNREGA) annual report 2023-24. Government of India. (महिला सहभाग डेटा स्रोत).
- National Crime Records Bureau. (2023). Crime in India 2023. Ministry of Home Affairs, Government of India.
- National Family Health Survey (NFHS-5). (2022). National Family Health Survey (NFHS-5) 2019-21: India report. International Institute for Population Sciences (IIPS) and ICF. http://rchiips.org/nfhs/NFHS-5Reports/India.pdf
- Oxfam International. (2023). Survival of the richest: The India story. Oxfam India.
- Rege, S. (2006). Writing caste/writing gender: Narrating Dalit women's testimonios. Zubaan.

- Teltumbde, A. (2016). Dalits: Past, present and future. Routledge India.
- आंबेडकर, बा. र. (२०११). जातिचे निर्मूलन (सु. आनंद, संपा.). नवी दिल्ली: नॅव्हायन. (मूळ प्रकाशन १९३६)
- आंबेडकर, बा. र. (२०१४). हिंदू कोड बिल आणि स्त्री प्रश्न. नवी दिल्ली: नॅव्हायन.
- गायकवाड, लक्ष्मण. (२००४). उच्छेद (श. रेगे, अनु.). पुणे: सुगावा प्रकाशन. (मूळ प्रकाशन १९५९)
- गुरु, गोपाल. (२०११). दलित स्त्रियांचा प्रश्न आणि बहुजन स्त्रीवाद. नागपूर: आनंद प्रकाशन.
- जगताप, शर्मिला. (२०१७). दलित स्त्रीचे आत्मकथन: साहित्य आणि समाजशास्त्र. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
- फुले, महात्मा ज्योतिराव. (२०१५). शेतकऱ्याचा आसूड. पुणे: शब्दालय प्रकाशन. (मूळ प्रकाशन १८८३)
- राणे, वि. जो. (२०१९). जात, वर्ग आणि लिंग: भारतीय समाजातील तिहेरी असमानता. मुंबई: ग्रंथाली.
- रेगे, शर्मिला. (२०१०). लिहिते दलित, लिहिते स्त्री: दलित स्त्रियांची साक्ष. पुणे: क्रांती प्रकाशन. (मूळ इंग्रजी २००६)
- वाघ, अरुणा. (२०१८). स्त्री दलित अस्मिता आणि साहित्य. औरंगाबाद: आनंद प्रकाशन.
- साठे, अण्णाभाऊ. (२०१५). फकीरा (संपूर्ण कादंबरी संच). मुंबई: लोकवाङ्मय गृह.
- हरड, सुभाष. (२०२०). मराठी दलित साहित्याचा इतिहास. नागपूर: पॉप्युलर प्रकाशन.

# सामाजिक असामानता: शासकीय धोरणांचे सिद्धांत, व्यवहार आणि प्रभाव

**डॉ. सुनील व्यंकटेश सामग** सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी जि.जालना

**सारांश:** सामाजिक असामानताही एक बहुआयामी आणि सर्वव्यापी समस्या आहे, जी केवळ आर्थिक असमानतेपुरती मर्यादित नसून ती जातीय, लैंगिक, प्रादेशिक आणि सांस्कृतिक विषमतांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यातून निर्माण होते. भारतासारख्या बहुसांस्कृतिक समाजात, ही असामानता ऐतिहासिक वर्चस्व, संरचनात्मक असमानता आणि संसाधनांच्या असमान वितरणाच्या जड प्रभावाने आणखीन गहन झाली आहे. शासकीय धोरणे हे या असामानतेचे नियमन, नियंत्रण आणि निर्मूलन करण्याचे प्राथमिक औपचारिक साधन आहेत. हा शोध निबंध सामाजिक असामानता आणि शासकीय धोरण यांच्यातील गुंतागुंतीचे संबंध एका संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून मांडतो. या शोधलेखात असामानतेच्या संकल्पनेचे सैद्धांतिक पाया (जसे की, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, अमर्त्य सेन), भारतातील तिची विविध रूपे, आणि ती दूर करण्यासाठी अवलंबलेल्या धोरणांची (आरक्षण, गरीबीनिर्मूलन कार्यक्रम, सार्वजनिक सेवा पुरवठा, प्रगतिशील करव्यवस्था) वैचारिक मूल्यमापन केले आहे. मुख्य विश्लेषण हे धोरणांच्या अंमलबजावणीच्या अंतराळावर *(Policy Implementation Gap)* केंद्रित आहे — म्हणजेच, धोरणाच्या उद्देशात्मक सिद्धांत आणि त्याच्या वास्तविक, स्थानिक स्तरावरील परिणामांमधील तफावत. निष्कर्ष असा आहे की, केवळ कायदे करणे किंवा योजना जाहीर करणे पुरेसे नसून, सामाजिक-प्रशासकीय संस्थांची कार्यक्षमता, राजकीय इच्छाशक्ती, सामाजिक पूर्वग्रहांशी संघर्ष करण्याची तयारी आणि स्थानिक गरजांना धरून धोरणांची रचना करणे हे यशस्वी हस्तक्षेपासाठी अत्यावश्यक आहे. शाश्वत परिवर्तनासाठी सक्षमीकरण-आधारित *(Empowerment-based)* आणि अधिकार-केंद्रित *(Rights-based)* धोरणांची आवश्यकता आहे.

**बीजशब्द:** सामाजिक असामानता, शासकीय धोरण, संरचनात्मक असमानता, आरक्षण, गरीबी निर्मूलन, धोरण अंमलबजावणी अंतर, सामाजिक न्याय, सक्षमीकरण, प्रगतिशील करव्यवस्था, भारतीय लोकशाही.

**प्रस्तावना:** सामाजिक असामानताही मानवी समाजरचनेतील एक सनातन, तथापि सतत बदलती गोष्ट आहे. ती केवळ 'कमी' आणि 'जास्त' असण्याचा मुद्दा नसून, सामाजिक संरचनेत सत्ता, संधी, संसाधने आणि प्रतिष्ठेचे असमान वितरण कोणत्या तर्काने होते, याच्या मुळाशी धावते. भारतीय संदर्भात, ही असामानता जाती, वर्ग, धर्म, लिंग आणि भूगोल यांच्या छेदनबिंदूंवर *(Intersectionality)* उभी राहते. एक दलित, ग्रामीण, महिला शेतमजूर हिच्या अनुभवातील असामानता ही केवळ तिच्या लिंगापुरती, जातीपुरती किंवा वर्गापुरती मर्यादित नसून या सर्व पैलूंची एकत्रित अभिव्यक्ती असते.

शासकीय धोरणे ही राज्यकर्त्यांनी समाजाचे नियमन करण्यासाठी निर्माण केलेली औपचारिक यंत्रणा आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत, या धोरणांचे अंतिम उद्दिष्ट सामाजिक कल्याण, न्याय आणि समानतेच्या तत्त्वांवर आधारित असावे अशी अपेक्षा असते. म्हणूनच, सामाजिक असामानता हे धोरणनिर्मितीचे (Policy Making) एक प्रमुख आव्हान आणि केंद्रबिंदू बनते. स्वातंत्र्योत्तर भारताने समतेच्या संवैधानिक आदर्शांना सामोरे जाण्यासाठी विविध धोरणात्मक हस्तक्षेपांचा मार्ग अवलंबिला. संविधानातील अनुच्छेद १४ ते १८ च्या तत्त्वांच्या पायावर उभे राहून, आरक्षण, गरीबी निर्मूलनाच्या अनेक योजना, सार्वत्रिक शिक्षण अधिकार, मनरेगा, अन्न सुरक्षा कायदा इत्यादी मोठे प्रयत्न केले गेले. मात्र, प्रश्न असा उभा राहतो की, ही धोरणे सामाजिक असामानतेच्या दंड-कोट्यात कितपत खोलवर भेद घालू शकतात? एका बाजूला धोरणांचे सैद्धांतिक डिझाइन आणि संसदेतील त्यांचे औचित्य असते, तर दुसरीकडे गावागावातील, टापू-वस्त्यांतील वास्तविकता असते. या दोन्हीमधील अंतराचे (Gap) विश्लेषण करणे हे या लेखाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. लेखात चर्चा तीन स्तरांवर केली आहे: प्रथम, असामानतेची संकल्पना आणि भारतातील तिची रूपे; द्वितीय, ती कमी करण्यासाठीच्या धोरणांचे सिद्धांत आणि प्रकार; आणि तृतीय, या धोरणांच्या अंमलबजावणीतील अडथळे आणि त्यांच्या परिणामकारकतेवरील प्रश्नचिन्हे.

**विषयाचे महत्त्व:**

**१. लोकशाहीची मूल्ये आणि प्रत्यक्षातील अंतर:**समता, न्याय आणि बंधुता या संवैधानिक मूल्यांची प्रत्यक्षातील स्थिती काय आहे, हे समजून घेण्यासाठी धोरणे आणि असामानता यांच्या संबंधाचा अभ्यास अत्यावश्यक आहे. धोरणे ही या मूल्यांची अंमलात आणण्याची साधने आहे.

**२. शासनाची जबाबदारी आणि जवाबदारी:** नागरिकांकडून गोळा केलेले कर आणि संसाधने वापरून तयार केलेली धोरणे त्यांच्यापर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचत आहेत का? याची तपासणी करणे हे लोकशाहीचे प्रमुख लक्षण आहे.

**३. सामाजिक सौहार्द आणि राष्ट्रीय एकात्मता:** खोलवर रुजलेली आणि वाढती असामानता सामाजिक असंतोष, हिंसा आणि विघटनाची कारणीभूत ठरू शकते.

प्रभावी धोरणे हे सामाजिक ताण कमी करण्यासाठीचे सुरक्षा-वाल्व (Safety Valve) म्हणून काम करू शकतात.

**४.आर्थिक वाढीची शाश्वतता:** अत्यंत असामानता आर्थिक वाढीवर नकारात्मक परिणाम करते. ती गरिबीच्या चक्राला चालना देते, मानवी भांडवलाचा विकास अवरोधित करते आणि अंतर्गत बाजारपेठेचा विस्तार मर्यादित ठेवते. समतोल वाढीसाठी समतोल सामाजिक धोरणे आवश्यक आहेत.

**५.सिद्धांत आणि व्यवहार यांच्या द्वंद्वाचे दर्शन:** हा अभ्यास सामाजिक विज्ञानातील सिद्धांत (जसे की, न्यायाचे सिद्धांत) कसे व्यवहारात (धोरण रूपात) उतरतात आणि व्यवहारातील अडचणी सिद्धांताची पुनर्मांडणी कशी करू शकतात, हे दाखवून देईल.

**संकल्पनात्मक चौकट आणि विश्लेषणात्मक चर्चा:**
भाग १:

**सामाजिक असामानतेचे सिद्धांत आणि भारतीय रूपरेषा:** सामाजिक असामानताही 'सामाजिक स्तरीकरण' (Social Stratification) या व्यापक प्रक्रियेचा एक भाग आहे. कार्ल मार्क्सच्या मते, हे स्तरीकरण उत्पादनाच्या साधनांवरील मालकीच्या आधारे होते, ज्यामुळे 'पूंजीपती' आणि 'सर्वहारा' अशा वर्गविभागणीला बळ मिळते. मॅक्स वेबरने यात तीन आयाम जोडले: वर्ग (आर्थिक स्थिती), स्थिती (सामाजिक प्रतिष्ठा) आणि पक्ष (राजकीय सत्ता). भारतात, जात ही 'स्थिती'चा एक अतिशय बलवान आणि कठोर प्रकार म्हणून काम करते, जी आर्थिक वर्गाच्या (Class) रेषा ओलांडून सामाजिक संधी नियंत्रित करते.

अमर्त्य सेन यांनी 'सक्षमता' (Capability) आणि 'कल्याण' (Well-being) या संकल्पनांवर भर देताना असामानतेचे मूल्यांकन केवळ उत्पन्नाच्या निकषाने न करता, व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्ये (जसे की, दीर्घ आयुष्य, शिक्षण, सन्मानपूर्ण जीवन) प्राप्त करण्याच्या क्षमतेनुसार करण्याचा पुरस्कार केला. भारतातील असामानता ही या सर्व सिद्धांतांची मिश्रित अभिव्यक्ती आहे. ती दृश्यमान आहे: **जातीय आधारावर**: दलित व आदिवासी समुदायांविरुद्धच्या ऐतिहासिक वर्चस्वाचे आणि हिंसेचे स्वरूप. **लैंगिक आधारावर**: कामाच्या वाटपात, शिक्षणात, आरोग्यात, संपत्तीच्या मालकीत आणि राजकीय प्रतिनिधित्वात सातत्याने दिसणारे अंतर. **प्रादेशिक आधारावर:** महाराष्ट्रातील मराठवाडा-खान्देश विरुद्ध पश्चिम महाराष्ट्र; देशातील पूर्व भारत विरुद्ध दक्षिण भारत अशी तफावत. **ग्रामीण-शहरी आधारावर:** मूलभूत सुविधा, रोजगाराचे प्रकार आणि जीवनमानातील फरक.

**भाग २:** असामानता-निर्मूलनाच्या शासकीय धोरणांचे प्रकार आणि सैद्धांतिक आधार

शासकीय धोरणे मुख्यतः दोन प्रकारची असतात:

१) पुनर्वितरणात्मक *(Redistributive):* ज्यातील संसाधने एका गटाकडून दुसऱ्या गटाकडे हस्तांतरित केली जातात.

२) विनियामक *(Regulatory):* जी काही वर्तणूक नियंत्रित करून समान संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

१. **आरक्षण (संविधानानुच्छेद १५ (४), १६ (४), ४६:** हे एक 'पुनर्वितरणात्मक न्याय' *(Distributive Justice)* आणि 'सकारात्मक कृती' *(Positive Discrimination/ Affirmative Action)* चे उदाहरण आहे. उद्दिष्ट केवळ आर्थिक पुनर्वितरण नसून, सामाजिक संस्थांमध्ये (शिक्षण, नोकरी, राजकारण) प्रतिनिधित्व वाढवून दीर्घकालीन सामाजिक सत्तेचे पुनर्वितरण करणे आहे. आरक्षणाने मध्यम वर्गीय दलित-आदिवासी- मागासवर्गीयामध्ये एक 'प्रथम पिढीचे' *(First Generation)* नेतृत्व निर्माण केले आहे, ज्यामुळे सामाजिक गतिशीलता *(Social Mobility)* वाढली आहे. मात्र, त्याच्या मर्यादा म्हणजे 'अतिक्रामकता' *(Elite Capture)* - म्हणजेच, त्याच गटातील सुस्थितीक लोकांना वारंवार फायदा; इतर मागास वर्गांशी तणाव; आणि आर्थिक निकषांची गरज याबद्दलची सतत चर्चा.

२. **गरीबी निर्मूलन व कल्याणकारी योजना:** ही धोरणे 'सामाजिक सुरक्षेचे जाळे' *(Social Safety Net)* तयार करण्यासाठी आहेत. ती 'न्यूनतम गरजा' *(Basic Needs Approach)* पुरविण्यावर आणि गरिबीच्या दुष्टचक्रातून *(Vicious Cycle of Poverty)* बाहेर काढण्यावर भर देतात. मनरेगा सारख्या योजनांनी ग्रामीण मजुरीचा दर वाढवण्यात आणि रोजगार हमी देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. तथापि, अंमलबजावणीतील गळती *(Leakages),* भ्रष्टाचार, वेळेवर वाटप न होणे, आणि केवळ रोजगार निर्माण करून विकासाची मूलभूत गरज भागत नाही, हे आव्हाने आहेत.

३. **सार्वजनिक सेवांचा पुरवठा (शिक्षण हक्क कायदा, आरोग्य धोरणे):** हे मानवी भांडवल *(Human Capital)* विकासाचा आधार आहे. अमर्त्य सेन यांच्या 'सक्षमता' संकल्पनेनुसार, शिक्षण आणि आरोग्य हे मूलभूत स्वातंत्र्ये आहेत, जी इतर सर्व संधी उपलब्ध करून देण्याची पायाभूत अट आहेत. शासकीय शाळा आणि आरोग्य केंद्रांचा दर्जा खालावल्यामुळे गरीबांना खासगी सेवांकडे वळावे लागते, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक बोजावर आणखी भार पडतो. हे स्वतःच एका प्रकारची असामानता निर्माण करते - सेवेची गुणवत्ता खरेदी करण्याची क्षमता.

४. **प्रगतिशील करव्यवस्था:** हे 'पुनर्वितरण' चे सर्वात थेट आर्थिक साधन आहे. तत्त्व असे की, ज्यांची कर भरण्याची क्षमता जास्त *(Higher Ability to Pay),* त्यांनी दरम्याने जास्त कर भरावा, आणि ते पैसे सामाजिक कल्याणासाठी वापरले जावेत. भारतातील करांचे अनुपात *(Tax-to-GDP Ratio)* आजही इतर विकसनशील देशांच्या तुलनेत कमी

आहे. थेट करांपेक्षा अप्रत्यक्ष करांवर अवलंबित्व जास्त आहे, ज्यामुळे गरीब आणि श्रीमंत दोघांना एकाच दराने कर भरावा लागतो, जे प्रगतिशीलतेच्या विरुद्ध आहे.

**भाग ३: धोरण अंमलबजावणी अंतर** *(PIG):* प्रमुख आव्हाने, सिद्धांत आणि व्यवहार यांच्यातील दरी मुख्यतः खालील घटकांमुळे निर्माण होते:

**१. राजकीय इच्छाशक्ती आणि धोरणाचे स्वरूप:** धोरणे अनेकदा निवडणूकीच्या वचनांप्रमाणे *(Populist Measures)* तात्पुरती स्वरूप धारण करतात, शाश्वत सुधारणांपेक्षा. शिवाय, सत्तेतील गटांचा हितसंबंध मोठ्या पुनर्वितरणास अडथळा आणू शकतो.

**२. प्रशासकीय कार्यक्षमता आणि भ्रष्टाचार:** धोरणांची अंमलबजावणी करणारी नोकरशाही, सामाजिक पूर्वाग्रह, लालफिती आणि अकार्यक्षमता हे अडथळे निर्माण करते.

**३. सामाजिक-सांस्कृतिक अडथळे:** धोरणे कागदोपत्री स्वीकारली जातात, पण सामाजिक पद्धती (जातीय विभागणी, लिंगभेद) त्यांच्या अंमलबजावणीवर नकारात्मक परिणाम करतात.

**४. माहिती आणि जागरूकतेचा अभाव:** धोरणांच्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काबद्दल माहिती नसल्यामुळे ते त्यांचा दावा करू शकत नाहीत. 'धोरणे' ही दूरच्या सरकारची गोष्ट राहते.

**५. एकत्रित धोरणे नसणे:** आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या एकमेकांशी निगडित समस्यांसाठीची धोरणे वेगवेगळ्या खात्यांतून चालतात, त्यामुळे समग्र परिणाम साध्य करता येत नाही.

**निष्कर्ष:** सामाजिक असामानताआणि शासकीय धोरण यांच्यातील संबंध हा एक सतत चाललेला, गतिमान संवाद आहे. हा संवाद केवळ धोरणांच्या निर्मितीपुरता मर्यादित नसून, त्यांच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर घडत असतो. भारताने आरक्षणापासून ते मोठ्या कल्याणकारी योजनांपर्यंत असामानतेच्या विविध आयामांवर हल्ला बोलणारी एक व्यापक धोरणात्मक रचना निर्माण केली आहे.

मात्र, वास्तविक परिवर्तनाची गती आणि खोली ही धोरणांच्या सिद्धांतापेक्षा त्यांच्या अंमलबजावणीच्या यंत्रणेवर अवलंबून आहे. 'धोरण अंमलबजावणी अंतर' हे सध्याचे सर्वात मोठे आव्हान आहे. हे अंतर भरून काढण्यासाठी, कागदोपत्री धोरणांपलीकडे जाऊन खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे:

**स्थानिककरण:** धोरणांची रचना आणि अंमलबजावणी स्थानिक आव्हाने, गरजा आणि संदर्भ लक्षात घेऊन व्हावी. पंचायती राज संस्थांना अधिक अधिकार आणि संसाधने दिली पाहिजेत.

**पारदर्शकता आणि जबाबदारी:** तंत्रज्ञानाचा वापर करून योजनांचे वाटप पादरर्शक करणे, गळती रोखणे आणि नागरिकांना गुन्हे नोंदविण्यासाठी सोपे मार्ग उपलब्ध करणे.

**सामाजिक ऑडिट आणि सहभाग:** लाभार्थ्यांना स्वतःच धोरणांच्या मूल्यांकनात सहभागी करून घेणे. हे केवळ भ्रष्टाचार कमी करत नाही तर त्यांच्या सक्षमीकरणाला *(Empowerment)* चालना देतो.

**सक्षमीकरणावरील भर:** केवळ देणग्या *(Doles)* देण्याऐवजी शिक्षण, आरोग्य, कौशल्य आणि संपत्तीच्या हक्कांद्वारे व्यक्ती आणि गट स्वावलंबी बनवणे.

**प्रगतिशील कर सुधारणा:** थेट करांचा आधार रुंदावणे, कर चुकवणे रोखणे आणि संपत्तीवरील कर यासारख्या पुनर्वितरणात्मक उपायांकडे गंभीरपणे विचार करणे.

अंतता: सामाजिक असामानतेविरुद्धचा लढा केवळ शासकीय धोरणांवर सोपवून चालणार नाही. तो एक सामूहिक सामाजिक बांधिलकीचा प्रश्न आहे. शासनाची भूमिका ही एक सुयोग्य निर्माता *(Facilitator)* आणि समानतेच्या संधी निर्माण करणारी *(Enabler)* असावी, पण बदलाची खरी ऊर्जा सामाजिक चळवळी, प्रबुद्ध नागरी समाज आणि प्रत्येक नागरिकाच्या न्यायाच्या अपेक्षेतून येते. धोरणे ही फक्त साधने आहेत; समता हे ध्येय त्यापेक्षा काहीसे मोठे आहे.

**संदर्भ:**


1) A.Kohli (Ed.), The Success of India's Democracy (pp. 193-225). Cambridge University Press.
2) Deshpande, S. (2011). The Grammar of Caste: Economic Discrimination in Contemporary India. Oxford University Press.
3) Dreze,J., & Sen, A. (2013). An Uncertain Glory: India and its Contradictions. Princeton University Press.
4) Government of India.(2006). Social, Economic and Educational Status of the Muslim Community of India: A Report (Sachar Committee Report). Cabinet Secretariat.
5) Government of India. (2014). Report of the Expert Group on the Determination of Poverty (Rangarajan Committee Report). Planning Commission.
6) Jenkins, R., & Manor, J. (2017). Politics and the Right to Work: India's National Rural Employment Guarantee Act. Oxford University Press.
7) Kohli, A. (2012). Poverty amid Plenty in the New India. Cambridge University Press.
8) Kumar, A., & Somanathan, R. (2018). Mapping Indian Districts across Census Years, 1971-2001. Economic and Political Weekly, 53(2), 59-69.
9) Mehta, P. B., & Roy, S. (2020). The Great Indian Inequality Debate. Seminar, 727.
10) Panagariya, A., & Mukim, M. (2014). A Comprehensive Analysis of Poverty in India. World Bank Policy Research Working Paper, (6714).
11) Sen, A. (1999). Development as Freedom. Oxford University Press.
12) Shah,G., Mander, H., Thorat, S., Deshpande, S., & Baviskar, A. (2006). Untouchability in Rural India. Sage Publications.
13) Weiner,M. (2001). The Struggle for Equality: Caste in Indian Politics.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# भारतामधील दिव्यांग महिलांवरील लिंग, जात आणि दिव्यांगत्वाचा आंतरविभागीय परिणाम: एक समाजशास्त्रीय विश्लेषण

**जयसिंग पी. सिंगल** समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**गोषवारा:** भारतीय समाजरचनेत लिंग, जात आणि दिव्यांगत्व या घटकांचा परस्परसंवाद दिव्यांग महिलांच्या जीवनावर बहुविध परिणाम घडवतो. दिव्यांग महिलांना केवळ शारीरिक किंवा मानसिक मर्यादांमुळे नव्हे, तर लिंगभेद, जातीय विषमता, आर्थिक दारिद्र्य आणि सामाजिक कलंक यांमुळे विविध स्तरांवर भेदभावाचा सामना करावा लागतो. या शोधनिबंधामध्ये आंतरविभागीयतेच्या संकल्पनेच्या आधारे भारतातील दिव्यांग महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक स्थितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. जे विविध स्तरावर दुर्लक्षित केल्याचे दिसून येते.

या अभ्यासासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून शासकीय अहवाल, कायदे, जनगणना, तसेच दिव्यांगत्व आणि स्त्रीवादी समाजशास्त्राशी संबंधित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. वर्णनात्मक आणि तुलनात्मक विश्लेषणाच्या साहाय्याने शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि सामाजिक सहभाग या क्षेत्रांतील असमानता अधोरेखित करण्यात आली आहे. अभ्यासातून असे दिसून येते की, दिव्यांग महिलांना दुहेरी नव्हे तर बहुविध वंचनेचा सामना करावा लागतो. विशेषतः निम्न समजल्या जाणाऱ्या जातीतल्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना मूलभूत सुविधांपर्यंत पोहोचण्यात अडथळे येतात. विद्यमान धोरणांमध्ये आंतरविभागीय दृष्टिकोनाचा अभाव असल्यामुळे त्यांच्या गरजा पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होत नाहीत. त्यामुळे लिंगसंवेदनशील, जातजाणीवपूर्वक आणि अधिकाराधारित धोरणांची आवश्यकता अधोरेखित होते. जे दिव्यांगत्व, लिंग आणि जात या आतंरविभागीयतेच्या चौकटीतील सामाजिक असमानता प्रस्तूत करून शासकीय धोरणातील हि दूर्लक्षितता किंवा वंचना अभ्यासकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करते.

**महत्वपूर्ण संज्ञा:** दिव्यांग महिला, आंतरविभागीयता *(Intersectionality),* लिंगभेद, जातीय विषमता, सामाजिक वंचना, दिव्यांगत्व अध्ययन, स्त्रीवादी समाजशास्त्र, सामाजिक असमानता इ.

**प्रस्तावना:** लिंग, जात आणि दिव्यांगत्व या घटकांचा संगम एक अत्यंत गुंतागुंतीची सामाजिक रचना निर्माण करतो, जी दिव्यांग महिलांच्या जीवनावर खोलवर परिणाम घडवते. आंतरराष्ट्रीय स्तरावर किंवा भारताच्या संदर्भात, दिव्यांग महिलांना अनेक स्तरांवरील भेदभावाचा सामना करावा लागतो. समाजातील कमी अपेक्षा, नकारात्मक दृष्टिकोन आणि विविध क्षेत्रांतील संधींची मर्यादा यांमुळे त्यांना संयुक्त व बहुअंगी वंचनेचा अनुभव येतो. परिणामी, पुरुषांच्या तुलनेतच नव्हे तर अपंगत्व नसलेल्या महिलांच्या तुलनेतही त्यांची जीवनमानाची गुणवत्ता अधिक कमी आणि प्रतिकूल स्वरूपाची आढळते. त्यांच्या जीवनअनुभवातून संधी, संसाधने आणि जीवन परिणाम यांतील तीव्र विषमता स्पष्टपणे दिसून येते. थोडक्यात, समाजरचनेत त्यांना न्याय्य व समान वागणूक मिळत नाही *(Ghosh, 2016; Pimo, 2017).*

आंतरविभागीयता *(Intersectionality)* ही संकल्पना आणि विश्लेषणात्मक चौकट कृष्णवर्णीय स्त्रीवादी विचारसरणीतून उदयास आली असून, तिची मुळे *किम्बर्ले क्रेन्शॉ* यांसारख्या विद्वानांच्या कार्यात आढळतात. ही संकल्पना विविध सामाजिक स्थितीच्या परस्परसंवादातून निर्माण होणाऱ्या सत्तासंबंध आणि दडपशाहीच्या विविध स्वरूपांचे स्पष्टीकरण करते. आंतरविभागीयता ही व्यक्तीच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या अनेक वंचनांच्या आधारांचा एकत्रित अभ्यास करण्यासाठी उपयुक्त चौकट आहे. ती दोन किंवा अधिक वंचित घटकांच्या एकसंघ असलेल्या व्यक्तींच्या अनुभवांचे वर्णन करते आणि अशा संयुक्त ओळखीमुळे निर्माण होणारा भेदभाव हा एका स्वतंत्र ओळखीच्या तुलनेत अधिक तीव्र आणि गुंतागुंतीचा असतो, हे स्पष्ट करते.

**संशोधन उद्दिष्ट्ये:** लिंग, जात आणि दिव्यांगत्व यांच्या आंतरसंबंधांचे विश्लेषण करून त्यांचा दिव्यांग महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक आणि जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे. भारतातील दिव्यांग महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि सामाजिक सहभाग या क्षेत्रांत भेडसावणाऱ्या भेदभाव व वंचनेच्या विविध स्वरूपांचा अभ्यास करणे. हे दोन प्रमुख उद्देश शोधनिबंधाचे आहे.

**संशोधन कार्यवाही:** या अभ्यासात दिव्यांग महिलांच्या लिंग व जातीच्या आधारे होणारा भेदभावाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आकलन करण्यासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. या संशोधनासाठी शासकीय अहवाल, धोरणे आणि कायदे (उदा. दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम *– RPWD Act, CEDAW* अहवाल), दिव्यांगत्व अध्ययन, आंतर-विभागीयता आणि स्त्रीवादी समाजशास्त्र यांवरील संशोधन साहित्य, जनगणना व राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण *(NSSO)* अहवाल इ. दुय्यम स्रोतांचा अभ्यास करण्यात आला आहे. भेदभाव, सक्षमीकरण आणि धोरणात्मक उणिवांचे

अभ्यास वर्णनात्मक स्वरुपात करण्यात आला आहे. जात, आर्थिक स्तर आणि भौगोलिक प्रदेश यांच्या आधारे आढळणाऱ्या विषमतेचे परीक्षण करण्यासाठी तुलनात्मक विश्लेषण केले आहे.

**अभ्यासाचा व्याप्ती:** हा अभ्यास भारतातील दिव्यांग महिलांवर केंद्रित असून, विशेषतः ग्रामीण आणि शहरी वंचित समुदायांतील महिलांच्या परिस्थितीवर लक्ष केंद्रित करतो.

**मर्यादा:** उपलब्धतेच्या अडचणींमुळे संशोधन प्रामुख्याने दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. अधिकृत आकडेवारी, दिव्यांगत्वाचे अपूर्ण नोंदणी असल्यामुळे अचूक माहिती मिळविण्यात अडचणी येऊ शकते.

**दिव्यांग महिला: जागतिक व भारतीय संदर्भ:**

*(Women with Disabilities: Global and Indian Context)*

दिव्यांग महिला या जगभरातील, तसेच भारतातील लोकसंख्येतील एक महत्त्वपूर्ण पण बहुधा दुर्लक्षित घटक आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या *(WHO)* अंदाजानुसार, जगातील सुमारे १५ टक्के लोकसंख्या काही ना काही प्रकारच्या दिव्यांगत्वासह जीवन जगत आहे आणि या गटात महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. दिव्यांगत्व सर्व समाजांमध्ये आढळते; मात्र विशेषतः कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये दिव्यांग महिलांची स्थिती अधिक प्रतिकूल असते.

भारताच्या २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील सुमारे २.६८ टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे आणि त्यापैकी सुमारे ५६ टक्के महिला आहेत. *(Surjan & Gautam, n.d.)* दिव्यांगत्वा संबंधित ही आकडेवारी समाजातील मोठ्या घटकाचे वास्तव दर्शवते, जो विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जात आहे. दिव्यांग व्यक्तींमध्ये महिलांची स्थिती अधिकच वंचित स्वरूपाची आढळते. महिला आधीच समाजातील उपेक्षित गटांपैकी एक मानल्या जातात; त्यात दिव्यांगत्वाची भर पडल्यास त्यांची परिस्थिती अधिक गंभीर बनते.

दिव्यांग महिलांना दिव्यांग पुरुषांच्या तुलनेत अधिक दारिद्र्य, बेरोजगारी आणि सामाजिक एकाकीपणाचा सामना करावा लागतो. त्यांचे सामाजिक वास्तव पुरुषांपेक्षा अधिक कठीण आणि प्रतिकूल असते. जागतिक स्तरावर दिव्यांग महिलांना इतर महिलांच्या तुलनेत हिंसाचाराच्या परिस्थितीत राहण्याची किंवा हिंसाचाराचा बळी ठरण्याची शक्यता अधिक असते. वाढता भेदभाव आणि हिंसाचाराचे वातावरण हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचे सामान्य वास्तव बनत चालले आहे. *(Meekosha et al., 2020)* ही परिस्थिती अधिक गंभीर होते, जेव्हा एखादी महिला दिव्यांग असण्यासोबतच अल्पसंख्याक किंवा वंचित सामाजिक गटातील सदस्य असते. भारतात दिव्यांगत्वाशी संबंधित सामाजिक कलंक आणि पारंपरिक लिंगभूमिकांचे निर्वाहण यांचा एकत्रित परिणाम दिव्यांग महिलांवर होतो. सामाजिक कलंक आणि पुरुषकेंद्री मूल्यव्यवस्था यांमुळे दिव्यांग महिलांना शिक्षण आणि आरोग्यसेवा यांसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागते *(Ghai, 2015).*

भारतीय समाजातील जातीव्यवस्थेची भूमिका लक्षात घेतल्यास, दिव्यांग व्यक्ती आणि निम्न जातीतील सदस्य यांना दुहेरी किंवा तिहेरी वंचनेचा सामना करावा लागतो, हे स्पष्ट होते. दारिद्र्याचाही या परिस्थितीवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. दिव्यांग व्यक्तींचे दारिद्र्याशी घनिष्ठ नाते असल्याचे दिसून येते. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, जगातील सर्वात गरीब लोकांपैकी प्रत्येक पाचपैकी एक व्यक्ती दिव्यांग आहे *(Acharya et al., n.d.).* भारतामध्ये दिव्यांग महिलांचे सामाजिक स्थान अत्यंत खालच्या स्तरावर आढळते. याचे कारण केवळ त्यांचे दिव्यांगत्व नसून, त्यांचे महिला असणेही आहे. पुरुषप्रधान समाजरचनेत महिलांना कमी महत्त्व दिले जाते आणि त्यात दिव्यांगत्वाची भर पडल्यास त्यांची वंचना अधिक तीव्र होते. भारतात दिव्यांगत्व असलेल्या महिलांची वाढती संख्या लक्षात घेण्यासारखी असून, त्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता अधोरेखित होते.

**लिंग आणि दिव्यांगत्वाची आंतरविभागीयता**

*(Intersectionality of Gender and Disability)*

लिंग आणि दिव्यांगत्व यांचा परस्परसंवाद सामाजिक वंचनेचे एक गुंतागुंतीचे जाळे निर्माण करतो, ज्याचा सर्वाधिक प्रतिकूल परिणाम दिव्यांग महिलांवर होतो. या दोन घटकांच्या संगमामुळे लिंग आणि दिव्यांगत्व या स्वतंत्र सामाजिक श्रेणी म्हणून पाहण्याची पारंपरिक समज अपुरी ठरते. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात लिंग आणि दिव्यांगत्व एकत्र आल्यास त्यांचा परिणाम केवळ जोडून होत नाही, तर तो अनेक पटींनी वाढतो. ही बहुगुणित वंचना समाजातील सत्ताकेंद्रित संरचनांच्या जाळ्यात घडते, ज्याला "वर्चस्वाची संरचना" *(matrix of domination)* असे संबोधले जाते *(Surjan & Gautam, n.d.).* उदा. दिव्यांग महिलांचे रोजगारातील प्रमाण त्यांच्या अपंगत्व नसलेल्या समवयस्क महिलांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आढळते. अमेरिकेतील २००२ मधील एका अभ्यासानुसार, अपंगत्व नसलेल्या महिलांचा रोजगार दर सुमारे ६० टक्के होता, तर दिव्यांग महिलांचा रोजगार दर केवळ २० टक्के इतका आढळला. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, श्रवण दोषासारख्या दिव्यांगत्वामुळे रोजगाराच्या संधींमध्ये मोठे अडथळे निर्माण होतात. *(Marshall, n.d.).*

जागतिक दक्षिणेकडील नवस्वतंत्र राष्ट्रांमध्ये पुरुषसत्ताक विचारसरणी आणि वसाहतवादी वारसा यांचा संगम अनेक सामाजिक समस्यांना अधिक गुंतागुंतीचा बनवतो. १९५० च्या दशकातच दिव्यांग महिलांनी वैयक्तिक आणि सामूहिक प्रतिकाराची काही क्षेत्रे निर्माण केली होती. *(Parekh)* तथापि, या प्रतिकाराच्या प्रक्रियेला बळ देण्याऐवजी अनेक राष्ट्रांनी विकासकेंद्री धोरणांचा अवलंब केला. आधुनिकतेच्या नावाखाली त्यांनी नागरिकांना सुधारण्याची गरज असलेला घटक म्हणून पाहिले. परिणामी, 'सक्षम' आणि 'अक्षम' तसेच 'पुरुषत्व आणि 'स्त्रीत्व' यांविषयी एकसाची कल्पना समाजात प्रस्थापित करण्यात आली. जणू काही 'सक्षम' असण्याचा एकच मार्ग आहे आणि तो सत्ताधारी वर्गाने निश्चित केलेला आहे; तसेच 'स्त्रीत्व'ही एका ठरावीक चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला गेला.

या आंतरविभागीय वास्तवात दिव्यांग महिलांची स्थिती अनेकदा अदृश्य राहते. काही महिला रोजगार क्षेत्रात प्रवेश करत असल्या तरी नेतृत्वाच्या स्तरावर किंवा निर्णयप्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. त्यांच्या जीवनावर परिणाम करणारी धोरणे बहुधा अशा व्यक्तींनी तयार केलेली असतात, ज्यांना त्यांच्या वास्तव जीवनानुभवांची पुरेशी जाणीव नसते. त्यामुळे दिव्यांग महिलांच्या आंतरविभागीय समस्यांचे प्रतिबिंब धोरण-निर्मितीत प्रभावीपणे दिसून येत नाही.

**जातीय भेदभाव आणि संसाधन प्राप्ती:**

*(Caste Discrimination and Access to Resources)*

जातीय भेदभावामुळे दिव्यांग महिलांच्या संसाधनांपर्यंत पोहोचण्याच्या क्षमतेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो, विशेषतः अशा समाजव्यवस्थांमध्ये जिथे जातीप्रथा केवळ सामाजिक संबंधच ठरवत नाही, तर संधींची श्रेणीदेखील निश्चित करते. जेव्हा एखाद्या कुटुंबाची सामाजिक-आर्थिक स्थिती त्याच्या जातीय स्थानावर अवलंबून असते, तेव्हा त्याचे गंभीर परिणाम दिव्यांग महिलांवर होतात. बहुसंख्य दिव्यांग महिला आधीच संसाधनांपासून वंचित कुटुंबांत जन्म घेतात आणि त्यांना सामाजिक प्रगतीच्या संधी अत्यंत मर्यादित प्रमाणात उपलब्ध होतात. उदा. एखादी दलित दिव्यांग महिला मातृत्वाशी संबंधित आरोग्यसेवा घेताना केवळ तिच्या दिव्यांगत्वामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांनाच सामोरी जात नाही, तर अजूनही अस्पृश्यतेच्या विचारसरणीने प्रभावित असलेल्या समाजाने उभ्या केलेल्या अडथळ्यांनाही तोंड द्यावे लागते. *(Meekosha & Soldatic, 2020)*

दिव्यांग व्यक्तींना सहाय्य करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अनेक धोरणांमध्ये त्यांच्या जीवनावर जातीय घटकांचा होणारा विशिष्ट परिणाम पुरेशा प्रमाणात लक्षात घेतला जात नाही. अनेक अभ्यासकांनी नमूद केल्याप्रमाणे, विद्यमान सैद्धांतिक आणि धोरणात्मक चौकटी वंचित जातींतील दिव्यांग व्यक्तींच्या अनुभवांचे सम्यक आकलन करण्यास अपुऱ्या पडतात. *(Acharya, 2021)* परिणामी, या महिलांना अशा अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते, जे त्यांना सामान्य व्यक्तींना उपलब्ध असलेल्या जीवनसंधींपासून दूर ठेवतात. वंचित जातींतील दिव्यांग महिलांच्या विशिष्ट गरजांविषयी सेवा पुरवठादारांमध्ये असलेले अज्ञान परिस्थिती अधिक गंभीर बनवते. अनेकदा आरोग्यसेवा क्षेत्रातील अग्रपंक्तीतील कर्मचारी स्वतःच्या सामाजिक पूर्वग्रहांमुळे किंवा संवेदनशीलता प्रशिक्षणाच्या अभावामुळे या महिलांशी इतर रुग्णांप्रमाणे सन्मानाने वागण्यास तयार नसतात. *(Groce et al., 2019)* या व्यवस्थात्मक त्रुटींमुळे अनेक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतात. त्यातील सर्वात गंभीर परिणाम म्हणजे या महिलांनी आरोग्यसेवा घेण्यासाठी पुढाकारच न घेणे.

या पार्श्वभूमीवर, लिंग, दिव्यांगत्व आणि जात यांच्या संगमावर असलेल्या महिलांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आंतरविभागीय दृष्टिकोनाचा अवलंब करणे आवश्यक आहे. हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, कारण तो या महिलांच्या जीवनाला आकार देणाऱ्या विविध घटकांचे सखोल आणि सर्वंकष आकलन करण्यास मदत करतो. लिंग, दिव्यांगत्व आणि जात या तिन्ही वंचनेच्या अक्षांमध्ये स्वतंत्र आणि प्रभावी सामाजिक गतिशीलता आढळते. या प्रत्येक घटकात भेदभाव आणि बहिष्काराची शक्यता दडलेली आहे आणि त्यासाठी स्वतंत्र तसेच समन्वित उपाययोजनांची आवश्यकता आहे.

**दिव्यांग महिलांविषयी सामाजिक दृष्टिकोन**

*(Societal Perceptions of Disabled Women)*

समाजात दिव्यांग महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा परस्पर गुंतलेल्या पूर्वग्रहांवर आणि सांस्कृतिक कथनांवर आधारित असतो, ज्यामुळे त्या समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात. लिंग आणि दिव्यांगत्व या दोन्ही कारणांमुळे त्यांना दुहेरी भेदभावाचा सामना करावा लागतो. या दुहेरी वंचनेमुळे समाजात त्यांच्या विरोधात द्विस्तरीय पूर्वग्रह निर्माण होतात. दिव्यांग महिलांकडे अनेकदा त्यांच्या लिंगामुळे आणि दिव्यांगत्वामुळे कमी लेखून पाहिले जाते. परिणामी, समाज त्यांच्याकडे स्वतंत्र व्यक्ती म्हणून न पाहता, केवळ आपल्या मूल्यव्यवस्थेच्या चौकटीत बसवण्याच्या दृष्टिकोनातून पाहतो. दिव्यांग महिलांना समकक्ष व्यक्ती म्हणून न पाहता समस्या किंवा ओझे म्हणून पाहण्याची प्रवृत्ती त्यांना तथाकथित प्रगत आणि समावेशक समाजातही अदृश्य बनवते. त्यामुळे अनेक दिव्यांग महिलांमध्ये आत्मसन्मान आणि

आत्मविश्वासाची कमतरता आढळते. हा सामाजिक दृष्टिकोन विविध क्षेत्रांत प्रकर्षाने दिसून येतो, विशेषतः रोजगार, आरोग्यसेवा आणि शिक्षण क्षेत्रांत. रोजगाराच्या संदर्भात, अनेक नियोक्त्यांकडे अजूनही व्यक्तींच्या क्षमतांविषयी कालबाह्य आणि रूढीवादी कल्पना आढळतात. विशेषतः दिव्यांग महिलांविषयी अशा कल्पना अधिक तीव्र असतात. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी मिळवणेच कठीण ठरते, तर निर्णय-प्रक्रियेतील स्थान मिळवणे तर अधिकच अवघड ठरते.

आरोग्यसेवेच्या क्षेत्रातही दिव्यांग महिलांविषयी नकारात्मक पूर्वग्रह आढळतात. विशेषतः गर्भधारणेच्या काळात, आरोग्यसेवा पुरवठादारांना दिव्यांग महिलांना मातृत्वाची इच्छा असू शकते किंवा त्या मुलांची योग्य काळजी घेऊ शकतात, यावर विश्वास ठेवणे कठीण जाते. या पूर्वग्रहांमुळे त्यांना मिळणाऱ्या आरोग्यसेवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो, अशा परिस्थितीत अनेकदा एकाकीपणाचे आणि सामाजिक अलिप्ततेचे ठरतात.

**लिंगभूमिकांचा दिव्यांगत्वावर होणारा परिणाम**

*(Impact of Gender Roles on Disability)*

दिव्यांगत्वाचा लिंगभूमिकांवर सखोल परिणाम होत असून, त्यामुळे त्या अधिक गुंतागुंतीच्या बनतात. दिव्यांगत्वामुळे समाजातील पुरुष आणि महिलां-विषयीच्या पारंपरिक अपेक्षा अधिक दृढ होतात, तसेच काही वेळा त्या अपेक्षांमध्ये गोंधळही निर्माण होतो. उदाहरणार्थ, दिव्यांग महिलांकडे त्यांच्या अपंगत्व नसलेल्या समवयस्क महिलांच्या तुलनेत कमी सक्षम किंवा अधिक अवलंबून असलेल्या व्यक्ती म्हणून पाहिले जाते. या दृष्टिकोनामुळे त्यांना लिंग आणि दिव्यांगत्व या दोन्ही संदर्भात दुहेरी वंचनेचा सामना करावा लागतो. जेव्हा अशा महिला परंपरेने संगोपन किंवा काळजीवाहू भूमिका पार पाडणाऱ्या सामाजिक गटांतील असतात, तेव्हा त्यांच्या संदर्भातील सामाजिक अपेक्षा अधिक तीव्र होतात. समाज त्यांना स्वतःच अधिक काळजीची गरज असलेल्या व्यक्ती म्हणून पाहतो आणि त्याच वेळी त्या समाजाला काहीही योगदान देऊ शकत नाहीत, अशी चुकीची धारणा निर्माण होते.

दिव्यांगत्व जेव्हा जात, वर्ग किंवा वंश यांसारख्या इतर सामाजिक ओळखींसोबत एकत्र येते, तेव्हा वंचनेची तीव्रता अधिक वाढते. हे विशेषतः महिलांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून येते, कारण दिव्यांगत्वाचे प्रतिनिधित्व अनेकदा लिंग, जात आणि वर्ग या चौकटींमध्येच केले जाते. 'दलित' हा शब्द पूर्वी 'अस्पृश्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांनी स्वतःसाठी स्वीकारलेला ओळखपर शब्द आहे, असे मीकूशा नमूद करतात. आपल्या अभ्यासात त्या दलित दिव्यांग महिलांना भेडसावणाऱ्या बहुपेडी भेदभावाकडे आणि त्यांच्या कठीण जीवनस्थितीकडे लक्ष वेधतात. भारतात १९९६ साली दिव्यांग व्यक्ती अधिनियम लागू झाल्यानंतरही दलित दिव्यांग महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधींमध्ये प्रभावी प्रवेश मिळालेला दिसत नाही. तसेच दिव्यांग हक्क चळवळीतही त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे *(Meekosha, 2011).* माध्यमे आणि लोकप्रिय संस्कृतीत दिव्यांग महिलांचे चित्रण अनेकदा हानिकारक रूढी आणि पूर्वग्रहांना बळकटी देणारे असते, ज्यामुळे त्यांच्या स्वायत्ततेला बाधा येते. अशा कथनांमुळे दिव्यांग महिलांना समाजात दुय्यम स्थानावर ठेवण्याची प्रवृत्ती दृढ होते. माध्यमांमध्ये स्त्रीत्व आणि दिव्यांगत्व यांची सांगड घातली जाते तेव्हा त्यातून बहुधा नकारात्मक प्रतिमा निर्माण होते. त्यामुळे दिव्यांग महिलांना दुर्बल, अवलंबून, अलैंगिक आणि अकार्यक्षम अशा स्वरूपात दाखवले जाते, ज्यामुळे त्यांच्या वास्तविक क्षमता आणि योगदानाकडे समाजाचे लक्ष वेधले जात नाही.

**समावेशकतेसाठी धोरणात्मक चौकट**

*(Policy Frameworks for Inclusion)*

दिव्यांग महिलांना भेडसावणाऱ्या बहुआयामी समस्यांवर उपाय शोधण्यासाठी, विशेषतः ज्या ठिकाणी लिंग आणि जात यांचा एकत्रित येतात, तेव्हा समावेशक धोरणात्मक चौकट अत्यावश्यक ठरते. धोरणात्मक उपाययोजना या महिलांच्या दिव्यांगत्वाशी संबंधित विशिष्ट जीवनानुभवांचे सखोल आकलन आणि सामाजिक विविधतेची व्यापक जाणीव यांवर आधारित असणे आवश्यक आहे. अन्यथा, दिव्यांग महिलांना पुन्हा एकदा वंचित करण्याचा धोका निर्माण होतो, यावेळी दिव्यांगत्वाच्या धोरणात्मक चौकटीतच त्यांचे उपेक्षण होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर अपंग व्यक्तींच्या हक्कांविषयीचे करार *(CRPD)* यांसारख्या संरचनांनी मार्गदर्शन केले आहे. या चौकटींनी लिंगसंवेदनशील धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि दिव्यांगत्वाशी संबंधित धोरणांच्या केंद्रस्थानी लिंगसमतेचा विचार ठेवण्यासाठी व्यापक साधने उपलब्ध करून दिली आहेत. तथापि, आंतरराष्ट्रीय करारांची खरी कसोटी त्यांच्या राष्ट्रीय स्तरावरील अंमलबजावणीतच दिसून येते. दुर्दैवाने, अनेक देशांमध्ये, तसेच भारतातही, दिव्यांग व्यक्ती अजूनही धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीची प्रतीक्षा करत आहेत *(Williams, 2013).*

भारताच्या संदर्भात पाहता, दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम २०१६ *(RPWD Act)* आणि त्याआधीचा १९९५ चा अधिनियम अस्तित्वात असले तरी ते पूर्णपणे अधिकाराधारित दृष्टिकोनावर आधारित असल्याचे दिसून येत नाही. या कायद्यांमध्ये जातीय घटकांचा उल्लेख नसल्यामुळे दलित दिव्यांग महिलांना भेडसावणाऱ्या

बहुअंगी अडथळ्यांचे वास्तव पूर्णपणे प्रतिबिंबित होत नाही. धोरणनिर्मितीत आंतरविभागीय विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित केले गेले असले तरी प्रत्यक्षात त्याचा अभाव दिसून येतो. *(Acharya, 2020)* सार्वजनिक सेवा पुरवठा-दारांच्या प्रशिक्षणामध्ये आंतरविभागीय संवेदनशीलतेचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण लिंग, जात आणि दिव्यांगत्व यांच्या संगमावर असलेल्या महिलांना एकाच वेळी अनेक प्रकारच्या वंचनांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत सार्वजनिक सेवा व्यवस्था ही त्यांच्यासाठी आधारव्यवस्था ठरू शकते. परंतु, सेवा पुरवठादारांना त्यांच्या बहुपेडी समस्यांची जाणीव नसेल, तर त्या सेवांचा अपेक्षित लाभ मिळणे कठीण ठरते. त्यामुळे सार्वजनिक सेवा कर्मचाऱ्यांसाठी आंतरविभागीय दृष्टिकोनावर आधारित संवेदनशीलता प्रशिक्षण कार्यक्रम आवश्यक ठरतात.

दिव्यांग महिलांना केवळ संसाधनांपर्यंत प्रवेशच नव्हे, तर सन्मान आणि स्वायत्तता मिळवून देण्यासाठी व्यापक आणि सर्वसमावेशक धोरणात्मक चौकट आवश्यक आहे. विविध सामाजिक - सांस्कृतिक पार्श्वभूमीतील दिव्यांग महिलांना समान संधी देण्यासाठी अशा धोरणांची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक जीवनात त्यांच्या सक्रिय आणि सशक्त उपस्थितीशिवाय खरी समता साध्य होऊ शकत नाही.

**निष्कर्ष** *(Conclusion):* दिव्यांगत्व आणि लिंग यांच्या परस्परसंवादामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे पारंपरिक लिंग संकल्पनांचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. समाजात पुरुष आणि महिलांकडून अपेक्षित असलेल्या भूमिकांचे पुनर्मूल्यांकन करणे ही समावेशक समाजनिर्मितीची महत्त्वाची अट आहे. दिव्यांग व्यक्तींना समाजात समाविष्ट करायचे असेल, तर त्यांच्याकडे केवळ रूढ प्रतिमांमधील व्यक्ती म्हणून पाहण्याची वृत्ती बदलणे आवश्यक आहे. या बदलासाठी कायदे, धोरणे आणि नागरी हक्क, महिला हक्क तसेच दिव्यांग हक्क चळवळीतील सहकाऱ्यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतात. तथापि, बहुतेक समाज अजूनही दिव्यांग महिलांना समान भागीदार म्हणून समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेत मागे आहेत.

त्याचवेळी, अवलंबित्व आणि गरज यांच्या साध्या सोप्या कथनांपलीकडे जाणाऱ्या पर्यायी आधारव्यवस्था अद्याप मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. समाजात प्रचलित असलेल्या रूढ कथनांमुळे दिव्यांग महिलांच्या सामर्थ्य, कौशल्य आणि जिद्दीच्या असंख्य कथा सार्वजनिक पातळीवर येऊ शकत नाहीत. या पर्यायी सकारात्मक कथनांना समाजात स्थान मिळाल्यास दिव्यांग महिलांच्या सक्षमीकरणाचा मार्ग अधिक सुकर होईल.

समाजातील समतेची खरी पायाभरणी दिव्यांग महिलांच्या सन्मान, स्वायत्तता आणि सार्वजनिक जीवनातील सक्रिय सहभागावर अवलंबून आहे. त्यामुळे आंतरविभागीय दृष्टिकोनावर आधारित धोरणात्मक सुधारणा, सामाजिक संवेदनशीलता आणि प्रभावी अंमलबजावणी यांद्वारे दिव्यांग महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ:**


Surjan, P. K., & Gautam, A. K. (2023). Gender and Disability: A Study with Special Reference to Women. ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts, 4(2), 1662–1667.

Parekh, P. N. (2007). Gender, Disability and the Postcolonial Nexus. In Intersecting Gender and Disability Perspectives in Rethinking Postcolonial Identities (Wagadu, Vol. 4, pp. 143–149).

Devkota, H. R., Clarke, A., Murray, E., Kett, M., & Groce, N. (2021). Disability, Caste, and Intersectionality: Does Co-existence of Disability and Caste Compound Marginalization for Women Seeking Maternal Healthcare in Southern Nepal? Disabilities, 1(3), 218–232

Meekosha, H. (2006). What the hell are you? An Intercategorical Analysis of Race, Ethnicity, Gender and Disability in the Australian Body Politic. Scandinavian Journal of Disability Research, 8(2–3), 161–176.

Wolbring, G., & Nasir, L. (2024). Intersectionality of Disabled People through a Disability Studies, Ability-based Studies, and Intersectional Pedagogy Lens: A Survey and a Scoping Review. Societies, 14 (9), 176.

Bailey, M., & Mobley, I. A. (2019). Work in the Intersections: A Black Feminist Disability Framework. Gender & Society, 33 (01), 19-40.

Rathi, B. M. (2021, March 13). Philosophical Reflections on Rendering of Disability and Gender in the COVID-19 era. Economic and Political Weekly (Engage).

Devkota, H. R., Murray, E., Kett, M., & Groce, N. (2017). Healthcare Provider's Attitude towards Disability and Experience of Women with Disabilities in the Use of Maternal Healthcare Service in Rural Nepal. Reproductive Health, 14, Article 79.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# सामाजिक असमानता आणि आदिवासी संदर्भातील शासकीय धोरणे: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. उमेश बाळासाहेब शिंदे** सहाय्यक प्राध्यापक, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

**गोषवारा:** आदिवासी समाज हा भारतातील एक महत्त्वपूर्ण समाज मानला जातो त्याची आपली एक बोलीभाषा संस्कृती आणि ओळख आहे. हा समाज पूर्वीपासूनच डोंगरी भागात वास्तव्य करीत असल्याने या समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास पुरेसा झालेला दिसून येत नाही. तसेच या समाजासाठी शासनस्तरा वरून अनेक सुविधा किंवा योजना देण्यात येत असल्या तरी बोलीभाषा आत्मविश्वास, उदासिनता भौतिक सुविधाच्या अभावामूळे यांच्यापर्यंत सहज शिक्षण पोहचत नाही. आदिवासी समाजातील मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण हे जास्त असल्याचे दिसून येते. कारण आईवडिलांचा अशिक्षितपणा व शिक्षणाचे महत्व नसते. घरातील कर्त्यांना रोजदारीच्या निमित्ताने बाहेर पडावे लागते. अशा परिस्थिती घरातील लहान भावंडाची जबाबदारी त्यांच्यावर येते. ते शिक्षणापासून वंचित राहतात. आदिवासी समाजातील सामाजिक असमानता ही ऐतिहासिक, संरचनात्मक व बहुआयामी स्वरूपाची आहे. शासकीय धोरणांनी काही प्रमाणात शिक्षण, आरोग्य व राजकीय प्रतिनिधित्वात सुधारणा घडवून आणली असली तरी जमीन, रोजगार व सांस्कृतिक स्वायत्ततेच्या बाबतीत असमानता अद्याप कायम आहे.

धोरणांची अपुरी अंमलबजावणी, प्रशासकीय उदासीनता, स्थानिक सहभागाचा अभाव व विकासाचे वरून लादलेले मॉडेल ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे आदिवासी विकासासाठी केवळ कल्याणकारी नव्हे तर अधिकाराधिष्ठित व सहभागी विकास दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक न्याय, समता, सांस्कृतिक आदर व स्वायत्तता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे. अशा दृष्टिकोनातून राबविलेली धोरणेच सामाजिक असमानता कमी करण्यास उपयुक्त ठरू शकतील.

**परवलीचे शब्द:** सामाजिक असमानता, आदिवासी समुदाय, शासकीय धोरणे

**प्रस्तावना:** भारतीय समाज हा ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. या समाजरचनेत सामाजिक असमानता ही एक मूलभूत व दीर्घकालीन समस्या म्हणून दिसून येते. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश व वंश या घटकांच्या आधारे समाजातील विविध गटांमध्ये संसाधने, सत्ता, प्रतिष्ठा व संधी यांचे असमान वितरण झाले आहे. या असमान सामाजिक संरचनेत आदिवासी समाज (अनुसूचित जमाती) हा सर्वाधिक वंचित घटक मानला जातो.

आदिवासी समाज हा अशाच वंचित घटकांपैकी एक असून त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय उपेक्षेला सामोरे जावे लागले आहे. आदिवासी समाजाचा इतिहास हा प्रामुख्याने जंगल, जमीन व नैसर्गिक संसाधनांशी निगडित आहे. पारंपरिक स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था, सामुदायिक मालकी, निसर्गाशी सुसंवाद आणि वेगळी सामाजिक-सांस्कृतिक ओळख ही आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये राहिली आहेत. तथापि, वसाहतवादी काळात लागू झालेल्या जंगल कायदे, महसूल धोरणे आणि नंतरच्या औद्योगिक व भांडवलशाही विकास प्रक्रियेमुळे आदिवासी समाज त्यांच्या पारंपरिक संसाधनांपासून दूर लोटला गेला. यामुळे दारिद्र्य, विस्थापन, बेरोजगारी व सामाजिक बहिष्करण यासारख्या समस्या अधिक तीव्र झाल्या. वसाहतवादी काळात लागू करण्यात आलेल्या जंगल, कायदे, महसूल व्यवस्था व प्रशासकीय धोरणांमुळे आदिवासी समाज त्यांच्या पारंपरिक हक्कांपासुन व संसाधनांपासून वंचित झाला. जंगलांचे राष्ट्रीयीकरण, खाजगी मालकीत्व आणि बाजारव्यवस्थेचा प्रसार यामुळे आदिवासीच्या उपजीविकेच्या पारंपरिक साधनांवर गदा आली. परिणामी मोठ्या प्रमाणावर दारिद्य, विस्थापन, बेरोजगारी व सामाजिक बहिष्करणाची प्रकिया सुरू झाली.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने आदिवासी समाजासाठी विशेष संरक्षणात्मक व कल्याणकारी तरतुदी केल्या. पाचवी व सहावी अनुसूची, शिक्षण व नोकरीतील आरक्षण, आदिवासी उपयोजना (TSP), तसेच वनहक्क कायदा (२००६) यांसारखी धोरणे राबविण्यात आली. तरीही प्रत्यक्षात आदिवासी समाजातील सामाजिक व आर्थिक असमानता पूर्णतः दूर झालेली नाही. त्यामुळे सामाजिक असमानता आणि शासकीय धोरणे यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते. आदिवासीचा प्रश्न हा केवळ कल्याणकारी योजनाचा विषय नसून तो सामाजिक न्याय, अधिकार, सत्ता-संबंध व विकासाच्या स्वरूपाशी संबंधित आहे. भांडवलशाही विकास मॉडेल, ओद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या प्रकियेत आदिवासी समाजाचे स्थान दुय्यम राहिले आहे. त्यामुळे सामाजिक असमानता केवळ आर्थिक नसून ती सांस्कृतिक, शेक्षणिक, आरोग्यविषयक

व राजकीय स्वरूपाची बनली आहे. या पाश्र्वभुमीवर सामाजिक असमानता आणि आदिवासी संदर्भातील शासकीय धोरणाचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) सामाजिक असमानतेची संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्ट करणे. २) भारतातील आदिवासी समाजाची सामाजिक-आर्थिक स्थिती समजून घेणे. ३)आदिवासी समाजातील सामाजिक असमानतेचे स्वरूप व कारणांचे विश्लेषण करणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:** आदिवासी समाज व सामाजिक असमानता या विषयावर समाजशास्त्रज्ञांनी विपुल लेखन केलेले आहे. आंद्रे बेतेई, १९७४, *Inequality among Men* या ग्रंथात सामाजिक असमानतेचा अभ्यास करताना भारतीय समाजातील वर्ग, जात व सत्ता यांच्या परस्परसंबंधावर भर दिला आहे. त्यांच्या मते असमानता ही केवळ आर्थिक नसून ती सामाजिक प्रतिष्ठा व सत्तेशी निगडित असते. जी. एस. घुर्ये, १९६३, घुर्ये यांनी *The Scheduled Tribes* या ग्रंथात आदिवासी समाजाच्या सामाजिक - सांस्कृतिक स्थितीचे विश्लेषण केले. त्यांनी आदिवासी समाजाचे मुख्य प्रवाहातील समाजाशी एकीकरण आवश्यक असल्याचे मत मांडले. ए. आर. देसाई (१९७०) यांनी ग्रामीण समाजशास्त्र व भांडवलशाही विकासाच्या संदर्भात आदिवासी समाजाच्या आर्थिक शोषणावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या लेखनात संघर्ष सिद्धांताचा प्रभाव दिसून येतो. आदिवासी दारिद्र विस्थापन हे संरचनात्मक आर्थिक प्रकियांचे परिणाम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विरजिनियस खाका (२००८) यांच्या Tribes and Indian State या ग्रंथात भारतीय राज्य व आदिवासी समाज यांच्यातील संबंधांचे सखोल विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते राज्याची भूमिका ही प्रामुख्याने कल्याणकारी असली तरी आदिवासी स्वायत्ततेचा अभाव ही एक मोठी समस्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९९०) यांच्या सामाजिक न्यायविषयक विचारांनी आदिवासी व इतर वंचित घटकांच्या हक्कांच्या प्रश्नाला नैतिक व घटनात्मक अधिष्ठान दिले आहे. आदिवासी व इतर वंचित घटकांसाठी राज्य हस्तक्षेप आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. विविध शासकीय, भारतीय राज्यघटना व शासकीय अहवाल, अशासकीय व सामाजिक संस्थाचे अहवाल, माहितीपत्रके, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, शोधनिबंध, मासिके व माहितीजाल (इंटरनेट) ग्रंथ इ.द्वारे द्वितीयक तथ्ये संकलन केले आहे. या स्रोतांच्या आधारे आदिवासी समाजातील सामाजिक असमानतेचे स्वरूप व शासकीय धोरणांची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण पद्धत:** या संशोधनात गुणात्मक (*Qualitative)* विश्लेषण पद्धतीचा प्रामुख्याने वापर करण्यात आला आहे. उपलब्ध साहित्य, अहवाल व सांख्यिकीय माहिती यांचे तुलनात्मक व आशय विश्लेषण (*Content Analysis)* करण्यात आले आहे. सामाजिक असमानतेचे विविध आयाम - आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व राजकीय - यांचे स्वतंत्रपणे विश्लेषण करण्यात आले. तसेच मार्क्स, आंबेडकर व विरजिनियस खाका यांच्या समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे तथ्यांचे अर्थलागू विश्लेषण करण्यात आले आहे.

**निष्कर्ष:** प्रस्तुत अभ्यासातून असे दिसुन येते की, आदिवासी समाजातील सामाजिक असमानता ही ऐतिहासिक, संरचनात्मक व बहुआयामी स्वरूपाची आहे. शासकीय धोरणांनी काही प्रमाणात शिक्षण, आरोग्य व राजकीय प्रतिनिधित्वात सुधारणा घडवून आणली असली तरी जमीन, रोजगार व सांस्कृतिक स्वायत्ततेच्या बाबतीत असमानता अद्याप कायम आहे. धोरणांची अपुरी अंमलबजावणी, प्रशासकीय उदासीनता, स्थानिक सहभागाचा अभाव व विकासाचे वरून लादलेले मॉडेल ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे आदिवासी विकासासाठी केवळ कल्याणकारी नव्हे तर अधिकाराधिष्ठित व सहभागी विकास दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक न्याय, समता, सांस्कृतिक आदर व स्वायत्तता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे. अशा दृष्टिकोनातून राबविलेली धोरणेच सामाजिक असमानता कमी करण्यास उपयुक्त ठरू शकतील.

**संदर्भ:**

१. देवळे, रा. ग. (१९९८). आदिवासी समाज: एक समाजशास्त्रीय अध्ययन. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.
२. जोशी, म. रा. (२०१०). आदिवासी शिक्षण: समस्या व आव्हाने. औरंगाबाद: कैलास प्रकाशन.
३. गायकवाड, भाऊराव. (२०१२). आदिवासी विकास धोरणे: एक चिकित्सक अभ्यास. नाशिक: यशवंत प्रकाशन.
४. शिंदे, उ. व. (२०१५). महाराष्ट्रातील आदिवासी समाज: सातत्य व परिवर्तन. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
५. कुलकर्णी, सु. ल. (२०१९). आदिवासी समाजातील सामाजिक असमानता. मुंबई: ग्रंथाली.
6. Béteille, André. (1974), Inequality among Men. Oxford University Press
7. Desai, A. R., (1970). Rural Sociology in India. Popular Prakashan.
8. Ghurye, G. S., (1974). The Scheduled Tribes. Popular Prakashan.
9. Xaxa, Virginius. (2008), Tribes and Indian State. Pearson.
10. Government of India.,(2006), Tribal Development Reports

* * *

# लिंगभाव आधारित असमानता आणि महिला-केंद्रित शासकीय धोरणे: एक समाजशास्त्रीय विश्लेषण

**डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग, के. टी. एच. एम.कॉलेज, नाशिक

**सारांश:** भारतीय समाजातील लिंगभाव आधारित असमानता ही ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि संस्थात्मक घटकांशी जोडलेली बहुआयामी समस्या आहे. कुटुंब, शिक्षण, श्रमबाजार, आरोग्य, राजकारण आणि सार्वजनिक क्षेत्र या सर्व पातळ्यांवर स्त्रियांना संधी व संसाधनांमध्ये असमान प्रवेश दिसून येतो. या पार्श्वभूमीवर भारतात महिला-सशक्तीकरणासाठी विविध महिला-केंद्रित धोरणे, कायदे आणि कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. परंतु धोरणांची उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये अनेकदा अंतर राहते; तसेच जात, वर्ग, प्रदेश, धर्म, शहरी आणि ग्रामीण भेदांमुळे या धोरणांचे परिणाम समान स्वरूपात दिसत नाहीत. या संशोधन लेखात लिंगभाव आधारित असमानतेची सामाजिक रचना, कारणे, परिणाम आणि महिला-केंद्रित धोरणांचा प्रभाव/मर्यादा यांचे गुणात्मक आणि दुय्यम स्रोतावर आधारित विश्लेषण करण्यात आले आहे.

**परवलीचे शब्द:** लिंगभाव, महिला-सशक्तीकरण, सार्वजनिक धोरणे, कल्याणकारी योजना, स्त्रीहक्क, अंमलबजावणी

**प्रस्तावना:** लिंगभाव आधारित असमानता म्हणजे स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक भूमिकांवर आधारित संसाधने, अधिकार, संधी, सुरक्षितता व प्रतिष्ठा यांचे असमान वितरण. "लिंगभाव" (gender) हा जैविक नसून सामाजिक-सांस्कृतिक निर्मितीचा परिणाम असल्यामुळे असमानतेचे स्वरूपही केवळ वैयक्तिक पातळीवर न थांबता सामाजिक संस्थांमध्ये (कुटुंब, शिक्षण, धर्म, अर्थव्यवस्था, राज्य इ.) रचले जाते. भारतात स्त्रियांचे शिक्षण, रोजगार, संपत्तीवरील अधिकार, सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य सुविधा, राजकीय प्रतिनिधित्व आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत सहभाग या सर्व क्षेत्रांत तुलनात्मकदृष्ट्या मर्यादा दिसतात.

स्वातंत्र्योत्तर भारताने समानता, सामाजिक न्याय, आणि कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने महिला-केंद्रित धोरणांची चौकट विकसित केली. घटनात्मक तरतुदी, कायदे (उदा. कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ प्रतिबंध इ.) आणि विविध योजना (शिक्षण, पोषण, मातृआरोग्य, आर्थिक समावेशन, स्वयं-सहायता गट इ.) यांच्या माध्यमातून स्त्रियांना सुरक्षितता व समान संधी देण्याचा प्रयत्न झाला. तथापि, धोरणांची प्रभावी अंमलबजावणी ही निधी, प्रशासन, स्थानिक पातळीवरील अंमलबजावणी, जागरूकता, सामाजिक मनोवृत्ती आणि सांस्कृतिक रूढींच्या बदलावर अवलंबून असते. म्हणूनच या संशोधन लेखात "धोरणे आहेत" एवढ्यावर न थांबता "धोरणे कशी काम करतात अथवा का कमी पडतात?" याचे समाजशास्त्रीय विश्लेषण मांडण्यात आले आहे.

**संशोधन समस्येचे विधान:** महिला-केंद्रित धोरणांचा विस्तार वाढत असतानाही अनेक निर्देशांकांमध्ये (शिक्षणातील गळती, कामगार सहभाग, हिंसेचे प्रमाण, वेतन तफावत, निर्णय प्रक्रियेत कमी प्रतिनिधित्व इ.) लिंगभाव आधारित विषमता टिकून असल्याचे दिसते. धोरणांचा लाभ काही गटांपर्यंतच मर्यादित राहणे, अंमलबजावणीतील त्रुटी, आणि सामाजिक रूढी-परंपरांचा प्रतिकार हे प्रमुख अडथळे ठरतात. त्यामुळे महिला-केंद्रित धोरणे लिंगभाव आधारित असमानतेला कमी करण्यात किती प्रभावी ठरतात, आणि कोणत्या संरचनात्मक अथवा प्रशासकीय कारणांमुळे अपेक्षित बदल मर्यादित राहतो हा मुख्य प्रश्न आहे.

**उद्दिष्टे:**

१) भारतीय समाजातील लिंगभाव आधारित असमानतेची प्रमुख परिमाणे (शिक्षण, रोजगार, आरोग्य, हिंसा, प्रतिनिधित्व) समजावून घेणे.

२) महिला केंद्रित शासकीय धोरणे, योजनांची दिशा आणि स्वरूपाचे विश्लेषण करणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:** लिंगभाव आधारित असमानता ही भारतीय समाजरचनेतील एक मूलभूत आणि दीर्घकालीन सामाजिक समस्या मानली जाते. समाजशास्त्रीय अभ्यासकांच्या मते, स्त्री-पुरुषांमधील असमानता ही केवळ जैविक फरकांवर आधारित नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय घटकांमुळे निर्माण होते. **सिमोन द बोव्हार** यांनी *The Second Sex* या ग्रंथात स्त्री ही "जन्मतः नसून घडवली जाते" असे स्पष्ट करत लिंगभाव ही सामाजिक रचना असल्याचे प्रतिपादन केले. या विचारांवर आधारित पुढील अनेक स्त्रीवादी अभ्यासांनी पितृसत्ताक व्यवस्थेचा

स्त्रियांच्या जीवनावर होणारा परिणाम अधोरेखित केला आहे.

भारतीय संदर्भात, **लीला दुबे** यांनी कुटुंब, विवाह आणि नातेसंबंधांच्या अभ्यासातून स्त्रियांची अधीन स्थिती स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था, वारसा हक्कांतील असमानता आणि लैंगिक श्रमविभागणी यांमुळे स्त्रियांचे सामाजिक स्थान दुय्यम ठरते. **बिना अग्रवाल** यांनी जमीन हक्क आणि मालकीच्या प्रश्नावर केलेल्या अभ्यासातून आर्थिक संसाधनांवर स्त्रियांचा कमी ताबा हा लिंगभाव असमानतेचा मुख्य स्रोत असल्याचे दाखवून दिले आहे. स्त्रीवादी समाजशास्त्रात राज्य आणि धोरणांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. **गोपाल गुरु** आणि **सुजाता पटेल** यांनी भारतीय राज्यव्यवस्थेचा अभ्यास करताना असे नमूद केले आहे की, राज्य हे केवळ तटस्थ घटक नसून विद्यमान सामाजिक विषमता पुनरुत्पादित करणारी संस्था आहे. त्यामुळे महिला-केंद्रित धोरणे जरी अस्तित्वात असली, तरी त्यांची अंमलबजावणी आणि परिणामकारकता मर्यादित राहते. महिला-केंद्रित शासकीय धोरणांवरील अभ्यासात **अमिता बाविस्कर** आणि **नीरा युवराज** यांचे लेख महत्त्वाचे ठरतात. त्यांनी महिला सक्षमीकरण कार्यक्रम, स्वयं-सहायता गट आणि ग्रामीण विकास योजनांचे विश्लेषण करत असे दाखवले आहे की, अनेक योजना संख्यात्मक प्रगती दाखवतात; मात्र स्त्रियांच्या निर्णयक्षमता, स्वायत्तता आणि सत्तासंबंधांमध्ये मूलभूत बदल घडवण्यात त्या अपुऱ्या ठरतात.

**संशोधन पद्धती:** हा लेख दुय्यम स्रोतावर आधारित आणि गुणात्मक स्वरूपाचा आहे. यामध्ये शासकीय अहवाल, कायदे/धोरण दस्तऐवज, पंचवार्षिक अहवाल, संशोधन लेख, पुस्तके, नियतकालिके, इंटरनेट यांचा आधार घेतला आहे.

**संकल्पनात्मक चौकट:** (अ) लिंगभाव आणि सत्ता: पितृसत्ता ही कुटुंब व समाजात अधिकार-सत्ता पुरुषांच्या बाजूने झुकवते. (ब) आंतरछेदिता: स्त्री म्हणून अनुभव एकसमान नसतो; जात, वर्ग, धर्म, प्रदेश, अपंगत्व, वय, शहरी/ग्रामीण स्थिती यांमुळे असमानता वेगवेगळ्या पातळ्यांवर तीव्र होते. (क) राज्य आणि कल्याण: कल्याणकारी धोरणे "संधी" देतात, संरचनात्मक अडथळे कायम राहिल्यास धोरणांचा परिणाम मर्यादित राहतो.

**तथ्य विश्लेषण:** या संशोधनात तथ्य विश्लेषणासाठी वर्णनात्मक-विश्लेषणात्मक पद्धतीचा प्रामुख्याने वापर करण्यात आला आहे.

**लिंगभाव आधारित असमानतेची प्रमुख क्षेत्रे:**

**शिक्षणातील असमानता:** स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी काही समुदायांमध्ये शालेय गळती, शिक्षणाची मर्यादा, वाहतूक, सुरक्षितता, घरकामाचा भार, लवकर विवाह आणि आर्थिक ताण यांमुळे संधी मर्यादित राहतात. मुलींच्या शिक्षणाला "भविष्यकालीन गुंतवणूक" म्हणून कमी महत्त्व दिले जाणे ही मानसिकता धोरणांच्या परिणामकारकतेला अडथळा ठरते.

**रोजगार, वेतन आणि अदृश्य श्रम:** स्त्रियांचा कामगार म्हणून सहभाग अनेक ठिकाणी कमी दिसतो. घरगुती/देखभाल (care work) स्वरूपाचे हे श्रम मोठ्या प्रमाणात असूनही अर्थव्यवस्थेत "अदृश्य" राहतात. रोजगारात प्रवेश मिळाल्यावरही वेतनात तफावत, असुरक्षित काम, लैंगिक छळ, मातृत्वाशी संबंधित अडथळे आणि नेतृत्व पदांवर कमी प्रतिनिधित्व मिळणे अशी आव्हाने दिसतात.

**आरोग्य, पोषण आणि मातृत्वाशी संबंधित मुद्दे:** मातृआरोग्य, पोषण, पुनरुत्पादक आरोग्य, मानसिक आरोग्य, आणि आरोग्यसेवांपर्यंत प्रवेश यामध्ये वर्ग-प्रदेशानुसार मोठे अंतर दिसते. आरोग्यसेवा "उपलब्ध" असूनही माहितीचा अभाव, सामाजिक दबाव, आणि सेवा, गुणवत्तेतील तफावत धोरणांना मर्यादा आणते.

**हिंसा आणि सार्वजनिक सुरक्षितता:** कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ, बालविवाह, सायबर गुन्हे आणि सार्वजनिक ठिकाणी असुरक्षितता हे मुद्दे स्त्रीयांच्या शिक्षण, रोजगार, आणि सार्वजनिक सहभागावर थेट परिणाम करतात. याबाबत विविध कायदे असूनही नोंदणी/तक्रार करण्यातील अडथळे, पोलिस-प्रशासनाची संवेदनशीलता आणि सामाजिक टीका, उपहास व बदनामीची भीती यामुळे न्याय मिळणे अवघड होते.

**राजकीय व संस्थात्मक प्रतिनिधित्व:** राजकीय क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे संधी वाढली असली तरी अनेक ठिकाणी "प्रतिनिधी महिला, मात्र निर्णय पुरुष घेतात" अशी परिस्थिति दिसते. त्यामुळे प्रशिक्षण, प्रशासन-ज्ञान, आणि स्वायत्त निर्णयक्षमता वाढवणाऱ्या उपायांची गरज कायम राहते.

**महिला-केंद्रित शासकीय धोरणे: स्वरूप व दिशा:** महिला-केंद्रित धोरणे साधारणपणे ४ प्रकारांत दिसतात:

१. सुरक्षितता व न्याय: कौटुंबिक हिंसा प्रतिबंध, लैंगिक छळ प्रतिबंध, महिला/बाल संरक्षण यंत्रणा.
२. शिक्षण व कौशल्य: मुलींचे शिक्षण, शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, डिजिटल साक्षरता.
३. आरोग्य व पोषण: मातृ-आरोग्य, बालपोषण, आरोग्य विमा/सेवा.
४. आर्थिक सशक्तीकरण: स्वयं-सहायता गट, सूक्ष्म वित्त, उद्योजकता, बँकिंग समावेशन, रोजगार.

या धोरणांची व्यापक उद्दिष्टे सकारात्मक आहेत; परंतु "लाभार्थी-केंद्रित वितरण" आणि "हक्काधारित

परिवर्तन" यामध्ये फरक असतो. केवळ अनुदान/सहाय्य देणे पुरेसे नसून निर्णयक्षमतेचा विकास, सुरक्षित सार्वजनिक अवकाश, आणि समान संधींची संस्थात्मक हमी आवश्यक ठरते.

**धोरणांचा प्रभाव आणि मर्यादा:**

**अंमलबजावणीतील तफावत:** कुठल्याही धोरणांची अंमलबजावणी करताना धोरणांचा निधी, कर्मचाऱ्यांची कमतरता, स्थानिक स्तरावरील नियोजनाचा अभाव, आणि अनेक विभागांमध्ये समन्वय नसणे यामुळे परिणाम कमी होतो. "कागदावर धोरण" आणि "प्रत्यक्ष परिणाम" यांत अंतर राहते.

**जागरूकता आणि माहितीचा अभाव:** योजना उपलब्ध असूनही अनेक महिलांना पात्रता, अर्ज प्रक्रिया, लाभ मिळवण्याची पद्धत याची माहिती नसते. विशेषतः ग्रामीण अथवा वंचित समूहांमध्ये माहिती-असमानता धोरणांच्या उद्दिष्टांना मर्यादा आणते.

**सामाजिक रूढी, पितृसत्ता आणि प्रतिकार**: धोरणे महिलांना सार्वजनिक क्षेत्रात आणू पाहतात; परंतु कुटुंबातील नियंत्रण, "स्त्रीचे स्थान घरातच" अशी पारंपरिक धारणा आणि लज्जा/प्रतिष्ठेचे नियम बदलण्यास वेळ लागतो. त्यामुळे धोरणांना सांस्कृतिकदृष्ट्या प्रतिकार होतो.

**एकसमान धोरणे, विविध वास्तव:** स्त्रियांचा अनुभव जात, वर्ग, प्रदेशानुसार बदलतो. "एकच मॉडेल" सर्वांसाठी वापरल्यास काही गट वगळले जातात. आदिवासी, दलित, अल्पसंख्याक, एकल माता /अपंग महिला यांच्यासाठी लक्षित आणि संवेदनशील उपाय आवश्यक असतात.

**परिणाम मोजण्याची मर्यादा:** धोरणांचे मूल्यमापन अनेकदा "लाभार्थी संख्या/खर्च" यावर केंद्रित असते; पण प्रत्यक्षात निर्णयक्षमता, हिंसा कमी होणे, रोजगार टिकणे, वेतन समता, शाळा-गळती कमी होणे अशा परिणाम-निर्देशांकांवर अधिक भर आवश्यक आहे.

**निष्कर्ष:** या लेखातील विश्लेषणावरून असे दिसते की महिला-केंद्रित धोरणे लिंगभाव आधारित असमानता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण साधने आहेत; मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी, सामाजिक रूढींमधील बदल आणि संस्थात्मक उत्तरदायित्वावर अवलंबून आहे. स्त्रीयांच्या आयुष्यातील असमानता ही केवळ "सेवा-अभाव" नसून "सत्ता-संबंध" आणि "सांस्कृतिक नियंत्रण" यांची समस्या आहे. म्हणूनच धोरणांनी केवळ लाभ-वितरण न करता संरचनात्मक बदलांना चालना देणे आवश्यक आहे. उदा. सुरक्षित सार्वजनिक अवकाश, कामाच्या ठिकाणी समान संधी, श्रमाला मान्यता, निर्णय प्रक्रियेत वास्तविक प्रतिनिधित्व, आणि हक्क आधारित सेवांची हमी.

**संदर्भ सूची:**

१. दुबे, एल (१९८८) "ऑन द कन्स्ट्रक्शन ऑफ जेंडर: हिंदू गर्ल्स इन पॅट्रिलिनल इंडिया", इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली, खंड २३, क्रमांक १८

२. कर्वे, इ. (२००८), भारतीय समाज: रचना व परिवर्तन, मुंबई: मौज प्रकाशन.

३. श्रीनिवास, एम. (२०१०), भारतीय समाजशास्त्र (मराठी अनुवाद). नवी दिल्ली: ओरिएंट ब्लॅकस्वान.

४. देशपांडे, एम. (२०१२), स्त्रीवाद: सिद्धांत आणि व्यवहार, पुणे: साधना प्रकाशन.

५. देशमुख, एस. (२०१४), स्त्री आणि समाज, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

६. देशपांडे, एन. (२०१५), भारतीय समाजातील स्त्री प्रश्न, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.

७. रामदास, एस. (२०१६), स्त्री सक्षमीकरण आणि विकास, मुंबई, राजहंस प्रकाशन.

८. भसीन कमला - अनुवाद तांबे, श्रु. (२०२०) लिंगभाव समजून घेताना, पुणे, लोकवाङ्मय गृह

9. Agarwal, B. (1997). "Bargaining and Gender Relations: Within and Beyond the Household." Feminist Economics, 3(1), 1–51.
10. Guru, G. (2009). Humiliation: Claims and Context. New Delhi: Oxford University Press.
11. Patel, S. (2010). Doing Sociology in India: Genealogies, Locations and Practices. New Delhi: Oxford University Press.
12. John, M. E. (2014), Gender and development in India: Contemporary debates. Indian Journal of Sociology, 45(1), 55–72.
13. Deshpande, A. (2019), Gender inequality in India: Dimensions and trends. Indian Journal of Gender Studies, 26(2), 203–223.
14. National Commission for Women (2021), Annual report. New Delhi
15. International Institute for Population Sciences (IIPS). (2021), National Family Health Survey (NFHS-5). Mumbai

# सामाजिक असमानता व शासकीय धोरणे

**डॉ. शिल्पा प्रकाश जाधव** विभागप्रमुख समाजशास्त्र, एन. जी. आचार्य आणि डी. के. मराठे महविद्यालय, चेंबुर, मुंबई

**सारांश:** सामाजिक असमानता ही भारतासारख्या विकसनशील देशांसमोर उभी असलेली एक गंभीर व बहुआयामी समस्या असून ती आर्थिक, सामाजिक, जातीय, लिंगाधारित आणि प्रादेशिक घटकांशी निगडित आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश भारतातील सामाजिक असमानतेचे स्वरूप समजून घेणे, ती कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय धोरणांची भूमिका व परिणामकारकता विश्लेषित करणे आणि धोरणांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या मर्यादा अधोरेखित करणे हा आहे. सदर अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. प्रकाशित संशोधन लेख, पुस्तके, शासकीय व निती आयोगाचे अहवाल आणि अधिकृत आकडेवारी यांच्या आधारे सामाजिक असमानतेच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला. अभ्यासातील निष्कर्ष दर्शवितात की शासकीय धोरणांनी अन्नसुरक्षा, रोजगार, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रांत वंचित घटकांना काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरी अंमलबजावणीतील त्रुटी, लक्ष्यीकरणातील चुका आणि माहिती-अभाव यांमुळे अपेक्षित सामाजिक समता पूर्णतः साध्य झालेली नाही. त्यामुळे सामाजिक असमानता कमी करण्यासाठी पुनर्वितरणात्मक धोरणांसोबतच समावेशक, अधिकाराधिष्ठित आणि परिणामाभिमुख धोरणांची आवश्यकता असल्याचे या अभ्यासातून अधोरेखित होते.

**कीवर्ड्स:** सामाजिक असमानता, शासकीय धोरणे, समावेशक विकास, सामाजिक समता, भारत

**प्रस्तावना:** भारतासारख्या लोकशाही समाजात *सामाजिक असमानता*ही केवळ आर्थिक तफावत नसून ती जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश, शिक्षण, आरोग्य, रोजगार-संधी आणि सामाजिक प्रतिष्ठा यांमध्ये खोलवर रुजलेली बहुआयामी रचना आहे. विकासदर वाढला तरी "कोणाचा विकास" आणि "कोण मागे राहतो" हा प्रश्न केंद्रस्थानी राहतो; कारण बाजारव्यवस्था, सामाजिक रूढी आणि संस्थात्मक भेदभाव एकत्र येऊन संधींचे वितरण असमान करतात. सामाजिक संधींची समानता (शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता) ही आर्थिक प्रगतीइतकीच महत्त्वाची असल्याचे मानव-विकास दृष्टिकोनातून स्पष्ट केले जाते, आणि सार्वजनिक कृती, कल्याणकारी धोरणे व लोकसहभाग यांद्वारे वंचित घटकांचा *क्षमता-विकास* घडवणे आवश्यक ठरते (Sen & Drèze, १९९५). भारतीय संदर्भात लोकशाही प्रक्रियेत सहभाग असला तरी सामाजिक विषमता टिकून राहण्यामागे स्थानिक पातळीवरील संसाधनांचे असमान नियंत्रण, सेवांपर्यंत पोहोचण्यातली दरी आणि सामाजिक बहिष्करणाची परंपरा यांचा प्रभाव दिसतो (Drèze, २००२). विशेषतः जातआधारित बहिष्करण, श्रमबाजारातील भेदभाव, सार्वजनिक सेवांतील अडथळे आणि प्रतिनिधित्वातील मर्यादा यांमुळे अनुसूचित जाती-जमाती, काही धार्मिक अल्पसंख्याक, स्थलांतरित व अनौपचारिक कामगार यांचे सामाजिक-आर्थिक पातळीवर सतत नुकसान होते, असे सामाजिक बहिष्करणाच्या चौकटीत अधोरेखित केले गेले आहे (Thorat, २०१३). या पार्श्वभूमीवर शासकीय धोरणांची भूमिका दुहेरी ठरते—(i) पुनर्वितरण (उदा., सामाजिक सुरक्षा, अन्नसुरक्षा, आरोग्य, शिक्षण) आणि (ii) समान संधी-निर्मिती (उदा., कौशल्य, रोजगार, पायाभूत सुविधा, अधिकाराधिष्ठित कार्यक्रम). तरीही अलीकडच्या काळात उत्पन्न/संपत्ती केंद्रीकरण वाढत असल्याचे जागतिक स्तरावरील असमानता अभ्यास दाखवतात, ज्यातून धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणी, कर-न्याय, सामाजिक खर्च आणि लक्ष्यित संरक्षण यांची गरज अधिक तीव्र होते (Chancel et al., २०२२; Reuters, २०२४). भारताच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या प्रगतीचे मूल्यांकन करणाऱ्या अधिकृत निर्देशांकांमध्ये राज्य-स्तरावर प्रगती दिसली तरी क्षेत्रीय व गट-स्तरावरील विषमता कमी करण्यासाठी *समावेशक* व *डेटा-आधारित* धोरण-सुधारणांची आवश्यकता सतत अधोरेखित होते (NITI Aayog, २०२३–२४). त्यामुळे "सामाजिक असमानता व शासकीय धोरणे" हा विषय केवळ तत्त्वचर्चा नसून, धोरण-रचना, अंमलबजावणीतील दरी, लाभार्थी निवड, पारदर्शकता, आणि परिणाममापन यांच्या आधारे भारतातील समता-साध्यतेचे वास्तव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**साहित्याचा आढावा:** सामाजिक असमानतेच्या अभ्यासात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि सार्वजनिक धोरण या सर्व क्षेत्रांतून महत्त्वपूर्ण योगदान दिले गेले आहे. *सामाजिक असमानता* ही केवळ उत्पन्नातील

तफावत नसून, संधी, क्षमता, अधिकार आणि सन्मान यांतील विषमता असल्याचे स्पष्ट करत अमर्त्य सेन यांनी "क्षमता दृष्टिकोन" (Capability Approach) मांडला असून, व्यक्तींच्या वास्तविक स्वातंत्र्यावर आणि जीवनमानावर धोरणांचा परिणाम होतो यावर त्यांनी भर दिला आहे (Sen, १९९९). भारताच्या संदर्भात सेन आणि द्रेझे यांनी सार्वजनिक कृती, कल्याणकारी धोरणे आणि लोकशाही सहभाग यांचा मानवी विकासाशी असलेला थेट संबंध अधोरेखित केला असून, आरोग्य व शिक्षणातील गुंतवणूक ही सामाजिक असमानता कमी करण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे नमूद केले आहे (Sen & Drèze, १९९५). सामाजिक बहिष्करणाच्या चौकटीतून पाहता, थोरात यांनी जात-आधारित असमानता, श्रमबाजारातील भेदभाव आणि संसाधनांवरील मर्यादित प्रवेश यामुळे वंचित गटांच्या विकासावर दीर्घकालीन परिणाम होत असल्याचे विशद केले आहे (Thorat, २०१३). देशपांडे (२०११) यांनी भारतीय समाजातील वर्ग, जात आणि लिंग यांच्या परस्परसंबंधातून निर्माण होणाऱ्या असमानतेचा सखोल अभ्यास केला असून, केवळ आर्थिक वाढ पुरेशी नसून संरचनात्मक सुधारणांची गरज असल्याचे अधोरेखित केले आहे. शासकीय धोरणांच्या भूमिकेवर चर्चा करताना, एस्पिंग-अँडरसन (१९९०) यांनी कल्याणकारी राज्याच्या विविध प्रतिमानांद्वारे (Welfare Regimes) सामाजिक संरक्षण आणि असमानतेतील संबंध स्पष्ट केला, ज्याचा प्रभाव भारतातील सामाजिक सुरक्षा योजनांच्या विश्लेषणातही दिसतो. भारतातील गरिबी निवारण व रोजगारनिर्मिती कार्यक्रमांचा अभ्यास करत कोळी (२०१२) यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) सारख्या अधिकाराधिष्ठित धोरणांनी ग्रामीण स्तरावर उत्पन्न-सुरक्षा वाढवली, मात्र अंमलबजावणीतील त्रुटीमुळे अपेक्षित परिणाम सर्वत्र साध्य होत नसल्याचे दाखवून दिले. शिक्षण क्षेत्रातील असमानतेवर लिहिताना, जयाराम (२००७) यांनी उच्च शिक्षणातील प्रवेश, गुणवत्ता आणि सामाजिक पार्श्वभूमी यांमधील दरी स्पष्ट केली असून, आरक्षण धोरणे ही संधी-समानतेसाठी आवश्यक असली तरी पूरक सुधारणा अनिवार्य असल्याचे नमूद केले आहे. आरोग्य क्षेत्रात, बारू इत्यादी (२०१०) यांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील अपुरा खर्च आणि खासगीकरणामुळे गरीब व वंचित घटकांवर वाढणारा आर्थिक भार अधोरेखित केला आहे. लिंग-असमानतेच्या संदर्भात, अगरवाल (१९९७) यांनी मालमत्ता हक्क, रोजगार आणि निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे हे सामाजिक समतेसाठी मूलभूत असल्याचे मांडले आहे. अलीकडील काळात, पिकेटी (२०१४) यांनी संपत्ती केंद्रीकरण आणि कर-धोरणांतील असमतोल यामुळे जागतिक स्तरावर असमानता वाढत असल्याचे दाखवून दिले असून, भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये प्रगतीशील करव्यवस्था आणि सामाजिक खर्च वाढवण्याची गरज अधोरेखित केली आहे. निती आयोगाच्या मानवी विकास व शाश्वत विकास उद्दिष्टांवरील अहवालांमध्ये (NITI Aayog, २०२१; २०२३) राज्यांदरम्यान आणि सामाजिक गटांदरम्यान विकासातील दरी स्पष्ट केली असून, डेटा-आधारित धोरण-निर्मिती आणि लक्ष्यित हस्तक्षेपांची शिफारस करण्यात आली आहे. एकूणच साहित्याचा आढावा सूचित करतो की सामाजिक असमानता ही बहुआयामी व संरचनात्मक समस्या असून, शासकीय धोरणे पुनर्वितरण, समान संधी-निर्मिती आणि सशक्तीकरण या तिन्ही पातळ्यांवर प्रभावी असणे आवश्यक आहे; मात्र धोरणांची परिणामकारकता अंमलबजावणी, संस्थात्मक क्षमता आणि सामाजिक संदर्भांवर अवलंबून असल्याचे विद्वानांचे एकमत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:** भारतातील सामाजिक असमानतेच्या विविध स्वरूपांचा (आर्थिक, सामाजिक व लिंगाधारित) अभ्यास करणे. सामाजिक असमानता कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय धोरणांची भूमिका व परिणामकारकता विश्लेषित करणे. शासकीय धोरणांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी ओळखून अधिक समावेशक धोरणांसाठी सूचनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:** सदर अभ्यासासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनात *दुय्यम माहिती* (Secondary Data) यांचा प्रामुख्याने उपयोग करण्यात आला असून, सामाजिक असमानता व शासकीय धोरणांशी संबंधित विद्यमान साहित्याचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. दुय्यम माहितीचे स्रोत म्हणून प्रकाशित संशोधन लेख, संदर्भित जर्नल्स, पुस्तके, शासनाचे अधिकृत अहवाल, निती आयोगाचे अहवाल, जनगणना व राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSSO) संबंधित आकडेवारी, तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल यांचा समावेश करण्यात आला आहे. संकलित माहितीचे वर्गीकरण आर्थिक, सामाजिक, लिंगाधारित व प्रादेशिक असमानता अशा विविध घटकांनुसार करण्यात आले आहे. माहिती विश्लेषणासाठी गुणात्मक (Qualitative) पद्धतीचा वापर करून तुलनात्मक व आशय-विश्लेषण (Content Analysis) करण्यात आले आहे.

विविध अभ्यासकांच्या निष्कर्षांची तुलना करून शासकीय धोरणांची परिणामकारकता, अंमलबजावणीतील मर्यादा आणि सामाजिक परिणाम यांचे मूल्यमापन करण्यात आले आहे. उपलब्ध

साहित्याच्या आधारे निष्कर्ष मांडून सामाजिक समतेसाठी धोरणात्मक सुधारणांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

**निकाल व निष्कर्ष:** सदर अभ्यासात सामाजिक असमानता व शासकीय धोरणे यांचा परस्परसंबंध दुय्यम माहितीच्या आधारे विश्लेषित करण्यात आला आहे. उपलब्ध साहित्य, शासकीय अहवाल आणि विद्यमान अभ्यासांच्या आधारे सामाजिक असमानतेचे स्वरूप, शासकीय हस्तक्षेपांची परिणामकारकता तसेच धोरण अंमलबजावणीतील अडचणी स्पष्टपणे समोर आल्या आहेत. खालील तीन प्रमुख विभागांमध्ये या निष्कर्षांचे सविस्तर विवेचन करण्यात येत आहे.

**विभाग १: भारतातील सामाजिक असमानतेचे स्वरूप व परिमाण:**

**१.१ आर्थिक असमानता:** अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसून येते की भारतातील आर्थिक असमानता ही केवळ उत्पन्नातील तफावतीपुरती मर्यादित नसून ती संपत्तीचे केंद्रीकरण, रोजगार-सुरक्षेचा अभाव, उपभोग क्षमतेतील दरी आणि आर्थिक संधींच्या असमान वितरणाशी निगडित आहे. आर्थिक उदारीकरणानंतर भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) सातत्याने वाढत असला, तरी या वाढीचा लाभ समाजातील सर्व घटकांना समान प्रमाणात मिळालेला नाही. उच्च उत्पन्न गटांकडे संपत्तीचे केंद्रीकरण वाढत असताना, निम्न व मध्यम उत्पन्न गटांची आर्थिक असुरक्षितता वाढल्याचे अनेक अभ्यास अधोरेखित करतात. औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रांमधील वेतनातील मोठी तफावत आर्थिक असमानतेचे एक प्रमुख लक्षण आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी वेतन, सामाजिक सुरक्षा नसणे, रोजगाराची अनिश्चितता आणि कामाच्या अटींचा अभाव यांचा सामना करावा लागतो. याउलट, औपचारिक क्षेत्रातील मर्यादित लोकसंख्येला स्थिर उत्पन्न, सामाजिक संरक्षण आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध होतात. यामुळे आर्थिक विभाजन अधिक तीव्र होते. ग्रामीण—शहरी दरीदेखील आर्थिक असमानतेला बळ देणारी ठरते. शहरी भागात रोजगार, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा तुलनेने अधिक विकसित असल्या, तरी ग्रामीण भागातील मोठ्या लोकसंख्येला मूलभूत सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. कृषी क्षेत्रातील उत्पन्नातील अस्थिरता, नैसर्गिक आपत्तींचा परिणाम आणि बाजारपेठेतील चढउतार यांमुळे ग्रामीण कुटुंबांची आर्थिक स्थिती अधिक असुरक्षित बनते.

यावरून असे दिसून येते की भारतातील आर्थिक असमानता ही संरचनात्मक स्वरूपाची असून आर्थिक वाढ असूनही मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आर्थिकदृष्ट्या असुरक्षित अवस्थेत आहे. त्यामुळे “विकास असूनही विषमता” हे वास्तव अभ्यासातून ठळकपणे समोर येते.

**१.२ सामाजिक व जातीय असमानता:** सामाजिक व जातीय असमानता ही भारताच्या सामाजिक रचनेतील एक खोलवर रुजलेली समस्या असल्याचे निष्कर्ष दर्शवितात. जात, धर्म आणि सामाजिक ओळख हे घटक शिक्षण, रोजगार, सामाजिक प्रतिष्ठा आणि सार्वजनिक सेवांमध्ये प्रवेश यांवर थेट परिणाम करतात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना ऐतिहासिक कारणांमुळे सामाजिक बहिष्करणाचा सामना करावा लागलेला असून, त्याचे परिणाम आजही दिसून येतात. शिक्षण क्षेत्रात प्रवेश वाढला असला, तरी गुणवत्तेतील तफावत, गळतीचे प्रमाण आणि उच्च शिक्षणातील मर्यादित प्रतिनिधित्व या समस्या कायम आहेत. रोजगार क्षेत्रातही जातीय भेदभाव, अनौपचारिक कामांमध्ये जास्त प्रमाणात अडकलेली लोकसंख्या आणि सामाजिक नेटवर्कचा अभाव यांमुळे वंचित गटांच्या प्रगतीला मर्यादा येतात.

शहरीकरण आणि आधुनिकीकरणामुळे सामाजिक भेदभाव कमी होईल अशी अपेक्षा होती; मात्र अभ्यासातून असे दिसून येते की सामाजिक भेदभावाचे स्वरूप बदलले असले, तरी तो पूर्णतः नष्ट झालेला नाही. सार्वजनिक सेवांमध्ये प्रवेश असमान असल्याने आरोग्य, शिक्षण आणि निवास यांसारख्या मूलभूत गरजांमध्येही विषमता टिकून आहे. या निष्कर्षांवरून सामाजिक असमानता ही केवळ आर्थिक नसून सामाजिक रचना, परंपरा आणि संस्थात्मक व्यवस्थांशी जोडलेली असल्याचे स्पष्ट होते.

**१.३ लिंगाधारित असमानता:** अभ्यासातील निष्कर्ष सूचित करतात की लिंगाधारित असमानता ही भारतीय समाजातील सर्व क्षेत्रांत आढळते. शिक्षणाच्या बाबतीत मुलींच्या नावनोंदणीत सुधारणा झाली असली, तरी उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यास-क्रमांमध्ये महिलांचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

कामगार बाजारात महिलांचा सहभाग दर कमी असून, समान कामासाठी कमी वेतन मिळणे ही समस्या अद्यापही कायम आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना सामाजिक सुरक्षा, मातृत्व लाभ आणि सुरक्षित कामाचे वातावरण यांचा अभाव भासतो. याशिवाय, घरगुती व काळजीवाहू कामाचे आर्थिक मूल्यांकन न होणे हे महिलांच्या अदृश्य श्रमांचे मोठे उदाहरण आहे. निर्णयप्रक्रियेत महिलांचे प्रतिनिधित्व राजकीय, सामाजिक आणि आर्थिक पातळीवर मर्यादित असल्याचेही अभ्यासातून स्पष्ट होते. त्यामुळे लिंगाधारित असमानता ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाची असल्याचे निष्कर्ष सूचित करतात.

**१.४ प्रादेशिक असमानता:** भारतामध्ये राज्यांदरम्यान तसेच राज्यांतर्गत जिल्ह्यांमध्ये विकासातील मोठी तफावत आढळते. काही राज्ये शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि पायाभूत सुविधांमध्ये आघाडीवर असताना, काही राज्ये अजूनही मूलभूत विकास निर्देशकांमध्ये मागे आहेत.

पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि शिक्षण संस्थांचे असमान वितरण प्रादेशिक असमानता वाढवते. परिणामी मोठ्या प्रमाणावर ग्रामीण ते शहरी स्थलांतर होते, ज्यामुळे शहरी झोपडपट्ट्यांची वाढ, बेरोजगारी आणि सामाजिक तणाव निर्माण होतो.

**विभाग २: सामाजिक असमानता कमी करण्यासाठी शासकीय धोरणांची भूमिका व परिणामकारकता:** भारतामध्ये सामाजिक असमानता कमी करण्यासाठी शासकीय धोरणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय राज्यघटनेतील समता, सामाजिक न्याय आणि कल्याणकारी राज्य या तत्त्वांच्या आधारे विविध पुनर्वितरणात्मक, सशक्तीकरणात्मक आणि हक्काधिष्ठित धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या अभ्यासातील निष्कर्षांनुसार, या धोरणांनी काही प्रमाणात सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्यास हातभार लावला असला, तरी त्यांची परिणामकारकता सर्वत्र समान आणि दीर्घकालीन स्वरूपाची असल्याचे दिसून येत नाही.

**२.१ पुनर्वितरणात्मक धोरणे:** अभ्यासातून असे स्पष्ट होते की अन्नसुरक्षा योजना, सार्वजनिक वितरण व्यवस्था (PDS), सामाजिक सुरक्षा योजना, वृद्धापकाळ निवृत्तीवेतन, विधवा व दिव्यांग सहाय्य योजना तसेच थेट लाभ हस्तांतरण (DBT) यांसारख्या पुनर्वितरणात्मक धोरणांनी गरीब व वंचित घटकांना तात्पुरती आर्थिक स्थिरता प्रदान केली आहे. या योजनांमुळे अन्नधान्य, किमान उत्पन्न आणि मूलभूत गरजांची पूर्तता होऊन अत्यंत गरिबीची तीव्रता काही अंशी कमी झाल्याचे दिसून येते. विशेषतः ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था ही अन्नसुरक्षेचे महत्त्वपूर्ण साधन ठरली आहे.

थेट लाभ हस्तांतरणामुळे लाभार्थ्यांपर्यंत आर्थिक सहाय्य थेट पोहोचण्यास मदत झाली असून मध्यस्थांची भूमिका कमी झाली आहे. यामुळे काही प्रमाणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढल्याचे आढळते. तथापि, या धोरणांचा प्रभाव मुख्यतः अल्पकालीन स्वरूपाचा असून दीर्घकालीन उत्पन्न-सुरक्षा, रोजगार-निर्मिती आणि आर्थिक स्वावलंबन साध्य करण्यात मर्यादा दिसून येतात. अनेक वेळा ही मदत केवळ उपजीविकेसाठी पुरेशी ठरते; परंतु दारिद्र्याच्या मुळाशी असलेल्या संरचनात्मक कारणांवर ती प्रभावीपणे उपाय करत नाही. त्यामुळे पुनर्वितरणात्मक धोरणे सामाजिक असमानता कमी करण्यासाठी आवश्यक असली, तरी ती पुरेशी नाहीत, असा निष्कर्ष अभ्यासातून पुढे येतो.

**२.२ शिक्षण व आरोग्य धोरणे:** शिक्षण आणि आरोग्य ही सामाजिक समतेची दोन महत्त्वाची आधारस्तंभ मानली जातात. अभ्यासातील निष्कर्षांनुसार, शिष्यवृत्ती योजना, मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश योजना आणि आरक्षण धोरणांमुळे शाळा प्रवेश आणि नावनोंदणी दरात लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः मुली, अनुसूचित जाती-जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये शिक्षणाची उपलब्धता वाढल्याचे दिसून येते. या धोरणांमुळे शिक्षणातील प्राथमिक पातळीवरील सहभाग वाढला असला, तरी शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत मोठी तफावत आढळते. ग्रामीण व शहरी भागांमध्ये शैक्षणिक सुविधा, डिजिटल साधने, प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता आणि पायाभूत सुविधा यांमध्ये स्पष्ट फरक दिसून येतो. डिजिटल शिक्षणाच्या प्रसारामुळे संधी वाढल्या असल्या, तरी डिजिटल दरीमुळे अनेक गरीब व ग्रामीण विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून वगळले जातात. त्यामुळे शिक्षण धोरणांनी प्रवेश वाढवला असला, तरी समान गुणवत्ता सुनिश्चित करण्यात मर्यादा असल्याचे स्पष्ट होते.

आरोग्य क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विमा योजना, प्राथमिक आरोग्य केंद्रांचा विस्तार आणि मातृ-बाल आरोग्य कार्यक्रमांमुळे आरोग्यसेवांचा आवाका वाढला आहे. तरीही, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील अपुरा खर्च, आरोग्य सुविधांची असमान उपलब्धता आणि खासगी आरोग्यसेवांवरील वाढता अवलंब यांमुळे गरीब कुटुंबांवर आर्थिक भार पडतो. अभ्यासातून असे दिसून येते की आजारपणामुळे होणारा खर्च अनेक कुटुंबांना पुन्हा दारिद्र्याच्या खाईत ढकलतो. त्यामुळे आरोग्य धोरणे सामाजिक असमानता कमी करण्यासाठी महत्त्वाची असली, तरी त्यांची परिणामकारकता मर्यादित राहते.

**२.३ रोजगार व कौशल्यविकास धोरणे:** रोजगारनिर्मिती आणि उत्पन्न-सुरक्षा ही सामाजिक समतेसाठी अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण रोजगार हमी योजना, कौशल्यविकास कार्यक्रम, स्वयंरोजगार प्रोत्साहन योजना आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांनी रोजगाराच्या संधी निर्माण केल्याचे निष्कर्ष सूचित करतात. विशेषतः ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेमुळे तात्पुरते रोजगार उपलब्ध होऊन स्थलांतर कमी होण्यास मदत झाली आहे.

तथापि, या रोजगाराची गुणवत्ता, नियमितता आणि दीर्घकालीन स्वरूप मर्यादित असल्याचे दिसते. कौशल्यविकास कार्यक्रम आणि बाजारातील वास्तविक गरजा यांमध्ये अनेकदा तफावत आढळते. प्रशिक्षित युवकांना योग्य रोजगार मिळण्यात अडचणी येतात,

ज्यामुळे कौशल्यविकासाचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. त्यामुळे रोजगार धोरणांनी संधी निर्माण केल्या असल्या, तरी दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबन साध्य करण्यात मर्यादा असल्याचे स्पष्ट होते.

**२.४ सशक्तीकरण व हक्काधिष्ठित दृष्टिकोन:** महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि अल्पसंख्याकां-साठी राबविण्यात येणाऱ्या सशक्तीकरणात्मक आणि हक्काधिष्ठित धोरणांनी सामाजिक जागरूकता, कायदेशीर संरक्षण आणि संस्थात्मक पाठबळ वाढवले आहे. आरक्षण धोरणांमुळे शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वात काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. महिलांसाठी स्वयंसहायता गट, आर्थिक समावेशन योजना आणि कायदेशीर हक्क यांमुळे आत्मविश्वास व सहभाग वाढल्याचे दिसून येते. तथापि, सामाजिक वृत्तीतील बदल अपेक्षेपेक्षा संथ गतीने होत असल्याचे अभ्यासातून स्पष्ट होते. केवळ धोरणात्मक हस्तक्षेप पुरेसा नसून सामाजिक-सांस्कृतिक बदल, मानसिकतेतील परिवर्तन आणि समुदाय पातळीवरील सहभाग आवश्यक आहे. अनेक वेळा कायदेशीर हक्क असूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी व स्वीकार मर्यादित राहतो.

एकूणच, अभ्यासातून असे निष्कर्ष निघतात की शासकीय धोरणांनी सामाजिक असमानता कमी करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक योगदान दिले आहे. अन्नसुरक्षा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सशक्तीकरण या क्षेत्रांत धोरणात्मक हस्तक्षेपांमुळे वंचित घटकांना काही प्रमाणात संरक्षण व संधी मिळाल्या आहेत. मात्र, या धोरणांची परिणामकारकता मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणीच्या गुणवत्तेवर, संस्थात्मक क्षमतेवर, प्रशासकीय कार्यक्षमतेवर आणि सामाजिक संदर्भांवर अवलंबून आहे. त्यामुळे सामाजिक असमानता प्रभावीपणे कमी करण्यासाठी केवळ धोरणांची संख्या वाढवणे पुरेसे नसून, समन्वित, समावेशक आणि दीर्घकालीन दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**विभाग ३: शासकीय धोरणांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी व समावेशकतेसाठी आवश्यक सुधारणा** *(उद्दिष्ट ३ शी संबंधित निष्कर्ष):* सामाजिक असमानता कमी करण्यासाठी भारत सरकारने विविध कल्याणकारी, पुनर्वितरणात्मक आणि हक्काधिष्ठित धोरणे राबविली असली, तरी या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी ही एक मोठी आव्हानात्मक बाब ठरते. अभ्यासातील निष्कर्ष दर्शवितात की धोरणांची रचना बहुतेक वेळा समतावादी व उद्दिष्टाभिमुख असते; मात्र अंमलबजावणीच्या टप्प्यावर येणाऱ्या प्रशासकीय, संस्थात्मक आणि सामाजिक अडचणींमुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. त्यामुळे धोरणे असूनही सामाजिक असमानतेत अपेक्षित प्रमाणात घट होत नसल्याचे स्पष्ट होते.

**३.१ अंमलबजावणीतील त्रुटी:** अभ्यासातून असे स्पष्ट होते की धोरणांची संकल्पना व उद्दिष्टे योग्य असली, तरी त्यांची अंमलबजावणी अनेक अडथळ्यांनी ग्रस्त आहे. प्रशासकीय अकार्यक्षमता ही यातील एक प्रमुख समस्या आहे. अपुरी मनुष्यबळ क्षमता, अधिकाऱ्यांचे अपुरे प्रशिक्षण, कार्यभाराचा ताण आणि यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव यांमुळे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील समन्वयाच्या कमतरतेमुळे धोरणांची अंमलबजावणी विस्कळीत स्वरूपाची ठरते.

भ्रष्टाचार आणि गळती (Leakages) हीदेखील एक गंभीर अडचण आहे. अनेक वेळा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या संसाधनांचा काही भाग मध्यस्थांकडून अडवला जातो किंवा गैरवापर केला जातो. यामुळे योजनांचा मूळ उद्देशच बाधित होतो. जरी डिजिटल प्रणाली, थेट लाभ हस्तांतरण आणि आधार-आधारित पडताळणी यांमुळे काही प्रमाणात पारदर्शकता वाढली असली, तरी पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त अंमलबजावणी साध्य झालेली नाही. याशिवाय, धोरणांची अंमलबजावणी अनेकदा 'एकसारखी सर्वांसाठी' (One-size-fits-all) पद्धतीने केली जाते, ज्यामुळे स्थानिक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाचा पुरेसा विचार होत नाही. परिणामी, काही क्षेत्रांत योजना परिणामकारक ठरतात, तर काही क्षेत्रांत त्या निष्फळ ठरतात. त्यामुळे अंमलबजावणीतील लवचिकतेचा अभाव हा देखील एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणून समोर येतो.

**३.२ लक्ष्यीकरण व लाभार्थी निवड:** लक्ष्यीकरणातील त्रुटी या सामाजिक कल्याणकारी योजनांच्या परिणामकारकतेला मर्यादा घालणाऱ्या प्रमुख समस्या आहेत. अभ्यासातून असे दिसून येते की अनेक योजनांमध्ये वगळणूक त्रुटी (Exclusion Errors) आणि समावेशन त्रुटी (Inclusion Errors) आढळतात. वगळणूक त्रुटींमुळे खऱ्या गरजू लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळत नाही, तर समावेशन त्रुटींमुळे अपात्र व्यक्ती योजनांचा लाभ घेतात.

दारिद्र्य रेषेचे मोजमाप, सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणातील त्रुटी, अद्ययावत डेटाचा अभाव आणि स्थलांतरित लोकसंख्येची नोंद न होणे ही लक्ष्यीकरणातील समस्यांची प्रमुख कारणे आहेत. विशेषतः स्थलांतरित कामगार, शहरी झोपडपट्ट्यांतील रहिवासी आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगार अनेकदा शासकीय योजनांच्या कक्षेबाहेर राहतात. डिजिटल ओळख प्रणाली आणि डेटाबेसच्या वापरामुळे लक्ष्यीकरण सुधारण्याचा

प्रयत्न करण्यात आला असला, तरी डिजिटल नोंदीतील चुका, कागदपत्रांचा अभाव आणि तांत्रिक अडचणी यांमुळे अनेक गरजू व्यक्ती वगळल्या जातात. त्यामुळे लक्ष्यीकरण सुधारण्यासाठी केवळ तांत्रिक उपाय नव्हे, तर सामाजिक वास्तवाचा विचार करणारी बहुआयामी पद्धत आवश्यक असल्याचे निष्कर्ष सूचित करतात.

**३.३ माहिती व जागरूकतेचा अभाव:** अभ्यासातील एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे शासकीय योजनांविषयी लाभार्थ्यांमध्ये अपुरी माहिती आणि जागरूकतेचा अभाव. अनेक गरीब व वंचित घटकांना त्यांच्या हक्कांविषयी, उपलब्ध योजनांविषयी आणि लाभ मिळविण्याच्या प्रक्रियेविषयी पुरेशी माहिती नसते. त्यामुळे योजना अस्तित्वात असूनही त्यांचा लाभ मर्यादित राहतो. डिजिटल माध्यमांद्वारे माहिती प्रसार वाढत असला, तरी डिजिटल दरी ही एक मोठी समस्या आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, डिजिटल साक्षरता आणि तांत्रिक कौशल्यांचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागातील, वृद्ध व्यक्ती, महिलां आणि कमी शिक्षित लोकसंख्येला डिजिटल सेवांचा लाभ घेणे कठीण जाते. यामुळे तंत्रज्ञान-आधारित धोरणे काही प्रमाणात नवीन स्वरूपाची असमानता निर्माण करतात. याशिवाय, भाषिक अडथळे, प्रशासकीय गुंतागुंत आणि अर्ज प्रक्रियेतील जटिलता यांमुळेही माहितीचा अभाव अधिक तीव्र होतो. त्यामुळे माहिती प्रसार केवळ डिजिटल स्वरूपात न ठेवता, स्थानिक भाषांमध्ये, समुदाय पातळीवर आणि प्रत्यक्ष संपर्काद्वारे करणे आवश्यक असल्याचे निष्कर्ष सूचित करतात.

**३.४ समावेशक धोरणांसाठी आवश्यक दिशा:** अभ्यासातून असे स्पष्ट होते की सामाजिक असमानता प्रभावीपणे कमी करण्यासाठी धोरण-रचना आणि अंमलबजावणी या दोन्ही टप्प्यांवर समावेशकतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. डेटा-आधारित धोरण-निर्मिती ही यासाठी एक महत्त्वाची दिशा ठरू शकते. अद्ययावत, विश्वासार्ह आणि विभागनिहाय डेटा उपलब्ध असल्यास धोरणे अधिक अचूकपणे लक्ष्यित करता येतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा सक्रिय सहभाग धोरणांच्या यशासाठी अत्यंत आवश्यक आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून स्थानिक गरजांची ओळख करून धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करता येते. सामाजिक लेखापरीक्षणामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग वाढतो, ज्यामुळे भ्रष्टाचार आणि गळती कमी होण्यास मदत होते. याशिवाय, सातत्यपूर्ण परिणाममापन आणि मूल्यांकन आवश्यक आहे. धोरणांचा प्रत्यक्ष सामाजिक परिणाम काय आहे, कोणते घटक लाभान्वित होत आहेत आणि कोण वगळले जात आहेत याचे नियमित मूल्यमापन केल्यास धोरणांमध्ये वेळोवेळी सुधारणा करता येतात. केवळ आर्थिक सहाय्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक सशक्तीकरण यांचा समन्वित दृष्टिकोन स्वीकारणे ही समावेशकतेची खरी दिशा असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**अभ्यासाची चर्चा:** सदर अभ्यासातील निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की भारतातील सामाजिक असमानता ही एकसंध किंवा केवळ आर्थिक स्वरूपाची समस्या नसून ती बहुआयामी, संरचनात्मक आणि परस्परसंबंधित घटकांमुळे निर्माण झालेली आहे. आर्थिक वाढ, शहरीकरण आणि तांत्रिक प्रगती असूनही सामाजिक, जातीय, लिंगाधारित व प्रादेशिक असमानता टिकून राहिल्याचे अभ्यासातून दिसून येते. हे निष्कर्ष क्षमता-दृष्टिकोन आणि सामाजिक बहिष्करणाच्या सिद्धांतांशी सुसंगत आहेत, ज्यानुसार संधी, संसाधने आणि निर्णयप्रक्रियेत समान प्रवेश नसल्यास विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही. शासकीय धोरणांनी अन्नसुरक्षा, रोजगार, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रांत वंचित घटकांना काही प्रमाणात संरक्षण दिले असले तरी, ही धोरणे प्रामुख्याने तात्पुरत्या दिलास्यापुरती मर्यादित राहिल्याचे दिसते. अधिकाराधिष्ठित व पुनर्वितरणात्मक धोरणांमुळे गरिबीची तीव्रता कमी झाली असली, तरी उत्पन्न, संपत्ती व सामाजिक प्रतिष्ठेतील दरी पूर्णतः कमी झालेली नाही. अंमलबजावणीतील प्रशासकीय अकार्यक्षमता, लक्ष्यीकरणातील त्रुटी आणि माहिती-अभाव या समस्या धोरणांच्या परिणामकारकतेला मर्यादा घालतात. विशेषतः डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढताना दिसत असला, तरी डिजिटल दरीमुळे काही वंचित गट अजूनही धोरणांच्या कक्षेबाहेर राहतात. अभ्यासात हेही स्पष्ट झाले की केवळ आर्थिक सहाय्य पुरेसे नसून दीर्घकालीन सामाजिक समतेसाठी शिक्षणाची गुणवत्ता, आरोग्य सेवांची उपलब्धता, कौशल्यविकास, महिलांचे सशक्तीकरण आणि सामाजिक वृत्तीतील बदल आवश्यक आहेत. त्यामुळे सामाजिक असमानता कमी करण्यासाठी शासकीय धोरणांना समन्वित, समावेशक आणि परिणामाभिमुख दृष्टिकोनाची गरज असून, धोरण-रचना आणि अंमलबजावणी यांतील दरी कमी करणे हीच खरी विकासाची कसोटी असल्याचे या अभ्यासातून अधोरेखित होते.

**निष्कर्ष:** सदर अभ्यासातून असे निष्पन्न होते की भारतातील सामाजिक असमानता ही केवळ आर्थिक विषमतेपुरती मर्यादित नसून ती जात, लिंग, वर्ग, प्रदेश आणि संस्थात्मक संरचना यांशी घट्टपणे निगडित असलेली बहुआयामी समस्या आहे. शासकीय धोरणांनी गरिबी

निवारण, अन्नसुरक्षा, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत वंचित घटकांना महत्त्वाचे संरक्षण व संधी दिल्या असल्या तरी, सामाजिक समता साध्य करण्यासाठी त्या पुरेशा ठरलेल्या नाहीत. धोरणांची अंमलबजावणी, लक्ष्यीकरणातील त्रुटी, प्रशासकीय अकार्यक्षमता आणि माहिती-अभाव यांमुळे अपेक्षित परिणाम अनेकदा मर्यादित राहतात. अभ्यासातून हेही स्पष्ट झाले की तात्पुरत्या आर्थिक मदतीपेक्षा दीर्घकालीन क्षमता-विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुलभ आरोग्यसेवा, कौशल्यविकास आणि महिलांचे सशक्तीकरण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सामाजिक असमानता कमी करण्यासाठी पुनर्वितरणात्मक धोरणांसोबतच समावेशक विकासाचा समन्वित दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. त्यामुळे, धोरण-रचना, अंमलबजावणी आणि परिणाममापन या सर्व टप्प्यांवर पारदर्शकता, लोकसहभाग आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया बळकट केल्यासच सामाजिक समता आणि शाश्वत विकास साध्य होऊ शकतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडता येतो.

**संदर्भ सूची:**


१. अगरवाल, बी. (१९९७). *घरांतर्गत व घराबाहेरील सौदेबाजी आणि लिंगसंबंध.* Feminist Economics, ३(१), १—५१.

२. एस्पिंग-अँडरसन, जी. (१९९०). *कल्याणकारी भांडवलशाहीचे तीन प्रकार.* Princeton University Press.

३. चॅन्सेल, एल., पिकेटी, टी., साएझ, ई., व झुकमन, जी. (२०२२). *जागतिक असमानता अहवाल २०२२.* World Inequality Lab.

४. बारू, आर., आचार्य, ए., आचार्य, एस., कुमार, ए. के. एस., व नगराज, के. (२०१०). *भारतामधील आरोग्यसेवांपर्यंत प्रवेशातील विषमता: जात, वर्ग आणि प्रदेश.* Economic and Political Weekly, ४५(३८), ४९—५८.

५. देशपांडे, ए. (२०११). *जातव्यवस्थेचे व्याकरण: समकालीन भारतातील आर्थिक भेदभाव.* Oxford University Press.

६. द्रेझे, जे. (२००२). *लोकशाही आणि अन्नाचा हक्क.* Economic and Political Weekly, ३७(३४), ३४२५—३४३२.

७. जयारामन, ए. (२००७). *भारतातील उच्च शिक्षणातील प्रवेश व समता.* Higher Education Policy, २०(४), ४४९—४७२.

८. कोळी, पी. ए. (२०१२). *महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा: एक चिकित्सक आढावा.* Indian Journal of Labour Economics, ५५(२), ३१७—३३०.

९. निती आयोग. (२०२१). *एसडीजी इंडिया निर्देशांक व डॅशबोर्ड २०२०—२१.* भारत सरकार.

१०. निती आयोग. (२०२३). *एसडीजी इंडिया निर्देशांक व डॅशबोर्ड २०२३—२४.* भारत सरकार.

११. पिकेटी, टी. (२०१४). *एकविसाव्या शतकातील भांडवल.* Harvard University Press.

१२. रॉयटर्स. (२०२४). *भक्कम आर्थिक वाढ असूनही भारतातील असमानता वाढते, अहवालात नमूद.* Reuters.

१३. सेन, ए., व द्रेझे, जे. (१९९५). *भारत: आर्थिक विकास आणि सामाजिक संधी.* Oxford University Press.

१४. सेन, ए. (१९९९). *स्वातंत्र्य म्हणून विकास.* Oxford University Press.

१५. थोरात, एस. (२०१३). *भारतातील सामाजिक बहिष्करण आणि समावेशक धोरण.* Indian Journal of Human Development, ७ (०१), १-१९.

# लिंग असमानता आणि महिलांच्या हक्काचा अभ्यास

**प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख, आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली.

**सारांश:** मानवी समाजाचा अभ्यास करताना असे दिसून येते की, समाजाची रचना त्यातील व्यक्तींच्या भूमिका आणि सत्ता संबंधाची व्याप्ती अनेक घटकांनी निश्चित केली जाते. त्यामध्ये 'लिंग' हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लिंग म्हणजे फक्त जैविक भेद नाही, तर सांस्कृतिक, मानसिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक अपेक्षांनी घडलेली एक सखोल सामाजिक संरचना होय. समाजशास्त्राच्या अभ्यासात 'लिंग' हा विषय स्त्री आणि पुरुष या दोन लिंगावृत्त मर्यादित राहत नाही, तर त्यातून निर्माण होणारी असमानता रूढी सामाजिक भूमिका अधिकार आणि संधीचा समग्र विचार केला जातो.

**बीज शब्द:** लिंगभेद, असमानता, बालविवाह, हुंडा प्रथा, संविधानातील समान तत्व, महिलांची मूलभूत हक्क, आणि लिंग समानता

**प्रस्तावना:** 'लिंग' ही जैविक संकल्पना आहे. स्त्री व पुरुष यांच्यातील जन्मत: प्राप्त असलेल्या जैविक भेदाच्या आधारे ही संकल्पना ठरते. लिंगभेद ही संकल्पना जैविक नसून ती सामाजिक बांधणी होय. समाजाने, संस्कृतीने आणि ऐतिहासिक प्रक्रियांनी स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी ठरलेल्या विशिष्ट अपेक्षा भूमिका वर्तन धर्म कर्तव्य यावर लिंगभेद आधारित असतो. त्यामुळे एखादी व्यक्ती कशाप्रकारे वागेल, कपडे परिधान करेल, कोणती नोकरी करेल या गोष्टी समाजच ठरवत असतो.

भारत हा विविधतेने नटलेला देश असला, तरी लिंगाष्टित वर्तनाच्या पद्धती सर्वत्र प्रकर्षाने दिसून येतात. कुटुंब, धर्म, जात, संस्कृती, शिक्षण व आर्थिक संरचना या संस्था स्त्री-पुरुष वर्तनावर प्रभाव टाकत असतात. मुलगा जन्माला येणे हे सन्मानाचे समजले जाते, तर मुलगी जन्माला आल्यावर चिंता व्यक्त केली जाते. घरकाम स्त्रियांचे काम आणि बाहेरील जबाबदारी ही पुरुषांची भूमिका असा विभाजनाच्या दृष्टिकोन आढळून येतो. शिक्षण, रोजगार, वारसा संपत्ती, निर्णय प्रक्रिया या सर्व क्षेत्रात स्त्रियांना कमी स्थान दिले जातात. या पारंपरिक पद्धती समाजात पिढ्या-पिढ्यापासून होत आहेत आणि त्यामुळे लिंग असमानता कायम राहत आहे.

**स्त्री-पुरुष भूमिकांची ऐतिहासिक मुळे:** मानव मानव इतिहासाच्या आद्य टप्प्यात स्त्रिया व पुरुषांच्या भूमिकांचा आधार मुख्यत: त्यांच्या शारीरिक क्षमतेवर व जगण्यासाठी आवश्यक कार्यावर होता. काळ जसजसा पुढे सरकत गेला, तस तशी श्रम विभागणी अधिक कठोर झाली. आणि त्याला धार्मिक सामाजिक सांस्कृतिक आणि नैतिक अवचित त्याची जोड मिळाली. कृषी व्यवसाय आल्यावर पुरुषांचे बाहेरचे काम महत्त्वाचे समजले जाऊ लागले. स्त्रियांची भूमिका घर, संतती आणि पालन पोषणापूर्ती मर्यादित करण्यात आली. पितृसत्ताक व्यवस्था मजबूत होत गेली, आणि स्त्रियांच्या हक्कावर नियंत्रण वाढले. या ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे आजही भारतासह अनेक समाजात लिंगाधारीत भूमिकांचे अवशेष टिकून आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) लिंगभेदाच्या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अध्ययन करणे.

२) लिंग समानतेच्या संकल्पनेचे सखोल अभ्यास करणे.

३) महिलांच्या हक्काचा इतिहास व वर्तमान स्थितीचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निरीक्षण पद्धती, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, साप्ताहिके या स्त्रोताचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**लिंगभेदाचे स्वरूप:** समाजाच्या रचनेत सर्वात संवेदनशील बाब म्हणजे लिंग भेद होय. समाजातील स्त्री पुरुष संबंध संधीचे विभाजन, अधिकाऱ्यांचे नियोजन आणि सामाजिक स्थानाचे वाटप हे अनेकदा लिंगानुसार निश्चित केला जाते. त्यामुळे लिंगभेद हा फक्त लिंगभेद वैयक्तिक अनुभव नाही, तर सामाजिक संरचनेत खोलवर रुजलेला सामाजिक विषमतेचा हा एक प्रकार आहे.

**लिंग भेदाची व्याख्या:** लिंगभेद म्हणजे एखाद्या व्यक्तींच्या जैविक लिंगावर किंवा सामाजिक लिंगावर आधारित केलेल्या असमान व अन्यायकारक वागणूक देण्याचा एक प्रकार होय. लिंग असमानतेचा अर्थ सर्वप्रथम लिंग असमानतेचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. **'लिंग'** या मराठी शब्दासाठी Sex आणि Gender असे दोन पर्यायही शब्द आहेत. Sex हा शब्द जीवशास्त्रीय दृष्ट्या तर Gender हा शब्द सामाजिकरण्याच्या संदर्भात वापरतात. यामध्ये स्त्री आणि पुरुष यांच्यापैकी एका गटाला समाजात कमी संधी, अधिकार, स्वातंत्र्य आणि कमी संसाधने मिळत असते.

**भारतीय समाजातील लिंग असमानता:** भारतासारख्या सांस्कृतिक विविधिपूर्ण राष्ट्रात लिंग असमानता ही केवळ स्त्री-पुरुषांच्या भेदापुर्ती मर्यादित नाही, तर ती समाजाच्या इतिहास, परंपरा, अर्थव्यवस्था, धर्म, जात, लिंग, शिक्षण आणि राजकीय संरचना या सर्वांमध्ये खोलवर रुजलेली आहे. भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासात लिंग असमानता ही सर्वात गंभीर व सातत्याने चर्चेला जाणारी एक समस्या आहे. कारण ती समस्या केवळ स्त्रियांच्या विकासाला प्रतिबंध करते असे नाही, तर ती संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर परिणामकारक ठरते.

**भारतातील ऐतिहासिक लिंग असमानता:**

**वैदिक काळ:** प्रारंभी स्त्रियांची स्थिती तुलनेने चांगली होती. त्यांना शिक्षण, मालमत्ता हक्क व धार्मिक विधींमध्ये स्थान होते. परंतु कालांतराने पितृसत्ताक व्यवस्था मजबूत होत गेली.

**उत्तर वैदिक काळ:** या काळात स्त्रियांवरील निर्बंध वाढले. विवाह संस्था कठोर झाली. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या.

**मध्ययुगीन काळ:** मध्ययुगीन काळात पडदा पद्धती, सती प्रथा, स्त्री शिक्षणावर बंदी, बहुपतित्व इत्यादी सामाजिक समस्या वाढल्या.

**औपनिवेशिक काळ:** भारतात इंग्रजांच्या आगमनानंतर अनेक सुधारणा झाल्या, सती प्रथा बंदी, विधवा पुनर्विवाह कायदा तरीही लिंग असमानता अवशेष स्वरूपात टिकून राहिले.

**स्वातंत्र्योत्तर काळ:** भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय संविधानात समानतेची हमी देण्यात आली. तरीही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय कारणामुळे असमानता पूर्णपणे कमी झाली नाही. इतिहासातील असमानतेचा प्रभाव आजही भारतीय समाजाच्या मानसिकतेत आणि व्यवहारात दिसून येतो, ते पुढील प्रमाणे...

**मुलगा मुलगी भेदभाव:** भारतीय समाजातील मुलगा मुलगी भेदभाव अनेक स्तरावर दिसून येतो. आजही मुलगा कुलधर्म पुढे नेणारा असा समज आहे, कुटुंबाच्या वंशपरंपरेचा वारसा मुलांकडे जाण्याची परंपरा मृदाफळात मुलगा सांभाळ करतो. अशी अपेक्षा मुलांचा आर्थिक हातभार लागेल असा विश्वास असतो.

**बालविवाह:** ग्रामीण समाज आजही काही जाती-जमातीमध्ये कमी वयात मुलींचे लग्न लावण्याची प्रथा आहे. मुलगी जबाबदारी वाटणे, गरिबी, अज्ञान, सामाजिक दबाव यासारख्या कारणास्तव ही प्रथा काही समाजात जिवंत आहे. याचा परिणाम मुलीचे शिक्षण बंद, लवकर मातृत्व, पोषणातील कमतरता इत्यादी गोष्टी दिसून येतात.

**हुंडा प्रथा:** हुंडा प्रथा ही असमानतेला पोषक आहे. विवाहात मुलींच्या कुटुंबावर आर्थिक ताण लग्नानंतर होण्यासाठी स्त्रियांना शारीरिक व मानसिक छळ काही प्रकरणात हुंडाबळीची समस्या निर्माण झालेली दिसून येते.

**महिलांवरील हिंसा:** भारतातील महिलांवरील हिंशेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी लैंगिक छळ, सायबर हिंसा, तस्करी, ऑनर किलिंग ही हिंसा फक्त शारीरिक नाही, तर तिच्या सामाजिक आर्थिक आणि मानसिक परिणाम दिसून येतो,

**लिंग गुणोत्तर समस्या:** भारतामध्ये लिंग गुणोत्तर ही अत्यंत चिंताजनक बाब आहे .मुलगा मुलगी भेदभाव, स्त्रियांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष, गर्भपातामध्ये लिंग निवड यासारख्या कारणामुळे मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.

**महिलांच्या आरोग्यावरील असमानता:** भारतातील महिलांच्या आरोग्यात असमानता ही जन्मापासून दिसून येते. मुलींच्या पोषणात कमी प्राधान्य किशोरवयीन मुलींमध्ये रक्त शय मोठ्या प्रमाणात मातृत्व दर जास्त असते. यासोबत प्रसुती पूर्व व प्रसूतीनंतरच्या काळात अपुरी आरोग्यसेवा, मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष, कौटुंबिक हिंसेमुळे होणारे शारीरिक नुकसान व मानसिक नुकसान आरोग्य हे मूलभूत हक्क असतानाही अनेक स्त्रियांना दर्जेदार आरोग्य सेवा आजही मिळत नाही.

**लिंग समानता:** लिंग समानता म्हणजे, स्त्री पुरुष तृतीय लिंगी किंवा कोणत्याही लिंग ओळखीच्या व्यक्तींना समान संधी, अधिकार, स्वातंत्र्य, सन्मान आणि संसाधना पर्यंत समान प्रवेश मिळणे होय. यामध्ये शिक्षण, आरोग्य, कामाच्या संधीमध्ये समान हक्क, निर्णय प्रक्रियेत समान सहभाग, वेतन, संपत्ती, मालकी हक्कातील समता, घरगुती व सार्वजनिक क्षेत्रात भेदभाव मुक्त वातावरण, हिंसा, छळ, बळजबरी पासून संरक्षण, लिंग समानता ही जैविक न्याय, मानवी हक्क, लोकशाही मूल्य आणि विकास या सर्वांची मूलभूत गरज आहे.

**संविधानातील समान तत्व:** भारतीय संविधानाने लिंग समानतेचे मजबूत कायदेशीर आधार दिलेले आहेत. अनुच्छेद १४ नुसार कायद्यापुढे समानता प्रत्येक व्यक्तीला लिंगभेद न करता कायद्यापुढे समान वागणूक मिळेल. अनुच्छेद १५ नुसार धर्म, वंश, जात, जन्मस्थान यांच्या आधयारावर कोणत्याही कोणताही भेदभाव करता येणार नाही. महिलांच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदी करण्यास परवानगी. अनुच्छेद १६ नुसार केंद्र व राज्य सरकारी रोजगारात स्त्री-पुरुषांना समान संधी मिळावी, हे अनुच्छेद भारतातील लिंग समानतेला कायदेशीर पाया मजबूत करतात.

**शिक्षणाद्वारे समानता साध्य करणे**: शिक्षण हे लिंग समानातीचे सर्वात प्रभावी साधन मानले जातात. मुलींच्या शाळेत जाण्याचे प्रमाण वाढवणे, महिला साक्षरता उच्च शिक्षणात प्रवेश, पाठ्यपुस्तकातून रूढीवादी भूमिका बदलणे, मुलींसाठी सुरक्षितता, स्वच्छ शाळा, सॅनिटेशन सुविधा इत्यादी पूर्वीले जातात.

**रोजगार आणि समान वेतन:** महिलांसाठी रोजगार क्षेत्रात समान कामासाठी समान वेतन हे मूलभूत हक्क आहे. जगभरात Gender Wage Gap दिसून येते. कामाच्या ठिकाणी महिलांना अनुकूल धोरणे, कार्यालयीन सुरक्षितते साठी कायदा, Sexual Harassment Act २०१३ घरगुती व अदृश्य कामाचे आर्थिक मूल्यांकन, समान वेतनामुळे आर्थिक सक्षमीकरण आणि लिंग समता वाढते.

**राजकीय समानता ३३ टक्के महिलांसाठी आरक्षण:** पूर्वी राजकारणात महिलांना कमी सहभाग होता. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था ३३ टक्के आरक्षण २०२३ चा Women Reservation Bill ३३ टक्के आरक्षण लोकसभा, विधानसभासाठी नेतृत्व निर्णय प्रक्रियेत महिलांचा समावेश वाढविणे, महिला प्रतिनिधींना स्थानिक प्रशासनात स्वास्थ्य, पाणी, शिक्षण, आरोग्य, हिंसा, भ्रष्टाचार या प्रश्नावर चांगले परिणाम दर्शवितात.

**महिलांचे मूलभूत हक्क:** भारतीय संविधानाने महिलांना पुरुषाप्रमाणे सर्व हक्क दिलेले आहेत. अनुच्छेद १४ नुसार समानतेचा हक्क म्हणजे कायद्यापुढे समानता भेदभाव मुक्त वागणूक. अनुच्छेद १५ (३) नुसार महिलांसाठी विशेष तरतुदी करण्यास राज्यास परवानगी. अनुच्छेद २१ नुसार महिलांना सन्मानपूर्वक हिंसामुक्त सुरक्षित जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्याचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, व्यवसाय निवड निवड, व्यक्ती स्वातंत्र्य. अनुच्छेद २३-२४ नुसार तस्करी, जबरदस्ती, बालमजुरी पासून संरक्षण हे हक्क महिलांच्या मानवी अस्तित्वाचे आधारस्तंभ आहेत.

**विवाह मालमत्ता हक्क वारसा हक्क:** विवाह हक्क, स्वच्छेने विवाह करण्यास हक्क, विवाहात समान संमती, घरगुती हिंसा, संरक्षण, घटस्फोट, पुनर्विवाह चे हक्क मालमत्ता हक्क Hindu Succession [Amendment] Act. २००५ नुसार मुलगा मुलगी समान वारसदार, स्त्रियांना संपत्तीवरील हक्काने आर्थिक सक्षमीकरण, हिंदू मुस्लिम ख्रिश्चन व्यक्ति कायद्यानुसार वारसा नियम स्त्रीला वडील, पत्ती आणि मुलांच्या संपत्तीवर कायदेशीर अधिकार हे हक्क स्त्रियांच्या आर्थिक सुरक्षिततेचे मूलभूत आधार आहेत.

**राजकीय सहभागाचे हक्क पंचायत राज मधील महिलांचा सहभाग:** भारतीय संविधानाच्या ७३ व ७४ व्या Amendment नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के महिलांना आरक्षण महाराष्ट्र सह अनेक राज्यात ५० टक्के आरक्षण महिलांचा स्थानिक प्रशासनातील व्यापक सहभाग आरोग्य, आर्थिक, शिक्षण, पाणीपुरवठा, महिला सुरक्षा या क्षेत्रात प्रभावी निर्णय महिलांच्या नेतृत्वामुळे स्थानिक पातळीवर सामाजिक न्यायाची अंमलबजावणी वाढलेली आहे.

**कामकाजाच्या ठिकाणी सुरक्षितता**: कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाविरुद्ध अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे लिंग समानतेसाठी उपाय:

१. **शिक्षणाचा प्रसार करणे:** मुलींसाठी सर्व समावेशक शिक्षण शाळेत Gender Sensitization कार्यक्रम, डिजिटल शिक्षणाची उपलब्धा, उच्च शिक्षण व्यावसायिक शिक्षणात प्रोत्साहन दिले पाहिजे.
२. **महिलांची आर्थिक स्वावलंबन:** यासाठी स्वयंरोजगार सूक्ष्म कर्जे योजना उद्योजकता कौशल्य विकास योजना आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करणे.
३. **स्वयं सहायता गट:** ग्रामीण महिलांचे आर्थिक संघटन बचत कर्ज प्रणाली लघु उद्योगांची निर्मिती सामाजिक नेतृत्व व निर्णय क्षमतेचा विकास करण्यासाठी स्वयं सहायता गट निर्माण करणे.
४. **पंचायत राज मधील महिला नेतृत्व:** ३० टक्के ५० टक्के राजकीय आरक्षणामुळे महिलांची स्थानिक स्वराज्य संस्थेत वाढ ग्रामसभा निर्णय ग्राम विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग समाजातील रूढ मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे.
५. **जनजागृती कार्यक्रम करणे:** वाढत्या हुंडा प्रथेला आळा घालण्यासाठी समाजात जनजागृत करून बालविवाह रोखण्याकरिता शाळा, महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करणे, समाजातील अनिष्ट रूढी प्रथेला बंदी घालने अत्यंत आवश्यक आहे.

**निष्कर्ष**: लिंग असमानतेचा अभ्यास करताना, असे लक्षात येते की, लिंगभेद हा केवळ जैविक फरकावर आधारित नसून तो सामाजिक, ऐतिहासिक, आर्थिक व राजकीय रचनेवर रुजलेला सामाजिक घटक आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार आधुनिक समाज व्यवस्थेचा पाया मानला जात असला, तरी प्रत्यक्षात अजूनही लिंगाधारीत भेदभाव हिंसा असमानता आणि पितृसता विचारसरणी अनेक स्तरांवर कायम आहे. त्यामुळे लिंग भेद दूर करणे हा केवळ महिला चळवळ न राहता संपूर्ण समाजाची एकत्रित जबाबदारी ठरते.

**लिंगभेद दूर करण्यासाठी समाजाची भूमिका:** समाजाची मानसिकता, मूल्य व्यवस्था, रूढी, परंपरा या लिंग भेदाला दिशा देतात. त्यामुळे बदलाची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. कुटुंब, शाळा, माध्यमे, धार्मिक संस्था, राजकीय व्यवस्था आणि सामाजिक संघटना यांनी लिंग संवेदनशीलतेचे वातावरण निर्माण

केले, तर समाजात सकारात्मक बदल घडून येऊ शकतो. कुटुंबात मुला-मुलींना समान वागणूक देणे, शाळांमध्ये लिंग समानतेवर भर देणे, स्त्रियांनी सकारात्मकता अंगीकारणे, समाजाने स्त्रियांच्या निर्णय क्षमतेचा आदर करणे.

**समानतेचा मार्ग स्वीकारणे**: लिंग समतेचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण. शिक्षणामुळे महिलांमध्ये जागरूकता, स्वालंबन आणि आत्मविश्वास निर्माण होत असते. त्यानंतर जनजागृती करणे, समाजातील वाईट प्रथेला विरोध करणे. भविष्यात लिंग समान समाज उभा करण्यासाठी लिंगभेद निरपेक्ष शिक्षण पद्धती, महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर भर देणे, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात सहभाग वाढविणे, सायबर युगातील महिलांच्या हक्काचे संरक्षण करणे इ. बदल अपेक्षित आहे.

या सर्व प्रक्रियेमुळे भविष्यात स्त्री पुरुष समानतेवर आधारित न्याय आणि प्रगतिशील समाज व्यवस्था निर्माण होऊ शकते. लिंगभेदाचा शेवट हा एका दिवसात होणारा बदल नाही, परंतु सततच्या प्रयत्नाने आणि शिक्षणाने या सोबतच कायद्याच्या फळावर तो बदल निश्चितपणे साध्य करता येते.

**संदर्भ ग्रंथ**


१. कऱ्हाडे बी -एम., भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.
२. बाबा एस., भारतीय समाज शास्त्र, सचिन प्रकाशन पुणे.
३. आगलावे प्रदीप, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
४. तोष्णीवाल सुभाष, भारतीय समाज समस्या आणि प्रश्न, विश्व पब्लिशर्स आणि डिस्ट्रीब्यूटर्स नागपूर.
५. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
६. बोधनकर सुधीर, संशोधन पद्धती श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
७. देसाई नयन, लिंग आणि समाज, हिमालय पब्लिशर्स हाऊस मुंबई .
८. ओक सैलाजा, स्त्री अभ्यास सिद्धांत आणि व्यवहार प्रसाद प्रकाशन, पुणे.
९. काबरा एस., Women Studies in India, Orient Blackmans.
१०. आपटे ज. श., भारतातील महिला विकास वाटचाल, डायमंड प्रकाशन पुणे.
११. मरजे बी. पी., लिंगभाव शाळा समाज, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.

# अनुसूचित जातींचे उप-वर्गीकरण: संवैधानिक विश्लेषण

**प्रा. कांबळे संजयकुमार** स्त्री आणि लिंगभाव विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**सारांश:** या पेपरमध्ये भारतातील अनुसूचित जाती (SC) मधील सकारात्मक कृती, आरक्षण आणि उप-वर्गीकरणाच्या वादग्रस्त प्रस्तावाभोवती कायदेशीर, राजकीय आणि समाजशास्त्रीय युक्तिवादांचे संश्लेषण केले आहे. माजी CJI बी.आर. गवई यांच्या अलीकडील सार्वजनिक टिप्पण्यांचा प्रवेश बिंदू म्हणून वापर करून, पेपरमध्ये घटनात्मक वादविवाद, न्यायालयीन उदाहरणे, क्रिमी लेयरची संकल्पना आणि दलित समुदायांमधील अंतर्गत स्तरीकरणाचे सामाजिक-राजकीय परिणाम यांचे विश्लेषण केले आहे. ते सापेक्ष वंचितता, वितरणात्मक न्याय आणि कोटा-आधारित प्रणालींच्या मर्यादा यासारख्या सैद्धांतिक दृष्टिकोनांचे देखील परीक्षण करते.भारतातील आरक्षण हे संविधानाने संरक्षित, कोटा-आधारित सकारात्मक कृती मॉडेल आहे जे प्रामुख्याने जाती-आधारित ऐतिहासिक भेदभावावर लक्षित आहे. प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी डिझाइन केलेले असले तरी, कार्यक्षमता, निष्पक्षता आणि अंतर्गत असमानतेबद्दल वादविवाद कायम आहेत. न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्या डिसेंबर २०२५ च्या व्याख्यानात सकारात्मक भेदभाव, क्रिमी-लेयर बहिष्कार आणि अनुसूचित जाती गटांना समानतेने लाभ वितरित करण्यासाठी उप-वर्गीकरण आवश्यक आहे का यावरील चर्चा पुन्हा सुरू झाल्या.

**मुख्य संकल्पना:** सघन समानता विरुद्ध औपचारिक समानता,संवैधानिक विचारधारा,मलाइ लेयर, दलित, संघराज्यवाद आणि संवैधानिक नैतिकता, मतभेद असलेले न्यायशास्त्र.

**प्रस्तावना**: सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने ई.व्ही. चिनैया विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२००४) च्या खटल्यातील पाच न्यायाधीशांच्या निर्णयाला ६:१ बहुमताने रद्दबातल ठरवले आणि अनुसूचित जातीय उप-वर्गीकरणाची वैधता कायम ठेवली. या प्रकरणात सहा मते दिली गेली, ज्यामध्ये मुख्य न्यायाधीश चंद्रचूड आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा, बी.आर. गवई, पंकज मिथल, विक्रम नाथ आणि एस.सी. शर्मा यांचा समावेश होता, तर न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी असहमती व्यक्त केली. बहुसंख्य लोकांच्या मते, कलम ३४१ अंतर्गत अनुसूचित जातींचा वर्ग एकसंध गट नाही, कारण या जातींना भेदभावाचा सामना करावा लागतो. तसेच, उप-वर्गीकरण तयार केल्याने राष्ट्रपतींना अनुसूचित जातींची यादी अधिसूचित करण्याची शक्ती नाहीशी होत नाही, असा विश्वास व्यक्त केला गेला. मुख्य मुद्द्यात राखीव श्रेणींमध्ये उप-वर्गीकरणाची आवश्यकता, अनुसूचित जातींचा एकसंध गट असणे याबद्दल चर्चा झाली.

सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी असं ठरवलं की अनुसूचित जातींची राष्ट्रपतींची यादी वास्तविकताशी बंधनकारक नाही. त्यांनी संविधानातील अंतर्गत कलमांच्या आधारावर उप-वर्गीकरणाची आवश्यकता आणि अनुशासनाबाबत प्रश्न उपस्थित केले. प्रतिवादींनी कलम ३४१ संदर्भात केलेल्या युक्तिवादाची पुष्टी केली. या प्रकरणातील प्रमुख प्रश्नांचा सारांश खालीलप्रमाणे दिला:

१) संविधानाच्या कलम १४, १५ आणि १६ अंतर्गत राखीव वर्गाचे उप-वर्गीकरण अनुज्ञेय आहे का?
२) अनुसूचित जाती एकसंध आहे की विषम गट आहे?
३) कलम ३४१ एका गृहीतक काल्पनिक कथांचा एकसंध वर्ग निर्माण करते का आणि
४) उप-वर्गीकरणाच्या व्याप्तीवर मर्यादा आहेत का?

मुख्य सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी असा युक्तिवाद केला की संविधानाच्या कलम १४ मध्ये अशा वर्गाचे उप-वर्गीकरण करण्याची तरतूद आहे जी "कायद्याच्या उद्देशाने समानरित्या स्थित नाही". तत्कालीन मा.सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी असेही म्हटले की अनुसूचित जाती जातीच्या श्रेणी एकसंध गट नाहीत कारण त्या प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रमाणात मागासलेपणाचा सामना करावा लागला.

भारतीय संविधानाने अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाच्या तरतुदी केल्या आहेत, ज्याचा उद्देश ऐतिहासिक वंचितता दूर करणे आहे. तथापि, अनुसूचित जातीमध्ये अंतर्गत विषमता असल्यामुळे काही गट अद्याप आरक्षण लाभांपासून वंचित आहेत. E.V. Chinnaiah v. State of Andhra Pradesh (२००५) आणि Punjab v. Davinder Singh (२०२४) यासारख्या निर्णयांमध्ये उप-वर्गीकरण आणि creamy layer यांचा घटनात्मक व सैद्धांतिक आढावा घेण्यात आले आहे. अनुच्छेद ३४१ च्या आधारावर अनुसूचित जातींची ओळख व संरचना तपासण्यात आली असून, यामुळे होणारा de facto dilution आणि दलित राजकीय एकात्मतेवरील प्रभावांची चर्चा करण्यात आली आहे. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांचा dissent आधुनिक Ambedkarite constitutionalism चे प्रतिनिधित्व करतो, जिथे creamy layer neolibral governance चा भाग मानली गेली आहे. Indra Sawhney v. Union of

India (१९९२) मध्ये ओबीसींसाठी उप-वर्गीकरण मान्य करण्यात आले, परंतु अनुसूचित जातींना वगळण्यात आले. Punjab v. Davinder Singh निर्णयाने उप-वर्गीकरणास मान्यता दिली, परंतु याने दलित राजकीय एकात्मतेसाठी धोका निर्माण केला आहे.

**आरक्षणामधील वर्गीकरणाबाबत तीन दृष्टिकोन आहेत:** सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमाती आरक्षणातील अंतर्गत विभागणीला कायदेशीर मान्यता दिल्यानंतर विविध दृष्टिकोन पुन्हा चर्चेत आले आहेत. यामध्ये तीन मुख्य दृष्टिकोन आहेत. पहिला, निरीक्षकांचा, ज्यांना या निर्माण झालेल्या वादाची पर्वा नाही. ते या समाजातील वादाकडे केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून पाहतात. दुसरा दृष्टिकोन प्रगत दलित समाजाचा आहे, जे या निर्णयामुळे चिंतेत आहेत. त्यांच्या कोट्याचे काय होणार, हे त्यांना विचारले जात नाही; त्यांचेच बांधव जातीय व्यवस्थेचे बळी असूनही, ते आपली स्वतःची स्थिती टिकवून ठेवण्याबद्दल चिंतित आहेत. तिसरा दृष्टिकोन महादलितांचा आहे, जे सर्वात तळाशी आहेत आणि ज्यांना अद्याप आरक्षणाचे फायदे मिळालेले नाहीत. या समाजाला गेल्या ७५ वर्षांत आरक्षणाचा फायदा झालेला नाही आणि त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांच्याकडे नेते नाहीत. महादलित समाजाच्या चिंता आणि दृष्टिकोनांप्रति संवेदनशील असलेल्या चर्चा पुढे येत आहेत. त्यामुळे, आरक्षणातील वर्गीकरणाची प्रक्रिया त्यांचा विश्वास आणि आवाज निर्माण करण्यावर केंद्रित असणे आवश्यक आहे. या चर्चेत महादलित समाज अजूनही दुर्लक्षित आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सदस्यांच्या उप-वर्गीकरणावरील चर्चा भारतातील सामाजिक न्यायामागील अनेक घटकांवर लक्ष केंद्रित करते. भारतात जातीच्या आधारावर सामाजिक आणि आर्थिक विषमतेचा इतिहास आहे. संविधानाने अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्यासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत, परंतु त्यांच्या अंमलबजावणीच्या परिणामांवर विविध स्तरांवरून चर्चा होत आहे. २०२४-२५ मध्ये उप-वर्गीकरणावर एक वाद सुरू झाला आहे, ज्यामुळे काही SC गट प्रगत झाले आहेत, तर काही मागासलेले राहिले आहेत. यामुळे समाजात समानता आणि एकात्मतेचा मुद्दा उपस्थित होत आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना शाहूजी महाराज आणि फुले यांच्या कार्याशी संबंधित आहे, ज्यांनी मागासलेल्या वर्गासाठी आरक्षणाची गरज स्पष्ट केली. डॉ. आंबेडकरांची विचारधाराही महत्त्वाची आहे. संविधानातील कलमे SC-ST चे हक्क संरक्षित करतात. न्यायालयाच्या निर्णयांनी या मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले आहे, तर १९९२ च्या इंदिरा साहनी प्रकरणात क्रीमी लेयर सिद्धांताला मान्यता देण्यात आली. उप-वर्गीकरणाच्या बाजूने काही युक्तिवाद आहेत, परंतु यामुळे जातीय एकतेला धक्का बसेल अशी चिंता व्यक्त केली जात आहे. भारतातील दलित समाजाला आर्थिक दारिद्य, सांस्कृतिक दडपशाही आणि विविध समस्यांना सामोरे जावे लागते. न्यायालयीन दृष्टिकोनांच्या महत्त्वावरही चर्चा होत आहे. माहितीच्या अभावामुळे उप-वर्गीकरणाचे प्रश्न अधिक तीव्र झाले आहेत. दलितांच्या प्रगतीसाठी अंतर्गत संघर्ष कमी करून कायद्यांचा वापर करणे आवश्यक आहे. जातीयवादी सरकारांकडून होणाऱ्या भेदभावाचा सामना करणे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात, अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणाच्या मुद्द्याने भारतीय सामाजिक न्यायाला एक नवीन दिशा दिली आहे, जिथे आता हा केवळ संख्येचा प्रश्न नसून न्यायाचा प्रश्न आहे. सामाजिक न्यायाचे अंतिम ध्येय मानवी प्रतिष्ठा आणि नैतिक समानता प्राप्त करणे हे आहे, ज्यासाठी केवळ औपचारिक समानता पुरेशी नाही. जात, धर्म, वंश यांच्या प्रयत्नांना वास्तविक समानतेच्या अधीन राहून कुशलतेने एकत्रित केले पाहिजे. अनुसूचित जाती (SC) आरक्षणाचा उद्देश ऐतिहासिक अन्याय, सामाजिक बहिष्कार आणि संरचनात्मक विषमता दूर करणे हा आहे. संविधानातील अनुच्छेद १५(४), १६(४) आणि विशेषतः अनुच्छेद ३४१ व ३४२ या सकारात्मक कृतीसाठी ठोस आधार देतात. तथापि, अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत उप-वर्गीकरण (sub-classification) करता येते का, हा प्रश्न दीर्घकाळ वादग्रस्त राहिला आहे. हा लेख *ई.व्ही. चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२००५)* आणि *पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग (२०२४)* या निर्णायक प्रकरणांच्या प्रकाशात, विशेषतः मा. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांच्या मतभेदात्मक भूमिकेचे संवैधानिक विश्लेषण सादर करतो.

तेलंगणा ने अनुसूचित जाती (SC) उप-वर्गीकरण लागू करणारे पहिले राज्य होण्याचा मान मिळवला आहे, ज्यामध्ये SC चे तीन गट - गट I, II आणि III - म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. हे उप-वर्गीकरण आरक्षणाच्या लाभांचे न्याय्य वितरण साधणे आणि कमी प्रतिनिधित्व असलेल्या दलित समुदायांच्या विशेष गरजा पूर्ण करणे यासाठी महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणांमध्ये, जसे की ई.व्ही. चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य आणि जर्नेल सिंग विरुद्ध लच्छमी नारायण गुप्ता, आरक्षणाच्या तर्कसंस्थेबाबत विविध निर्णय दिले आहेत. न्यायालयाने असे म्हटले की अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण आवश्यक आहे कारण काही गटांना लाभांचा विषम वाटा मिळतो आणि शिक्षण,

नोकऱ्या, व राजकीय प्रतिनिधित्वात असमानता आहे. भारतीय संविधानाच्या कलम १४, १५ आणि १६ नुसार उप-वर्गीकरणाला मान्यता आहे, परंतु ते एकसंध नसल्यास ही प्रक्रिया नियमांच्या अनुषंगी असावी लागेल. हे उप-वर्गीकरण SC समुदायामध्ये असमानता दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**२. संवैधानिक चौकट: अनुच्छेद ३४१ व ३४२:** अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणाचा मुद्दा संवैधानिक चर्चेत महत्त्वाचा आहे. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांच्या मतानुसार, उप-वर्गीकरणावर जनहिताचे विशेष लक्ष आहे. ई.व्ही. चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२००५) आणि पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग (२०२४) या प्रकरणांत घटनात्मक वैधतेवर विचार केला जातो. अनुसूचित जातींचे आरक्षण संविधानातील अनुच्छेद १५(४), १६(४), ३४१ व ३४२ च्या आधारावर आहे, पण उप-वर्गीकरणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्रिवेदी यांच्या मते, 'अनुसूचित जाती' म्हणून अधिसूचित झाल्यावर उप-वर्गीकरणाचा अधिकार राज्यांना नाही. इंद्रा साहनी (१९९२) प्रकरणाने ओबीसींमध्ये उप-वर्गीकरणाला मान्यता दिली, परंतु अनुसूचित जातींना वेगळी स्थान दिली. चिन्नय्या प्रकरणात, कोर्टाने सिद्ध केले की अनुसूचित जाती एकसंध वर्ग आहेत. दविंदर सिंग प्रकरणात, बहुमताने उप-वर्गीकरणास मान्यता दिली, 'वस्तुनिष्ठ समता' यावर जोर दिला. त्रिवेदी यांचे मत विविधपणाला महत्त्व देत सामाजिक न्याय संरक्षण करते. उप-वर्गीकरणामुळे सामाजिक विखंडन होऊ शकते, त्यामुळे घटनादूरूस्ती किंवा संसदीय कायदा आवश्यक आहे. दविंदर सिंग निर्णयाने उप-वर्गीकरणाची मान्यता दिली, ज्यामुळे सामाजिक न्यायाची चर्चा महत्त्वाची बनते. एकत्रितपणे, चिन्नय्या आणि दविंदर सिंग प्रकरणे अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणाच्या संवैधानिक विवादांचे प्रकाशन करतात. **१.** कलम ३४१ राष्ट्रपतींना SC ची यादी जारी करण्याचा अधिकार देते, परंतु न्यायाधिशांच्या मते उप-वर्गीकरण संबंधित विवाद आहे. **२.** कलम १४, १५, १६ अंतर्गत उप-वर्गीकरणाचा मुद्दा समानतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करत नाही असे ठरवले. **३.** कलम १६(४) मागास वर्गासाठी विशेष तरतुदीची परवानगी देते, जे उप-वर्गीकरणासाठी आधारभूत आहे. **४.** ई. व्ही. चिनैया केसच्या पुनरावलोकनात सामाजिक वास्तवाचा विचार करण्यात आला. **५.** नवीन बेंचने स्पष्ट केले की राज्यांना उप-वर्गीकरण करण्याचे अधिकार आहेत, ज्याला डेटा आवश्यक आहे. **६.** उद्देश: SC/ST मधील असमानता दूर करणे आहे, आणि वंचितांना न्याय देणे प्राथमिक आहे.

अनुच्छेद ३४१ व ३४२ नुसार अनुसूचित जाती/जमातींची ओळख निश्चित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे आणि त्यात कोणताही बदल केवळ संसदच करू शकते. या तरतुदींचा हेतू म्हणजे देशभर एकसारखी ओळख, प्रशासकीय/राजकीय मनमानीपासून संरक्षण आणि या समुदायांच्या विशेष दर्जाचे संवर्धन. एकदा राष्ट्रपतींच्या अधिसूचनेद्वारे 'अनुसूचित जाती' निश्चित झाल्यानंतर राज्यांना त्यांचे पुनर्विभाजन किंवा उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार नाही, असा मजकूराधिष्ठित अर्थ मा. न्यायमूर्ती त्रिवेदी अधोरेखित करतात. सरन्यायाधीशांनी (न्यायाधीश मनोज मिश्रा यांच्या वतीने देखील) त्यांच्या निकालात यावर भर दिला की "प्रतिनिधित्वाची अपुरीता" हे मागासलेपणाचा आधार म्हणून दाखविण्याची जबाबदारी पूर्णपणे राज्याची आहे. या आवश्यकतानुसार राज्यांनी विशिष्ट समुदायांना विविध क्षेत्रांमध्ये कमी प्रतिनिधित्व दिले जात आहे हे दर्शविणारे ठोस पुरावे सादर करावेत, ज्यामुळे राखीव श्रेणींमध्ये कोणत्याही प्रस्तावित उप-वर्गीकरणाचे समर्थन करता येईल.

**३. न्यायिक पार्श्वभूमी: इंद्रा साहनी ते ई. व्ही. चिन्नय्या:** अनुसूचित जाती (SC) उप-करण वर्गाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, राज्यांना अनुसूचित जातीचा लाभ अधिक वं उप-गट अनिवार्यपणे SC मध्ये उप-वर्गीकरण करण्याची परवानगी आहे, कारण SC हा एकसंध गट नसून विविध स्तरांची मागासपणा आहे; याला १४, १५ आणि १६ समान तत्त्वे तत्त्वे कायद्याच्या आधारावर जात नाहीत, मात्र हे ठोस डेटावरपालिकेच्या पुनर्विलोकन अधिकार अधिकार, असे न्यायिक संवैधानिक विश्लेषण आहे. *इंद्रा साहनी विरुद्ध भारत संघ (१९९२)* प्रकरणात ओबीसींमध्ये उप-वर्गीकरण व 'क्रीमी लेयर' संकल्पनेला मान्यता देण्यात आली; मात्र अनुसूचित जाती/जमातींना त्यांच्या स्वतंत्र संवैधानिक दर्जामुळे स्पष्टपणे वेगळे ठेवण्यात आले.*ई.व्ही. चिन्नय्या (२००५)* मध्ये घटनापीठाने ठामपणे ठरवले की अनुसूचित जाती हा अनुच्छेद ३४१ अंतर्गत एकसंध वर्ग आहे आणि राज्यांना आरक्षणाच्या उद्देशानेही अंतर्गत उप-वर्गीकरण करता येत नाही. असे उप-वर्गीकरण अनुच्छेद १४ (समानता) चे उल्लंघन ठरते.

**४. पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग (२०२४): बहुमताचा निर्णय:** सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने ६:१ बहुमताने *चिन्नय्या* निर्णय रद्द करून अनुसूचित जाती/जमातींमध्ये उप-वर्गीकरणाला मान्यता दिली. बहुमताने 'वस्तुनिष्ठ समानता' (substantive equality) या तत्त्वावर भर देत, अनुभवजन्य व परिमाणात्मक डेटाच्या आधारे कमी प्रतिनिधित्व असलेल्या उप-गटांना प्राधान्य देणे घटनासंगत ठरवले. तसेच, क्रीमी लेयरसदृश निकष लागू करण्याची शक्यता उघडी ठेवली.

**१. मुख्य संवैधानिक आणि विश्लेषण: उप-वर्गीकरणासाठीचे युक्तिवाद**

१) गहन असमानता दूर करणे: समर्थक (जसे की आंध्र प्रदेश/तेलंगणातील मादिगा) असा युक्तिवाद करतात की अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींच्या यादीतील काही गट अधिक वंचित आहेत आणि त्यांना सामान्य कोट्याचा सर्वात कमी फायदा होतो, त्यामुळे अंतर्गत वाटपाची आवश्यकता आहे.

२) वस्तुनिष्ठ समानता: केवळ विद्यमान फायदे असलेल्यांपर्यंतच नव्हे, तर सर्वात मागासलेल्यांपर्यंतही संधी पोहोचतील याची खात्री करून वस्तुनिष्ठ समानता (परिणामांची समानता) प्राप्त करण्यासाठी हे आवश्यक मानले जाते.

३) सक्षमीकरण: या गटांमधील खऱ्या अर्थाने उपेक्षित घटकांना सक्षम करणे, चांगले प्रतिनिधित्व आणि संसाधनांपर्यंत पोहोच सुनिश्चित करणे हे उद्दिष्ट आहे. कायदेशीर आणि घटनात्मक संदर्भ

४) सर्वोच्च न्यायालय सामान्यतः राज्यांना उप-वर्गीकरणासाठी अनुभवजन्य डेटा आणि भक्कम पुरावे सादर करण्यास सांगते, जे मागासलेपणाच्या आणि अल्प-प्रतिनिधित्वाच्या विविध पातळ्या सिद्ध करतात आणि ते न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधीन असते.

चार बहुमत असलेल्या न्यायाधीशांनी अनुसूचित जाती आणि जमातींमधील "क्रिमी लेयर" ला आरक्षणाच्या लाभांपासून वगळण्यास पाठिंबा दिला, जरी हा न्यायालयासमोरील मध्यवर्ती मुद्दा नसला तरी. न्यायमूर्ती गवई आणि विक्रम नाथ यांनी या वगळण्याचे स्पष्टपणे समर्थन केले. न्यायमूर्ती मिथल यांनी असे सुचवले की आरक्षण एका पिढीपुरते मर्यादित असावे, या मताचे न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनीही समर्थन केले.

थोडक्यात, हा वाद ऐतिहासिकदृष्ट्या वंचित गटांसाठी गट न्यायाच्या तत्त्वाला आव्हान देतो, कारण यामुळे गट विखंडित होतील आणि विषमतेचे नवीन प्रकार निर्माण होतील अशी भीती आहे. 'धोकादायक प्रवृत्ती' हे विशेषण उपाययोजना विखंडित होण्याचा आणि अन्यायाचा नवीन स्रोत बनण्याचा धोका अधोरेखित करते.

**६. मुख्य टीका आणि मुद्दे:** 'आरक्षणामध्ये आरक्षण' (उप-वर्गीकरण) यावर होणारी टीका हे एक चुकीचे तत्त्व आणि धोकादायक प्रवृत्ती आहे. ही चिंता यातून उद्भवते की मागासलेल्या वर्गांचे विभाजन होते, त्या गटांमधील आधीच सधन असलेल्या लोकांना फायदा होतो, गुणवत्तेकडे दुर्लक्ष केले जाते, असंतोष वाढतो आणि त्याचे राजकीय हेतूने शोषण केले जाते. तर, समर्थक असा युक्तिवाद करतात की उपेक्षित समुदायांमधील (जसे की मादिगा विरुद्ध माला) खोलवर रुजलेल्या विषमतेवर उपाययोजना करणे आणि केवळ औपचारिक प्रवेशाऐवजी वास्तविक समानता सुनिश्चित करणे आवश्यक आहे, ज्यामुळे योग्य अंमलबजावणी आणि खऱ्या गरजूंपर्यंत लाभ पोहोचवण्यावर कायदेशीर आणि सामाजिक वादविवाद सुरू होतात.

**६.१ मुख्य टीका आणि मुद्दे:**

१) 'क्रिमी लेयर'चा फायदा: समीक्षकांचा असा युक्तिवाद आहे की उप-वर्गीकरणामुळे SC/ST/OBC प्रवर्गांमधील प्रभावी गटांना अधिक फायदे मिळतात, ज्यामुळे सर्वात वंचित लोक मागे पडतात, जसे की OBC मधील 'क्रिमी लेयर'च्या वादात घडले.

२) गुणवत्ता आणि एकतेचे कमकुवत होणे: यामुळे वैयक्तिक गुणवत्तेपेक्षा गट ओळखीला प्राधान्य दिले जाऊ शकते, अंतर्गत स्पर्धा आणि असंतोष निर्माण होऊ शकतो आणि व्यापक मागासलेल्या वर्गांमध्ये राजकीय फूट पडू शकते.

३) राजकीय हेराफेरी: काहींच्या मते, उप-आरक्षणाची मागणी ही पक्षांकडून उन्नतीसाठी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांऐवजी मते मिळवण्याचे एक राजकीय साधन म्हणून पाहिली जाते.

४) गुंतागुंत आणि अकार्यक्षमता: हे आधीच गुंतागुंतीच्या असलेल्या प्रणालीमध्ये गुंतागुंतीचे थर वाढवते, ज्यामुळे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे कठीण होते आणि प्रशासकीय आव्हानांना सामोरे जावे लागते.

५) जातिव्यवस्थेला बळकटी: विरोधाभासाने, जातीवर उपाययोजना करण्याचा हेतू असूनही, उप-आरक्षणाद्वारे होणारे खोलवरचे स्तरीकरण जातीय चेतनेला अधिक बळकटी देऊ शकते, असे काही समीक्षक म्हणतात.

**६.२ मा. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांचे मतभेद:** मा. न्यायमूर्ती त्रिवेदी यांचा मतभेद हा संविधानाच्या मजकूराशी निष्ठावान आणि न्यायिक शिस्तीवर आधारित आहे. त्यांच्या मते:

- अनुच्छेद ३४१/३४२ अंतर्गत राष्ट्रपतींच्या यादीत अप्रत्यक्ष बदल घडविणारे कोणतेही राज्यस्तरीय उप-वर्गीकरण असंवैधानिक आहे.
- *इंद्रा साहनी* मधील तत्त्वे अनुसूचित जाती/जमातींना लागू होत नाहीत; बहुमताने त्याचा विपर्यास केला आहे.
- 'क्रीमी लेयर' ही ओळखीची नव्हे तर समानतेची चाचणी असली, तरी ती अनुसूचित जातींवर लागू करणे संविधानाच्या रचनेशी विसंगत आहे.
- न्यायालयीन पूर्वनिर्णय (stare decisis) आणि संस्थात्मक शिस्त धोक्यात येते, जेव्हा घटनादुरुस्तीशिवाय आधीचे घटनापीठीय निर्णय रद्द केले जातात.

**बेला त्रिवेदी यांचा निष्कर्ष:** बेला त्रिवेदी यांचा निष्कर्ष की 'अनुसूचित जात' उप-वर्गीकडून अधिकार राज्यांना नसल्याने संविधानिक समानता व न्यायालयीन शिस्त उल्लंघन होईल. उच्च न्यायालयाने अनुसूचित जात एकसंध गट म्हणून मान्य केले आणि उप-वर्गीकरणाचा अधिकार राज्यांना नाकारला. पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग प्रकरणात आरक्षणात प्राधान्य देणाऱ्या कायद्याचे पुनरावलोकन करून, त्रिवेदी यांनी न्यायालयीन शिस्तीच्या विरोधात विचारला. अनुच्छेद ३४१ प्रमाणे अनुसूचित जात ओळखण्याचा अधिकार फक्त राष्ट्रपतीला आहे. संविधानानुसार उप-वर्गीकरण असंविधानिक आहे. चिन्नय्या वि. आंध्र प्रदेश खटल्यामध्ये राज्यांच्या उप-वर्गीकरणाच्या अधिकाराला नकार दिला. इंद्रा साहनी प्रकरणासाठी ओबीसींमध्ये उप-वर्गीकरण मान्य केले गेले तरी त्रिवेदी यांचे मत अनुसूचित जातांसाठी भिन्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने ६:१ बहुमताने उप-वर्गीकरणास मान्यता दिली, जे वंचित गटांचे प्रतिनिधित्व सुरक्षित करेल. "क्रीमी लेयर" संकल्पना स्वीकारली, ज्यामुळे राज्यांना आरक्षणाचे फायदे सीमित करणे शक्य झाले. सध्या, अनुसूचित जात आणि जमातींच्या उप-वर्गीकरणावर भारतातील दीर्घकाळ चर्चा सुरू आहे. न्यायालयाने उप-वर्गीकरणाच्या अधिकाराला मान्यता दिली आहे, जे राज्यांना आरक्षण योजना तयार करण्यास अनुमती देते. तथापि, त्रिवेदी यांचे विरोध भेद निर्माण होईल असे चिंतन करतात. त्रिवेदी यांचे मत की उप-वर्गीकरण अनुच्छेद ३४१ व ३४२ यांच्या संरक्षणात्मक चौकटीला धोका निर्माण करतो, महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय करण्याच्या तारिखेवर न्यायालये राज्यांच्या कृतींची काटेकोरपणे तपासणी करावी लागेल, जे समाजातील समता साधण्यामध्ये महत्त्वाचे ठरते.

**'सापेक्ष वंचितता' आणि 'वितरणात्मक न्याया'च्या सिद्धांताच्या मर्यादा:** आरक्षणाच्या मुद्द्यावर विचार,ध्येय, विचारधारा, नेतृत्व आणि संघटना यांचे महत्त्व आहे. दलितांची वंचितता सामाजिक गतिशीलता आणि संदर्भ गट यांच्या मानाने बहुआयामी आहे. उच्च जातींपेक्षा कमी भौतिक सुखसोयीमुळे दलितांमध्ये सापेक्ष वंचिततेची भावना निर्माण झाली आहे. काही दलित जातींमध्ये ही भावना अधिक तीव्र आहे. तथापि, मध्यमवर्गीय दलितांचे उदय होत असल्याने समान वंचिततेचा अनुभव साक्षात्कारित होतो.

सरंजामशाही व्यवस्थेमुळे दलितांना सामाजिक मर्यादांचा सामना करावा लागतो, त्यामुळे आत्मजागृती वाढली आहे. बौद्ध धर्म स्वीकारणीसाठी प्रयत्न असून सुद्धा त्यांच्या सामाजिक दर्जात सुधारणा होत नाही. मागासलेपणामुळे समाजाने निर्माण केलेले गट संदर्भ गटाचे ज्ञान मिळाल्यावर वैयक्तिक विकासात यशस्वी होत आहेत. महाराष्ट्रातील मांग आणि बौद्ध समुदायात शिक्षित मध्यमवर्गाने उच्च जातींशी तुलना सुरू केली आहे, ज्यामुळे द्वेषाची भावना आणि संघटनात्मक प्रयत्न वाढले आहेत. सामाजिक गतिशीलता आणि भेदाभेद यांवर विचार करणे आवश्यक आहे. दलित राजकारणाने सत्ता संरचनेमध्ये कमी स्थान दिले आहे. वितरणात्मक न्यायाच्या दृष्टीने, भौतिक संसाधनांचे वितरण महत्त्वाचे असले तरी आत्मसन्मानाचे वितरणही आवश्यक आहे. शाहू महाराजांच्या कामांद्वारे दारिद्र्य दूर करण्याचे उदाहरण दिले जाते. नैतिकता आणि आत्म-सन्मान यांची महत्त्वता यशस्वीतेसाठी आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या संदर्भात आरक्षणाची उपवर्गीकरणे विवाद निर्माण करतात. भारतातील जात, धर्म, आणि समाजाच्या भेदांमध्ये निष्कर्ष प्रकट होणे कठीण आहे. त्यामुळे, दारिद्र्यविरोधी धोरणे जात, धर्म आणि लिंगाच्या आधारावर तयार केली पाहिजेत जेणेकरून दलित व आदिवासींना योग्य दिशा मिळेल.

७) **दलितांच्या प्रगतीसाठी खालीलप्रमाणे काही उपाययोजना कराव्या लागतील.**

१) अनुसूचित जातींमधील अंतर्गत संघर्ष कमी करून सामाजिक विकास घडवून आणणे आवश्यक आहे.

२) दारिद्र्य आणि विकासाचे मापन करून आरक्षणाचे फायदे अधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आणि अनुसूचित जातींच्या विकासासाठी उपाययोजना सुचवणे आवश्यक आहे.

३) आरक्षणासंबंधीच्या कायद्यांचा विचार करताना, सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून कायद्यांकडे पाहण्याऐवजी, सामाजिक बदलाचे साधन म्हणून कायदे करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात जात संपवण्याची कल्पना आता कालबाह्य झाली असून, वर्तमानात जातींना कायदेशीर आणि घटनात्मक दर्जा देण्याचे राजकारण सुरू आहे. गेल्या १०-२० वर्षांमध्ये महाराष्ट्रातील आरक्षणाच्या संदर्भात मराठा आणि ओबीसी यांच्यात संघर्ष सुरु आहे, ज्यामुळे सामाजिक जीवनावर नकारात्मक परिणाम होत आहेत. जातींच्या वर्ग व उपजातांमध्ये असलेला भेद समजून घ्यावा लागतो, कारण भारतीय निवडणूक राजकारण जातीय-धार्मिक समीकरणांवर आधारित आहे. समाजाला प्रगल्भ बनवण्याची इच्छा नाही किंवा चर्चा घडवण्यात आळा आहे. आरक्षणाची संकल्पना काय आहे, हे कोणत्याही माध्यमांमध्ये योग्यरित्या चर्चिले जात नाही; याव्यतिरिक्त, सामाजिक शास्त्रांमध्ये जातीय ओळख प्रभावी राहते. राज्यसंस्था जातीय राजकारण करून तणाव निर्माण करत आहे, ज्यामुळे दलित, मराठा, ओबीसी आणि ब्राह्मण यांच्यात वाद होत आहेत. जातीय

तणाव आणि असमानता राज्याच्या विकासास अडथळा आणत आहेत. समाजाला संवैधानिक मानकांनुसार प्रबोधन करणे आवश्यक आहे. गरिबीची तुलना व संसाधनांची माहिती आवश्यक आहे, कारण बेरोजगारीशी संबंधित समस्या सरकारची आहेत. सत्य विचारल्यासच सामाजिक शांतता आणि न्याय प्राप्त होईल.

**८. मूल्यमापन - संभाव्य आव्हाने व परिणाम:** बहुमताचा निर्णय परिणामाधिष्ठित समानतेला प्राधान्य देतो; तथापि, तो अनुच्छेद ३४१/३४२ मधील संरक्षणात्मक चौकट कमकुवत करतो, अशी भीती मतभेदातून व्यक्त होते. उप-वर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये नवीन पदानुक्रम, अंतर्गत स्पर्धा आणि सामाजिक विखंडनाचा धोका निर्माण होऊ शकतो. त्रिवेदी यांचे म्हणणे आहे की, अधिक वंचित उप-गटांना मदत करायची असल्यास योग्य मार्ग म्हणजे घटनादुरुस्ती किंवा संसदीय कायदा करणे योग्य राहील, न्यायालयीन पुनर्लेखन नव्हे.

**प्रशासकीय गुंतागुंत:** अनुसूचित जाती समुदायांचे उप-समूहांमध्ये वर्गीकरण करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये जातींची नावे आणि ओळखींमध्ये फरक असल्याने गोंधळ आणि वाद निर्माण होऊ शकतात.

**विश्वसनीय आणि अद्ययावत डेटाचा अभाव:** सामाजिक-आर्थिक निर्देशकांवर व्यापक, जातीनिहाय डेटा नसल्यामुळे कोणाला किती मिळावे हे ठरवणे कठीण होते.शेवटची जातीय जनगणना १९३१ मध्ये करण्यात आली होती आणि २०११ ची सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना (SECC) डेटा कधीही पूर्णपणे जाहीर करण्यात आला नाही.

**राजकीय आणि सामाजिक तणाव:** प्रबळ अनुसूचित जाती समुदाय आरक्षणाच्या लाभांच्या वाटणीला विरोध करू शकतात. उप-वर्गीकरणामुळेदलित गटांमध्ये अंतर्गत फूट आणि आंतर-जातीय संघर्ष निर्माण होऊ शकतात.

**इतर राज्यांकडून मागण्या:** तेलंगणाच्या या निर्णयामुळे इतर राज्यांमध्येही अशाच मागण्यांना चालना मिळू शकते, ज्यामुळे राज्य आणि केंद्र सरकारवर दबाव येऊ शकतो. यामुळे आरक्षणाच्या राजकारणाचे विभाजन होऊ शकते आणि प्रादेशिक विषमता वाढू शकते .

**पुढे जाण्याचा मार्ग:**

१) **देशभरात जाती-आधारित सर्वेक्षण करा:** वैज्ञानिक, अद्ययावत आणि व्यापक जाती-आधारित जनगणना किंवा सर्वेक्षण सुरू करा. पुराव्यावर आधारित धोरण तयार करण्यासाठी डेटाचा आधार म्हणून वापर करा.

२) **पुनरावलोकन यंत्रणा स्थापन करा:** उप-वर्गीकरणाचे वेळोवेळी पुनरावलोकन करण्यासाठी राज्य-स्तरीय आणि राष्ट्रीय-स्तरीय आयोग स्थापन करा. या संस्थांनीअद्ययावत सामाजिक-आर्थिक परिस्थितीनुसार उप-कोटांमध्ये समायोजन करण्याची शिफारस करावी.

३) **राष्ट्रीय पातळीवर एकसमान मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे:** केंद्र सरकार राज्यांमध्ये उप-वर्गीकरणाच्या प्रयत्नांना मार्गदर्शन करण्यासाठी कायदे सक्षम करण्याचा विचार करू शकते. यामुळे संवैधानिक सुसंगतता सुनिश्चित होईल, कायदेशीर वाद टाळता येतील आणि एकसंध दृष्टिकोन राखता येईल.

**९. निष्कर्ष**

१. *पंजाब राज्य विरुद्ध दविंदर सिंग (२०२४)* हा निर्णय अनुसूचित जाती/जमाती आरक्षणाच्या न्यायशास्त्रात निर्णायक वळण ठरतो. बहुमत सामाजिक न्यायाच्या गतिमान संकल्पनेला स्वीकारते, तर मा. न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांचा मतभेद संविधानिक मर्यादा, मजकूरनिष्ठ अर्थ आणि न्यायिक शिस्त यांचे महत्त्व अधोरेखित करतो. परिवर्तनकारी सामाजिक न्याय साध्य करताना तो संविधानाच्या चौकटीतच साध्य झाला पाहिजे—हा या मतभेदाचा केंद्रस्थ संदेश आहे.

२. सामाजिक-राजकीय गतिमानता: सापेक्ष वंचितता आणि अंतर्गत स्तरीकरण.दलित गटांना दोन्ही अनुभव येतात.जसजसे नवीन दलित मध्यमवर्ग उदयास येत आहेत, तसतसे अंतर्गत असमानता तीव्र होत जातात, ज्यामुळे असंतोष निर्माण होतो आणि उप-कोटाची मागणी होते.जलद हिंदूकरण, धार्मिक बाहेर पडण्यावरील निर्बंध आणि संरचनात्मक भेदभाव दलित ओळख निर्माण करतात आणि भौतिक वंचिततेच्या पलीकडे खोलवरचे अलगाव निर्माण करतात.

३. संविधानातील आरक्षणाचा मुद्दा स्पष्ट करतो की आरक्षण सामान्य श्रेणीतील बेरोजगारीचे कारण नाही. सध्याच्या वाढत्या लोकसंख्येसह नोकऱ्यांची आवश्यकता वाढली आहे, परंतु रोजगार उपलब्धता कमी आहे. सुशिक्षित तरुणांचे प्रमाण वाढत असताना, मानसिकतेत अयशस्वी उमेदवार सामान्य श्रेणीतील उमेदवारांना आरक्षणामुळे नुकसान होते असे समजतात. तथापि, त्याच वेळी, आरक्षणाचा लाभ घेणारेही मर्यादित आहेत, त्यामुळे बेरोजगारीची समस्या कायम आहे. बेरोजगारीवर चर्चा करताना युवा एकमेकांविरुद्ध उभे केले जातात, परंतु आरक्षण हा या समस्येचा एकटा उपाय नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अनुसूचित जाती/जमातींमध्ये विरोध दाखवला जात आहे. मुख्यतः, समस्या आरक्षणाची नाही, तर संकुचित रोजगार संधी आणि बेरोजगारीची आहे. तरुणांनी रिक्त जागांच्या उपलब्धतेसह नोकऱ्या

मिळवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, आरक्षणावर नव्हे.

४. आर्थिक बदल आणि मर्यादित औद्योगिक संधींचा नवीन व्यवसायांमध्ये प्रवेश करणाऱ्या अनुसूचित जाती गटांवर विषम परिणाम होतो, ज्यामुळे लवकर व्यवसायात प्रवेश करणाऱ्या गटांमध्ये (उदा. बौद्ध) आणि उशिरा प्रवेश करणाऱ्या गटांमध्ये (उदा. मांग समुदाय) असमानता वाढते.

५. भरपाई सिद्धांत संरचनात्मक जातीच्या हानीला अपुरेपणे पकडतात.दलित न्याय भौतिक पुर्नवितरणापेक्षा जास्त मागणी करतो - त्यासाठी प्रतिष्ठा, मान्यता आणि सामाजिक आदर आवश्यक आहे .

६. आंबेडकरांचा नैतिक उन्नती आणि स्वाभिमानावर भर कायदेशीर आरक्षण चौकटींना पूरक आहे. सामाजिक परिवर्तन केवळ कोट्यावर अवलंबून राहू शकत नाही तर त्यासाठी नैतिक आणि नागरी सुधारणांची आवश्यकता आहे.

७. राखीव रिक्त जागा भरण्यात सरकारचे अपयश, खाजगीकरणाला गती देणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार कमी होणे यामुळे आरक्षणाची प्रभावीता कमी होते.उप-वर्गीकरण वादविवादांना अनुसूचित जातींच्या अंतर्गत फरकांवरील अपुरा सामाजिक-आर्थिक डेटाचा त्रास होतो.

८. सामाजिक-राजकीय गतिमानतेत दलित गटांना सापेक्ष वंचितता आणि अंतर्गत स्तरीकरणाचा अनुभव येतो. नवीन दलित मध्यमवर्गाच्या उदयाने अंतर्गत असमानता वाढवली आहे, ज्यामुळे असंतोष आणि उप-कोटाची मागणी वाढत आहे. धार्मिक बाहेर पडणारे निर्बंध आणि भेदभाव दलित ओळख निर्माण करताना भौतिक वंचिततेच्या पलीकडे वेगळेपण आणतात. आर्थिक बदलांमुळे अनुसूचित जातींमध्ये विषम परिणाम होतात, ज्यामुळे लवकर आणि उशिरा व्यवसायात प्रवेश करणाऱ्यात असमानता वाढते. दलित न्यायाच्या मागणीमध्ये प्रतिष्ठा आणि सामाजिक आदर महत्वाचे आहेत. केवळ कायदेशीर आरक्षणावर अवलंबून राहणे अपूर्ण आहे; नैतिक आणि नागरी सुधारणांची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील मराठा-ओबीसी तणाव जातीय ध्रुवीकरणाचे उदाहरण दाखवते.

९. खऱ्या सामाजिक न्यायासाठी आरक्षण वितरणात पारदर्शकता, अद्ययावत सामाजिक-आर्थिक डेटा, अनुसूचित जातींमधील संघर्ष कमी करणे आणि आरक्षणाला सन्मान-केंद्रित सामाजिक सुधारणांसह एकत्रित करणारा एकात्मिक दृष्टिकोन आवश्यक आहे.

## संदर्भ सूची:


१. E.V. Chinnaiah v. State of Andhra Pradesh, (२००५) १ SCC ३९४.
२. Punjab v. Davinder Singh, (२०२४) SCC OnLine SC __.
३. Indra Sawhney v. Union of India, १९९२ Supp (३) SCC २१७.
४. B.R. Ambedkar, Annihilation of Caste (१९३६).
५. Granville Austin, The Indian Constitution: Cornerstone of a Nation (Oxford, १९६६).
६. अभिनव चंद्रचूड, "आरक्षणातील उप-वर्गीकरण — II", भारतीय संवैधानिक कायदा आणि तत्वज्ञान (indconlawphil.wordpress.com, ४-९-२०२०). ९. (२०२०) ८ एससीसी १. १०. (२००५)
७. एससीसी ३९४. ११. न्यायमूर्ती पी. रामचंद्र राजू आयोग अहवाल, १९९७.
८. अजॉय कर्पुरम, "मडिगाससाठी आरक्षणातील उप-वर्गीकरण: मोठी कहाणी", सर्वोच्च न्यायालय निरीक्षक (scobserver.in, १७-८-२०२२).
९. (१९७६) २ एससीसी ३१०. १४. १९९२ सप*एससी/एसटींच्या उप-वर्गीकरणाच्या निकालात सर्वोच्च न्यायालय ३ ऑगस्ट २०२४ "केस ब्रीफ्स" मध्ये 'केवळ संसदच अ. ३४१ अंतर्गत अनुसूचित जातींच्या यादीत समाविष्ट करू शकते किंवा वगळू शकते': अनुसूचित जाती/जमातींच्या उप-वर्गीकरणाच्या निकालात न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांच्या असहमतीचे तपशीलवार विश्लेषण ६ ऑगस्ट २०२४

# महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना: धोरणात्मक हस्तक्षेप आणि सामाजिक असमानता

**डॉ. समाधान एल. कुंभार** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, क. ब. चौ. उ. म. वि., जळगाव

**सारांश:** महिलांची सामाजिक स्थिती ही केवळ जैविक लिंगावर आधारित नसून ती ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय प्रक्रियांतून घडलेली एक सामाजिक रचना आहे. पितृसत्ताक व्यवस्था, सामाजिक मूल्ये व सत्ता-संबंधांमुळे महिलांना शिक्षण, आरोग्य, रोजगार व निर्णय प्रक्रियेत मर्यादित स्थान मिळालेले दिसते. आधुनिक काळात राज्यसंस्थेने महिला सक्षमीकरणासाठी विविध धोरणात्मक हस्तक्षेप राबविले असून शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार व राजकीय सहभागाच्या क्षेत्रांत काही सकारात्मक बदल घडून आले आहेत. तथापि, या धोरणांची अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष सामाजिक वास्तव यामध्ये मोठी तफावत आढळते. अनेक धोरणे संख्यात्मकदृष्ट्या व्यापक असली तरी त्यांची गुणात्मक परिणामकारकता असमान आहे. NFHS-५ सारख्या अभ्यासांमधून महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी निर्णय प्रक्रियेत त्यांची स्वायत्तता अजूनही मर्यादित असल्याचे स्पष्ट होते. पंचायत राज संस्थांतील आरक्षण व स्वयं-सहायता गटांमुळे सहभाग वाढला असला, तरी प्रत्यक्ष सत्तानियंत्रण अनेकदा पुरुषप्रधान संरचनांकडेच राहते. काही प्रसंगी धोरणे सामाजिक असमानता कमी करण्याऐवजी तिचे पुनरुत्पादन करीत असल्याचेही आढळते. त्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीची खरी पुनर्रचना साध्य करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेपांबरोबरच सामाजिक संरचना, मूल्यव्यवस्था व मानसिकतेत मूलभूत परिवर्तन आवश्यक ठरते.

**मुख्य शब्द:** सामाजिक असमानता, लिंगाधारित असमानता, पितृसत्ताक सामाजिक रचना, धोरणात्मक हस्तक्षेप, महिला सक्षमीकरण, स्त्रीवादी दृष्टिकोन, प्रतीकात्मक व वास्तविक सक्षमीकरण, सामाजिक न्याय व समता, क्षमताविकास.

**प्रस्तावना:** मानवी समाजरचनेत महिलांची सामाजिक स्थिती ही केवळ जैविक लिंगावर आधारित नसून ती ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियांतून घडत गेलेली एक जटिल सामाजिक संकल्पना आहे. पारंपरिक समाजव्यवस्थेत महिलांना बहुधा दुय्यम, अवलंबून आणि सीमित भूमिकांमध्ये बांधून ठेवण्यात आलेले दिसते. कुटुंब, विवाह, वारसा, श्रमविभागणी आणि सामाजिक मूल्यव्यवस्था या सर्व घटकांनी महिलांची सामाजिक ओळख ठरवण्यात निर्णायक भूमिका बजावलेली आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, महिलांची सामाजिक स्थिती ही स्थिर नसून ती सतत बदलणाऱ्या सामाजिक संरचनांच्या प्रभावाखाली पुनर्रचित होत असते. त्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास हा केवळ वैयक्तिक स्तरावर न करता तो व्यापक सामाजिक असमानतेच्या चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते.

सामाजिक असमानता ही कोणत्याही समाजाची एक मूलभूत वैशिष्ट्ये असून ती वर्ग, जात, लिंग, धर्म, प्रदेश आणि आर्थिक स्तर अशा विविध घटकांवर आधारित असते. यापैकी लिंगाधारित सामाजिक असमानता ही सर्वांत व्यापक आणि खोलवर रुजलेली स्वरूपाची आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यातील असमानता ही नैसर्गिक नसून ती सामाजिकरीत्या निर्मित (socially constructed) आहे, असे आधुनिक समाजशास्त्र मानते. पितृसत्ताक सामाजिक रचना, पारंपरिक मूल्यव्यवस्था आणि सत्ता-संबंधांमुळे महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, मालमत्ता, राजकीय सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत मर्यादित स्थान मिळालेले दिसते. त्यामुळे महिलांची सामाजिक स्थिती ही अनेक स्तरांवर असमानतेने ग्रस्त राहिलेली आहे. ही असमानता केवळ स्त्री-पुरुष भेदापुरती मर्यादित नसून ती जातीय, वर्गीय आणि प्रादेशिक असमानतेशी संलग्न होऊन अधिक तीव्र स्वरूप धारण करते.

आधुनिक काळात राज्यसंस्था ही सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वाची यंत्रणा म्हणून उदयास आलेली आहे. महिलांच्या संदर्भात पाहता, राज्याने विविध धोरणात्मक हस्तक्षेपांद्वारे त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा, कायदेशीर संरक्षण आणि राजकीय सहभाग या क्षेत्रांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र योजना, कायदे आणि कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. तथापि, धोरणांची रचना, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये अनेकदा तफावत आढळून येते, ज्यामुळे अपेक्षित सामाजिक परिवर्तन साध्य होण्यास अडथळे निर्माण होतात.

शासकीय धोरणांची भूमिका ही केवळ योजनांच्या घोषणांपुरती मर्यादित नसून ती सामाजिक असमानतेच्या संरचनात्मक मुळांवर कितपत परिणाम करते, हे तपासणे महत्त्वाचे ठरते. अनेक अभ्यासांमधून असे दिसून येते की काही धोरणे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देतात, तर

काही धोरणे प्रतीकात्मक स्वरूपाची राहून सामाजिक वास्तव बदलण्यात अपयशी ठरतात. विशेषतः ग्रामीण, दलित, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांच्या बाबतीत धोरणांचा लाभ मर्यादित प्रमाणात पोहोचतो. त्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीच्या पुनर्रचनेत शासकीय धोरणात्मक हस्तक्षेपांची परिणामकारकता, मर्यादा आणि आव्हाने यांचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

याच पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना आणि सामाजिक असमानता यांमधील परस्परसंबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सामाजिक असमानतेच्या चौकटीतून पाहता, धोरणात्मक हस्तक्षेप महिलांच्या जीवनविश्वात कितपत बदल घडवून आणतात, हा या संशोधनाचा मुख्य प्रश्न आहे. महिलांच्या सामाजिक स्थितीतील बदल हे केवळ धोरणांमुळे घडतात की त्यावर सामाजिक संरचना, सांस्कृतिक मूल्ये आणि पितृसत्ताक मानसिकता यांचा प्रभाव अधिक निर्णायक असतो, याचा शोध घेणे ही संशोधनाची केंद्रस्थानी असलेली समस्या आहे. धोरणे आणि सामाजिक वास्तव यांतील अंतर समजून घेणे हे या अभ्यासाचे एक महत्त्वाचे अंग आहे.

या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश महिलांच्या सामाजिक स्थितीच्या पुनर्रचनेत शासकीय धोरणात्मक हस्तक्षेपांची भूमिका स्पष्ट करणे हा आहे. तसेच सामाजिक असमानतेच्या विविध स्वरूपांमुळे महिलांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेणे आणि धोरणांची परिणामकारकता तपासणे हा देखील या लेखाचा महत्त्वाचा हेतू आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा चिकित्सक आढावा घेत, प्रत्यक्षात सामाजिक स्थितीत कितपत परिवर्तन झाले आहे, याचे विश्लेषण करणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच भविष्यात अधिक समावेशक, लिंग-संवेदनशील आणि परिणामकारक धोरणांची गरज अधोरेखित करणे हा देखील या लेखाचा व्यापक उद्देश आहे.

एकूणच, महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना ही केवळ धोरणात्मक हस्तक्षेपांवर अवलंबून नसून ती सामाजिक मूल्यव्यवस्था, सत्ता-संबंध आणि संरचनात्मक असमानतेच्या परिवर्तनाशी निगडित आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन लेख महिलांच्या सामाजिक स्थितीच्या अभ्यासाला एक समाजशास्त्रीय, विश्लेषणात्मक आणि चिकित्सक दृष्टीकोन प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. हा अभ्यास महिलांच्या प्रश्नाकडे केवळ कल्याणकारी नव्हे, तर सामाजिक न्याय आणि समतेच्या दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करतो.

**संकल्पनात्मक व सैद्धांतिक चौकट:** महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना आणि सामाजिक असमानता यांचा अभ्यास करताना संकल्पनात्मक व सैद्धांतिक चौकट ही संशोधन लेखाची वैचारिक पायाभूत रचना ठरते. कोणत्याही समाजशास्त्रीय संशोधनामध्ये वापरल्या जाणाऱ्या संकल्पना, त्यांचे सैद्धांतिक अधिष्ठान आणि त्या संकल्पनांमधील परस्परसंबंध स्पष्ट केल्याशिवाय विश्लेषण सुसंगत व शास्त्रीय ठरत नाही. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महिलांच्या प्रश्नाकडे केवळ कल्याणकारी किंवा वर्णनात्मक दृष्टिकोनातून न पाहता, तो सामाजिक असमानतेच्या संरचनात्मक चौकटीत समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यामुळे सामाजिक स्थिती, सामाजिक असमानता, धोरणात्मक हस्तक्षेप, स्त्रीवादी व संरचनात्मक समाजशास्त्रीय दृष्टिकोन आणि राज्य—सत्ता—महिला यांचे परस्परसंबंध या संकल्पनांचे सखोल स्पष्टीकरण आवश्यक ठरते.

**सामाजिक स्थिती:** ही समाजशास्त्रातील एक मूलभूत आणि मध्यवर्ती संकल्पना आहे. सामाजिक स्थिती म्हणजे एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला समाजरचनेत प्राप्त झालेले स्थान, प्रतिष्ठा, अधिकार आणि भूमिका यांचा एकत्रित निर्देश होय. **मॅक्स वेबर** यांच्या मते, सामाजिक स्थिती ही केवळ आर्थिक वर्गाशी निगडित नसून ती सामाजिक सन्मान, प्रतिष्ठा आणि मान्यतेवर आधारित असते. महिलांच्या संदर्भात सामाजिक स्थिती ही जन्मतः प्राप्त होणारी नसून ती सामाजिक प्रक्रियांतून घडवली जाते. कुटुंबातील भूमिका, वैवाहिक स्थिती, मातृत्व, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणाची पातळी आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग या सर्व घटक महिलांची सामाजिक स्थिती ठरवतात. पारंपरिक पितृसत्ताक समाजव्यवस्थेत महिलांची सामाजिक स्थिती ही प्रामुख्याने दुय्यम, अवलंबून आणि मर्यादित स्वरूपाची राहिलेली आहे. त्यामुळे महिलांची सामाजिक स्थिती ही स्वायत्त नसून ती सामाजिक संरचनांनी नियंत्रित केलेली आहे.

**सामाजिक असमानता:** ही समाजातील व्यक्ती व समूहांमधील संसाधने, संधी, अधिकार आणि सत्ता यांचे असमान वितरण दर्शवणारी संकल्पना आहे. **कार्ल मार्क्स** यांनी सामाजिक असमानतेचे विश्लेषण वर्गसंघर्षाच्या चौकटीत केले, तर **वेबर** यांनी वर्ग, स्थिती आणि सत्ता या तीन परिमाणांतून असमानतेचे स्पष्टीकरण दिले. लिंगाधारित सामाजिक असमानता ही सर्व समाजांमध्ये आढळून येणारी सर्वात टिकाऊ आणि सर्वव्यापी असमानता आहे. महिलांच्या बाबतीत ही असमानता आर्थिकच नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि मानसिक पातळीवरही प्रकट होते. शिक्षणातील प्रवेश, रोजगारातील संधी, वेतनातील तफावत, आरोग्य

सुविधा, मालमत्ता हक्क, निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रतिनिधित्व या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना असमानतेचा सामना करावा लागतो. ही असमानता अनेकदा जात, वर्ग आणि प्रदेश यांसोबत एकत्र येऊन महिलांची सामाजिक स्थिती अधिक दुर्बल बनवते.

**धोरणात्मक हस्तक्षेप:** ही संकल्पना राज्यसंस्थेच्या सामाजिक भूमिकेशी थेट संबंधित आहे. धोरणात्मक हस्तक्षेप म्हणजे समाजातील विशिष्ट सामाजिक समस्यांवर उपाय म्हणून राज्याकडून आखली जाणारी योजनाबद्ध, कायदेशीर आणि प्रशासकीय कृती होय. महिलांच्या संदर्भात धोरणात्मक हस्तक्षेपांचे उद्दिष्ट त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीत सुधारणा घडवून आणणे असे असते. शिक्षणासाठीच्या योजना, आरोग्यविषयक कार्यक्रम, रोजगार व स्वयंरोजगार योजना, सामाजिक सुरक्षा, कायदेशीर संरक्षण आणि राजकीय आरक्षण ही धोरणात्मक हस्तक्षेपांची महत्त्वाची क्षेत्रे आहेत.

**स्त्रीवादी दृष्टिकोन:** स्त्रीवादी सिद्धांतानुसार लिंगाधारित असमानता ही नैसर्गिक नसून ती सामाजिकरीत्या निर्मित आहे. सायमन द बोउवार यांनी स्त्रीच्या दुय्यमतेला सामाजिक घडणीचे फलित मानले आहे. उदारमतवादी स्त्रीवाद महिलांच्या समान संधींवर भर देतो, तर मार्क्सवादी स्त्रीवाद आर्थिक रचनेतील असमानतेकडे लक्ष वेधतो. मूलगामी स्त्रीवाद पितृसत्ताक सत्तासंरचनेला असमानतेचे मूळ मानतो. या सर्व प्रवाहांच्या आधारे महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना ही केवळ धोरणात्मक हस्तक्षेपांद्वारे नव्हे, तर सत्तासंबंधांच्या परिवर्तनातूनच शक्य आहे, असे स्पष्ट होते.

**संरचनात्मक दृष्टिकोन:** सामाजिक असमानतेचे विश्लेषण सामाजिक रचना, संस्था आणि सत्ता-संबंध यांच्या चौकटीत करतो. या दृष्टिकोनानुसार व्यक्तीचे वर्तन, संधी आणि सामाजिक स्थिती ही वैयक्तिक निवडींपेक्षा सामाजिक संरचनांवर अधिक अवलंबून असते. महिलांच्या बाबतीत कुटुंबव्यवस्था, शिक्षण व्यवस्था, श्रमबाजार, धार्मिक संस्था आणि राज्यसंस्था या सर्व संरचना त्यांच्या सामाजिक स्थितीवर प्रभाव टाकतात. त्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना ही केवळ व्यक्तिकेंद्रित उपायांनी शक्य नसून ती संरचनात्मक बदलांशी निगडित आहे.

**राज्य - सत्ता - महिला यांचे परस्परसंबंध:** हा प्रस्तुत संशोधनाचा एक अत्यंत महत्त्वाचा सैद्धांतिक मुद्दा आहे. **मिशेल फुको** यांच्या सत्तेच्या संकल्पनेनुसार सत्ता ही केवळ दडपशाही स्वरूपाची नसून ती ज्ञान, धोरणे आणि संस्थांच्या माध्यमातून कार्यरत असते. राज्यसंस्था महिलांच्या जीवनावर कायदे, धोरणे आणि प्रशासकीय यंत्रणांद्वारे प्रभाव टाकते. आंबेडकरवादी विचारसरणीत राज्याला सामाजिक न्यायाचे साधन मानले गेले असले, तरी ते प्रभावी ठरण्यासाठी राज्याची धोरणे समतावादी आणि लिंग-संवेदनशील असणे आवश्यक आहे.

एकूणच, प्रस्तुत संशोधन लेखासाठी स्वीकारलेली संकल्पनात्मक व सैद्धांतिक चौकट महिलांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास बहुआयामी, चिकित्सक आणि विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यास मदत करते. सामाजिक स्थिती, सामाजिक असमानता, धोरणात्मक हस्तक्षेप आणि सत्ता-संबंध यांचे परस्परसंबंध समजून घेतल्याशिवाय महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना समजणे अशक्य आहे. ही चौकट संशोधन लेखाला वैचारिक सुसंगतता आणि शास्त्रीय खोली प्रदान करते.

**साहित्याचे अवलोकन:** विविध अभ्यासकांनी महिलांची सामाजिक स्थिती ही केवळ जैविक लिंगावर आधारित नसून ती ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय घटकांच्या परस्परसंवादातून घडते, असे स्पष्ट केले आहे. प्रारंभीच्या समाजशास्त्रीय अभ्यासांमध्ये महिलांना प्रामुख्याने कुटुंबकेंद्रित भूमिका, मातृत्व आणि गृहकार्य यांपुरते मर्यादित मानले गेले होते. मात्र, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेल्या अभ्यासांमध्ये महिलांच्या सामाजिक स्थितीकडे एक स्वतंत्र आणि संरचनात्मक प्रश्न म्हणून पाहिले जाऊ लागले.

**महिलांच्या सामाजिक स्थितीवरील महत्त्वाच्या अभ्यासांमध्ये** स्त्रीवादी समाजशास्त्राचा मोठा वाटा आहे. सायमन द बोउवार यांनी महिलांच्या दुय्यमतेचे सामाजिक स्पष्टीकरण देत स्त्रीची ओळख ही सामाजिक घडणीचे फलित असल्याचे मांडले. ॲन ओकले, बेट्टी फ्रिडन आणि इतर स्त्रीवादी अभ्यासकांनी कुटुंबव्यवस्था, श्रमविभागणी आणि पितृसत्ताक मूल्यव्यवस्था महिलांच्या सामाजिक स्थितीवर कसा प्रभाव टाकतात, याचे विश्लेषण केले आहे. भारतीय संदर्भात पाहता, इरावती कर्वे, लीला दुबे, बिन्नी थॉमस आणि शशि देशपांडे यांसारख्या अभ्यासकांनी महिलांची सामाजिक स्थिती ही जात, वर्ग आणि धर्माशी घट्टपणे जोडलेली असल्याचे अधोरेखित केले आहे. या अभ्यासांमधून असे स्पष्ट होते की महिलांची सामाजिक स्थिती ही एकसारखी नसून ती बहुआयामी आणि विषम स्वरूपाची आहे.

**शासकीय धोरणांशी संबंधित आधीच्या संशोधनांमध्ये** शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्वयंरोजगार, सामाजिक सुरक्षा आणि राजकीय सहभाग या क्षेत्रांतील धोरणांचा महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम अनेक अभ्यासांनी तपासलेला आहे. भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या अहवालांमध्ये तसेच UNDP, World Bank आणि UNICEF यांच्या अभ्यासांमध्ये महिलांसाठीच्या

धोरणात्मक हस्तक्षेपांनी काही प्रमाणात सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणल्याचे नमूद करण्यात आले आहे. अनेक अभ्यासांमध्ये धोरणांची अंमलबजावणी, प्रशासनिक मर्यादा आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी अधोरेखित करण्यात आलेल्या आहेत.

**सामाजिक असमानतेवर केंद्रित निष्कर्षांमध्ये** लिंगाधारित असमानता ही इतर असमानतेच्या स्वरूपांशी संलग्न असल्याचे स्पष्ट केले गेले आहे. मार्क्सवादी आणि संरचनात्मक अभ्यासकांनी महिलांची सामाजिक स्थिती ही आर्थिक रचनेशी आणि श्रमबाजारातील स्थानाशी जोडलेली असल्याचे मांडले आहे. स्त्रीवादी अभ्यासांमधून असे दिसून येते की शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढूनही महिलांवरील कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेतनातील तफावत आणि निर्णय प्रक्रियेतील मर्यादित सहभाग कायम आहेत. विशेषतः दलित, आदिवासी आणि ग्रामीण महिलांच्या बाबतीत सामाजिक असमानता अधिक तीव्र स्वरूपाची असल्याचे अनेक क्षेत्रीय अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीचा प्रश्न हा केवळ लिंगापुरता मर्यादित नसून तो सामाजिक संरचनेतील विषमतेशी निगडित आहे.

विद्यमान साहित्याचा आढावा घेतल्यास **अनेक अभ्यासांमध्ये काही महत्त्वाच्या उणिवा** आढळून येतात. बहुतेक संशोधनांमध्ये महिलांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास हा योजना-केंद्रित किंवा सांख्यिकीय स्वरूपाचा राहिलेला आहे. धोरणात्मक हस्तक्षेप आणि महिलांच्या सामाजिक स्थितीतील संरचनात्मक बदल यांमधील परस्परसंबंधांचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला आहे. तसेच अनेक अभ्यासांमध्ये महिलांना एकसंध समूह म्हणून पाहिले गेले असून, जात, वर्ग, प्रदेश आणि सांस्कृतिक विविधतेनुसार असणाऱ्या भिन्न अनुभवांकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. धोरणे आणि सामाजिक वास्तव यांतील अंतर समजून घेण्याऐवजी काही अभ्यासांमध्ये धोरणांची उद्दिष्टेच यशस्वी ठरविण्याची प्रवृत्ती दिसून येते.

याच पार्श्वभूमीवर **सद्य संशोधनाची गरज** प्रकर्षाने जाणवते. महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना ही केवळ धोरणात्मक घोषणांवर आधारित नसून ती सामाजिक असमानतेच्या संरचनात्मक मुळांशी जोडलेली आहे. त्यामुळे धोरणात्मक हस्तक्षेप महिलांच्या जीवनविश्वात प्रत्यक्षात कोणते बदल घडवून आणतात, कोणत्या मर्यादा राहतात आणि सामाजिक असमानता कशी पुनरुत्पादित होते, याचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन लेख विद्यमान अभ्यासातील या उणिवा भरून काढण्याचा प्रयत्न करतो. सामाजिक असमानतेच्या चौकटीतून महिलांच्या सामाजिक स्थितीची पुनर्रचना समजून घेणे आणि राज्य—धोरणे-महिला यांचे परस्परसंबंध स्पष्ट करणे ही या संशोधनाची मुख्य भूमिका आहे.

**संशोधन उद्दिष्टे:** महिलांच्या सामाजिक स्थितीतील बदलांचे विश्लेषण करणे, धोरणात्मक हस्तक्षेपांचा प्रभाव समजून घेणे, सामाजिक असमानतेच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

**महिलांची सामाजिक स्थिती: विद्यमान वास्तव:**

**कुटुंबातील स्थान:** महिलांची सामाजिक स्थिती समजून घेताना कुटुंबातील त्यांचे स्थान हा मूलभूत घटक मानला जातो. सिल्व्हिया वाल्बी (Sylvia Walby) यांनी कुटुंबाला पितृसत्तेचे प्रमुख संरचनात्मक केंद्र मानले असून, महिलांवरील नियंत्रण हे घरगुती श्रम, लैंगिक भूमिका व निर्णय प्रक्रियेतून प्रस्थापित होते, असे स्पष्ट केले आहे. भारतीय संदर्भात, इरावती कर्वे व एम. एन. श्रीनिवास यांनी कुटुंबव्यवस्थेतील पुरुषप्रधान सत्तासंबंधांमुळे महिलांची सामाजिक भूमिका दुय्यम स्वरूपाची राहते, असे नमूद केले आहे. NFHS-५ (२०१९—२१) नुसार, भारतातील सुमारे ४२ टक्के विवाहित महिला स्वतःच्या आरोग्यविषयक किंवा आर्थिक निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकत नाहीत. ही आकडेवारी महिलांच्या कुटुंबातील मर्यादित निर्णयस्वातंत्र्याचे द्योतक आहे. बेटी फ्रिडन (Betty Friedan) यांनी "घरगुती भूमिकेत अडकविलेली स्त्री ही अदृश्य असमानतेची बळी ठरते" असे प्रतिपादन केले असून, हे निरीक्षण भारतीय सामाजिक वास्तवातही तितकेच लागू पडते. त्यामुळे कुटुंबातील स्थान हे महिलांच्या सामाजिक स्थितीवर निर्णायक प्रभाव टाकणारे संरचनात्मक परिमाण ठरते.

**शिक्षणातील सहभाग:** महिलांच्या सामाजिक स्थितीच्या पुनर्रचनेत शिक्षण हा कळीचा घटक मानला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीशिक्षणाला सामाजिक समतेचे मुख्य साधन मानले आहे. तथापि, जनगणना २०११ नुसार, भारतातील महिला साक्षरता दर ६५.४६ टक्के, तर पुरुष साक्षरता दर ८२.१४ टक्के आहे, जो लिंगाधारित शैक्षणिक दरी स्पष्ट करतो. AISHE अहवाल दर्शवितो की उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग वाढत असला, तरी तांत्रिक, व्यावसायिक व संशोधन क्षेत्रात त्यांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. अमर्त्य सेन यांच्या "Capability Approach" नुसार, शिक्षण केवळ साक्षरता नसून व्यक्तीच्या क्षमतांचा विकास आहे; महिलांना शिक्षणातील संधी नाकारल्या गेल्यास त्यांची सामाजिक क्षमता मर्यादित राहते. सामाजिक रूढी, बालविवाह, आर्थिक अडचणी व घरगुती जबाबदाऱ्या यांमुळे शिक्षणातील असमानता टिकून राहते आणि त्यामुळे महिलांची सामाजिक गतिशीलता मर्यादित होते.

**रोजगार व आर्थिक स्थिती:** महिलांचा रोजगारातील सहभाग हा त्यांच्या सामाजिक दर्जाचा महत्त्वाचा निदर्शक आहे. PLFS (२०२२—२३) नुसार, भारतातील महिला श्रम सहभाग दर सुमारे ३५ टक्के इतका असून तो पुरुषांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहे. एस्तर बोसरप (Ester Boserup) यांनी महिलांचे आर्थिक श्रम अदृश्य ठेवले जात असल्याने त्यांच्या योगदानाचे अवमूल्यन होते, असे स्पष्ट केले आहे. NSSO च्या अभ्यासानुसार, समान कामासाठी महिलांना सरासरी २०—३० टक्के कमी वेतन मिळते. मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंत असे मानतात की उत्पादनाच्या साधनांवर महिलांचा ताबा नसल्यामुळे आर्थिक शोषण अधिक तीव्र होते. अमर्त्य सेन व नुसबॉम (Martha Nussbaum) यांच्या मते, आर्थिक स्वायत्तता नसल्यास महिलांचे सामाजिक सक्षमीकरण अपूर्ण राहते. परिणामी, रोजगारातील असमानता महिलांच्या सामाजिक स्थितीला दुय्यम ठेवते.

**आरोग्य व निर्णय प्रक्रियेत सहभाग:** महिलांचे आरोग्य हे त्यांच्या सामाजिक स्थितीचे संवेदनशील परिमाण आहे. NFHS-५ नुसार, भारतातील सुमारे ३५ टक्क्यांहून अधिक महिला रक्तक्षयाने (Anemia) ग्रस्त आहेत. मिशेल फुको यांच्या सत्तासंबंधांच्या संकल्पनेनुसार, शरीरावरचे सामाजिक नियंत्रण हे सत्तेचे सूक्ष्म स्वरूप आहे; महिलांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष हे त्याचेच उदाहरण आहे. राजकीय व सामाजिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न झाले असले, तरी UNDP Gender Inequality Index दर्शवितो की आरोग्य, शिक्षण व राजकीय सहभागातील लिंगविषमता अद्याप कायम आहे. बीना अग्रवाल यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांच्या सहभागाचे विश्लेषण करताना असे नमूद केले आहे की, औपचारिक प्रतिनिधित्व असूनही प्रत्यक्ष निर्णयक्षमतेवर सामाजिक बंधने प्रभावी ठरतात. त्यामुळे आरोग्य व निर्णय प्रक्रियेत मर्यादित सहभाग हा महिलांच्या सामाजिक स्थितीच्या पुनर्रचनेतील प्रमुख अडथळा ठरतो.

**शासकीय धोरणात्मक हस्तक्षेप:**

**महिला-केंद्रित धोरणांचा संक्षिप्त आढावा:** स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने महिलांना समानता, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय यांची हमी दिली असून त्यावर आधारित विविध महिला-केंद्रित धोरणे विकसित झाली. प्रारंभीच्या धोरणांचा भर *कल्याणकारी दृष्टिकोनावर* (Welfare Approach) होता; परंतु कालांतराने *विकासात्मक* व *सक्षमीकरणात्मक* धोरणांचा अवलंब करण्यात आला. पाच वर्षीय योजनांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या असून सहाव्या योजनेनंतर महिला विकास हा स्वतंत्र धोरणात्मक विषय बनला. बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला शक्ती केंद्र, स्वयंसहायता गट (SHG), उज्ज्वला योजना, मातृवंदना योजना, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठी आरक्षण ही प्रमुख महिला-केंद्रित धोरणे आहेत. बीना अग्रवाल यांच्या मते, महिला-केंद्रित धोरणे ही केवळ संरक्षणात्मक नसून महिलांना संसाधनांवर नियंत्रण मिळवून देणारी असली पाहिजेत.

**धोरणांची उद्दिष्टे:**

**१) लिंगाधारित सामाजिक असमानता कमी करणे:** लिंगाधारित सामाजिक असमानता कमी करणे हे महिला-केंद्रित धोरणांचे मूलभूत उद्दिष्ट आहे. सामाजिक वास्तव पाहता, शिक्षण, आरोग्य, रोजगार व पोषण या क्षेत्रांत महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. या असमानतेला आव्हान देण्यासाठी शासनाने विविध धोरणात्मक हस्तक्षेप केले आहेत. उदा. *बेटी बचाओ बेटी पढाओ* योजनेचा उद्देश मुलींचे अस्तित्व, शिक्षण व सक्षमीकरण सुनिश्चित करणे हा आहे. हरियाणा, राजस्थान यांसारख्या राज्यांत या योजनेमुळे मुलींच्या शालेय नावनोंदणीत वाढ झाल्याचे सरकारी अहवाल दर्शवितात. या उदाहरणातून स्पष्ट होते की धोरणांचा उद्देश केवळ सांख्यिक सुधारणा नसून सामाजिक मानसिकतेत बदल घडविणे हा आहे.

**२) महिलांचे आर्थिक सक्षमीकरण:** महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे सामाजिक स्थितीतील परिवर्तनाचे केंद्र मानले जाते. महिलांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाल्यास त्यांचे कुटुंबातील व सामाजिक स्थान मजबूत होते. उदाहरणार्थ, *स्वयंसहायता गट (SHG)* चळवळीमुळे ग्रामीण महिलांना सूक्ष्म कर्ज, बचत व स्वयंरोजगाराच्या संधी मिळाल्या. आंध्र प्रदेश व केरळ राज्यांत SHG मॉडेलमुळे महिलांचे उत्पन्न वाढले असून त्यांनी स्थानिक बाजारपेठेत सक्रिय सहभाग घेतल्याचे अभ्यासातून दिसते. बीना अग्रवाल यांच्या मते, आर्थिक संसाधनांवर नियंत्रण मिळाल्यास महिलांची सौदेबाजीची क्षमता वाढते - हे SHG च्या उदाहरणातून स्पष्ट होते.

**३) निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे:** लोकशाही प्रक्रियेत सहभाग हा सामाजिक सक्षमीकरणाचा महत्त्वाचा घटक आहे. महिलांसाठी पंचायत राज संस्थांमध्ये आरक्षण देण्यामागील उद्दिष्ट महिलांना राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आहे. उदा. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे अनेक ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच निवडून आल्या. काही ठिकाणी *"प्रॉक्सी सरपंच"* ही समस्या दिसून आली असली, तरी महाराष्ट्र व पश्चिम बंगालमधील काही ग्रामपंचायतींमध्ये महिलांनी पाणीपुरवठा, स्वच्छता व शिक्षणविषयक निर्णय प्रभावीपणे राबविले. हे उदाहरण दर्शविते की संधी दिल्यास महिलांचा निर्णयक्षम सहभाग वाढू शकतो.

**४) महिलांचे सामाजिक संरक्षण व सुरक्षितता:** सुरक्षिततेचा अभाव हा महिलांच्या सामाजिक सहभागातील मोठा अडथळा आहे. त्यामुळे महिलांना हिंसा, शोषण व भेदभावापासून संरक्षण देणे हे धोरणांचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. उदा. *घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा (२००५)* अंतर्गत महिलांना कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. अनेक राज्यांत *वन-स्टॉप सेंटर* (Sakhi Centers) च्या माध्यमातून पीडित महिलांना वैद्यकीय, कायदेशीर व समुपदेशन सेवा दिल्या जातात. यावरून दिसते की संरक्षणात्मक धोरणे महिलांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यास आत्मविश्वास देतात.

**५) क्षमताविकास:** अमर्त्य सेन यांच्या Capability Approach नुसार, विकास म्हणजे व्यक्तीच्या निवडी व क्षमतांचा विस्तार. महिलांच्या बाबतीत धोरणांचे उद्दिष्ट त्यांना केवळ लाभार्थी न ठेवता सक्षम निर्णयकर्ता बनविणे हे आहे. उदा. *महिला शक्ती केंद्र* कार्यक्रमांतर्गत महिलांना नेतृत्व प्रशिक्षण, कायदेविषयक माहिती व कौशल्य विकास दिला जातो. अनेक जिल्ह्यांत या प्रशिक्षणामुळे महिलांनी स्वयंरोजगार सुरू केला किंवा स्थानिक निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेतली. हे उदाहरण क्षमताविकास धोरणांचे व्यावहारिक स्वरूप स्पष्ट करते.

**६) समावेशक विकास साध्य करणे:**

महिलांचा एकसमान गट नसून त्यांच्यात सामाजिक व आर्थिक विविधता आहे. त्यामुळे धोरणांचे उद्दिष्ट सर्व स्तरांतील महिलांचा समावेश करणे हे आहे.

उदाहरणार्थ, *आदिवासी व ग्रामीण महिलांसाठी* स्वतंत्र पोषण व आरोग्य योजना राबविल्या जातात, तर *अल्पसंख्याक महिलांसाठी* शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत. या उदाहरणांमधून स्पष्ट होते की समावेशक धोरणांशिवाय सामाजिक असमानता कमी होऊ शकत नाही.

**अंमलबजावणीची रचना:**

**केंद्र सरकारची भूमिका:** केंद्र सरकार धोरणांची चौकट तयार करते व निधी उपलब्ध करून देते. उदाहरणार्थ, महिला व बालविकास मंत्रालय *बेटी बचाओ बेटी पढाओ* योजनेसाठी राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे ठरवते, तर अंमलबजावणीची जबाबदारी राज्यांवर असते.

**राज्य सरकारची भूमिका:** राज्य सरकारे धोरणे स्थानिक गरजेनुसार रूपांतरित करतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्र सरकारने केंद्राच्या महिला सक्षमीकरण धोरणांना पूरक अशा *मिशन शक्ती* सारख्या योजना सुरू केल्या आहेत.

**स्थानिक स्वराज्य संस्था:** स्थानिक पातळीवर धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येतो. उदाहरणार्थ, काही ग्रामपंचायतींनी महिलांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा व स्वच्छता योजना यशस्वीपणे राबविल्या.

**महिला व बालविकास मंत्रालय / महिला आयोग:** या संस्था देखरेख व तक्रार निवारण करतात. उदाहरणार्थ, राज्य महिला आयोगाकडे घरगुती हिंसेसंबंधी तक्रारींची नोंद व त्यावर कारवाई केली जाते.

**स्वयंसेवी संस्था व समुदाय आधारित संघटना:** स्वयंसेवी संस्था धोरणे व समाज यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. उदाहरणार्थ, काही स्वयंसेवी संस्थांनी ग्रामीण भागात महिलांसाठी कायदेविषयक जनजागृती मोहिमा राबविल्या.

**धोरणे व सामाजिक असमानता:**

**१. धोरणांचा महिलांच्या सामाजिक स्थितीवर परिणाम:** शासकीय धोरणात्मक हस्तक्षेपांचा महिलांच्या सामाजिक स्थितीवर झालेला परिणाम बहुआयामी स्वरूपाचा आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार व राजकीय सहभाग या क्षेत्रांत धोरणांमुळे काही प्रमाणात सकारात्मक बदल घडून आलेले दिसतात. महिला शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजनांमुळे मुलींच्या शालेय नावनोंदणीत वाढ झाली असून मातृत्व आरोग्य कार्यक्रमांमुळे मातामृत्यू दरात घट झाल्याचे विविध अहवाल दर्शवितात. तथापि, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता हा परिणाम संख्यात्मक सुधारणा इतकाच मर्यादित राहिल्याची टीका आढळते. अमर्त्य सेन यांच्या मते, विकासाचा खरा अर्थ महिलांच्या *निवडीच्या स्वातंत्र्यात* (freedom of choice) झालेली वाढ असा असतो. अनेक धोरणांमुळे महिलांना लाभ मिळत असला, तरी त्यांच्या सामाजिक स्वायत्ततेत अपेक्षित बदल झाला आहे का, हा प्रश्न अद्याप कायम आहे. कुटुंबातील निर्णयप्रक्रिया, मालमत्ता हक्क व सामाजिक नियंत्रण या क्षेत्रांत महिलांचे स्थान अनेकदा पूर्ववत राहते. त्यामुळे धोरणांचा परिणाम हा संमिश्र स्वरूपाचा असल्याचे दिसते; एकीकडे सुधारणा, तर दुसरीकडे संरचनात्मक मर्यादा.

**२. विविध सामाजिक घटकांनुसार परिणामातील तफावत:** महिला हा एकसमान सामाजिक गट नसून त्यांच्यात जात, वर्ग, प्रदेश, शिक्षण व धर्म यांनुसार मोठी विविधता आहे. त्यामुळे धोरणांचा परिणाम सर्व महिलांवर समान रीतीने होत नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक व ग्रामीण महिलांवर धोरणांचा प्रभाव तुलनेने कमी असल्याचे अनेक अभ्यास दर्शवितात. उदा. शहरी व शिक्षित महिलांना शिक्षण व रोजगाराशी संबंधित धोरणांचा लाभ अधिक प्रमाणात मिळतो; तर ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना माहितीअभाव, प्रशासकीय अडथळे व सामाजिक दबावामुळे या योजनांचा लाभ मर्यादित प्रमाणात मिळतो. बीना अग्रवाल यांच्या मते, संसाधनांवर आधीपासूनच असलेला असमान प्रवेश धोरणांच्या परिणामातील तफावत अधिक तीव्र करतो.

याशिवाय, प्रदेशानुसारही धोरणांचा परिणाम बदलतो. दक्षिण व पश्चिम भारतातील काही राज्यांत महिला सक्षमीकरणाची पातळी तुलनेने जास्त असून उत्तर व मध्य भारतातील काही भागांत सामाजिक रूढी व पितृसत्ताक नियंत्रण अधिक प्रभावी असल्यामुळे धोरणांचा प्रभाव मर्यादित राहतो. त्यामुळे सामाजिक घटकांनुसार धोरणांचा परिणाम वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रकट होतो.

**३. प्रतीकात्मक व वास्तविक सक्षमीकरण:** धोरणांचे मूल्यमापन करताना प्रतीकात्मक सक्षमीकरण आणि वास्तविक सक्षमीकरण यांतील फरक लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रतीकात्मक सक्षमीकरण म्हणजे महिलांना औपचारिक अधिकार, प्रतिनिधित्व किंवा लाभ दिले जातात; मात्र प्रत्यक्ष निर्णयक्षमतेत व स्वायत्ततेत फारसा बदल होत नाही. उदाहरणार्थ, पंचायत राज संस्थांमधील महिलांसाठी आरक्षणामुळे महिलांचे संख्यात्मक प्रतिनिधित्व वाढले असले, तरी अनेक ठिकाणी प्रॉक्सी प्रतिनिधित्व आढळते. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण हे कागदोपत्री मर्यादित राहते. याउलट, वास्तविक सक्षमीकरण म्हणजे महिलांना आर्थिक स्वायत्तता, सामाजिक प्रतिष्ठा व निर्णयक्षमता प्रत्यक्षात प्राप्त होणे. सिल्व्हिया वाल्बी यांच्या मते, पितृसत्ताक सामाजिक रचना बदलल्याशिवाय प्रतीकात्मक उपाय वास्तविक सक्षमीकरणात रूपांतरित होऊ शकत नाहीत.

स्वयंसहायता गटांसारख्या काही उपक्रमांत महिलांनी आर्थिक निर्णय, बचत व सामूहिक कृतीत सक्रिय सहभाग घेतल्याचे उदाहरणे आढळतात, ज्यामुळे वास्तविक सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू होते. तथापि, ही उदाहरणे सर्वसाधारण न बनता अपवादात्मक स्वरूपाची राहतात. त्यामुळे धोरणे व सामाजिक असमानता यांचे नाते समजून घेताना प्रतीकात्मक आणि वास्तविक सक्षमीकरण यांतील अंतर स्पष्टपणे अधोरेखित करणे आवश्यक ठरते.

**प्रमुख आव्हाने व मर्यादा:**

**धोरण अंमलबजावणीतील अडचणी:** धोरण अंमलबजावणी ही महिला-केंद्रित शासकीय हस्तक्षेपांची सर्वात निर्णायक पण दुर्बल कडी ठरते. अनेक धोरणे संकल्पनात्मक पातळीवर प्रगत असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये ती अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत.

**निधीचा अपुरा व असमतोल वापर:** भारत सरकारच्या *Comptroller and Auditor General (CAG)* च्या अहवालानुसार (२०१८), महिला व बालविकास विभागासाठी मंजूर निधीपैकी सुमारे २०—२५ टक्के निधी खर्च न होता परत गेला. *उदा.* "बेटी बचाओ, बेटी पढाओ" योजनेत अनेक राज्यांत जाहिरात व जनजागृतीवर जास्त खर्च झाला, तर प्रत्यक्ष शिक्षण-सुविधांवर तुलनेने कमी.

**प्रशासकीय विलंब व समन्वयाचा अभाव:** केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील समन्वयाचा अभाव धोरणांची प्रभावी अंमलबजावणी रोखतो. *उदाहरण:* पोषण अभियानात (POSHAN Abhiyaan) अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य विभाग व स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वय अभावामुळे लाभार्थी महिलांपर्यंत सेवा वेळेवर पोहोचत नाही.

**लाभार्थी-केंद्रित दृष्टिकोनाचा अभाव:** अनेक धोरणे "Top-down approach" वर आधारित असल्याने स्थानिक गरजा दुर्लक्षित राहतात. *अमर्त्य सेन* यांच्या मते, धोरणे लोकांच्या वास्तविक क्षमतांशी (real freedoms) जुळली नाहीत, तर त्यांचा सामाजिक परिणाम मर्यादित राहतो.

**सामाजिक रचनात्मक अडथळे:** पितृसत्ताक सामाजिक रचना (Patriarchal Social Structure) ही महिला धोरणांच्या अंमलबजावणीतील मूलभूत अडथळा आहे.

**लिंगाधारित भूमिका व मूल्यव्यवस्था:** *Sylvia Walby* यांच्या "Theorizing Patriarchy" (१९९०) नुसार, पितृसत्ता केवळ कौटुंबिक नव्हे तर आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक संस्थांमध्येही खोलवर रुजलेली आहे. *उदाहरण:* स्वयं-सहायता गटांमधून महिलांना कर्ज उपलब्ध झाले तरी अनेक ठिकाणी त्या कर्जाचा वापर पुरुष सदस्य करतात.

**शिक्षण व जागरूकतेचा अभाव:** *NFHS-५ (२०१९—२१)* नुसार भारतात केवळ ४१ टक्के महिलांना स्वतःच्या आरोग्यविषयक निर्णयात पूर्ण स्वायत्तता आहे. हे दर्शवते की धोरणे असूनही सामाजिक मानसिकता बदललेली नाही.

**जात, वर्ग व ग्रामीण-शहरी विषमता:** दलित, आदिवासी व अल्पसंख्याक महिलांना धोरणांचा लाभ तुलनेने कमी प्रमाणात मिळतो. *उदा:* आदिवासी भागांत मातृ मृत्यू दर (MMR) राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे, जरी समान आरोग्य धोरणे लागू असली तरी.

**धोरणे व वास्तव यातील अंतर:** Policy—Practice Gap ही भारतीय सामाजिक धोरणांची एक स्थायी समस्या आहे.

**कायदेशीर तरतुदी विरुद्ध सामाजिक वास्तव:** *घरेलू हिंसा प्रतिबंधक कायदा,* २००५ अस्तित्वात असूनही *NFHS-*५ नुसार २९.३ टक्के विवाहित महिलांनी शारीरिक/लैंगिक हिंसेचा अनुभव घेतल्याचे नोंदवले आहे. यावरून कायदा अस्तित्वात असणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे यात मोठे अंतर स्पष्ट होते.

**प्रतीकात्मक सक्षमीकरण:** पंचायत राज संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणामुळे महिलांचे संख्यात्मक प्रतिनिधित्व वाढले, परंतु अनेक अभ्यास (Bina Agarwal, २०१०) दर्शवतात की निर्णय प्रक्रिया अनेकदा "Proxy Representation" स्वरूपाची असते. *उदा:* महिला सरपंच असली तरी प्रत्यक्ष निर्णय पती किंवा कुटुंबीय घेतात.

**वास्तविक सक्षमीकरणाचा अभाव:** *Naila Kabeer* यांच्या मते, सक्षमीकरण म्हणजे केवळ संसाधनांची उपलब्धता नव्हे, तर संसाधनांवर नियंत्रण व निर्णयक्षमता. भारतात महिलांचा कामगार सहभाग दर (FLFPR) सुमारे २५ टक्के पेक्षा कमी असल्याने आर्थिक सक्षमीकरणाचे वास्तव मर्यादित असल्याचे दिसते.

**संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष:** सदर संशोधनातून असे आढळून येते की २१व्या शतकातील महिला-केंद्रित शासकीय धोरणे ही संख्यात्मक दृष्ट्या व्यापक असली, तरी त्यांची गुणात्मक परिणामकारकता असमान आहे. शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वयंरोजगार, राजकीय सहभाग इत्यादी क्षेत्रांत महिलांसाठी स्वतंत्र धोरणात्मक हस्तक्षेप राबविले गेले आहेत; मात्र त्यांचा लाभ सर्व सामाजिक घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. *NFHS-५ (२०१९–२१)* नुसार महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले असले, तरी निर्णय प्रक्रियेत महिलांची स्वायत्तता मर्यादित असल्याचे स्पष्ट होते.

**धोरणात्मक हस्तक्षेपांची एकूण परिणामकारकता:** धोरणात्मक हस्तक्षेपांची परिणामकारकता मिश्र स्वरूपाची (Mixed Outcomes) असल्याचे संशोधनातून दिसते. एकीकडे, पंचायत राज संस्थांमधील आरक्षणामुळे महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढले, स्वयं-सहायता गटांमुळे आर्थिक सहभागात वाढ झाली; परंतु दुसरीकडे, ही सक्षमीकरण प्रक्रिया अनेक वेळा प्रतीकात्मक (Symbolic) स्वरूपातच मर्यादित राहते. *Bina Agarwal* यांच्या अभ्यासानुसार, महिला प्रतिनिधी संख्येने वाढल्या तरी निर्णयांवरील वास्तविक नियंत्रण पुरुषप्रधान संरचनांकडेच राहते. त्यामुळे धोरणांची परिणामकारकता ही केवळ आकडेवारीपुरती मर्यादित न ठेवता, सामाजिक व्यवहारांत तपासणे आवश्यक ठरते.

**सामाजिक असमानतेच्या पुनरुत्पादनाबाबत निरीक्षणे:** या संशोधनाचा महत्त्वाचा निष्कर्ष असा की शासकीय धोरणे सामाजिक असमानता पूर्णपणे नष्ट न करता, काही प्रमाणात तिचे पुनरुत्पादन (Reproduction of Inequality) करतात. *Sylvia Walby* यांच्या पितृसत्ताक सिद्धांतानुसार, सामाजिक रचना बदलल्याशिवाय धोरणे विद्यमान विषमता कमी करण्याऐवजी कधी कधी ती अधिक दृढ करतात.

**शिफारशी:** धोरणात्मक सुधारणांची गरज संरचनात्मक (Structural Reforms) स्वरूपाची असल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते. महिला धोरणे ही केवळ कल्याणकारी (Welfare-oriented) न ठेवता परिवर्तनकारी (Transformative) स्वरूपाची असावीत. *Amartya Sen* यांच्या Capability Approach नुसार, धोरणांनी महिलांच्या शिक्षण, आरोग्य व उत्पन्नासोबतच निर्णयक्षमता व स्वायत्तता वाढविण्यावर भर द्यावा. जात, वर्ग, धर्म, ग्रामीण–शहरी भेद लक्षात घेऊन Intersectional Policy Design अवलंबणे आवश्यक आहे. धोरणांची प्रभावी अंमलबजावणी ही सक्षमीकरणाची गुरुकिल्ली असल्याचे संशोधन अधोरेखित करते. निधीवापरात पारदर्शकता व सामाजिक लेखापरीक्षण (Social Audit) बंधनकारक करणे. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार व संसाधने देऊन Bottom-up Approach मजबूत करणे. स्वयंसेवी संस्था व समुदाय आधारित संघटनांचा सहभाग वाढवून जागरूकता व मानसिकता परिवर्तन साधणे. धोरणांच्या परिणामांचे नियमित मूल्यांकन (Impact Assessment) करणे.

## संदर्भ सूची


1. Sen, A. (1999). *Development as Freedom*. Oxford University Press.
2. Walby, S. (1990). *Theorizing Patriarchy*. Basil Blackwell.
3. Kabeer, N. (1999). *Resources, Agency, Achievements: Reflections on the Measurement of Women's Empowerment*. Development and Change.
4. Agarwal, B. (2010). "Gender and Green Governance." *Oxford University Press*.
5. Deshpande, A. (2017). "Gender inequality in India." *Indian Journal of Labour Economics*.
6. Jejeebhoy, S. J. (2015). "Women's autonomy and reproductive health." *Population Council*.
7. Government of India. *National Family Health Survey – 5 (2019–21)*.
8. Planning Commission / NITI Aayog. *Gender Budgeting Reports*.
9. Comptroller and Auditor General of India (CAG). *Performance Audit Reports on Women-Centric Schemes*.
10. Ministry of Women and Child Development. *Annual Reports*.

# शासकीय शैक्षणिक धोरण आणि सामाजिक असमानता: समाजशास्त्रीय विश्लेषण

**मिलिंद आर. घाटे** हिस्लॉप कॉलेज, नागपुर

**प्रस्तावना**: भारतातील सर्वात आर्थिकदृष्ट्या विकसित राज्यांपैकी अग्रेसर असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे, ज्या महाराष्ट्रात २०११ व्या जनगणनेनुसार अकरा कोटीपेक्षा जास्त लोकसंख्येचे प्रमाण आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने मराठा समाज, अल्पसंख्याक समुदाय, अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) यासारखे विविध लोक राहतात. उपेक्षित समुदायामधील शैक्षणिक समानता वाढविण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न करण्यात येतात, जसे की शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण, शिष्यवर्त्या, वसतिगृह सुविधा इत्यादी असूनही, महाराष्ट्रातील वंचित समुदायांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळविण्यात मोठे अडथळे येत आहेत. या अडथळ्यांमध्ये सामाजिक-आर्थिक विचार, जातीवर आधारित भेदभाव, कमकुवत पायाभूत सुविधा इत्यादी गरजा पूर्ण करणाऱ्या मध्ये अनेक शासकीय आणि निम्न शासकीय पातळीवरील यंत्रणा कमी पडत आहे. प्रस्तुत शोधनिबंध शिक्षण मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या वंचित समुदायाला येणाऱ्या विविध अडथळ्यांचा शोध घेतो आणि महाराष्ट्राची शैक्षणिक व्यवस्था बदलण्यासाठी सतत सुरू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतो. या लेखात उपेक्षित समुदायाच्या समस्यांच्या मूळ कारणांचे विश्लेषण करून आणि विविध शैक्षणिक दृष्टिकोनांचे मूल्यांकन करून या समुदायांना शैक्षणिक न्याय कसा मिळू शकते यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील वंचित लोकांना शिक्षणाची योग्य प्रवेश मिळण्याच्या समस्येचे गंभीरपणे परीक्षण करण्यासाठी सामाजिक न्याय, समावेशन आणि सक्षमीकरणाशी संबंधित महत्त्वाचे शैक्षणिक सिद्धांत समाविष्ट करणारे सैद्धांतिक चौकट वापरण्यात आले आहे. सामाजिक-आर्थिक घटक, जात-आधारित असमानता, सांस्कृतिक विविधता आणि शैक्षणिक धोरणांच्या परस्परसंवादामुळे महाराष्ट्रातील उपेक्षित समुदायासाठी शैक्षणिक कामगिरी कशी करते याचे विश्लेषण प्रस्तुत निबंधामध्ये आहे.

**साहित्याचे पुनर्वलोकन:** बी वि शाह आणि के बी शाह लिखित "शिक्षणाचे समाजशात्र" (२०२४) या पुस्तकात भारतीय परिस्थितीत शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक नऊ प्रकरणामध्ये विभागून यामध्ये संपूर्ण समाज आणि त्याच्या उपप्रणाली जसे की कुटुंब, राजकारण, अर्थव्यवस्था आणि स्तरीकरण, स्थानिक समुदाय आणि शैक्षणिक संस्था आणि वर्ग यासारख्या सामाजिक समुदायाच्या संदर्भात तसेच अनुसूचित जाती आणि जमातींच्या सामाजिक बदल आणि शिक्षणाच्या समस्यांच्या संदर्भात शिक्षणाचा एक अधिकृत अभ्यास प्रस्तुत पुस्तकामध्ये केला आहे. नवीन समाजशास्त्रीय अंतर्दृष्टी देणारे हे पुस्तक सामाजिक शास्त्राच्या साहित्यात एक अतिशय उपयुक्त योगदान आहे आणि विविध अभ्यासक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी ते महत्वाचे आहे.

आर इंदिरा संपादित केलेल्या "थिम्स इन सोसिओलॉजि ऑफ एडुकेशन" (२०१२) या खंडात शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या क्षेत्रातील सैद्धांतिक दृष्टिकोन आणि अनुभवजन्य अभ्यास यांचे मिश्रण असलेले १२ लेख आहेत. हा खंड चार विभागांमध्ये विभागला गेला आहे: पहिला विभाग शिक्षणाला सामाजिक व्यवस्था म्हणून हाताळतो; दुसरा विभाग अल्पसंख्याक आणि महिलांच्या शिक्षणाच्या समस्या आणि चिंतांवर लक्ष केंद्रित करतो; तिसरा विभाग शैक्षणिक धोरणांच्या निर्मिती आणि अंमलबजावणीमध्ये ज्या प्रमुख मुद्द्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे त्यावर लक्ष केंद्रित करतो; आणि शेवटचा विभाग शिक्षणाचे माध्यम म्हणून स्थानिक भाषेचा स्वीकार आणि बुद्धिजीवींच्या भूमिकेतील गंभीर अंतर्दृष्टीशी संबंधित काही प्रमुख मुद्द्यांचे परीक्षण करतो. या खंडाचा सारांश असा आहे की शिक्षण ही मुळात एक सामाजिक संस्था आहे जी सामाजिक बदलांना प्रतिसाद देणारी असली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात मात्र चित्र थोडेशे वेगळे दिसते.

प्रोफेसर जगन कराडे संपादित केलेले कास्ट बेस्ड एक्सक्लुजन (२०१५) या पुस्तकामध्ये प्रमुखतः महाराष्ट्रातील अनेक समाजशातत्रांच्या अभ्यासकांनी आपले संशोधनपर लेख लिहिलेले आहेत. हे पुस्तक महाराष्ट्रातील जाती-आधारित बहिष्कार ही एक गुंतागुंतीची घटना आहे ज्यामध्ये, बहुआयामी आणि विविध परिणामांचा शोध घेते. भारतातील जातीने केवळ भारतीय समाजाची आणि त्याच्या लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेची रचना केली नाही तर भारतातील बहिष्काराचे सर्वात कठोर माध्यम देखील आहे, असे अनेक अभ्यासकांनी प्राथमिक तथ्यांच्या आधारे नमूद केले आहे.. अनादी काळापासून, जातीच्या पदानुक्रमाच्या तळाशी असलेल्यां उपेक्षित समाजाला सर्वात जास्त त्रास सहन करावा लागला आहे. त्यांना बहिष्कृतांमध्ये वगळण्यात

आले आहे. दैनंदिन जीवनात आणि नातेसंबंधांमध्ये सीमांतीकरण आणि वंचिततेचे भित्तिचित्र आणि गांभीर्य समजून घेण्यासाठी भेदभावाच्या प्रक्रियेला समग्र समज समजून घेणे आवश्यक आहे. जाती-आधारित बहिष्कारावरील समकालीन प्रवचन आतापर्यंत 'बाहेरील आणि वरच्या' दृष्टिकोनातून समस्येचे आकलन करण्यावर केंद्रित आहेत. हा खंड 'आतील आणि बाहेरील दृष्टिकोनांवर विचार प्रदान करतो आणि आपल्या समाजात दलितांनी अनुभवलेल्या अलगावच्या व्यापकता, परिमाण आणि संरचनेचे संपूर्ण वर्तुळ व्यापण्याचा प्रयत्न करतो आणि सुधारणांसाठी दृष्टिकोन देखील सुचवतो.

**संशोधन पद्धतिशास्त्र:** प्रस्तुत सांशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला कारण यामध्ये उपलब्ध साहित्याचे पुनर्वलोकन करून सामाजिक संरचना आणि उपेक्षित समाजाच्या शैक्षणिक संधीसाठी अडथळे कसे निर्माण करतो, याचा शोध घेतला आहे (राम अहुजा: १३८). तथ्य संकलन करण्यासाठी दोन्ही स्रोतांचा, प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा उपयोग केला आहे. उपर्युक्त पेपर साठी प्रकाशित साहित्य आणि तथ्यांचा उपयोग करून इथे उपेक्षित समुदयाना शैक्षणिक समान संधीची मुबलकता आहे याचे विश्लेषण केले आहे.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये:** प्रस्तुत अध्ययन करण्यासाठी संशोधक उपयुक्त साहित्याचे पुनर्वलोकन करून संशोधन पेपर लिहिण्यासाठी खालील प्रकारचे उद्दिष्टयाची निर्मिती करून त त्या उद्दिष्ट्या पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न या पेपर मध्ये केला आहे.

१. उपेक्षित समुदायाला शैक्षणिक समान संधी मिळते का ? त्याचे विश्लेषण करणे.

२. उपेक्षित समुदायामध्ये शिक्षणामुळे झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

३. उपेक्षित समाजाच्या शैक्षणिक मागासलेपणासाठी जबाबदार घटकांची चर्चा करणे

**सैद्धांतिक पार्श्वभूमी:** वरील अध्ययनासाठी आणि उपेक्षित समाजाची शैक्षणिक स्थिती समजून घेण्यासाठी प्रामुख्याने सामाजिक न्यायाचा सिद्धांत, सामाजिक पुनरुत्पादन आणि अमर्त्य सेन यांचा क्षमता सिद्धांचा उपयोग केला आहे. हे तिन्ही सिद्धांत सीमांतिकारणासाठी जबाबदार असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि संरचनात्मक घटकांचे स्पष्टीकरण देते.

**सामाजिक न्याय सिद्धांत:** सामाजिक न्याय सिद्धांत शैक्षणिक प्रणालींवर समता, निष्पक्षता आणि संसाधनांच्या उपलब्धतेचे परिणाम पाहण्यासाठी एक दृष्टिकोन प्रदान करतो. ही संकल्पना शिक्षणाला अधिक सामाजिक न्याय आणि मूलभूत हक्क मिळविण्याचे साधन म्हणून पाहते. न्याय्य समाज स्थापन करण्यासाठी, जॉन रॉल्स आणि मार्था नुसबॉम सारख्या प्रमुख विचारवंतांनी समान संसाधन आणि संधी वितरणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. महाराष्ट्रातील उपेक्षित समुदायांमध्ये दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीयांना ज्या संरचनात्मक अन्यायांना तोंड द्यावे लागते त्या शैक्षणिक प्रणाली कशा सोडवू शकतात याचे परीक्षण करण्यास सामाजिक न्याय सिद्धांत मदत करतो.

**क्षमता दृष्टिकोन:** अमर्त्य सेन यांनी तयार केलेल्या आणि नंतर मार्था नुस्बॉम यांनी विस्तारित केलेल्या क्षमता दृष्टिकोनाचा मुख्य केंद्रबिंदू म्हणजे लोक ज्या वास्तविक क्षमता किंवा स्वातंत्र्यांचा वापर करू शकतात ते क्षमता दृष्टिकोन आहे. हा सिद्धांत असा युक्तिवाद करतो की शिक्षणाच्या चौकटीत, संसाधने (जसे की शाळा आणि शिक्षक) प्रदान करण्याव्यतिरिक्त, समाजात पूर्णपणे सहभागी होण्याची व्यक्तीची क्षमता वाढवणे हे प्राधान्य असले पाहिजे. या प्रतिमानातून वंचित लोकसंख्येला त्यांच्या पूर्ण शैक्षणिक क्षमतेपर्यंत पोहोचण्यापासून रोखणारे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अडथळे दूर करण्याचे महत्त्व अधोरेखित होते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील उपेक्षित समाजातील मुलांना भाषिक असमानता किंवा सांस्कृतिकदृष्ट्या योग्य अभ्यासक्रमाचा अभाव यासारख्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागू शकते, ज्यामुळे अधिकृत शैक्षणिक व्यवस्थेत भरभराटीची त्यांची क्षमता मर्यादित होते. क्षमता दृष्टिकोनानुसार, शैक्षणिक प्रणालींनी लोकांना त्यांची क्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांचा सामाजिक आणि आर्थिक समावेश करण्यासाठी सरकार कडून प्रयत्न केले पाहिजे आणि जे काही उपेक्षित समाजाच्या मार्गात येणारे अडथळे दूर केले पाहिजे.

**सामाजिक पुनरुत्पादन सिद्धांत:** शैक्षणिक व्यवस्था पिढ्यानपिढ्या सामाजिक अन्याय कसा सहन करतात हे समजून घेण्यासाठी एक समाजशास्त्रीय पाया पियरे बॉर्डीयूच्या सामाजिक पुनरुत्पादन सिद्धांताद्वारे प्रदान केला जातो. बॉर्डीयूचा असा युक्तिवाद आहे की शैक्षणिक व्यवस्था सामाजिक पुनरुत्पादनासाठी साधने म्हणून काम करतात, ज्यामुळे श्रीमंत कुटुंबातील लोकांना शाळेत यशस्वी होण्यास मदत करणारे सामाजिक आणि सांस्कृतिक भांडवल तयार करता येते. दुसरीकडे, संरचनात्मक अडथळे दुर्लक्षित गटांना शाळेत त्यांची पूर्ण क्षमता साध्य करण्यापासून रोखतात. जसे की महाराष्ट्रात, जिथे वंचित लोकांकडे वारंवार आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संसाधनांचा अभाव असतो (जसे की भाषा प्रवीणता, माहिती, किंवा सामाजिक नेटवर्क) जे मुख्य प्रवाहातील शैक्षणिक प्रणालींद्वारे महत्वपूर्ण असतात, तिथे बॉर्डीयूची सांस्कृतिक भांडवलाची संकल्पना इथे उपक्षितांच्या शैक्षणिक परिवर्तन

समजून घेण्यासाठी मदत करते. हा प्रबंध स्पष्ट करतो की शैक्षणिक व्यवस्था अनावधानाने श्रीमंत उच्च जातीतील मुलांना सामाजिक गटांमधील विद्यार्थ्यांना प्राधान्य कसे देतात, ज्यामुळे समाजामध्ये कायम गरिबी आणि सीमांतीकरणाचे चक्र कायम राहते. या संरचनात्मक समस्यांना संबोधित केले पाहिजे आणि वंचित समुदायांना शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यासाठी केलेल्या हस्तक्षेपांमध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये सांस्कृतिक भांडवलाचे महत्त्व मान्य केले पाहिजे.

**शिक्षणाच्या समान संधीतील अडथळे:** अस्पृश्यतेच्या प्रथांमुळे ज्या जाती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत त्यांचा समावेश अनुसूचित जातींमध्ये केला जातो. कारण अस्पृश्यता प्रथा फक्त हिंदूंमध्येच प्रचलित आहे. भौगोलिक वेगळेपणा, जीवनशैली आणि संस्कृतीची वेग-वेगळी पद्धत आणि आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक हे त्यांच्या मागासलेपणाचे आधार आहेत. म्हणून खालील मुद्याच्या आधारे उपेक्षितांचे मागासलेपण समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक-आर्थिक विषमता:** महाराष्ट्रातील उपेक्षित लोकसंख्येची सामाजिक-आर्थिक स्थिती ही शिक्षणाच्या न्याय्य प्रवेशातील मुख्य अडथळ्यांपैकी एक आहे. या उपेक्षित समुदायातील अनेक कुटुंबे गरीब आहेत आणि त्यांच्याकडे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसे नसतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्राच्या ग्रामीण जिल्ह्यांमध्ये, विशेषतः आदिवासी भागात, शाळा, कुशल शिक्षक आणि पायाभूत सुविधांसारख्या मूलभूत शैक्षणिक सुविधांचा वारंवार अभाव आहे. कमी उत्पन्न असलेल्या मुलांना त्यांच्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी वारंवार काम करावे लागते, ज्यामुळे त्यांच्या शिक्षणाच्या प्रवेशावर मर्यादा येतात. त्याच बरोबर आर्थिक विषमता ही अनेक क्षेत्रामध्ये आढळून येते त्यामध्ये भांडवली बाजापेठ, रिअल इस्टेट, आणि उद्योग इ.मध्ये पाहायला मिळते. (*जगन कराडे: ८१*)

**जाती-आधारित भेदभाव:** जरी संविधानाने जाती-आधारित भेदभाव करण्यास मनाई केली असली तरी, वंचित गटांना - विशेषतः दलित आणि आदिवासींना - शैक्षणिक व्यवस्थेत पूर्वग्रह अनुभवायला मिळत आहे. धमकावणे, सामाजिक कार्यक्रमांमधून वगळणे आणि शिक्षकांकडून कमी अपेक्षा ही शाळांमध्ये भेदभाव दिसून येतो याची काही उदाहरणे आहेत. शिक्षण, गृहनिर्माण आणि आरोग्य या क्षेत्रातील सरकारी किंवा खाजगी संस्थांकडून पुरवल्या जाणाऱ्या सामाजिक गरजा पूर्ण करण्यात बहिष्कार आणि भेदभाव सर्रासपणे केला जातो आणि परिणामी शाळा-महाविद्यालयामध्ये लक्षणीय गळतीचे प्रमाण अनुभवायला मिळते. ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी आजही जाती आधारित भेदभाव प्रत्येक सार्वजनिक आणि खागजी क्षेत्रामध्ये होते, प्रत्येक गावामध्ये खासकरून दलित आणि आदिवासी समाजाचे वास्तव्य एका विशिष्ठ दिशेला असते, अशुभ दिशेला स्वतंत्र वसाहत () असते ज्याचा परिणाम उच्च जातीतील मुलां मध्ये भेद करण्याची जणू प्रशिक्षण दिले जाते, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की बी.आर. आंबेडकर म्हणाले, "गाव म्हणजे, अज्ञानाचे, संकुचित विचारांचे आणि सांप्रदायिकतेचे अड्डे आहेत *(जगन कराडे: ५३).*

**उच्च गळतीचे दर:** भारतीय समाजामध्ये उपेक्षित समाजासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, शैक्षणिक प्रवेश वाढवण्यासाठी पुढाकार असूनही, उच्च गळतीचे दर, ही एक मोठी समस्या आहे, विशेषतः ओबीसी, एससी आणि एसटी कुटुंबातील मुलांसाठी आणि त्यांच्या समाजासाठी चिंतेची बाब आहे. आरक्षणाच्या माध्यमातून उपेक्षितांचे प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात पण मर्यादित जागा असल्यामुळे अनेक बुद्धिवान, हुशार विध्यार्थी प्रवेशअभावी पुढील शिक्षणापासून वंचित होत आहेत. सांस्कृतिक घटक, बालमजुरी, बालविवाह आणि आर्थिक मर्यादांमुळे ही समस्या आणखी वाढली आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण करावे याची खात्री करण्यासाठी, या मूलभूत समस्यांचे निराकरण करणे अत्यावश्यक आहे.

**अपुरी पायाभूत सुविधा आणि संसाधने:** महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायातील दलित आणि आणि आदिवासी समाजातील मुले अनेक शाळा आणि शाळेतील मुले मर्यादित शिक्षण संसाधने, पात्र शिक्षकांची कमतरता आणि निकृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांशी झुंजत आहेत. पुरेशा वर्गखोल्या, स्वच्छता सुविधा आणि शैक्षणिक साहित्याच्या अभावामुळे वंचित समुदायातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी यशस्वीरित्या संवाद साधणे कठीण जाते. आधुनिक काळामध्ये तर डिजिटल विभाजनामुळे ही समस्या आणखी बिकट झाली आहे. कारण उपेक्षित समाजाची आर्थिक स्थिती कमजोर असल्यामुळे त्यांना इंटरनेट, मोबाइल आणि इतर डिजिटल साधने घेण्याची ऐपत नसल्यामुळे वंचित समुदायाच्या विध्यार्थ्यांच्या अडचणीत वाढ झालेली पाहायला मिळते.

**भाषा आणि सांस्कृतिक अडथळे:** समाजशास्त्रात शिक्षणाची चिकित्सा करणारे सॅम्युअल बाउल आणि हरबर्ट गिंथीस, असा युक्तिवाद करतात की शैक्षणिक आणि आर्थिक व्यवस्थेतील पद किंवा नौकरी केवळ गुणवत्तेवर आधारित असतात, या मतांना ते नाकारतात, त्यांचा असे म्हणतात की शैक्षणिक आणि व्यावसायिक प्राप्ती प्रतिभा आणि क्षमतेपेक्षा कौटुंबिक पार्श्वभूमीशी संबंधित आहे. त्यामुळे उपेक्षित समजतील मुलांना नेहमीच

ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

संघर्ष करावा लागतो. कारण श्रीमंत आणि राजकीय, जातीय शक्तिशाली लोकांची मुले त्यांच्या क्षमतेकडे दुर्लक्ष करून उच्च पात्रता आणि उच्च पद असलेल्या नोकऱ्या मिळवतात *(हारलोम्बस: १८४).* अनेक शाळांचे अभ्यासक्रम मुख्य प्रवाहातील समुदायातील विद्यार्थ्यांसाठी तयार केले जातात आणि ते नेहमीच भाषिक आणि सांस्कृतिक विविधता विभागलेली समुदायाला विचारात घेत नाहीत. उदाहरणार्थ, अनेक आदिवासी मुले त्यांच्या स्वतःच्या स्थानिक भाषा बोलतात, ज्या पाठ्यपुस्तकांमध्ये किंवा शिक्षणाच्या माध्यमात वारंवार दर्शविल्या जात नाहीत. भाषेच्या अडथळ्यामुळे हे विद्यार्थी वर्गात पूर्णपणे सहभागी होऊ शकत नाहीत, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर परिणाम होऊ शकतो.

**सारांश:** अशाप्रकारे महाराष्ट्रातील वंचित किंवा उपेक्षित लोकांसाठी शैक्षणिक समान संधी या महत्त्वाच्या समस्येवर सरकार, नागरी समाज आणि इतर भागधारकांनी लक्ष केंद्रित करणे आणि त्यावर कारवाई करणे आवश्यक आहे तेव्हाच दलित आदिवासी समाजामध्ये शैक्षणिक परिवर्तन घडून येऊ शकते.. सामाजिक-आर्थिक असमानता, भेदभाव, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक अडथळ्यांमुळे उपेक्षित समुदायांच्या शैक्षणिक कामगिरीत अजूनही अडथळा येत आहे, जरी कायदे आणि शिक्षणाची प्रवेश क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने केलेल्या प्रयत्नांनी लक्षणीय प्रगती केली आहे तरीसुद्धा शैक्षणिक परिवर्तन साध्य करण्यासाठी प्रवेशाबरोबरच शिक्षणाची गुणवत्ता आणि विविधतेवर लक्ष केंद्रित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र वंचित समुदायाला सक्षम करणारी आणि समन्वित प्रयत्नांनी प्रत्येक मुलाच्या यशाची हमी देणारी अधिक समान शैक्षणिक व्यवस्था निर्मण करून संधीची समानता राबिविली पाहिजे, तेंव्हा उपेक्षित समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन शक्य आहे.

**संदर्भ सूची:**


1) Karade, J. (2015). *Caste based exclusion*. Rawat Publication.
2) Shah, B. V., & Shah, K. B. (1998). *Sociology of education*. Rawat Publication.
3) Thorat, S. (2017). *Memorandum on untouchability, caste discrimination and atrocities in Maharashtra*. Sugava Publication.
4) Indira, R. (2012). *Themes in sociology of education*. Sage Publications.
5) Haralambos, M. (2010). *Sociology: Themes and perspectives*. Oxford University Press.
6) Narwani, G. S. (2011). *Atrocities against scheduled castes and scheduled tribes*. Rawat Publications.
७) आहुजा, रा. (२०१७). *सामाजिक अनुसंधान.* रावत पब्लिकेशन.
८) कुंडले, म. बा. (२०१२). *शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र.* श्रीविद्या प्रकाशन.
९) महाजन, ध. (२०१३). *जनजातीय समाज का समाजशास्त्र.* विवेक प्रकाशन.

# जातीव्यवस्थेतील सामाजिक असमानता शासकीय धोरणे आणि उपाययोजना

**प्रा. अनिल गावंडे** समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य (सायंम) महाविद्यालय, नागपूर

**सारांश:** Social inequality या शब्दाचा मराठीत अर्थ 'सामाजिक असमानता' किंवा 'सामाजिक विषमता' असा होतो. 'समान नसलेल्या गोष्टी, संधी किंवा परिस्थिती दर्शवण्यासाठी केला जातो. सामाजिक असमानता म्हणजे उत्पन्न, शिक्षण, आरोग्यसेवा, संधी आणि संसाधनांचे अयोग्य वाटप, ज्याचे परिणाम वंश, जात, लिंग इत्यादी घटकांवर अवलंबून असतात. सामाजिक असमानता तेव्हा घडते जेव्हा संसाधने, विशेष अधिकार, आणि संधीचे समाजातील गटांमध्ये, विशेष अधिकार आणि संधीचे समाजातील गटांमध्ये असमान वितरण होते. ज्यामुळे उत्पन्न, शिक्षण, आरोग्य सेवा आणि न्याय, यासारख्या गोष्टींवर परिणाम होतो. ही असमानता अनेकदा जात, वंश, लिंग, वर्ग आणि इतर समाजातील घटकांमुळे निर्माण होते. यामुळे सामाजिक असंतोष आणि सामाजिक समस्या निर्माण होऊ शकतात.

सामाजिक असमानता कमी करण्यासाठी शासकीय धोरणे आर्थिक आणि सामाजिक संसाधनांचे समान वितरण करणे, शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करणे, सामाजिक सुरक्षा प्रदान करणे, भेदभावाशी लढा देणे आणि दुर्बळ गटांना आधार देणे यावर भर देतात. हे धोरणे उत्पन्न आणि संपत्तीचे विषमता कमी करणे, तसेच शिक्षण आरोग्य सेवा आणि संधीमध्ये समानता आणणे यासारख्या सामाजिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी तयार केली जातात.

**बीजसंज्ञा:** सामाजिक असमानता, लिंग, शिक्षण, आरोग्य सेवा, संधी, जाती व्यवस्था, उत्पन्न, न्याय, विशेष अधिकार, शासकीय धोरणे, सामाजिक सुरक्षा, दुर्बल घटक, संपत्तीची विषमता, कौशल्य विकास, सामाजिक समस्या इ.

**प्रस्तावना:** भारतीय समाज व्यवस्थेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास असे आढळून येते की, भारतीय समाज व्यवस्था ही जातिव्यवस्थेवर आधारित आहे. जातीव्यवस्थेशिवाय समाजाचा विचार करता येत नाही. जाती व्यवस्था भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत आधार आहे. भारतीय समाजात लोकांचा दर्जा समान नाही. व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीनुसार निश्चित होतो. म्हणून भारतीय समाजाचे संरचना ही विषमताधीळीत जातिव्यवस्थेवर आधारित आहेत.

असमानता किंवा विषमता म्हणजे भेद किंवा फरक होय. सामाजिक असमानता किंवा विषमता म्हणजे समाज आणि समाजातील परंपरा, मूल्य आणि प्रमाणकाद्वारा कास मान्य केलेली असमानता किंवा विषमता होय.

**अध्ययनाचा उद्देश्य:** १) सामाजिक असामान्यतेचे स्वरूप समजून घेणे, २) ऐतिहासिक आणि संरचनात्मक कारणांचा शोध घेणे, ३) शासकीय धोरणांचे मूल्यांकन करणे, ४) वंचित घटकांचे सक्षमीकरण करणे, ५) जातीव्यवस्थेच्या परिणामांचे विश्लेषण करणे, ६) धोरणांमध्ये सुधारणा सुचविणे.

**अध्ययनाची गृहितके:** १) जातिव्यवस्था अजूनही अस्तित्वात आहे. आणि ते सामाजिक आर्थिक विषमतेचे मूल्य कारण आहे. २) शासकीय धोरणे असूनही, जातीय भेदभाव आणि त्यातून निर्माण होणारे असमानता कमी झालेली नाही असे मानले जाते. ३) वाचन घटकांचे सक्षमीकरण आणि न्यायपूर्ण विकासासाठी धोरणे अपुरी आहेत, असे गृहीत धरले जाते.

**संशोधन पद्धती:** जातिव्यवस्थेतील सामाजिक असमानता आणि शासकीय धोरणांच्या अभ्यासासाठी कोणात्मक आणि संख्यात्मक संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये सर्वेक्षण, मुलाखती, केस स्टडीज आणि सरकारी अहवाल, डेटा विश्लेषण यांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये ऐतिहासिक, समाजशास्त्रीय आणि धोरणात्मक दृष्टिकोन वापरून सामाजिक - आर्थिक स्थिती, मानवी हक्क, आणि धोरणांची अंमलबजावणी तपासले जाते.

**सामाजिक असमानता:** सामाजिक असमानता तेव्हा उदभवते जेव्हा समाजात संसाधने असमानपणे वितरित केले जातात. ज्यामध्ये व्यक्तींच्या सामाजिक आधारावर श्रेष्ठ - कनिष्ठ असे श्रेणी तयार होते. संसाधनाचे असमान वितरण काही निकषाद्वारे घडून येते यामुळे समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, लैंगिक इत्यादी असमानता दिसून येते. समाजात सामाजिक संसाधनाचे असमान वितरण शक्ती, धर्म, परस्पर संबंध, प्रतिष्ठा, वंश, लिंग, वय आणि वर्ग याद्वारे केले जाते सामाजिक असमानता सामान्यतः परिणामांच्या समानतेच्या अभावाचा संदर्भ देते उदा. सामाजिक अर्थव्यवस्थांमध्ये असमानता ज्या पद्धतीने मांडली जाते. आणि या आधारावर कार्यक्षम असलेल्या अधिकाऱ्यांशी संबंधित आहे. तर सामाजिक हक्कांमध्ये वेतन, उत्पन्नाचे स्त्रोत, आरोग्य सेवा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षण, प्रतिनिधित्व आणि राजकारणातील सहभाग यांचा समावेश होतो. समाजशास्त्रज्ञ समाजातील मौल्यवान संसाधने, पुरस्कार, आणि सामाजिक पदांच्या

असमान वितरणाचे वर्णन करण्यासाठी सामाजिक असा मानता हा शब्द वापरतात.

**असमानतेचा अर्थ व व्याख्या:** सामाजिक असमानता ही समाजशास्त्रातील एक मूलभूत संकल्पना आहे. समाजात सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा, यांचे विषम पद्धतीने वितरण झालेले असते त्यामुळे समाजातील व्यक्ती, समूहात व समाजात असमानता निर्माण होते. असमानता म्हणजे विषमता होय. थोडक्यात आपण म्हणू शकतो की सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, धर्म, जात, वंश, लिंग, स्थान या आधारे समाजात आढळून येणारे असमानता म्हणजे विषमता होय. "समाजातील व्यक्ती-व्यक्ती, किंवा समूहा-समूहात विशेषाधिकार, भौतिक पारितोषिके, संधी, सत्ता, प्रतिष्ठा, प्रभाव यांचे होणारे विषम वितरण होय.

**सामाजिक असमानतेचे प्रकार:** १. राजकीय असमानता, २. आर्थिक असमानता, ३. सामाजिक असमानता, ४. लैंगिक असमानता, ५. वांशिक असमानता, ६. वय असमानता, ७. स्वास्थ्य असमानता.

**सामाजिक असमानतेची कारणे:** १. सामाजिक असमानता, २. आर्थिक असमानता, ३. सामाजिक रचना, ४. बेरोजगारी, ५. अल्पशिक्षण

**सामाजिक असमानता (विषमता)चे प्रकार:** प्रत्येक देशात सामाजिक असमानतेचे स्वरूप एकसारखे नाही. सामाजिक विषमतेचे आधार देखील वेगवेगळे आहेत. मार्क्स आणि वेबर यांनी देखील सामाजिक विषयामते बद्दल आपले विचार मांडले आहेत. आर्थिक विषमतेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते असे म्हटले आहे. तर मॅक्स वेबर यांच्या मते, वर्ग, दर्जा, आणि सत्ता या आधारावर समाजात विषमता निर्माण झाली आहे.

**सामाजिक विषयामध्ये चे पुढील तीन प्रकार आहेत:** १. वर्गाची विषमता, २. दर्जाची विषमता, ३. सत्तेची विषमता या तीन प्रकारच्या विषमतेपैकी दर्जाची विषमता जातीच्या विषमतेशी संबंधित आहे. रुन्सीमनच्या मते, सामाजिक गुणविशेष आतील फरक आणि जीवनशैली ज्यामुळे श्रेष्ठ केव्हा कनिष्ठा प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होते, या सर्वांचा समावेश दर्जाच्या विषमतेमध्ये केला जातो.

दर्जा हा समाजाद्वारे निश्चित केला जातो. म्हणून सामाजिक दर्जाच्या आधारावर जी विषमता निर्माण होते, त्यास सामाजिक विषमता म्हणतात. या विषमतेलाच रुन्सीमन यांनी दर्जाची विषमता म्हंटले आहे.

**जातिव्यवस्था:** भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने वर्णव्यवस्था आणि जातीसंस्थेवर आधारित आहे. जातिव्यवस्था ही एक सामाजिक संस्था असून त्यास हिंदुधर्माचे मान्यता असल्यामुळे जातीव्यवस्थताशेकडो वर्षांपासून ती कोण आहे. भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरून निश्चित होतो. व्यक्तीची ओळख त्याच्या गुण किंवा कर्तुत्वावरून दिली जात नाही. तर जातीच्या आधारावर व्यक्तीची ओळख करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. भारतीय समाज व्यवस्थेवर सातव्यवस्थेचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. वर्ग आणि जाती या वेगवेगळ्या संकल्पना आहे. वर्ण व्यवस्थेमुळे भारतीय समाजाचे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णनात विभाजन झाले होते. तर जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजाच्या शेकडून जाती आणि उपजातीत विभाजन झाले होते. प्राचीन काळे भारतीय समाजात प्रथम वर्ग व्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर जातिव्यवस्था निर्माण झाली. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजात असमानता (विषमता) निर्माण झाली. वर्ण आणि जाती या जन्मावर आधारित असल्यामुळे व्यक्तीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा हा जन्मताच निश्चित होतो.

**जातीचा अर्थ व्याख्या:** 'जात' हा शब्द 'जन'या धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ जन्म असा आहे. एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जात ला इंग्रजी मध्ये 'cast' म्हणतात. 'Cast' हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज 'casta' या शब्दावरून बनला आहे. 'Casta' या पोर्तुगीत शब्दांची उत्पत्ती 'castus' या लॅटिन भाषेतील शब्दातून झाली. 'Castus' या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे.

**व्याख्या:** डॉ. बी आर आंबेडकर यांच्या मते, "बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे होय. जात हा एक बंद झालेला वर्ग होय." चार्लस कुले यांच्या मते, "जेव्हा वर्ग अनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेला असतो, तेव्हा त्याला जात असे म्हणतात".

**जातीची वैशिष्ट्ये:** १.समाजाचे खंडात्मक विभाजन, २.श्रेष्ठ-कनिष्ठता, ३.रोटी व्यवहार आणि सामाजिक संबंधांवर निर्बंध, ४.सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेषाधिकार, ५.व्यवसाय निवडीवर निर्बंध, ६.विवाहावर निर्बंध, ७.धार्मिक आधारावर.

**जातीव्यवस्थेमुळे सामाजिक असमानतेवर (विषमतेवर) झालेला परिणाम:** जाती व्यवस्था विषमतेवर आधारित आहे. त्यामुळे जातीच्या गुणांपेक्षा जातीचे दोषच अधिक आहेत. भारतीय समाजात जाती विषमता किंवा भेदभाव ही फार मोठी सामाजिक समस्या आहे. जाती विषमतेमुळे भारतीय समाजात विविध प्रश्न निर्माण झाले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा अभाव जातीव्यवस्थेत असल्यामुळे शूद्र आणि अस्पृश्य लोकांच्या मानवी अधिकारांच्या हणन झाले. जातिवाद, अस्पृश्यता, सामाजिक शोषण इत्यादी समस्या जातिभेदामुळे निर्माण झालेल्या आहेत. जातीभेदामुळे एक संघ असा भारतीय समाज निर्माण होऊ शकला नाही. व्यक्ती आणि सामाजिक विकासामध्ये

जातिभेद हा फार मोठा अडथळा आहे. भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास केवळ जातिभेदामुळे होऊ शकला नाही. शूद्र आणि अस्पृश्य जातीच्या लोकांना मानवी अधिकाऱ्यांपासून वंचित ठेवण्यात आले होते.

**जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी झालेले प्रयत्न:** विषमता हाच जातीव्यवस्थेचा पाया आहे. विषमतेवर आधारित असलेली ही व्यवस्था बदलविण्यासाठी प्राचीन काळापासून अनेक प्रयत्न करण्यात आलेत. जातीव्यवस्था आणि जातीभेदाला सर्वप्रथम विरोध अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्ध यांनी केला होता. गौतम बुद्धाने जातिव्यवस्थेवर कडाडून विरोध केला. त्यांनी ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारले, जातीतील सर्व माणसे समान आहेत, समाजात समता असल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकणार नाही हा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला. तसेच संत चोखामेळा, रविदास यांनी सुद्धा जातीभेदाला विरोध केला. राजा राम मोहन रॉय, केशव चंद्रसेन, महात्मा ज्योतिबा फुले, स्वामी दयानंद सरस्वती, छत्रपती शाहू महाराज, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता, जातीप्रथा नष्ट करणे, धार्मिक अंधश्रद्धा दूर करणे, इत्यादी कार्य केले.

**जातिव्यवस्थेतील परिवर्तन करण्यास सहाय्यभूत घटक:** व्यवसाय व खानपान निर्बंधात परिवर्तन ब्राह्मणांचे प्रभुत्व घटले, विवाह संबंधीच्या प्रतिबंधांमध्ये परिवर्तन, अस्पृश्यतेचे निर्मूलन, पाश्चात्य शिक्षण प्रणाली, वैज्ञानिक विचारसरणी, औद्योगीकरण, नागरीकरण, नवीन व्यवसाय, सामाजिक चळवळ, लोकशाही मूल्य, कायदे आणि शासकीय प्रयत्न इ.

**कायदे, शासकीय धोरणे:** जातीव्यवस्थेचा सामाजिक जीवनावर अतिशय वाईट परिणाम झाला. हे लक्षात घेऊन शासनातर्फे विशेष प्रयत्न करण्यात आले. इंग्रजी सरकारने १८५० मध्ये विवाहातील जाती बंधन निर्मूलनाचा कायदा केला. त्यानंतर वेगवेगळे कायदे करून इंग्रजांनी जातीप्रथेमुळे निर्माण झालेले सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात आली. राज्यघटनेच्या पंधराव्या कलमानुसार राज्यातील नोकऱ्या आणि पदांवर नियुक्ती करण्यासाठी सर्व नागरिकांना समान संधी देण्यात आली. धर्म, वंश, जन्म, जात, लिंग, जन्मस्थान व निवास या आधारावर भेदभाव पाळण्यास कायद्याने मनाई करण्यात आली. सतराव्या कलमानुसार जाती व्यवस्थेतून निर्माण झालेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आली. विवाह कायदा १९५४ अस्पृश्यता अपराध कायदा १९५५ इत्यादी अनेक कायदे केले. जाती प्रथा नष्ट करण्याच्या संदर्भात शासकीय स्तरावर अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. शासकीय कायदे आणि प्रत्यक्ष शासकीय धोरणांमुळे सार्वजनिक ठिकाणी जातीप्रथा पाळण्याचे धाडस कोणी करीत नाही.

**सामाजिक असमानता किंवा विषमतेची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना:** सर्व उत्पन्न स्तरावरील लोकांना वाजवी किमतीत चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्रयत्न केला जावा. असमान वेतनाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासकीय स्तरातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. चांगल्या नोकऱ्यांच्या तरतुदीबरोबरच प्रशिक्षण आणि नवीन कौशल्य विकसित करण्याच्या संधी उपलब्ध कराव्यात. देशभरात अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. शासनाने सर्वसामान्य जनतेवर लावलेले कर समान असले पाहिजेत.

**निष्कर्ष:** थोडक्यात सामाजिक असमानता आर्थिक असमानतेशी संबंधित आहे. त्यांचे वर्णन सामान्यतः उत्पन्न किंवा संपत्तीच्या असमान वितरणावर आधारित आहे. अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र मध्ये आर्थिक असमानतेची परीक्षण आणि स्पष्टीकरण देण्यासाठी सामान्यता भिन्न सिद्धांत दृष्टिकोनांचा वापर केला जातो. तथापि दोन्ही शास्त्रे असमानतेच्या संशोधनात सक्रीयपणे गुंतलेली आहेत. शुद्ध आर्थिक संसाधना व्यतिरिक्त इतर सामाजिक आणि नैसर्गिक संसाधने देखील बहुतेक समाजामध्ये असमान पणे वितरित केली जातात. सामाजिक असमानता जवळजवळ प्रत्येक समाजात आढळते. कारण ती नैसर्गिक आहेत. आणि ती व्यक्ती-व्यक्तींमधील अंतर निहित फरक प्रतिबिंबित करते. सामाजिक असमानता भौगोलिक स्थान किंवा नागरिकत्वाची स्थिती यासारख्या अनेक संरचनात्मक घटकांद्वारे आकारली जाते.

**संदर्भ:**


१) आगलावे, प्रदीप. (२००१). समाजशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.

२) लोटे, रा. ज. (२०१६). समाजशास्त्र विषय आणि संकल्पना पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

३) आगलावे, प्रदीप. (२०१६). समाजशास्त्र परिचय. साईनाथ प्रकाशन, नागपूर

४) घुर्ये, जी. एस. (१९६९) कास्ट अॅण्ड रेस इन इंडिया, पापुलर बुक प्रकाशन

५) आहूजा, राम. (१९९३) भारतीय सामाजिक व्यवस्था, रावत पब्लिकेशन, जयपुर

६) राजश्री शाहू स्मारक ग्रंथ -डॉ. जयसिंगराव पवार (संपादक) महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर जानेवारी २००१

७) केतकर, डॉ. एस. व्ही. (१९०९) भारतीय जातिव्यवस्था

८) कर्वे डॉ. इरावती - किंन शिप ऑर्गनायझेशन इन इंडिया.

९) मुखर्जी, रवींद्रनाथ. (१९७६) भारत अग्रवाल, प्रारंभिक समाजशास्त्र, सरस्वती सदन

१०) देसाई डॉ. आय पी भारतातील संयुक्त कुटुंब पद्धती.

# ग्रामीण समाजव्यवस्थेतील असमानता आणि बदलती जीवनशैली

**डॉ. किशोर उत्तमराव राऊत** प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**सारांश:** 'ग्रामीण समाजव्यवस्थेतील असमानता आणि बदलती जीवनशैली' या विषयासंदर्भात या विषयाचे विश्लेषणात्मक अध्ययन करताना ग्रामीण क्षेत्रात आजही जाती, धर्म, पंथ, भाषा,वर्ग यावर आधारित बऱ्याच प्रमाणात विभिन्नता, यातूनच त्यांच्यातील असमानता आढळून येते. गावाची रचना पाहता गावातही विशिष्ट प्रकारची वस्ती, आढळून येते. ज्या जातीची संख्या अधिक आहे, अशा जातीचे वर्चस्व पिढ्यानपिढ्यापासून गावांवर असल्याचे दिसून येते, त्यामुळे इतर जातीचे लोक त्यापासून दुरावतात, एकमेकांमध्ये समानता व एकोपा न राहता संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होते. असे असले तरी ग्रामीण क्षेत्रांमध्ये वर्तमान नागरी सामाजिक बदलामुळे बऱ्याच अंशी त्यांच्या जीवनशैलीत बदल झाला आहे. हा बदल विविध कारणांचा परिणाम म्हणावा लागेल. जसे- शिक्षण, रोजगार, नोकरी, व्यवसाय, इत्यादी अशा विविध घटकांमुळे आर्थिक संपन्नता, शैक्षणिक गुणवत्ता ज्यांच्याकडे आहे, त्या व्यक्तींना त्यांची जीवनशैली बदलल्याची दिसते त्याचा इतरांवर परिणाम होत आहे. एकूणच या संशोधनात 'ग्रामीण समाजातील असमानता आणि त्यांची बदलती जीवनशैली' अभ्यासताना वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक संशोधनात्मक मुद्द्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**कीवर्ड्स:** ग्रामीण समाजव्यवस्था, सामाजिक असमानता, बदलती जीवनशैली, जातीय विषमता, वर्गीय असमानता, पितृसत्ताक कुटुंब, कृषी समाज, ग्रामीण अर्थव्यवस्था, शैक्षणिक असमानता, लिंगभेद, सामाजिक स्तरीकरण, ग्रामीण विकास.

**प्रस्तावना:** भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करता आजही ६५ टक्के जनता ग्रामीण भागातून वास्तव्य करते. या बहुसंख्येने वास्तव्य करणाऱ्या जनतेच्या विकासाशिवाय देशाचा सर्वांगीण विकास करता येणार नाही. कारण याच क्षेत्रात कृषी व्यवसाय प्रमुख असून त्यावरच ग्रामीण क्षेत्र अवलंबून आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी व्यवसाय कणा असून या कृषी व्यवसायावर कार्यरत असणारा हा ग्रामीण समुदाय विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, वर्ण,वर्ग चा असून त्यानुसार गावा-गावात त्यांचे विभाग दिसून येतात. त्यांचे अंतर्गत सर्व व्यवहार चालतात.अशी ही जीवन पद्धती असली तरी वर्तमान नागरी परिस्थितीमुळे नागरीकरणाच्या आणि नागरी संस्कृतीच्या प्रभावाने ग्रामीण जीवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले आहे.आता गावाचा मूळ ढाच्यामध्ये बदल झाला असल्याचे दिसते. 'ग्रामीण समाजव्यवस्थेतील असमानता आणि बदलती जीवनशैली' या दोन्ही मुद्द्याच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनाचे उद्देश:** या संशोधनात खालील उद्देशांचा समावेश करण्यात आला आहे

१) ग्रामीण क्षेत्रातील लोकांची वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनशैलीचा अभ्यास करणे.
२) ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीचे अध्ययन करणे.
३) ग्रामीण समाजव्यवस्थेतील असमानता अभ्यासणे.
४) ग्रामीण असमानता आणि समस्याचे विश्लेषनात्मक मांडणी करणे.

वरील उद्देशाला अनुसरून या संशोधनांमध्ये ग्रामीण क्षेत्रांमध्ये जाती-धर्मानुसार करण्यात आलेली मानव निर्मित असमानता, भेदाभेद,उच्च-निच्चता आजही असली तरी वर्तमान बदलामुळे ग्रामिणाची बदलती जीवनशैली या दोन्ही मुद्द्याला अनुसरून वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक विश्लेषण करण्यात आले आहे. ग्रामीण समाजव्यवस्थेचा अनेक अभ्यासक आणि शास्त्रज्ञांनी अभ्यास केला आहे.त्यामध्ये अमेरिका आणि युरोपमध्ये प्रामुख्याने ग्रामीण समाजाचे विश्लेषणात्मक अध्ययन झाले आहे. त्यामध्ये सोरोकीन, जिमरमेन, गेलपीन, टेलर,कोल्ब,ब्रेनर, सिम्स, सन्डरसन,रेडफिल्ड (गुप्ता एव शर्मा २०२४:५) स्वातंत्र्याच्या अगोदर विलियम टेनेण्ट(१८०३), सर हेन्री मेन (१८६१) बैडन पावेल (१८७२), मूर (१८९९) तर स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने भारतातील ग्रामीण अभ्यासाला गती प्राप्त झाली. प्रामुख्याने स्वातंत्र्य आंदोलना दरम्यान महात्मा गांधीजी यांनी 'खेड्याकडे चला' हा नारा देऊन ग्रामीण विकासामध्ये मौलिक योगदान दिले. 'गाव स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही' असेही ते म्हणत. याबरोबरच इतरही अनेक अभ्यासक व संशोधक त्यामध्ये एस. सी. दुबे,एम. एम. श्रीनिवास, मुजुमदार,आर. के. मुखर्जी, बी आर चव्हाण, ए आर देसाई, जे बी चितबरम,ए एच सोमजी, अनिल भट्ट, के एल शर्मा, आंद्रे बेतैले, डी.एन धनागरे अशा अनेकांनी भारतीय ग्रामीण समाजाचे सविस्तर विश्लेषण केले आहे.त्यातून आधुनिक ग्रामीण अभ्यासला नवी चालना मिळाली.

**विदर्भातील ग्रामीण समाजव्यवस्था:** या संशोधनात प्रामुख्याने विदर्भातील ग्रामीण समाजव्यवस्था आणि त्यांची

जीवनशैली अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. विदर्भामध्ये १) नागपूर २)अमरावती अशा दोन विभागाचा समावेश होतो. नागपूर विभागात सहा जिल्हे १) नागपूर २) चंद्रपूर ३) भंडारा ४) गोंदिया ५) वर्धा ६) गोंदिया तर अमरावती विभागामध्ये १) अमरावती २) अकोला ३) यवतमाळ ४) बुलढाणा आणि ५) वाशिम अशा अकरा जिल्ह्यांचा समावेश होत असून १२४ तालुक्यांचा अंतर्भाव होतो. विदर्भामध्ये प्रामुख्याने कोरडवाहू आणि निसर्गावर अवलंबून असलेली शेती सर्वाधिक आहे. ओलीत आणि सिंचनाच्या सोयी पुरेशा प्रमाणात नसून निसर्गावर अवलंबून शेती व्यवसाय सर्वाधिक आहे. वर्तमान परिस्थितीमध्ये निसर्गाच्या असमतोलपणामुळे कृषी व्यवसाय फारसा फायद्याचा राहिलेला दिसत नाही. कितीही काबाडकष्ट करूनही शेतक-यावर उपासमारीची वेळ येते. एका बाजूला निसर्गाचा समतोलपणा, कमी पाऊस, तर दुसऱ्या बाजूला योग्य बी- बियाणे, खते, शेतीचे लहान लहान तुकडे आणि शेती उत्पादनासंबंधी प्रबोधनाचा अभाव यामुळे शेतीतून फारसे उत्पादन मिळत नाही. उत्पादन आणि उत्पन्न याचे समीकरण बसत नसल्यामुळे विदर्भामध्ये आणि प्रामुख्याने अमरावती, अकोला,यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, आणि वर्धा या सहा जिल्ह्यांमध्ये 'शेतकरी आत्महत्या' ची संख्या सर्वाधिक आढळून आहे. दर दिवशी चार-पाच शेतकरी आत्महत्या केल्याची उदाहरणे वृत्तपत्रांमध्ये वाचायला किंवा पाहायला मिळतात हे या भागाचे किंवा कृषी धोरणाचे दुर्दैव म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळवून ७८ वर्षे झाली असली तरी आजही शेती आणि शेतकरी याकडे पुरेशा प्रमाणात लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. शेती व्यवसायात शेतकरी प्रमुख असला तरी त्यांच्या हंगामाच्या वेळी त्याला दहा-वीस हजाराची खरी गरज असते, ती शासनाकडून पूर्ण केल्या जात नाही, परंतु शासन त्यांना आत्महत्या केल्यानंतर एक लाख रुपयांची रक्कम त्याच्या कुटुंबीयांना दिली जाते हे या व्यवस्थेचे दुर्दैव म्हणावे लागेल. एकूणच शेती, शेतकरी आणि कृषी व्यवसायाबद्दलची दैना अवस्था विदर्भ मराठवाड्यामध्ये प्रामुख्याने आढळून येते. आजही ग्रामीण क्षेत्रांमध्ये शेती करणाऱ्यांमध्ये मराठा व कुणबी यांची संख्या सर्वाधिक आहे. मग ते विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र असा कोणताही विभाग पाहिला तर ते सहजपणे लक्षात येते. या विभागांमध्ये शेतकरी आणि शेतमजूर असे दोन महत्त्वाचे घटक आहेत. अर्थात हे दोन्ही घटक कृषी व्यवसायासाठी महत्त्वाचे मानले जातात. शेतकऱ्यांकडून आपल्या सर्व शेतीचे मशागत होईलच असे नाही तर त्याकरिता भूमिहीन आणि शेतमजुरांची आवश्यकता असते. हे दोन्ही घटक गावात असतात.त्यावरच गावाचा कारभार पिढ्यानपिढ्या चालत आला आहे. हे दोन्ही घटक ग्रामीण समाज जीवनाचे मूलभूत घटक म्हणता येईल.

ग्रामीण क्षेत्रात वास्तव्य करणारी जनता ही मुळातच कृषी आणि कृषीशी संबंधित व्यवसायावरच अवलंबून आहे. या अनुषंगाने त्यांची जीवनशैली निसर्ग आणि निसर्गाशी संबंधित आहे. त्यांच्या प्रथा, परंपरा, चालीरीती, संकेत, विश्वास,सण समारंभ, उत्सव हे सर्व निसर्गाशी संबंधितच असल्याचे दिसून येते.

**ग्रामीण क्षेत्र:** ग्रामीण क्षेत्राचा विचार करता निसर्ग आणि निसर्गाशी संबंधित जीवन जगणारा, कमी लोकसंख्या, मर्यादित आकार, लहान लहान वस्त्या,असणारा समूह होय. शेती हाच प्रमुख व्यवसाय करणारा समुदाय होय. 'गाव' किंवा 'ग्राम' या संदर्भात अनेकांनी वास्तुनिष्ट विश्लेषणात्मक मांडणी केली आहे.या संदर्भात त्रि.ना.अत्रे यांनी पुराणांतरी गावाची व्याख्या दिल्याप्रमाणे-

तथाशुद्राजनप्राया सुसमृद्धकृषीवला I
क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिग्रामसंज्ञिता I I

"जिच्या भोवती कीर्दसार-वाहीतीला योग्य-जमीन आहे, आणि जिच्यामध्ये मातबर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत.अशा वस्तीला गाव म्हणतात."(अत्रे २०१५:१२९)पुढे ते गावा संदर्भात वर्णन करतात की,गावाच्या हद्दीला किंवा सीमेला 'शीव'ही संज्ञा आहे.गावाचे स्वभात: आणि एकमेकापासून अलग असे दोन भाग उघड उघड पडतात.एक पंढरी किंवा गावठाण आणि दुसरा काळी किंवा रान.काळी आणि पांढरी ह्या संज्ञा जमीनीच्या रंग आणि गुणधर्मावरून प्रचारात आल्या असाव्या."(अत्रे २०१५:१२९).कोणत्याही गावात गेले तरी असे चित्र समोर येते.पुढे ते म्हणतात की 'काळी व पांढरी हे जसे गावाचे दोन स्वाभाविक विभाग पडतात,तसे उद्योगपरत्वे लोकवस्तीचे दोन भाग शेतकरी करतात- 'कुणबी'म्हणजे शेतकरी आणि 'अडाणी'म्हणजे बिगर शेतकरी'.( अत्रे २०१५:१३३) तसेच कोणत्याही गावाची संरचना पाहिली तरी हे सहजपणे लक्षात येते की,मुळात गावाचा विचार केला तर मराठा, कुणबी वा देशमुख सर्वाधिक आढळून येतात. अर्थात त्यामध्ये विविध उपजाती असल्या तरी त्यांची संख्या सर्वार्थाने अधिक असते. त्रि. ना. अत्रे म्हणतात की 'पांढरीच्या अगोदर चटकन काळीच डोळयांपुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्या-मेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, भुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, माळा, गोपण वगैरे बळीराजाची वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेतीखेरीच दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्याखेरीस दुसरे कोणी राहत असेल असे एकाएकी मनात देखील येत नाही. कुणबीपुढे झाल्याशिवाय एकाही खेड्याचा खेड्यात वसाहत झाली

नाही. त्यांने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतूद केली, तेव्हा ते गोळा झाले. दुनियेच्या पोटापाण्याचा भार कुणब्याने उचलला ही सार्वत्रिक समजूत असल्यामुळे खेड्यातले सर्व धंदेवाले कुणब्याला 'बळीराजा' असे संबोधतात, (अत्रे २०१५:१३३)असे वर्णन अत्रे यांनी केले आहे.

**सामाजिक असमानता:** सामाजिक असमानता संदर्भात विविध अभ्यास आणि विश्लेषण केली आहेत. ही सामाजिक असमानता समाजातील संसाधनाचे असमान वितरणामुळेच होय. व्यक्तीच्या मूलभूत आणि आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी संधीची उपलब्धता नसणे म्हणजे असमानता होत. समाजातील सदस्यांची सामाजिक भूमिका आणि दर्जा या संदर्भातही ती अभ्यासली जाऊ शकते. वेगवेगळ्या जाती समूहामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवस्था निर्माण केल्या आहेत. त्या आधारे ही मोजल्या जाऊ शकते. गरजा पूर्ण होणे यातून समाजात संघर्ष आणि असमानता निर्माण होऊन सामाजिक गुंतागुंत वाढत जाते. परिणामी सामाजिक असमानता निर्माण होते. ग्रामीण समाज व्यवस्थेमध्ये शेतकरी आणि मजूर, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी असमानतेसाठी कारणीभूत आहे. या सामाजिक असमानतेसाठी समतावादी समाज, श्रेणीबद्ध समाज, स्तरीकृत समाज या संदर्भात वर्गीकरण केल्या जाते. या सामाजिक असमानतेच्या संदर्भामध्ये संपत्तीचे असमान वितरण, राजकीय असमानता, आर्थिक असमानता, अशा विविध मुद्द्यांचा उल्लेख केला जातो, ग्रामीण क्षेत्रांमध्ये असणारी कुटुंब व्यवस्था पुरुषप्रधान असल्याने सदस्याला दिल्या जाणा-या संधी यामध्येही अंतर दिसते.

समाजातील सामाजिक-आर्थिक स्थिती अभ्यासताना दोन बाबींचा विचार केला जातो. गुणांकित वैशिष्ट्ये आणि साध्य केलेली वैशिष्ट्ये. शारीरिक दृष्टीने विचार करता लिंग, त्वचेचा रंग, डोळ्याचा आकार, जन्मस्थान, लैगिकता, पालकत्व याबरोबर साध्य करण्यात येणारी वैशिष्ट्ये ज्यामध्ये वैवाहिक, शैक्षणिक,नोकरी, व्यवसाय इत्यादी. समाजामध्ये सामाजिक स्थिती शोधताना या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ग्रामीण क्षेत्रामध्ये ब-याच प्रमाणात सामाजिक असमानता दिसून येते त्यामध्ये जाती, धर्म, वंश, वर्ग, याबरोबर सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यात्मक, आर्थिक स्थिती इत्यादी घटकही महत्त्वाचे होत.

असमानते संदर्भात समाजशास्त्रीय दृष्टिकोन महत्वाचा ठरतो. ही सामाजिक-आर्थिक असमानता लक्षात घेतांना काल मार्क्स यांनी समाजामधील दोन प्रमुख वर्गाचा उल्लेख करून असमानता स्पष्ट केली. समाजात कायम दोन वर्ग असतात आणि त्यात वर्ग संघर्ष कायमच असतो. भांडवलदार-कामगार, मालक आणि मजूर, श्रीमंत-गरीब असे दोन वर्ग परस्पर विरोधी विचाराचे दोन वर्ग असतात.असे विरोधी सामाजिक हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे वर्ग जसे- भांडवलदार वर्ग हा अधिकाधिक नफा कमावणे तर कामगार अधिक वेतन व बोनस मिळवण्यासाठी प्रयत्न करतात, त्यातून संघर्ष निर्माण होतात, त्याचप्रमाणे मक्स वेबर या समाज शास्त्रज्ञाने सुद्धा उत्पन,संपत्ती आणि दर्जा यासाठी सामाजिक वर्गाचा वापर केला. सामाजिक वर्ग प्रतिष्ठा आणि विशेष अधिकाऱ्यांशी परस्पर संबंध आहे. सामाजिक वर्गाची पिढ्यानपिढ्या स्थिर राहण्याची प्रवृत्ती आणि बहुतेक असमानता देखील त्यातून दिसून येते. याकरिता उत्पन्न, संपत्ती, शिक्षण, पेन्शन अशा अनेक बाबतीचा विचार केला. त्याच बरोबर क्रेडिट सुईस या शास्त्रज्ञाने सुद्धा समाजामध्ये असणारे तीन वर्गाचा उल्लेख केला उच्च मध्यम आणि निम्न यातून असमानता दिसून येते. (फ्री विकिपीडिया साईटवरून)

**सामाजिक स्तरीकरण:** भारतातील ग्रामीण क्षेत्रांमध्ये असणारी समाजव्यवस्था लक्षात घेता विविध जाती, धर्म, पंथ, वर्ग, वंश,लिंग यासंदर्भात स्तरीकरण दिसून येते. हेच सामाजिक असमानतेचे प्रतिकच म्हणावे लागेल. १) जाती व्यवस्था २) वर्ग व्यवस्था ३) संपत्ती ४) राजकीय वर्ग ५) आर्थिक इत्यादी. या सर्वांचा विचार करता ही रचना विषमतामुलक समाजव्यवस्था निर्माण करणारी स्थिती होय. एक व्यक्ती हा दुसऱ्या पेक्षा कमी अधिक प्रमाणात उच्च किंवा कनिष्ठ मानला जातो. त्यातूनच त्यांच्या प्रथा, परंपरा, चालीरीती, विश्वास, संकेत,सण समारंभ,उत्सव, देवी देवता,निर्माण करून कायमच आपले स्थान अबाधित ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो.अशी ही असमानतेचे स्थिती मानव निर्मित आहे.

**ग्रामीण असमानता:** ग्रामीण क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने जाती-धर्माचे प्राबल्य सर्वाधिक आहे स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही आजही गावांची रचना ही जाती धर्मानुसारच आढळून येते एका बाजूला विशिष्ट जाती व धर्माची वस्ती आजही पाहायला मिळते. ही जातीय आणि धार्मिक विषमता पूर्णतः संपलेली दिसत नाही. अर्थात यामध्ये बदल झाला असला तरी, जाती आणि धार्मिक वातावरण आजही कायम आहे. याचा अनुभव गावातील प्रत्येकाला दर दिवशी येत असतो. विशेषतः निवडणुकांच्या संदर्भामध्ये गावांमध्ये जातीय असंतोष, दंगली, मारामाऱ्या, अधिक होताना आढळतात. ज्या क्षेत्रामध्ये ज्या जातीची संख्या जास्त आहे अशा जातीच्या व्यक्तीलाच उमेदवारी दिली जाते आणि पिढ्यान पिढ्या त्या जातीचे वर्चस्व इतरांना मान्य करावे लागते अशी ग्रामीण क्षेत्रातील परिस्थिती आहे. त्यामुळे इतर मागास जाती व धर्मांना त्यामध्ये फारसा भाव मिळत नाही.

ग्रामीण असमानतेकरिता अनेक कारणाचा समावेश केला जातो त्यातील काही खालीलप्रमाणे आहेत.

**१) लिंगभाव असमानता:** या सामाजिक असमानतेमध्ये लिंगभाव महत्वाचं कारण होय. लिंग आणि लिंगभाव यावर आधारित पूर्वग्रह व भेदभाव होतो. ग्रामीण क्षेत्राचा विचार करता कृषी क्षेत्रामध्ये श्रम विभाजनाच्या माध्यमातून स्त्री -पुरुषांमध्ये श्रम विभाजन आणि त्यात निर्माण होणारी असमानता सहजपणे लक्षात येते. जसे- ग्रामीण भागामध्ये पुरुषांना दर दिवशी मिळणारी रोजमजुरी हे अधिक तर स्त्रियांना मिळणारी मजुरी ही पुरुषांपेक्षा कमी दिली जाते. श्रम सारखे पण मिळणारी रोजमजुरी मात्र कमी दिली जाते. ही आर्थिक विषमता प्रामुख्याने आढळून येते. श्रम विभाजनामध्ये असमानता सातत्याने दिसून येते. भारतीय व्यवस्थेचा विचार करता पुरुषप्रधान किंवा पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये कायम स्त्रियांना निर्णय प्रक्रियेपासून किंवा महत्त्वाच्या बाबींमध्ये स्त्रियांना सहभागी करून घेतल्या जात नाही. वर्तमान परिस्थिती किती सुधारली असली तरी आजही स्त्रियांना पाहिजे त्या प्रमाणात वागणूक मिळत नाही.

**२) वयाबद्दल असमानता:** ग्रामीण क्षेत्रांमध्ये वयाला विशेष महत्त्व आहे. कुटुंबातील कर्ता व्यक्ती त्याला विशेष अधिकार असतात. कुटुंबातील इतर व्यक्तींना त्यापेक्षा कमी अधिकार असतात. कर्ता व्यक्ती किंवा प्रौढ व्यक्ती ज्या पद्धतीने सांगेल किंवा निर्णय घेईल त्याच पद्धतीने इतरांना आपले वर्तन करावे लागते. या वयाच्या आधारे कुटुंबाचे व्यवस्थापन चालते. वयाप्रमाणे श्रम विभाजन करण्यात येते.कर्ता वा प्रौढ व्यक्तींच्या अधिपत्याखाली सर्वांना कामे करावी लागतात.

**३) आरोग्यात्मक असमानता:** ग्रामीण भागांमध्ये आजही विविध आजार असून स्त्री-पुरुषबाबतही असमानता आहे. पुरुष आजारी पडला तर ताबडतोब दवाखान्यात देण्याचा प्रयत्न होतो. मात्र स्त्री आजारी पडली तर तिच्याकडे कायमच दुर्लक्ष केले जाते. स्त्रियांसंबंधीत अनेक आरोग्यात्मक सोयीसुविधा आजही निर्माण झाल्या तरीही स्त्रिया फारशा दवाखान्यात जात नाहीत. स्त्रियांचे आरोग्य सुधारण्याकरीता ग्रामीण पातळीवर आजही अनेक अडचणी आहेत. गाव- खेड्यात पुरेशा प्रमानात प्राथमिक आरोग्य केंद्रची सुविधा नाही. स्त्रीयांना आजही पुरेशा प्रमाणत निरोगी आणि पोषण आहार मिळत नाहीत. आरोग्याच्या संदर्भात सरकारने विविध प्रकारच्या योजना राबवल्या असल्या तरी सार्वजनिक आरोग्य सेवा आजही ग्रामीण भागापर्यंत पूर्णतः पोहचली नसल्याचे दिसून येते.

**४) सामाजिक आणि आर्थिक असमानता:** मुळात सामाजिक असमानता निर्माण होण्यासाठी आर्थिक घटक खूप महत्त्वाचा आहे. श्रीमंत आणि गरीब मालक-मजूर यांच्यातील दरी लक्षात घेता ग्रामीण भागांमध्ये असमानता मोठ्या प्रमाणावर आहे. श्रीमंत व्यक्तीला त्याच्या आर्थिक क्षमतेनुसार मिळत असलेल्या सोयी सवलती या गरीब किंवा दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला मिळत नसल्याचे दिसून येते. दर दिवशी मजुरी केल्यानंतरच त्याला आणि त्याच्या कुटुंबीयांना जेवणासाठी मिळते अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील बहुतांश लोकसंख्येला दर दिवशी काम केल्याशिवाय खायला मिळत नाही. महिन्याच्या काही दिवसच मजुरी मिळते इतर दिवशी त्याला मजुरीविना राहावे लागते. या आर्थिक अडचणीचा परिणाम त्याच्या मानसिकतेबरोबर कुटुंबावर मोठ्या प्रमाणात होतो. सामाजिक-आर्थिक घटकाबाबत कार्ल मार्क्स यांनी सांगितल्याप्रमाणे समाजामध्ये असणारे भांडवलदार वर्ग हा कायमच कामगारांचे शोषण करीत आला आहे .कामगार वर्ग हा भांडवलदाराच्या मर्जीवर जगत असल्यामुळे अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. शेतकरी आणि शेतमजूर हे ग्रामीण क्षेत्रात क्षेत्रातील महत्त्वाचे घटक असून त्यांच्यामध्ये सुद्धा विविध मुद्द्यांच्या आधारे असमानता असल्याचे दिसून येते.

**५) ग्रामीण यांची वैयक्तिक आणि सामाजिक जीवन पद्धती:** ग्रामीण क्षेत्रातील व्यक्तीची वैयक्तिक आणि सामाजिक जीवन पद्धती विशिष्ट प्रकारची आहे.ग्रामीण व्यक्ती हा सामान्यपणे साधा आणि सरळ जीवन पद्धतीचा स्वीकार करणार आहे. गरजा कमी असून मर्यादित क्षेत्रामध्ये आपल्या जीवणाचा उदरनिर्वाह करण्याची त्यांची शैली महत्त्वाची आहे. निसर्ग आणि निसर्गाशी संबंधित अनेक अडचणी असल्या तरी आपल्या जीवनशैलीचा भाग म्हणून त्याकडे कानाडोळा करून राहण्याची त्यांची मानसिकता आहे. देवी देवता, सण समारंभ, उत्सव याला महत्त्व देतो. आहे त्या परिस्थितीला समाधान म्हणून जीवन जगण्यामध्ये धन्यता मानणारा हा समुदाय होय. या समुदायाने हजारो वर्षापासून कृषी आणि कृषीशी संबंधित व्यवसायावरच आपली कायमच निष्ठा ठेवून आपल्याबरोबर संपूर्ण मानव जातीला जगवण्याचा मोलाचं योगदान दिले आहे.

सामाजिक जीवनशैलीचा विचार करता समाजातील परंपरागत पद्धतीने अनुसरून मान्य केले जाते. परंतु वर्तमान काळामध्ये नागरी संस्कृती आणि आधुनिक संस्कृतीच्या प्रभावाने ग्रामीण क्षेत्रातही त्याचं शिरकाव झाला आहे. त्यामुळे ग्रामीण मूळ संस्कृती -हास होताना दिसून येते. परंपरागत आणि आधुनिक अशा दोन्हीमध्ये ग्रामीण जनता असल्यामुळे ग्रामीण भागात अनेक समस्यांची निर्मिती झाली आहे.

**६) आर्थिक आणि शैक्षणिक समस्या:** ग्रामीण समाज जीवनाची असमानतामध्ये आर्थिक बाबीचा प्रामुख्याने

विचार करावा लागतो. गावामध्ये एका बाजूला श्रीमंताची वस्ती ज्यांच्याकडे शेती आणि मुबलक धनसंपत्ती आहे अशा व्यक्ती. तर दुसऱ्या बाजूला झोपड्यांमध्ये आणि कच्च्या घरांमध्ये वास्तव्य करणारी बहुसंख्य जनता. आपापल्या जाती उपजातीनुसार वास्तव्य करताना दिसून येते. गावाची रचनात मुळात जाती व धर्मानुसार केल्याचे दिसून येते. जसे- कुणबी पुरा, माळीपुरा,मातंगपुरा, चांभारपुरा, बौद्धपुरा इत्यादी. त्यामध्ये त्या त्या जाती व उपजातीची संख्या दिसून येते. त्यांचा व्यवसाय सुद्धा तशाच प्रकारचा असतो. आर्थिक दृष्टीने दारिद्र्यरेषेचे प्रमाण ग्रामीण भागांमध्ये सर्वाधिक आढळून येते. सर्वांकडे केसरी रंगाचे राशन कार्ड असून स्वस्त धान्य चा फायदा घेतात.

शैक्षणिक असमानता शिक्षणाच्या संदर्भामध्ये आजही ग्रामीण भागामध्ये चौथी किंवा सातवीपर्यंत शिक्षणाची सोय असून उच्च शिक्षणासाठी किंवा वरच्या शिक्षणासाठी बाहेरगावी किंवा शहराच्या ठिकाणी जावे लागते. अशावेळी ग्रामीण पालक आपल्या मुलींना दूर शिक्षणासाठी पाठवत नाही. त्यामुळे मुलांपेक्षा मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे ग्रामीण क्षेत्रांमध्ये दिसून येते. दुसरे असे की सातवी किंवा दहावीपर्यंत शिक्षण पर्ण झाल्यानंतर मुलीच्या लग्नाचा विचार केला जातो. मुलीचे लग्न करून जबाबदारीतून मुक्त होण्याची भावना जरी असली तरी त्याशिवाय पालकांकडे दुसरा मार्ग नसतो. त्यामुळे बहुतांश ठिकाणी बालविवाह होताना आढळून येतात. याच बालविवांमुळे माता मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण ग्रामीण क्षेत्रांमध्ये सर्वाधिक आहे.

थोडक्यात या ग्रामीण समाजातील असणारी सामाजिक असमानता आणि त्यांची बदलती जीवनशैली अभ्यासताना जटील आणि गुंतागुंतीची व्यवस्था आहे.ती दूर करण्यासाठी काही उपाययोजना पुढीलप्रमाणे जसे- शिक्षणाचे प्रमाण वाढवावे, दोन नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, कुटीर लघु उद्योगाला प्रोत्साहन द्यावे, गावांमध्ये जातीय द्वेष आणि झगडे भांडणे मिटवण्यासाठी सर्व घटकांची एक समिती नेमण्यात यावी, कडक आणि काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, ग्रामीण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाकरता कृती कार्यक्रम तयार करावा, कृषी क्षेत्राचा विकास करावा,आरोग्यात्मक सोयीसुविधा पुरवावे. जाती-धर्मांना सर्वांना समान व एकत्रितपणे जीवन जगण्यासाठी पोषक ध्येय धोरणाची कडक व कठोर अंमलबजावणी करावी .एकूण ग्रामीण समाज व्यवस्थेतील असमानता नष्ट करून त्यांचा सर्वांगीण करणे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) गुप्ता एम एल एवं शर्मा डी डी (२००४)भारतीय ग्रामीण समाजशास्त्र,साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा
२) अत्रे त्रि ना (२०१५) गावगाडा,(संपादन :द दि पुंडे) शताब्दी आवृत्ती, राजहंस प्रकाशन पुणे पु क्र १२९,
३) कित्ता पु क्र १२९,
४) कित्ता पु क्र १३३,
५) कित्ता पु क्र १३३,
६) तोमर राम बिहारी सिंह(१९९१) ग्रामीण समाजशास्त्र, आग्रा, श्रीराम कंपनी
७) मुखर्जी आर एन (१९७८)भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, बरेली,आज बुक डेपो
८) देसाई ए आर(१९५६) भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, नवी दिल्ली,रावत पब्लिकेशन
९) मदन जी आर (१९९८) भारत का ग्रामीण पुनर्निर्माण, दिल्ली, विविध प्रकाशन जवाहर नगर
१०) श्रीनिवास एम एन (१९९६)आधुनिक भारत मे सामाजिक परिवर्तन, दिल्ली, राजकमल प्रकाशन
११) क-हाडे बी एम(२०११) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, नागपूर,पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स
१२) फ्री विकिपीडिया वेबसाईटवरून.

# सामाजिक विषमता आणि आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण: भारतीय संदर्भातील समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर** प्राचार्य, आर सी पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर, जिल्हा धुळे.

**सारांश:** प्रस्तुत अभ्यास भारतातील आदिवासी विद्यार्थ्यांवर सामाजिक विषमतेचा शिक्षणावर होणारा परिणाम समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्ट करतो. सामाजिक विषमता ही केवळ आर्थिक दारिद्र्यापुरती मर्यादित नसून ती ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक आणि संस्थात्मक घटकांशी जोडलेली आहे. आदिवासी समुदाय प्रामुख्याने दुर्गम व ग्रामीण भागात वास्तव्यास असून दारिद्र्य, भाषिक अडथळे, सांस्कृतिक वेगळेपणा आणि सामाजिक भेदभाव यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक सहभागावर, टिकावावर आणि शैक्षणिक यशावर होतो. भारतीय संविधान आणि विविध शासकीय योजना असूनही आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचलेली नाही. अनेक वेळा धोरणांची अंमलबजावणी अपुरी व असमान राहते. स्थानिक वास्तव, आदिवासी जीवनपद्धती आणि समुदायाचा सहभाग यांचा अभाव असल्यामुळे अनेक योजना प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे केवळ शैक्षणिक प्रवेश वाढवणे पुरेसे नसून शिक्षणाची गुणवत्ता, सातत्य आणि समावेशकता यांवरही लक्ष देणे आवश्यक ठरते. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक समता साध्य करण्यासाठी सामाजिक रचनांमध्ये बदल, मातृभाषेतून अध्यापन, सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील शिक्षणपद्धती आणि शाळा-समाज यांचा समन्वय आवश्यक आहे. शासन, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक समुदाय यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच शिक्षण हे आदिवासी समाजासाठी खऱ्या अर्थाने सशक्तीकरणाचे प्रभावी साधन ठरू शकते.

**मुख्य शब्द:** सामाजिक विषमता, आदिवासी विद्यार्थी, शासकीय धोरणे, शैक्षणिक समता, सामाजिक सशक्तीकरण.

**प्रस्तावना:** सामाजिक विषमता ही भारतीय समाजाची एक सातत्यपूर्ण, खोलवर रुजलेली आणि संरचनात्मक स्वरूपाची वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. ही विषमता ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच राजकीय रचनांमध्ये खोलवर अंतर्भूत असून तिचे परिणाम आजही विविध सामाजिक गटांवर स्पष्टपणे दिसून येतात. भारतीय समाजातील सर्वाधिक प्रभावित आणि वंचित समूहांमध्ये आदिवासी समुदायांचा समावेश होतो. भारतीय संविधानाने या समुदायांना अनुसूचित जमाती (Scheduled Tribes — STs) म्हणून मान्यता दिली असली, तरीही संविधानिक संरक्षणे आणि विविध शासकीय हस्तक्षेप असूनसुद्धा हे समुदाय सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या अद्यापही कडेलोटावरच राहिलेले दिसतात. सामाजिक गतिशीलता, समावेशन आणि सक्षमीकरणासाठी शिक्षण हे एक प्रभावी आणि परिवर्तनकारी साधन मानले जाते; तथापि, आदिवासी विद्यार्थ्यांना आजही असमान प्रवेश, कमी शैक्षणिक यश, उच्च गळतीचे प्रमाण आणि मर्यादित शैक्षणिक व व्यावसायिक संधींचा सामना करावा लागत आहे.

आंद्रे बेतेय (२०१२) आणि देसाई (२०१५) यांसारख्या नामवंत भारतीय समाजशास्त्रज्ञांनी स्पष्टपणे अधोरेखित केले आहे की भारतातील सामाजिक विषमता ही केवळ आर्थिक स्वरूपाची नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक स्वरूपाची देखील आहे. आदिवासी समुदायांना भौगोलिक दुर्गमता, दारिद्र्य, भाषिक अडथळे, सामाजिक भेदभाव तसेच संस्थात्मक पाठबळाच्या अभावामुळे दीर्घकालीन सामाजिक बहिष्करणाचा अनुभव येतो. या बहिष्करणाचा थेट आणि खोल परिणाम आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहभागावर, शिकण्याच्या प्रक्रियेवर आणि शैक्षणिक यशावर होतो. जरी शासकीय धोरणे आणि योजना सामाजिक समानतेच्या उद्देशाने राबविल्या जात असल्या, तरी त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा परिणाम अनेकदा असमान, अपुरा आणि मर्यादित स्वरूपाचा राहतो.

भारतातील सामाजिक विषमता ही मूलतः रचनात्मक स्वरूपाची असून ती ऐतिहासिकदृष्ट्या जात, जमात, वर्ग आणि प्रदेश अशा परस्पर गुंतलेल्या सामाजिक व्यवस्थांमधून सातत्याने टिकून राहिली आहे. अनुसूचित जमाती या समाजरचनेतील सर्वाधिक वंचित घटकांपैकी एक आहेत. संविधानिक मान्यता आणि सकारात्मक कृती धोरणे (affirmative action) अस्तित्वात असतानाही, आदिवासी समुदायांचे मुख्य प्रवाहातील सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये एकीकरण आजही मर्यादित स्वरूपाचेच राहिले आहे. अनेक अभ्यासकांचे मत आहे की आदिवासी समुदायांवरील विषमता ही अपघाती नसून ती ऐतिहासिक दुर्लक्ष, सक्तीचे विस्थापन आणि विकास प्रक्रियांमधून झालेल्या दीर्घकालीन बहिष्करणाचा थेट परिणाम आहे (बेतेय, २०१२).

भारतीय राज्यघटनेने शिक्षणाला सामाजिक विषमता दूर करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून मांडले

आहे; मात्र प्रत्यक्षात आदिवासी लोकसंख्येपर्यंत शिक्षणाचा प्रभाव असमान राहिलेला दिसून येतो. नावनोंदणीच्या निर्देशांकांमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसत असले, तरी अध्ययन परिणाम, शैक्षणिक टिकाव (retention) आणि उच्च शिक्षणाकडे संक्रमण या गुणात्मक पैलूंमध्ये अजूनही मोठी दरी कायम आहे. देसाई (२०१५) यांच्या मते, विषमता ही केवळ उत्पन्न किंवा प्रवेशापुरती मर्यादित नसून सामाजिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक भांडवल आणि संस्थात्मक पक्षपात हे घटक शैक्षणिक अनुभव घडविण्यात निर्णायक भूमिका बजावतात. म्हणूनच, या अभ्यासात आदिवासी शिक्षणाचा विचार हा व्यापक समाजशास्त्रीय विषमतेच्या चौकटीत करण्यात आलेला आहे.

सदर अभ्यासाचा मुख्य उद्देश आदिवासी विद्यार्थ्यांवर परिणाम करणाऱ्या सामाजिक विषमतेचे स्वरूप सखोलपणे समजून घेणे तसेच ही विषमता कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय धोरणांचे चिकित्सक मूल्यमापन करणे हा आहे. हा अभ्यास प्राथमिक माहिती संकलनावर आधारित नसून, शासकीय अहवाल, जनगणना माहिती, धोरणात्मक दस्तऐवज आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे शास्त्रीय लेखन यांवर आधारित आहे. या लेखाचा हेतू सामाजिक विषमतेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन मांडणे आणि सार्वजनिक धोरणे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक समावेशन घडवून आणण्यात कितपत प्रभावी ठरली आहेत, याचे विश्लेषण करणे हा आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. भारतातील आदिवासी विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या सामाजिक विषमतेचे स्वरूप, कारणे आणि विविध परिमाणांचा सखोल अभ्यास करणे.
२. सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती, शैक्षणिक सहभाग, टिकाव आणि शैक्षणिक प्रगती यांचे विश्लेषण करणे.
३. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमुख शासकीय धोरणे, योजना आणि कार्यक्रमांचा अभ्यास करणे.
४. आदिवासी विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक विषमता कमी करण्यात या धोरणांची परिणामकारकता तपासणे.
५. शैक्षणिक समता आणि धोरणात्मक सुधारणा साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.

**सामाजिक विषमता आणि आदिवासी उपेक्षा:** सामाजिक विषमता म्हणजे समाजातील विविध सामाजिक गटांमध्ये संसाधने, संधी आणि अधिकार यांचे पद्धतशीर आणि असमान वितरण होय. भारतीय संदर्भात सामाजिक विषमता ही जात, जमात, वर्ग, लिंग आणि प्रदेश या घटकांशी अतिशय घट्टपणे जोडलेली आहे. आदिवासी समुदाय ऐतिहासिकदृष्ट्या मुख्य प्रवाहातील सामाजिक रचनेबाहेर राहिल्यामुळे त्यांना दीर्घकालीन आणि बहुआयामी वंचनांचा सामना करावा लागला आहे. आंद्रे बेतेय (२०१२) यांच्या मते, भारतातील सामाजिक विषमता ही संस्थात्मक यंत्रणांद्वारे पिढ्यानपिढ्या पुनरुत्पादित होत राहते, ज्यामुळे वंचित गटांचे सामाजिक स्थान कायमस्वरूपी दुर्बल राहते.

आदिवासी उपेक्षा ही बहुआयामी स्वरूपाची असून त्यात आर्थिक दारिद्र्य, सामाजिक बहिष्करण, राजकीय अप्रतिनिधित्व आणि शैक्षणिक मागासलेपणा यांचा समावेश होतो. अनेक आदिवासी विद्यार्थी अशा कुटुंबांमधून येतात जे जंगलावर आधारित उपजीविका, रोजंदारी काम किंवा अल्पभूधारणा शेतीवर अवलंबून असतात. अशा अस्थिर आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात सातत्य राखणे अत्यंत कठीण ठरते. यासोबतच, आदिवासी जीवनपद्धती आणि औपचारिक शिक्षणव्यवस्था यांच्यातील सांस्कृतिक अंतर शिक्षणातील विषमता अधिक तीव्र करते. भाषा आणि अभ्यासक्रमातील अपरिचितपणा शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करतो.

औपचारिक शिक्षणव्यवस्था जर आदिवासी ज्ञानप्रणाली, सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनानुभव यांना मान्यता देत नसेल, तर ती व्यवस्था आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वगळणारी ठरते. परिणामी, विषमता केवळ भौतिक स्वरूपाची न राहता प्रतीकात्मक आणि सांस्कृतिक स्वरूपाचीही बनते. त्यामुळे शासकीय धोरणांचे मूल्यमापन करताना या संकल्पनात्मक चौकटीचे सखोल आकलन अत्यंत आवश्यक ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक विषमता म्हणजे जीवनसंधींचे पद्धतशीर आणि संस्थात्मक असमान वितरण होय. भारतात आदिवासी उपेक्षा ही वसाहतवादी काळातील वनधोरणे, स्वातंत्र्योत्तर विकास मॉडेल्स आणि आदिवासी प्रदेशांवरील प्रशासकीय नियंत्रण यांमधून निर्माण झाली आहे. बेतेय (२०१२) यांचे मत आहे की सामाजिक संस्था अनेकदा विषमता दूर करण्याऐवजी ती अधिक दृढ करतात. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शाळा आणि महाविद्यालये अनेक वेळा समावेशक जागा ठरण्याऐवजी सांस्कृतिक परकेपणाची स्थाने ठरतात.

प्रतीकात्मक वर्चस्वामुळेही आदिवासी उपेक्षा अधिक तीव्र होते. आदिवासी ज्ञान, भाषा आणि सांस्कृतिक प्रथा औपचारिक शिक्षणात दुय्यम मानल्या जातात. झक्सा (२०१४) यांच्या मते, आदिवासी समुदायांसाठी शिक्षण ऐतिहासिकदृष्ट्या मुक्तीचे साधन न राहता अनेकदा आत्मसात (assimilation) करण्याचे माध्यम ठरले आहे. ही संकल्पनात्मक चौकट स्पष्ट करते की सामाजिक

विषमता ही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक अशा सर्व स्तरांवर एकाच वेळी कार्यरत असते. त्यामुळे धोरणात्मक हस्तक्षेप हे बहुआयामी, संवेदनशील आणि संदर्भसापेक्ष असणे आवश्यक ठरते.

**शासकीय धोरणांचे चिकित्सक विश्लेषण:** आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आखण्यात आलेली शैक्षणिक धोरणे व योजना संकल्पनात्मकदृष्ट्या प्रगत, समतावादी आणि सामाजिक न्यायावर आधारित असल्याचे दिसून येते; तथापि, त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर अनेक गंभीर अडचणी आढळतात. देशपांडे (२०१७) यांच्या मते, सकारात्मक भेदभावावर आधारित धोरणांचा लाभ अनेक वेळा समाजातील सर्वाधिक वंचित घटकांपर्यंत पोहोचत नाही. प्रशासकीय विलंब, अपुरी माहिती, तसेच दुर्बल निरीक्षण व मूल्यमापन यंत्रणा यांमुळे धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी अडथळ्यांत सापडते. अनेक आदिवासी विद्यार्थी आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे किंवा डिजिटल प्रणालींशी संबंधित अडचणींमुळे शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक लाभांपासून वंचित राहतात. त्यामुळे धोरणांची व्याप्ती मोठी असली, तरी प्रत्यक्ष लाभ मर्यादित स्वरूपातच मिळताना दिसतो.

धोरणांच्या मर्यादा त्यांच्या एकसमान रचनेतूनही स्पष्ट होतात. भारतातील आदिवासी समाज सांस्कृतिक, भाषिक व भौगोलिक दृष्ट्या अत्यंत विविध आहे; मात्र बहुतांश शैक्षणिक योजना स्थानिक वास्तव, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धतींचा पुरेसा विचार न करता तयार केल्या जातात. दक्षा (२०१४) यांच्या मते,स्थानिक समुदायांचा सहभाग नसल्यास धोरणे वरून लादलेली वाटतात आणि त्यांचा अपेक्षित सामाजिक परिणाम साध्य होत नाही. स्थलांतराचे स्वरूप, उपजीविकेचे साधन, स्थानिक भाषा आणि सामाजिक परंपरा या घटकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे अनेक योजना प्रभावी ठरत नाहीत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) मध्ये समता आणि सर्वसमावेशकतेवर विशेष भर देण्यात आला असून आदिवासी समुदायांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित गट म्हणून स्पष्टपणे ओळखण्यात आले आहे. आदिवासीबहुल भागांमध्ये शालेय पायाभूत सुविधा बळकट करणे, प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता वाढविणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे यांसारख्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही धोरणे ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याच्या राज्याच्या जबाबदारीचे प्रतीक आहेत. तथापि, या उपाययोजनांचे यश संस्थात्मक क्षमता, प्रशासनाची संवेदनशीलता आणि समुदायाच्या सक्रिय सहभागावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

देसाई (२०१५) यांच्या मते, अंमलबजावणी यंत्रणा दुर्बल असल्यास कल्याणकारी धोरणे खोलवर रुजलेल्या सामाजिक विषमता कमी करण्यात अपयशी ठरतात. अनेक आदिवासी कुटुंबांना योजनांची माहितीच नसते किंवा प्रशासकीय अडथळ्यांमुळे त्यांचा लाभ घेणे कठीण जाते. याशिवाय, प्रादेशिक असमतोलामुळे काही राज्यांमध्ये धोरणांची परिणामकारकता अधिक तर काही ठिकाणी अत्यंत मर्यादित दिसून येते. परिणामी, धोरणांमुळे शैक्षणिक प्रवेश वाढतो; मात्र शैक्षणिक टिकाव, गुणवत्ता आणि यश सुनिश्चित होत नाही. म्हणूनच, केवळ धोरणात्मक हस्तक्षेप पुरेसा नसून सामाजिक, प्रशासकीय आणि संस्थात्मक पातळीवर व्यापक सुधारणा करणे अत्यावश्यक ठरते.

**सामाजिक विषमता आणि आदिवासी शिक्षणावर होणारा परिणाम:** भारतामधील आदिवासी समाजातील सामाजिक विषमता ही ऐतिहासिक प्रक्रियांमधून निर्माण झालेली असून ती सामाजिक रचनेत खोलवर रुजलेली आहे. आदिवासी समुदाय पारंपरिकरित्या जंगल, डोंगराळ व दुर्गम भागात वास्तव्यास असून त्यांचे जीवन स्वतंत्र सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांवर आधारित आहे. औपनिवेशिक काळातील वनधोरणे तसेच स्वातंत्र्योत्तर विकास प्रकल्पांमुळे आदिवासींच्या पारंपरिक जीवनशैलीत मोठ्या प्रमाणावर विस्थापन घडून आले. जमिनीपासून वंचित होणे, उपजीविकेची साधने नष्ट होणे आणि सामाजिक अस्थैर्य निर्माण होणे याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक परिस्थितीवर झाला. घुर्ये (१९६३) यांच्या मते, आदिवासी समाजाला हळूहळू एका श्रेणीबद्ध सामाजिक रचनेत सामावून घेण्यात आले; मात्र त्यांच्या सामाजिक - आर्थिक हक्कांचे पुरेसे संरक्षण झाले नाही.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सामाजिक विषमता ही संसाधनांच्या असमान उपलब्धतेतून निर्माण होते. जमीन, शिक्षण, रोजगार आणि राजकीय सत्ता या क्षेत्रांमध्ये आदिवासी समाज दीर्घकाळ वंचित राहिला आहे. सरकारी अहवालांनुसार आदिवासी कुटुंबांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. नीति आयोगाच्या (२०२१) अहवालानुसार अनेक आदिवासीबहुल जिल्हे मानवी विकास निर्देशांकांमध्ये मागे आहेत, विशेषतः साक्षरता, शालेय उपस्थिती आणि शिक्षण पूर्ण करण्याच्या बाबतीत दारिद्र्याचा थेट परिणाम शिक्षणावर होतो, कारण त्यामुळे शैक्षणिक साहित्य, पोषण, स्थिर निवास आणि शिकण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध होत नाही.

सामाजिक बहिष्करणामुळे ही विषमता अधिक तीव्र होते. भौगोलिक दुर्गमता, सांस्कृतिक वेगळेपणा आणि मुख्य प्रवाहातील संस्थांपासून दूर राहणे यामुळे आदिवासी समाज शैक्षणिक संधींपासून वंचित राहतो.

समाजशास्त्रज्ञांच्या मते, जेव्हा सामाजिक रचना वरच्या पातळीवर जाण्याच्या संधी रोखते, तेव्हा विषमता पिढ्यानपिढ्या टिकून राहते. वंचित आदिवासी कुटुंबात जन्मलेली मुले सामाजिक मर्यादा वारशाने घेऊन आपला शैक्षणिक प्रवास सुरू करतात, ज्यामुळे त्यांची प्रगती अधिक कठीण बनते.

सामाजिक विषमतेचा थेट परिणाम आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहभागावर आणि यशावर होतो. दारिद्र्यामुळे पाठ्यपुस्तके, शिकवणी वर्ग आणि डिजिटल साधने यांचा अभाव निर्माण होतो. त्याचबरोबर सामाजिक भेदभाव, कमी अपेक्षा आणि आत्मविश्वासाचा अभाव यामुळे शैक्षणिक प्रेरणा कमी होते (देवळे, २०१५). अनेक आदिवासी विद्यार्थी शाळेत परकेपणाची भावना अनुभवतात, ज्यामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते.

भाषा हा आणखी एक महत्त्वाचा अडथळा आहे. अनेक आदिवासी मुले पहिल्या पिढीतील शिकणारी असून त्यांची मातृभाषा शाळेतील अध्यापन भाषेपेक्षा वेगळी असते. एनसीईआरटी (२०१९) च्या अहवालानुसार, बहुभाषिक अध्यापन पद्धतींच्या अभावामुळे शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच शिकण्यातील दरी निर्माण होते. त्यामुळे या संरचनात्मक विषमता दूर केल्याशिवाय केवळ शैक्षणिक प्रवेश वाढवून समता साध्य करणे शक्य नाही. म्हणूनच, शिक्षण व्यवस्था जर सामाजिक व सांस्कृतिक विषमता लक्षात न घेता कार्यरत असेल, तर ती समतेचे उद्दिष्ट साध्य करू शकत नाही. खऱ्या अर्थाने शैक्षणिक समता साध्य करण्यासाठी केवळ संख्यात्मक विस्तार नव्हे, तर सामाजिक रचनात्मक सुधारणांची नितांत आवश्यकता आहे.

**संस्था आणि समाजाची भूमिका:** आदिवासी विद्यार्थ्यांवरील सामाजिक असमानतेचा परिणाम कमी करण्यात शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे केवळ प्रवेश देणाऱ्या यंत्रणा न राहता, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पोषक व समावेशक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. समावेशक अध्यापन पद्धती, सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील शिक्षण, पूरक व उपचारात्मक वर्ग, शैक्षणिक मार्गदर्शन तसेच समुपदेशन सेवा यांद्वारे संस्थांनी आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक व मानसिक आधार द्यावा. विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या समता कक्ष, विशेष मार्गदर्शन योजना आणि उपचारात्मक अध्यापन उपक्रम प्रभावीपणे राबविल्यास शैक्षणिक विषमता कमी होण्यास लक्षणीय मदत होऊ शकते.

यासोबतच स्वयंसेवी संस्था, नागरी समाज संघटना आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. अनेक स्वयंसेवी संस्था आदिवासी भागांमध्ये वसतिगृहे, अनौपचारिक शिक्षण केंद्रे, शिष्यवृत्ती सहाय्य आणि जनजागृती कार्यक्रम राबवून शासकीय प्रयत्नांना पूरक मदत करतात. स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग असल्यास धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावी ठरते. स्थानिक पातळीवर विश्वास निर्माण होतो आणि शिक्षण हे बाह्य लादलेले साधन न राहता सामाजिक सशक्तीकरणाचे प्रभावी माध्यम बनते. त्यामुळे शैक्षणिक संस्था, समाज आणि समुदाय यांचा समन्वय आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समतेसाठी अत्यावश्यक ठरतो.

**सूचना आणि धोरणात्मक परिणाम:** आदिवासी विद्यार्थ्यांमधील सामाजिक व शैक्षणिक असमानता कमी करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप करताना केवळ आर्थिक सहाय्यावर मर्यादित न राहता सामाजिक, सांस्कृतिक आणि संरचनात्मक अडथळ्यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक पातळीवर शैक्षणिक नियोजन प्रक्रियेत स्थानिक आदिवासी समुदायाचा सक्रिय सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शाळा व्यवस्थापन समित्यांमध्ये आदिवासी पालक, स्थानिक नेते आणि समाज प्रतिनिधींचा समावेश झाल्यास धोरणे अधिक वास्तवाशी सुसंगत आणि प्रभावी ठरू शकतात. सामाजिक भेदभाव, भाषिक अडथळे आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी यांबाबत जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच आरोग्य, पोषण आणि निवास यांसारख्या मूलभूत सुविधांचा शिक्षणाशी समन्वय साधल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सातत्य आणि सहभाग वाढू शकतो.

शैक्षणिक पातळीवर मातृभाषेतील अध्यापनाची प्रभावी अंमलबजावणी करणे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची संख्या वाढविणे आणि दुर्गम आदिवासी भागांमध्ये डिजिटल पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये आदिवासी संस्कृती, सामाजिक पार्श्वभूमी आणि आर्थिक वास्तव यांचा समावेश केल्यास अध्यापन प्रक्रिया अधिक समावेशक आणि परिणामकारक ठरू शकते. दीर्घकालीन दृष्टीकोनातून शिक्षणाला रोजगाराभिमुख कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधींशी जोडणे आवश्यक आहे. अशा सर्वांगीण आणि संवेदनशील धोरणात्मक उपाययोजनांद्वारेच शिक्षण हे आदिवासी समाजासाठी खऱ्या अर्थाने सामाजिक समतेचे आणि सशक्तीकरणाचे प्रभावी साधन ठरू शकते.

**निष्कर्ष:** सदर अभ्यासातून हे स्पष्टपणे दिसून येते की भारतातील आदिवासी विद्यार्थ्यांवरील सामाजिक विषमता ही केवळ आर्थिक मर्यादांपुरती सीमित नसून ती ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक

घटकांशी खोलवर जोडलेली आहे. जात, जमात, वर्ग, प्रदेश आणि भाषा यांसारख्या घटकांमुळे आदिवासी समुदाय दीर्घकाळ मुख्य प्रवाहापासून दूर राहिला आहे. शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे प्रभावी साधन मानले जात असले, तरी प्रत्यक्षात आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणप्रवेश, शैक्षणिक टिकाव, गुणवत्ता आणि उच्च शिक्षणातील संधी या सर्व स्तरांवर अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे सामाजिक विषमता ही पिढ्यानपिढ्या पुनरुत्पादित होत असल्याचे चित्र दिसून येते.

अभ्यासात शासकीय धोरणे आणि योजना यांचा सविस्तर आढावा घेतल्यावर असे आढळते की घटनात्मक तरतुदी, शिष्यवृत्ती योजना, निवासी शाळा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण यांसारख्या उपक्रमांमुळे शिक्षणातील प्रवेशात काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, या धोरणांची अंमलबजावणी अनेकदा अपुरी, असमान आणि प्रशासनकेंद्रित स्वरूपाची ठरते. स्थानिक सामाजिक वास्तव, सांस्कृतिक विविधता आणि आदिवासी समुदायांचा सहभाग यांचा अभाव असल्यामुळे धोरणांचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. त्यामुळे धोरणे अस्तित्वात असणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी, संवेदनशील आणि समावेशक अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

थोडक्यात, आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक समता साध्य करण्यासाठी केवळ शैक्षणिक विस्तारावर भर देणे पुरेसे नाही. सामाजिक संरचना, सांस्कृतिक मान्यता, भाषिक समावेशन आणि संस्थात्मक बदल यांचा समन्वित विचार करणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्था, शासन, नागरी समाज आणि स्थानिक समुदाय यांचा संयुक्त सहभाग असल्यासच शिक्षण हे आदिवासी समाजासाठी खऱ्या अर्थाने सशक्तीकरणाचे साधन ठरू शकते. अशा सर्वांगीण आणि संवेदनशील दृष्टिकोनातूनच सामाजिक विषमता कमी करून आदिवासी विद्यार्थ्यांना समान संधी आणि सन्मान प्राप्त करून देता येईल. बेतेय, आंद्रे. (२०१२). भारतीय समाजातील विषमता. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.

**संदर्भ सूची :**

देसाई, ए. आर. (२०१५). भारतीय समाज: रचना आणि परिवर्तन. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.

घुर्ये, जी. एस. (१९६३). भारतीय आदिवासी. पुणे: गोकुळदास पब्लिशर्स.

झक्सा, व्हर्जिनियस. (२०१४). आदिवासी समाज: इतिहास, संस्कृती आणि शिक्षण. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस (मराठी अनुवाद उपलब्ध).

देवळे, एस. एम. (२०१५). शिक्षण आणि सामाजिक समता. औरंगाबाद: विद्या प्रकाशन.

महाराष्ट्र शासन. (२०२०). आदिवासी विकास धोरणे व योजना. मुंबई: आदिवासी विकास विभाग.

भारत सरकार. (२०१९). राष्ट्रीय शिक्षण धोरण – मसुदा. नवी दिल्ली: शिक्षण मंत्रालय (मराठी आवृत्ती).

एनसीईआरटी. (२०१९). बहुभाषिक शिक्षण आणि आदिवासी विद्यार्थी. नवी दिल्ली: एनसीईआरटी.

नीति आयोग. (२०२१). मानवी विकास अहवाल. नवी दिल्ली: भारत सरकार (मराठी सारांश).

फुले, ज्योतिराव. (१८७३/पुनर्मुद्रण). गुलामगिरी. पुणे: साकेत प्रकाशन.

Deshpande, A. (2011). *The Grammar of Caste: Economic Discrimination in Contemporary India*. Oxford University Press

# स्त्रियांविषयी विकृत धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन आणि शासकीय धोरण

**डॉ. माया बापुराव मसराम** शरदराव पवार आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज, गड़चांदूर ता.कोरपना जिल्हा चंद्रपुर

**सारांश:** स्त्रियांबद्दलचे विकृत धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन यामुळे स्त्रियांच्या विकासाच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण होतात. स्त्रियांच्या सक्षमीकरणात भेदभाव, हुंडा पद्धती, पुरुषप्रधानता, रुढीवाद, लवकर विवाह या सर्व गोष्टी अडथळे निर्माण करते. ज्यामुळे हिंसाचार, कामाचे ठिकाणी भेदभाव, वेतन असमानता यासारख्या समस्या निर्माण होतात. पण यावर मात करण्यासाठी भारतीय संविधान आणि महाराष्ट्र राज्याने समान हक्क, शिक्षण, आरोग्य आणि विविध कायदे केले आहे. तरीही या समस्येवर मात करण्यासाठी सामाजिक जागृती आणि धोरणाची प्रभावी अमलबजावणी आवश्यक आहे अनेक सामाजिक आणि धार्मिक विचारामुळे स्त्रियांना दुय्यम मानले जाते. ज्यामुळे त्यांचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य हिरावले गेले. अजूनही अनेक ठिकाणी हुंडा घेऊन लग्न करतात ज्यामुळे मुलींच्या जन्माकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते. घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, वधू म्हणून मुलीची विक्री यासारख्या समस्या आजही भारतामध्ये आहे. गरीब मुलींना शिक्षणाऐवजी घरकाम किंवा बालविवाहाच्या जाळयामध्ये अडकवले जाते त्यामुळे महिलांना आपला विकास साधता येत नाही.

भारतीय संविधानात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे समान अधिकार दिले. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी महिला सक्षमीकरणासाठी धोरण आखली. शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक स्वातंत्र्यावर भर दिला गेला. समान वेतन कायदा (१९ ७६) घरगुती हिंसाचार कायदा( २००५) कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ थांबविण्यासाठी चा कायदा (२०१३) करण्यात आला परंतु सामाजिक जागृतीचा अभाव असल्यामुळे आजही स्त्रियांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.या समस्या शहरी व ग्रामीण भागातील महिलांना वेगवेगळ्या प्रमाणात भेडसावतात आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक आणि मानसिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करतात. जोपर्यंत शासनाच्या शासकीय धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणार नाही तोपर्यंत सामाजिक दृष्टिकोनात बदल आणि महिलांचे सक्षमीकरण घडवून आणणे कठीण आहे.

**मुख्य शब्द:** महिला शासकीय धोरण, कामाच्या ठिकाणी, भेदभाव, अत्याचार, सामाजिक दृष्टिकोन, विकास, अडथळा, दुय्यम, धार्मिक व सामाजिक.

**उद्देश:** १) स्त्री शिक्षणाविषयी समाजाचा दृष्टिकोन जाणून घेणे. २) महिलांच्या सक्षमीकरणात धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन कसे अडथळे निर्माण करते ते तपासून पाहणे.
३) बदलत्या जगात महिलांना सर्व क्षेत्रात समानतेची वागणूक मिळते का हे जाणून घेणे.

**संशोधनाची पद्धत:** प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत याचा वापर करण्यात आला. प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेल्या गोष्टींचा समावेश या लेखांमध्ये करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** अलीकडच्या काळात दळणवळणाची साधने आणि वाढता प्रसार माध्यमाचा प्रभाव यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणावर आपल्यापुढे येत आहे. या बातम्या विविध ठिकाणच्या विविध समस्येची संबंधित असल्या तरी त्यातील स्त्रियांविषयी बातम्या मन हे लावून टाकणाऱ्या आहेत. स्त्रियांचा हुंड्यासाठी होणारा छळ,लहान मुली पासून तर वयोवृद्ध महिलेवर झालेला बलात्कार,फसवणूक, विनयभंग, मुलीची खरेदी- विक्री, मारझोड, इच्छेविरुद्ध विवाह, स्त्रीभ्रूण हत्या, कुमारी माता अशा विविध समस्यांनी स्त्रियांना एक सबला नारी म्हणून जीवन जगण्यास असमर्थ करून टाकले आहे. त्यामुळे स्त्री आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आज जगात स्त्रियांसाठी असुरक्षित देश म्हणून भारताचे नाव प्रथम क्रमांकावर येते.

आपल्या देशात प्रत्येक ५६ मिनिटाला एक बलात्कार केला जातो.२६ मिनिटाला स्त्रियांचा विनयभंग आणि ४२ मिनिटाला स्त्रियांचा हुंड्यासाठी बळी घेतला जातो हा भारतीय गौरवशाली संस्कृती समजणाऱ्या देशात ह्या घटना घडताना दिसतात. सरकारने स्त्रियांच्या सुरक्षेसाठी अनेक कायदे केली तरी पण महिलांच्या वाट्याला स्वाभिमानाचे जीवन जगणे अजून पर्यंत आले नाही.

भारतीय स्त्रियांना स्वाभिमानाचे जीवन जगणे तिच्या वाटेला का आले नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय मनुस्मृती होय. १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले. पण भारतीय माणसाच्या मनातील विकृत मनुस्मृती मात्र अजूनही बाहेर निघाली नाही. या मनुस्मृतीचे मुळे इतके खोलवर व्यक्तीच्या मनात रुजलेले आहे की, त्यातून बाहेर पडण्याचा मार्गच बंद आहे. त्यामुळे शासकीय धोरण व कायद्याचा कितीही प्रसार व प्रचार झाला तरी स्त्रियांकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोन मात्र बदलताना दिसत नाही. सजीव असूनही निर्जीव वस्तू प्रमाणे वाटेल तेव्हा उपभोगल्या जाणाऱ्या स्त्रियांचे जीवन फार कठीण झाले

आहे. या देशात सर्वच स्तरातील स्त्रिया सुरक्षित नाही. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असणाऱ्या स्त्रियांकडे पाहिले तर ती देखील कुटुंब, ऑफिस, इतर व्यवसाय या ठिकाणी स्त्री म्हणून तिच्या जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतात.कुटुंबात सासू-सासऱ्यांपासून तर येणाऱ्या पाहुण्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे, ऑफिसमध्ये वरिष्ठ अधिकारी यांच्या दबावाखाली काम करणे,व्यवसायामध्ये चतुराई दाखवली तर तिला बदनाम केल्या जाते. एखादी स्त्री आपल्या मेहनतीने, कला कौशल्याने, परिश्रमाने पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असेल, पुढे येऊन आपले कौशल्य दाखवीत असेल अशावेळी तिचे मनोबल खचविले जाते. अन्यथा तिला पुढे येण्याची संधीच नाकारल्या जाते. प्रामाणिकपणे कार्य करूनही तिच्या कामाची कोणती दखल ऑफिसमध्ये घेतल्या जात नाही. आणि चमचेगिरी करणाऱ्या लोकांना मात्र सर्व न्याय मिळतो ही वस्तुस्थिती आहे.अशा व्यवस्थित कार्य करताना अनेकदा तिला मानसिक त्रास सहन करावा लागतो. महिलांच्या सुरक्षेसाठी शासनाने प्रत्येक कार्यालय, शाळा, महाविद्यालय या ठिकाणी महिला तक्रार पेटी लावली आहे. पण त्या तक्रार पेटीत किती महिला आपल्या तक्रारी टाकतात हा एक प्रश्नच आहे.तिने एखाद्या व्यक्तीची तक्रार केली तर त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी महिलेलाच बदनाम व्हावे लागते. अशावेळी तिला कोणतेच पाठबळ मिळत नाही म्हणून या शासनाच्या धोरणाचा महिलांना कोणताच लाभ होताना दिसत नाही.यांच्या या अवनतीला कारणीभूत महत्त्वाचा घटक कोणता याचा विचार जर केला तर असे दिसते की, माणसाच्या विचार व व्यवहाराला प्रभावित आणि प्रेरित करणाऱ्या दोन गोष्टी महत्त्वाचे आहेत एक पुरुषाची नैसर्गिक सहज प्रवृत्ती आणि दुसरी व्यक्तीवर होणारे संस्कार होय. स्त्रियांवर अत्याचार करणारा केवळ पुरुषच असतो असे नाही तर पुरुषाप्रमाणे स्त्रिया देखील स्त्रियांवर अत्याचार करतात.कारण काही स्त्रियांमध्ये जळाऊ वृत्ती असते अशा स्त्रिया उघड्या डोळ्यांनी दुसऱ्या स्त्रियांचे सुख, शांती पाहू शकत नाही आणि त्या देखील पुरुषांना तिला छळण्यामध्ये मदत करतात. हे विदारक चित्र अनेक ठिकाणी काम करणाऱ्या स्त्रियांच्या वाटेला आले आहे. कुटुंबातही सासू- सून या दोघीही एकमेकांना छळताना दिसते. ही परंपरा कितीतरी वर्षापासून आजही सुरू आहे. धार्मिक कर्मकांड, उपवास, परंपरा याचे पालन करणा-या स्त्रियांना संस्कारी मानले जाते. पण एखादी स्त्रिया कर्मकांडापासून दूर राहत असेल तर तिला समाजातील लोक सुखाने जगू देत नाही.

आज आम्हाला दूरदर्शन या प्रसार माध्यमांमधून याचे चांगले दर्शन होते.प्रत्येक मालिकेमध्ये कर्मकांड करणारी स्त्री ही संस्कारी मानली जाते.ज्या स्त्रिया या कर्मकांडापासून दूर राहतात त्या स्त्रीवर टीका केली जाते. हे सर्व घडत असताना मला असे वाटते की, असे संस्कार देण्यापेक्षा लहानपणापासूनच मुलींमध्ये धाडस, सहास, मेहनत, चिकाटी, जिद्द, नेतृत्व शिक्षण यानुसार तिची घडन केली तर नक्की तुमच्या आमच्या बाया आणि मुलींवर आपला बळी देण्याची वेळ येणार नाही. धार्मिक कर्मकांडात किती दिवस बायकां गुंतून राहणार आणि स्त्रिया देखील मुकाट्याने हा सर्व गोष्टी अंगीकारतात. जन्मतास कोणतीही स्त्री सबला व अबला नाही. तिला अबला किंवा सबला बनवण्याचे काम तेथील प्रस्थापित धार्मिक व सामाजिक व्यवस्था करते. नवऱ्याने मारले काय आणि पावसाने झोडले काय! याची तक्रार कुणाकडे करायची याप्रमाणे आजही आमच्या भारतीय स्त्रियांवर हे संस्कार होतात त्यामुळे अनेक स्त्रिया हुंडाबळी, बलात्कार, फसवणूक, मानसिक व शारीरिक शोषणाच्या बळी ठरतात.स्त्रियांची अब्रू लुटण्यासाठी पवित्र मानणारे मंदिर देखील अपुरे पडत आहे. शाळा, महाविद्यालय या ज्ञानार्धनाच्या पवित्र ठिकाणी सहकारी असणाऱ्या महिलेला समानतेने पाहिले जातं नाही.तिच्या प्रगतीत कसा अडथळा निर्माण होईल यासाठी प्रयत्न केला जातो. इतकेच नव्हे तर पहिल्या वर्गातील विद्यार्थिनी पासून तर महाविद्यालयीन सुंदर तरुणी वर काही उच्च विभूषित लोकांची नजर असते काही वेळा तिने प्रतिसाद दिला नाही. अशावेळी तिला बदनाम करण्याचाही प्रयत्न केला जातो. अशा महिला दृष्ट नजर ठेवणाऱ्या लोकांच्या मानसिक शोषणाच्या बळी पडतात. काही वेळा या महिला अशा व्यक्तीच्या मानसिक शोषणाला कंटाळून आत्महत्या करतात. ज्या व्यवस्थेत या महिला काम करतात त्यांना त्या ठिकाणी स्वतंत्रपणे राहता येत नाही. कारण त्याला जबाबदार त्या व्यवस्थित झालेले परंपरेने चालत आलेली प्रथा जसे की स्त्री फक्त उपभोगाच्या वस्तू आहेत 'पायातली वाहान पायात ठेवली तर ती डोक्यावर बसणार नाही. अशी मानसिकता स्त्रियांच्या प्रगतीत बाधक ठरते. आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वा अमृत महोत्सव साजरा करतो आहे. परंतु आम्ही अजूनही मनुस्मृतीची गुलामगिरी विसरायला तयार नाही. त्यामुळे आज जाती-धर्माच्या नावाखाली भांडणे लावून देण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.आम्ही अजूनही संविधानाचे पक्के पाईप झालेलो नाही.

मनुस्मृतीने स्त्रियांना मानसिक, शारीरिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या पूर्णपणे बंदिस्त करून ठेवले. स्त्रियांनी लहानपणी वडिलांच्या छायेत राहावे, लग्नानंतर पती आणि पतीच्या मृत्यूनंतर पुत्राची आज्ञा पाळावी. तिने स्वतंत्रपणे जीवन जगता कामा नये, पतीच्या मृत्यूनंतर दुसऱ्या विवाह करता कामा नये,पतीच्या मालमत्तेवर

पत्नीचा कोणताच अधिकार राहणार नाही, वेद रहित, यज्ञविधी स्त्रियांनी करू नये. त्यांनी ते केले तर त्यांना नरक वास प्राप्त होईल. पत्नीने पतीच्या सहमतीशिवाय यज्ञ, उपोषण करू नये पूर्णपणे पतीच्या अधिन राहिली पाहिजे, स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये आणि शिक्षण घेण्याचे धाडसीने दाखवले तर धर्म बुडेल हीच मानसिकता स्त्रियांच्या अधोगतीला कारणीभूत ठरली आहे. हे सर्व हिंदू धर्म ग्रंथांमध्ये नमूद केले आहे.आजही आमच्या स्त्रिया उच्चशिक्षित झाल्या तरी अनेक प्रथा परंपरेपासून त्यांची सुटका झाली नाही. उपासना, पारायण बुवा, महाराज, मूहर्त अशा गोष्टीवर आजही अनेक महिला विश्वास ठेवून स्वतः च बळी पडतात.

भारतीय संविधान महिलांना सतत समान हक्क आणि संधी प्रदान करतो. ते केवळ महिलांना समानता प्रदान करत नाही तर देशाला महिलांच्या बाजूने सकारात्मक भेदभावांचे उपाय अमलात आणण्याचे अधिकार देतो. लोकशाहीच्या चौकटीत कायदे, विकास धोरणे योजना आणि विविध कार्यक्रम महिलांच्या विकासासाठी आहे. भारत सरकारने महिलांचे स्थान, समान हक्क, सुरक्षितता करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या विविध आंतरराष्ट्रीय अधिवेशनांना आणि मानवी हक्कांच्या कायद्यांना देखील मान्यता दिली आहे. १९९३ मध्ये महिलांविरुद्ध सर्व प्रकारच्या भेदभावांचे निर्मूलन करण्यास मान्यता दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या हक्क आणि सुरक्षिततेसाठी विविध कायदे केले परंतु महिलांच्या हिताचे धोरण याची समाजात योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे आजही बऱ्याचश्या स्त्रिया स्वावलंबी झाल्या नाहीत. स्त्रियांबद्दलचे विकृत, धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन अनेकदा पुरुषप्रधान विचारसरणीतून निर्माण होतात त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. भारतीय संविधानाने व सरकारने शिक्षण, आरोग्य, आर्थिक व राजकीय सहभाग वाढवणारे कायदे व धोरणे अमलात आणली . महिला धोरण (२०२४), समान वेतन, कामाच्या ठिकाणी महिलांचे संरक्षण या कायद्यामुळे महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न सुरू आहे. भारतीय संविधानातील कलम १४, १५ आणि १६ नुसार महिलांना समानता, समान संधी आणि कोणताही भेदभाव करता कामा नये अशी तरतूद आहे. भारतीय घटनाकारांनी स्त्रियांच्या प्रगतीसाठी त्यांना अंधारातून प्रकाशात आणण्याचे कार्य केले. पण आमच्या स्त्रियांमध्ये संघटन नसल्यामुळे त्या आजही या प्रस्थापित मनुवादी व्यवस्थेच्या बळी पडतात.

स्त्री स्वातंत्र्य म्हणजे पुरुषाच्या गुलामगिरीतून मुक्त होणे, स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्री-पुरुषांचा समान सामाजिक हक्क होय. हा अनिष्ट व अयोग्य स्पर्धेचा बाजार नसून वैचारिक बैठक असलेली एक वाटचाल आहे. स्वायत्तता, स्वयंपूर्णता, बाजारीपणा म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर समानता आणि स्वातंत्र्य हे एकमेकांपासून वेगळे न राहणारे एक अंग आहे.हे स्त्रियांनी लक्षात घेऊन स्त्रीमुक्तीसाठी एक स्वतंत्र चळवळ उभारून भरीव कार्य करण्याची जिद्द ठेवली पाहिजे. पुरुषांचे वर्चस्व दाखवणारे सौभाग्याच्या अलंकाराच्या आधारे स्वतःचे रक्षण करण्याचे परावलंबित्व म्हणजे मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या होय. यांच्या बुरख्यात न राहता पुरुष प्रधान गुलामगिरीतून स्वतःची सुटका करून घ्यावी. आणि आपले वेगळे अस्तित्व निर्माण करावे. असे दृष्टिकोन मांडणारे अनेक साहित्यिक विचारवंत आहेत पण वस्तुस्थिती अशी आहे की, सौभाग्याच्या जबाबदारीचे ओझे स्त्रियांनी झुगारून देऊन त्यांचा वनवास संपला असे म्हणता येणार नाही. परंपरेची झाल्लर पांघरून असलेली सामाजिक व्यवस्था मात्र त्यांना स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण करते .या देशातील सनातनी, विषमतावादी प्रवृत्तीने हजारो स्त्रियांना अनेक वर्षापासून जाणीवपूर्वक शिक्षणापासून वंचित ठेवले. आणि मानसिक दृष्ट्या तिला कमजोर बनवले. स्त्रीचे माणूसपण या व्यवस्थेने गृहीत धरले नाही.' न स्त्री स्वातंत्र्य महरती' हे मनुचे वचन इथल्या समाजव्यवस्थेने तंतोतंत स्वीकारले होते. स्त्री नावाच्या मानवाची शक्ती पुढे येऊच द्यायची नाही. तिला संधी मिळताच ठेचून काढायचं हाच कट मनू वाद्यांनी मनुस्मृती या ग्रंथात सांगितला आहे. त्यामुळे मनुस्मृतीला व तिच्या विचार पतकाला घेऊन समग्र स्त्री जीवनास,वेठीस धरणाऱ्या मानसिकतेला संपवल्याशिवाय या देशातील स्त्री मुक्तीचा लढा सुरू करता येणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृती या विषारी धर्मग्रंथाचे दहन केले. हा लढा खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्तीचा लढा होता. परंतु प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेत स्त्रियां प्रतिचा परंपरागत दृष्टीकोन बाबासाहेबांना, महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंना जसा बदल पाहिजे होता. तसा बदल झालेला दिसत नाही.

**संदर्भ ग्रंथ:**

१) आंबेडकर डॉ. बाबासाहेब - हिंदू कोड बिल (संपा), रत्नाकर गणवीर नेहा प्रकाशन १२० अशोक नगर नागपूर

२) आंबेडकर बी.आर.- हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती- सुगत प्रकाशन वैशाली नगर नागपूर.

३) साळुंखे आ. ह.- महाभारतातील स्त्रिया- भाग १- सुगावा प्रकाशन सदाशिवपेठ, चित्र शाळा बिल्डिंग पुणे.

# स्त्री भ्रूणहत्या समस्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रो. डॉ. दिगंबर तंगलवाड** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा, महाराष्ट्र.

**शोध सारांश:** स्त्री भ्रूणहत्या ही समस्या भारतासहित अनेक विकसनशील देशांमध्ये गंभीर रूप धारण करीत आहे. आधुनिक काळात विकसित झालेली वैद्यकीय तंत्रज्ञान पद्धती यामुळे गर्भावस्थेत असलेल्या लिंगाचा शोध घेत त्याची ओळख पटविण्याचे काम केले जाते. जे अर्भक मुलगी असते त्याची हत्या करण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये प्रयत्न केले जात आहेत. मुळामध्ये स्त्रीभ्रूण हत्या करणे हे कायदेशीर अपराध असून सुद्धा गांभीर्याने त्याच्यावर अंमलबजावणी केली जात नाही. परिणामी समाजाची संरचना आणि लिंग गुणोत्तर यामध्ये बदल घडून येत असून सामाजिक संतुलन बिघडण्याची स्थिती तयार झालेली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने ही समस्या पितृसत्ताक विचाराने तसेच लैंगिक भेदभाव आणि सामाजिक आर्थिक असमानतेमुळे गंभीर रूप धारण करताना दिसून येते. भारतात आजही मुलगा हा वंशाचा दिवा म्हणून श्रेष्ठ मानला जातो. मुलगी ही कनिष्ठ व कुटुंबाला बोज ही मानसिकता लोकांमध्ये असल्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचा प्रयत्न लोक सातत्याने करतात. ही घटना अत्यंत अमानवीय असुन ती दिवसेंदिवस वाढताना दिसून येते. सामान्यपणे ही घटना लोकांमध्ये असलेले अज्ञान बेरोजगारीपणा, दारिद्र्य त्याचबरोबर गर्भपाताच्या कायद्याचा चुकीचा अर्थ व कायद्याची नीट अंमलबजावणी नसल्यामुळे स्त्री भ्रूणहत्येचा प्रश्न वाढतो आहे. त्याचा परिणाम म्हणून समाजात स्त्री-पुरुष असमानता निर्माण झाली असून स्त्री अत्याचारांमध्ये वाढ होताना दिसते. भविष्यकाळामध्ये बहुपती प्रथा सुद्धा अस्तित्वात येऊ शकते. हा एक समाजासाठी मोठा धोका आहे, त्यामुळे स्त्री भ्रूणहत्या समस्येवर उपाय करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रस्तुत अध्ययनामध्ये स्त्री भ्रूणहत्येच्या समस्येचे गांभीर्याने अध्ययन करून स्त्रीभ्रूणहत्येच्या कारणांचा परिणामाचा शोध घेऊन त्यावर उपाय सुचविण्यात आलेले आहेत.
**संकल्पनात्मक शब्द:** स्त्रीभ्रूण, स्त्रीभ्रूण हत्या, असमानता, पितृसत्ताक संरचना.

**प्रस्तावना:** भारत देश हा एक संस्कृती संपन्न देश म्हणून जगाच्या पाठीवर ओळखला जातो. भारत भूमी ही "सुजलाम सुफलाम" भूमी म्हणून ओळखली जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचा जसा झपाट्याने विकास होत गेला, त्याच तुलनेत अनेक समस्याही निर्माण झाल्या. उदा. दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्या वाढ, झोपडपट्टी, आतंकवाद, समुदायवाद, भाषावाद, प्रांतवाद, पर्यावरणाची समस्या अशा अनेक समस्या पैकी विकासात्मक विचारातून उदयाला आलेली अत्यंत एक गंभीर सामाजिक समस्या जी अत्यंत जलद गतीने लक्ष वेधून घेणारी आहे ती म्हणजे 'स्त्रीभ्रूणहत्या' समस्या होय.

देशाच्या विविध राज्यात दर हजार पुरुषां मागे स्त्रियांचे प्रमाण हे विषम असलेले दिसून येते. संपूर्ण भारताचा विचार करता हे प्रमाण दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४० एवढे आहे आणि ही संख्या दिवसेंदिवस घटताना दिसून येते. ज्यावेळी मुलींचा गर्भ नष्ट केला जातो त्यावेळी स्त्रीला विश्वासात घेतले जात नाही. यावरून पुरुषप्रधान संस्कृतीचे प्राबल्य आजही समाजात आहे. त्यामुळेच अलीकडील काळात स्त्री ही पुरुषांच्या दर्जाच्या बरोबरीची आहे असे म्हटले जात असले तरी आजही समाजात आर्थिक, धार्मिक, राजकीय वैवाहिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रियांचे स्थान दुय्यमच आहे. विज्ञान युग निश्चितच परिवर्तनशील व वरदान असले तरी त्याचा दुरुपयोग करून स्त्रीभ्रूणहत्या केल्या जात असल्यामुळे विज्ञान एक शाप म्हणून देखील काम करताना दिसून येते. यामुळे लिंग विषमतेची समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. म्हणून स्त्रीभ्रूणहत्या समाजाला लागलेला एक कलंक आहे असे म्हणता येईल. यावरून सामाजिक तत्त्ववेत्यांनी व समाजशास्त्रज्ञांनी समाजाला जागरूक करण्याची गरज आहे. स्त्रीभ्रूणहत्या ही भारतीय समाजातील एक लक्षवेधक समस्या आहे भ्रूण म्हणजे गर्भ व भ्रूणहत्या म्हणजे गर्भाची हत्या अर्थात स्त्रीभ्रूणहत्या म्हणजे मुलीच्या गर्भाची हत्या करणे होय. आपल्याच रक्ता मांसाचा गोळा आई वडील डॉक्टर रुपी कसायाकडे नेऊन वैज्ञानिक तंत्राद्वारे जन्म अधिक स्त्री लिंगाचे तुकडे तुकडे करून नष्ट करतात त्याला स्त्रीभ्रूणहत्या असे म्हणतात.

**साहित्य समीक्षा:**

**१) अमृत्यसेन:** अमृत्यसेन यांनी केलेल्या अध्ययनामध्ये लिंग अनुपात याची गिरावट याला 'मिसिंग वुमन' अशी संज्ञा दिलेली आहे त्यांच्या मतानुसार लाखो महिला जन्म घेण्याच्या अगोदरच भेदभावाच्या कारणामुळे लुप्त होत आहेत. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेमध्ये महिलांचे प्रमाण कमी होत आहे.

**२) *लीला दुबे*:** लीला दुबे यांनी भारतीय समाजातील पितृसत्ताक व्यवस्थेच्या भूमिकेचे विश्लेषण केलेले आहे त्यात त्यांनी असे म्हटले की मुख्यतः प्रजनन आणि घरेलू भूमिका यामुळे स्त्रीभ्रूणहत्येची समस्या वाढलेली आहे कारण कुटुंबात महिलांना दुय्यम स्थान असल्यामुळे त्यांचे मत लक्षात घेतले जात नाही व भ्रणाची हत्या केली जाते.

**३) भारत सरकार जनगणना अहवाल:** भारत सरकारच्या जनगणना अहवालामध्ये सुद्धा आर्थिक दृष्ट्या समृद्ध राज्यांमध्ये सुद्धा स्त्रीभ्रूणहत्येची समस्या गंभीर आहे

यावरून हे स्पष्ट होते की, ही समस्या केवळ गरीबीशी संबंधित नाही तर सामाजिक मानसिकतेशी संबंधित आहे अर्थात भारतातील विविध राज्यांमध्ये आर्थिक परिस्थिती सक्षम असलेल्या कुटुंबामध्ये सुद्धा स्त्रीभ्रूणहत्येची समस्या मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येते. त्यामुळे ही एक गंभीर समस्या आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) स्त्री पुरुष प्रमाणाचा शोध घेणे, २) स्त्रीभ्रूणहत्येच्या कारणांचा शोध घेणे, ३) स्त्रीभ्रूणहत्येच्या परिणामांची मीमांसा करणे, ४) स्त्रीभ्रूणहत्येस पुरुषप्रधान संस्कृती जबाबदार आहे काय? याचा शोध घेणे, ५) स्त्रीभ्रूणहत्येमुळे लिंग विषमता कशी निर्माण होते हे जाणून घेणे.

**संशोधनाची गृहीतके:** १) स्त्री-भ्रूणहत्या ही पुरुषप्रधान संस्कृतीमुळे निर्माण झाली आहे. २) स्त्रीभ्रूणहत्येमुळे लिंग विषमता निर्माण होते. ३) वैज्ञानिक तंत्रज्ञानामुळे स्त्रीभ्रूणहत्या करणे सोयीचे ठरले. ४) स्त्री-भ्रूणहत्या आई-वडिलांबरोबर डॉक्टर देखील जबाबदार आहेत. ५) स्त्री-भ्रूणहत्येमुळे निर्माण झालेल्या लिंग विषमतेमुळे समाजाचे विघटन होत आहे .

**अभ्यासाचे महत्त्व:**

प्रस्तुत संशोधनामुळे स्त्रीभ्रूणहत्येच्या कारणांची व परिणामांची विमांसा करण्यात येत असल्यामुळे तसेच गर्भाचे माता पिता समाज आणि डॉक्टर या समस्येला कसे जबाबदार आहेत याचाही अभ्यास या संशोधनामुळे होत असल्यामुळे त्याच्या अभ्यासाला महत्त्व आहे याशिवाय भारतीय पातळीवर स्त्रियांचे पुरुषाशी प्रमाण काय आहे आणि भविष्यात हे प्रमाण घटत गेले तर त्याचे काय परिणाम होतील याचाही शोध प्रस्तुत अध्ययनामध्ये घेण्यात आलेला असल्यामुळे या अभ्यासाचे विशेष महत्त्व आहे.

**संशोधन आराखडा:** प्रस्तुत शोध अभ्यासासाठी संशोधन आराखड्यांपैकी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आलेला आहे वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून स्त्री अध्ययन संदर्भातील जागतिक स्तरावरील तसेच महाराष्ट्र स्तरावरील भारतीय स्तरावरील माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले असून स्त्रीभ्रूणहत्येचे कारणे त्याचे परिणाम व स्त्रीभ्रूणहत्येवरील उपायाचा शोध घेऊन वर्णनात्मक विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत अध्ययनामध्ये करण्यात आलेला आहे

**शोध अध्ययन पद्धती:** प्रस्तुत विषयावरील शोधा देण्यासाठी गुणात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे या पद्धतीच्या सहाय्याने अमूर्त तथ्याचे आकलन करून त्याचे विश्लेषण करण्यात येते गुणात्मक पद्धतीच्या माध्यमातून सूक्ष्म तथ्यांचा व सामुदायिक तथ्यांचा शोध घेता येतो त्या अनुषंगाने गुणात्मक पद्धती उपयोगाची ठरते.

**तथ्य संकलनाचे तंत्र:** अन्य शास्त्राप्रमाणे समाजशास्त्रात-ही ज्ञानेंद्रियाच्या आधारे निरीक्षणाचा बोध घेऊन तथ्य प्राप्त केली जातात. आपल्या ज्ञानेंद्रियावर आघात करणाऱ्या गोष्टींमुळे आपणास झालेल्या संवेदनाची नोंद तथ्य रूपाने घेतली जाते. प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलनाकरिता दुय्यम तथ्य संकलन साधनांचा उपयोग करण्यात आला असून स्त्रीभ्रूणहतेशी संबंधित लिखित साहित्य, शासकीय दस्तऐवज, वर्तमानपत्रे व मासिके इत्यादीचा उपयोग करून शोध पूर्ण करण्यात आला.

**माहितीचे विश्लेषण:** सन २०११च्या जनगणनेनुसार, जागतिक स्तरावर स्त्री-पुरुषांच्या प्रमाणावर दृष्टिक्षेप टाकल्यास दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण हे पुढील प्रमाणे दिसून येते जसे की रशियामध्ये ११६५, ऑस्ट्रेलिया १०१०, फ्रान्स १०५६, जपान १०५४, इंडोनेशिया १००३, जर्मनी १०३८, युके इंग्लंड १०५७, नायजेरिया ९५४, मलेशिया ९७०, ब्राझील १०३१, इराण ९३८, दक्षिण आफ्रिका १०२८ भारत ९४०, अमेरिका १०२६, ची ९२७, कोरिया १०२० आणि सौदी अरेबिया मध्ये स्त्रियांचे प्रमाण ९२७ असे आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ असून, राज्यात सर्वाधिक लोकसंख्येचा जिल्हा ठाणे (सुमारे १.१ कोटीहून अधिक) आणि सर्वात कमी लोकसंख्येचा जिल्हा सिंधुदुर्ग (सुमारे ८.५ लाख) होता. मुंबई उपनगर आणि पुणे हे इतर दाट लोकवस्तीचे जिल्हे आहेत. महाराष्ट्राचे लिंग गुणोत्तर दर १००० पुरुषांमागे ९२९ महिला इतके आहे, जे राष्ट्रीय सरासरी (९४३) पेक्षा कमी आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण ९५२ आणि नागरी भागात ९०३ महिला (दर १००० पुरुषांमागे) आहे. रत्नागिरी (११२२) आणि सिंधुदुर्ग (१०३७) जिल्ह्यांत सर्वाधिक तर मुंबई शहर (८३२) आणि मुंबई उपनगर (८६०) मध्ये सर्वात कमी लिंग गुणोत्तर आहे.

२०११ जनगणनेनुसार महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा निहाय लिंग गुणोत्तर (दर १००० पुरुषांमागे महिला) पुढील प्रमाणे दिसून येते जसे की, सर्वोच्च लिंग गुणोत्तर असलेले जिल्ह्यात रत्नागिरी ११२२, सिंधुदुर्ग १०३७, गोंदिया ९९६, सातारा ९८८, भंडारा ९८२, यांचा समावेश होतो तर सर्वात कमी लिंग गुणोत्तर असलेले जिल्ह्यात मुंबई शहर ८३२, मुंबई उपनगर ८६०, ठाणे ८८०, पुणे ९१५, औरंगाबाद ९२३ या जिल्ह्यांचा समावेश होतो तसेच इतर प्रमुख जिल्ह्यांमध्ये नांदेड ९४३, जालना ९३७ असे महिलांचे प्रमाण दर हजार पुरुषांमागे दिसून येते. महाराष्ट्राचे एकूण लिंग गुणोत्तर ९२९ आहे. ग्रामीण लिंग गुणोत्तर ९५२ तर नागरी लिंग गुणोत्तर ९०३ असुन बाल लिंग गुणोत्तर (०-६ वर्षे) ८९४ आहे.

वरील आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ग्रामीण व शहरी भागामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे दर हजार पुरुषामागे विषम असलेले दिसून येते. यावरून स्त्रीभ्रूणहत्येच्या समस्येने महाराष्ट्रातही गंभीर रूप धारण केल्याचे स्पष्ट होत आहे.

**स्त्री भ्रूण हत्येची कारणे:**

**१) पुरुषप्रधानता:** भारतात पितृसत्ता कुटुंब पद्धतीने वर्चस्व स्थापित केले असल्यामुळे स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान प्राप्त झालेले होते त्यामुळे आपत्य प्राप्तीच्या बाबतीतही पुरुष निर्णय घेतात स्त्रियांचा कोणताही निर्णय परिवारामध्ये विचारात घेतला जात नाही त्यामुळे देखील स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहेत. अर्थात महिलांना पुरुषांच्या सत्तेमुळे नाईलाजाने स्त्रीभ्रूणहत्या करण्यासाठी तयार व्हावे लागते त्यामुळे स्त्रीभ्रूणहतेला पुरुषप्रधान पद्धती कारणीभूत ठरते.

**२) अज्ञान तथा अंधश्रद्धा:** भारतामध्ये विशेषतः ग्रामीण समाजामध्ये अज्ञान आणि अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणामध्ये आहे. मुलगी ही परक्याचे धन व मुलगा हा वंशाचा दिवा समजला जातो त्यामुळे मुलगा जन्माला कसा येईल याच्यावरच जास्तीत जास्त भर दिला जातो आणि मुलींच्या जन्माचा विरोध केला जातो याचा परिणाम म्हणून मुलींच्या गर्भाची हत्या करण्याचे पाप मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेली आहे. समाजामध्ये अज्ञान आणि अंधश्रद्धा असल्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येची समस्या गंभीर रूप धारण करत आहे.

**३) गर्भपाताच्या कायद्याचा चुकीचा अर्थ:** भारतात १९७२ मध्ये प्रथमच गर्भपाताच्या कायदा करण्यात आला. त्याप्रमाणे विशिष्ट परिस्थितीमध्ये गर्भपात करून घेण्यासह त्याच्यामध्ये संमती देण्यात आली होती परंतु सदर कायद्याचा गैरफायदा घेत पती-पत्नी दांपत्ये व डॉक्टर यांच्या संगणमताने नको असलेले स्त्री गर्भाची हत्या करण्याचा प्रकार चालू झाला, यातून स्त्रीभ्रूणहत्या वाढल्या तसेच १९८८ च्या गर्भपात परीक्षा विरोधक कायद्यानुसार गर्भजलाची परीक्षा करून गर्व हा स्त्रीचा आहे की पुरुषाचा आहे याचे निदान करणे बेकायदेशीर असताना तसेच १० जानेवारी २००३ मध्ये महाराष्ट्रात लिंग चाचणीवर बंदी घातलेली असताना सुद्धा स्त्री गर्भाची हत्या केली जाते त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या वाढतात थोडक्यात गर्भपाताच्या कायद्याचा चुकीचा अर्थ घेऊन त्याचा उपयोग स्त्रीभ्रूणहत्या करण्यावर होताना दिसते.

**४) लिंग परीक्षण व सोनोग्राफीचा वाढता प्रभाव:** अलीकडील काळामध्ये देशाच्या विविध भागांमध्ये सोनोग्राफी सेंटरद्वारे गर्भलिंग परीक्षण करून स्त्री गर्भ असेल तर काढून टाकण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेले दिसून येते. तालुका व जिल्हास्तरावर सर्वत्रच सोनोग्राफी सेंटरची सुविधा मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे या उपलब्ध करून दिलेल्या सोनोग्राफीच्या सेंटरवर लिंग परीक्षण करून स्त्री गर्भची हत्या करण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**५) कायद्याच्या अंमलबजावणीचा अभाव:** लिंगनिदान करणे हा कायद्याने गुन्हा असून वैद्यकीय व्यवसायातील डॉक्टरांनी त्यांच्या दवाखान्यामध्ये लिंगनिदान हा गुन्हा आहे असे लिहून ठेवलेले दिसून येते परंतु हेच डॉक्टर बेकायदेशीर रित्या लिंगनिदान करून गर्भलिंग हत्या करण्यास मदत करतात विशेष म्हणजे याला माता-पिता ही तेवढेच जबाबदार आहेत. महाराष्ट्रामध्ये बीड येथे डॉक्टर दांपत्यांनी अनेक स्त्रीभ्रूणहत्या केल्याचे प्रकार उघडकीस आलेले होते यासंदर्भामध्ये शासनामार्फत कठोर कारवाई केली जात नाही. बेकायदेशीर रित्या स्त्रीभ्रूण हत्या करणाऱ्या डॉक्टर व माता-पित्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे परंतु तसे होत नसल्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढलेले आहे.

**स्त्रीभ्रूणहत्या समस्येचे परिणाम:**

**१) स्त्री-पुरुष प्रमाणात असमतोल:** स्त्रीभ्रूणहत्या ही सर्वत्रच केली जात असल्यामुळे पुरुषांच्या तुलनेमध्ये स्त्रियांचे प्रमाण हे दिवसेंदिवस घटताना दिसून येते. याचा परिणाम म्हणून बलात्कार व गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणाची वाढ होताना दिसून येते. भारतात राष्ट्रीय पातळीवर दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण हे केवळ ९४० असून लिंग गुणोत्तराचा विचार करता स्त्रियांची संख्या कमी होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. यावरून स्त्री व पुरुषांमध्ये असमतोल वाढताना दिसून येते.

**२) स्त्री अत्याचारात वाढ व समाज सातत्याला धोका:** स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे समाजातील विविध घटकांमधून स्त्री अत्याचाराचे प्रमाण वाढताना दिसून येते भारतामध्ये मुळातच स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम असल्यामुळे याशिवाय स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस घटत चालल्यामुळे स्त्रियांवर लैंगिक अत्याचार शोषण, बालशोषण, पत्नीची अदलाबदली, सामूहिक बलात्कार अशा दृष्ट प्रवृत्तीला चालना मिळताना दिसून येते. जर स्त्रीभ्रूणहत्येच्या घटना वाढतच राहिल्या तर स्त्रियांवरील अत्याचार मोठ्या प्रमाणामध्ये वाढून समाज सातत्याला याचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

**३) बहुपत्नीत्व प्रथेला चालना मिळण्याचा धोका:** स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे भविष्यामध्ये प्रत्येक पुरुषाला पत्नी मिळणे अत्यंत अवघड होणार आहे, त्यामुळे अनेक पुरुषांना एका स्त्री सोबत विवाह करणे भाग पडू शकते त्यातूनच बहुपती प्रथेला चालना मिळण्याची शक्यता आहे. परिणामी समाजात हे निर्माण झालेले विदारक चित्र लोकशाहीला बाधा निर्माण करणाऱ्या असून मानवता वादाला धोका पोहोचणारे आहे.

म्हणून स्त्रीभ्रूणहत्या ही भविष्यामध्ये बहुपती प्रथेला चालना देऊ शकते व समाज अधोगतीकडे वाटचाल करू शकतो.

**स्त्रीभ्रूणहत्या समस्येवर उपाय:** शासनाने १९८८ साली केलेल्या गर्भजल विरोधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी बेकायदेशीर असलेल्या सोनोग्राफी सेंटरवर बंदी आणावी तसेच गर्भजल परीक्षण करणाऱ्या व गर्भजल परीक्षण करून घेणाऱ्यांवर व त्यानुसार स्त्रीभ्रूण हत्या करणाऱ्यांना शिक्षा करण्यात यावी. स्त्रीभ्रूण हत्या करणाऱ्या मात्यापित्यांना किमान तीन महिन्यांचा ते एक वर्षापर्यंतच्या कारावासाची शिक्षा करण्यात यावी. स्त्रीभ्रूणहत्या समाजास घातक असल्याबाबत समाजामध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेऊन मुलींना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात यावी, याशिवाय शासनामार्फत मुलींच्या विवाहाची व्यवस्था देखील करून देण्यात यावी. यामध्ये समाज कल्याण मंत्रालयाने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष:** स्त्रीभ्रूण हत्येला पुरुषप्रधान संस्कृती जबाबदार आहे स्त्रीभ्रूण हत्येमुळे समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण घटत आहे. स्त्रीभ्रूणहत्येमुळे समाजात स्त्री-पुरुषांचा असमतोल निर्माण होत असून, त्यातून स्त्रियांवरील अत्याचारांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ होत आहे. वैज्ञानिक तंत्रज्ञानामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढत असून त्यात मात्यापित्याबरोबर डॉक्टरही जबाबदार आहेत. स्त्रीभ्रूणहत्येमुळे स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे बहुपती प्रथा निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी विवाह संस्था, कुटुंब संस्था यांचे अस्तित्व धोक्यात येऊन सामाजिक विघटन होण्याची दाट शक्यता आहे.

**समारोप:** सारांश रुपाने असे म्हणता येईल की, स्त्रीभ्रूणहत्या ही भारतातील अत्यंत लक्षवेधक समस्या असून भारतीय समाजाला लागलेला एक कलंक आहे. कारण स्त्री ही वंशाची जननी आहे हे माहीत असूनही ही गर्भातच तिची हत्या करणे व वंशाचा दिवा म्हणून मुलाला महत्त्व देणे हे समाजासाठी पर्यायाने देशासाठी अत्यंत घातक आहे. स्त्रीभ्रूणहत्या हा पुरुषप्रधान संस्कृतीचा परिणाम असून यामुळे समाजामध्ये स्त्री व पुरुषांचे असमतोल प्रमाण निर्माण होत आहे. परिणामी भविष्यामध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण होऊ शकतात म्हणून या समस्येकडे शासनाने तातडीने लक्ष वेधणे गरजेचे आहे अन्यथा समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय हानी मोठ्या प्रमाणात होऊन समाज अस्थिरेकडे वाटचाल करू शकतो.

**संदर्भ ग्रंथसूची:**


1) United Nations Children's Fund (UNICEF). (2019). Gender equality: Global annual results report. New York:
2) UNICEF. World Health Organization. (2011). Preventing gender-biased sex selection. Geneva: WHO.
3) Government of India. (2021). National Family Health Survey (NFHS-5). New Delhi: Ministry of Health and Family Welfare.
४) भारत सरकार. (२०११). भारत की जनगणना २०११: लिंग अनुपात एवं जनसांख्यिकीय विवरण. नई दिल्ली: भारत सरकार, गृह मंत्रालय।
५) महिला एवं बाल विकास मंत्रालय. (२०१८). लैंगिक समानता और बालिका संरक्षण. नई दिल्ली: भारत सरकार।
६) शर्मा, आर.क. (२०१५). भारतीय समाज में स्त्री की स्थिति, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.
७) महाराष्ट्र शासन. (२०१९). स्त्री—पुरुष लिंग प्रमाण आणि सामाजिक समस्या. मुंबई: सामाजिक न्याय विभाग.
८) भिकर मंजुळा - भारतीय नारी शोषण के बदलते आयाम
९) सिंह मीनाक्षी महिला सशक्तिकरण
१०) पाटील स. (२०१६). ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री प्रश्न, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
११) दे शमुख, अ. (२०१८). स्त्री भ्रूण हत्या: एक सामाजिक अभ्यास. मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिका.
१२) श्रीवास्तव सुधारांनी - महिला शोषण आणि मानवाधिकार.
१३) देशमुख अलका विविध अंगी आयामातून स्त्री.

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषण व बालविवाह समस्या - एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. दिपक हरिभाऊ शिंदे** सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, के.टी,एच.एम. कॉलेज नाशिक

**गोषवारा:** आदिवासी हा या देशातील मूळ रहिवासी असून तो स्वताला जंगलचा राजा समजत असे. वसाहतवादी काळात या समाजाच्या अज्ञानाचा गैर फायदा घेऊन त्यांची लुट केली गेली. अज्ञान, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, यातून बाहेर काढण्यासाठी शासन, सेवाभावी संस्था, प्रयत्नशील आहेत. आजही आदिवासींमध्ये बालविवाह समस्या, कुपोषण या समस्या प्रकर्षाने दिसून येतात. नाशिक जिल्ह्यात आदिवासींची संख्या मोठी आहे. कुपोषण हे ग्रामीण आणि आदिवासी भागाला लागलेले ग्रहण आहे. शिक्षणाचा अभाव, गरिबी, रोजगाराचा अभाव, वारंवार पडणारे दुष्काळ, बालविवाह याचा परिणाम सर्वच वंचित घटकांवर होताना दिसून येतो. या दुष्काळाचा व वरील घटकांचा सर्वाधिक प्रभाव स्त्रिया आणि बालकांवर होताना दिसून येतो. प्रस्तुत निबंधात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या कुपोषण व बालविवाह समस्येचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि शासकीय उपाययोजनांचे चिकित्सक मूल्यमापन केले आहे.

**किवर्डस्:** आदिवासी, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, कुपोषण, बालविवाह

**प्रस्तावना:** आदिवासी समुदाय हा खऱ्या अर्थाने मूळ रहिवासी आहे. डॉ. जी. एस. घुर्ये आदिवासींना मागासलेले हिंदू मानतात. आदिवासी समाज हा भारतातील सर्वात प्राचीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या अनोखा समाज आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचा मोठा भाग नाशिक जिल्ह्यात राहतो. नाशिकच्या दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा, इगतपुरी, चांदवड इत्यादी तालुक्यांमध्ये कोकणा, वारली, कातकरी, महादेव कोळी, भिल्ल या जमातींचे अधिवास आहेत. या समाजातील स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक अडचणींमुळे अनेक मूलभूत समस्यांना सामोरे जावे लागते. त्यापैकी कुपोषण आणि बालविवाह या दोन समस्या सर्वाधिक गंभीर असून त्या पिढ्यानुपिढ्या आदिवासी स्त्रियांच्या आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि संपूर्ण जीवनमानावर विपरित परिणाम करीत आहेत. प्रस्तुत निबंधात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या कुपोषण व बालविवाह समस्येचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि शासकीय उपाययोजनांचे चिकित्सक मूल्यमापन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** नाशिक जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्याची स्थिती आणि त्यांच्यातील कुपोषणाचा अभ्यास करणे. नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषण समस्येच्या कारणांचा अभ्यास करणे. नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील बालविवाह समस्येच्या कारणांचा अभ्यास करणे. नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील बालविवाह समस्येच्या कारणांवर उपाय सुचविणे. नाशिक जिल्ह्यातील पोषण स्थिती सुधारण्यासाठी आणि कुपोषण दूर करण्यासाठी पर्यायी धोरणे तयार करणे.

**गृहीतकृत्य:** कुपोषण हे ग्रामीण आणि आदिवासी भागाला लागलेले ग्रहण आहे. शिक्षणाचा अभाव, गरिबी, रोजगाराचा अभाव, वारंवार पडणारे दुष्काळ, बालविवाह याचा परिणाम सर्वच वंचित घटकांवर होताना दिसून येतो. या दुष्काळाचा व वरील घटकांचा सर्वाधिक प्रभाव स्त्रिया आणि बालकांवर होताना दिसून येतो.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषण समस्या अभ्यास करणे. आदिवासी स्त्रियांमधील कुपोषण समस्यांचा अभ्यास करणे, बालविवाह समस्या अभ्यास करणे. तसेच या समाजस्थितीचा अभ्यास तृणमूल पातळीवर केला आहे. या अभ्यासात संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही अभ्यास पद्धतींचा वापर केला आहे.

**संशोधनाची तंत्रे:** प्रस्तुत अध्ययनात अनुसूची अनौपचारिक मुलाखती (Informal Interview ) व्यष्टी अध्ययन (Case Study) तंत्रे वापरली आहेत. तसेच द्वितीय स्रोतांचा वापर केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती:** प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील तीन तालुक्यांशी (त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ,) निगडीत आहे.या तीन तालुक्यांची सहेतुक संशोधन पद्धतीने निवड करण्यात आली. या तालुक्यातील गावांमधील निवडक ३० अंगणवाडी सेविकांच्या व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेविकांच्या प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे.

**नाशिक जिल्ह्याचे भौगोलिक स्थान:** महाराष्ट्राच्या उत्तरेकडे असलेला हा जिल्हा महाराष्ट्रातील पाच व गुजरातमधील दोन अशा सात जिल्ह्यांनी वेढलेला आहे.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेस व काहीशा ईशान्येस धुळे जिल्हा पसरलेला असुन जळगाव जिल्हा पूर्वेस पसरलेला आहे. नाशिक जिल्ह्याच्या आग्नेयेस औरंगाबाद जिल्हा असून दक्षिणेस अहमदनगर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या नैऋत्येस व पश्चिमेस ठाणे जिल्हा आहे. गुजरातमधील डांग व सुरत हे जिल्हे नाशिक जिल्ह्याच्या वायव्येस आहेत. नाशिक जिल्ह्याच्या पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे २०० कि मी असून दक्षिण-उत्तर विस्तार सुमारे १२० कि मी आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या पाच टक्क्यांहून थोडेसे अधिक क्षेत्र नाशिक जिल्ह्याने व्यापले आहे. नाशिक जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १५,५३० चौ कि मी इतके आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ५.०४ टक्के क्षेत्र व्यापलेल्या नाशिक जिल्ह्याचा राज्याच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार करता तिसरा क्रमांक लागतो.

नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके आहेत त्यात नाशिक, पेठ, सुरगाणा, दिंडोरी, कळवण, बागलाण, मालेगाव, चांदवड, येवला, नांदगाव, निफाड, सिन्नर, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर व देवळा हे होय यापैकी त्र्यंबकेश्वर व देवळा या दोन्ही नवीन तालुक्याची २६ जून १९९९ रोजी निर्मिती करण्यात आली आहे. पेठ, सुरगाणा, दिंडोरी, कळवण, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर हे आदिवासी बहुल तालुके आहेत. कोकणा, वारली, ठाकर, धोंडी, मल्हार कोळी, महादेव कोळी यांसारख्या प्रमुख आदिवासी जमाती आढळतात, विशेषतः सुरगाणा, पेठ, त्रंबकेश्वर या तालुक्यांमध्ये त्यांची वस्ती जास्त आहे, नाशिक जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेची सद्यस्थिती पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

**नाशिक जिल्ह्यातील आरोग्य सुविधा (२०१८-१९)**

| अ क्र | तालुका | गावांची/ संख्या | सार्वजनिक वैद्यकीय सुविधा (संख्या) | दवाखाने | प्रसूतीगृहे | प्राथमिक आरोग्य केंद्रे | उपकेंद्रे | एकूण | डॉक्टर व वैद्य | परिचारिका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरगाणा | १९० | २ | ० | १३ | ८ | ३८ | ६१ | ३१ | ५८ |
| २ | कळवण | १५० | २ | ० | १४ | ७ | ४९ | ७२ | ३४ | १३६ |
| ३ | देवळा | ५२ | २ | ० | १२ | ५ | २५ | ४४ | १९ | ४४ |
| ४ | बागलाण | १७० | ३ | ० | २६ | ११ | ५३ | ९३ | ३० | ८५ |
| ५ | मालेगाव | १४६ | ७ | ५ | २९ | ९ | ४९ | ९९ | ७६ | २०० |
| ६ | नांदगाव | १०० | ३ | १ | १४ | ५ | २० | ४३ | ३१ | ४७ |
| ७ | चांदवड | ११२ | १ | १ | २२ | ५ | २७ | ५६ | १९ | ४८ |
| ८ | दिंडोरी | १५८ | २ | १ | २२ | १० | ६६ | १०१ | ३० | ९१ |
| ९ | पेठ | १४५ | १ | ० | २१ | ७ | २९ | ५८ | २० | ३९ |
| १० | त्र्यंबक | १२५ | २ | ० | १५ | ६ | ३५ | ५८ | २४ | ५३ |
| ११ | नाशिक | ७६ | ९ | १२ | २१ | ३ | २८ | ७३ | १६० | ७२३ |
| १२ | इगतपुरी | ११९ | ३ | २ | ३० | ८ | ४९ | ९२ | २९ | ७९ |
| १३ | सिन्नर | १३० | १ | २ | ३४ | ६ | ३४ | ७७ | १९ | ४९ |
| १४ | निफाड | १३४ | २ | १ | ३३ | ९ | ५३ | ९८ | ३१ | ८३ |
| १५ | येवला | १२४ | २ | ३ | १७ | ४ | २२ | ४८ | १७ | ४२ |
| एकूण | | १९३१ | ४२ | २८ | ३२३ | १०३ | ५७७ | १०७३ | ५७० | १७७७ |
| शेकडा प्रमाण | | ३.९४ | २.६२ | ३०.२७ | ९.६५ | ५४.०८ | १००.५६ | -- | -- | |

**संदर्भ** - जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, नाशिक (२०१८-१९)

वरील तक्त्यावरून असे दिसते की,२०१८-१९ या वर्षात नाशिक जिल्ह्यात सार्वजनिक व अर्थसहाय्यीन संस्थाचे एकूण ४२ (३.९४ टक्के) रुग्णालये, २८ (२.६२ टक्के) सार्वजनिक दवाखाने, ३२३ (३०.२७ टक्के) प्रसूतिगृहे, १०३ (९.६५ टक्के) प्राथमिक आरोग्य केंद्रे तर ५७७ (५४.०८ टक्के) उपकेंद्रे होती वरील संस्थांमध्ये २५३८ खाटांची व्यवस्था होती त्यापैकी ८४७ खाटा स्त्रियाच्या होत्या डॉक्टरांची संख्या ५७० इतकी असून परिचारिकांची संख्या ही १७७७ इतकी आहे. कुपोषण हे ग्रामीण आणि आदिवासी भागाला लागलेले ग्रहण आहे. गरिबी, रोजगाराचा अभाव, वारंवार पडणारे दुष्काळ याचा परिणाम सर्वच वंचित घटकांवर होताना दिसून येतो. या दुष्काळाचा सर्वाधिक प्रभाव स्त्रिया आणि बालकांवर होताना दिसून येतो.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषणाची प्रमुख कारणे म्हणजे कमी वयातील विवाह आणि बाळंतपण, अपुरा आहार, आरोग्य सुविधांचा अभाव (विशेषतः दुर्गम भागात), घरात प्रसूती होण्याचे

प्रमाण, पाणी आणण्याचा ताण, दारिद्य, अज्ञान आणि अंधश्रद्धा आहेत, ज्यामुळे स्त्रिया अशक्त राहतात आणि त्यांचे आरोग्य खालावते, असे विविध अहवाल आणि अभ्यासातून दिसून येते. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांमधील कुपोषणाची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे

**कुपोषणाची कारणे :**

**१. दारिद्य:** दुर्गम भागातील कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असते डोंगर उतारावरील जमीन पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी शेती, रोजगाराचा अभाव पायाभूत सुविधा नसणे यामुळे आदिवासी कुटुंबातील सदस्यांचे कुपोषण वाढताना दिसते.

**२. आहार आणि पोषणमूल्य:** आर्थिक परिस्थिती व आहार यांचा जवळचा संबंध आहे गरीबीमुळे उपलब्ध संशोधनांच्या कमतरतेमुळे आदिवासींना मिळणारा आहार हा सकस नसतो त्यामुळे गरोदर माता व लहान मुले यांचे कुपोषण होते आदिवासींच्या आहारात नाचणी वरही हे धान्य असते परंतु काही आदिवासी हे पारंपारिक धान्य विकून गहू व बाजरी घेताना दिसून येतात.

**३. अपुरे आरोग्य सुविधा:** आरोग्य सुविधा सर्वदूर पोहोचल्या असल्या तरी त्या आदिवासी भागात पुरेशी नाहीत प्राथमिक आरोग्य केंद्र PHCs उपकेंद्र दुर्गम भागात नाहीत लहान मुलांसाठी लागणारे अत्याधुनिक सुविधा या केंद्रांमध्ये नसतात त्यामुळे उपचार वेळेवर मिळत नाही बऱ्याच जमातांची घरीच प्रस्तुती होते त्यामुळे मातांना व बालकांना अधिक धोका निर्माण होतो.

**४. कमी वयात होणारे विवाह:** बालविवाह कायद्याने बंदी असली तरी अजूनही आदिवासी भागात अल्पवयात मुलींचे विवाह होतात त्याचा परिणाम मातेची शारीरिक वाढ झालेली नसते कमी वजनाची व कुपोषित मुले जन्माला येतात परिणामी ते विविध आजारांना बळी पडतात.

**५. अंधश्रद्धा:** हजार बाबत आदिवासींमध्ये अजूनही जागरूकता दिसून येत नाही आजही दुर्गम भागात भोंदू बाबा व भगत यांचे कडे उपचार घेताना दिसून येतात या अंधश्रद्धां मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**६. शारीरिक व मानसिक ताण:** अपुरा आहारामुळे होणारी शारीरिक झीज ही आदिवासी महिलांच्या बाबतीत मी त्याचीच दिसून येते कावड कष्ट करून उपजीविका व भाकरी जाते शारीरिक झाल्याने तब्येत वारंवार बिघडते शारीरिक क्षमता कमी होते यातून ताणतणाव निर्माण होतात.

**७. छुपी वेठबिगारी:** वेठबिगारी ही कायद्याने बंद असली तरी आदिवासींचे छुप्या पद्धतीने चालणाऱ्या वेठबिगारीमुळे आर्थिक शोषण होताना दिसून येते त्यातूनही पुन्हा दारिद्य निर्माण होते.

**८. अशक्तपणा:** पोषण मूल्य आहारात कमी असल्याने बऱ्याचशा स्त्रियांचे हिमोग्लोबिन कमी असते त्यांच्यात अशक्तपणा, Anemia ही समस्या दिसून येते.

यावर्षी प्रकाशित झालेल्या प्रासंगिक लेखातून असे दिसून येते की पुरोगामी महाराष्ट्र कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. १८२४४३ मुले कुपोषित होती. नाशिक जिल्ह्यात २४६४१ बालके कुपोषित आढळून आली. त्यातील ११३३५ बालके माध्यम कुपोषित होती. नाशिक जिल्हा कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्रातील जिल्ह्यात ५१५ तीव्र कुपोषित ३३३ अति कुपोषित होती. कोरोनाच्या कालखंडानंतर पोषण आहार योजना प्रभावी राबवल्यानंतर काही प्रमाणात कुपोषणाला नाशिक जिल्ह्यात काळा बसला असे दिसते.

नाशिक जिल्हा कुपोषणाच्या बाबतीत राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाकेहर्ष, टाकेदेवगाव, अस्वली, सामुंडी, येथे बालकांचे कुपोषण होत आहे. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत येथे बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी पोषण आहार योजना राबविली जाते आहे. याच गावात सिकलसेल आजाराचेही बालके आढळून आले आहेत. या गावातील कुपोषणा मागील मुख्य कारण म्हणजे अल्पवयीन मुलींचे विवाह होय. त्यामुळे कमी वजनाची बालके जन्माला येतात. त्यामुळे येथे आरोग्य यंत्रणेलाही सतर्क राहावे लागते.

**निष्कर्ष:** नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यात प्रामुख्याने त्रंबक व इगतपुरी या तालुक्यात टाके हर्ष असवली येथे कुपोषित बालके आढळून आली त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती त्रंबकेश्वर यांच्या महिला बाल विकास विभागामार्फत शोध मोहीम घेऊन ० ते ६ महिने वयोगटातील २९ बालके व सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील ४८६ बालके कुपोषित आढळून आली त्यांना अंगणवाडीमार्फत पोषण आहार दिल्याने त्यांच्या कुपोषणाची स्थिती सुधारण्यास मदत झाली. कोरोना काळानंतर जिल्हा परिषदेने ग्राम पंचायतीच्या माध्यमातून एक मोठा पोषण आहार योजना राबवल्याने खूप कुपोषणात काही प्रमाणात घट झालीहोती मात्र त्यानंतर पुन्हा कुपोषित बालकांची संख्या वाढत गेली जिल्हा उपोषण मुक्त करण्यासाठी महिला व बालविकास विभागासह शिक्षण विभाग आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले होते. बालक ही देशाची संपत्ती आहे. बालकांचे व स्त्रियांचे कुपोषण ही केवळ आरोग्याची नाही तर सामाजिक विकासाची समस्या आहे. योग्य पोषण, आरोग्यसेवा, शिक्षण, स्वच्छता आणि सरकारी योजनांचा प्रभावी अंमलबजावणी यांद्वारे कुपोषणावर मात करता येऊ शकते. बालक निरोगी व सक्षम झाले तर राष्ट्राचा पाया

मजबूत होतो, तर सशक्त स्त्री ही सशक्त कुटुंब व समाज घडवते. त्यामुळे बालकांचे व स्त्रियांचे कुपोषण दूर करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

**शिफारसी:** गर्भवती स्त्रियांसाठी विशेष काळजी घेण्यात यावी. विशे म्हणजे गर्भावस्थेत दिवसातून एक अतिरिक्त पोषक जेवण घ्यावे.लोह, कॅल्शियम व फॉलिक ॲसिड गोळ्या नियमित घ्याव्यात.नियमित गर्भ तपासणी करावी.संतुलित व पुरेसा आहार दररोज धान्य, डाळी, हिरव्या पालेभाज्या, फळे, दूध यांचा समावेश असावा. कामाच्या प्रमाणानुसार उर्जा देणारा आहार घ्यावा. आदिवासी व ग्रामीण भागात सरकारी योजनांचा प्रभावी वापर करावा. प्रामुख्याने ICDS आंगणवाडी योजना - पूरक पोषण, आरोग्य तपासणी नियमितपणे व्हावी. आदिवासी व ग्रामीण भागात मिड-डे मील योजना प्रभावीपणे सुरु आहेत की नाही याचे परीक्षण व्हावे. आदिवासी व ग्रामीण भागात प्रधानमंत्री मातृ वंदना योजना - गर्भवती व स्तनदा मातांसाठी आर्थिक सहाय्य करावे. आदिवासी व ग्रामीण भागात स्वयंसहायता गट, महिला मंडळे यांचा सहभाग वाढवावा.

**संदर्भसूची :**


१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नाशिक जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, 2012, पृ क्र 1 ते 12.

२. पवार, पंडितराव, वसंत पवार (संपा ) (2005), 'जनस्थान' 78 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक स्वागत समिती, नाशिक, लेखाचे नाव - कृषीक्षेत्रात अग्रगण्य नाशिक जिल्हा, लेखक, प्रा डॉ. सतीश श्रीवास्तव, पृ क्र 99.

३. पाठक, अ शं, (2002) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, इतिहास: प्राचीन काळ (खंड 1), अध्यक्ष - संपादक मंडळ, दर्शनिका, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथम आवृत्ती (इंग्रजी) - मराठी आवृत्ती, पृ क्र 23 व 31.

४. पाठक, यशवंत (2005), 'जनस्थान', 78 वे मराठी साहित्य संमेलन, लेखाचे नाव - सांस्कृतिक ऐतिहासिक नाशिक, पृ क्र 5.

५. जोशी, लक्ष्मणशास्त्री, (संपा ), (1979), 'मराठी विश्वकोष', खंड-8, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, 5वा मजला, मंत्रालय, मंबई 32, प्रथम प्रकाशन, पृ क्र 574.

६. जोशी, लक्ष्मणशास्त्री, (संपा ), 'भारतीय संस्कृतीकोष', खंड-8, पृ क्र 571.

७. दैनिक पुढारी, 14 जुलै 2025, विकास गामने, पृष्ठ 7

८. Dwivedi Purnima 2008, Problem of Women Health and Malnutrition in Indian Social Perspective

९. Viswanathan Brinda, Agnihotri Archana, Double Burden of Malnutrition in India: Decadal changes among Adult men and Women. Madras School of Economics Aug. 2020.

१०. Manjunatha, L.B., Rao DUM, Hajory Dipika, Roy. R, Burman Singh Rashmi, Social Beliefs, Customs and Superstitions Associated with care of mother and New Born Baby: A case study from Bundelkhand Region in Central India. Indian Res. J. Ext. Edu. 17 (1); January, 2017.

११. http://hdl.handle.net/10603/231004

१२. http://www.who.int/

१३. अनौपचारिक मुलाखती

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# शिक्षण क्षेत्रात समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांचा वापर: परिणाम व उपाय

**डॉ. गोपाल एम. गांगर्डे** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कला, स. द. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**सारांश:** समाज माध्यमे व डिजिटल साधने आधुनिक शिक्षणव्यवस्थेचे अविभाज्य घटक बनले आहेत. डिजिटल माध्यमे शिक्षणाची गुणवत्ता, उपलब्धता, संवाद, सर्जनशीलता आणि सहभाग वाढवतात. तथापि या डिजिटल साधनांच्या अतिवापरामुळे त्याचे व्यसन, लक्ष विचलन, चुकीच्या माहितीचा प्रसार आणि डिजिटल दरी यासारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. जर डिजिटल साक्षरता वाढवली, शिक्षकां प्रशिक्षित केले, सुरक्षित आणि नियमनबद्ध डिजिटल धोरणे राबवली तर समाज माध्यमे व डिजिटल साधने भारतीय शिक्षण प्रणालीला अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि विद्यार्थी-केंद्रित बनवू शकतात.

**किवर्डस्:** डिजिटल शिक्षण, समाज माध्यमे, ई-लर्निंग, डिजिटल साक्षरता, ऑनलाइन शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० इ.

**प्रस्तावना:** आजचे युग हे संगणकाचे युग आहे. डिजीटल क्रांतीमुळे झालेल्या प्रगतीद्वारे संपूर्ण मानवी जीवन बदलले आहे. समाज माध्यमे हे आधुनिक समाजातील संवादाचे एक प्रभावी व्यासपीठ बनले आहे. डिजीटल क्रांतीमुळे संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले असून मानवी जीवनाचा कोणतेही क्षेत्र त्याच्या प्रभावापासून वंचित राहिलेले नाही. आधुनिक कालखंडात शिक्षणव्यवस्था देखील या अभूतपूर्व डिजिटल परिवर्तनाचा साक्षीदार ठरली आहे. ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स, मोबाइल संचारसाधने, संगणकीय उपकरणे आणि विशेषतः समाजमाध्यमे यांनी ज्ञानप्राप्ती आणि शैक्षणिक संवाद यांचे स्वरूप मूलभूतपणे बदलून टाकले आहे. कोविड-१९ महामारीने या डिजिटल माध्यमातून शिक्षणाला अतिरिक्त चालना दिली असून, आज शैक्षणिक प्रक्रियेचे भौतिक आणि आभासी असे दुहेरी स्वरूप आपण अनुभवतो आहोत. शिक्षणाच्या डिजिटलीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक नवीन संधी व आव्हाने उभी राहिलेली आहेत. त्यावर मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संशोधने हाती घेतली जात आहेत.

समाजमाध्यमे ज्यात युट्यूब, व्हाट्सएप, टेलिग्राम, फेसबुक, इन्स्टाग्राम अशा बऱ्याच सोशल नेटवर्किंग साइट्सचा समावेश होतो ज्यावर लोक आपल्या कल्पना, विचार, मत आणि भावना व्यक्त करतात. ही माध्यमे आज केवळ संवादाची साधने राहिली नसून ती शक्तिशाली अनौपचारिक शैक्षणिक माध्यमे देखील बनली आहेत.[१] या समाज माध्यमांद्वारे ज्ञानाचे सार्वत्रिकरण झाले असून, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील ज्ञान व माहिती तसेच संसाधने सहज उपलब्ध होऊ लागले आहे. तथापि, हीच समाज माध्यमे आज माहितीचा अतिभार, विश्वासार्हतेचा अभाव, डिजिटल विभाजन आणि मानसिक आरोग्यावर होणारे संभाव्य दुष्परिणाम यासारख्या गंभीर आव्हानांचा सामना करताना दिसून येत आहेत.

भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-२०२०) ने तंत्रज्ञान आधारित शिक्षणावर भर देऊन डिजिटल साक्षरता, माध्यम साक्षरता आणि ऑनलाइन शैक्षणिक संसाधनांच्या सहज उपलब्धतेला राष्ट्रीय प्राथमिकता दिली आहे.[२] या धोरणात्मक पार्श्वभूमीवर, डिजिटल माध्यमांचा शिक्षणातील भूमिकेचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही स्तरांवर समग्र मूल्यांकन करणे गरजेचे होते. म्हणूनच, या शोधनिबंधात संशोधकाने भारतीय संदर्भात समाजमाध्यमे व इतर डिजिटल साधनांच्या शैक्षणिक वापराचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणामांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, या समाज माध्यमांचा प्रभावी, सुरक्षित आणि समावेशक वापर करण्यासाठी काही धोरणात्मक उपाययोजना देखील सूचविण्यता आलेल्या आहेत.

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

१. शिक्षण क्षेत्रात समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांचा वापराचा अभ्यास करणे.
२. विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर व शिक्षण व्यवस्थेवर डिजिटल माध्यमांच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
३. डिजिटल साक्षरता, तांत्रिक उपलब्धता व सामाजिक समायोजनातील आव्हानांची चर्चा करणे.
४. शिक्षण क्षेत्रातील समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांच्या वापरातून निर्माण झालेल्या समस्यांवर परिणामकारक उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तूत शोध निबंध पूर्णतः द्वितीयक तथ्यांवर आधारित आहे. माहिती संकलनासाठी विविध मासिकांमध्ये प्रकाशित शोधनिबंध, संदर्भग्रंथ, अहवाल, शासकीय दस्तऐवज, शैक्षणिक संकेतस्थळे, ऑनलाइन माहिती व लेख यांचा वापर केलेला आहे. प्राप्त माहितीचे वर्णनात्मक पध्दतीने विश्लेषण प्रस्तूत केलेले आहे.

**शिक्षण क्षेत्रात समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांचा वापर:** आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांसाठी

युट्यूबसारखे साधन उपलब्ध झाले असून त्याचा वापर करून विद्यार्थी हे केवळ शैक्षणिक व्हिडिओच पाहत नाहीत, तर UPSC, NET, SSC यांसारख्या महत्वाच्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शक सामुग्री, मॉक टेस्ट्स आणि वर्तमान घडामोडींचे विश्लेषण यांचा सहज आणि विनामूल्य फायदा घेतात. युट्यूबद्वारे विद्यार्थ्यांना वैयक्तिक शिक्षणाची संधी प्राप्त झाली असून याठिकाणी विद्यार्थी स्वतःच्या गतीने आणि सोयीनुसार अभ्यास करतात. याशिवाय विद्यार्थी व्हॉट्सएप आणि टेलिग्राम यासारख्या संदेशवाहन ॲप्सद्वारे विद्यार्थी एकमेकांशी त्वरित संपर्क साधतात, ज्यामुळे नोट्स, महत्त्वाच्या PDFs, प्रश्नसंच आणि संदर्भसाहित्य यांची सहज देवाणघेवाण शक्य होते.[३]

शिक्षण क्षेत्रात शिक्षक देखील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांचा वापर करताना दिसत असून, त्यामुळे शिक्षणप्रक्रिया समृद्ध आणि परस्परसंवादी बनली आहे. Zoom, Google Meet सारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सद्वारे वर्ग घेऊन भौगोलिक मर्यादा ओलांडून अध्यापनाचे काम ते करतात. गूगल क्लासरूमसारख्या संस्थात्मक प्लॅटफॉर्म्सवरून शिक्षक विद्यार्थ्यांना असाइनमेंट्स देतात, त्यांचे पेपर तपासतात. ज्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया सुव्यवस्थित होते आणि अध्ययनाची प्रक्रिया सातत्याने चालू राहते. याशिवाय, पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन्स (PPTs) आणि शैक्षणिक ॲप्स यांसारख्या डिजिटल साधनांचा उपयोग करून वर्गातील संवाद आणि विद्यार्थ्यांची संकल्पनात्मक समज वाढविण्याचा प्रयत्न शिक्षकांकडून होताना दिसतो.[४] अशाप्रकारे, अध्यापनात डिजिटल साधनांचा सुयोग्य वापर करणारा शिक्षक हा आधुनिक शिक्षणव्यवस्थेतील को-क्रिएटर आणि मार्गदर्शक बनतो आहे.

ई-लायब्ररी, डिजिटल आर्काइव्ह्ज आणि MOOCs (मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस) यासारख्या खुल्या शैक्षणिक संसाधनांमुळे विद्यार्थ्यांना जगातील उत्कृष्ट विद्यापीठे आणि शिक्षणसंस्थांमधील अभ्यासक्रम, लेख आणि प्रकाशने यांची सहज उपलब्धता होते. अशाप्रकारे, या सर्व डिजिटल साधनांनी मिळून एक अशी बहुआयामी शैक्षणिक पर्यावरण निर्माण होते. शिक्षणाच्या डिजीटीलीकरणामुळे पारंपरिक अध्यापन पद्धतींच्या मर्यादा दूर करून अध्ययन अध्यापन पध्दती सुलभ झाली आहे.[५]

**समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांचे शिक्षण क्षेत्रावर सकारात्मक परिणाम:**

**१. शिक्षणाची उपलब्धता आणि सर्वसमावेशकता:** समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांच्या शैक्षणिक वापरामुळे शिक्षण सर्वसमावेशक व सार्वत्रिक झाले आहे. ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स, मोफत ऑनलाइन अभ्यासक्रम (MOOCs), शैक्षणिक यूट्यूब चॅनेल्स आणि विविध ॲप्लिकेशन्सद्वारे शिक्षण आता ग्रामीण व दूर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. डिजीटल साधनांनी भौगोलिक अडथळे व मर्यादा यांना छेद देत शाळा व अध्ययन केंद्रांच्या अभावामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची दारे आज खुली झाली आहेत.[६]

**२. विद्यार्थ्यांच्या गतीने शिक्षण:** डिजिटल साधनांमुळे अध्ययनाची प्रक्रिया गतिमान व विद्यार्थी-केंद्रित बनली आहे. समाज माध्यमे व डिजिटल क्रांतीमुळे स्वत:च्या गतीने अभ्यास ही एक शिक्षणातील महत्त्वाची क्रांती ठरली आहे. डिजिटल माध्यमांमुळे, पारंपारिक वर्गातील एकसमान गतीच्या अध्ययनाचे बंधन दूर होऊन विद्यार्थ्यांना आपल्या सोयीनुसार व वैयक्तिक आकलनक्षमतेनुसार अभ्यास करण्याची स्वायत्तता मिळाली आहे. यूट्यूब व्हिडिओ, इंटरएक्टिव्ह ई-लर्निंग मॉड्यूल्स, एज्युकेशनल ॲप्स आणि ऑनलाइन क्विझेस यासारख्या साधनांद्वारे प्रत्येक विद्यार्थी एखाद्या संकल्पनेची पुनरावृत्ती करू शकतो, पुढे जाऊ शकतो किंवा आवश्यक ते साहित्य वेगळ्या पद्धतीने समजून घेण्याचा प्रयत्न करू शकतो. यामुळे विद्यार्थ्यावरील अध्ययनाचा दबाव कमी होतो आणि त्याचा आत्मविश्वास वाढतो.

**३. मल्टिमीडियामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी व परिणामकारक होते:** समाजमाध्यमे व डिजिटल माध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या मल्टिमीडिया माहितीमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक प्रभावी, आकर्षक आणि सुलभ बनली आहे. मल्टिमीडिया सामग्रीमुळे ग्रहणशक्ती आणि स्मरणशक्ती वाढण्यास मोलाची मदत होते. उदा. एखादी संकल्पना फक्त मजकुरातून समजावून घेण्यापेक्षा ती एका शैक्षणिक ॲनिमेशन व्हिडिओद्वारे पाहिल्यास विद्यार्थ्यांना ती सहज व दृक्श्राव्य पद्धतीने लवकर आकलन होते व प्राप्त ज्ञान दीर्घकाळ टिकते.[७]

**५. डिजिटल कौशल्यांचा विकास:** समाजमाध्यमे व डिजिटल साधनांचा सर्वात महत्त्वाचा सकारात्मक परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये एकविसाव्या शतकातील गरजेची डिजिटल कौशल्ये विकसित झाली आहेत. या माध्यमांद्वारे विद्यार्थी केवळ माहिती शोधत नाहीत तर त्या माहितीचे विश्लेषण, संश्लेषण व मूल्यमापन करून जटिल समस्यांचे निराकरण करायला शिकतात. ही कौशल्ये केवळ शैक्षणिक यशासाठीच नव्हे तर भविष्यातील व्यावसायिकतेसाठी आवश्यक असलेली नाविन्यपूर्ण विचारसरणी, तांत्रिक साक्षरता व गटकार्य क्षमता यांना बळ देतात. त्यातून विद्यार्थी बदलत्या जगासाठी सज्ज होतात.

**समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांचे नकारात्मक परिणाम:**

**१. लक्ष विचलित होणे व सोशल मीडिया व्यसन:** समाजमाध्यमांच्या अतिवापराचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक एकाग्रतेवर गंभीर धोका निर्माण होतो. रोसेन व इतर सहकारी (२०१३) यांनी नमूद केल्याप्रमाणे, समाज माध्यमे व डिजिटल माध्यमांमुळे लक्ष विचलित होणे आणि व्यसनासारखी सवय लागू शकते. सततचे मेसेजेस आणि त्याला द्यावा लागणारा प्रतिसाद यामुळे मानसिक ओव्हरलोड होतो, ज्यामुळे स्व-नियमन कौशल्य कमकुवत होऊन अभ्यासाची कामगिरी आणि गुणवत्ता झपाट्याने घटते. ही समस्या दीर्घकाळात तंत्रज्ञानावरील व्यसनात बदलू शकते.[८]

**२. चुकीची माहिती व अफवाचा प्रसार:** समाज-माध्यमांवर चुकीची माहिती व अफवा अत्यंत वेगाने पसरतात. माहिती प्रसारीत करण्यापूर्वी माहितीच्या शहानिशा करण्याच्या प्रक्रियेचा अभावामुळे ही समस्या वाढते. याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा सिमित राहतात आणि त्यांची चिकित्सक विचार करण्याची क्षमता कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

**३. सायबरबुलिंग, ट्रोलिंग, गोपनीयतेचे धोके:** शैक्षणिक डिजिटल माध्यमांच्या वापरामुळे सायबरबुलिंग, ट्रोलिंग आणि गोपनीयतेचे धोके हे गंभीर नकारात्मक परिणाम दिसून येतात. यामुळे विद्यार्थ्यांवर, विशेषतः भावनिकदृष्ट्या अपरिपक्व किशोरवयीन मुलांवर, गंभीर मानसिक आरोग्याचे धोके निर्माण होतात. त्यांची व्यक्तिगत माहिती सुरक्षित न राहिल्याने माहितीच्या चोरीची भीतीही वाढते. म्हणून या धोक्यांपासून संरक्षणासाठी तरूणांना जागरूक करून योग्य उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.[९]

**४. स्क्रीन टाइम वाढल्याने आरोग्य समस्या वाढतात:** स्क्रीन टाइममध्ये झालेली वाढ आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. दीर्घकाळ स्क्रीनकडे पाहण्यामुळे डोळ्यांचा ताण, डोकेदुखी आणि दृष्टीसंबंधी तक्रारी उद्भवतात. याशिवाय, स्क्रीनच्या निळ्या प्रकाशामुळे झोपेच्या चक्रात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे अनिद्रेचा आजार जडतो. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने, सतत ऑनलाईन असणे, माहितीचा अतिरिक्त भार आणि सोशल मीडियाचा ताण यामुळे चिंता, एकाग्रतेची कमतरता आणि तणाव यासारख्या समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो. अशाप्रकारे, डिजिटल साधनांचा अनियंत्रित वापर हे विद्यार्थ्यांच्या संपूर्ण आरोग्यासाठी एक गंभीर आव्हान बनू शकतो.[१०]

**५. डिजिटल दरी:** डिजिटल दरी हे डिजिटल शिक्षणातील एक मोठे आव्हान आहे. ग्रामीण व दुर्बल भागातील विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट, स्मार्टफोन यासारख्या मूलभूत साधनांचा, विश्वासार्ह कनेक्टिव्हिटीचा आणि डिजिटल कौशल्याचा अभाव आढळतो. ही केवळ तांत्रिक दरी नसून, एक सामाजिक-आर्थिक विषमता आहे. यामुळे ऑनलाइन शिक्षणापासून अनेकांना वंचित राहण्याची शक्यता निर्माण होते, शिक्षणातील समान संधीचे तत्त्व धोक्यात येते आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या समावेशकतेच्या ध्येयात अडथळा निर्माण होतो.[११]

**डिजिटल तंत्रज्ञान व समाज माध्यमाचे शिक्षण क्षेत्रातील वापराबाबत मुख्य आव्हाने:** डिजिटल युगातील शिक्षणात अनेक मूलभूत आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. सर्वप्रथम, डिजिटल साक्षरतेचा अभाव ही एक प्रमुख अडचण आहे, ज्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांनाही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता येत नाही. शिक्षकांचे अपुरे प्रशिक्षण हे दुसरे आव्हान आहे, कारण डिजिटल पद्धतीने अध्यापनाचे आधुनिक कौशल्य अद्याप बहुतेकांकडे पुरेसे विकसित झालेले नाही.

आर्थिक आणि सामाजिक असमानता ही तिसरी मोठी समस्या आहे, ज्यामुळे देशातील मोठ्या विद्यार्थीवर्गासाठी स्मार्टफोन, इंटरनेट यांसारखी मूलभूत साधने परवडत नाहीत, यामुळे डिजिटल विभाजन रुजते. सायबर सुरक्षा हा चौथा गंभीर धोका असून, वैयक्तिक डेटा व गोपनीयता यांचे संरक्षण करणे आव्हानात्मक ठरते. डिजिटल माध्यमांत ऑनलाइन परीक्षांदरम्यान नकल व इतर गैरव्यवहारांवर नियंत्रण ठेवणे कठीण जाते. भाषिक अडचणही मोठा अडथळा असून, मराठीसह प्रादेशिक भाषांमध्ये गुणवत्तापूर्ण डिजिटल शैक्षणिक सामग्रीची उणीव जाणवते. या सर्व आव्हानांवर मात करणे आजच्या शिक्षणव्यवस्थेसाठी अत्यावश्यक आहे.

**उपाययोजना व शिफारसी:** डिजिटल माध्यमांच्या प्रभावी वापराबाबत विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना ICT व माध्यम साक्षरतेचे प्रशिक्षण द्यावे. NEP-२०२० प्रमाणे शाळा-महाविद्यालयात माध्यम साक्षरता अभ्यासक्रम हा अनिवार्य विषय करावा. प्रत्येक संस्थेने सुरक्षित इंटरनेट धोरण स्वीकारून सायबर सुरक्षा व डेटा संरक्षणाची स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत. ऑनलाइन शिक्षणाची प्रभावी पद्धत शिकवण्यासाठी शिक्षकांना विशेष ICT पेडागॉजी प्रशिक्षण द्यावे. डिजिटल दरी कमी करून सर्वांना परवडणारे उपकरणे, सबसिडाइज्ड इंटरनेट व ग्रामीण भागात डिजिटल केंद्रे उभारून सर्वांना प्रवेश देण्यासाठी उपक्रम राबवावेत. नियोजित सोशल मीडिया वापर: शैक्षणिक गट, वेळापत्रक व सामग्रीचे नियमन करून अनुशासित व हेतुपूर्ण वापर प्रोत्साहित करावा. शैक्षणिक ॲप्स व सामग्रीची गुणवत्ता व सुरक्षा तपासण्यासाठी स्वतंत्र प्रमाणक मंडळ स्थापन करावे.

## संदर्भ सूची:


1. Asadullah, Md & Yeasmin, Minara. (2023). Impact of social media on education: Both positively and negatively. *International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology*, 3(10), Pg No. 272
2. NEP (2020). *National Education Policy 2020*. Ministry of Education, Government of India.
3. Devi, Kuruva & Eragamreddy, Gouthami & Lakshmi V, Vijaya (2019). Role of Social Media in Teaching-Learning Process. 6. 96-103.
4. Devi, Kuruva & Eragamreddy, Gouthami & Lakshmi V, Vijaya p. 103.
5. Martoredjo, Nikodemus. (2023). Social media as a learning tool in the digital age: A review. *Procedia Computer Science*. 227. 534-539.
6. Desai, R. (2020, August 3). *Digital learning – digital education*. Retrieved from https://drrajivdesaimd.com/2020/08/03
7. पाटील, चंद्रकांत. (2015, Nov). इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी मल्टिमेडिया वापराची परिणामकारकता. *International Journal of Researches in Social Sciences and Information Studies*. IJRSSIS, Vol. II, Issue (4), 170–173.
8. Rosen, L. D., Lim, A., Carrier, L. M., & Cheever, N. A. (2013). *Facebook and texting made me do it: Media-induced task-switching while studying. Computers in Human Behavior,* 29(3), 948–958
9. Bucaj, Enver & Haziri, Fatos. (2024). Cyberbullying and cyberstalking: Parents' role to protect their children. *Multidisciplinary Reviews*. 7.
10. Devi, Khumukham, A., & Singh, Sudhakar, K. (2023). The hazards of excessive screen time: Impacts on physical health, mental health, and overall well-being. *Journal of Education and Health Promotion*, 12(413).
11. Thekkumbad, D. (2025, June 9). Digital Dreams, Divided Realities: Navigating Educational Access in India. *ORF Online*. https://www.orfonline.org

# कौटुंबिक हिंसाचार: एक सामाजिक समस्या

**डॉ. रामदास वैद्य** समाजशास्त्र विभाग, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

**गोषवारा:** कौटुंबिक हिंसाचार ही महत्त्वाची सामाजिक समस्या बनली आहे. माणसाने आपले शारीरिक व मानसिक संरक्षण करण्याच्या उद्देशाने कुटुंबाची स्थापना केलेली आहे. कुटुंबात व्यक्तीला प्रेम, सहानुभूती, सहकार्य आधार मिळतो. जीवन सुखकारक बनते. सुदैवाने काही वेळा व्यक्ती ही कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सतत अन्याय- अत्याचाराला बळी पडणारी स्त्री आजही स्वातंत्र भारतात काही वेगळी दिसून येत नाही. अनेक कायदे अस्तित्वात असून सुद्धा स्त्रियावरील अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे. कौटुंबिक हिंसाचार ही एक सामाजिक समस्या बनली आहे. आज स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे तरी दुसऱ्या बाजूला कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना आजही सरसपणे घडत आहे.

**बिजसंज्ञा:** कौटुंबिक हिंसाचार, भारतीय स्त्री, भारतीय समाजव्यवस्था

**प्रस्तावना:** कौटुंबिक हिंसाचार ही केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक नसून ती एक गंभीर सामाजिक समस्या आहे. भारतीय समाज व्यवस्थेचा कणा म्हणून कुटुंब संस्थेकडे पाहिले जाते. भारतीय संस्कृतीची वाहक म्हणून कुटुंब संस्था भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे अंग आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियेत भारतीय कुटुंब व्यवस्था वेगाने बदलत आहे. समाज परिवर्तन होत असले तरी आज भारतीय कुटुंब व्यवस्थेत महिलावर होणाऱ्या अत्याचारात देखील वाढ झाली आहे. कौटुंबिक हिंसाचार या घटकाचा विचार करताना महत्त्वाचा पैलू म्हणजे कुटुंबातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, हिंसा, शारीरिक व मानसिक अवडणूक होत आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा एक सामाजिक प्रश्न बनला आहे.

**उद्दिष्टे:** १. कौटुंबिक हिंसाचाराची संकल्पना व व्याप्ती अभ्यासणे. २. कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व समस्या सोडविण्यासाठी योग्य उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:** या संशोधनासाठी दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये ग्रंथ, पुस्तके, शोध निबंध, मासिके यांचा आधार घेतला आहे.

**कौटुंबिक हिंसाचार: अँन्योनी गिडीन्स:** "कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एक किंवा अनेक व्यक्तींच्या विरोधात केलेला शारीरिक दुरुपयोग होय." **मेरीअम वेबस्टर शब्दकोश:** "कुटुंबातील किंवा घरातील एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस शारीरिक दुखापत व इजा करणे असा वर्तन प्रकार पुन्हा पुन्हा किंवा सराईतपणे करणे होय."

कौटुंबिक हिंसाचार ही कुटुंबातील एका सदस्याने, स्त्रीने व पुरुषांनी दुसऱ्या ओ असाह्य मग ती स्त्री व पुरुष असेल, बाल वा वृद्ध असेल, शारीरिक इजा व दुखापत करणारी कृती ठरते. स्त्रियांच्या होणाऱ्या कौटुंबिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात २६ ऑक्टोंबर २००६ पासून लागू केला आहे. कौटुंबिक हिंसेची समस्या गंभीर गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेतील सत्तासंबंध त्यामुळे लिंगभावधीष्टीत होणारी स्त्रियावरील कुटुंबा अंतर्गत शारीरिक, मानसिक, आर्थिक हिंसा, स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव निर्माण करणारी आहे. केंद्र सरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी २००५ मध्ये कायदा संमत केला. त्यानुसार कौटुंबिक हिंसाचारात स्त्रीचा तिच्या पतीने किंवा इतर नातेवाईकांनी लिव्ह इन रिलेशनशिप या तत्त्वानुसार एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषांपैकी पुरुषाने व त्यांच्या नातेवाईकांनी त्या स्त्रीचा शारीरिक, लैंगिक, भावनिक व आर्थिक छळ करने या कृतीचा समावेश होतो. प्रत्येक माणसाला जीवन जगण्याचा, सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेने हा एक मूलभूत अधिकार मानला आहे. आपण जेव्हा सर्वाधिक विकासावर चर्चा करीत असतो तेव्हा विकासाच्या प्रक्रियेत महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सन्मानच मिळतो का? कारण दररोज स्त्रियांच्या बाबतीत अनेक वाईट प्रसंग निर्माण होताना दिसून येतात.

**कौटुंबिक हिंसाचाराची व्याप्ती:** कौटुंबिक हिंसाचारात पुढील बाबीचा समावेश केला जातो.

**१. शारीरिक छळ:** स्त्रीला मारहाण करणे, तोंडात मारणे, लाथ व गुद्धे मारणे, ढकलणे, चटके देणे, वेदना देणे आणि शारीरिक दुखापत करणारा कोणताही प्रकारचा संपर्क.

**२.लैंगिक अत्याचार:** जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील फोटो काढणे, बीभस्त कृत्य सक्तीने करावयास लावणे.

**३. आर्थिक अत्याचार:** हुंड्याची मागणी करणे, स्त्रीचे वा तिच्या मुला बाळांच्या पालन पोषणासाठी पैसे न देणे तसेच

अन्न, वस्त्र, औषधे न देणे, नोकरी स्वीकारण्यास व करण्यास मनाई करणे, नोकरीवर जाण्यास अडथळा आणणे, पगाराचे व रोजगाराचे पैसे काढून घेणे, पगार व बरोबर रोजगार वापरण्यास मनाई करणे. घरातून हाकलून देणे, घराचा कोणताही भाग व त्यातील कपडे व इतर वस्तू वापरण्यास मनाई करणे.

**४. तोंडी किंवा भावनिक अत्याचार:** अपमान करणे, वाईट नावाने बोलले, चारित्र्याबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही किंवा हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे, स्त्रीला वा तिच्या मुलांना शाळा, महाविद्यालयात वा इतर शिक्षण संस्थेत जाण्यास तसेच घराबाहेर पडण्यास, नोकरी करण्यास मनाई करणे, स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिला विवाह करण्याची जबरदस्ती करणे किंवा तिच्या मन पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास मनाई करणे इत्यादी.

**पितृसत्ताक व्यवस्था:** पितृसत्ताक व्यवस्था हे कौटुंबिक हिंसाचारासह स्त्रियांच्या सर्वच समस्यांचे कारण आहे. कुटुंबप्रमुख पुरुष या सत्तेचा दुरुपयोग करून हुकुमशहासारखा वागतो. या व्यवस्थेत पुरुष हा स्त्रीला आपली दासी वा गुलाम मानतो, तिला मारहाण करतो. या मनोवृत्तीतूनच कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडतात.

**हुंडा प्रथा:** भारतात हुंडा प्रथा मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. हुंड्याची मागणी जेव्हा वधूंच्या माता-पित्याकडून संपूर्णपणे पूर्ण केली जात नाही तेव्हा वधूचा तिच्या पती व त्याचे नातेवाईक छळ करतात. तिला मारहाण करतात. काही वेळा तिला ठार ही करतात. अशा हुंडा प्रथा कौटुंबिक हिंसाचारास कारणीभूत ठरते.

**आर्थिक परावलंबन:** बहुसंख्य कुटुंबात पुरुष हे कमावते असतात व स्त्रिया व मुले आपल्या गरजपूर्तीसाठी त्या पुरुषावर अवलंबून असतात. त्यांच्या परावलंबनामुळे कमावता पुरुष त्यांच्यावर सत्ता गाजवितो. आपल्यावर अवलंबून असणाऱ्या स्त्री व मुलांनी काही चुका केल्यास त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार आपणास आहे यातूनच कौटुंबिक हिंसाचारास चालना मिळते.

**पुरुषांची व्यसनाधीनता:** अनेक कुटुंबातील पुरुष हे मादक द्रव्य सेवनाच्या आहारी गेलेले असतात. नशेमध्ये ते इतर कुटुंब सदस्यांना विशेषता पत्नी व मुलांना मारहाण करतात. त्यांचा छळ करतात. असे व्यसनाधीन पुरुष व्यसनाच्या पूर्तीसाठी पत्नी व मुलांकडे पैसे मागतात. जर त्यांनी पैसे दिले नाहीत तर त्यांना मारहाण करतात. त्यांचा छळ करतात.

**संशयी स्वभाव:** काही पुरुष आपल्या पत्नीचे चारित्र्य चांगले नाही असा सतत संशय घेतात आणि या संशयापोटी तिला मारहाण करतात. पत्नीशिवाय कुटुंबातील इतरही स्त्रियांच्या चारित्र्याचा संशय घेऊन त्यांचा छळ केला जातो.

**प्रेम विवाह:** भारतीय समाजात प्रेम प्रकरण व प्रेम विवाह फारसे पसंत केले जात नाही. त्यामुळे एखाद्या कुटुंबातील तरुणी एखाद्या तरुणावर प्रेम करू लागली त्याच्याशीच विवाह करण्याचा हट्ट करू लागली तर तिचे आई-वडील व बहिण भाऊ तिला मारहाण करतात. घराबाहेर पडण्यास तिला मज्जाव करतात. तिचे शिक्षण बंद करतात. आपण निवडलेल्या मुलाशी विवाह करण्याची तिच्यावर सक्ती करतात. जर मुलीने त्यास नकार दिला तर प्रसंगी तिला प्रतिष्ठेपोटी ठार करतात.

**सत्तेचा प्रश्न:** समाजशास्त्रीय दृष्ट्या या पैलूचा विचार करताना स्पष्ट होते की, कुटुंबाअंतर्गत सर्व सत्ता सासू या घटकाभोवती केंद्रित असते. त्यामुळे बऱ्याच वेळा कौटुंबिक हिंसाचार घडून येण्याची शक्यता निर्माण होते. कौटुंबिक हिंसाचाराचे विविध प्रकार आढळून येतात. उपासमार, अपमान, मारझोड करणे, दुखापत, अतिश्रम, बलात्कार, हुंडाबळी, पळवून नेणे, अपहरण करणे, खून करणे, ठार मारले, तीव्र वेदना देणे, विनयभंग करणे, लैंगिक दुरुपयोग वाळीत टाकने, मालमत्तेपासून दूर ठेवणे इ.

कुटुंबात तिच्यावर अनेक प्रकारे अत्याचार होतात. ते अत्याचार करणारे परकीय नसून आप्तस्वकीय असतात. त्यात प्रामुख्याने तिचा पती, सासू-सासरा,ननंद, सवत व प्रसंगी त्या अत्याचारित महिलेचा मुलगा देखील सहभागी असलेला दिसून येतो. कौटुंबिक हिंसाचारात स्त्रीला उपाशी ठेवने, मानसिक त्रास देणे, तिच्याकडून अतिश्रमाची कामे करून घेणे, वेळोवेळी अपमान करणे, शरीर सुखाची अवैध्यरित्या मागणी करणे, तिचा लैंगिक छळ करणे यात प्रामुख्याने अनैसर्गिक संबंध ठेवणे, पतीव्यतिरिक्त इतर पुरुष मंडळीकडे लैंगिक संबंध ठेवण्यासाठी बाद्य करणे. तिचा विनयभक्त करणे. दुखापत करणे. तिला मूल होऊ न देणे किंवा तीचा गर्भपात करणे, प्रसंगी तीला आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे व मारून टाकने अशा अनेक प्रकारचे स्त्रियावर् कुटुंबात अत्याचार होताना दिसतात.

कौटुंबिक हिंसाचारासाठी सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, आर्थिक कारणे जबाबदार असलेले दिसून येतात. समाजात अस्तित्वात असलेली लिंग विषमता, परंपरांचा प्रभाव, पती-पत्नी संबंधातील दरी, प्रसार माध्यमांचा प्रभाव, स्त्रियांचे पुरुषावरील आर्थिक परावलंबन, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा मर्यादित सहभाग, वरील कारणामुळे स्त्रीया स्वतःला असाहाय्य समजू लागतात.

**कौटुंबिक हिंसाचारावरील उपाय योजना:**

**१. कायद्याची कठोर अंमलबजावणी:** कायदा व पोलीस दलात सुधारणा घडवून आणून कायद्याची कठोर

अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक अपराधाबाबत पोलिसांना प्रतिबंधक कारवाई करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

**२. समाजात जाणीव जागृती:** समाजात स्त्रियांच्या प्रश्नावर जाणीव जागृती होणे गरजेचे आहे. सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, प्राध्यापक, मार्गदर्शक, पोलीस यांनी स्त्रियावरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडली पाहिजे.

**३. महिला सुरक्षागृहाची स्थापना:** महिला सुरक्षा गृहाची स्थापना मोठ्या प्रमाणात व्हावी. जर पत्नीशी आपण वाटेल तसे वागलो तर पत्नी माहेरी निघून जाईल अशी भीती पतीला वाटली पाहिजे. तेव्हाच हा प्रश्न मिटू शकेल.

**४. पत्नी- स्त्रीने स्वतःमध्ये सामर्थ्य निर्माण करावे:** पत्नी-स्त्रीने स्वतःमध्ये सामर्थ्य निर्माण करून पतीचा त्रास निमुटपणे सहन करू नये. पतीच्या त्रासाला वाचा फोडणे गरजेचे आहे. पतीच्या मारहाणीला विरोध केला पाहिजे. जेणेकरून पुरुष घाबरून अत्याचार करणार नाही याची काळजी घ्यावी. सर्व क्रिया होतांना स्त्रियांनी स्वतः सामर्थ्यवान बनले पाहिजे.

**५. महिलांची सामुदायिक कृती आवश्यक:** महिलांची सामुदायिक कृती असणे आवश्यक आहे. पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीच्या घरासमोर धरणे किंवा मोर्चा काढणे अशा प्रकारचा अवलंब स्त्री संघटनांनी केला पाहिजे.

**६. रोजगार उपलब्ध करून देणे:** ज्या महिलांना मारहाण, अत्याचार, हिंसाचार इत्यादींना बळी पडावे लागते त्यांच्यासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांच्या मुलांची काळजी घेऊन त्यासाठी त्यांना आर्थिक साह्य दिले पाहिजे.

**७. संरक्षण प्रशिक्षण देणे:** मुलींना स्वतःच्या संरक्षणासाठी तसे शिक्षण देणे आवश्यक आहे त्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयामधून विविध शिबिरातून त्यांना स्वतःचे व इतरांचे संरक्षण कसे करावे याचे धडे दिले गेले पाहिजे. अत्याचाराच्या बळी पडलेल्या महिलांना सुरक्षितता, सहकार्य आणि सल्ला याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले पाहिजे. बलात्कार, पळवून नेणे, अपहरण, विधवा इत्यादीने त्रासलेल्या स्त्रियांना सामाजिक कार्यकर्त्या महिलांनी सुरक्षागृहात पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**निष्कर्ष:** आधुनिक, सामाजिक जीवनाच्या परिवर्तनशील समाजात अनेक घटकांची गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे स्त्रियांच्या हिंसात्मक कृत्यात तोच तोपणा दिसून न येता त्यात व्यापकता आढळून येत आहे. कायद्याचे संरक्षण, स्त्री स्वातंत्र्य, शिक्षण, राजकारण, बदलती ग्रामीण, आर्थिक परिस्थिती नागरिकीकरण यासारख्या बाबी मिळून स्त्रीला व्यापक क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**सारांश:** कौटुंबिक हिंसाचार ही भारतीय समाजाला ग्रासलेली एक गंभीर व चिंताजनक समस्या असून हुंडा, दारूचे व्यसन आणि संकुचित पुरुषप्रधान मानसिकता ही याची मुख्य कारणे आहेत. यामध्ये केवळ शारीरिक मारहाणच नाही, तर मानसिक टोमणे आणि आर्थिक छळाचाही समावेश होतो, ज्यामुळे घरातील शांतता नष्ट होऊन मुलांच्या मनावर आणि भविष्यावर वाईट परिणाम होतो. या समस्येवर उपाय म्हणून स्त्रियांनी शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा २००५' ची कडक अंमलबजावणी आणि जनजागृती होणे आवश्यक आहे. कौटुंबिक वाद विकोपाला जाण्याआधीच समुपदेशनाद्वारे आणि संवादाने सोडवले पाहिजेत आणि पीडित व्यक्तीने अन्याय सहन न करता महिला हेल्पलाइन किंवा पोलिसांची तातडीने मदत घेतली पाहिजे. अखेरीस, समाजाची मानसिकता बदलून घरात स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे आणि हिंसाचार मुळापासून संपवणे ही एक सुदृढ समाज घडवण्यासाठी आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**ग्रंथ सूची:**

१) गाठाळ एस. एस.: भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन.
२) सरिन प्रमिला: कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम.
३) Chaudhari Sudha: domestic violence in India.
४) खडसे भा. कि.: भारतीय सामाजिक समस्या.
५) सरोदे असीम: कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा.
६) साने गीता: भारतीय स्त्री जीवन
७) काळदाते सुधा, गव्हाणे: गुन्हेगारीचे समाजशास्त्र.
८) कुलकर्णी पि.के.: भारतातील सामाजिक समस्या

# महिलांसाठी शासकीय योजना व कार्यक्रम: एक अभ्यास

**डॉ. सोमा पी गोंडाणे** राजीव गांधी कला महाविद्यालय, पाटन, ता.जिवती जि. चंद्रपुर

**गोषवारा:** भारत हा विविधतेने नटलेला देश असून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या महिलांचे स्थान दीर्घकाळ दुय्यम राहिले आहे. स्त्री-पुरुष असमानता, शिक्षणाचा अभाव, आर्थिक परावलंबित्व, आरोग्यविषयक समस्या, सामाजिक रूढी-परंपरा यांमुळे महिलांचा सर्वांगीण विकास बाधित झाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेने महिलांना समान हक्क बहाल केले असून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी विविध योजना व कार्यक्रम राबविले आहेत. महिलांचे शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगार, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सुरक्षितता व सक्षमीकरण हे या योजनांचे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर शोधनिबंधात महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमुख शासकीय योजना व कार्यक्रमांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या योजनांचा महिलांच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम, अंमलबजावणीतील अडचणी व मर्यादा यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासाच्या शेवटी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक शिफारसी सुचविण्यात आल्या आहेत.

**कीवर्ड्स:** महिला सक्षमीकरण, शासकीय योजना, महिला कल्याण कार्यक्रम, सामाजिक सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन, महिला शिक्षण, महिला आरोग्य, पोषण योजना, रोजगार संधी, लिंग समानता, सामाजिक न्याय, महिला विकास.

**प्रस्तावना:** समाजाच्या सर्वांगीण विकासात महिलांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. "स्त्री सशक्त तर समाज सशक्त" ही संकल्पना आधुनिक समाजशास्त्रात अधोरेखित करण्यात आली आहे. मात्र ऐतिहासिकदृष्ट्या पाहता भारतीय समाजात महिलांना शिक्षण, मालकीहक्क, रोजगार व निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळालेली नव्हती. बालविवाह, हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसा, अशिक्षण व गरिबी यांसारख्या समस्यांनी महिलांचे जीवन प्रभावित केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने महिलांना समतेचा अधिकार (कलम १४), भेदभाव प्रतिबंध (कलम १५), समान संधी (कलम १६) आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार बहाल केला. याच घटनात्मक तत्त्वांच्या आधारे महिलांच्या उन्नतीसाठी विविध शासकीय योजना व कार्यक्रम सुरू करण्यात आले. महिला व बालविकास मंत्रालय, सामाजिक न्याय मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय यांच्या माध्यमातून केंद्र सरकार तसेच राज्य सरकारे महिलांसाठी विविध योजना राबवत आहेत. या योजनांचा उद्देश महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे.

महिला ही समाजाची मूलभूत घटक असून कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या विकासामध्ये तिचे योगदान अनन्यसाधारण आहे. सामाजिक प्रगती, आर्थिक विकास, सांस्कृतिक समृद्धी आणि नैतिक मूल्यांची जडणघडण यामध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तरीही ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे भारतीय समाजात महिलांचे स्थान दीर्घकाळ दुय्यम राहिले आहे. पितृसत्ताक सामाजिक रचना, रूढी-परंपरा, अशिक्षण, दारिद्र्य आणि लिंगभेद यांमुळे महिलांना समान संधी मिळालेल्या नाहीत. परिणामी महिलांच्या सर्वांगीण विकासावर मर्यादा आल्या आहेत. प्राचीन काळात भारतीय समाजात महिलांना काही प्रमाणात सन्मानाचे स्थान प्राप्त होते; परंतु कालांतराने सामाजिक बंधने वाढत गेली. बालविवाह, हुंडा पद्धत, स्त्रीभ्रूणहत्या, स्त्रीशिक्षणावरील निर्बंध, कौटुंबिक हिंसा आणि आर्थिक परावलंबित्व यांसारख्या समस्यांनी महिलांचे जीवन अधिक गुंतागुंतीचे बनवले. या परिस्थितीत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवणे ही केवळ सामाजिक गरज नसून राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक बाब ठरते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने महिलांना समान अधिकार बहाल केले. राज्यघटनेतील कलम १४ मध्ये समतेचा अधिकार, कलम १५ मध्ये लिंगभेदास प्रतिबंध, कलम १६ मध्ये समान संधी आणि कलम २१ मध्ये प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार यांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये महिलांच्या कल्याणासाठी विशेष तरतुदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. या घटनात्मक तरतुदींच्या आधारे केंद्र व राज्य सरकारांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजना व कार्यक्रम सुरू केले आहेत.

महिलांसाठी शासकीय योजना व कार्यक्रम यांचा मुख्य उद्देश महिलांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक सक्षमीकरण करणे हा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांचे बौद्धिक विकास साधणे, आरोग्य योजनांद्वारे माता व बालकांचे संरक्षण करणे, रोजगार व स्वयंरोजगार योजनांद्वारे आर्थिक स्वावलंबन निर्माण करणे आणि सामाजिक सुरक्षा योजनांद्वारे महिलांना आधार देणे हे या योजनांचे प्रमुख हेतू आहेत. महिलांचे सक्षमीकरण

म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर निर्णयप्रक्रियेत सहभाग, आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे होय.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने बेटी बचाओ बेटी पढाओ, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, वन स्टॉप सेंटर योजना यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत. या योजनांचा उद्देश मुलींचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य, पोषण व महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हा आहे. याचबरोबर महिला स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. स्वयं-सहायता गटांमुळे महिलांमध्ये बचतीची सवय, सामूहिक शक्तीची जाणीव आणि नेतृत्वगुणांचा विकास झाला आहे.

राज्य पातळीवरही महिलांच्या गरजांनुसार विविध विशेष योजना राबविण्यात येतात. महाराष्ट्र शासनाने माझी कन्या भाग्यश्री योजना, तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना, संजय गांधी निराधार योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीस चालना दिली आहे. विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या योजना उपयुक्त ठरल्या आहेत.तथापि, शासकीय योजनांची संख्या मोठी असली तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसमोर अनेक अडचणी आहेत. जनजागृतीचा अभाव, प्रशासकीय अडथळे, माहितीचा अभाव, सामाजिक रूढी आणि कधीकधी भ्रष्टाचार यांमुळे अनेक महिलांना योजनांचा लाभ मिळत नाही. ग्रामीण भागातील महिला, अशिक्षित महिला आणि वंचित घटकांतील महिलांना या योजनांपर्यंत पोहोचण्यात विशेष अडचणी येतात. त्यामुळे केवळ योजना तयार करणे पुरेसे नसून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी व मूल्यांकन करणे आवश्यक ठरते.

महिलांसाठी शासकीय योजना व कार्यक्रमांचा अभ्यास करणे हे सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा अभ्यासातून योजनांची उपयुक्तता, मर्यादा, अंमलबजावणीतील त्रुटी आणि त्यांचा महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम समजून घेता येतो. महिलांचे सक्षमीकरण हे शाश्वत विकासाचे महत्त्वाचे अंग असून त्याशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य नाही. त्यामुळे महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा सखोल अभ्यास करून त्यांची परिणामकारकता वाढविणे ही काळाची गरज आहे.

सदर शोधनिबंधात महिलांसाठी शासकीय योजना व कार्यक्रमांचा अभ्यास करून त्यांचा सामाजिक व आर्थिक परिणाम विश्लेषित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच या योजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण कितपत साध्य झाले आहे, याचा आढावा घेण्यात येणार आहे. महिलांचे सशक्तीकरण हे केवळ सरकारी जबाबदारी नसून समाजाच्या सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे. या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा आहे.

**अध्ययनाचे उद्देश:**

१) महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमुख शासकीय योजना व कार्यक्रमांचा अभ्यास करणे.
२) या योजनांचा महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम समजून घेणे.
३) महिलांच्या सक्षमीकरणात शासकीय योजनांची भूमिका विश्लेषित करणे.
४) योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी व मर्यादा अभ्यासणे.
५) महिलांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिफारसी सुचविणे.

**गृहितके:**

१. महिलांसाठीच्या शासकीय योजना महिलांच्या आर्थिक स्वावलंबनास हातभार लावतात.

२. शासकीय योजनांमुळे महिलांचे शिक्षण व आरोग्य-विषयक स्तर उंचावले आहे.

३. ग्रामीण व शहरी महिलांमध्ये योजनांच्या लाभ मिळण्यात असमानता आढळते.

४. योग्य जनजागृती अभावी अनेक महिला योजनांच्या लाभापासून वंचित राहतात.

**अध्ययन पद्धती:** सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.
माहितीचे दुय्यम स्रोत : शासकीय अहवाल, जनगणना अहवाल,महिला व बालविकास मंत्रालयाची संकेतस्थळे, पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके, वृत्तपत्रे व ऑनलाइन स्रोत

**अभ्यासाची व्याप्ती:** हा अभ्यास भारतातील महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमुख शासकीय योजनांपुरता मर्यादित आहे.

**महिलांसाठी प्रमुख शासकीय योजना व कार्यक्रम:** भारतीय समाजरचनेत महिलांचे स्थान ऐतिहासिकदृष्ट्या दुय्यम राहिले असले तरी आधुनिक भारतात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारांनी विविध शासकीय योजना व कार्यक्रम राबविले आहेत. महिलांचे शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सुरक्षितता व सक्षमीकरण ही या योजनांची प्रमुख उद्दिष्टे आहेत. महिलांचे सामाजिक स्थान उंचावणे, लिंगभेद कमी करणे व समान संधी उपलब्ध करून देणे यासाठी या योजनांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. खाली महिलांसाठी

राबविण्यात येणाऱ्या प्रमुख शासकीय योजनांचा सविस्तर आढावा देण्यात येत आहे.

**१. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना:** बेटी बचाओ बेटी पढाओ योजना केंद्र सरकारने २०१५ साली सुरू केली. भारतात स्त्रीभ्रूणहत्या, घटते लैंगिक प्रमाण व मुलींच्या शिक्षणातील मागासलेपणा या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत —

१) स्त्रीभ्रूणहत्या रोखणे,

२) मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे,

३) मुलींचे शिक्षण व सशक्तीकरण वाढवणे.

या योजनेअंतर्गत जनजागृती मोहिमा, शाळांमध्ये मुलींच्या नावनोंदणीस प्रोत्साहन, पालकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, तसेच कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली जाते. या योजनेमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये लैंगिक प्रमाणात सुधारणा झाली असून मुलींच्या शिक्षणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे. समाजात "मुलगी ओझे नसून संपत्ती आहे" हा संदेश रुजविण्यात ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

**२. प्रधानमंत्री उज्ज्वला योजना:** प्रधानमंत्री उज्ज्वला योजना २०१६ मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण व गरीब कुटुंबांतील महिलांना स्वच्छ इंधन उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पारंपरिक चुलीमुळे निर्माण होणारा धूर महिलांच्या आरोग्यास हानिकारक ठरतो. त्यामुळे डोळ्यांचे आजार, श्वसनाचे विकार व इतर गंभीर समस्या उद्भवतात. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन देण्यात येते. यामुळे महिलांचे आरोग्य सुधारले असून त्यांचा वेळ व श्रम वाचले आहेत. स्वयंपाकघरातील धुरमुक्त वातावरणामुळे महिलांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला आहे. उज्ज्वला योजना ही महिलांच्या आरोग्यसुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जाते.

**३. सुकन्या समृद्धी योजना:** सुकन्या समृद्धी योजना ही केंद्र सरकारची एक महत्त्वाची बचत योजना आहे. मुलींच्या भविष्याच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पालक आपल्या मुलीच्या नावाने बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडू शकतात. या खात्यावर आकर्षक व्याजदर मिळतो व ही रक्कम मुलीच्या शिक्षणासाठी किंवा विवाहासाठी वापरता येते. या योजनेमुळे पालकांमध्ये मुलींच्या शिक्षणाबाबत जागरूकता वाढली आहे. मुलगी म्हणजे आर्थिक ओझे ही मानसिकता बदलण्यास या योजनेने हातभार लावला आहे. दीर्घकालीन बचतीच्या माध्यमातून मुलींच्या सशक्तीकरणाला चालना देणारी ही योजना ठरली आहे.

**४. महिला स्वयं-सहायता गट:** महिला स्वयं-सहायता गट ही ग्रामीण व शहरी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाअंतर्गत महिलांचे स्वयं-सहायता गट स्थापन केले जातात. या गटांमुळे महिलांना बचत, कर्ज, स्वयंरोजगार व उद्यमशीलतेची संधी मिळते. स्वयं-सहायता गटांमुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन वाढले असून त्यांचा आत्मविश्वास व निर्णयक्षमतेत वाढ झाली आहे. महिलांनी छोटे उद्योग, शेतीपूरक व्यवसाय, हस्तकला, दुग्धव्यवसाय अशा विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाली असून महिलांचे सामाजिक स्थान उंचावले आहे. स्वयं-सहायता गट हे महिलांच्या सामूहिक शक्तीचे उत्तम उदाहरण मानले जाते.

**५. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:** प्रधानमंत्री मातृ वंदना योजना गर्भवती व स्तनदा मातांच्या आरोग्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या अपत्याच्या वेळी महिलांना आर्थिक सहाय्य दिले जाते. गर्भधारणेदरम्यान योग्य पोषण, तपासणी व आरोग्यसेवा घेण्यास महिलांना प्रोत्साहन दिले जाते. या योजनेचा उद्देश माता व बालमृत्यू दर कमी करणे हा आहे. आर्थिक सहाय्यामुळे गरीब महिलांना आरोग्यसेवा घेणे सुलभ झाले आहे. या योजनेमुळे मातांच्या पोषणात सुधारणा झाली असून नवजात बालकांच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम दिसून येतो.

**६. वन स्टॉप सेंटर योजना:** वन स्टॉप सेंटर योजना हिंसाग्रस्त महिलांसाठी सुरू करण्यात आली आहे. घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार, मानसिक छळ यांचा सामना करणाऱ्या महिलांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारची मदत उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या केंद्रांमध्ये वैद्यकीय सेवा, कायदेशीर मार्गदर्शन, समुपदेशन व तात्पुरती निवास व्यवस्था दिली जाते. महिलांना त्वरित संरक्षण व आधार मिळावा यासाठी ही योजना उपयुक्त ठरली आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना न्याय मिळवून देण्यात वन स्टॉप सेंटर योजना महत्त्वाची भूमिका बजावते.

**७. महाराष्ट्रातील विशेष योजना**

**अ) माझी कन्या भाग्यश्री योजना:** ही योजना महाराष्ट्र शासनाने मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केली आहे. दोन अपत्यांपर्यंत मर्यादा पाळणाऱ्या कुटुंबांना या योजनेचा लाभ दिला जातो. मुलींच्या शिक्षण व आरोग्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेमुळे मुलींच्या जन्माविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

**ब) तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना:** तेजस्विनी योजना ग्रामीण भागातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत महिलांना कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगाराच्या संधी व नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाते. ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनविण्यात ही योजना प्रभावी ठरली आहे.

**क) संजय गांधी निराधार योजना:** संजय गांधी निराधार योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी महत्त्वाची सामाजिक सुरक्षा योजना आहे. विधवा, परित्यक्ता, अपंग व निराधार महिलांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. या योजनेमुळे अनेक महिलांना आधार मिळाला आहे.

**निष्कर्ष :**

१) शासकीय योजनांमुळे महिलांचे शिक्षण, आरोग्य व आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

२) स्वयं-सहायता गटांमुळे महिलांमध्ये नेतृत्वगुण व आत्मविश्वास वाढला आहे.

३) ग्रामीण भागात जनजागृतीअभावी अनेक महिला योजनांपासून वंचित राहतात.

४) योजनांची अंमलबजावणी करताना प्रशासकीय अडचणी व भ्रष्टाचार आढळतो.

५) महिलांचे सामाजिक स्थान उंचावण्यात शासकीय योजनांची महत्त्वाची भूमिका आहे.

**शिफारसी :**

१) महिलांसाठीच्या योजनांची प्रभावी जनजागृती करणे आवश्यक आहे.

२) ग्रामीण व दुर्गम भागात योजनांची पोहोच वाढवावी.

३) डिजिटल साक्षरतेद्वारे महिलांना ऑनलाइन सेवांचा लाभ घेण्यास सक्षम करावे.

४) योजनांच्या अंमलबजावणीवर नियमित देखरेख ठेवावी.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवावा.

## संदर्भ सूची


1. Government of India. (2015). Beti Bachao Beti Padhao: Scheme Guidelines. New Delhi: Ministry of Women and Child Development.
2. Government of India. (2020). Annual Report. Ministry of Women and Child Development.
3. Desai, N., & Thakkar, U. (2007). Women in Indian Society. New Delhi: National Book Trust.
4. Census of India. (2011). Women and Men in India. New Delhi: Registrar General of India.
5. Kabeer, N. (2012). Women's economic empowerment and inclusive growth. International Development Research Centre, 44(3), 1–20.

# वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांमध्ये सामाजिक कार्याचा हस्तक्षेप

**रुचि अनिलराव बोरकर** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
**अभिजीत अनिलराव बोरकर** महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा

**सारांश:** वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग हा एक मोठा आव्हान आहे कारण त्यात खोलवर रुजलेले सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि पायाभूत सुविधांचे अडथळे आहेत. या संशोधनाचा उद्देश गरिबी, बालविवाह, जागरूकतेचा अभाव आणि अपुऱ्या शैक्षणिक सुविधांसह औपचारिक शिक्षणाच्या उपलब्धतेवर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे आहे. या अभ्यासात गुणात्मक आणि संख्यात्मक दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आला, ज्यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह सर्वेक्षणे आणि मुलाखतींचा समावेश होता. या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समावेशक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक कार्य हस्तक्षेपांची महत्त्वपूर्ण भूमिका - जसे की समुदाय एकत्रीकरण, समुपदेशन, समर्थन आणि शैक्षणिक सहाय्य - यावर प्रकाश टाकला आहे. सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक समुदाय आणि धोरणकर्त्यांचा समावेश असलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे गोंड आदिवासी मुलींसाठी शैक्षणिक परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकते, यासाठी एक सहाय्यक वातावरण निर्माण करणे, संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि कुटुंबांना शिक्षणाला प्राधान्य देण्यास सक्षम करणे शक्य आहे, असे निष्कर्षांवरून दिसून येते. हा अभ्यास शैक्षणिक दरी भरून काढण्यास मदत करतो आणि उपेक्षित आदिवासी लोकांमध्ये सामाजिक समानतेला चालना देण्यासाठी सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील, शाश्वत धोरणांची गरज अधोरेखित करते.

**मुख्य शब्द:** गोंड जमाती, आदिवासी शिक्षण, सामाजिक कार्य वर्धा जिल्हा, शैक्षणिक अडथळे, हस्तक्षेप धोरणे.

**परिचय:** शिक्षण हा मूलभूत मानवी हक्क आहे आणि वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक प्रमुख चालक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात, गरिबी कमी करण्यासाठी आणि समावेशक विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. तथापि, शिक्षणातील अडथळे कायम आहेत, विशेषतः अनुसूचित जमाती (ST) सारख्या ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित समुदायांमध्ये. भारतातील सर्वात मोठ्या आदिवासी समुदायांपैकी एक असलेली गोंड जमात प्रामुख्याने मध्य भारतीय प्रदेशात राहते, ज्यामध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडचा काही भाग समाविष्ट आहे. महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात, ग्रामीण आणि दुर्गम भागात गोंड लोकांची मोठी लोकसंख्या राहते.

आर्थिक अडचणी, सामाजिक-सांस्कृतिक अडचणी, अपुरी शैक्षणिक पायाभूत सुविधा, वाहतुकीचा अभाव आणि मुलींच्या शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल अपुरी जागरूकता यासारख्या विविध अडथळ्यांमुळे गोंड आदिवासी मुलींची शैक्षणिक स्थिती चिंताजनकरित्या खालावली आहे. लहान वयात घरगुती जबाबदाऱ्यांसारख्या सामाजिक अपेक्षा, सतत सहभाग घेण्यास परावृत्त करतात. अनेक कुटुंबे दीर्घकालीन सक्षमीकरणापेक्षा अल्पकालीन आर्थिक अस्तित्वाला प्राधान्य देतात. सर्व शिक्षा अभियान (SSA), कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) आणि शिक्षणाचा अधिकार (RTE) यासारख्या सरकारी योजनांनी आदिवासी मुलांची नोंदणी आणि टिकवून ठेवण्याची क्षमता सुधारण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु आव्हाने आणि समुदायाच्या सहभागाच्या अभावामुळे त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला मर्यादित परिणाम मिळाले आहेत. सामाजिक कार्यातील हस्तक्षेप सक्षमीकरण, समर्थन आणि सामाजिक न्याय यावर भर देऊन परिवर्तनकारी भूमिका बजावू शकतात. समुदाय एकत्रीकरण, जागरूकता कार्यक्रम, समुपदेशन आणि पाठिंब्याद्वारे, सामाजिक कार्यकर्ते मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर प्रभाव टाकू शकतात, कुटुंबांना शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देण्यास मदत करू शकतात आणि शैक्षणिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करू शकतात.

हा संशोधन पेपर वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागाची सद्यस्थिती शोधतो, त्यांच्या शिक्षणात अडथळा आणणाऱ्या सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि पायाभूत सुविधांमधील आव्हाने ओळखतो आणि या समस्या सोडवण्यासाठी सामाजिक कार्याच्या भूमिकेचे मूल्यांकन करतो. लक्ष्यित सामाजिक कार्य हस्तक्षेप आणि धोरणात्मक सुधारणांद्वारे शैक्षणिक परिणाम वाढविण्यासाठी आणि आदिवासी मुलींना सक्षम करण्यासाठी व्यावहारिक धोरणांची शिफारस केली जाते.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१) प्रतिसादकर्त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) प्रतिसादकर्त्यांच्या शैक्षणिक सहभागाची स्थिती जाणून घेणे आणि त्यांच्या सहभागाचे स्वरूप अभ्यासणे.

३) शिक्षण घेत असताना प्रतिसादकर्त्यांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) प्रतिसादकर्त्यांना मिळालेल्या सरकारी सुविधांचा त्यांच्या शैक्षणिक सहभागावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**गृहीतके:**

१) प्रतिसादकर्त्यांचे शिक्षण आणि आर्थिक स्थिती पालकांच्या सहभागाशी संबंधित आहे.

२) शहरी भागातील मुलींचा शैक्षणिक सहभाग ग्रामीण भागांपेक्षा जास्त आहे.

३) प्रतिसादकर्त्यांचा शैक्षणिक विकास कुटुंबाच्या आधाराशी संबंधित आहे.

४) समाधानकारक सरकारी सुविधा मुलींच्या शैक्षणिक सहभागाशी संबंधित आहेत.

**साहित्य समीक्षा:** अनेक विद्वानांनी भारतातील आदिवासी मुलींना शिक्षण मिळवण्यासाठी येणाऱ्या आव्हानांचा शोध घेतला आहे. गोविंदा आणि बंदोपाध्याय (२०११) यांनी गरिबी आणि सामाजिक बहिष्कारामुळे आदिवासी मुले, विशेषतः मुली शैक्षणिक क्षेत्रात कशी दुर्लक्षित राहतात यावर प्रकाश टाकला. झा आणि झिंग्रान (२०१२) यांनी भाषेतील अडथळे, सांस्कृतिकदृष्ट्या खंडित अभ्यासक्रमासह, आदिवासी विद्यार्थ्यांमधील उच्च गळती दरात योगदान देतात. महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित करताना, मेहता (२०१४) यांना आढळून आले की, अल्पवयीन विवाह, घरगुती जबाबदाऱ्या आणि महिला शिक्षकांची कमतरता यासारखे घटक गोंड आदिवासी मुलींना सतत शिक्षण घेण्यापासून परावृत्त करतात. त्याचप्रमाणे मिश्रा आणि डॅश (२०१६) यांनी असे निरीक्षण नोंदवले की सर्व शिक्षा अभियान आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय यांसारख्या सरकारी योजनांमुळे नावनोंदणीत काही सुधारणा झाली असली तरी, कायम राखणे ही एक प्रमुख समस्या आहे. तिवारी (२०१८) यांनी गोंड मुलींमधील शैक्षणिक सातत्य वाढविण्यासाठी आर्थिक आणि नैतिक समर्थन प्रणालीच्या महत्त्वावर भर दिला. या संदर्भात सामाजिक कार्याची भूमिका महत्त्वाची आहे, जसे की देसाई (२०१५) यांनी नमूद केले आहे, समाज कार्यकर्त्यांनी जागरुकता, समुपदेशन आणि समुदाय सहभागाची सोय केली आहे. पटेल आणि शर्मा (२०१७) यांनी दाखवून दिले की समाजकार्य आणि गैर सरकारी संस्थेच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील आदिवासी भागात शाळेतील उपस्थिती आणि पालकांच्या वृत्तीवर सकारात्मक परिणाम केला. कुमार आणि सिंग (२०१९) यांनी आदिवासी प्रदेशांमध्ये शैक्षणिक परिणाम सुधारण्यासाठी सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील समाजकार्य पद्धतींसाठी पुढे युक्तिवाद केला. आदिवासी व्यवहार मंत्रालय (२०२०) आणि UNESCO (२०१९) च्या अहवालांसह सरकारी अहवालांमध्ये आदिवासी लोकसंख्येमध्ये शैक्षणिक प्रवेश प्राप्त करण्यासाठी सर्वांगीण, एकात्मिक दृष्टिकोनाच्या गरजेवर जोर देण्यात आला आहे. या अंतर्दृष्टी असूनही, मर्यादित संशोधन विशेषतः वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींवर लक्ष केंद्रित करते, प्रभावी समाजकार्य हस्तक्षेपाद्वारे त्यांच्या अद्वितीय आव्हानांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी स्थानिक अध्ययनाची आवश्यकता अधोरेखित करते.

**संशोधन पद्धती:** हा अध्ययन महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा अध्ययन करण्यासाठी मिश्र पद्धतीच्या संशोधन रचनेचा उपयोग करतो. संशोधनामध्ये नावनोंदणी, उपस्थिती आणि गळती दरांवरील माहिती संकलित करण्यासाठी परिमाणात्मक आणि गुणात्मक पद्धती एकत्रित केल्या आहेत. नमुन्यात १०० मुली, त्यांचे पालक, शिक्षक आणि समाज कार्यकर्ते यांचा समावेश आहे. माहिती विश्लेषण साधनांमध्ये वर्णनात्मक आकडेवारी आणि विषयगत विश्लेषण समाविष्ट आहे वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग आणि या संदर्भात उद्भवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी समाजकार्य मध्यस्तीः

गौड जमाती, मध्य भारतातील एक प्रमुख अनुसूचित जमाती, महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात लक्षणीय उपस्थिती आहे. विविध शासकीय शैक्षणिक योजना असूनही जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग तुलनेने कमी आहे. अनिवार्य शिक्षण धोरणे आणि माध्यान्ह भोजन योजनांमुळे प्राथमिक स्तरावर लवकर नावनोंदणी तुलनेने जास्त आहे, परंतु उच्च प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर गळतीचे प्रमाण प्रचंड वाढते. शाळा बंद होण्याच्या मुख्य कारणांमध्ये आर्थिक अडचणी, घरगुती जबाबदाऱ्या, शाळांपासूनचे अंतर, अपुरी पायाभूत सुविधा, भाषेतील अडथळे, सांस्कृतिक समजुती आणि लवकर विवाह यांचा समावेश होतो.

पालकांना अनेकदा शिक्षणाच्या दीर्घकालीन फायद्यांविषयी जागरुकता नसते, ते मुलींसाठी, विशेषतः ग्रामीण गोंड समुदायांमध्ये अत्यावश्यक म्हणून पाहतात. गोंड आदिवासी मुलींना शिक्षणासंदर्भात भेडसावणाऱ्या समस्यांचे वर्गीकरण सामाजिक-आर्थिक समस्या, सांस्कृतिक समस्या, संस्थात्मक समस्या आणि मानसिक समस्या यांमध्ये करता येते. स्थानिक गरजांप्रती संवेदनशील असलेल्या सर्वांगीण, समुदाय-आधारित हस्तक्षेपांचा वापर करून या अडथळ्यांचे निराकरण करण्यात समाजकार्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ओळखल्या गेलेल्या प्रमुख हस्तक्षेपांमध्ये जागरूकता

आणि संवेदनीकरण मोहीम, समुपदेशन सेवा, सरकारी योजनांमध्ये प्रवेश सुलभ करणे, समुदाय एकत्रीकरण आणि उपचारात्मक शिक्षण, समर्थन आणि धोरण हस्तक्षेप व कौशल्य विकास आणि जीवन कौशल्य प्रशिक्षण यांचा समावेश आहे.

अध्ययनात असे आढळून आले की सक्रिय सामाजिक कार्यात सहभाग असलेल्या क्षेत्रांमध्ये अशा प्रकारचे समर्थन नसलेल्या लोकांच्या तुलनेत जास्त नावनोंदणी आणि धारणा दर आहेत. समाज कार्यकर्त्यांकडून पाठिंबा मिळवणाऱ्या मुलींनी अधिक आत्मविश्वास, शैक्षणिक प्रगती आणि उच्च शिक्षणाची आकांक्षा दाखवली. शिवाय, मुलींच्या शिक्षणाकडे समाजाचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक झाला आणि काही गावांमध्ये लवकर विवाहाचे प्रमाण कमी झाले. वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागावर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक घटकांच्या जटिल जाळ्याचा प्रभाव आहे. सरकारी प्रयत्नांनी पाया घातला असताना, समर्थन, सहाय्य सेवा आणि सामुदायिक सहभागाद्वारे या आव्हानांना तोंड देण्यासाठी समाजकार्य कर्त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग आवश्यक आहे. अशा हस्तक्षेपांना बळकटी दिल्याने आदिवासी मुलींसाठी परिवर्तनात्मक परिणाम होऊ शकतात, ज्यामुळे त्यांना गरिबी आणि उपेक्षिततेचे चक्र तोडता येईल.

**शैक्षणिक सहभागासाठी अडथळे:** वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग विविध परस्परसंबंधित अडथळ्यांमुळे लक्षणीयरीत्या अडथळा ठरतो. यामध्ये गरिबी, आर्थिक स्रोतांची कमतरता, घरगुती आणि मजुरीसाठी मुलींवर अवलंबून राहणे आणि शैक्षणिक साहित्य व वाहतुकीचा खर्च यांचा समावेश आहे. संस्थात्मक आणि पायाभूत सुविधांच्या अडथळ्यांमध्ये आदिवासी भागातील अपुऱ्या शाळा, शिक्षणाचा दर्जा आणि आदिवासी भाषेतील शिक्षणाचा अभाव, शिक्षकांची वारंवार अनुपस्थिती आणि सांस्कृतिक असंवेदनशीलता यांचा समावेश होतो. हे घटक या प्रदेशातील आदिवासी मुलींमध्ये कमी नोंदणी, उच्च गळती दर आणि खराब शैक्षणिक कामगिरीमध्ये योगदान देतात.

या आव्हानांना तोंड देण्यासाठी, आर्थिक पाठबळ, सामुदायिक संवेदना आणि शैक्षणिक पायाभूत सुविधा मजबूत करणे यासह बहुआयामी दृष्टीकोन आवश्यक आहे. सामाजिक कार्याचा हस्तक्षेप आदिवासी समुदाय आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पूल म्हणून काम करू शकतो, गोंड आदिवासी मुलींना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी अधिक समावेशक आणि सक्षम वातावरण निर्माण करू शकतो. या अडथळ्यांना दूर करून, प्रदेश या मुलींसाठी शैक्षणिक संधी सुधारू शकतो आणि अधिक न्याय्य समाजात योगदान देऊ शकतो.

**विद्यमान सरकार आणि गैर-सरकारी संस्थांचा पुढाकार:** भारत सरकार आणि अनेक गैर-सरकारी संस्थांनी (NGO) उपेक्षित गटांमध्ये, विशेषतः आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आणि कार्यक्रम सुरू केले आहेत. या उपक्रमांमध्ये सर्व शिक्षा अभियान (SSA) यांचा समावेश आहे, ज्याचा उद्देश सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सुनिश्चित करणे, शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक उपलब्धता आणि समुदायाचा सहभाग वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणे आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) योजना शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या गटांमध्ये मुलींसाठी निवासी शाळा स्थापन करून अनुसूचित जमातींसह उपेक्षित समुदायातील मुलींना लक्ष्य करते. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) कायदा (PESA), १९९६, आदिवासी समुदायांना त्यांच्या स्वतःच्या संसाधनांवर नियंत्रण ठेवण्याचा आणि शिक्षणासह स्थानिक पातळीवर संबंधित निर्णय घेण्याचा अधिकार देतो. शिक्षणाचा अधिकार कायदा (RTE), २००९, ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची हमी देतो, ज्यामध्ये हकालपट्टी नसलेली धोरणे, वयोमानानुसार शिक्षण आणि शालाबाह्य मुलांसाठी विशेष प्रशिक्षण यांचा समावेश आहे. गैर-सरकारी संस्थांच्या उपक्रमांमध्ये समुदाय एकत्रीकरण, आणि वैकल्पिक शिक्षण केंद्रे, मार्गदर्शन, समर्थन कार्यक्रम आणि मार्गदर्शन कार्यक्रम यांचा समावेश होतो. तथापि, अंमलबजावणीची आव्हाने कायम आहेत, जसे की नोकरशाही विलंब, निधीची कमतरता, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता, समुदायाचा कमी सहभाग आणि अपुरे निरीक्षण आणि मूल्यमापन.

सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांचे उपक्रम गोंड आदिवासी मुलींमध्ये शैक्षणिक प्रवेश वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण समर्थन देतात, परंतु प्रणालीगत आव्हाने आणि सामाजिक-सांस्कृतिक अडथळ्यांमुळे वास्तविक परिणाम मर्यादित राहतो. तळागाळातील सहभाग मजबूत करणे, योजना वितरण सुधारणे आणि सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था व समाज कार्यकर्ते यांच्यातील हस्तक्षेपाच्या सहयोगी प्रतिमानाला प्रोत्साहन देणे वर्धा जिल्ह्यातील आदिवासी मुलींच्या शैक्षणिक परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा करू शकते.

**समाजकार्य हस्तक्षेपाची भूमिका:** गोंड आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागात अडथळा आणणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी सामाजिक कार्याचा हस्तक्षेप महत्त्वपूर्ण आहे. समुदाय-केंद्रित, हक्क-आधारित, आणि सहभागात्मक दृष्टिकोन लागू करून, समाज कार्यकर्ते

आदिवासी समुदाय आणि औपचारिक शिक्षण प्रणाली यांच्यातील अंतर कमी करतात. त्यांच्या प्रयत्नांमध्ये जागरूकता निर्माण, शैक्षणिक सहाय्य कार्यक्रम, समर्थन आणि मनोसामाजिक सक्षमीकरण यांचा समावेश होतो. सामुदायिक जागरूकता आणि एकत्रीकरण ही समाज कार्यकर्त्यांद्वारे वापरली जाणारी प्रमुख धोरणे आहेत. ते पालकांना मुलींच्या शिक्षणाच्या मूल्यावर शिक्षित करतात, समाजातील नेत्यांना आणि आदर्शांना सहभागी करून घेतात आणि गावागावात ग्राम शिक्षण समित्या (VECs) तयार करतात. शैक्षणिक समर्थन कार्यक्रमांमध्ये शालेय शिक्षणानंतर, शिष्यवृत्ती आणि करिअर समुपदेशन व मार्गदर्शन यांचा समावेश होतो. आदिवासींच्या शिक्षणावर परिणाम करणाऱ्या धोरणे आणि पद्धतींवर प्रभाव टाकण्यासाठी समाज कार्यकर्ते स्थानिक प्रशासन संरचना, शिक्षण विभाग व स्वयंसेवी संस्थांशी देखील व्यस्त असतात.

समर्थन आणि धोरणात्मक सहभागामध्ये शालेय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, आदिवासी संस्कृती व भाषा यांचा अभ्यासक्रमात समावेश करणे सुनिश्चित करणे आणि शाश्वत शिक्षण प्रतिमानासाठी अभिप्राय आणि शिफारसी प्रदान करणे समाविष्ट आहे. मानसिक-सामाजिक समर्थन आणि समुपदेशन भावनिक, सामाजिक व मानसिक अडथळे दूर करतात जे मुलींना शिक्षणात भरभराट होण्यापासून रोखतात. यामध्ये आघात, कमी आत्मसन्मान, लिंगभेद, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमतेसाठी जीवन कौशल्य प्रशिक्षण व कौटुंबिक समुपदेशनाद्वारे लवकर विवाह रोखणे यांचा समावेश आहे. वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींसाठी शैक्षणिक परिदृश्य बदलण्यासाठी सामाजिक कार्याचा हस्तक्षेप महत्त्वपूर्ण आहे. दीर्घकालीन प्रभावासाठी आदिवासी शिक्षणातील शाश्वत विकासासाठी या हस्तक्षेपांचे प्रमाण वाढवणे आणि त्यांना धोरणात्मक चौकटीत एकत्रित करणे आवश्यक आहे.

**परिणाम:** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये (KGBVs) आणि सर्व शिक्षा अभियान (SSA) यांसारख्या सरकारी योजनांच्या अंमलबजावणीमुळे गोंड आदिवासी मुलींमध्ये, विशेषतः प्राथमिक ८/१४ नावनोंदणी दरात माफक सुधारणा झाली आहे. तथापि, कायमस्वरूपी सामाजिक आव्हानांमुळे, विशेषतः माध्यमिक शिक्षणामध्ये, धारणा दर कमी राहतात. पारंपारिक सांस्कृतिक वृत्ती, ज्यात लिंग-आधारित भूमिका आणि लवकर विवाह यांचा समावेश आहे, शैक्षणिक सातत्य अडथळा आणत आहेत. घरगुती कामांसाठी मुलींवर आर्थिक अवलंबित्व आणि मोलमजुरीमुळे अनेकांना वेळेपूर्वीच शाळा सोडावी लागते, ज्यामुळे सरकारी योजनांचा संभाव्य लाभ कमी होतो. सामाजिक कार्यातील हस्तक्षेपांची परिणामकारकता, जसे की समुदायाची जमवाजमव, शैक्षणिक समर्थन आणि धोरणात्मक समर्थन, सक्रिय गैर-सरकारी संस्थांचा सहभाग आणि समाजकार्य हस्तक्षेप असलेल्या प्रदेशांमध्ये शाळेतील उपस्थिती, प्रतिबद्धता आणि शैक्षणिक कामगिरी सुधारण्यात लक्षणीय असल्याचे आढळले. समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रमांनी आदिवासी मुलींचा आत्मविश्वास, प्रेरणा आणि सहभाग वाढवण्यात, उच्च आत्मसन्मान व शिक्षण चालू ठेवण्याची अधिक शक्यता दाखवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

मुख्य धोरण म्हणून सामुदायिक संलग्नता ही शिक्षणातील प्रणालीगत अडथळ्यांवर मात करण्यासाठी सर्वात प्रभावी धोरण असल्याचे आढळून आले. ज्या गावांमध्ये ग्राम शिक्षण समित्या (VECs) स्थापन केल्या गेल्या आणि त्यांना समाजकार्य कर्त्यांनी पाठिंबा दिला, तेथे शाळेतील उपस्थिती ३० टक्के नी सुधारली आणि वाढीव सामुदायिक देखरेखीमुळे शिक्षकांची गैरहजेरी २१ टक्के कमी झाली. हे परिणाम सूचित करतात की आदिवासी प्रदेशात मुर्लीचे शिक्षण टिकवून ठेवण्यासाठी समुदायाची मालकी आणि शैक्षणिक प्रशासनात सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. सरकारी योजनांनी शिक्षणात प्रवेश सुधारण्यासाठी पाया घातला आहे, सामाजिक कार्यातील हस्तक्षेप हे धोरणाचे व्यवहारात रूपांतर करण्यासाठी, विशेषतः वर्धा जिल्ह्यातील गोंड मुलींसारख्या आदिवासी संदर्भामध्ये महत्त्वपूर्ण ठरले आहेत. सर्वसमावेशक आणि शाश्वत शैक्षणिक विकास सुनिश्चित करण्यासाठी संसाधनांचे वाढीव वाटप आणि भागधारकांमधील सहकार्यासह या हस्तक्षेपांना वाढवणे आवश्यक आहे.

**चर्चा:** वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागावर परिणाम करणाऱ्या घटकांच्या गुंतागुंतीच्या परस्परसंवादावर या अध्ययनात प्रकाश टाकण्यात आला आहे. वंचित गटांमध्ये शिक्षणाला चालना देणाऱ्या सरकारी योजना असूनही, टिकवून ठेवण्याची आव्हाने, सांस्कृतिक वृत्ती आणि पद्धतशीर अडथळे प्रगतीला बाधा आणत आहेत. विशेषतः सर्व शिक्षा अभियान (SSA) अंतर्गत केलेल्या प्रयत्नांमुळे आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये (KGBVS) च्या स्थापनेमुळे नावनोंदणी दरांमध्ये थोडीशी सुधारणा, लक्ष्यित सरकारी हस्तक्षेपांचा सकारात्मक परिणाम दर्शवते. या योजनांमुळे अधिकाधिक आदिवासी मुलींना शिक्षण व्यवस्थेत, विशेषतः प्राथमिक स्तरावर आणण्यात यश आले आहे. तथापि, धारणा गंभीरपणे कमी राहते, विशेषतः माध्यमिक स्तरावर, शाश्वत शैक्षणिक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी केवळ नावनोंदणी अपुरी असल्याचे दर्शवते.

गोंड आदिवासी मुली ज्या सांस्कृतिक संदर्भामध्ये राहतात ते शिक्षण चालू ठेवण्यासाठी एक मोठा अडथळा आहे. खोलवर रुजलेले पितृसत्ताक नियम, लिंग-पक्षपाती अपेक्षा आणि लवकर लग्नाच्या पद्धती मुलींच्या शिक्षणाचे मूल्य कमी करतात. कुटुंबे अनेकदा शालेय शिक्षणापेक्षा घरगुती जबाबदाऱ्या किंवा मजुरीला प्राधान्य देतात, विशेषतः आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांमध्ये, हे आर्थिक अवलंबित्व, शिक्षणाच्या दीर्घकालीन फायद्यांबद्दल जागरूकतेच्या अभावासह, असे वातावरण निर्माण करतात जिथे शालेय शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही.

या संदर्भात समाजकार्य हस्तक्षेप गंभीर बनतात. सक्रिय गैर-सरकारी संस्थांचे सहभाग आणि समाजकार्य कर्त्यांच्या सहभागासह क्षेत्रांमध्ये शाळेतील उपस्थिती, आत्मविश्वास पातळी आणि समुदायाच्या सहभागामध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आल्या. या हस्तक्षेपांनी आव्हानांना स्थानिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील प्रतिसाद दिला, ज्यामुळे तळागाळातील सहभागाचे महत्व अधोरेखित झाले. समाज कार्यकर्त्यांनी केवळ शालेय शिक्षण यांसारख्या शैक्षणिक समर्थन कार्यक्रमांची सोय केली नाही तर समुदाय जागरुकतेवरही मोठ्या प्रमाणावर काम केले, ज्यामुळे हळूहळू पालक आणि गावातील नेत्यांमध्ये वृत्ती बदलू लागली.

सामाजिक कार्याचा सर्वात लक्षणीय परिणाम म्हणजे समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रम, ज्याने कमी आत्मसन्मान, भेदभावाची भीती आणि आकांक्षा नसणे यासारख्या शिक्षणातील मानसिक अडथळे दूर केले. वैयक्तिक लक्ष, जीवन कौशल्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देऊन, या कार्यक्रमांनी आदिवासी मुलींना आत्मविश्वासाने शिक्षण घेण्यास आणि पारंपारिक भूमिकांच्या पलीकडे भविष्याची कल्पना करण्यास सक्षम केले. सरकारी योजनांनी पाया घातला असताना, सहभागाची शाश्वतता ही आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक अडथळे दूर करणाऱ्या सामाजिक कार्याच्या हस्तक्षेपांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. आदिवासी समुदायांसाठी शैक्षणिक प्रवेश व सक्षमीकरण साध्य करण्यासाठी अशा हस्तक्षेपांना वाढवणे आणि सरकारी कार्यक्रमांशी त्यांचे एकीकरण सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:** वर्धा जिल्ह्यातील गोंड आदिवासी मुलींच्या शैक्षणिक सहभागावरील अध्ययनात सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि संस्थात्मक घटकांचा गुंतागुंतीचा परस्परसंवाद दिसून येतो जो शैक्षणिक प्रक्रियेत त्यांचा पूर्ण समावेश होण्यास अडथळा निर्माण करतो. सर्व शिक्षा अभियान आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय यांसारखे सरकारी उपक्रम असूनही, टिकवून ठेवण्याची, दर्जेदार शिक्षणाची आणि सामुदायिक सहभागाची सततची आव्हाने महत्त्वपूर्ण अडथळे आहेत. आर्थिक अडचण, लवकर विवाह आणि अपुरी शैक्षणिक पायाभूत सुविधा गोंड आदिवासी मुलींना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक संधींवर गंभीरपणे मर्यादा घालतात. उच्च गळती दर, विशेषतः दुय्यम स्तरावर, समग्र आणि शाश्वत उपायांची तातडीची गरज प्रदर्शित करतात. समुदाय एकत्रीकरण, शैक्षणिक समर्थन कार्यक्रम, समुपदेशन आणि धोरण समर्थनाद्वारे या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक कार्यातील हस्तक्षेप एक महत्त्वपूर्ण शक्ती म्हणून उदयास आले आहेत. सक्रिय गैर-सरकारी संस्थांचे सहभाग असलेल्या क्षेत्रांमध्ये या हस्तक्षेपांचे यश हे दाखवून देते की स्थानिक पातळीवर रुजलेल्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील धोरणांमुळे शाळेतील उपस्थिती, धारणा व एकूण सहभागामध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकतात. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समुदायाचा सहभाग देखील आवश्यक आहे. शेवटी, गोंड आदिवासी मुलींचा शैक्षणिक सहभाग सुधारण्यासाठी एका बहु-आयामी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे जी लक्ष्यित समाजकार्य हस्तक्षेपांसह सरकारी समर्थन एकत्रित करते. विद्यमान योजनांना बळकटी देणे, अंमलबजावणीतील तफावत भरून काढणे, आणि समुदायाच्या नेतृत्वाखालील उपक्रमांमध्ये गुंतवणूक करणे हे सुनिश्चित करु शकते की शिक्षण हे आदिवासी मुलींसाठी सक्षमीकरणाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे साधन बनू शकते.

**संदर्भ :**


1) Akhup, A. (2013). Revisiting tribal studies in India: An epistemological perspective. Journal of Tribal Intellectual Collective India, 1(1), 1-16.
2) Apte, H., & Lama, R. (2008). Education among tribal communities in Maharashtra. In N. D. C., A. Kurane, S. Wind, A. M., & J. L. S. (Eds.), Ignored claims: A focus on tribal education in India (pp. 139-150). Delhi: Kalpaz Publications.
3) Bagai, S., & Nundy, N. (2009). Tribal education: A fine balance. Mumbai: Dasra.
4) GoI. (2013-2014). Working of Ashram schools in tribal areas: Forty-fourth report. Retrieved from http://164.100.47.134/lsscommittee/Social20Justice20&20Empowerment/15_Social_Justice_And_Empowerment_44.pdf
5) Heredia, R. C. (1995). Tribal education for development: Need for a liberative pedagogy for social transformation. Economic and Political Weekly, 30(16), 891-897.
6) Kumar, K. (1983). Educational experience of scheduled castes and tribes. Economic and Political Weekly, 18(36/37), 3-19.
7) Kurane, A. (2008). Tribal education: A case study of Katkaris in Maharashtra. In N. D. C., A. Kurane, S. Wind, A. M., & J. L. S. (Eds.), Ignored claims: A focus on tribal education in India (pp. 191-210). Delhi: Kalpaz Publications.

8) Mane, V. (2010b). School curriculum and tribal students: A socio-economic and cultural interface. Pune: Centre for Educational Studies, Indian Institute of Education.
9) Ministry of Tribal Affairs, Statistics Division, GoI. (2013). Statistical profile of scheduled tribes in India. Noida: DAVP, Ministry of Information and Broadcasting, GoI.
10) Mutatkar, R. K. (2004). Action strategies for health and education in tribal Nandurbar. Maharashtra Human Development Action Research Study. Mumbai: IGIDR.
11) Nanjunda, D. C. (2008). Introduction. In N. D. C., A. Kurane, S. Wind, A. M., & J. L. S. (Eds.), Ignored claims: A focus on tribal education in India (pp. 1-10). Delhi: Kalpaz Publications.
12) NCERT. (2006b). Position paper of the National Focus Group on problems of scheduled caste and scheduled tribe children. New Delhi: NCERT. Retrieved fromhttp://www.ncert.nic.in/new_ncert/ncert/rightside/links/pdf/focus_group/position_paper_on_sc_st.pdf
13) Noronha, A. (2006). Education of tribal children: From social mobilization to poverty alleviation. One World South Asia. March.
14) Office of the Registrar General, India. (2001). Maharashtra data highlights: The scheduled tribes. Census of India 2001. Retrieved from http://censusindia.gov.in/Tables_Published/SCST/dh_st_maha.pdf
15) Rustogi, P., Mishra, S. K., & Mehta, B. S. (2012). Scheduled tribe children in India: Multiple deprivations and locational disadvantage. New Delhi: UNICEF.
16) Singh, B. (1996). Education and development of tribals in India. Journal of Education, Culture and Society, 10(1), 23-39.
17) Singh, U. K., & Nayak, A. K. (1997). Tribal education. New Delhi: Commonwealth Publishers.
18) Sujatha, K. (n.d.). Education among scheduled tribes. India Education Report. Retrieved from http://www.doccentre.net/docsweb/Education/Scanned_material/analysis_Tribals.pdf
19) Sujatha, K. (2000). Education of Indian scheduled tribes: A study of community schools in the district of Vishakapatnam, Andhra Pradesh. Paris: International Institute for Education Planning.
20) Sujatha, K. (2004). Scheduled tribes, education of. In J. S. Rajput (Ed.), Encyclopaedia of Indian education: Volume II L-Z (pp. 1481-1485). New Delhi: NCERT.
21) Tribhuwan, R. D., & Patil, J. A. (2008). Educational issues of primitive tribes in Maharashtra. In N. D. C., A. Kurane, S. Wind, A. M., & J. L. S. (Eds.), Ignored claims: A focus on tribal education in India (pp. 227-242). Delhi: Kalpaz Publications.

# नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील भटक्या विमुक्त जाती-जमातींना परिघावरून मुख्य प्रवाहात येण्याच्या प्रक्रियेतील अडथळयांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.महेश अर्जुन शिंदे** सहाय्यक प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभागप्रमुख, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर जि. नाशिक

**गोषवारा:** भटक्या आणि विमुक्त जाती-जमाती भारतीय समाजाच्या परिघावर राहिलेल्या, ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित व सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत समुदाय आहेत. त्यांच्या समाजमुखीकरणाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे असून, आजही ते शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास आणि ओळख यांसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत. ब्रिटिश काळात लावण्यात आलेल्या 'गुन्हेगार जमात' या कलंकामुळे आणि त्यानंतरही समाजातील असंवेदनशीलतेमुळे या जमातींच्या सामाजिक प्रतिमेला गंभीर धक्का बसला आहे. अशा पार्श्वभूमीवर हे संशोधन समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या अडथळ्यांचे विश्लेषण करते आणि समाजमुखीकरणाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक धोरणात्मक व सामाजिक हस्तक्षेप सुचवते. हे अध्ययन शासकीय धोरण, समाजकार्य, शैक्षणिक धोरण व अभ्यास साहित्य यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, वंचित घटकांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करून, एक समावेशक आणि सशक्त लोकशाही समाज घडवण्याच्या दिशेने हे संशोधन एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.

**कीवर्ड्स:** भटक्या विमुक्त जाती-जमाती, समाजमुखीकरण, सामाजिक बहिष्करण, सामाजिक कलंक, शिक्षणातील वंचितता, परिघावरचे समुदाय, सामाजिक समावेशन, धोरणात्मक हस्तक्षेप, वंचित घटक, सामाजिक न्याय.

**प्रस्तावना:** भारतीय समाज हा मुळातच संमिश्र स्वरूपाचा असून, त्यामध्ये विविध मानवी समूहांचा समावेश आहे. या समाजात विविध समुदाय, संस्कृती, वंश, भाषा, धर्म, पंथ, जाती आणि जमाती आढळतात. भारतीय समाजाची विभागणी प्रामुख्याने आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समाज अशा तीन प्रमुख गटांमध्ये केली जाते. पारंपरिक भारतीय समाजरचना वर्णव्यवस्थेवर आधारित होती. प्रत्येक समाजात स्तरात्मक रचनेची एक विशिष्ट व्यवस्था निर्माण झालेली असते. भारतीय समाजात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक गट इत्यादींचा समावेश केला जातो.

प्राचीन काळी सर्व जमाती टोळ्या करुन राहात होत्या. आजही काही जमाती टोळ्या करुनच भटके जीवन जगत आहेत. निसर्गाची पूजा, भूत-पिशाच्यावर विश्वास, प्राण्याला बळी देण्याची प्रथा आजही अशा जमाती मध्ये चालूच आहे. त्यामुळे हा भटका समाज इतर विकसित समाजाच्या प्रवाहातून दूर झाल्याचे दिसून येते. "उदरनिर्वाह करिता निवडलेल्या किंवा वाट्यास आलेल्या व्यवसायनिमित्त किंवा उदरनिर्वाहाच्या साधनाच्या शोधात भटकत राहाणाऱ्या लो कांच्या टोळ्यांना भटक्या जमाती किंवा भटके असे म्हणतात."

महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या विमुक्त जाती व जमाती आहेत. त्यापैकी २८ भटक्या जमाती आहेत. या जमातीच्या पोटजातीची संख्या २०० पेक्षा जास्त आहेत. त्यामध्ये संस्कृती, रुढी, परंपरा, विवाहपध्दती, अंधश्रध्दा, अंत्यविधी, व्यवसाय, भौगोलिकता इ. विविधतेमुळे अंतर्गत साम्य व भेद निर्माण झाल्याचे दिसून येते. ब्रिटिश सरकारच्या काळात इ.स. १९७१ साली गुन्हेगारी जाती व जमातीचे लोक इतर समाजापासून वेगळे झाले. या कायद्यामुळे भटक्या विमुक्त जाती व जमातीतील १९८ जाती-जमातींना गुन्हेगार जाती म्हणून जाहीर केले. पुढे सरकारने इ.स. १८९७ साली 'क्रिमिनल टाईब्न सेटलमेंट ॲक्ट' पास केला. त्या कायद्याने गुन्हेगार जाती-जमातींच्या लोकांच्या वसाहती स्थापन करण्यात आल्या. गुन्हेगारी जाती-जमातींना तारेचे कंपाऊंड करुन त्यामध्ये अशा जमातींच्या भारतात ५२ वसाहती निर्माण करण्यात आल्या. त्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात अशा वसाहतीचा समावेश होतो. इ.स. १८७१ चा गुन्हेगारी कायदा स्वतंत्र भारताच्या पार्लमेंटने सन १९५२ साली रद्द केल्यानंतर १९६० ह्या वर्षी अखिल भारतीय पातळीवर गुन्हेगारी जाती-जमातीचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे भरले. त्या वेळी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंनी वस्तुस्थिती पाहून बंदिस्त वसाहतीतील लोकांना मुक्त करण्याचे आदेश संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिले. तेव्हा १४ जमातींना गुन्हेगारी कायद्यातून मुक्त केले. त्या दिवसापासून या जमाती 'विमुक्त' या नावाने घोषित करण्यात आल्या उदरनिर्वाहासाठी ज्या जमाती सतत भटकंती करीत असतात त्यांना 'भटक्या जमाती' या नावाने ओळखले जाते. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देत भटक्या जाती व विमुक्त जमातीतील नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील विविध भटक्या आणि पारंपरिक समाजांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत विविध उपकंपन्या स्थापन करून संबंधित समाजांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन निर्णय घेतले आहेत. रामोशी समाजासाठी "राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ", वडार समाजासाठी "पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ", लोहार समाजासाठी "ब्रह्मलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ", गवळी व तत्सम समाजासाठी "श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ", विणकर समाजासाठी "विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ", तर नाथपंथी समाजासाठी "परमपूज्य गंगानाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ" या उपकंपन्यांना मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील औरंगाबाद, रत्नागिरी, नांदेड, पुणे, नागपूर, सांगली, रायगड, बीड, अकोला, सोलापूर, सातारा, नाशिक, अहिल्यानगर, परभणी, ठाणे, वाशीम, हिंगोली, बुलढाणा इत्यादी जिल्हात गोंधळी, धनगर, बंजारा, भोई, वडार, बेलदार, मसनजोगी, जोशी, वासुदेव, गाडिया लोहार, सरोदे, बहुरूपी, गवळी, कोंचीकोरवी, छितोडिया, सिकलीघर, ओतारी, वंजारी, नंदीवाले, खोलती, भुट्टे, रावल, बेरड, चप्परबंद, कंजरभाट, कैकाडी, राजपूत भोमटा इत्यादी भटक्या विमुक्त जाती-जमाती आढळतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:** १) भटक्या व विमुक्त जमातींच्या परंपरागत उपजीविकेच्या पद्धती, जीवनशैली व सांस्कृतिक ओळख समजून घेणे. २) शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास व नागरिकत्व ओळख मिळवण्यासंबंधी भटक्या व विमुक्त जमातींना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे. ३) भटक्या व विमुक्त जमातींच्या समाजमुखीकरण प्रक्रियेत येणाऱ्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय अडथळयांचे विश्लेषण करणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:** भारतामध्ये सुमारे ६ कोटी भटक्या व अर्धभटक्या जमातींना शिक्षण, सामाजिक समावेश आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे (तिवारी, २०२४). जम्मू आणि काश्मीरमधील गुज्जर व बकरवाल यांसारख्या जमाती पारंपरिक जीवनशैली टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत असताना आधुनिक समाजाशी जुळवून घेण्यात अडचणीत आहेत (तौफिक आणि एकराम, २०२०). या जमाती समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि पारंपरिक कलांचे संरक्षण करण्यात मोलाची भूमिका बजावत आहेत. तरीदेखील अनेक भटक्या जमाती आजही मूलभूत सुविधा आणि सामाजिक समतेपासून वंचित आहेत, त्यामुळे त्यांना आवश्यक सामाजिक सेवांपर्यंत पोहोच मिळत नाही. वसाहतवादी कालखंडात त्यांच्यावर 'गुन्हेगार जमाती'चा लागलेला कलंक आजही त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला बाधा आणतो (रामगुंड आणि सोमानाबोनिया, २०२१). या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भटक्या समाजाच्या सक्षमीकरणासाठी शैक्षणिक उपक्रमांसह विविध प्रयत्न राबवले जात असले, तरी त्यांना भेडसावणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्यांवर हे उपाय अपुरे ठरत आहेत (तिवारी, २०२४). त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे संवर्धन आणि सामाजिक-आर्थिक विकास यांचा समतोल राखणारे शाश्वत उपाय हे या वंचित समुदायांच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत. अनेक संशोधनातून असे दिसून येते की भटक्या व विमुक्त जमाती आजही मुख्य सामाजिक प्रवाहापासून दूरच आहेत. **कन्नाबिरण के., (२०१८),** हा लेख २०१३ ते २०१५ या कालावधीत मध्य, पश्चिम आणि दक्षिण भारतातील नऊ राज्यांमध्ये विस्थापित, भटक्या आणि अर्धभटक्या समुदायांमध्ये सामाजिक-आर्थिक स्थिती आणि शैक्षणिक प्रगती यावर करण्यात आलेल्या अभ्यासावर आधारित आहे. या अभ्यासाचा प्रमुख उद्देश ७६ समुदायांतील १३,०२० कुटुंबांचा समावेश करून, शैक्षणिक प्रगतीतील अडथळे आणि या समुदायांतील सामाजिक-आर्थिक स्थिती व शिक्षण यामधील विशिष्ट परस्परसंबंध शोधणे हा होता. **तिवारी, (२०२४),**. त्यांनी त्यांच्या संशोधनामध्ये भारतातील भटक्या जमाती शिक्षण टिकवून ठेवण्यासाठी आणि पारंपरिक कला व संस्कृतीचे जतन करण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे. या अभ्यासात भटक्या जमातींच्या शाश्वततेस व जीवनमान उन्नतीसाठी समाज व शासनाकडून प्रभावी पाठबळाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. **भुक्या, बी., और सुरेपल्ली, एस (२०२१),** या संशोधन निबंधात भारतातील विमुक्त, भटकी आणि अर्धभटकी जमातींच्या ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. शिकारी, पशुपालक, फिरते व्यापारी व कलाकार या प्रमुख प्रकारांवर सविस्तर अभ्यास केला आहे. त्यांच्या धार्मिक ओळखी, जातीय संघर्ष, वांशिक इतिहास व उपजीविकेच्या पद्धतींचा अभ्यास करण्यात आला आहे. ब्रिटिश कालीन 'गुन्हेगारी जमात कायदा' आणि स्वातंत्र्यानंतरचा 'Habitual Offenders Act' यांचा परिणामही मांडलेला आहे. सामाजिक बहिष्कार, शैक्षणिक व नागरी सुविधांपासून वंचितता, शोषण व पोलिसी छळ यांचा ठळक उल्लेख आहे. नागरी भागातील योगदान दुर्लक्षित राहिल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. महिलांचा सहभाग, धार्मिक समारंभ व स्थानिक स्वराज्य संस्थांतील अडथळयांचे

विश्लेषणही करण्यात आले आहे. विविध राज्यांतील वास्तव, सांख्यिकी माहिती व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडणी करून हे संशोधन ह्या समाजाच्या समस्यांवर नव्या विचारांना दिशा देणारे ठरते. हे संशोधन शैक्षणिक व धोरणात्मक दृष्टिकोनातून उपयुक्त ठरेल.

**अध्ययन पद्धती:** प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. तसेच संशोधन हे प्राथमिक आणि दुय्यम तथ्यावर आधारित असणार आहे. तथ्ये संकलनासाठी क्षेत्र स्तरावरील प्राथमिक स्रोतांबरोबरच द्वितीयक स्त्रोतांचा आधार घेतला जाईल. संशोधन विषयाचे प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचे सखोल विश्लेषण करून तर्कनिष्ठ निष्कर्ष काढले जाणार आहेत.

या संशोधनाद्वारे सद्यस्थितीची माहिती मिळविणे एवढेच अपेक्षित नसून या माहितीचे विश्लेषण करणे, अर्थ निर्वचन करणे व उपयोगिता ठरवणे अभिप्रेत आहे. तसेच संबंधित समस्येच्या कारणा संबंधीचे वास्तव ज्ञान प्राप्त करुन त्या समस्येच्या निराकरणासाठी उपाययोजना सुचवणे, हा आहे. संशोधनासाठी लागणारी माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक स्रोत व दुय्यम स्रोतांचा आधार घेण्यात येणार आहे.

**अ) प्राथमिक स्रोत:** संशोधनसाठी नाशिक जिल्ह्यातील नमुना भटक्या विमुक्त जमातीकडून माहिती प्राथमिक तथ्ये संकलन केले आहे. भटक्या विमुक्त जाती-जमाती परिघावरून मुख्य प्रवाहात येण्याच्या प्रक्रियेतील अडथळ्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधन क्षेत्रात प्राथमिक स्रोत संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत-अनुसूची, निरीक्षण, प्रत्यक्ष भेटी, केंद्रीय समूह चर्चा (फोकस्ड ग्रुप डिस्कशन) आणि ग्रामीण सहभागी मूल्यावलोकन (पार्टिसिपेटरी रूरल अप्राईझल- पीआरए) इ. चा अवलंब केला आहे.

**ब) दुय्यम स्रोत:** संशोधनासाठी प्राथमिक स्रोतांबरोबरच दुय्यम स्त्रोतांचा देखील आधार घेतला जाईल. विविध शासकीय, अशासकीय व सामाजिक संस्थाचे अहवाल, माहितीपत्रके, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, संशोधन निबंध, मासिके व माहितीजाल (इंटरनेट) इत्यादीद्वारे द्वितीयक तथ्ये संकलन केले आहे.

**नमुना निवड:** या संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील भटक्या व विमुक्त जाती-जमातींचा अभ्यास करण्यासाठी बहुस्तरीय यादृच्छिक नमुना पद्धतीने नमुना निवड करण्यात आली आहे. संशोधनासाठी जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यांतील भटक्या-विमुक्त समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गटांचा समावेश केला जाणार आहे. नमुन्यात एकूण सुमारे ३० उत्तरदाते असतील, ज्यामध्ये वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, शासकीय योजनांचा लाभ इत्यादी निकषांवर आधारित स्तरीकरण केले आहे.

**तथ्य विश्लेषण पद्धत:** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या प्राथमिक व दुय्यम स्रोतांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण पध्दतीचा वापर करून विश्लेषण केले आहे. मुलाखत-अनुसूची, प्रश्नावली व निरीक्षण, इत्यादीद्वारे प्राप्त केलेल्या तथ्यांच्या आशयाचे क्रमबद्ध वस्तूनिष्ठ आणि परिणामकारक विश्लेषण केले आहे. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य हेतू हा भटक्या विमुक्त जाती-जमाती परिघावरून मुख्य प्रवाहात येण्याच्या प्रक्रियेतील अडथळ्यांचे अध्ययन करणे, ह्या जाती-जमातींना मुख्य प्रवाहात येण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे हा मुख्य हेतू आहे. सदर संशोधनात नाशिक जिल्ह्यातील नमुना भटक्या विमुक्त जाती-जमाती कडून तथ्ये संकलित केली आहेत. या संकलित केलेल्या तथ्यांचे खालील संख्याशास्त्रीय साधनांच्या आधारे विश्लेषण केला जाणार आहे. तथ्ये विश्लेषणासाठी शेकडेवारी (Percentage), मध्य (Mean), सहसंबंध (Correlation), प्रमाण विचरण (Standard Deviation), स्काय स्केअर चाचणी (Chi-squared test) ह्या संख्याशास्त्रीय साधनांचा तथ्य विश्लेषणासाठी अवलंब केला आहे.

१) भटक्या जमाती (Nomadic Tribes): अशा जमाती ज्या पारंपरिकरित्या एकाच ठिकाणी स्थायिक न राहता उपजीविकेसाठी सतत स्थलांतर करतात. त्यांचा उदरनिर्वाह प्रामुख्याने फिरत्या व्यवसायांवर, जसे की जनावरांचा व्यापार, लोककला, औषधोपचार, इत्यादींवर अवलंबून असतो.

२) विमुक्त जमाती (Denotified Tribes): ब्रिटिश काळात 'गुन्हेगार जमात' म्हणून घोषित करण्यात आलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये त्या लेबलमधून मुक्त करण्यात आलेल्या जमाती. आज या जमाती 'विमुक्त' म्हणून ओळखल्या जातात, परंतु सामाजिक कलंक आजही कायम आहे.

३) समाजमुखीकरण (Mainstreaming): भटक्या व विमुक्त समाजघटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी एकत्र आणण्याची प्रक्रिया. यामध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, ओळखपत्रे, राजकीय प्रतिनिधित्व व सामाजिक समावेश यांचा समावेश होतो.

४) समाजमुखीकरणातील अडथळे (Barriers to Mainstreaming): शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व मानसिक पातळीवरील त्या अडचणी ज्या भटक्या व विमुक्त समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करतात. उदा. कलंक, भेदभाव, माहितीचा अभाव, स्थलांतर, योजना अंमलबजावणीत अडथळे.

५) सामाजिक समावेशन (Social Inclusion): समाजातील सर्व घटकांना, विशेषतः वंचित समूहांना, संधी, सेवा व संसाधनांमध्ये समान सहभाग व प्रवेश मिळवून देण्याची प्रक्रिया.

६) ऐतिहासिक कलंक (Historical Stigma): ब्रिटिशांनी लावलेल्या 'गुन्हेगार जमात' या लेबलबरोबर जोडलेले सामाजिक अपमान, जो आजही समाजाच्या वागणुकीतून दिसून येतो आणि भटक्या-विमुक्त समाजाला प्रतिष्ठा मिळण्यापासून रोखतो.

७) धोरणात्मक हस्तक्षेप (Policy Interventions): शासन किंवा संस्थांकडून समाजाच्या विशिष्ट समस्यांसाठी आखण्यात आलेली योजना, कायदे व कृती योजना, ज्या भटक्या-विमुक्त समाजाच्या विकासासाठी राबवल्या जातात.

८) सक्षमीकरण: भटक्या व विमुक्त समाजाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या सक्षम बनवण्याची प्रक्रिया, जेणेकरून ते स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहू शकतील.

**निष्कर्ष:** भटक्या आणि विमुक्त जाती-जमाती भारतीय समाजाच्या परिघावर राहिलेल्या, ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित व सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत समुदाय आहेत. त्यांच्या समाजमुखीकरणाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे असून, आजही ते शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास आणि ओळख यांसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत. ब्रिटिश काळात लावण्यात आलेल्या 'गुन्हेगार जमात' या कलंकामुळे आणि त्यानंतरही समाजातील असंवेदनशीलतेमुळे या जमातींच्या सामाजिक प्रतिमेला गंभीर धक्का बसला आहे. अशा पार्श्वभूमीवर हे संशोधन समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या अडथळ्यांचे विश्लेषण करते आणि समाजमुखीकरणाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक धोरणात्मक व सामाजिक हस्तक्षेप सुचवते. हे अध्ययन शासकीय धोरण, समाजकार्य, शैक्षणिक धोरण व अभ्यास साहित्य यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, वंचित घटकांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करून, एक समावेशक आणि सशक्त लोकशाही समाज घडवण्याच्या दिशेने हे संशोधन एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.

**संदर्भ सूची:**


१) अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र. (२०२२). देशोधडीतील श्रद्धा-अंधश्रद्धा आणि भटक्या जमाती. अंनिस वार्ता.

२) भोसले, स. (२०१८). विंचवाचं तेल *(आत्मचरित्र).* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

३) चव्हाण रामनाथ.(२०२३). भटक्या विमुक्तांचे जीवन व समस्या. चपराक प्रकाशन. पुणे

४) डॉ.नागनाथ कदम (२०१३) महाराष्ट्रातील भटका समाज: संकृती व साहित्य.

५) Becker, H. S. (1963). Outsiders: Studies in the Sociology of Deviance. New York: Free Press.

६) Bhukya, B., & Surepally, S. (2021, September 4). Unveiling the world of the nomadic tribes and denotified tribes: An introduction. Economic and Political Weekly, 56 (36).

७) Bhukya, B., & Surepalli, S. (2021). The politics of criminal tribes: Historical, social, and legal perspectives on DNTs in India. Journal of Social Inclusion Studies*,* 7 *(1)*, 45–63.

८) Government of India. (1952). *Habitual Offenders Act.* Ministry of Law and Justice.

९) Kannabiran, K. (2018). Mapping the Margins: A Study of Educational Access and Social Status among Nomadic Tribes in India (2013–2015). Hyderabad: Council for Social Development.

१०) Maharashtra Government. (2023). Government Resolution on Development Schemes for Denotified and Nomadic Tribes. Mumbai: Department of Social Justice and Special Assistance.

११) महाराष्ट्र शासन, इतर मागास व विशेष प्रवर्ग कल्याण विभाग. (२०२१). भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी वस्तीगृह योजना [शासन निर्णय].

१२) Parsons, T. (1951). *The Social* System. Glencoe, IL: Free Press.

१३) Ramgund, P., & Somanabonia, S. (2021). Colonial legacy and contemporary stigma: The case of de-notified tribes. Economic and Political Weekly, 56 *(*9), 12–16.

१४) Sen, A. (1999). Development as Freedom, Oxford University Press.

१५) Taufiq, M., & Ekram, A. (2020). Struggles of the Gujjar and Bakarwal tribes in Jammu and Kashmir: A socio-cultural analysis. Indian Journal of Tribal Affairs, *18* (2), 56–72.

१६) Tiwari, P. (2024). A study on the nomadic tribe's efforts to maintain education in the society (In the context of denotified and nomadic tribes). International Journal of Scientific Research in Engineering and Management.

१७) Tiwari, R. (2024). Denotified and Nomadic Tribes in India: Identity, Inclusion, and Policy Gaps. New Delhi: Sage Publications

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने: समाजशास्त्रीय चिंतन

**डॉ. जयमाला लाडे** मिलिंद महाविद्यालय, मुळावा

**सारांश:** जगातील संपूर्ण मोठी लोकशाही असलेल्या देशाच्या संविधानिक स्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्षे उलटुन गेले. भारतीय लोकशाहीची वाटचाल समृद्ध असतांना वाटेत अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत किंवा मुद्दाम जाणुनबुजून होत आहेत. ह्याचे सध्याचे काळात चिंतन-मनन करणे काळाची गरज आहे. कारण राजकीय-धार्मिक ध्रुवीकरण, व्देषपूर्ण राजकारण, मोठ्या प्रमाणात सामाजिक-आर्थिक विषमता, सत्ताप्राप्तीसाठी चाललेली तत्वहीन तडजोडी, बुध्दिजीवी वर्गाची वाढती उदासीनता, निवडणुकीत होणारे गैरप्रकार धनशक्तीची राजकारणावर होत चाललेली घट्ट पकड, स्वातंत्र्य, समता, बंधूभाव, सामाजिक न्याय ह्यासरख्या मूल्यांचा होत असलेला ऱ्हास, भारतीय सनातन्यांकडून व प्रस्थापितांकडून सातत्याने संविधानावर होत असलेले हल्ले अनेक मूळ कायद्यांमध्ये होत असलेले बदल, भांडवली शक्तीचा वाढलेला प्रभाव ह्या अशा परिस्थितीत वर्तमानकाळात लोकशाही पुढील आव्हाने निर्माण झालेली आहेत. प्रस्तुत निबंधात लोकशाही पुढील असलेल्या आव्हानांचा आणि त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधींनी सांगितलेले सप्तदोष, पं. जवाहरलाल नेहरु, राम मनोहर लोहिया ह्यासारख्या विचारवंताचे लोकशाहीप्रती विचार आणि लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी मांडलेले विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी सत्य अहिंसा, करुणा, विवेक, सहिष्णुता, ह्या गुणांच्या आधारे सर्व भारतीय लोकशाहीला टिकवून ठेवतीलच....!

**मुख्य शब्द:** लोकशाही, भारतीय संविधान, कायदेमंडळ, न्यायव्यवस्था, मूल्याधिष्ठीत समाजनिर्मिती, लोकशाही सक्षमीकरण, धार्मिक कट्टरताबवाद, राजकीय ध्रुविकरण, संविधानीक अभिव्यक्ती, संविधानिक संस्था, साधनसूचिता, विज्ञाननिष्ठ्तत्वे, सत्ये, अहिंसा, करुणा, विवेक, निष्पक्ष, निवडणुका, भ्रृष्टाचार मुक्त प्रशासन

**प्रस्तावना:** आज जगातील तीन चर्तुर्थांश राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धती स्विकारलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने सुद्धा लोकशाही शासनपद्धती निवडली. भारतीय लोकशाहीची ७५ वर्षांची वाटचाल झालेली आहे. प्राचीन भारतातील नगर राज्यातील लोकशाही व्यवस्था, वसाहतकालीन आधुनिक लोकशाही ते २१ व्या शतकातील लोकशाहीपर्यंतच्या विकासाचे टप्पे भारतीय लोकशाहीने पूर्ण केलेले आहेत. भारतीय लोकशाहिच्या वाटचालीत अनेक अडथळे व आव्हाने येऊन देखील भारतीय लोकशाही टिकून आहे. ह्याचे श्रेय देशातील सामान्य नागरीकांना, सत्ताधारी, विरोधी पक्ष तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवरांच्या योगदानाला जाते. तरीपण आज भारतीय लोकशाहीच्या वाटचालीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकशाही अधिक मजबुत होईल म्हणुनच प्रस्तुत शोधनिबंधात लोकशाही समोरील आव्हाने ह्यावर चिंतन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारतामध्ये लोकशाही व भारतीय संविधान शतकानुशतके टिकावे अशी भारतीयांची (लोकशाही/संविधान प्रिय) ईच्छा आहे. परंतु अलीकडच्या काही वर्षामध्ये भारतीय लोकशाहीला अनपेक्षितरित्या हादरे बसत आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या भवितव्याविषयी संवेदनशिल व सुजान नागरिकांना चिंता वाटत आहे आणि ही चिंता देशातील घडामोडीकडे पाहिल्यास रास्त वाटते. कारण आज देशामध्ये भिती, संशय व दमनसदृश्य सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण निर्माण झालेले आहे. राष्ट्रीय आणि सामाजिक ऐक्य आणि एकोप्याला इजा पोहोचविणारी वाढती जातीयता आणि धर्मांधता लोकशाहीसाठी धोकादायक आहे. आज असमानता व अन्याय यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याचप्रमाणे राजकारणातील हरवत चाललेला सुसंस्कृतपणा व साधनसुचितेचा अभाव या बाबी चिंता वाढविणाऱ्या आहेत. समाजामध्ये सहिष्णुता समन्वय व संवाद कमी होत आहे. विरोधी (सरकार) मत व्यक्त करणा-यांना शत्रु मानण्याची मानसिकता वाढत आहे. देशातील आधारभूत संस्था (कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायसंस्था, निवडणुक आयोग, सी.बी.आय., ई.डी., अंमलबजावणी संचालनालय दबावाखाली काम करीत असल्यामुळे शासन व प्रशासनातील तटस्थता, सर्व समावेशकता आणि निष्पक्षता संपुष्टात येत आहे. सरकारी यंत्रणेचा हेतू खुलेआम पध्द्तीने वापर करुन विरोधकांची राज्य सरकारे पाडली जात आहेत. धर्म राजकारणापासून दूर असावे असे अपेक्षित असतांना देखील आज धर्माचा शासनामध्ये हस्तक्षेप वाढतांना दिसतो आहे. दारिद्रय, विषमता, अज्ञान, पिळवणूक, बेकारी या सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्याऐवजी लोकांच्या भावनांना उत्तेजीत करुन राजकारण केले जात आहे. सत्ता आणि संपत्ती यांचे मुठभराच्या हातांमध्ये केंद्रिकरण होत आहे.

धर्म ही बाब वैयक्तिक आहे. धर्मसंस्थेने शासकीय व प्रशासकीय धोरणावर प्रभाव टाकता कामा नये. परंतु आज धर्माचा प्रभाव वाढतो आहे. ही बाब संविधानाला अभिप्रेत नाही. बुध्दिजीवी वर्ग आणि शासनकर्ते यांच्यातील संवाद खंडीत होत आहे. समाजातील प्रतिभावंत, प्रज्ञावंत, विचारवंत आणि साहित्यीक शाश्वत मूल्यांचे निर्माते व संवर्धनकर्ते असतात. ते समाज आणि संस्कृतीला आधार देत असतात. मानवी जीवनाचा तोल सांभाळण्याचे ते मोलाचे कार्य करीत असतात. परंतु आज त्यांची उपेक्षा होतांना दिसून येत आहे. एवढेच नाही तर साहित्यीक आणि विचारवंताची हत्या करण्यापर्यंत मजल गेलेली आहे. हे सभ्य् आणि सुसंस्कृत समाजाचे अध:पतनच आहे असे म्हणावे लागेल.

चारित्र्याविना शिक्षण, तत्वविना राजकारण, क्षमाविना संपत्ती, नितिविना व्यापार, विवेकाविना विकास, मानवतेविना विज्ञान आणि त्यागाविना पुजन महात्मा गांधींनी सांगितलेली हे सप्तदोष दिवसेंदिवस समाजामध्ये वाढतांना दिसून येते आहे. ह्यामुळे भारतीय लोकशाही आणि संविधान ह्यांना धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळेच प्रस्तुत शोध निबंध सादर करीत आहे.

**अभ्यासपद्धती:** प्रस्तुत शोध निबंधाकरीता दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतलेला आहे. जसे ग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ.

**उद्दीष्टे:** १) लोकशाहीचा अर्थ आणि स्वरुप समजून घेणे. २) लोकशाहीपुढील आव्हानाचा अभ्यास करणे. ३) लोकशाही मजबूतीकरणासाठी उपाययोजनांचा आढावा घेणे.

**लोकशाही संबंधी मौलिक चिंतन (अर्थ):** “लोकांचे, लोकांकडून, लोकांकरीता चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही” अशी अब्राहम लिंकन ह्या विचारवंतानी अर्थ सांगितला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या केवळ राजकीय शासन म्हणुन केली नाही. तर ती स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वावर केंद्रित जीवनशैली म्हणुन केली आहे. ज्यामध्ये सर्वांसाठी खऱ्या अर्थाने एक माणुस, एक मत, एक मूल्य, साध्यकरण्यासाठी मूलभूत सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन आवश्यक आहे असे प्रखर मत बाबासाहेबांचे आहेत.

“महात्मा फुले” ह्याच्या मते “राष्ट्र हा लोकशाही समाज आहे. राष्ट्राच्या जन्मासाठी नागरी समाजाची वाढ, नागरिकत्वाचा उत्सव आणि उपेक्षितांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात आवश्यक आहे”. महात्मा फुले मानतात की, सर्व स्त्री — पुरुषांनी या पृथ्वीवर एक कुटुंब म्हणुन एकत्र राहावे, प्रमाणिकपणे आणि भेदभाव न करता ते कोणत्याही गाव, प्रांत, देश खंड किंवा धार्मिक श्रद्धा यांचे पालन करतात. निर्मात्याने मनुष्याला स्वतंत्र आणि इतरांप्रमाणे समान अधिकार उपभोगण्यास सक्षम बनवले. निर्मात्याने प्रत्येकाला मानवी हक्क बहाल केले आहेत. त्यामुळे एखादी व्यक्ती किंवा समुह दुसऱ्यावर वर्चस्व गाजवू शकत नाही. या तत्वाचे पालन करणे म्हणजे सदाचारी आचरण करणे होय. सर्व स्त्री-पुरुषांना धार्मिक, राजकीय स्वातंत्र्य दिले आहे. जो दुसऱ्यला कोणत्याही प्रकारची हानी पोहचवत नाही आणि दुसऱ्यांचे हक्क हिरावुन घेत नाही. अशाप्रकारे सहमानवांप्रती प्रामाणिक वर्तन नैतिकतेचे रुप धारण करते. एकंदरीत महात्मा ज्योतिबा फुलेंचे विचार नैतिक लोकशाहीला अभिप्रेत आहेत. म्हणुनच महात्मा ज्योतीबा फुले हे सामाजिक क्रांतीचे जनक तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक लोकशाहीचे प्रणेते आहेत.

लोकशाही पुढील असलेल्या आव्हांनाचा अभ्यास करतांना पं. जवाहरलाल नेहरु ह्यांना अपेक्षीत असलेली लोकशाहीचा विचार करणे गरजेचे आहे. त्यांच्या मते, लोकशाही ही खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी लोकशाही असून, ती केवळ राजकीय व आर्थिक नसते तर लोकशाही ही मनोवस्था असून सर्वांना राजकीय व आर्थिक क्षेत्रात शक्यतो समान संधी मिळणे त्यात अपेक्षीत असते. व्यक्तीला विकासाचे स्वातंत्र्य असून आपल्या क्षमतेचा व पात्रतेचा पुरेपुर फायदा घेण्याचे स्वातंत्र्य त्यात असते. दुसऱ्यांबद्दल व आपल्यांशी न जुळणाऱ्या त्यांच्या मतांबद्दल सहिष्णुता असली पाहिजे. शेवटी राजकीय समस्यांकडे पाहण्याचा लोकशाही हा एक मानसिक दृष्टिकोन असतो. ह्याचाच अर्थ पंडित नेहरु च्या मते, समता, न्याय, व शोषणविरहितता प्राप्त करुन देऊन तिच्या सर्वांगिण विकासासाठी झटणारी शासनप्रणाली म्हणजेच लोकशाही असा अर्थ अभिप्रेत होता. म्हणजेच लोकशाही समाजवाद असा अर्थ अभिप्रेत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कडवे पुरस्कर्ते होते ते लोकशाहीकडे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय ह्या मूल्यधिष्ठीत सामाजनिर्मितीचे साधन म्हणुन पाहतात. बाबासाहेब आंबेडकरांना वंचित व शोषित अशा शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय समाजातील ८० टक्के टक्के लोकांना हक्क मिळुन देण्यासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी लोकशाही हवी होती. म्हणूनच ते म्हणतात, मला शेटजी-भटजींचे राज्य नको असून ८० टक्के टक्के लोकांचे राज्य हवे आहे. ही ८० टक्के टक्के लोक म्हणजे स्त्रिया, इतर मागासवर्गीय, आदिवासी, भटके-विमुक्त, बौद्ध, शिख, ख्रिश्चन आणि मुस्लिम समाजगट ह्या लोकांसाठीची लोकशाही ही खरी लोकशाही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा सांगितलेला अर्थ इतर विचारवंतापेक्षा भिन्न आहे. जसे की,

वाल्टर बेगहोट ह्यांनी आपल्या इंग्लिश संविधान या ग्रंथामध्ये असे म्हणतात की, लोकशाही म्हणजे चर्चेवर आधारलेली शासन संस्था होय. त्याचप्रमाणे अब्राहम लिंकन म्हणतात लोक शाही म्हणजे लोकांचे सरकार, लोकांनी नियुक्त केलेले सरकार आणि लोकासाठी राबवणारे सरकार तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्याख्या अशी आहे. लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जिवनात क्रांतीकारक बदल आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही लोकशाहीची खरी व उच्चतम कसोटी सांगतांना ते लिहतात ज्या शासन पद्धतीमध्ये सत्तारुढ मंडळींना सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात बदल करता येतात आणि असे बदल ग्रहण करतांना जनता रक्तलांच्छित हिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत नाही तेथेच लोकशाही नांदते, असे बाबासाहेबांचे विचार होते.

डॉ. आंबेडकारांच्या लोकशाही संकल्पनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांना मध्यवर्ती स्थान आहे. या मूल्यांना त्यांनी आदर्शतत्वे मानलेली आहेत. "ॲनिलिलेशन ऑफ कास्ट" या ग्रंथात ते म्हणतात "माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारलेला समाज असेल", तसेच माझे सामाजिक तत्वज्ञान निश्चितपणे तीन शब्दांत गुंफले आहेत आणि हे तीन शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव होय. मानवी संबंध व मानवी व्यवहार हे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांवर आधारलेले असावेत आणि ही मूल्ये लोकशाहीचा मूळआधार आहे. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या दृष्ट्रीने ह्या मूल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणे शक्य नाही. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही तिनही मूल्ये एकमेकांवर अवलंबून आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे राज्य होईल. समता, स्वातंत्र्य शून्य असेल तर ती व्यक्तीच्या जीवनातील स्वंयप्रेरणा नष्ट् करील, बंधत्व नसेल तर स्वातंत्र्य व समता यांची वाढ होणार नाही. त्यामुळे त्यांनी लोकशाही संकल्पनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाला सर्वोच्च स्थान दिले आहे. लोकशाही संकल्पनेमध्ये प्रतिनिधीत्वाचा दावा, लोकांचे कल्याण घटनात्मक नैतिकता जबाबदार शासनपद्धती, कायद्याचे राज्य, सामाजिक न्याय आणि लोकांचे सार्वभौमत्व या तत्वांचाही समावेश आहे.

भारताच्या लोकशाही विचार विश्वातील एक द्रष्टा म्हणजे मनोहर लोहिया ह्यांचे विचार सुध्दा लोकशाहीच्या बळकटीसाठी उपयुक्त आहेत. राम नोहर लोहिया हे भारताच्या लोकशाही व्यवस्थेला बळकटी प्राप्त करुन देणारे विचारवंत आहेत. समाजवादी विचारसरणीला भारतात एका चळवळीचे स्वरुप देणाऱ्या आणि त्यास प्रभावीपणे प्रोत्साहित व प्रसारित करणाऱ्या चिंतकामध्ये प्रामुख्याने राम मनोहर लोहिया ह्यांचे नाव घेतले जाते. त्यांच्यावर गांधीवाद व मार्क्सवादाचा प्रभाव होता. झपाट्याने बदलणाऱ्या जगात, जिथे आर्थिक असमानता, सामाजिक भेदभाव आणि केंद्रिकृत सत्तेची आव्हाने कायम आहेत, अशा परिस्थितीत लोहिया यांची विचारधारा अधिक समावेशक आणि सहभागी शासन प्रणालीसाठी रोडमॅप प्रदान करते. लोहिया यांच्या मते सत्तेचे विकेंद्रीकरण प्रदेश आणि समुदायांतील असमानता दूर करण्यात मदत करु शकते. स्थानिक स्वराज्य संरचना मजबूत केल्याने विकासाचे फायदे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचतील. शिवाय ज्या समाजात जात आधारीत भेदभाव आणि लिंग असमानता कायम आहे अशा समाजात लोहिया यांची समाजिक न्यायाची बांधिलकी कायम आहे. त्यांचे आदर्श स्विकारल्याने अधिक समतावादी समाजाचा मार्ग मोकळा होऊ शकतो. जिथे प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि संधी उपलब्ध असतील.

राम मनोहर लोहिया हे हुकूमशाही प्रवृत्तींना विरोध करणारे, विषमतेविरुध्द् सप्तक्रांती करणारे जसे- स्त्री-पुरुष समानता, शरीराच्या रंगावर आधारित असमानतेविरुद्ध, जाती प्रथेविरुद्ध, परदेशी गुलामी विरुद्ध, खाजगी संपत्तीतील विषमतेविरुद्ध, लोकशाही कार्यपद्धतीच्या आग्रहासाठी आणि शस्त्रास्त्रांच्या विरुद्ध आणि सत्याग्रहाकरीता अशाप्रकारे विषमतेचे उच्चाटन करण्यासाठी लोहिया त्यांचे विचार महत्वपूर्ण आहेत. आज आधुनिक प्रशासनाच्या क्लिष्ट गुंत्यामध्ये मार्गक्रमण करत असतांना, लोहियांची दृष्टी आपल्याला समानता, सशक्तीकरण आणि एकता या तत्वावर आधिरित लोकशाहीस पूरक ठरतात. त्यांच्या विचार आणि आदर्शाचा स्विकार केल्याने एक राष्ट्र निर्माण होण्यास मदत होऊन उपेक्षीत लोकांचा आवाज ऐकू येईल आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची तत्वेही वास्तव बनतील. समता, समाजवाद, भाषिक विविधता, जातीविरोधी सक्रियता, विकेंद्रीकरण आणि सामाजिक न्यायासाठी बांधिलकी यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हा भारतीय लोकशाहीसाठी पोषक राहील.

लोकशाहीबाबत विचारवंताचे मूल्यवान विचार पहिले तर असे लक्षात येते की, आजच्या काळात लोकशाही मध्ये असलेली नैतिकता टिकून राहते की नाही? हा प्रश्न निर्माण झाला. लोकशाहीला टिकविण्यासाठी संविधानिक नैतिकता महत्वाची आहे. सर्व पक्षीय स्तरावर संविधानीक नैतिकता पायदळी तुडविल्या जाते आहे असे चित्र दिसून येत आहे.

**लोकशाहीपुढील आव्हाने:** भारतीय राज्यघटनेनी भारतासाठी लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार केलेला

आहे. घटनाकारांनी लोकशाही केवळ शासन व्यवस्थेचा एक प्रकार या अर्थाने न पाहता ती एक जीवन पद्धती आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात (उद्देशीत पत्रिका) तिचे तत्वज्ञान व उद्दिष्ट्ये स्पष्ट् शब्दात व्यक्त केली आहेत. मात्र लोकशाही वरवर पाहता एकसंघ जरी दिसत असली तरी ती आतून पूर्णपणे पोखरली आहे. गल्लीपासुन दिल्ली पर्यंतच्या राजकारणात जनता भरडली जाते. राष्ट्रीय शक्ती वाढविण्याऐवजी राजकारणी स्वत:ची शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारतीय लोकशाहीने आतपर्यंत यशस्वीपणे वाटचाल केली असली तरी तिचा पुढचा मार्ग निर्वघ्न बनला आहे. असा निष्कर्ष् मात्र काढता येत नाही. भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने आहेत ती कोणती ह्याबाबत पुढीलप्रमाणे मत मांडता येतील. १) धार्मिक कट्टरतावाद व जातीयवाद यांचा राजकारणातील वाढता प्रभाव. २) सत्तेच्या राजकारणाला प्राप्त झालेले अवास्तव महत्व. ३) गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना मिळणारे राजकीय संरक्षण. ४) राजकीय नेते व सामाजविघातक तत्वे ह्यांची झालेली हात मिळवणी किंवा राजकारणाचे गुन्हेगारीकरण. ५) समाजात वाढत चाललेली असहिष्णुता. ६) नैतिकमुल्य व राजकारण यांची होत असलेली फारकत. ७) आर्थिक शक्ती (धनशक्ती) राजकारणावर बसत असलेली पकड. ८) देशातील वाढता भ्रष्टाचार. ९) सत्ताप्राप्तीसाठी चाललेल्या तत्वहीन तडजोडी. १०) बुद्धिजीवी वर्गाची वाढती उदासिनता. ११) निवडणूकीत वाढते गैरप्रकार आणि हिंसाचार १२) वाढती सामाजिक व आर्थिक विषमता.

ह्या सर्व आव्हांनाबरोबरच सध्याच्या काळात लोकशाहीसमोर मोठे आव्हान उभे आहेत- जसे की, राजकीय ध्रुवीकरण, फेक न्यूज / पेड न्यूज किंवा चूकीची माहिती, संविधानिक (लोकशाही) संस्थाची दुर्बलात, पैशाला आलेले अवास्तव महत्व, नागरीकांची राजकीय अनास्था, जागतिकीकरणामुळे निर्माण होणारी आव्हाने, अल्पसंख्यांक हक्कांचे संरक्षणाचा प्रश्न, पर्यावरणीय संकटे, भ्रष्टाचार.

समाजात विचारसरणीचे तीव्र विभाजन वाढत आहे. सोशल मिडीयामुळे चुकीची माहिती व व्देषपुर्ण प्रचार वेगाने परसतो. त्यामुळे नागरीकांमध्ये अविश्वास वाढत जात आहे. डिजीटल मिडीयावर खोटी माहिती पसरवुन मतप्रवाह व निवडणुका प्रभावित होत आहेत. त्यामुळे नागरिकांना आपले मत व्यक्त करण्याला मर्यादा येत आहेत. संविधानिक अभिव्यक्ती स्वातंत्र्याला मर्यादा येत आहेत. न्यायसंस्था, निवडणूक आयोग, तपासणा यंत्रणा, आर्थिक संस्था ह्यासारख्या महत्वपूर्ण संविधानिक संस्थावर राजकीय दबाव वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ह्या संस्थांचे स्वातंत्र्य आणि पारदर्शकता धोक्यात येऊ शकते. कारण ह्यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीवरच आघात होतो. निवडणुका महाग होत आहेत. मतदात्यांवर पैशाचा प्रभाव पडला आहे. मत विकत घेतल्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे निवडणुका महागड्या होत असल्याने प्रमाणिक उमेदवार दुय्यम ठरत आहेत. विशेष म्हणजे कॉर्पोरेट फंडिंगमुळे धोरणांवर मोठ्या व्यावसायिक गटांचा प्रभाव पडत आहे. ह्या सर्वांमुळे तरुणांमध्ये/नागरीकांमध्ये राजकारणाबाबत उदासिनता निर्माण होत आहे. तरुण वर्ग राजकारणाकडे आला तरी राजकारण हे केवळ पैसे पद, प्रतिष्ठा कमवण्याचे साधन आहे असा भ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे विशेषत: नागरिकांच्या मुलभुत प्रश्नांकडे लक्ष जात नाही. आर्थिक, शैक्षणिक जातीय असमानता वाढल्याने लोकशाहीचा आधार कमकुवत होत आहे. विशेषकरुन काही शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक असमानता निर्माण झालेली दिसुन येते. ग्रामिण विभागातील तसेच सरकारी शाळा बंद पाडण्याच्या किंवा पडण्याच्या मार्गावर आहेत. लोकांचे शिक्षण घेणे हा मूलभुत अधिकारच जर मिळाला नाही तर सामाजिक आर्थिक समानता कशी निर्माण होईल? हे लोकशाहीसाठी खुप मोठे आव्हान आहे. बुध्दिजीवी वर्गाचा गट निर्णय प्रक्रियेकडून दूर जात आहेत.

देशात बहुराष्ट्रीय कंपन्या व आंतरराष्ट्रीय संस्थाचा प्रभाव वाढत आहे. राष्ट्रीय धोरणांवर बाह्य शक्तींचा दबाव निर्माण होऊ शकतो. त्याचप्रमाणे बहुसंख्यांकाच्या राजकारणात अल्पसंख्याकाचे प्रश्न मागे पडू शकतात. त्यांच्यावर होणारे भेदभाव लोकशाहीच्या समतेच्या तत्वाला धोका निर्माण होतो. हवामान बदल, प्रदुषण, अतिवृष्टी, पाणी टंचाई ही मोठी संकटे आहेत. त्यामुळे लोकशाही सरकारांना शाश्वत (दिर्घकालीन) निर्णय होणे कठीण जाते. सर्वात मोठा धोका जर असेल तर तो म्हणजे प्रत्येक क्षेत्रात वाढते भ्रष्टाचार, त्यामुळे प्रशासनात पादरर्शकतेचा अभाव. त्यामुळे नागरीकांचा विश्वास कमी होत जातो. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता राजकारण हे प्रदुषित होत आहे आणि हे राजकीय प्रदुषण आज लोकशाही टिकवुन ठेवण्याकरीता मोठे आव्हान आहे.

सहिष्णुता आणि समावेशकता या भारतीय संस्कृतीच्या मूलभूत तत्वांना तिलांजली दिली जात आहे. ह्यातुन बहुसंख्यांकवाद आणि घरवापसी सारखा प्रश्न निर्माण झाला आहे. गायीचे मांस खातात या शंकेवरुन दगडाने ठेचून मारण्याचा (लिचिंग) घटना सुध्दा देशात घडल्या. खरेतर सहिष्णुता आणि समावेशकता हे धर्माचे विशेष गुण असतात मात्र हे संस्कार लुप्त होतात की काय ही भिती निर्माण होऊन सामाजिक ध्रुवीकरण होतांना दिसून येते आहे.

- लोकशाहीत संवाद हा महत्वाचा असतो. खरे तर तो लोकशाहीचा प्राणच असतो पण सध्याचे सरकार तर विरोधकांना बोलण्याची संधीच देत नाही. विरोधकांचा आवाज दाबला जात आहे. सभागृहात बोलणे म्हणजे सगळ्या राष्ट्रांशी व नागरीकांशी संवाद साधणे होय. सरकारच्या थोडेही विरोधी बोलले तर त्यांना देशद्रोही ठरविल्या जाते.
- संविधानिक संस्था निवडणुक आयोग, ईडी अमलबजावणी संचालनालय, सी.बी.आय. एन.आय.ए. ह्या संस्था विरोधकांना संपविण्यासाठी दबावाखाली कार्य करतांना दिसून येतात. लोकशाहीचे सक्षमीकरण करणे हे पक्षीय राजकारणाचे उद्दिष्ट्यच संपुष्टात येत आहे. देशात व्देषपुर्ण भाषणे सर्रास होत आहेत. सोशल मिडीयावरही व्देषपुर्ण भाषणे प्रसारित केली जात आहेत. विशिष्ट् कम्युनिटीला टारगेट केले जात आहे.
- लोकशाही शासन हे दोन महत्वाच्या सिध्दांतावर आधारलेले असते जसे कायद्याचे राज्य आणि कायद्यासमोरची समानता ह्या दोन्हीही सिध्दांताची प्रताडना होत असल्याचे आढळुन येते. पक्षांतर हे भारतीय लोकशाहीपुढील आव्हान आहे. सर्वच पक्षाचे कार्यकर्ते पक्ष स्थानांतरीत होतांना दिसून येत आहेत. महाराष्ट्र हे त्यांचे उत्तम उदाहरण आहे असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटना आणि तिच्यावर आधारलेली न्याय व्यवस्था हाच लोकशाहीला टिकवून ठेवणारा आधार आहे. परंतु राज्यकर्त्यातील काही लोकं भारतीय राज्यघटनेची चौकट बदलण्याची भाषा बोलु लागली आहेत हा तर खरोखरच मोठा धोका आहे असे म्हणता येईल.
- न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा शेवटचा आधार असतो. न्यायपालिका कमजोर झाली की लोकशाही कमजोर होते. ह्या न्यायव्यवस्थेला कमजोर करण्याचा प्रयत्न सुरु आहे. न्यायधिशांच्या निवडीसाठी जी प्रक्रिया अवलंब करण्यात येते ही प्रस्थापित सरकारला मान्य नाही. त्यांनी तसा कायदा करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सुप्रीम कोर्टाने तो असंविधानिक ठरवून रद्दबादल केला.
- सतत वाढत जात असलेली बेरोजगारी हे भारतीय लोकशाहीपुढील आव्हान आहे. बेरोजगारी ही आज देशासमोरची सर्वात मोठी व गंभीर समस्या आहे. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इत्यादि संस्थाच्या अभ्यासानुसार आज जगात सर्वात जास्त आर्थिक विषमता भारतात आहे.
- लोकशाहीचा चौथा स्तंभ प्रसारमाध्यमे आहे. प्रसारमाध्यमांचे मालक भांडवलदार व सत्ताधाऱ्यांच्या हातातले खेळणे झालेले दिसुन येत आहे. फेक न्यूज, पेड न्यूज, मोठ्या प्रमाणात होत आहे. अलीकडच्या काळात मुख्यनिर्वाचन आयुक्तांची नेमणुक करतांना सरन्यायाधिशांना डावलुन पंतप्रधान, विरोधी पक्ष नेते व इतर केंद्रीय मंत्री यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे न्यायव्यवस्थेचे प्रतिनिधीत्व राहिले नाही. लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकण आवश्यक आहे. परंतु सत्ता ही एककेंद्री होतांना दिसून येत आहे. त्यामुळे हुकुमशाहींकडे (निरंकुश सत्ता) वाटचाल आहे काय? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तत्वहीन राजकारण सुरु झाले आहे.

अशा प्रकारे भारतीय लोकशाहीसमोर राजकीय पक्ष आणि राजकीय नेते यांची विधिनिषेध शून्यवृत्ती, सत्तेच्या राजकारणाला प्राप्त झालेले आवास्तव महत्व, गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना मिळत असलेले राजकीय संरक्षण, भांडवलदारांचा वाढता प्रभाव, भारतीय जनमाणसांमध्ये वाढत असलेली असहिष्णुता, बुध्दीजीवी वर्गाची राजकीय उदासिनता पायाभूत शाश्वत विकासाठी शिक्षण, शेती, आरोग्य, रोजगार, ग्रामिण विकास ह्या प्रश्नांकडे होत असणारे दुर्लक्ष ही सर्व आव्हाने उभी आहेत.

**लोकशाही मजबूतीकरणासाठी उपाययोजना:** प्रदुषण प्रदुषीत झाले तर उपाययोजना करता येईल. परंतु लोकशाही चालवणारे राजकीय शक्तीच जर प्रदुषित झाली तर उपाययोजना कशी व कुणी करायची? हा प्रश्नच आहे. अशीच काही परिस्थिती देशात निर्माण झालेली दिसुन येते त्यासाठी कठोर उपाययोजनांची गरज आहे. देशात राजकीय, सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे. लोकशाही बाबत लोकांच्या मनात जागृकता व आदर निर्माण करणे. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे. धर्माचा राजकीय वापर न करता धर्म ही व्यक्तीगत बाबत मानून सर्व धर्मियांमध्ये सर्वधर्मसमभाव, धर्म सहिष्णुता वाढविली पाहिजे. भारतीय संविधानातील मूल्ये, तत्वे, प्रत्यक्षात अंमलात आणली पाहिजे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, व न्यायमंडळ यांनी सत्ता संतुलन सांभाळुन लोकशाही तत्वे व मूलभूत अधिकार ह्यांचे संरक्षण केले पाहिजे. प्रसार माध्यमांनी आपले मूलतत्व तटस्थता जपून खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपले प्रमाणिकपणे भूमिका करायला पहिजे. शेती क्षेत्रातील विकासाच्या योजना राबवून शेती मालाला पूरक असे हमीभाव, शेतीपूरक उद्योगांना चालणा देणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे देशाची शिक्षण व्यवस्था वेद, उपनिषदे पुराने इत्यादिकडे घेऊन जाण्याऐवजी ती आधुनिक मानवी मुल्य व रोजगार निर्मितीस पुरक असे वातावरण/आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करणे. विवेकी, सुधारणावादी, विज्ञाननिष्ठ् तत्वे समाजात रुजवली पाहिजे. विरोधासाठी

विरोध न करता सत्य, योग्य, समाज हिताची भूमिका घेण्याची मानसिकता सर्वच राजकीय पक्षांनी स्विकारली पाहिजे. घटनात्मक संस्था, प्रशासकीय संस्था यांचा वापर योग्य त्या परिस्थितीत करुन त्यांची विश्वासार्हता जपली पाहिजे. राजकीय पक्ष, राजकीय नेते आणि सामान्य लोकांनाही सहिष्णुता जपली पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि चांगुलपणा, प्रतिष्ठा, वैविध्य, सर्वसमावेशिकता या मानवी मूल्यांवर आधारित वर्तन/आचरण असले पाहिजे.

अशा तऱ्हेने लोकशाहीची वाटचाल समृध्दपणे होण्यासाठी व आव्हांनाचा सामान करण्यासाठी उपाययोजनांची/तरतुदींची गरज असते. कारण लोकशाही केवळ शासनपद्धती नसून ती एक जीवनमूल्यांची प्रणाली आहे. लोकशाही टिकून राहण्यासाठी नागरिकांचा सहभाग, जबाबदार नेतृत्व, पारदर्शक प्रशासन आणि न्यायिक स्वायत्तता अत्यंत महत्वाची असते. त्यासाठी शाळा-महाविद्यालयामध्ये नागरी शिक्षण, मतदार जनजागृती आणि सामाजिक समरसतेचे धडे दिले पाहिजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक व्यवस्था लोकशाहीचा कणा आहे. पैशाचे राजकारण रोखणे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांवर निर्बंध आणणे आणि निवडणूक आयोगाला अधिक अधिकार देणे आवश्यक आहे. शासनव्यवस्था उत्तरदायी आणि लोकाभिमुख असावी. आर. टी. आय., सोशल ऑडिट, ई-गव्हर्नर, सार्वजनिक अहवाल प्रणाली यामुळे प्रशासनात पादरर्शता निर्माण होते. न्यायव्यवस्थेची स्वायत्तता टिकून ठेवणे गरजेचे आहे. याशिवाय मुक्त आणि जबाबदार माध्यमे, सक्रिय नागरी समाज, सामाजिक, आर्थिक समता, डिजीटल साक्षरता तसेच भ्रष्टाचार विरोधी सक्षम संस्था या सर्व घटकांमुळे लोकशाही अधिक मजबुत बनते. अशा प्रयत्नांमुळे लोकशाही केवळ संरक्षित न राहता ती अधिक समावेशक, न्याय आणि सशक्त बनते.

**समारोप:** भारताला संविधानिक लोकशाहीचा प्रवास सुरु करुन ७५ वार्षाहुन अधिक वर्ष होत आहेत. या प्रवासात अनेक अडचणी सोबत लोकशाही पुढे अनेक आव्हानेही आहेत. गेल्या दशकभरात लोकशाही संस्था व त्यांच्यासाठी उत्तरदायित्वांसाठी जबाबदार असलेल्या यंत्रणा हेतूपुर्वक कमकुवत करण्याचा प्रयत्न होतांना दिसून येते आहे. देशात व्देषमुक्त संस्कृती जाणीवपूर्वक जोपासली जात आहे. सत्तेसाठी वाट्टेल ते ही मानसिकता रुजली जात आहे. हे लोकशाही पुढील आव्हान आहे. लोकशाही केवळ मतदानावर आधारलेली नसून ती सहभाग, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर उभी असते. नागरिकांची जाणीवपूर्वक भूमिका, निष्पक्ष निवडणुका, स्वायत्त, न्यायव्यवस्था, जबाबदार माध्यमे आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन या घटकांमुळे लोकशाहीची मुळे अधिक दृढ होतात. सामाजिक, आर्थिक समता, सहिष्णुता आणि लोकसहभाग ह्यांना बळ देऊनच लोकशाही अधिक बळकत बनू शकते. म्हणूनच लोकशाही मजबुती ही सरकार, नागरीक आणि नागरी समाज यांच्या संयुक्त व सततच्या प्रयत्नांमधूनच शक्य होते.

आजपर्यंतच्या आव्हांनाचा सामना यशस्वीपणे करत आलेली आहे. याहीपुढे यशस्वीपणे वाटचाल करेल. कारण, सत्य, अहिंसा, करुणा, दयाभाव, सहिष्णुता, सहनशिलता, विवेक हे गुण भारतीयांमध्ये आहेत.

**संदर्भ:**


१) कुंभार, नागोराव, (२०२४), विचार शलाका – भारतीय लोकशाही आव्हाने व भविष्य, नागोराव लक्ष्मणराव कुंभार.

२) खोब्रागडे, ई. झेड (२०२४),विवेकनामा (संविधान अमृतमहोत्सव विशेषांक)

३) कुल्लरवार, संपदा, एस (२०१९), भारतीय लोकशाही समोरील आव्हाने (सोशन इश्युज अॅन्ड प्राब्लेम्स)

४) https//www.maxmaharashtra.com

५) http//vivekresearchjournal.org.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई यांनी विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान

**डॉ. प्रेरणा दिलीप दीक्षित** सहायक प्राध्यापक(CHB), समाजशास्त्र विभाग, वैद्यनाथ महाविद्यालय,परळी वैजनाथ

**गोषवारा:** आधुनिक कालखंडाच्या १९ ते २०व्या शतकात स्त्री समाजसुधारकांनी विधवा सुधारणा, स्त्री हक्क, शिक्षण तसेच सामाजिक जागृतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. सदरील संशोधनात सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई यांनी विधवा कल्याणासाठी केलेल्या कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकण्यात येणार आहे. त्यासाठी द्वितीय स्रोतांचा वापर होणार आहे. तत्कालीन परिस्थितीत विधवांचे जीवन नरकप्राय होते. त्यांच्यावर अनेक जाचक बंधने लादली जात. त्यात भर पुरुषसत्ताक पद्धतीने लादून दिलेल्या स्त्री-पुरुष असमानतेची होती. अशा अनेक समस्यातून विधवांची सोडवणूक करण्यासाठी, त्यांच्या हक्कासाठी वरील स्त्री सुधारकांनी काय कार्य केले? कसा संघर्ष केला? वैचारिक क्रांती कशी घडवून आणली? हे अभ्यासण्याच्या उद्देशाने सदरील संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर महत्वपूर्ण बाब अशी, की तत्कालीन परिस्थितीत समाजाचा विरोध पत्करत, स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, बालहत्या, जातीभेद विरोध तसेच पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणास समर्थन इत्यादीसाठी यांनी लढा दिला. आज एकविसाव्या शतकात मात्र अपेक्षित सुधारणा दिसत नाही. कारण आजही पुनर्विवाहाला, शिक्षणाला मान्यता दिली जात नाही. आजही बालविवाह होतो. पवित्र अपवित्र बंधनात आजही विधवांना बांधले जाते. ही परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. विधवांनाही त्यांचे हक्क मिळणे गरजेचे आहे. खऱ्या अर्थाने विधवांचे कल्याण करण्यासाठी त्यांची दयनीय परिस्थिती सुधारण्यासाठी वरील तिन्ही स्त्री सुधारकांनी विधवा कल्याणासाठी केलेले कार्य समाजासमोर आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथे संशोधिकेने केलेला आहे. जेणेकरून त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आजच्या विधवा महिलांच्या कल्याणासाठी, विकासासाठी योग्य पाऊल उचलण्यास मदत होईल.

**मुख्य शब्द:** विधवा, कल्याण, योगदान

**प्रस्तावना:** वी म्हणजे अभाव असणे आणि धवा म्हणजे माणूस किंवा पुरुष नवरा नसणे/मृत पावणे. थोडक्यात जिचा पती मरण पावला अशी महिला विधवा म्हणून ओळखली जाते. जिथे कधी स्त्रीला देवी मानल्या जायचे तेथे आधुनिक कालखंडात विधवांना जिवंत जाळल्या जात होते. अन्यथा केशवपन करून विद्रूप केले जात असत. अत्यंत अमानवीय प्रथा त्यांच्यावर लादून त्यांचे जीवन नरकप्राय केले जात असत. अशा वाईट प्रथांविरोधात अनेक समाजसुधारकांनी कार्य केले. त्यात प्रामुख्याने राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, ज्योतिबा फुले, बाबा पद्मनजी, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. समावेश होतो. यापैकी सदरील संशोधनात सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई या तीन स्त्री सुधारकांनी विधवा कल्यानासाठी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करण्यात आलेला आहे

जिथे शिक्षणाचा अधिकार नव्हता त्या समाजात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी शेण, माती झेलत मुलींना शिकवले. विधवांना आधार दिला. अनाथ मुलांच्या त्या आई झाल्या. तर तत्कालीन समाजात आपल्या परखड भाषेतून ताराबाई शिंदे यांनी विधवांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला. जातीभेद, स्त्री-पुरुष भेदाचा त्यांनी विरोध केला. पंडिता रमाबाई ज्यांचा स्वतःचा परिवार उद्ध्वस्त झाला होता. तरी त्यांनी समाजातील अनाथ मुले-मुली, विधवा यांच्या सुखासाठी आयुष्यभर झटल्या. कधी लिखाण, भाष्य तर कधी प्रत्यक्ष कार्यातून सुधारणा केली. तत्कालीन परिस्थितीत असे कार्य जीवावर बेतल्यासारखे होते. हे माहित असून देखिल कोणत्याच संकटांची पर्वा न करता या प्राणपणाने आयुष्यभर स्त्रियांसाठी, सबंध सामाजिक जागृतीसाठी झटत राहिल्या. यातूनच त्यांनी अनेक प्रथांचा नायनाट केला. ज्यामुळे आजच्या विधवा महिलांना जाचक बंधनापासून मुक्ती मिळाली. तेव्हापासून आजपर्यंत आणखी काही अनेक बदल अपेक्षित होते. परंतु असे झाले नाही. जातीभेद, स्त्री-पुरुष असमानता, पुनर्विवाह बंदी, बालविवाह, पवित्र-अपवित्र इ. मध्ये समाज आजही अडकलेला दिसून येतो. कारण समाजाने या सुधारकांच्या विचारांचा, कार्याचा पूर्णपणे जीवनात अवलंब केलाच नाही. केला असता, तर कागदावरच कायदा प्रत्यक्षात अवलंबण्यात आला असता. आजची विधवा तुलनेत आणखी स्वतंत्र आयुष्य जगू शकली असती. या सर्व बाबींचा विचार करूनच संशोधिकेने या विषयाची निवड केली आहे. जेणे करून प्रस्तुत अभ्यासातून वरील तीनही स्त्री सुधारकांच्या विचारांची, कार्याची ओळख या समाजाला पुन्हा नव्याने होईल. तसेच त्यांचे हे बहुमोल कार्य आजच्या समाजाला विधवा महिलांचे कल्याण आणि विकास करण्यात

नक्कीच प्रेरणादायी ठरेल. या दृष्टीने सदरील संशोधन कार्य महत्त्वाचे ठरते.

**संशोधनाचा उद्देश:** १) सावित्रीबाई फुले यांनी विधवांसाठी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणे. २) ताराबाई शिंदे यांनी विधवा हक्कासाठी घडवून आणलेली वैचारिक क्रांती अभ्यासणे. ३) पंडिता रमाबाईंनी विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान लक्षात घेणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन विषय शास्त्रीय पद्धतीने हाताळण्यासाठी संशोधिकेने पूर्णतः दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर केलेला आहे. कारण हे संशोधन तत्कालीन परिस्थितीत सुधारकांनी विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान अभ्यासण्याच्या दृष्टीने करण्यात आलेले आहे. त्यामुळे यात प्रामुख्याने संशोधन उद्देशाला अनुसरून ग्रंथ, पुस्तके, शासकीय अहवाल, वेबसाइट्स, वर्तमानपत्रे, मासिक, नियतकालिका, विश्वकोश अशा वस्तुनिष्ठ स्त्रोतांचा वापर केलेला आहे. संकलित तथ्यांची अचूक पडताळणी करूनच संशोधन कार्य पूर्ण केले आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे.

**संशोधनात वापरण्यात आलेल्या प्रमुख संकल्पना:** जिचा पती मरण पावला आणि त्यानंतर जिने पुर्नविवाह केला नाही अशा महिलेस **विधवा** म्हटले जाते. जी उपेक्षित आहे. परंपरांमध्ये जखडलेल्या तत्कालीन विधवा त्यांच्या हितासाठी सावित्रीबाई, ताराबाई आणि पंडिता रमाबाई यांनी, बालविवाह, सतीप्रथा, केशवपण, पुर्नविवाह बंदी बालहत्या या विरुद्ध लढा दिला. तसेच त्यांना आर्थिक सहाय्य, निवासस्थान, शिक्षणाच्या सोयी सुविधा निर्माण केल्या. हे अभ्यासण्याच्या हेतूने येथे कल्याण हा शब्द वापरलेला आहे. विधवांच्या अशा प्रश्नांच्या निराकरणासाठी आपले विचार, लेखन, भाष्य, कृती इत्यादीच्या माध्यमातून समाजात बदल घडवून आणण्यासाठी जे कार्य केले, जी भूमिका पार पाडली ते स्पष्ट करण्याच्या हेतूने येथे योगदान शब्दप्रयोग केलेला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा:** प्रत्येक संशोधनाला काही मर्यादा असतात. त्याप्रमाणे या संशोधनालाही काही मर्यादा आहेत. या संशोधनात फक्त सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई या तीनच स्त्री सुधारकांनी एकमेव विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान अभ्यासले आहे. इतर सुधारकांचा किंवा यांच्या इतर सामाजिक कार्याचा येथे उल्लेख केलेला नाही. सदरील संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेता यात विधवा महिलांसाठी केलेल्या कार्यावर जास्त भर देण्यात आलेला आहे.

**स्त्री सुधारकांनी विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान:** सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई यांनी तत्कालीन परिस्थितीत विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान सदरील शोधनिबंधात अभ्यासले आहे. तसेच त्यांचा अल्प परिचय आणि त्यांनी विधवा संबंधित केलेल्या कार्याची पुढील प्रमाणे मांडणी करण्यात आलेली आहे.

**सावित्रीबाई फुले: जीवन परिचय:** भारतातील स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना ओळखले जाते. सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्याच्या नायगाव या गावी ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडील खंडोजी नेवसे पाटील हे गावचे पाटील होते. सावित्रीबाई ९ वर्षाच्या असताना त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. सावित्रीबाई ज्या विधवांचा सांभाळ करत, बाळंतपण करत त्यातीलच एका विधवा महिलेचा मुलगा त्यांनी दत्तक घेऊन त्याचे यशवंत, असे नामकरण केले होते. विधवेचा मुलगा असल्यामुळे कोणीच त्याला मुलगी द्यायला तयार नव्हते. शेवटी ज्ञानोबा ससाने यांची मुलगी राधा हिच्याशी त्यांचा विवाह झाला. हाच महाराष्ट्रातील १८८९ चा पहिला आंतरजातीय विवाह होता. पुढे एक वर्षांनी २८/११/१८९० रोजी ज्योतिबांचा मृत्यू झाला आणि सावित्रीबाई विधवा झाल्या. यावेळी समाजाने पुन्हा संपूर्ण विधी करण्यासाठी दत्तक पुत्राला नाकारले होते. अशा परिस्थितीत विधवा सावित्रीबाईंनी स्वतःच्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला होता.

**विधवांसाठी केलेले कार्य:** आधुनिक युगातील पहिल्या महिला सुधारक म्हणून ओळख असणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. ज्यांनी आपल्या पतीच्या (महात्मा फुले) समाजकार्यात प्रत्येक पावलावर निष्ठेने साथ दिली. फुलेंच्या पत्नी एवढीच त्यांची ओळख नसून स्त्रीसुधारणा या सारखे महान कार्य करून त्यांनी इतिहासात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्याचे दिसून येते. परंतु हे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे, की त्यांना यासाठी प्रेरणा ज्योतिबांकडून मिळाली. सावित्रीबाई मधील हुशारी ज्योतिबांनी हेरली होती, ओळखली होती. म्हणून त्यांनी प्रथम त्यांना स्वतः शिकवले. त्यानंतर सावित्रीबाईंनी इतर स्त्रियांना ज्ञान देण्याचे कार्य केले. परंतु या कार्यासाठी त्यांना अगणित त्रास सहन करावा लागला. शेण, माती, दगड, चिखल तर त्यांच्यावर फेकण्यात आलेच; परंतु त्यांना अब्रू लुटण्याच्या धमक्या सुद्धा येत होत्या. नीडर सावित्रीबाई मात्र मागे सरकल्या नाही. ज्ञानदानाची ज्योत त्यांनी तेवतच ठेवली. शेवटी त्यांना स्वतःचे घर सोडावे लागले; पण समाजकार्य त्यांनी सोडले नाही. त्यांच्या या हिमतीमुळे आज सबंध देशातील मुली स्वइच्छेने शिक्षण घेत आहेत. म्हणूनच त्यांना पहिली शिक्षिका होण्याचा मान मिळाला. जो अभिमानास्पद आहे. भारत देशाची हीच खरी शान आहे.

तत्कालीन समाजात पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांवर फार जुलूम होत असत. त्यांना ज्ञानापासून वंचित ठेवल्या जात. बालविवाह करून संपूर्ण आयुष्य विधवा अवस्थेत जगण्यास भाग पाडून, नको त्या प्रथा त्यांच्यावर लादल्या जात. ज्यात विधवा होरपळून जात असे. त्यांचे दु:ख सावित्रीबाईसाठी असहनीय होते. यातून त्यांनी या विधवांसाठी पुढील आयुष्यात, असे कार्य केले जे इतिहासात कोणीच केले नाही आणि भविष्यातही कोणी करणार नाही. त्यात बालविवाह, पुनर्विवाह बंदी, केशवपन, सतीप्रथा आणि विधवांवर लादले जाणारे जाचक व असहनीय नियम याचा त्यांनी विरोध केला. या सर्वातून विधवांची सुटका करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. तत्कालीन हिंदू समाजामध्ये बालविवाहाची प्रथा रूढ होती. कमी वयात विवाह झाल्याने मुली तारुण्यातच विधवा होत असत. त्यातील काही वासनेला बळी पडत तर कधी त्यांच्यावर व्यभिचार घडल्याने त्या महिला गरोदर राहत. यातून बचावण्यासाठी काही आत्महत्या करत, तर काही विधवा गर्भपात करत. हे प्रमाण यावेळी चांगलेच वाढले होते. जे कमी करणे अत्यावश्यक होते. 'विधवांची सुटका करण्यासाठी आणि निष्पाप बालकांची हत्या थांबवण्यासाठी फुले दांपत्यांनी २८ जानेवारी १८६३ साली 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केली. त्यासंबंधी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात असे म्हटले होते की, "विधवांनो येथे येऊन गुप्तपणाने बाळंत व्हा. तुम्ही तुमचे मूल न्यावे किंवा येथे ठेवावे तुमच्या मर्जीवर. येथे ठेवलेल्या मुलाची काळजी हा आश्रम घेईल". तत्कालीन परिस्थितीत या प्रकारचे जाहीर पत्र काढणे म्हणजे क्रांतिकारक, स्फोटक व समाज हादरवून सोडणारे धाडसी कृत्य होते.' नको असलेले मातृत्व प्राप्त झालेल्या अशा विधवांचा सांभाळ सावित्रीबाई करत होत्या. या महान कार्यामुळे विधवांना आधार तर मिळालाच सोबत निष्पाप बालकांची जन्माआधीच होणाऱ्या हत्येला चांगलाच आळा बसला. अशा अनेक महान कार्यामुळे त्यांना क्रांतीज्योती म्हणून ओळखले जाते. सावित्रीबाईंना दुर्दैवाने मातृत्व सौख्य लाभले नव्हते. त्या कधीच आई बनू शकत नव्हत्या. परंतु समाजातील अनाथ खितपत पडलेल्या अनेक विधवांचे बाळंतपण करण्याचे भाग्य त्यांना मिळाले. या विधवांच्या पोटी जन्माला आलेल्या बालकांची माता होण्याचे भाग्य त्यांच्या पदरी पडले. लेकीचे बाळंतपण समजून मोठ्या आनंदाने, ममतेने हे कार्य त्यांनी पूर्ण केले. फुले दाम्पत्यांनी याच बालहत्या प्रतिबंधक गृहातील एका विधवेचा मुलगा दत्तक घेतला. त्याला लहानाचे मोठे केले आणि फुलेंचा वारसा म्हणून घोषित केले. स्वतःच्या मुलाप्रमाणे सावित्रीबाईंनी त्याला प्रेम दिले. अतिशय संवेदनशील आणि दयाळू, असे त्याचे व्यक्तिमत्व होते. सावित्रीबाई बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांचे पालनपोषण करीत. त्यांना स्वतःला अपत्य नसल्याने त्या माऊलीने आपल्या उदार स्वभावास अनुसरून त्या नवजात लेकरांचे अत्यंत प्रेमाने आणि वात्सल्याने संगोपन करत. असे हे सौभाग्याचे कार्य करताना सावित्रीबाई खूप आनंदी व्हायच्या. म्हणून तर त्या अनेक अनाथ लेकरांच्या राष्ट्रमाता ठरल्या. अशा कार्याला आज पर्यंतच्या इतिहासात कसली तोडच नाही.

पतीच्या निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले. कित्येक विधवांचे पुनर्विवाह करून त्यांना नवीन जीवन देऊन जगण्याची संधी दिली. आत्महत्या करणाऱ्या कित्येक विधवांना आधार दिला. त्यांच्या या कार्याची महत्ता अवर्णनीय आहे. विधवा सावित्रीबाईंनी आपले स्त्री सुधारणेचे कार्य कुठल्याही सरकारी मदतीशिवाय अविरत चालूच ठेवले होते. १८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ पसरली. प्लेग पीडितांची सेवा करताना सावित्रीबाईलाही प्लेग झाला. यातच त्यांचा १० मार्च १८९७ ला मृत्यू झाला. सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिवस 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो. एक विधवा समाजाचा विरोध पत्करत समाजातील अनेक जाती धर्माच्या विधवांचा व त्यांच्या अपत्यांचा सांभाळ करत होती. तेथे कसल्याच प्रकारची असमानता किंवा भेदभाव नव्हता. तेथे फक्त माणुसकीच्या नात्याने रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त प्रेम दिले जात होते. जे समाजासाठी प्रेरणादायी ठरले. पुढील काळात अनेक समाजसुधारकांनी, असे बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन करून फुले दाम्पत्यांच्या कार्याला गती प्रदान केल्याचे दिसते.

**ताराबाई शिंदे: जीवन परिचय:** देशातील पहिले आधुनिक स्त्रीवादी पुस्तक लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे सर्वत्र परिचित आहेत. यांचा जन्म १८५० मध्ये महाराष्ट्रातील बुलढाणा येथे झाला. तिथेच त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. वडील बापूजी हरी शिंदे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. महसूल कार्यालयात मुख्य कारकून म्हणून ते काम करत होते. ताराबाई यांचा विवाह झाला; पण त्यांचे नाते फार काळ टिकले नाही. त्यानंतर त्या शेतीचा कारभार, कोर्टातील कामे करत. स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ त्यांनी १८८२ मध्ये लिहिला. ५० पृष्ठाच्या या पुस्तकांमधून ताराबाई शिंदे यांनी पुरुषसत्ताक पद्धतीला चांगला चपराक दिल्याचे लक्षात येते. विधवा हक्कांसाठी त्यांनी यातून आवाज उठवला. जो इतर लेखकांना थक्क करत होता. या ग्रंथातील त्यांच्या परखड लिखाणामुळे त्यांचे व्यक्तिमत्व जगाला दिसून आले. स्त्रियांवर असलेल्या अन्यायावर प्रश्नचिन्ह म्हणजे त्यांचे स्त्री-पुरुष तुलना पुस्तक होय.

**विधवा हक्कासाठी घडवून आणलेली वैचारिक क्रांती:** आपली दृष्टी अतिशय सूक्ष्म ठेवत उघड डोळ्यांनी

समाजाकडे पाहणाऱ्या ताराबाईंनी विधवांच्या दयनीय अवस्थेचे कारण 'अज्ञान' आहे, असे सांगितले होते. केशवपन केले व पुनर्विवाह केला नाही की वासना निर्माण होत नाही, असे नसून उलट पुनर्विवाहामुळे स्त्रियांच्या आयुष्यात दुःखाची निर्मिती होत नाही. ही वाईट चाल बंद झाल्याशिवाय समाज सुधारणा होणार नाही, असे त्यांचे मत होते. ताराबाईंचे वडील केशवपन, बालविवाह, पुनर्विवाह बंदी या विरोधात कार्य करत होते. इतकेच नाही तर त्यांनी या प्रथेविरोधात इंग्रज सरकारने कायदा काढावा. अशी मागणी देखील केली होती. मात्र ताराबाई विधवा झाल्यास त्यांचा पुनर्विवाह न करता त्यांना विधवेचे जीवन जगण्यास भाग पाडले. इतिहासात, असे बरेच उदाहरणे आहेत. ज्यात समाजसुधारकांनाच नको त्या प्रथांचा आपल्या आयुष्यात जबरदस्त अवलंब करावा लागला. अशी दयनीय परिस्थिती तत्कालीन समाजात होती. यात सुधारणा घडवणे फार कठीण कार्य होते.

विधवा महिलांवर पुरुषांनी केलेल्या अत्याचाराचे वर्णन करताना ताराबाई पुरुषसत्ताक पद्धतीचा विरोध करत समाजातील पुरुषांना जाब विचारताना म्हणतात, "अरे तुम्ही म्हणता ना, की आपल्या जीवावरून दुसऱ्याच्या जीव जाणावा. मग तेथे तुमचा जीव कोठे जातो? तुमचा जीव जसा तुम्हाला प्यारा आहे, तसा स्त्रियांचा त्यांना नसेल काय? स्त्रिया दुसऱ्या मातीच्या, दगडाच्या नाहीत तर लोखंडाच्या बुकणीच्या केले असतील. तुम्ही व तुमचा जीव हे अगदी गाळीव सोने. स्त्रिया काय अगदी यकश्चित प्राणी ढेकूण नाही तर पिसूं, असे तुम्हाला वाटते. हे तुमचे अनुभवाप्रमाणे अगदी बरोबर आहे. कसे? जर म्हणाल तर पतीराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे या बाईसाहेबांचे हाल कुत्रे खात नाहीत. त्यांच्या कपाळी मग काय? माथ्यावरील एकदा सर्व कुरळे केसावर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अहंकार गेले. सुंदरपण गेले. थोडक्यात तिला सर्व तऱ्हेने उघडी करून देशोधडी केल्याप्रमाणे नागवून सांदीचे खापर करावयाचे. तिला कोठे लग्नकार्यात, समारंभात जेथे काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी. ती बंदी का? तर तिचा नवरा मेला. ती अभागी, करंट्या कपाळाची तिचे तोंड पाहू नये. अपशकुन होतो. मग ही विशेषणे तिला! अरे... पण तिचा पती मेला नाही कोण म्हणतो? पण तो तिने का मारिला? देवाजवळ, "या नवऱ्याला देवा तुम्ही लवकर न्या हो" असा तिने अर्ज का केला होता? कदाचित 'या स्वारीला देवा तू लवकर ने, मला याच्या जाचातून सोडीव' असेही देवाजवळ एक वेळ करुणा भाकील. पण हे राजश्री यमनगरीत गेल्यावर यांचे पाठीमागे आपली कशी दुर्दशा होईल? या धास्तीने तरी ती अशी प्रार्थना करणार नाही... त्याची आयुष्य मर्यादा संपली, बाजार झाला. तो आपले बरे वाईटाचे घेणे देणे करून चालता झाला. याचा दोष त्याचे बायकोकडे कशाकरिता?" असा प्रश्न करून ताराबाई विधवांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराची चीड व्यक्त करतात.

ताराबाईच्या या लिखाणात "सांदीचे खापर असा उल्लेख त्यांनी केला आहे. या शब्दाविषयी इंद्रजित भालेराव यांनी आपल्या लिखाणातून ताराबाईच्या मनातील विधवांविषयीची गहनता किंवा वेदना व्यक्त करताना लिहितात की, सांदीचे खापर याचा अर्थ फार मोठा आहे. स्त्रियांच्या आयुष्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या दोन प्रतिमाच आहेत. स्त्रीचे जगणे म्हणजे चुलीत जळणारी धिपली किंवा सांदीचे खापर. स्त्रियांच्या वाट्याला एक तर चुलीतल्या धिपलीसारखे जळत राहणे. नाहीतर सांदीच्या खापरासारखे उपेक्षित राहणे. "सांदीचे खापर" म्हणजे फुटलेल्या गाडग्याच्या बुडाचा मोठा तुकडा, ज्याचा उपयोग मुलांची किंवा म्हाताऱ्या माणसांची विष्ठा घराबाहेर नेऊन टाकण्यासाठी केला जातो. तेव्हाच त्याची आठवण होते. जेव्हा घाण नसते तेव्हा त्या खापराला पाहून घाणीची आठवण होऊ नये म्हणून ते सांदी कोपऱ्यात अशा ठिकाणी ठेवले जाते, की कुणाच्या सहसा नजरेला पडू नये. शुभप्रसंगी किंवा पाहुणे आले असताना विशेष काळजी घेतली जाते." यापेक्षा विधवांचे जीवन वेगळे काही नसते. भालेरावांनी ताराबाईच्या सांदीच्या खापरविषयी या पद्धतीने आपले मत व्यक्त करून एकंदरीत त्यांच्या मताला सहमती देऊन आपल्या लिखाणातून त्यांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले आहे. लेखकाने ताराबाईची प्रेरणा घेऊन एक प्रकारे आपल्या या लिखाणातून वैचारिक क्रांती करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या पद्धतीने ताराबाईंनी केलेला दिसतो. त्यांनी कधी आपल्या लेखणीला शस्त्र बनवले, तर कधी प्रत्यक्षात संकटांना भिडल्या. कधी कायद्याने वचक बसवला. स्वतः समाजासमोर आदर्श बनल्या. यातून समाजसुधारणा घडवून आणली. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाद्वारे आपले विचार समाजापर्यंत पोहचवून जनजागृती केली. तत्कालीन समाजात एका पुस्तकाच्या माध्यमातून अतिशय निर्भयपणे पुरुषसत्ताक पद्धतीचा विरोध करण्याची हिंमत ताराबाईंमध्येच होती. 'त्यांच्या स्त्री-पुरुष तुलना या पुस्तकाची दखल महात्मा फुले यांनी त्यांच्या 'सत्सार' दुसऱ्या क्रमांकाच्या अंकात घेतली आहे.' ताराबाईं बालविवाहाचा विरोध करताना आपल्या या पुस्तकात लिहतात की, "कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा अकरा वर्षाच्या मुली ऐशी नव्वद वर्षाच्या श्रीमंत म्हाताऱ्यास रुपयांची थैली घेऊन व त्यांच्या श्रीमंतीवर नजर देऊन, "नवरा मेला तरी चिंता नाही, इला पैशाला काही कमी नाही ना ? दोन दिवस खाईल, पिईल, घेईल,

नेसल एक नवरा नसला तर काय चिंता आहे?" असे म्हणून वाघाला जशी बकरी द्यावी त्याप्रमाणे बेधडक देतात. अरे, पण जे खरे सुख खरी ममता, ज्या लेण्या नेसण्याने ज्याला आनंद होतो, जो तिचे कौतुक करणारा तिला प्राणापेक्षाही चाहणारा तो तर गेला. मग तिला हे जग अरण्यासारखे वाटणार. मग तिला हे कोरडे सोहळे कशाला रे? पूर्वी सती जात. ते बरे होते. एकदाचे त्यांचेबरोबर आपली ही राख केली म्हणजे सरले, या जगात बायकांवर जसा नवरा प्रीती करील तशी आई वेगळी करुन कोणी करणार नाही. हे अगदी खास, पण जिला ते दोन्ही अंतर देतात. तिने मग कोणाच्या बळावर हे तरुणपणाचे प्रज्वलीत इंगळ पदरात वागवून दिवस काढावे बरे?" असा प्रश्न या समाजातील त्या बापाला करतात. जे आपल्या कोवळ्या मुलीला शिकायला धाडण्यापेक्षा ९० वर्षाच्या म्हताऱ्याच्या गळयात घालून बाल विधवेचे जीवन जगण्यास भाग पाडतात. त्याचबरोबर त्यांच्या मते, सर्व सुख असले तरी माय-बाप, नवरा यांच्या सुखापेक्षा त्या पैश्याला मोल नाही, असे त्यावरील लिखाणातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. त्याचबरोबर पुनर्विवाह करणे ही बाब विधवांच्या आयुष्यात किती महत्वाची आहे. हा अधिकार नसल्याने किती मोठे नुकसान झाल्याचे ताराबाई येथे दाखवून देतात. भारतीय दुर्दशेच्या पातळीवर त्यांनी आपला दृष्टिकोन मांडला. त्या म्हणतात, पूर्वी एखादा राजा मेला तर पत्नी कुणाकडून तरी राज्याला वारस मिळवून देई. याचा दाखला देऊन त्या म्हणतात, "असे करण्यापेक्षा दुसरे लग्न करण्याची जर चाल चालू ठेवली असती, तर त्या राज्याला दुप्पट बळकटी येऊन आज लक्षावधी लहान सहान मांडलिक राज्ये, जहागिरी, इनामे, देशमुख्या वगैरे बुडून आपला देश भिकारी झाला नसता. कित्येकांनी औरस वारस नसल्यामुळे त्यांची सर्व जिनगी सरकारात जाऊन सरकार खजिन्यात पडली. कित्येक ठिकाणी सर्वच बायका बोडक्या झाल्या. त्यांचा बाजार पाहण्याला कोणीच नाही. तेव्हा तुम्ही येथे टोळासारखे पडून सफाई सत्यानास करून सोडलात." पुरुषाची पत्नी मरण पावली, की राख थंड होण्याच्या आतच दुसरी आणली जाते. स्त्रियांनी मात्र पुनर्विवाहाचा विचार सुद्धा करू नये. हा अन्याय आहे. स्त्री आणि पुरुषातील ही असमानता का?, असे प्रश्न ताराबाईंना छळत असल्याचे संपूर्ण लिखानातून दिसून येते. समाजात विधवांना पुनर्विवाहाची परवानगी न दिल्याने, बालविवाह केल्याने देशाचे किती मोठे नुकसान होते, हे ताराबाईंनी आपल्या बौद्धिक सामर्थ्याने पटवून दिले आहे. आपल्या लिखाणातून ताराबाईंनी स्त्रियांवरील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व थरातील अत्याचारांचे त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरेचे, चालीरीतीचे त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांचे वर्णन आणि त्याचा विरोध फारच तडफदार, निडर आणि तिखट भाषेत केला आहे. तत्कालीन समाजात अशा भाषेत एका स्त्रीने लिखाण करणे फारच शौर्याचे कार्य होते. असे अनेक सामाजिक कार्य करत शेवटी १९१० मध्ये ताराबाईंनी अखेरचा श्वास घेतला. आज या जगात त्या जरी नसल्या तरी त्यांच्या स्त्री-पुरुष तुलना या पुस्तकाने पुरुषसत्तेचे खरे रूप समाजसमोर आणले. त्याचबरोबर विधवांच्या दुःखांची जाणिव समाजाला झाल्याची लक्षात येते. इंद्रजीत भालेराव यांच्या मते, "ताराबाईंच्या आधी आणि त्यांच्या नंतर कुणाही स्त्रीला इतक्या प्रखरपणे स्त्रीची बळकट बाजू घेता आली नाही."

**पंडिता रमाबाई: जीवन परिचय:** पंडिता रमाबाई या एक विदुषी, समाज सुधारक आणि स्त्री शिक्षणाच्या चळवळीतील महत्त्वाची व्यक्ती म्हणून आपण त्यांना ओळखतो. ज्यांनी परितक्त्या, पतित व विधवा महिलांसाठी कार्य केल्याचे दिसते. त्यांचे जन्मनाव रमाबाई डोंगरे होते. २३ एप्रिल १८५८ मध्ये अनंतशास्त्री डोंगरे व अंबाबाई डोंगरे यांच्या पोटी म्हैसूर संस्थानातील कर्नाटक राज्य मंगलुर जवळ माळहेरंजी जवळील गंगामूळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत त्यांचा जन्म झाला. आईकडून त्यांना संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले होते. १८७७ च्या दुष्काळात आई-वडील वारले. त्यानंतर काही वर्षात बंधुचाही मृत्यू झाला होता. फार कामी वयात रमाबाई अनाथ झाल्या होत्या. त्या संस्कृत सोबत मराठी, हिंदी, बंगाली, कन्नड, गुजराती इ. भाषा बोलू शकत होत्या. कलकत्त्याला त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला होता. तेथील सिनेट हॉलमध्ये 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरूदावली त्यांना बहाल करण्यात आल्या होत्या. पंडिता या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई एकमेव महिला होत्या. बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारत वर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले होते. कलकत्त्यामधील बिपिन बिहारी दास मेधावी या शूद्र जातीतील वकिलासोबत त्यांचा विवाह झाला होता. पण त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ टिकू शकले नाही. १९ महिन्याच्या संसारानंतर लगेच रमाबाईंच्या पतीचे निधन झाले. रमाबाई विधवा झाल्या. अशाप्रकारे रमाबाईनी घरातील सर्व माणसे गमावली होती. पुढे त्यांनी 'स्त्री धर्मनिती' पुस्तक लिहून पुस्तकाच्या विक्रीतून आलेल्या पैशात मुलगी मनोरमासह त्या लंडनला गेल्या. तेथेच त्या ख्रिस्ती धर्माकडे वळल्या. यावेळी त्यांना सनातनवादी विचारवंतांचा विरोध पत्करावा लागला. याकडे लक्ष न देता त्यांनी आपले कार्य सुरु ठेवले. अमेरिकेला जाऊन हिंदुस्थानातील बालविधवांना उपयुक्त होणारी बालोद्यान शिक्षण पद्धती त्यांनी शिकून घेतली होती. एकंदरीत रमाबाईनी स्वतःला पूर्णतः समाजकार्यात वाहून घेतले होते.

**विधवा कल्याणासाठी दिलेले योगदान:** महाराष्ट्रातून इंग्लंडमध्ये जाणारी पहिली स्त्री 'पंडिता रमाबाई'. ज्यांनी महिला हक्कासाठी फार कष्ट उचलले. विधवा महिलांसाठी 'शारदा सदनची' स्थापना केली. महिलांचा विकास झाला तर देशाचा विकास होईल, असे त्यांचे मत होते. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी आणि स्त्रियांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी रमाबाईंनी प्रयत्न केले. आंतरजातीय विवाह केल्याने समाजाचा रोष पत्करावा लागला. पती निधनानंतर खचून न जाता एका विधवेने सर्व संकटांना सामोरे जात समाजातील इतर विधवा महिलांसाठी सामाजिक कार्य तसेच हिंदू धर्माने लादलेल्या प्रथांचा,चालीरीतींचा विरोध केल्याने ब्राह्मण लोकांनी त्यांचा विरोध केला. तरी त्या मागे सरकल्या नाहीत. अतिशय खडतर प्रवासातून त्यांनी अनाथ बालविधवांसाठी लढा दिला. एका विधवेने देशातील इतर विधवांसाठीच काय तर सबंध स्त्रियांच्या कल्याणासाठी जे परिश्रम घेतले ते कौतुकास्पद आहेत. अनिष्ट चालीरीती नसत्या तर हिंदू समाजापासून दूर जाऊन त्यांना ख्रिश्चन मिशनऱ्यांकडे जावे लागले नसते. तरी त्यांच्या कार्याचा, बुद्धीचा, विचारांचा आदर बरेच लोक मान्य करत. रानडे, भांडारकर यांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. पती निधनानंतर रमाबाईला विधवेची भयान आयुष्य न जगता विधवा महिलांचे कल्याण करायचे होते. आपल्या आयुष्यात एक ठाम निर्णय त्यांनी यावेळी घेतला होता. त्या म्हणाल्या, "जोपर्यंत माझ्या शरीरामध्ये रक्ताचा एक बिंदूमात्र आहे, तोपर्यंत आपल्या जातीचे अर्थात स्त्री जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामात मी पराडमुख होणार नाही. आजपासून स्त्री जातीची सुधारणा करावयाची आहे. हे व्रत मी धारण केले आहे." तेव्हापासून त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. बालविवाह, केशवपन, अज्ञान, पुनर्विवाह बंदी या सर्व जाचक बंधनांचा विरोध त्यांनी केला. त्यांच्या मते, "बालविवाहमुळे ज्ञानप्राप्तीचे मार्ग बंद होतात. पुरातन काळी भरतखंडात बालविवाहाची चाल नव्हती. हे शास्त्राध्ययन केल्याने आपणास विदित होईल. स्त्रिया विद्या शिकल्या तर त्या दुर्गुणी होतील, असे लोक म्हणतात. परंतु हे चूक आहे. सत्यभामा, सावित्री, अशा पुष्कळ स्त्रियांच्या उदाहरणावरून ही कल्पना मिथ्या ठरते. इतकेच नव्हे, तर विद्येच्या योगाने स्त्रिया अधिक सद्गुणी होतील. शिकलेल्या स्त्रियांमध्ये कोणीच दूर्गुणी निघणार नाहीत, असे माझे म्हणणे नाही. परंतु घरात कोंडून ठेवलेल्या व अक्षरशत्रू बायकांमध्ये अशा दुर्गुणी स्त्रिया निघत नाहीत काय?" अशा शब्दात बालविवाहाचा विरोध व स्त्रियांना शिक्षणाची संधी याचा त्या स्वीकार करताना दिसून येतात. अज्ञान आणि बालविवाहामुळे स्त्रियांची जी परिस्थिती झाली होती त्यातून स्त्रियांना काढण्यासाठी, त्यांची उन्नती करण्यासाठी पंडिता रमाबाईंनी मुंबईमध्ये 'आर्य महिला समाज' नावाची संस्था स्थापन केली.

पंडिता रमाबाई इंग्लंडमध्ये ज्यावेळी होत्या, त्यावेळी त्यांना मिस हरफर्ड यांनी लंडनचे ख्रिस्ती मिशनचे होम दाखवले. तेथे त्यांनी पाहिले, की पतीत, अनाथ, विधवा स्त्रियांना किती प्रेमाने वागवले जात होते. हे पाहूनच त्या थक्क झाल्या. यावर त्यांना जास्तच लक्षात आले, की आमच्या हिंदू धर्मात पतीत स्त्रियांविषयी प्रेमाचा विचार कोणाच्या मनाला शिवत नाही. त्यांना प्रेमाने जवळ करून त्यांच्याशी प्रेमाने वागून त्यांस सदाचरणी करण्याचा व पुढील सर्व आयुष्य सत्कार्यात घालवण्याची पात्रता त्यांच्यात आणण्याचे महान कार्य या सिस्टर्स ऑफ मर्सी करीत. हा ख्रिस्ती धर्माच्या उपदेशाचा परिणाम पाहूनच त्यात ख्रिस्ती झाल्या. त्यानंतर त्यांनी ठरवले, की स्वदेशी जाऊन स्त्रियांच्या उद्धारासाठीच झटायचे. त्यांनी स्त्रियांसंबंधित एक पुस्तक ही लिहले होते. ते म्हणजे 'High Caste Hindu Women' या पुस्तकाद्वारे फिलाडेल्फिया येथे त्यांना प्रसिध्दी मिळाली होती. त्यांच्या भावी कार्याविषयी सहानुभूती अमेरिकेत उत्पन्न झाली. दहा वर्षापर्यंत हिंदू कार्यास रमाबाई असोसिएशनला अमेरिकेहून मदत करण्याचे ठरले. संस्था ख्रिस्ती म्हणून न चालवण्याचे ठरले. १८९२ ला 'शारदा सदन' स्थापन करण्यात आले. 'ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याने समाजातून चहूबाजूने लोक त्यांचा विरोध करत होती. इतकेच काय तर अनेक लोकांनी आपल्या मुली देखील तिथून काढल्या. दहा वर्षाचा अवधी संपत येत होता. यावेळी त्यांनी स्वावलंबनाचा मार्ग पत्करला आणि एका नव्या 'मुक्तिसदन' नावाच्या संस्थेची स्थापना केली. ही संस्था स्वकष्टातून चालत होती. त्यासाठी शेती, भाजीपाला, मळे लावून कार्य केले जात होते. या संस्थेतही बरेच जण आपल्या मुलींना पाठवत नव्हते. यावेळी १८९७ मध्ये भिषण दुष्काळ पडला. ही संधी साधून त्यांनी अनेक अनाथ मुलामुलींच्या विधवा, लाचार स्त्रियांच्या पाठीराखी ठरल्या. या सर्वांना त्यांनी आपल्या सदनात जागा दिली. अशा तीन हजार जणांना त्यांनी ख्रिस्ती केले. यावर टीका झाली; पण त्यांनी या दुष्काळात अडकलेल्यांचा सांभाळ केला. त्यांचे राहणे, खाणे सर्व सुविधा पुरवल्या. त्यांचे हे कार्य महत्त्वाचे होते. कित्येक अनाथ विधवांना त्यांनी आधार दिला. या सर्वांना ख्रिस्ती नसते केले, तर हा बोजा परदेसी ख्रिस्तींनी उचलला असता. तेच कार्य हिंदूंनी केले असते, तर ही वेळ आलीच नसती. परंतु परिस्थितीनुसार प्राण वाचवणे महत्त्वाचे होते. जे रमाबाईंनी मनुष्य स्वभावास अनुसरून केले.' त्यांच्या कार्याला पाहून एकदा सुबोध पत्रिकेने असे उद्गार काढले, "परदेशी जावे की न जावे, गेले तर किती शेणमुत खावे. याची वाटाघाट करीत आताची विद्वाने मंडळी बसली

आहेत. अशा वेळी एकट्या स्त्रीने अमेरिकेसारख्या सातासमुद्रा पलीकडच्या देशी जावे, तिकडील लोकांच्या अंत:करणात आपल्या भगिनीविषयी कळवळा उत्पन्न करावा. त्याच्याकरिता सभेचे विद्यालय व १० वर्षापर्यंत त्याला लागणारा खर्च सर्व मिळवून आणावा. याला जर अलौकिक पराक्रम म्हणू नये तर म्हणावा कशाला?" अशा शब्दात त्यांचा गुणगौरव केला होता. एक विधवा स्त्री समाजातील इतर विधवा स्त्रियांची उद्धारक ठरली. इतिहासात, असे क्वचितच उदाहरणे दिसून येतात. वैद्य यांच्या मते "एकीकडे पतीत, तिरस्कृत बायांसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या स्त्रिया व त्यांचे वर्तन आणि दुसरीकडे आमच्या लोकांचा कठोरपणा. अनितीस उत्तेजन व बेपर्वाई यांचा अनुभव घेतल्यावर रमाबाई सारख्या प्रेमळ अंत:करणाच्या स्त्रीला ख्रिस्ती धर्माचा मार्ग पसंत पडला तर त्यात आश्चर्य ते काय?"

इतरांसाठी आयुष्यभर जगणाऱ्या रमाबाई व्यक्तिगत जीवनात एक एक करत शेवटी २४ वर्षीय मुलीला सुद्धा मुकल्या. त्यानंतर काही कालांतराने रमाबाईचे देखील पुण्यातील केडगाव येथे ५ एप्रिल १९२२ मध्ये निधन झाले.

**निष्कर्ष आणि शिफारशी:** ज्या काळात महिलांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. चूल आणि मुल इथपर्यंतच त्यांचे आयुष्य मर्यादित होते. बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, बालहत्या, पुनर्विवाह बंदी, जातीभेद, स्त्री-पुरुष भेद केल्या जायचा. अशी दयनीय परिस्थिती तत्कालीन समाजात होती. यात सुधारणा घडवणे फार कठीण कार्य होते. तरी सुद्धा सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई यांनी माघार न घेता या सर्व प्रथांमधून विधवा महिलांची सुटका केल्याचे सदरील अभ्यासातून समोर आले.

महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे वरील तीनही स्त्री सुधारक विधवा होत्या. वैधव्यावस्थेत असतानाही स्वतःचे दु:ख बाजूला ठेऊन प्राणपणाने विधवांसाठी, त्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र लढल्या. ना अब्रू लुटण्याच्या धमक्यांची पर्वा, ना निर्भीडपणे आपल्या लिखाणातून पुरुषसत्ताक पद्धतीचा विरोध करताना समाजाची पर्वा, ना कुटुंबातील एक एक करत सर्व प्रिय व्यक्तींना अगदी पती, पोटची मुलगी गमावण्याच्या दु:खाची पर्वा. अशा परिस्थितीत स्व:ताचे जगणे कठीण असते तेथे यांनी इतरांना जगायला शिकवले. सर्व बाजूला सारून फक्त स्त्री सुधारणा, समाज जागृती हेच त्यांच्या आयुष्याचे अंतिम ध्येय असल्याचे या संशोधनातून समोर आले आहे. न भूतो न भविष्यति! असे सावित्रीबाईचे कार्य या अभ्यासातून दिसून आले. मातृत्वाचे सुख नसताना सावित्रीबाईनी पीडित विधवांचे बाळंतपण करून त्यांच्या मुलांचा सांभाळ केला. इतके महान कार्य जगात कोणी केले नसावे ते या माऊने केल्याचे स्पष्ट होते. याच अनमोल कार्यामुळे त्या सबंध जगाच्या सावित्रीआई झाल्या. सनातनी लोकांचा विरोध पत्करत विधवांची प्रखरतेने बाजू मांडणे हे धाडसी कृत्य ताराबाईनी केले. त्याचबरोबर ख्रिस्ती धर्म स्वीकारून, दुसऱ्या देशात जाऊन तेथील लोकांच्या मनात आपल्या भगिनींविषयी भावना निर्माण करण्याचे अवर्णनीय कार्य पंडिता रमाबाई यांनी केल्याचे या संशोधनातून समोर आले आहे.

वरील तीनही स्त्री सुधारकांचे कार्य अद्वितीय आहे. आपण पाहतो, आज विधवा महिला कुप्रथांपासून मुक्त आहेत. त्याचे कारण या स्त्री सुधारकांच्या वरील कार्यावरून समजते. त्यामुळे याचे श्रेय या महान सुधारकांना जाते. त्यांचे हे ऋण कशानेच फिटणार नाही. परंतु त्यांचे विचार, कार्य प्रत्यक्ष आपल्या जीवनात अवलंबवने गरजेचे आहे. हेच आपले आद्य कर्तव्य. कारण आजही कायदे कागदावरच आहेत. कित्येक बालविवाह होतात, विधवांना अपवित्र मानल्या जाते. त्यांना इतर महिलांप्रमाणे सन्मानपूर्वक वागणूक दिली जात नाही. समाज विसरतो; की विधवा ही एक महिलाच आहे. हे समाजाच्या लक्षात येणे आवश्यक आहे. विधवा महिलांना सन्मानपूर्वक वागणूक, जगण्याचे स्वातंत्र्य, त्यांच्याकडे पाहण्याचा या समाजाचा जो अत्यंत वाईट दृष्टीकोन आहे तो बदलणे महत्त्वाचे आहे. त्यांना समाजाच्या प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. गव्हाणे, किशोरकुमार. शिंदे, सुखदेव. (२०१४). महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास (१८१८ ते १९६०). औरंगाबाद: ऐज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्यूटर्स. पृ. क्र.२४६
२. भालेराव, इंद्रजीत. (२००८). महाराष्ट्राच्या शिल्पकार ताराबाई शिंदे. द्वितीयावृत्ती. मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ. पृष्ठ क्र.३१-३३,७
३. शिंदे, ताराबाई. (२०१६). स्त्री-पुरुष तुलना.औरंगाबाद: आनंद प्रकाशन.पृष्ठ.क्र.३०
४. कोत्तापल्ले, नागनाथ. (जून २००४). जोतीपर्व. द्वितीय आवृत्ती. औरंगाबाद: स्वरूप प्रकाशन. पृष्ठ.क्र.१६३
५. https://marathivishwakosh.org/६८६०४/
६. ऑम्व्हेट, गेल. (१९९८). जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार. व्दितीय आवृत्ती. मुंबई: लोकवाड्मय गृह. पृष्ठ. क्र.२०
७. वैद्य, द्वारकानाथ. गोविंद. (१९८८). पंडिता रमाबाई. द्वितीय आवृत्ती. मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. पृष्ठ.क्र.२८-२९, ४४-४७

# गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या विवाह पद्धतीचे समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा जि. गडचिरोली

**प्रस्तावना:** गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड आणि भामरागड हा प्रादेशिक भाग माडिया जमातीने व्यापलेला आहे. माडिया गोंड किंवा माडिया ही महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हा च भारताच्या छत्तीसगड राज्यातील बस्तर विभागात राहणाऱ्या जमातीपैकी एक आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड आणि भामरागड हा प्रादेशिक भाग माडिया जमातीने व्यापलेला आहे. लाहेरी ते कुवाकुडी हे सुमारे २० किमी. अंतर दाट जंगलातून आणि बिकट वाटणे चालून गेल्यावर माडिया जमातीचे दर्शन घडते. 'माड' हा वृक्ष माडिया लोकांचा आवडता आहे. या प्रदेशात माडिया लोकांची संख्या ही भरपूर आहे. त्यामुळेच त्यांना 'माडा च्या प्रदेशात राहणारे लोक' या अर्थाने झालेली आहे. माडिया ही गोंड जमातीची उपजमात आहे. ही जमात अतिशय मागासलेली आहे. डोंगराळ व दाट वन प्रदेशातील माडिया गोंडाचा सखल प्रदेशातील अन्य लोकांशी क्वचितच संबंध येतो. माडिया गोंड जमातीत वस्तींच्या ठिकाणावरून त्यांच्यात दोन गट पडतात. जे लोक उंच पहाडावर राहतात त्यांना 'बडा माडिया' म्हणतात. तर जे सखल प्रदेशात किंवा पहाडाच्या पायथ्याला राहतात त्याला 'छोटा माडिया' असे म्हणतात.

**बीज शब्द:** माडिया, विवाह, खर्चा, इ.

**संशोधनाचे उद्देश:** माडिया आदिवासी जमातीच्या विवाह विषयक पद्धतीचा अभ्यास करणे. माडिया या आदिवासी जमातीच्या विवाहातील अनेक प्रकारांचा अभ्यास करणे. माडिया आदिवासी जमातीतील दहेज (खर्चा) पध्दतीचा अभ्यास करणे.

**संशोधन गृहीतकृत्ये:** माडिया आदिम जमातीत सगोत्र विवाह होत नाही. माडिया आदिम जमातीत विवाहाचे अनेक प्रकार आहेत.

१. माडिया जमातीत दहेज (खर्चा) पद्धती आहे.

**संशोधनाचे महत्त्व:** प्रस्तुत संशोधन माडिया चा आदिवासी जमातीतील विवाहाशी संबंधीत आहे. यात माडिया या जमातीतील विवाह ठरविण्याची पद्धत, विवाहाचे प्रकार, दहेज (खर्चा), घटस्फोट इत्यादींचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने सदर संशोधन होणे संशोधनकर्त्याला आवश्यक वाटतो.

**संशोधन पद्धती**: प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक संशोधन आहे. द्वितीच स्त्रोताद्वारे माहितीचे अथवा तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

**अध्ययन क्षेत्र:** संशोधनाचे अध्ययन क्षेत्र म्हणून गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीची निवड करण्यात आलेली आहे.

**तथ्य संकलन पद्धती:** सदर संशोधन हे माडिया जमातीच्या विवाह पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात आला. त्यात लिखित साहित्य, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट वरील साहित्याचा वापर करण्यात आला.

**तथ्यांचे विश्लेषण:** सदर संशोधन पूर्णत्वास नेण्याकरिता तथ्याचे संकलन करण्यात आले. कारण तथ्याचे संकलन केल्याशिवाय संशोधन कार्य पूर्वत्वास जाऊ शकत नाही.

**विवाह प्रथा:** माडिया गोंडात सगोत्रीय विवाह होत नाहीत. त्याच्यात चारदेवे, पाचदेवे, सहादेवे आणि सातदेवे असे चार प्रमुख गोत्र गट आहेत. त्याचा एका गटात समावेश केलेला असतो. एका गोत्रातील लोक म्हणजे एकाच रक्त सबधातील लोक असे ते समजतात. म्हणून एकाच देवकातील किंवा गोत्रातील तरुण-तरुणीचे विवाह सबंध निषिद्ध समजले जातात. सामान्यपणे एकाच आडनावाचे लोक एकाच गोत्रातील असतात असे समजले जाते. म्हणून समान आडनावाच्या तरुण-तरुणीमध्ये विवाह होत नाहीत. तरुण आणि तरुणी वयात आल्यानंतरच त्यांचे विवाह होतात. माडिया गोंड जमातीत विवाहाचे अनेक प्रकार आहेत. त्यात वडिलधाऱ्यांनी ठरवून केलेला विवाह, तरुण-तरुणीने एकमेकांना पसंत पडली म्हणून सक्तीने मुलीला पळवून नेऊन केलेला विवाह आणि विधवा विवाह असे चार प्रकार आहेत. माडिया गोंडजमातीत दहेज पद्धती प्रचलित आहे. त्याला 'खर्ची' असे म्हणतात. म्हणूनच त्याला खर्च द्यावा लागतो. त्यात रोख रूपये, धान, कोंढा (बैल), हर्रे (बकऱ्या), केल (कोंबड्या), डुकरे इत्यादीचा समावेश होतो. ही एक प्रकारची मुलीच्या पित्याला, आर्थिक मदत असते. काही वेळेस विवाह प्रसंगी मुलगी पूर्वी ठरविल्याप्रमाणे वा त्यापेक्षा जास्त दहेज मागते. ऐपत असली तर मुलाचे वडील दहेज देतात. नाही तर लग्न मोडते. वडिलधाऱ्यांनी ठरवून केलेल्या विवाह प्रकारात मुलामुलीवर कधीही सक्ती केली जात नाही. तरुण-तरुणी आपल्या जोडीदाराची निवड करण्यास मुक्त असतात.

वडीलधारी लोक विवाह निश्चित करण्यापूर्वी दोन्हीही पक्षाचे गोत्र पाहतात वडिलधाऱ्याकडून ठरवून केलेल्या विवाहात मुलाकडील मडळींना मुलींच्या घरी

जावे लागते त्यात मुलाचे वडील आणि इतर काही वडीलधारी मडळींचा समावेश असतो. अनेक वेळेला दहेज प्रश्नावरून विवाह मोडत असतात. दोन्ही पक्षाकडील मंडळीने खर्चा ठरविला असेल तरच विवाह होतात. त्यामुळे काही मुलामुलींचे दोन-दोन, तीन-तीन वर्षे विवाह अडून पडतात. विवाह निश्चित झाल्यावर वैवाहिक जीवन सुखकारक ठरेल किंवा नाही हे शकून पाहून माडिया गोंड ठरवितात. त्यांची शकून पाहण्याची विशिष्ट पद्धती आहे. त्यासाठी ते पाण्याने भरलेल्या एका पसरट भांड्यात तांदळाचे दोन दाणे वेगवेगळे टाकतात. ते त्या भांड्यात एकत्र आले तर वैवाहिक जीवन सुखकर होइल असे समजतात. त्यानंतर विवाहाची तयारी सुरू होते. तांदळाचे दाणे एकत्र न आल्यास अपशकून समजतात.

विवाह मुलीच्या घरी होतो. विवाहापूर्वी मुलगी आपल्या सर्व नातलगाना भेटून येते. त्यावेळी तिचे नातलग तिला आपल्या ऐपतीप्रमाणे पैसे किंवा भेटवस्तू देतात, नंतर मुलगी, वडीलधारी मडळी आणि इतर नातलगाबरोबर विवाहासाठी मुलाच्या घरी जाते. यावेळी मुलीला दुःख होणे स्वाभाविक असते. परंतु इतर मंडळीचा मात्र उत्साह वाढलेला असतो. सर्वजण स्वतःला सजवून आणि नटूनथटून विवाहाला जातात. या प्रसंगी ढोल वाद्ये मोठमोठ्याने वाजविली जातात. स्त्रीया गाणीही म्हणतात. विशिष्ट लयी आणि फेर धरून स्त्री-पुरुष सामूहिक नृत्यही करतात. नृत्यात पुरुषाच्या कमरेला घुंगराच्या माळा बाधलेल्या असतात. नाचतांना कबरेच्या घुंगरांचा आवाज केला जातो. विवाहाच्या निमित्ताने कोरिव काम केलेला नक्षिदार लाकडी खाब तयार केला जातो. त्याला 'मुडा' असे म्हणतात. या खांबाला माडिया गोंडांच्या विवाहात अनन्यसाधारण महत्त्व असते. तो असल्याशिवाय विवाह सोहळा पार पडत नाही.

मुंडा हा विवाहाची आठवण आणि शुभचिन्ह म्हणून ठेवण्याची प्रथा आहे. प्रत्येक विवाहात एक मुंडा तयार करून तो रोवला जातो आणि मोठ्या मुलाच्या विवाहातील मुंड्याजवळ इतर मुंडे रोवले जातात. वराने ऐपतीप्रमाणे पितळी मुकुट घालणे आणि वधू-वरांनी परस्परांना पितळी किंवा चांदीची अंगठी घालणे अशी प्रथा आहे. विवाहात विशेष विधी नसतात.

आर्थिक अडचणींमुळे काही कुटुंबांना मुला-मुलींचे विवाह करणे कठीण जाते, त्यामुळे अनेक वेळा वयात आलेली मुले-मुली घरातून पळून जाऊन प्रेमविवाह करतात. या प्रकारात मुलीकडून दहेज किंवा खर्च घेतला जात नाही आणि जोडीदाराची निवड मुलगा-मुलगी स्वतः करतात. गोटूल किंवा सामाजिक प्रसंगांमध्ये भेटून ते विवाहबद्ध होतात. काही वेळा मुलींना पळवून नेऊन जबरदस्तीने विवाह केले जातात, ज्यात मुलाच्या नातेवाईकांचा किंवा मित्रांचा सहभाग असतो आणि यामुळे वाद व मारामाऱ्या देखील होऊ शकतात. एखाद्या तरुणाला विधवेशी विवाह करावयाचा असल्यास तो तिला बाजाराच्या दिवशी नवीन बांगड्या घालतो आणि ते दोघे एकत्र राहातात. एखाद्या विधवेने विवाह केल्यास माडिया लोकात काहीही गैर मानले जात नाही. परिस्थिती चांगली असेल तर पुरुष एकापेक्षा अधिक विवाह करतात. परंतु पहिल्या पत्नीपासून पुरुषाला घटस्फोट घ्यावा लागतो. पतीपत्नीचे पटत नसेल तर पंचायतीचा दंड भरून घटस्फोट घेता येतो. घटस्फोटानंतर स्त्री आपल्या प्रियकराकडे आणि पुरुष आपल्या प्रेयसीकडे जाण्यास मोकळे होतात व नवीन विवाह करण्यास मुक्त होतात. माडिया समाजातील शिथील सामाजिक बंधनामुळे विवाहपूर्वीच स्त्री माता होत असेल तर कोणताही विधी न करता ती मुलाच्या घरी जाते आणि त्याची पत्नी म्हणून राहू लागते. जर एखाद्या तरुण-तरुणीची जोडी अत्यंत गरीब असेल आणि त्या दोघांनाही विवाह करण्याची इच्छा असेल तर कोणताही विधी किंवा देवाणघेवाण न करता ते पती-पत्नी म्हणून राहू शकतात आणि त्यांच्या वैवाहिक जीवनाला सुरुवात होते. यात कोणतीच आडकाठी नसते. अशा पद्धतीने माडिया या जमातीत विवाहाची पद्धत पाहण्यास मिळते.

**निष्कर्ष:** माडिया ही आदिवासी जमात अत्यंत मागासलेली आहे. या जमातीत विवाह ठरवितांना खर्चा पद्धती घरोघरी आहे. या जमातीत सगोत्र विवाह होत नाहीत. या जमातीत वडीलधाऱ्यांनी ठरवून लावलेला विवाह. मुला मुलींनी एकमेकांना पसंत करून पळून जाऊन केलेला प्रेमविवाह. मुलाला मुलगी पसंत पडल्यास मुलीला सक्तीने पळवून नेऊन केलेला विवाह व विधवा विवाह मान्य आहेत. मुंडा खांबाला माडियाचा विवाह समारंभास अनन्य साधारण महत्त्व आहे. माडिया जमातीत घटस्फोट घेण्याची पद्धत आहे

**संदर्भ:**


१. विखार रविंद्र (२००२) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, बीड: हर्षवर्धन पब्लिकेशन.
२. महाराष्ट्र शासन, *आदिवासी विकास विभाग*, आदिवासींचे अंतरंग, नाशिक: लीलावती प्रकाशन.
३. कऱ्हाडे बी. एम., राऊत किशोर (२०२५), *महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती*, अमरावती: ज्ञानपथ पब्लिकेशन (भारत)
४. कुळकर्णी दिलीप, (१९८६,) *निसर्गायन*, पुणे : राजहंस प्रकाशन
५. नाडगोडे गुरुनाथ, (१९८६), *भारतीय आदिवासी*, पुणे: कॅन्टीनेन्टल प्रकाशन
६. गारे गोविंद (२०१८), *आदिवासी विकास*, दिपस्तंभ, मुंबई: श्रीनिवास प्रकाशन
७. देवगावकर एम. जी. (२००१), *आदिवासी विश्व*, नागपूर: श्री. साईनाथ प्रकाशन

# साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिकेच्या आधारे उच्य वर्ग आणि मध्यम वर्गातील जीवनशैलीचा दृश्य माध्यमातून तुलनात्मक अभ्यास

**प्रा . मंजिता कुलकर्णी** सेंट मीराज मुलींचे महाविद्यालय, पुणे
**डॉ. दिलीप खैरनार** देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**सारांश:** समाज हा संतुलित राहण्यासाठी त्या मधील सर्व संस्था, घटक, व्यक्ती आपापल्या भूमिका, दर्जा नुसार कार्य पार पाडतांना दिसून येतात. ह्या प्रकार्यामुळेच सर्व समाज एकसंध राहतो. व्यक्तीला समाजात एकसमान अधिकार जरी संविधानाने नमूद करून दिलेले असले तरीही प्रत्येक व्यक्तीची जी सामाजिक जडण-घडण बालपणापासून होते तीच त्याच्या जगण्याची शैली बनलेली दिसून येते. प्रत्येक व्यक्ती आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांद्वारे घडवला जात असतो आणि त्याची हि जडण-घडण थोडक्यात सामाजीकरणाची हि प्रक्रिया सतत सुरु असते, किंबहुना व्यक्ती मध्ये भिनली जाते असे म्हणता येईल. साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिकेमध्ये एक कुटुंब त्यांची उच्य वर्गातील राहणी आणि त्या मध्ये आलेली मध्यम वर्गातील सून आणि तिच्या मध्यम वर्गातील जीवनपद्धती ह्या विनोदी शैली मध्ये सादर केलेल्या आहेत. अगदी सामान्य प्रसंगांवरून देखील उच्य वर्ग आणि मध्यम वर्ग, समाजात त्यांचे इतरांशी असलेले नाते, स्वतःच्या वर्गा प्रमाणे वर्तन करण्याची पद्धत आणि समाजावर वर्ग अस्मितेचा असलेला प्रभाव ह्या मालिके आधारे समजून घेण्याचा प्रयत्न ह्या पेपर मध्ये करण्यात आला आहे. व्यक्तीची जडण- घडण व्यवहारातून प्रकट पणे दिसून येते का?व्यक्तीला वर्तन किंवा कृती करताना स्वतःच्या वर्गाचे भान असते का? समाजावर वर्ग अस्मितेचा प्रभाव असतो का? ह्या मालिकेचे पहिल्या सत्रामधला भाग १, येथे सहेतुक नमुना निवड पद्धतीनी निवडला आहे. वर्णनात्मक विश्लेषणाचा वापर इथे केला गेला आहे. आणि संघर्ष सिद्धांताला आधार मानून वर्ग संघर्ष दृश्य माध्यमाच्या आधारे समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
**कीवर्ड्स:** वर्ग असमानता, सामाजीकरण प्रक्रिया, सामाजिक स्तरीकरण, उच्च-मध्यम वर्ग संबंध, कुटुंबसंस्था, सामाजिक भूमिका व दर्जा, दृश्य माध्यम विश्लेषण, सामाजिक वर्तन, सांस्कृतिक भिन्नता, वर्ग संघर्ष.

**प्रस्तावना:** समाज आणि व्यक्ती ह्यांचे नाते अतूट आहे. प्रकार्यावादी दृष्टीकोनातून पाहता सर्व संस्था ह्या समाजाचे अंग आहेत असे मानल्यास प्रत्येकाला नेमून दिलेले कार्य अचूकपणे करणे अनिवार्य आहे. एका जरी संस्थेच्या कार्यात परिवर्तन झाले तर त्याचा परिणाम अन्य संस्थांवर दिसून येईल. व्यक्ती हि समाजाचा अविभाज्य घटक आहे. व्यक्ती आणि समाज परस्परावलंबून आहेत असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. व्यक्ती ची कार्य आणि समाजाशी असलेले नाते पूर्ण करताना व्यक्ती च्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक ह्या घटकांमुळे देखील व्यक्तीच्या वर्तनात आणि कृती मध्ये बदल होताना दिसतात. कार्ल मार्क्स ह्यांच्या संघर्ष सिद्धांताचा विचार केला तर त्यांनी भांडवलशाही व्यवस्थेवर टीका केलेली आहे.त्यामधील उत्पादनाचे साधन, कामगारांचे शोषण, परात्मिकरण आणि खाजगी मालमत्तेचे मालक आणि श्रम हिच शक्ती असलेले कामगार ह्यांच्यामध्ये वर्ग संघर्ष असतोच. *(Unnati Singh, 2024)* आज च्या २१ व्या शतकात देखील वर्ग संघर्ष किंवा दोन वर्गांमधील दरी हि कोणत्या ना कोणत्या प्रकारे पाहायला मिळतेच हे दिसून येते. वर्ग अस्मितेचा विचार करता प्रत्येक व्यक्तीला तो कोणत्या आर्थिक वर्गातील आहे- उच्य, मध्यम, कनिष्ठ हे बालपणापासूनच सामाजीकरणाच्या माध्यमातून बिंबवले जात असते. व्यक्ती त्याच्या आर्थिक स्तरानुसार त्याची जीवनशैली बनवतांना दिसते आणि नकळतपणे व्यक्तीच्या दैनंदिन कृतींमधून ती आर्थिक वर्गाची वर्तवणूक प्रत्येक्ष दिसून येते. वर्ग अस्मिता आणि त्या नुसार जीवनशैली हे साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालीकेच्या आधारे दृश्य माध्यमातून समजून घेण्याचा प्रयत्न ह्या पेपर मध्ये करण्यात आला आहे. मार्क्स वादानुसार आज देखील नवीन जागतिक आव्हाने समजण्यासाठी संदर्भ महत्वाचा ठरतो. मग ति कोणत्याही प्रकारची आव्हाने असतील जसे, आर्थिक समाजवाद, कामगाराचे डीजिटल हक्क, भांडवलशाही विरोधी चळवळी मार्क्स वादाची संरचना आधुनिक समाजामध्ये देखील असमानता आणि सामाजिक अन्याय समजण्यासाठी महत्वपूर्ण आहे. *(Unnati Singh, 2024)*

वर्ग अस्मिता समजून घेणे तिचे निरीक्षण करणे हे थोडे अवघड आहे कारण व्यक्ती स्वतःच्या वर्तनाला किंवा इतरांच्या वर्तनाला अलिप्तपणे पाहणे थोडे अवघड आहे. पण दृश्य माध्यमातून पाहताना ति एक कथा असते आणि त्याचे विश्लेषण करणे शक्य असते. दृश्य माध्यमामध्ये चित्रपटाचा जर विचार केला तर, साधारण व्यक्ती साठी चित्रपट हे खूप पूर्वीपासून खूप मोठ्ठे आकर्षणाचे केंद्र आहे कारण त्यात व्यक्तीच्या जीवनासारखी गुणवत्ता, वास्तवता दाखवली जाते. चित्रपट हे फक्त मनोरंजनाचे साधन नसून स्वप्ने दाखवतो, साधारण व्यक्तीच्या प्रेरणा आणि

अभिलाषा देखील मांडतो. (*Dr. Vijay Devidas Matkar, 2023*) चित्रपटासारखीच सर्व दृश्य माध्यमे व्यक्ती वर प्रभाव पाडतांना दिसतात. कोणताही प्रसंग प्रत्येक्षात पहिला कि त्याची करणे, तीव्रता, भावना व्यक्ती पर्यंत जलद पोहोचते.वास्तव वाटते आणि व्यक्तीला बऱ्याचदा नवीन विचार देऊन जाते.बरेचशे चित्रपट आहेत ज्या मध्ये मार्क्सवादातील घटक जसे, कामगार -भांडवलदार आणि सर्व सामान्य मुद्दा वर्ग संघर्ष हे दाखवले जातात . मार्क्स ह्यांच्या दृष्टीकोनातून वर्गसंघर्ष कधीच संपणार नाही. (*Dr. Vijay Devidas Matkar, etc* 2023). चित्रपटांन सोबतच मालिकाही ह्या मुद्द्यांवर भाष्य करताना दिसून येतात. साराभाई विरुद्ध साराभाई हि मालिका कौटुंबिक मालिका म्हणून पहिली जाते ह्यात विनोदी शैलीनी वर्गसंघर्ष जो उच्च वर्ग आणि मध्यम वर्गाच्या राहणीमानातून दाखवला आहे. व्यक्ती ची आर्थिक स्थिती बदलली तरी देखील व्यक्तीवर बालपणापासून जे सामाजीकरण होते, म्हणजे ति व्यक्ती कुटुंब, समाज, मित्रपरिवार ह्यांच्या कडून स्वतःच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती संदर्भात जे वर्तन शिकते किंवा तिच्यावर बिंबवले जाते ते ती विसरू शकत नाही हे इथे दैनंदिन कृतीमधून पहावयास मिळते. ह्या मालिकेमध्ये सासू आणि सून ह्यांच्या मधील नाते लोक जास्त पाहतात पण ते पाहत असताना दोघींची आर्थिक पाश्वभूमी वेगवेगळी आहे, आपण सामाजिक वर्गामधील वास्तवता आणि सामाजिक असमानता ज्यामुळे अनेक निर्णय किंवा विचार करण्याच्या प्रक्रियेमध्ये बदल दिसतात ते कायदेशीर आणि सामान्य म्हणून स्वीकारतांना दिसतो आणि व्यक्तींमधील क्षमता आणि व्यक्तीमधील महात्वाकांक्षेला त्याच्या आतील फरक म्हणून प्रतिबिंबित करतो. (*Dr. Vijay Devidas Matkar, 2023)*.

चित्रपट हा कला आणि विज्ञान दाखवणारे एक स्वरूप आहे, ज्या द्वारे संपर्क केला जातो. समाजाच्या संस्कृतीचा तो असा एक भाग आहे ज्यात वर्तन कसे असावे ह्या बाबतचे ज्ञान, भाषा आणि साहित्य, संगीत, काय योग्य आणि काय अयोग्य ह्या संबंधीच्या आदर्श कल्पना, कार्य करण्याची पद्धती हे सर्व चित्रपटातून सांगण्यात येते. चित्रपट हे एक असे दृश्य माध्यम म्हणून स्वीकारले जाते ज्यातून वास्तवाला मांडण्यासाठी आणि कथा सांगण्यासाठी उपयुक्त आहे. *(Mohammad Aminur Rahman, 2015).* चित्रपट असो किंवा मालिका किंवा इतर कोणतेही दृश्य माध्यम ते समाजातील सर्व बाबी व्यक्तींपर्यंत पोहचवते आणि व्यक्तींना नकळतपणे वास्तवतेचा आरसा दाखवते.कथेच्या रुपात जेव्हा एखादी बाब समाजासमोर येते तेव्हा ति व्यक्ती कडून समजून आत्मसात करण्याची शक्यता जास्त असते कारण प्रत्येक्ष पणे ती व्यक्ती पर्यंत पोहोचते. दृश्य माध्यमातून दाखवलेल्या पात्रांचे हावभाव, बोलण्याची शैली, पोशाख, संगीत, कृती,भावनाप्रधानता सर्वच व्यक्तीला खिळवून ठेवते आणि अत्यंत सोप्या सरळ पद्धतीने व्यक्ती पर्यंत हवा तो संदेश व्यक्ती म्हणजेच पर्यायाने समाजा पर्यंत पोहचवला जातो.

मार्क्सवाद हा स्थूल पातळीवरील संरचनात्मक सिद्धांत आहे ज्या मध्ये असे मानले जाते कि सर्व व्यक्तींवर समाजाचे नियंत्रण असते. (*Mohammad Aminur Rahman*, 2015) ज्या मध्ये आपण अनुभवतो कि व्यक्ती ज्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीतून आली आहे त्या परिस्थितीचा, समाजाचा तिच्यावर पूर्ण पगडा असतो. नकळतपणे तिचे जसे सामाजीकरण झालेले आहे तेच त्या परिस्थितीचे प्रतिबिंब व्यक्तीच्या वर्तनात उमटलेले दिसून येते.ह्या मालिकेमध्ये सासू आणि सुनेच्या नात्या सोबतच त्या दोघी वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक,सांस्कृतिक परिस्थितीतून आलेल्या असल्यामुळे त्यांच्या मधील नाते वेगळे आहे, समाजात त्यांचे वर्तन आणि विचार करण्याची, राहण्याची शैली चे भिन्नत्व अनुभवता येते. संघर्ष सिद्धांतात सामाजिक गटांमध्ये अस्वीकार आणि संघर्ष दिसून येतो हे समाजाचे वैशिष्ठ्य मानले गेले आहे.आणि हा संघर्ष प्रामुख्याने उच्य म्हणजेच श्रीमंत आणि कनिष्ठ वर्ग म्हणजेच गरीब ह्याच्यात दिसतो, ज्याला दुसऱ्या भाषेत सत्ताधारी आणि सत्ताहीन असे वर्णन मार्क्सवाद करतो. (*Mohammad Aminur Rahman*,2015). ह्या संशोधनात वर्ग संघर्ष, वर्ग अस्मिता ह्या मुद्द्यांना आधार मानून उच्य वर्ग आणि मध्यम वर्गातील राहणीमान, जीवनशैली ह्या बाबींचा आढावा घेतला जाणार आहे.मध्यम वर्ग हा कनिष्ठ वर्गापेक्षा वेगळा असतो पण उच्च वर्गाशी तुलना करता आर्थिक स्थिती खूप चांगली असलेली दिसून येत नाही.चित्रपटासारखेच मालिका म्हणजे दृश्य माध्यमातून वर्ग अस्मितेचा विचार करता समकालीन चित्रपट अध्ययनात ऐतिहासिक, आर्थिक आणि आदर्शात्मक विश्लेषण तसेच प्रसार माध्यमा मधील कृतीप्रधानता ह्यांचे विश्लेषण ह्यामध्ये मार्क्सवादाचे योगदान वाखण्याजोगे आहे.ज्यात मुलभूत अभिरुची आणि पद्धतींचा समावेश आहे तसेच मार्क्सवाद ज्यावर भर देतो त्या ऐतिहासिक विश्लेषणात विविध आंतरक्रियात्मक घटक जसे- सामाजिक,आर्थिक आणि राजकीय संबंध ह्यांच्या वर पण मोठ्या प्रमाणात लक्ष देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. (*Chuck Kleinhans, 1998)* दृश्य माध्यमामधून मार्क्सवादाची वर्ग संघर्ष आणि वर्ग अस्मिता ह्या संकल्पना पाहताना साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिके संदर्भात काही प्रश्न पडतात जसे- व्यक्तीची जडण- घडण व्यवहारातून जीवनशैलीचा प्रकटपणे दिसून येते का?

व्यक्तीला वर्तन किंवा कृती करताना स्वतःच्या वर्गाचे भान असते का? व्यक्तीवर वर्ग अस्मितेचा प्रभाव असतो का?

**संशोधन पद्धती:** ह्या पेपर साठी दृश्य विश्लेषण आणि वर्णनात्मक विश्लेषण ह्या पद्धती वापरल्या गेल्या आहेत . सहेतुक नमूना निवडीचा प्रकार वापरुन साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिकेच्या पहिल्या सत्राचा भाग १ निवडला गेला आहे . दुय्यम तथ्य मिळवण्यासाठी इतर संशोधन पेपर वापरले गेले आहेत आणि संघर्ष सिद्धांत आधार मानला आहे

**संशोधन प्रश्न:** १) व्यक्तीची जडण-घडण व्यवहारातून जीवनशैलीचा प्रकट पणे दिसून येते का? २) व्यक्तीला वर्तन किंवा कृती करताना स्वतःच्या वर्गाचे भान असते का? वर्ग अस्मितेचा प्रभाव व्यक्तीवर दिसून येतो का?

**संशोधनाची उद्दिष्टये:** १) व्यक्ती स्वतःच्या समाजिकीक-रणानुसार वर्ग स्तरीकरणा प्रमाणे वर्तन सहजपणे करताना दिसून येतो काय हे परीक्षण करणे. २) व्यक्ती एखादी गोष्ट स्वीकारतांना स्वतःची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती समजून घेऊनच त्या अनुसार वर्तन करतो का हे अभ्यासणे.

**चर्चा:** साराभाई vs साराभाई ह्या मालिकेचा भाग १ शीर्षक- 'भेट साराभाईशी' ची सुरुवात गोव्यातील समुद्र किनाऱ्यापासून होते, जिथे त्यांचा मोठ्ठा मुलगा घर सोडून आला आहे आणि नागेश अय्यर ह्या लेखक म्हणवणाऱ्या व्यक्तीला तो स्वतःची कहाणी सांगताना दाखवला आहे. ह्या पहिल्या भागात साराभाई कुटुंबातील मोठ्ठा मुलगा साहिल साराभाई आपल्या सर्व कुटुंबाची आणि त्यांच्या स्वभावाची, राहणीमानाची त्यांच्या वागण्याची कथेच्या रुपात ओळख करून देतो. तो त्याची आई आणि पत्नी ह्यांच्या मधील भांडणामुळे घर सोडून गोव्या ला आलेला आहे.साराभाई कुटुंबामध्ये दोन मुले — एक साहिल आणि दुसरा रोसेश, मोठ्ठी सून मोनिशा, घरातील जेष्ठ वडील इंद्रवर्धन साराभाई त्यांची पत्नी म्हणजे साहिल आणि रोसेश ची आई माया साराभाई ह्या प्रमुख पात्रांची साहिल ओळख करून देतो. ह्यात विनोदी मालिका म्हणून पाहताना वापरले गेलेले वाक्य विनोदी वाटतात पण सासू माया हि उच्च घरातील आहे आणि सून मोनिशा हि मध्यम वर्गातून आलेली आहे हे प्रत्येक प्रसंगातून जाणून दिले जाते. जसे, साहिल घर सोडून जातो तेव्हा हि बातमी जेव्हा हर्षवर्धन भ्रमणध्वनी वर कोणाला तरी तो हर्षवर्धन दि ग्रेट बोलत आहे असे म्हणून अत्यंत सहजतेने सांगत असतो तेव्हा तो सांगतो कि मुलगा साहिल पुन्हा घर सोडून गेला आहे सर्व काळजी करत आहे, म्हणून माया काळजी करत आहे आणि तिच्या डोक्यात कोंडा झाला आहे. माया हे ऐकून लगेच भ्रमणध्वनी घेते आणि स्पष्टीकरण देते कि मुलगा घर सोडून गेलाय पण माझ्या डोक्यात कोंडा नाही झालेला. तसेच हि बातमी त्याची पत्नी मोनिशा तामिळ वर्तमान पत्रात छापते, माया जेव्हा हे पाहते आणि कारण विचारते तेव्हा मोनिशा सांगते इंग्रजी आणि हिंदी वर्तमानपत्रापेक्षा तामिळ वर्तमानपत्रात बातमी देण्यासाठी पैसे कमी लागतात आणि चार दिवस हि बातमी छापून येईल. तेव्हा हर्षवर्धन मोनिशा ला सांगतो कि प्रार्थना कर साहिल ४ दिवस येऊ नये नाहीतर वर्तमान पत्रात जाहिरात देण्यासाठीचे पैसे वाया जातील, मोनिशा देखील हे मान्य करताना दाखवली आहे कि, पैसे व्यर्थ जाऊ नयेत.आणि माया ला पैसे वाचवण्याची सवय नाहीआणि फरक पण पडत नाही हे दिसून येते. जाहिरात देखील मध्यम वर्गाच्या शैलीत छापली गेली आहे अशी माया सांगताना दिसून येते त्याच बरोबर माया आपल्या सुनेच्या सवयींबद्दल बोलताना दाखवली आहे जसे,खाण्यात तेल आणि मसाला जास्त घालणे,सिग्नल वरून स्वस्तातील अगरबत्ती घेणे आणि आनंदी होणे,सोफ्यावर कपडे तसेच ठेवणे,इटालियन हॉटेल (उपहारगृह) मध्ये जाऊन मलई कोफ्ता मागणे ह्या सवयींसाठी माफी माग असे माया मोनिशा ला सांगते म्हणजे साहिल परत घरी येईल.

प्रत्येक प्रसंगात सासू आणि सुनेची एकमेकांवर होणारी वरचढ पाहायला मिळते. माया म्हणते साहिल गोव्याला का गेला तिथे शाकाहारी लोकांसाठी काही खायला मिळत नाही आणि मोनिशा नी स्टील चा डब्बा पण बांधून दिलेला नाही. चेन्नई किंवा अजून दुसऱ्या ठिकाणी पळून का नाही गेला.गोव्या मध्ये नागेश अय्यर ला साहिल शी बोलताना समजते कि तो सर्वांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करत असतो तो कोणाला दुखवू शकत नाही.पुढील एका प्रसंगात माया साहिल ला सांगते कि मोनिशा नी मोठ्ठ्या पार्टी मध्ये मसाला दुध मागितले आणि चीर्स पण नाही केले सर्वांचा नियम पाळला नाही, नंतर 'चैर्स (खुर्च्या) ची काय गरज सोफा आहे ना घरी 'असा विनोद करून कोणी हसले नाही तर त्यांना चैर्स (खुर्च्या )आणि चीर्स ह्या मधला फरक स्वतःच सांगून हसत होती. शिवाय चमचा मागून दुधातील मसाला पूर्ण तोंडामध्ये येई पर्यंत खात होती अशी तक्रार सासू असलेली माया सुनेच्या विरुद्ध म्हणजे मोनिशा च्या विरुद्ध मुलाकडे करते आणि सांगते तिला समजावं कि दुध जरी घेतले तरी अशा पार्टी मध्ये चीर्स सर्वांसोबत केलेच पाहिजे.

एका प्रसंगात भाजी वाल्याला पैसे कमी करण्यासाठीचा प्रसंग दाखवला आहे, ज्यात सून मोनिशा एक रुपया वाचवण्यासाठी प्रयत्न करत असते आणि माया ला ते अजिबात पटत नाही, असे पैसे कमी करणे आपल्याला शोभत नाही हे मध्यम वर्गीय वर्तन आहे असे माया मोनिशा ला बोलते ते पण भाजी वाल्यासमोर, ते पण एक रुपया साठी कारण पाव किलोच भाजी हवी असते.

शिवाय भाजी वाल्याला देखील इंग्रजी मध्ये भाज्यांची नावे सांगून भाजी मागितली जाते. मोनिशा प्रसंग वर्णन करते कि लेडीज फिंगर ऐवजी ति भाजी वाल्याला भेंडी द्या असे म्हणते तर सासू माया तिला अपशब्द का वापरतेस असे विचारते. ह्या भागाच्या शेवटी नागेश अय्यर साहिल च्या सांगितलेल्या त्यांच्या अनुभवावर पुस्तक प्रकाशित करतात ज्यात नावे बदलली जातात ती सर्व जण वाचताना दाखवतात. वाचतांना प्रत्येक जण आपले मत मांडतो, त्यात मोनिशा सांगते १५० रुपये किमत आणि पाने ९० च आहेत,त्यात देखील वाचण्याच्या वेगावरून मोनिशा सांगते ति हळूहळू वाचत आहे अजून तिसरेच पान सुरु आहे तर माया म्हणते प्रत्येक पान हळू वाचून पानांचे पैसे वसूल करत आहे. एकंदर माया, हर्षवर्धन, रोसेश ची पोशाख घालण्याची पद्धत, बोलणे, एक मेकांना मिठी मारून भेटण्याची पाश्चिमात्य पद्धत, वर्तन ह्या सर्वांवरून ती उच्च वर्गातील आहे हे कळून येते. शिवाय साराभाई माया आणि हर्षवर्धन ह्यांच्या घराची रचना, घरातील वस्तू, त्या मांडण्याची पद्धत ह्या सगळ्यातून उच्च वर्गाची संस्कृती ठळक पणे आधोरेखित होताना दिसते.

**विश्लेषण आणि निष्कर्ष:** साराभाई विरुद्ध साराभाई ह्या मालिके मध्ये माया आणि हर्षवर्धन ह्यांचे घर, घरातील किमती सामान, त्यांची विशिठ्य प्रकारची रचून ठेवण्याची रचना, माया चा पोशाख ज्यामध्ये घरामध्ये देखील अत्यंत महाग आणि चांगल्या गुणवत्तेची साडी तसेच नवीन आधुनिक पद्धतीचा ब्लाउज तिनी घातलेला दाखवला आहे, घरात कुठेही पसारा दिसत नाही, सर्व आधुनिक पद्धतीचे ह्यातून हे कुटुंब उच्च आर्थिक वर्गातील आहे हे समजते.कथा सुरु होते ती गोव्याच्या समुद्र किनाऱ्यावरून आणि जेव्हा साहिल हर्षवर्धन आणि माया चा मोठ्ठा मुलगा त्याच्या परिवाराबद्दल एका लेखकाला सांगायला सुरुवात करतो. साधी कौटुंबिक आणि विनोदी शैलीची भासणारी हि मालिका वर्ग अस्मिता आणि वर्ग संघर्ष देखील सादर करते. एका प्रसंगात जेव्हा साहिल घर सोडून जातो तेव्हा हि बातमी हर्षवर्धन भ्रमणध्वनी वर कोणाला तरी तो हर्षवर्धन दि ग्रेट बोलत आहे असे म्हणून अत्यंत सहजतेने सांगत असतो त्या वरून दिसून येते कि आर्थिक दृष्ट्या प्रभावी असले कि व्यक्ती स्वतःला खूप मोठ्ठा समजायला लागतो. तो सांगतो कि मुलगा साहिल पुन्हा घर सोडून गेला आहे सर्व काळजी करत आहे, आणि ह्या घर सोडण्यामुळे माया म्हणजे त्याची आई काळजी करत आहे आणि तिच्या डोक्यात कोंडा झाला आहे.असे माया हे ऐकून लगेच भ्रमणध्वनी घेते आणि स्पष्टीकरण देते कि मुलगा घर सोडून गेलाय पण माझ्या डोक्यात कोंडा झालेला नाही.पुन्हा ह्या शब्दातून समजते कि उच्च लोकांना घर सोडणे किंवा आपल्या ला जे हवे त्या साठी जे योग्य वाटेल ते करणे चुकीचे वाटत नाही. शिवाय माया एक आई आहे पण तिला मुलाच्या काळजी पेक्षा तिच्या डोक्यात कोंडा आहे हे लोकांना सांगणे चुकीचे वाटते. ह्यावरून असे दिसते कि नात्यांपेक्षा लोकांच्या नजरेत चांगली प्रतिमा राहणे हे उच्च वर्गाला महत्वाचे वाटते. दुसऱ्या प्रसंगात साहिल ची पत्नी मोनिशा तामिळ वर्तमान पत्रात साहिल घरी परत येण्यासाठी बातमी छापते, माया साहिल ची आई जेव्हा हे पाहते आणि कारण विचारते तेव्हा मोनिशा सांगते इंग्रजी आणि हिंदी वर्तमानपत्रापेक्षा तामिळ वर्तमानपत्रात बातमी देण्यासाठी पैसे कमी लागतात आणि हि बातमी चार दिवस वर्तमान पत्रात छापून येईल. ह्या वरून मोनिशा हि मध्यम वर्गातील जे सामाजीकरण आहे त्याच पद्धतीने वर्तन करताना दिसते. तिच्या विचारांवरून समजते कि प्रत्येक ठिकाणी पैसा जितका वाचवता येईल तितका वाचवून ठेवला पाहिजे. तेव्हा हर्षवर्धन मोनिशा ला सांगतो कि प्रार्थना कर साहिल ४ दिवस येऊ नये नाहीतर वर्तमान पत्रात जाहिरात देण्यासाठीचे पैसे वाया जातील, मोनिशा देखील हे मान्य करताना दाखवली आहे कि, पैसे व्यर्थ जाऊ नयेत. मोनिशा ला साहिल म्हणजे तिचा नवरा घरी येण्यापेक्षा पैसा चार दिवसाचा वाया जाऊ नये हि काळजी जास्त आहे. सहजतेने तिच्या वर्तनात ते दिसून येते. तसेच तामिळ वर्तमान पत्रातील जाहिरातीचा कमीत कमी आणि मोजका मजकूर, खाण्यात तेल आणि मसाला जास्त घालणे,सिग्नल वरून स्वस्तातील अगरबत्ती घेणे आणि आनंदी होणे,सोफ्यावर कपडे तसेच ठेवणे,इटालियन हॉटेल (उपहारगृह) मध्ये जाऊन मलई कोफ्ता मागणे ह्या सवयींसाठी माया मोनिशा ला जबाबदार ठरवते आणि ह्या मधम वर्गीय सवयींमुळे साहिल घर सोडून गेला असे सांगताना दिसते. मध्यम वर्गीय कुटुंब प्रामुख्याने खाण्यापिण्याच्या बाबींवर खर्च करताना दिसते त्यामुळे आरोग्याकडे थोडे दुर्लक्ष होताना दिसते ह्या उलट उच्च वर्गाची खाण्याची पद्धत पहिली तर त्यांच्या खाण्यामध्ये पौष्टिक घटक, ड्रायफ्रुटस, महागडे तेल नसलेले, कमी मसालेदार पदार्थ दिसून येतात. तसेच सिग्नल वर अगरबत्ती किंवा अन्य बाबी अशा स्वस्तात आणि कुठूनही विकत घेणे हि सवय उच्च वर्गात दिसून येत नाही, कनिष्ठ वर्गात तर इतके पैसे उपलब्ध पण नसतात हे लक्षात येते. सोफ्यावर किंवा इतरत्र सर्व सामान मोनिशा च्या घरात विखुरलेले खूप दृश्यांमध्ये दिसते ज्यात समजते कि ती जितकी जागा आहे तितक्या जागेचा पुरेपूर वापर करते शिवाय ज्या बाबी स्वस्त किंवा फुकट मिळत आहेत त्या सर्व तिने घरात ठेवल्या आहेत . आहे त्या सामानाचा देखील ति काळजीपूर्वक आणि पुरेपूर उपयोग करून घेताना दिसते.तसेच इटालियन उपहारगृहात पदार्थ खूप महाग असतात आणि वेगळे असतात मध्यम वर्गातील

व्यक्ती ठराविकच उपहारगृहात जाते आणि जे किमतींनी परवडेल आणि सवयीचे असेल तेच खाणे पसंत करते.मलई कोफ्ता हेच तिच्या साठी महाग आणि मोठ्ठ्या उपहारगृहात गेल्यावर खायचा पदार्थ असेल. ह्या सर्व बाबींवरून लक्षात येते कि ती आता उच्च वर्गात जरी असली तरी तिचे बालपणापासून जे सामाजीकरण झाले ते आजही तसेच आहे आणि त्या प्रमाणे ति सहज वर्तन करते. उद्दिष्ट्य१.व्यक्ती स्वतःच्या सामाजीकीकरणानुसार वर्ग स्तरीकरणा प्रमाणे वर्तन सहजपणे करताना दिसून येतो काय हे इथे स्पष्ट होते.

साहिल गोव्याला का गेला तिथे शाकाहारी लोकांसाठी काही खायला मिळत नाही आणि मोनिशा नी स्टील चा डब्बा पण बांधून दिलेला नाही. ह्या विधानात दिसते कि सहसा उच्च वर्गातील लोक महागड्या ठिकाणी जाणे, महागड्या वस्तू घेणे, खाणे हे पसंत करतात त्यांना पैसे किती लागतील ह्याची काळजी करावी लागत नाही त्यामुळे त्यांचे राहणीमान पण खूप महागडे असते. ह्याउलट मध्यम वर्गीय लोक फारच कमी वेळेस घराच्या बाहेर जाण्याची फिरण्याची वेळ येते, शिवाय खर्च खूप नको म्हणून ते घरूनच जितक्या बाबी घेता येतील त्या घेऊन जातात. घरात असताना परत कशाला तेच घेण्यात पैसे घालवायचे अशी त्यांची धारणा सामाजीकरणातूनच झालेली असते. खाद्यपदार्थ पण ते स्टील च्या डब्ब्यात नेतात, प्लास्टिक वेगळे पैसे खर्च करून ते टाकून देणे त्यांना आवडत नाही. हे माया च्या संवादातून आणि मोनिशा च्या संवादातून समजते.पार्टी च्या प्रसंगात उच्च वर्गाच्या बाबत मोनिशा ला फारशी माहिती नसल्यामुळे तिचे वर्तन माया ला आवडत नाही. मध्यम वर्गा प्रमाणे मसाला दुध ते पण सर्व मसाला संपवणे हि सवय आणि उच्च वर्गाच्या पार्टी मधील वर्तन हे दाखवते कि व्यक्ती कुठे जरी असली तरी तिला तिच्या परिस्थितीनुसार वर्तन करणे जास्त सोयीस्कर वाटते आणि नकळत ते होते. बाकी वर्तन शिकून घ्यावे लागते तरी पूर्णपणे व्यक्ती त्याची विचारसरणी बदलवू शकत नाही. ह्या वरून उद्दिष्ट्य २.व्यक्ती एखादी गोष्ट स्वीकारतांना स्वतःची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती समजून घेऊनच त्या अनुसार वर्तन करतो हे स्पष्ट होते.

**संदर्भ:**


1. Unnati Singh, (2024), Marxism in today's world, International Journal of Political Science and Governance 2024; 6(2): 134-136.
2. Vijay Devidas Matkar. (2023), Critique to Capitalism in the Movie Super-30: A Marxist Approach, Epitome: International Journal of Multidisciplinary Research,.
3. Mohammad Aminur Rahman, (2015) Marxist Reading of Political Cinema: A Case Study on Costa-Gavras Films", IOSR Journal of Humanities and Social Science, Vol. 20 (07).
4. Chuck Kleinhans, (1998), Marxism and Film, an essay for The Oxford Guide to Film Studies, ed. Pamela Church Gibson and John Hill (Oxford: Oxford University Press).

# समाजाचे मानसिक आरोग्य: समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून एक संशोधन

**डॉ अंजली जोशी टेंभुर्णीकर** उपप्राचार्य आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**गोषवारा:** मानसिक आरोग्य हा आधुनिक समाजातील अत्यंत महत्त्वाचा परंतु दुर्लक्षित सामाजिक प्रश्न आहे. सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक बदलांमुळे व्यक्तींच्या मानसिक स्थितीवर व्यापक परिणाम होत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात मानसिक आरोग्याकडे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नसून सामाजिक रचना, कौटुंबिक संबंध, आर्थिक अस्थिरता, बेरोजगारी, स्पर्धात्मक जीवनशैली, सोशल मीडियाचा दबाव आणि सामाजिक आधारव्यवस्थेच्या कमतरतेशी निगडित सामाजिक घटना आहे. अभ्यासातून युवक, महिला, विद्यार्थी, कामगार आणि शेतकरी या गटांमध्ये तणाव, नैराश्य, चिंताग्रस्तता आणि व्यसनाधीनता यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. शहरी जीवनातील स्पर्धा, शेतकरी आत्महत्या आणि सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना संस्कृती ही मानसिक आरोग्याच्या गंभीरतेची उदाहरणे आहेत. तसेच एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार आत्महत्या व गुन्हेगारीत मानसिक ताणाचा महत्त्वाचा संबंध दिसून येतो. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी जनजागृती, समुपदेशन सेवा, सामाजिक आधार गट आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता अधोरेखित होते.

**कीवर्ड्स:** मानसिक आरोग्य, समाजशास्त्र, सामाजिक ताणतणाव, नैराश्य, चिंताग्रस्तता, सामाजिक रचना, मानसिक विकार इ.

**प्रस्तावना:** मानसिक आरोग्य हा आजच्या युगातील सर्वात महत्त्वाचा पण सर्वाधिक दुर्लक्षित आरोग्यघटक मानला जातो. समाज जसा विविध सामाजिक, आर्थिक, तांत्रिक बदलातून जातो आहे, तसतसे व्यक्तींच्या मानसिक स्थितीवरही या बदलांचा गंभीर परिणाम होत आहे. समाजशास्त्र या शास्त्रात मानसिक आरोग्याकडे केवळ वैयक्तिक समस्या म्हणून न पाहता, ती एक व्यापक सामाजिक घटना, सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, सामाजिक ताणतणाव आणि जीवनपद्धतीशी घट्ट निगडित बाब म्हणून पाहिली जाते. आजच्या समाजात तणाव, नैराश्य, चिंताग्रस्तता, कौटुंबिक अस्थिरता, बेरोजगारी, स्पर्धात्मक जीवन, सोशल मीडियाचा दबाव, नातेसंबंधातील ताण, मादक पदार्थांचे व्यसन इत्यादी अनेक गोष्टींमुळे मानसिक आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. विशेषतः युवक, महिला, कामगार, शेतकरी, शहरी गरीब, विद्यार्थी, वृद्ध या गटांमध्ये मानसिक आरोग्याकडे वैज्ञानिक रीत्या लक्ष देण्याची गरज अधिक आहे. या शोधनिबंधात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मानसिक आरोग्याचे महत्त्व, घटक, सामाजिक परिणाम, उदाहरणे, तक्ते व आकृत्यांसह सविस्तर विश्लेषण सादर केले आहे.

**विषयाचे महत्त्व:** मानसिक आरोग्य सामाजिक स्थैर्य ठरवते. मानसिक आरोग्य चांगले असेल तर व्यक्तीचे निर्णय घेणे, नातेसंबंध, कामकाज, भावनांचे नियंत्रण, सामाजिक सहभाग हे सर्व घटक सकारात्मक मार्गाने विकसित होतात. समाजात स्थैर्य आणि शांततेचा विकास शक्य होतो. आर्थिक प्रगतीवर मानसिक आरोग्याचा थेट परिणाम होतो. मानसिक आरोग्य बिघडलेल्या व्यक्तींची उत्पादनक्षमता कमी होते. नोकरीतील गैरहजेरी, अपघात, निर्णय क्षमता कमी होणे, औषधोपचार खर्च वाढणे यामुळे देशाच्या अर्थकारणावरही परिणाम होतो.

**कौटुंबिक जीवनावर प्रभाव:** तणावग्रस्त किंवा नैराश्यातील पालकांमुळे मुलांचे संगोपन, शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास ह्यावरही नकारात्मक परिणाम होतो. समाजातील गुन्हेगारी, हिंसा, आत्महत्या यांचे प्रमाण मानसिक आरोग्याशी संबंधित असतात. अध्ययनानुसार मानसिक तणाव, एकलकोंडेपण, आर्थिक ताण, सामाजिक आधाराचा अभाव हे घटक गुन्हेगारी वाढीस कारणीभूत ठरतात.

**आरोग्यासंदर्भातील जागरूकता वाढविणे आवश्यक:** मानसिक आरोग्याविषयी अद्याप समाजात गैरसमज, अज्ञान आणि कंलक *(Stigma)* आहे. या विषयाला सामाजिक चर्चेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे महत्त्वाचे आहे.

**संशोधन उद्दिष्ट्ये:** १) कुटुंब आणि समाजातील मानसिक ताण - तणावाची कारणे शोधणे, २) समाजात मानसिक आरोग्य कसे जपले जाते याचा शोध घेणे, ३) समाजातील मानसिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन उपाययोजना सुचवणे.

**विषयातील मानवीय मुद्दे:** समाजातील प्रत्येक व्यक्ती मानसिक आरोग्याच्या समस्यांना वेगवेगळ्या पद्धतीने सामोरा जातो. त्यातील काही मानव-केंद्रित मुद्दे असे—

१) भावनिक ताण *(Emotional Stress):* कामाचा वाढता ताण, स्पर्धात्मक वातावरण, नोकरीची अनिश्चितता यामुळे भावनिक ताण वाढतो.

२) सामाजिक एकलकोंडेपणा *(Social Isolation):* मोबाईल, सोशल मीडिया वाढल्याने प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. त्यामुळे एकटेपणा आणि मानसिक असंतुलन

वाढते.

३) कौटुंबिक ताणतणाव: पती-पत्नीचे वाद, आर्थिक अडचणी, पिढ्यांतील संघर्ष, विभक्त कुटुंब ही मानसिक आरोग्यास धोका निर्माण करणारी कारणे आहेत.

४) बेरोजगारी मुळे निर्माण होणारे तणाव: तरुणांमधील तणाव, आत्महत्येचे प्रमाण बेरोजगारीशी थेट संबंध ठेवते.

५) विद्यार्थी आणि परीक्षेचा ताण: भारतीय समाजात शैक्षणिक स्पर्धा तीव्र असल्याने विद्यार्थी तणाव, नैराश्य किंवा आत्महत्येच्या प्रवृत्तीला बळी पडतात.

६) महिला आणि मानसिक आरोग्य: महिलांना घरातील आणि बाहेरील दुहेरी जबाबदाऱ्या, सामाजिक नियम, हिंसा, छळ, आर्थिक निर्बंध यामुळे मानसिक स्वास्थ्यावर मोठा ताण येतो.

**उदाहरणासहित स्पष्टीकरण:** १) शहरी जीवन आणि तणाव: मुंबई, पुणे, दिल्ली सारख्या शहरांत वाढलेले जीवनमान, वाहतूक कोंडी, प्रदूषण, एकलकोंडेपणा अधिकाधिक स्क्रीन टाईम यामुळे लोकांमध्ये तणावाचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा जास्त आढळते. २) शेतकरी आत्महत्या: आर्थिक कर्जबाजारीपणा, हवामानातील अनिश्चितता, उत्पन्नाची तूट, सामाजिक आधाराचा अभाव यामुळे मानसिक तणाव वाढून अनेक शेतकरी आत्महत्या करतात. ३) सोशल मीडिया आणि मानसिक आरोग्य: इन्स्टाग्राम, फेसबुकवरील "Perfect Life" च्या तुलना संस्कृतीमुळे नैराश्य, ईर्षा, हीनभावना वाढतात.

**तक्ता: मानसिक आरोग्याचे प्रमुख प्रकार आणि परिणाम**

| मानसिक समस्या | प्रमुख कारणे | व्यक्तीवरील परिणाम | समाजावर परिणाम |
|---|---|---|---|
| तणाव | कामाचा ताण, कौटुंबिक ताण | निद्रानाश, चिडचिड, मानसिक थकवा | उत्पादकता कमी, कामातील त्रुटी |
| नैराश्य | नुकसान, अपयश, भावनिक धक्का | आत्महत्येचा धोका, निराशा, सामाजिक अलिप्तता | सामाजिक अस्थिरता, कुटुंबातील तणाव |
| चिंताग्रस्तता | स्पर्धा, अनिश्चितता, असुरक्षितता | निर्णयक्षमता कमी, भीती, अस्वस्थता | नातेसंबंधांमध्ये तणाव, कार्यक्षमता घट |
| व्यसन | सामाजिक दबाव, ताण, चुकीची संगत | आरोग्य बिघाड, आर्थिक नुकसान, वर्तनात बदल | गुन्हेगारी वाढ, सामाजिक अस्थिरता |

चार्ट: Mental Health Prevalence

वरील चार्ट हा विविध मानसिक समस्यांचे समाजातील साधारण प्रचलन दर्शवतो (नमुना डेटावर आधारित).

**वर्तमानकाळाशी संबंध:** कोविड-१९ नंतर मानसिक समस्यांचे प्रमाण ०३ पट वाढले आहे.लॉकडाऊन, बेरोजगारी, मृत्यूचे प्रमाण, घरातील तणाव यामुळे मानसिक विकार वाढले आहेत. डिजिटल युगामुळे नवीन मानसिक समस्या वाढल्या उदा. स्क्रीन ॲडिक्शन, सायबर बुलिंग, माहितीचा अतिरेक. युवकांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक झाले आहे. NCRB नुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली आहे. कामकाजाचा ताण वाढला आहे. IT कंपन्यात "Burnout" वाढत आहे. सरकारी आणि खाजगी कार्यालयांमधून कामाच्या आणि इतर होणारा संघर्ष, त्यातून होणाऱ्या पोलीस केस, न्यायप्रविष्ठ प्रकरणे यांची संख्या मोठी आहे. त्याचप्रमाणे कौटुंबिक वाद, औद्योगिक वाद, मुले आणि स्त्रियांवरील अत्याचार, व्यसनाधीनता, दहशतवाद, धर्मांधता, आत्महत्या आणि हत्यांचे वाढते प्रमाण या सर्वांमधून समाजातील मानसिक ताण तणाव वाढल्याचे स्पष्टपणे समोर येत आहे. राष्ट्रीय क्राइम रिकॉर्ड्स ब्युरो (NCRB) यांनी दिलेल्या आकडेवारी हेच स्पष्ट करतात.

**तक्ता: मानसिक ताण, व्यसन व गुन्हेगारी - NCRB संदर्भातील आकडेवारीचा सारांश**

| NCRB अधारित आकडेवारी / संकेत घटक | आकडेवारी (२०२३) | स्त्रोत |
|---|---|---|
| एकूण गुन्हेगारी | ६.२४ लाखांहून अधिक प्रकरणे; ७.२ टक्के वाढ | *Crime in India 2023 Report* |
| कारागृहातील मानसिक आजार | ५.३० लाख बंदिवानांपैकी ९,०९५ (१.७ टक्के) मानसिक आजारग्रस्त | *NCRB Prison Statistics India 2023* |
| आत्महत्या (Suicides) | १,७१,४१८ प्रकरणे | *NCRB Accidental Deaths & Suicides 2023* |
| शेतकरी/कृषी कामगार आत्महत्या | १०,७८६ प्रकरणे | *NCRB Suicide Data 2023* |
| कारागृहातील आत्महत्या (महाराष्ट्र) | ७ आत्महत्येने मृत्यू | *NCRB 2023 Custodial Deaths* |
| गुन्ह्यांचे प्रमुख प्रकार | हत्या, बलात्कार, अपहरण, चोरी, ड्रग्स संबंधित गुन्हे इ. | *Crime in India Summary* |
| ड्रग/नशीले पदार्थ संबंधित गुन्हे | दर १ लाख लोकसंख्येमागे ८.६ प्रकरणे | *NCRB Crime in India 2023* |

**मानसिक ताण / व्यसन व गुन्हेगारीचा परस्पर संबंध**

महत्त्वाचे मुद्दे (धोरणात्मक संदर्भ): NCRB Prison Statistics नुसार, कारागृहातील कैद्यांमध्ये मानसिक आजार किंवा मानसिक ताणाचे निदान झालेले आकडे दिसतात. हे मानवी आणि गुन्हेगारी संदर्भात गंभीर स्थिती सूचित करतात.

✓आत्महत्येची संख्या सामान्य सामाजिक मानसिक आरोग्याच्या गंभीरतेचे प्रतिक आहे, आणि मानसिक ताण/दु:ख, कुटुंब-समस्या, व्यसन/नशा इ. कारणांसह गेलेले गुन्हे व मृत्यू पुढे येतात.

✓ शेतकरी आत्महत्यांची संख्या आर्थिक ताण आणि मानसिक तणावाचा प्रत्यक्ष परिणाम मानला जातो, जे सामाजिक तणाव, कर्ज / बेरोजगारी / उत्पादन समस्यांशी जोडलेले असते.

✓ ड्रग व नशीले पदार्थ संबंधित गुन्हे यांचा डेटा प्रत्यक्ष मानसिक आजाराच्या आकडेवारीइतका विस्तृत NCRB मध्ये उपलब्ध नसलाही, या गुन्ह्यांमध्ये व्यसनाचा महत्त्वाचा भाग असतो.

*NCRB* ची अधिकृत अहवाल *(Crime in India, Prison Statistics India, Accidental Deaths & Suicides in India)* मानसिक आजार आणि गुन्हेगारी यांच्यात थेट “correlation table” उपलब्ध करत नाहीत. उपलब्ध आकडेवारी वर आधारित संदर्भात्मक तक्ता हा सामाजिक, न्यायिक आणि आरोग्य-व्यवस्था या क्षेत्रांच्या दृष्टीने माहितीपूर्ण आहे.

**निरीक्षणे:** मानसिक आरोग्याचा प्रश्न वैयक्तिक नसून सामाजिक आहे. समाजातील आर्थिक - सामाजिक विषमता वाढेल तसा मानसिक तणावही वाढतो. कौटुंबिक आधार असलेल्या व्यक्तींचे मानसिक आरोग्य तुलनेने चांगले असते. सोशल मीडिया मानसिक आरोग्यावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम घडवते. शहरी भागात तणावाचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा जास्त दिसते. मानसिक आरोग्याविषयी जनजागृतीची पातळी अत्यंत कमी आहे. अज्ञानामुळे लोक उपचार घेत नाहीत. परंतु मानसिक ताणतणाव निवारणासाठी विविध प्रकारचे गुरु, महाराज यांचा आधार घेतला जातो. आर्ट ऑफ लिविंग, पतंजली योग, गौर गोपाल दास, अनिरुद्धाचार्य अशा विविध उपचार पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर अवलंब होतो. शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे येथे मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध नसते.

**निष्कर्ष:** समाजशास्त्राच्या परिभाषेत मानसिक आरोग्य हा एक व्यापक सामाजिक मुद्दा आहे. व्यक्तीच्या भावनिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घटकांनी मानसिक आरोग्याची पायाभरणी होते. समाजातील ताणतणाव, विषमता, स्पर्धा, कौटुंबिक रचना, जीवनमान यांचे मानसिक आरोग्यावर खोलवर परिणाम होतात. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी समाजाला पुढील उपाययोजना आवश्यक: जनजागृती मानसिक आरोग्य तज्ज्ञांची उपलब्धता, शाळा-महाविद्यालयांत समुपदेशन, सामाजिक आधार गट, ताण व्यवस्थापन कार्यक्रम, सरकारी धोरणे आणि मानसिक आरोग्य सेवा, मानसिक आरोग्याचे संरक्षण व संवर्धन हे एकंदर समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे.

 ISSN 2230-7745 (SJIF Impact Factor - 7.88)

# सामाजिक असमानता निर्मूलनात शासकीय धोरणांची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. रमेश धोंडीराम राठोड** समाजशास्त्र विभाग प्रमुख, वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ, जि. बीड

**सारांश:** प्रस्तुत शोध निबंधात सामाजिक असमानता निर्मूलनात शासकीय धोरणांची भूमिका या विषयावर चर्चा करण्यात आलेली आहे. यात भारतीय समाजातील सामाजिक असमानतेचे स्वरूप व ती निर्मूलन करण्यासाठी शासकीय धोरणांची भूमिका यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे. जात, वर्ग, लिंग, शिक्षण, आरोग्य व प्रदेश यांच्या आधारे निर्माण झालेली सामाजिक विषमता ही ऐतिहासिक आणि संरचनात्मक स्वरूपाची असून, स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने समता, सामाजिक न्याय व समावेशक विकास ही मूल्ये स्वीकारली आहेत. आरक्षण धोरण, शिक्षणविषयक योजना, आर्थिक व सामाजिक कल्याणकारी कार्यक्रम, तसेच महिला व अल्पसंख्याक सक्षमीकरणासाठीच्या धोरणांमुळे वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यास काही प्रमाणात यश मिळाले आहे. तथापि, या धोरणांच्या अंमलबजावणीत काही त्रुटी आहेत. त्यामुळे सामाजिक असमानता पूर्णतः नष्ट न होता तिचे स्वरूप बदलत असल्याचे आढळते. त्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:** भारतीय समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय असमानतेने ग्रस्त राहिला आहे. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश व शैक्षणिक स्तर यांवर आधारित विषमता आजही समाजात दिसून येते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने समता, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकास ही मूल्ये स्वीकारली असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी विविध शासकीय धोरणे व योजना राबविण्यात आल्या आहेत. सामाजिक असमानता निर्मूलनात शासकीय धोरणे महत्त्वाची भूमिका बजावतात, यात शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि उत्पन्न वितरणासारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा करून संधींची समानता आणणे, दारिद्र्य कमी करणे आणि वंचित घटकांचे सक्षमीकरण करणे यावर लक्ष केंद्रित केले जाते, जेणेकरून सर्व नागरिकांचा सर्वांगीण विकास होईल. ही धोरणे कायद्यांद्वारे, कल्याणकारी कार्यक्रमांद्वारे आणि कर प्रणालीतील बदलांद्वारे असमानता कमी करण्याच्या उद्देशाने राबविली जात आहेत. त्यातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि या धोरणांनी सामाजिक असमानता कितपत कमी केली आहे, याचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक आहे. या दृष्टीने सामाजिक असमानता निर्मूलनात शासकीय धोरणांची भूमिका तपासण्याच्या हेतूने हा शोधनिबंध प्रस्तुत करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** सामाजिक असमानतेचे स्वरूप व कारणे समजून घेणे. सामाजिक असमानता निर्मूलनासाठी राबविण्यात आलेल्या शासकीय धोरणांचा अभ्यास करणे. शासकीय धोरणांचा विविध वंचित घटकांवर झालेला प्रभाव तपासणे. धोरणांच्या अंमलबजावणीतील मर्यादा व अडचणींचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय स्रोतच्या आधारे माहिती संकलन पद्धती वापरण्यात आली आहे. यामध्ये शासकीय अहवाल, योजना दस्तऐवज, जनगणना, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS), संशोधन निबंध, पुस्तके व नियतकालिकांचा आधार घेण्यात आला आहे. विश्लेषणासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

**सामाजिक असमानतेची संकल्पना व स्वरूप:** सामाजिक असमानता म्हणजे समाजातील विविध घटकांमध्ये संधी, संसाधने, अधिकार व प्रतिष्ठा यांचे असमान वितरण होय. भारतात सामाजिक असमानता प्रामुख्याने पुढील स्वरूपांत दिसून येते.

**जातीय असमानता:** भारतीय समाजरचनेत जातीय व्यवस्था ही सामाजिक असमानतेचा सर्वात खोलवर रुजलेला स्रोत मानली जाते. परंपरागत वर्ण-जात व्यवस्थेमुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना शिक्षण, रोजगार, जमीनधारणा, सामाजिक प्रतिष्ठा आणि राजकीय सहभागापासून दीर्घकाळ वंचित ठेवण्यात आले. अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, भेदभावपूर्ण वर्तन आणि हिंसाचार यामुळे त्यांच्या सामाजिक प्रगतीवर मर्यादा आल्या. इतर मागासवर्गीय (OBC) घटकांनाही आर्थिक व शैक्षणिक संधींचा अभाव सहन करावा लागला. स्वातंत्र्यानंतर आरक्षण धोरण, घटनात्मक संरक्षण आणि कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या असल्या, तरीही सामाजिक मानसिकतेतील भेदभाव, संसाधनांवरील मर्यादित प्रवेश आणि विकासातील प्रादेशिक तफावत यांमुळे जातीय असमानता आजही पूर्णतः नष्ट झालेली नाही.

**पुरुष-स्त्री असमानता:** पुरुष-स्त्री असमानता ही पितृसत्ताक सामाजिक संरचनेतून निर्माण झालेली आहे.

भारतीय समाजात महिलांना शिक्षण, रोजगार, मालमत्ता हक्क, निर्णयप्रक्रिया आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग याबाबत दीर्घकाळ दुय्यम स्थान दिले गेले. स्त्री-पुरुष साक्षरतेतील फरक, कामगार सहभाग दरातील तफावत, वेतनातील असमानता, तसेच घरगुती व सामाजिक हिंसाचार हे लैंगिक असमानतेचे ठळक निदर्शक आहेत. स्त्री-भ्रूणहत्या, बालविवाह आणि आरोग्यसेवांतील दुर्लक्ष यामुळे महिलांचे सामाजिक-आर्थिक स्थान अधिक दुर्बल बनते. जरी महिला सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजना राबविण्यात येत असल्या, तरी सामाजिक रूढी, मानसिकता आणि संरचनात्मक अडथळे यांमुळे लैंगिक समता अद्यापही एक मोठे आव्हान ठरते.

**आर्थिक असमानता:** आर्थिक असमानता म्हणजे समाजातील संपत्ती, उत्पन्न व संसाधनांचे असमान वितरण होय. भारतात अल्पसंख्याक लोकसंख्येकडे मोठ्या प्रमाणावर संपत्ती केंद्रीत झालेली असून, बहुसंख्य लोकसंख्या अल्प उत्पन्नावर गुजराण करताना दिसते. बेरोजगारी, असंघटित क्षेत्रातील रोजगार, कमी वेतन, जमीनधारणा व भांडवलाचा अभाव यांमुळे गरिबीची समस्या तीव्र झाली आहे. जागतिकीकरण व उदारीकरणामुळे आर्थिक वाढ झाली असली, तरी त्याचा लाभ सर्व घटकांपर्यंत समानपणे पोहोचलेला नाही. परिणामी, श्रीमंत-गरीब दरी वाढत असून सामाजिक अस्थिरतेला चालना मिळत आहे. आर्थिक असमानता ही इतर सामाजिक असमानतांना अधिक तीव्र बनवते, हे येथे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे.

**शैक्षणिक व आरोग्यविषयक असमानता:** शिक्षण आणि आरोग्य ही सामाजिक विकासाची मूलभूत साधने असली, तरी त्यांचा लाभ समाजातील सर्व घटकांना समानपणे मिळत नाही. ग्रामीण, आदिवासी व वंचित समाजघटकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असून, दर्जेदार शिक्षणसंस्थांचा अभाव दिसून येतो. खाजगी शिक्षणव्यवस्थेच्या वाढीमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण हे आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांपुरते मर्यादित राहिले आहे. त्याचप्रमाणे आरोग्यसेवांमध्येही सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेतील अपुऱ्या सुविधा, डॉक्टरांची कमतरता आणि खर्चिक खाजगी सेवा यांमुळे गरीब व ग्रामीण लोकसंख्या अधिक वंचित राहते. परिणामी, बालमृत्यू दर, मातामृत्यू दर व कुपोषण यांसारख्या समस्या सामाजिक असमानतेला अधिक गती देतात.

**ग्रामीण-शहरी विषमता:** ग्रामीण-शहरी विषमता ही विकासातील असमतोलाचे प्रतीक आहे. शहरी भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानाचा अधिक विकास झालेला दिसतो, तर ग्रामीण भागात मूलभूत सुविधांचाही अभाव अनेकदा जाणवतो. शेतीवर अवलंबून असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था अनिश्चित उत्पन्न, पाणीटंचाई, बाजारपेठेचा अभाव आणि नैसर्गिक आपत्तींच्या जोखमींनी ग्रस्त आहे. परिणामी, ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत असून सामाजिक व आर्थिक ताण निर्माण होत आहेत. शासनाने ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबविल्या असल्या, तरी अंमलबजावणीतील मर्यादा आणि प्रादेशिक असमतोल यांमुळे ग्रामीण-शहरी दरी अद्यापही कायम आहे. एकूणच, असे दिसून येते की सामाजिक असमानता ही बहुआयामी व परस्परावलंबी आहे. जात, लिंग, अर्थव्यवस्था, शिक्षण, आरोग्य आणि प्रदेश यांतील असमानता एकमेकांना बळ देतात. त्यामुळे सामाजिक असमानता कमी करण्यासाठी एकात्मिक, समावेशक आणि दीर्घकालीन धोरणांची नितांत गरज आहे.

**सामाजिक असमानता निर्मूलनासाठी शासकीय धोरणे:**

**घटनात्मक तरतुदी:** भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४, १५, १६, १७, २१ तसेच राज्याच्या धोरणनिदेशक तत्त्वांमुळे सामाजिक न्यायाचा पाया घातला गेला आहे. अस्पृश्यतेचा अंत, समान संधी व भेदभावविरोधी तरतुदी या महत्त्वाच्या आहेत. सामाजिक असमानता कमी करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने भक्कम घटनात्मक चौकट उभी केली आहे. अनुच्छेद १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समता व कायद्याचे समान संरक्षण प्रदान करतो, तर अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारे भेदभाव करण्यास मनाई करतो. अनुच्छेद १६ सार्वजनिक सेवांमध्ये समान संधीची हमी देतो आणि मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला देतो. अनुच्छेद १७ अस्पृश्यतेचा अंत करून सामाजिक समानतेच्या दिशेने क्रांतिकारक पाऊल उचलतो, तर अनुच्छेद २१ जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क सुनिश्चित करतो. यासोबतच, राज्याच्या धोरणनिदेशक तत्त्वांमुळे सामाजिक व आर्थिक न्याय, दुर्बल घटकांचे संरक्षण आणि समतावादी समाजनिर्मितीचा मार्ग प्रशस्त झाला आहे. या घटनात्मक तरतुदींमुळे सामाजिक न्याय ही केवळ नैतिक संकल्पना न राहता कायदेशीर बांधिलकी बनली आहे.

**आरक्षण धोरण:** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी शिक्षण, नोकरी व राजकीय प्रतिनिधित्वात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. या धोरणामुळे वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली असली, तरी गुणवत्तेचा प्रश्न व सामाजिक तणावही निर्माण झाले आहेत. सामाजिक असमानता निर्मूलनासाठी राबविण्यात आलेल्या धोरणांमध्ये आरक्षण धोरण हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अनुसूचित जाती,

अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी शिक्षणसंस्था, शासकीय नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्वात आरक्षणाची तरतूद करून ऐतिहासिकदृष्ट्या वंचित घटकांना समान संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या धोरणामुळे अनेक घटक सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या सशक्त झाले असून त्यांचा प्रशासन व निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला आहे. तथापि, आरक्षणामुळे गुणवत्तेचा प्रश्न, सामाजिक ध्रुवीकरण आणि राजकीयरण यांसारखे वादही निर्माण झाले आहेत. त्यामुळे आरक्षण हे केवळ लाभवाटपाचे साधन न राहता सामाजिक समतेचे प्रभावी माध्यम कसे ठरेल, यावर सातत्याने विचार होणे आवश्यक आहे.

**शिक्षणविषयक धोरणे:** शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक असमानता कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने विविध शिक्षणविषयक धोरणे व योजना राबविल्या आहेत. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट ठेवून शाळा, शिक्षक व प्रवेशसंख्या वाढविण्यात आली. मध्याह्न भोजन योजनेमुळे गरीब व वंचित कुटुंबांतील मुलांना शाळेकडे आकर्षित करण्यास मदत झाली तसेच पोषणस्तर सुधारण्यास हातभार लागला. अलीकडील राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे समावेशक, कौशल्याधिष्ठित आणि लवचिक शिक्षणव्यवस्थेवर भर देते. या योजनांमुळे शिक्षणाचा विस्तार निश्चितच झाला आहे; मात्र शहरी—ग्रामीण तफावत, दर्जेदार शिक्षणसंस्थांचा अभाव, शिक्षक गुणवत्तेतील फरक आणि डिजिटल दरी यांमुळे शिक्षणाच्या गुणवत्तेतील असमानता अद्यापही कायम आहे. या योजनांनी शिक्षणाचा विस्तार केला असला, तरी गुणवत्तेतील तफावत अजूनही कायम आहे.

**आर्थिक व सामाजिक कल्याण योजना:** सामाजिक असमानता कमी करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने विविध आर्थिक व सामाजिक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण भागातील गरीब व अकुशल मजुरांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी किमान १०० दिवसांचा रोजगार देण्याची हमी देऊन ग्रामीण कुटुंबांना उत्पन्नाचा आधार मिळतो तसेच स्थलांतर रोखण्यास मदत होते. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना अंतर्गत वृद्ध, विधवा, अपंग आणि निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य पुरवून सामाजिक सुरक्षेची हमी दिली जाते. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना गरीब व बेघर कुटुंबांना पक्के घर उपलब्ध करून देऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्याचा प्रयत्न करते. सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) ही गरिबांना स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करून देणारी महत्त्वाची योजना असून, अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ती अत्यावश्यक ठरते. या योजनांमुळे गरिबीचे प्रमाण काही अंशी कमी झाले असून, आर्थिक सुरक्षितता वाढली आहे; तथापि, लाभार्थी निवडीतील त्रुटी, भ्रष्टाचार, गळती, अपुरी अंमलबजावणी आणि प्रशासकीय अकार्यक्षमता ही मोठी आव्हाने आजही कायम आहेत. या योजनांमुळे गरिबी कमी होण्यास मदत झाली, परंतु लाभार्थी निवड व भ्रष्टाचार ही मोठी आव्हाने आहेत.

**महिला व अल्पसंख्याक धोरणे:** महिला व अल्पसंख्याक घटकांचे सक्षमीकरण हे सामाजिक समतेसाठी अत्यावश्यक मानले जाते आणि त्या दृष्टीने शासनाने विविध धोरणे स्वीकारली आहेत. बेटी बचाओ बेटी पढाओ ही योजना मुलींचे संरक्षण, शिक्षण व सक्षमीकरण यावर भर देत असून, लिंगन्याय आणि स्त्री—पुरुष समतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानली जाते. महिला स्वयं-सहायता गटांद्वारे महिलांना आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता विकास आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होते. त्याचप्रमाणे अल्पसंख्याक शैक्षणिक व आर्थिक योजना अंतर्गत शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, कर्जसुविधा व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून अल्पसंख्याक समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. या धोरणांमुळे महिला व अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक सहभागात वाढ झाली असून आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळाली आहे. तथापि, सामाजिक रूढी, मर्यादित जागरूकता आणि अंमलबजावणीतील अडचणी यांमुळे या धोरणांचा अपेक्षित परिणाम सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्यात अजूनही अडथळे जाणवतात. परंतु या धोरणांनी महिला व अल्पसंख्याकांच्या सक्षमीकरणास चालना दिली आहे. शासकीय धोरणांनी सामाजिक असमानता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले असले, तरी त्यांची अंमलबजावणी अनेकदा अपुरी ठरते. धोरणांचा लाभ प्रामुख्याने शहरी व जागरूक वर्गांपर्यंत मर्यादित राहतो. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागातील लोकांना अपेक्षित लाभ मिळत नाहीत. याशिवाय, राजकीय हस्तक्षेप, प्रशासकीय अकार्यक्षमता व निधीची कमतरता ही धोरणांची प्रभावशीलता कमी करणारी कारणे आहेत.


**आव्हाने व मर्यादा:** सामाजिक असमानता निर्मूलनासाठी तयार करण्यात आलेली शासकीय धोरणे उद्देशाने समतावादी असली, तरी त्यांची अंमलबजावणी प्रभावी नसणे ही सर्वात मोठी मर्यादा ठरते. धोरणे केंद्र व राज्य पातळीवर ठरविली जात असली, तरी स्थानिक पातळीवर त्यांची अंमलबजावणी अनेकदा अपुरी, विलंबित किंवा औपचारिक स्वरूपाची राहते. प्रशासकीय अकार्यक्षमता,

प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव आणि समन्वयाचा अभाव यामुळे धोरणांचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. परिणामी, धोरणांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचण्याऐवजी कागदोपत्रीच मर्यादित राहण्याची शक्यता वाढते. सामाजिक असमानता निर्मूलनात सामाजिक जागरूकतेचा अभाव हीदेखील एक गंभीर मर्यादा आहे. अनेक लाभार्थ्यांना स्वतःच्या हक्कांची, उपलब्ध योजनांची व त्याच्या लाभप्रक्रियेची पुरेशी माहिती नसते. निरक्षरता, माहितीचा अभाव, डिजिटल दरी आणि सामाजिक भीती यांमुळे वंचित घटक योजनांपासून दूर राहतात. परिणामी, धोरणे अस्तित्वात असतानाही त्यांचा प्रत्यक्ष लाभ मर्यादित लोकांपुरताच केंद्रित राहतो. भ्रष्टाचार व लाभार्थी गळती ही समस्या सामाजिक कल्याण योजनांच्या प्रभावशीलतेला मोठा अडथळा ठरते. लाभार्थी निवडीत पक्षपात, अपात्र व्यक्तींना लाभ मिळणे, निधीचा अपव्यय आणि मध्यस्थांमार्फत होणारी गळती यांमुळे खऱ्या गरजूंपर्यंत योजना पोहोचत नाहीत. विशेषतः सार्वजनिक वितरण प्रणाली, आवास योजना आणि रोजगार हमी योजनांमध्ये अशा त्रुटी मोठ्या प्रमाणावर आढळतात. या प्रक्रियेमुळे शासनावरील लोकांचा विश्वास कमी होतो आणि सामाजिक असमानता कमी होण्याऐवजी अधिक दृढ होण्याचा धोका निर्माण होतो.

**निष्कर्ष:** सामाजिक असमानता निर्मूलनासाठी शासकीय धोरणे अत्यावश्यक असून, ती भारतीय समाजातील समतेचा पाया मजबूत करतात. सामाजिक असमानता निर्मूलनासाठी शासकीय धोरणे महत्त्वपूर्ण असून, त्यांनी वंचित घटकांना शिक्षण, रोजगार, आर्थिक सहाय्य आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. तथापि, केवळ धोरणांची निर्मिती पुरेशी नसून, प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता, लोकसहभाग आणि सामाजिक जागरूकता यांचा समन्वय आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शासन, समाज व नागरिक यांचा संयुक्त प्रयत्न अपरिहार्य आहे. सामाजिक न्याय आणि समतेसाठी धोरणांव्यतिरिक्त प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता, स्थानिक सहभाग आणि सतत मूल्यमापन यांचा समन्वय आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१) सुभाष कश्यप, -भारतीय संविधान
२) सुरेश.पाटील, -आत्मनिर्भर भारत व आर्थिक विकास.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर,— समता आणि सामाजिक न्याय.
४) खाडिलकर उषा : विसाव्या शतकातील परिवर्तन
५) डॉ.एम.एन.श्रीवास्तव - आधुनिक भारत में जातिवाद
६) सरला महेश्वरी-नारी प्रश्न
७) प्रिता जोशी - विकास प्रशासन
८) योजना -मासिक पत्रिका




# दलित समूह : एका निर्णायक वळणावर

## लेखक : पी. जी. जोगदंड

**दलित समाजाच्या वेदना, संघर्ष, चळवळीचे टप्पे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि सक्षमीकरणाच्या दिशेने झालेला प्रवास यांचे विस्तृत चित्रण**

**ग्रंथ परिचय : प्रा. प्रियदर्शन भवरे**

पी. जी. जोगदंड हे नाव सामाजिकशास्त्र विषयाच्या अभ्यासकांना सर्वदूर परिचित आहेत. दलित चळवळीचा अभ्यास करताना त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या संदर्भाशिवाय आपणाला पुढे जाता येत नाही. दलित वुमन, दलित मूव्हमेंट इन इंडिया, न्यू इकॉनोमिक पॉलिसी अँड दलित, ग्लोबलायझेशन अँड सोशल जस्टिस, ग्लोबलायझेशन अँड सोशल मूव्हमेंटस स्ट्रगल फॉर ह्यूमन सोसायटी, दलित चळवळ: सिद्धांत आणि व्यवहार यासारख्या ग्रंथाच्या निर्मिती बरोबरच विविध चर्चासत्रामध्ये शोधनिबंधवाचन तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागातून त्यांनी सातत्याने दलित प्रश्नांवर विचार मंथन केले आहे. अलीकडेच त्यांचे "**दलितस् ॲट क्रॉसरोडस्**" या शीर्षकाचे इंग्रजी पुस्तक एबीडी प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक दलित अभ्यास, सामाजिक चळवळी आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या समकालीन मुद्द्यांवर केंद्रित आहे. हे पुस्तक संशोधन, नियतकालिके आणि संपादित पुस्तकांमध्ये प्रकाशित झालेल्या १९ शोधनिबंधांचा संग्रह आहे. या पुस्तकात दलित समाजाच्या वेदना, संघर्ष, चळवळीचे टप्पे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि सक्षमीकरणाच्या दिशेने झालेला प्रवास यांचे विस्तृत चित्रण केले आहे. हे शोधनिबंध अनुभवाधिष्ठित आधारावर आधारित असल्यामुळे त्यातील माहिती आणि त्याचे विश्लेषण अधिक उपयुक्त आणि समकालीन झाले आहे. दलितांनी वेळोवेळी प्रस्थापित विषम व्यवस्थेविरूद्ध कसा लढा दिला आणि त्यांना आलेला अनुभव हा या पुस्तकातील एक समान धागा आहे. हे पुस्तक दलितांनी स्वत:हून मांडलेल्या समस्यांचे सर्वसमावेशक चित्र सादर करते. किंबहुना, ते त्यांच्या स्वतःच्या चळवळीचे प्रवर्तक आहेत आणि म्हणूनच त्यांनी केलेले विरोध/आंदोलने हे प्रायोजित नव्हते. त्यांच्याद्वारे अनुभवलेल्या वंचिततेच्या विविध स्वरूपांचे हे विश्लेषण आहे. दलितांनी वर्चस्व आणि नियंत्रणाच्या संरचनेविरुद्ध लढे दिले आहेत, ज्यात त्यांना वेगवेगळ्या प्रमाणात यश आणि अपयश मिळाले आहे. दुर्दैवाने, या संघर्षांचे आणि त्यांच्या परिणामांचे सर्वसमावेशक आणि एकत्रित दस्तऐवजीकरण अद्याप झालेले नाही. या दृष्टीने, दलितांवरील साहित्याची दीर्घकाळ प्रलंबित असलेली गरज पूर्ण करणारे हे पुस्तक अगदी वेळेवर प्रसिद्ध झाले. हे पुस्तक चर्चेतील विषयांच्या सैद्धांतिक आणि अनुभवसिद्ध पैलूचे सविस्तर वर्णन करते. हे पुस्तक विविध विषयांच्या मोठ्या वाचक वर्गाला आकर्षित करेल. लेखकाच्या म्हणण्यानुसार या पुस्तकातील लेख त्यांच्या शैक्षणिक काळखंडात लिहिले आहे. यातील सर्व लेख समाजातील तुटलेला, वंचित आणि दडपलेला घटक म्हणजेच ‘दलित’ या विषयाभोवती केंद्रित आहेत.

पुस्तकाच्या पहिल्या भागात जागतिकीकरण आणि दलित याविषयीची चर्चा आहे. हा लेख जागतिकीकरण आणि नवीन आर्थिक धोरणे यांचा दलित समाजावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करतो. या लेखात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा (उदा. खासगीकरण, उदारीकरण) दलितांच्या जीवनावर झालेला सकारात्मक आणि नकारात्मक परिणामाची चर्चा केली आहे. माहिती तंत्रज्ञान, सेवा क्षेत्रात संधींची उपलब्धता हे काही सकारात्मक परिणाम तर सरकारी नोकऱ्यांतील घट, संघटित क्षेत्रातील रोजगारावर परिणाम आणि सरकारी कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च कमी होण्याची शक्यता हे काही नकारात्मक पैलू आहेत. दलित समाज, जो लोकसंख्येच्या सुमारे १६ टक्के आहे; त्याला जातीव्यवस्थेने शतकानुशतके वंचित ठेवले आहे. त्याची आर्थिक स्थितीही कमकुवत आहे. शिक्षण, आरोग्य, उद्योग, बँकिंग व इतर क्षेत्रांमध्ये सरकारचे नियंत्रण कमी झाल्याने, तसेच खाजगीकरण वाढल्याने, दलितांचा रोजगार व इतर बाजारपेठांवरील प्रवेश आणखी कठीण

झाला आहे. उपेक्षित समूहांच्या संदर्भात केंद्र व परिघाचे मुद्दे याची चर्चा केली असून येथे जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता कशी वाढते, याचाही परामर्श घेतला आहे. केंद्र (*Core)* हा जागतिक अर्थव्यवस्थेचा आणि विकासाचा लाभ घेणारा गट (उदा. उच्च-जाती आणि उच्च-वर्गीय) आणि परिघ (*Periphery)* हा  या लाभांपासून वंचित राहिलेला किंवा दुर्लक्षित झालेला गट (उदा. दलित आणि उपेक्षित समूह). जागतिकीकरणामुळे उपलब्ध संसाधने आणि संधी केंद्रात जमा होतात, ज्यामुळे परिघावरील उपेक्षित समूहांचे जीवन अधिक कठीण होते. त्याचबरोबर विषमतेचे नवे नवे प्रकार निर्माण झाले आणि श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी वाढत गेली.

पुस्तकातील दुसऱ्या भागात दलित चळवळींच्या विविध पैलूंचे, त्यांच्या स्वरूपाचे आणि सामाजिक बदलात त्यांच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. शतकानुशतकांच्या शोषणामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांत दलित चळवळी उभ्या राहिल्या. आत्मसन्मान, समानता, प्रतिष्ठा आणि ओळख या मुख्य मागण्यांभोवती आंदोलनांची घडी बसली. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत दलित समाजाला बदल जाणवू लागले. दलित लेखकांनी दलित साहित्य चळवळ उभी केली. कविता, कथा, आत्मचरित्रे, नाटके या माध्यमातून त्यांनी आपल्या अनुभवांना आवाज दिला. त्यांचे लेखन हे केवळ मनोरंजनासाठी नसून प्रतिकार व संघर्ष यांची भाषा होते. तरीही, आजच्या काळात दलित चळवळीसमोर नेतृत्वाचा अभाव, जबाबदारीचा प्रश्न आणि चळवळीतील ठप्पपणा दिसतो. *'महाराष्ट्रातील दलित चळवळी: समाजशास्त्रीय दृष्टिकोन'* या लेखात दलित चळवळींचा समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून परामर्श लेखकाने घेतला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील चळवळ आणि नंतरच्या दलित पँथर चळवळीसारख्या महत्त्वपूर्ण टप्प्यांचा अभ्यासही यात केलेला आहे. या चळवळींनी महाराष्ट्रातील जातीव्यवस्थेचे स्वरूप आणि राजकीय समीकरणे कशी बदलली, यावर लक्ष केंद्रित केले आहे. दलित चळवळ ही केवळ हक्क मिळवण्यासाठी नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेत मूलभूत बदल घडवण्याच्या तीव्र इच्छेतून निर्माण झाली आहे, हे येथे स्पष्ट केले आहे. केवळ आर्थिक सुधारणा नव्हे, तर सामाजिक समता, आत्मसन्मान आणि जाती-भेदभावाचा अंत करणे हे मुख्य उद्दिष्ट दलित चळवळीचे आहे. दलित चळवळ: स्वरूप आणि परिणाम या शोधनिबंधात लेखकाने दलित चळवळींच्या कार्य पद्धती (उदा. सामूहिक निदर्शने, शिक्षण आणि राजकारण) आणि त्यांचे दीर्घकालीन परिणाम तपासले आहे. दलितांमध्ये शैक्षणिक जागृती, राजकीय चेतना वाढवणे आणि संवैधानिक हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे तसेच शांततापूर्ण मार्ग विरुद्ध अधिक आक्रमक दृष्टिकोन याचीही चर्चा केली आहे. 'महाराष्ट्रातील दलितांमध्ये विरोधाची संस्कृती' या लेखात महाराष्ट्रातील दलितांनी विरोध करण्याची एक विशिष्ट संस्कृती कशी विकसित केली, याचे चित्रण केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर आधारित सामाजिक संघटनेची शक्ती, शिक्षणाचे महत्त्व आणि साहित्य व कलेचा उपयोग (उदा. लोकनाट्य, साहित्य) करून जाती भेदभावावर, विषमतेवर आवाज उठवणे; हा विरोधाचा सांस्कृतिक पाया दलिताना सतत आणि प्रभावीपणे संघर्ष चालू ठेवण्यासाठी प्रेरित करतो. दलित चळवळीचे विश्लेषण करताना लेखकाने 'सापेक्ष वंचना सिद्धांत' (*Theory of Relative Deprivation)* वापरला आहे. या सिद्धांतानुसार लोकांना फक्त वास्तविक दारिद्र्यामुळे नव्हे, तर इतरांशी तुलना करताना जाणवणाऱ्या मागासलेपणामुळे संघर्षाची प्रेरणा मिळते. आज मात्र दलित चळवळ काही अडचणींचा सामना करत आहे. नव्या नेतृत्वाची कमतरता वा संकट, उत्तरदायित्वाची कमतरता आणि चळवळीत जाणवणारा ठप्पपणा (*stagnation)* या कारणांमुळे ही चळवळ आज सर्वसामान्य दलितांच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडू शकत नाही, अशी चिंता व्यक्त केली जाते. म्हणजेच, दलित चळवळीने जरी ऐतिहासिक कामगिरी केली असली, तरी नव्या काळात नवे धोरण, नवे नेतृत्व, नवे प्रश्न आणि नवे भाष्य आवश्यक आहे, असे लेखकाचे मत आहे.

तिसऱ्या भागात लेखकाने आरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संविधानात SC-ST साठी अनेक संरक्षणात्मक तरतुदी आहेत. नोकऱ्या, शिक्षण व राजकारणातील आरक्षण हे त्यातील प्रमुख आहे. ७० वर्षांत या धोरणाने अपेक्षे इतके परिणाम  दिले नसले तरी, एक दलित मध्यमवर्ग उभा राहिला आहे ही एक आशादायक घटना आहे. आरक्षणामुळे काहींना नोकरी, सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. पण १९९१ नंतर सरकारी क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्याने दलितांच्या रोजगाराच्या संधीही घसरल्या. तरीही, 'सक्षमीकरण' म्हणजे आत्मविश्वास, स्वावलंबन आणि हक्कांसाठी लढण्याची क्षमता ही दलित समाजात मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. 'नोकरीतील आरक्षण: समस्या आणि तथ्ये' हा लेख भारतातील सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाच्या धोरणाचे सखोल विश्लेषण करतो. भारताच्या संविधानात अनुसूचित जाती (*SC)* आणि अनुसूचित जमाती (*ST)* साठी अनेक संरक्षणात्मक तरतुदी आहेत. नोकरीत, शिक्षणात आणि राजकीय प्रतिनिधित्वात त्यांना आरक्षण दिले आहे. संविधानाने दलितांच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासाची गरज स्पष्टपणे

मान्य केली आहे. या विभागात (प्रकरणे ०८ - १०) या सर्व तरतुदींचा आणि योजनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. गेल्या सात दशकांत या धोरणामुळे काही अपेक्षित (*intended*) आणि काही अनपेक्षित (*unintended*) बदल झाले. जरी अंमलबजावणी अनेकदा अपुरी किंवा कमकुवत असली, तरी दलित मध्यमवर्ग म्हणून ओळखला जाणारा एक छोटा, पण महत्त्वाचा घटक उभा राहिला आहे. म्हणूनच, आरक्षण धोरण हे दलित समाजात सामाजिक गतिशीलता घडवून आणणारे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे.

आरक्षणाचे ऐतिहासिक मूळ आणि घटनात्मक आधार (*Article 16 (4)*) याविषयीची चर्चा करून आरक्षणाच्या अंमलबजावणीतील त्रुटी, 'क्रीमी लेयर' बाबतचे वादविवाद, आणि आरक्षणाचे फायदे खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत आहेत की नाही याबद्दलचे प्रश्न यावरील मांडणी यात केली आहे. दलित समाजाला राजकीय प्रतिनिधित्व आणि प्रशासनात सहभाग मिळवून देण्यात आरक्षणाची भूमिका किती महत्त्वाची आहे हेही स्पष्ट केले आहे. 'खासगी क्षेत्रातील आरक्षण - महाराष्ट्रातील कायदे' हा लेख खासगी उद्योगांमध्ये आरक्षण लागू करण्याच्या मागणीवर आणि त्या संदर्भात महाराष्ट्रात झालेल्या/प्रस्तावित कायद्यांवर प्रकाश टाकतो. सरकारी नोकऱ्यांची संख्या कमी होत असल्याने, दलितांना खासगी क्षेत्रातही पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ही मागणी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय राज्याने सुरू केलेल्या आरक्षण आणि इतर धोरणे व कार्यक्रमांनी दलितांना सरकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये (*PSUs*) नोकऱ्या मिळवण्यास काही प्रमाणात मदत केली आहे. नोकऱ्यांमध्ये आरक्षणाने एका महत्त्वपूर्ण वर्गाला उत्पन्न, सुरक्षितता, माहिती, आश्रय आणि प्रतिष्ठा दिली आहे. परंतु १९९१ नंतर, म्हणजे नवीन आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतर, दलितांच्या रोजगारात निरपेक्ष संख्या आणि प्रमाणात घट झाली आहे. याव्यतिरिक्त, 'राज्याने' दलितांना सबल करण्यासाठी मर्यादित स्वरूपात का होईना, एक महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दलितांच्या संदर्भात सबलीकरण म्हणजे दुसरे काही नसून स्वतःची मदत करणे होय. थोडक्यात, सबलीकरण ही मनाची एक अवस्था आहे; ती आत्मविश्वास, स्वावलंबन आणि स्वतःच्या हक्कांसाठी व हितासाठी लढण्याचा दृढनिश्चय दर्शवते. याकडे 'क्षमता निर्माण करणे' *(Capacity building)* म्हणूनही पाहिले जाते. सबलीकरणावर लक्ष केंद्रित केल्यामुळे व्यक्तींमध्ये आर्थिक आणि सामाजिक क्षमता निर्माण करण्यावर नवीन भर देण्यात आला आहे. दलित मोठ्या प्रमाणात सबळ झाले आहेत, ज्यामुळे ते आता आपल्या समाजातील श्रेणीबद्ध रचना बदलण्याच्या उद्देशाने प्रत्येक आघाडीवर हक्क सांगू लागले आहेत. आता ते सामाजिक बदलाचे आणि पर्यायाने सबलीकरणाच्या प्रक्रियेचे प्रवर्तक बनले आहेत.

'आरक्षण धोरण आणि दलितांचे सक्षमीकरण' हा लेख आरक्षण धोरणाचा दलितांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणावर झालेला परिणाम तपासतो. आरक्षणामुळे दलितांना उच्च शिक्षण आणि स्थिर नोकऱ्या मिळाल्या, ज्यामुळे त्यांच्या जीवनात सामाजिक गतिशीलता वाढली. आरक्षणामुळे आत्मसन्मान आणि राजकीय जाणीव वाढण्यास मदत झाली, जी सक्षमीकरणासाठी महत्त्वाची आहे. हा लेख सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील यश आणि मर्यादा या दोन्हींचे संतुलन दर्शवतो. आरक्षणाचे सामाजिक लाभ: सामाजिक गतिशीलता आणि 'समाजाचे उत्तरदायित्व' या प्रवृत्तीचे चित्रण यामध्ये अधोरेखित केले आहे. आरक्षणाचे फायदे मिळाल्यानंतर दलित समाजातील व्यक्तींमध्ये निर्माण होणाऱ्या सामाजिक जबाबदारीच्या भावनेचे विश्लेषण केले जाते. आरक्षणामुळे एका पिढीत झालेले वर्ग बदल आणि जीवनमानातील सुधारणा हा घटक महत्वपूर्ण असून सामाजिक परिवर्तनाचे संदर्भ यात दिसून येतात. 'परतफेड' प्रवृत्ती (*'Paying-back' Tendency*) अथवा आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उच्च पदावरील किंवा सुशिक्षित दलितांनी आपल्या समाजाच्या गरिब बांधवांसाठी काय योगदान दिले (उदा. शैक्षणिक मदत, सामाजिक नेतृत्व) याकडे हा लेख लक्ष वेधून घेतो. यातील दलितांचा विकास: काही निरीक्षणे हा लेख स्वातंत्र्यानंतरच्या काळात दलितांच्या विकासाच्या प्रगतीचे एक सर्वसाधारण मूल्यांकन करतो. शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती आणि राजकीय सहभाग यासारख्या मानवी विकास निर्देशांकांच्या आधारावर दलितांच्या प्रगतीचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. सामाजिक विकासाची गती अपेक्षेनुसार झाली आहे की नाही वा अजून कोणत्या क्षेत्रांत लक्ष देण्याची गरज आहे यावरही या लेखात प्रकाश टाकला आहे.

'दलितांचा सामाजिक विकास: काही प्रचलित प्रवाह' हा लेख दलितांच्या सामाजिक स्थितीत सध्या दिसत असलेल्या नवीन बदलांच्या प्रवाहांचे विश्लेषण करतो. दलित मध्यमवर्गाचा उदय, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दलितांचा सहभाग, आणि जातीय अस्मितेच्या नवीन राजकीय अभिव्यक्ती जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा दलितांच्या सामाजिक विकासावर झालेला परिणाम. या महत्वपूर्ण विषयाची चर्चा येथे केली आहे. दुर्बल घटकांचे सक्षमीकरण हा विषय केवळ दलितांनाच नव्हे, तर भारतातील इतर दुर्बल आणि वंचित घटकांना (उदा. आदिवासी, मागासवर्गीय स्त्रिया) सक्षमीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणांचा अभ्यास

करतो. जमीन सुधारणा, कर्ज उपलब्धता, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा यासारख्या उपायांवर चर्चा येथे केली आहे. विविध सरकारी योजनांचा या घटकांच्या सक्षमीकरणावर होणारा प्रत्यक्ष परिणाम शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. 'दलितांवरील मानवाधिकार उल्लंघने: भारतीय सामाजिक वास्तवाचे अन्वेषण' हा सर्वात गंभीर विषय असून तो दलितांवरील अत्याचार आणि मानवाधिकारांचे उल्लंघन यावर आधारित आहे. दलितांना आजही खेड्यापाड्यांमध्ये आणि शहरांमध्ये सामाजिक बहिष्कार, शारीरिक हिंसा आणि मालमत्तेच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे हे वास्तव आहे. अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर कायद्यांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होत आहे याचे गंभीर विश्लेषण येथे केले आहे. भारतीय समाजातील जातीय भेदभावाचे आणि हिंसाचाराचे मूलभूत कारणे शोधणे हे गरजेचे आहे.

शेवटच्या चार प्रकरणांमध्ये (सोळा ते एकोणविस) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती, धर्म आणि स्त्री प्रश्न या विषयांवर सविस्तर चर्चा केली आहे. आंबेडकर हे दलित समाजासाठीच नव्हे तर समानता आणि जातिनिर्मूलन मानणाऱ्या प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहेत. ते दलितांसाठी एक प्रमुख प्रेरणास्थान असून ते आज जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत आहेत. त्यांच्या विचारसरणीतून दलितांनी सर्व क्षेत्रांत, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संघर्ष उभारला. आज आंबेडकर हे केवळ दलितांसाठीच नव्हे, तर जात विनाश आणि समतावादी समाजाची निर्मिती यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी मार्गदर्शक शक्ती बनले आहेत. ते एक जागतिक पातळीवर मान्यता प्राप्त विचारवंत आहेत; अनेक लोकांनी आपली ओळख आणि संघर्ष त्यांच्या विचारांशी जोडली आहे. आंबेडकरांनी हिंदू सामाजिक व्यवस्था ही सामाजिक न्यायाच्या कसोटीवर तपासली ते भारतीय समाजातून जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करून 'न्याय्य समाज' निर्माण करू इच्छित होते. ते म्हणायचे 'जात हा एक राक्षस आहे आणि जोपर्यंत या राक्षसाचा नाश होत नाही तोपर्यंत आपल्या समाजात कोणतीही सुधारणा शक्य नाही. आंबेडकरांनी जातिसंस्थेचे काही मूलभूत गुणधर्म ओळखले ते म्हणजे, जातिसंस्था ही एक प्रकारची शासनव्यवस्था आहे. ती अंतर्विवाहावर म्हणजेच स्वतःच्या जातीतच विवाह करण्यावर आधारित आहे. ती केवळ कामाचे विभाजन नसून, काम करणाऱ्यांचे जाती नुसार विभाजन आहे. विविध प्रकारची असमानता आहे, प्रत्येक जातीसाठी निश्चित नागरी, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक अधिकार दिलेले आहेत.

जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती आणि यंत्रणेबद्दल स्वतःचे विचार मांडल्यानंतर, डॉ. आंबेडकरांनी जाती नष्ट करण्यासाठी तीन उपाय सुचवले म्हणजे आंतरजातीय विवाह, आंतरजातीय भोजन आणि शास्त्र आणि वेदांच्या पावित्र्य आणि अधिकारावरील विश्वास नष्ट करणे जे जातिव्यवस्थेला धार्मिक मान्यता देतात. याखेरीज त्यांनी वंशपरंपरागत पुजारीपद रद्द करण्याचीही शिफारस केली. आंबेडकरांचे अंतिम ध्येय होते आधुनिक, समताधिष्ठित भारताची पायाभरणी करणे. जात-अस्पृश्यतेचे शतकानुशतकांचे बंधन तोडणे हे त्यांच्या जीवनाचे ऐतिहासिक मिशनच होते. चळवळीच्या शेवटच्या टप्प्यात त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. धर्म हा सामाजिक असावा. तो नैतिकतेवर आधारित असावा. तो समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश देणारा असावा. त्यांना बौद्ध धर्मातील प्रज्ञा, करुणा आणि समानता हे तीन तत्त्व अत्यंत प्रिय होती. त्यांचा बौद्ध धर्म स्वीकार हा स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठा मिळवण्यासाठीचा धार्मिक स्वरूपाचा सामाजिक-राजकीय विद्रोह होता. बौद्ध साहित्याची साधी, मानवी व करुणामय परंपरा आंबेडकरांना आकर्षित करत होती. त्यांनी म्हटले होते की, बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान वैश्विक, शाश्वत, समतावादी, तर्कनिष्ठ आणि नैतिक आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, "मी बौद्ध धर्म निवडतो कारण तो मला तीन गोष्टी एकत्र देतो. ज्या दुसऱ्या कोणत्याही धर्मात मला दिसत नाहीत. प्रज्ञा (समज / ज्ञान), करुणा (प्रेम / दया) आणि समता (समानता). यामुळेच माणसाला चांगले आणि आनंदी जीवन जगता येते." बौद्ध धर्माची निवड ही आंबेडकरांची अत्यंत विचारपूर्वक आणि योग्य निवड होती.

स्त्रीमुक्तीविषयीचे आंबेडकर यांचे विचार अत्यंत मूलगामी स्वरूपाचे आहे. त्यांचे असे मत होते की, जातीव्यवस्था हीच स्त्रियांच्या शोषणाची मुख्य कारणीभूत व्यवस्था आहे. त्यांनी दलित महिलांमध्ये आत्मसन्मान निर्माण करण्यावर भर दिला. हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी स्त्रियांचे अधिकार कायद्याने मजबूत करण्याचा प्रयत्न केला. आजही लिंगभाव समानतेच्या चर्चेत आंबेडकरांचा विचार जोडल्यास सर्व स्त्रियांच्या मुक्तीसाठी तो मोठा आधार ठरू शकतो.

वर्तमान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जमान्यात मानवी समाजात मोठी गुंतागुंत निर्माण झाली आहे. जो समाज नवे ज्ञान, नवे विचार, आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, नवीन कौशल्य आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणार नाही तो समाज कालबाह्य ठरेल हे सांगायला कोण्या भविष्यकर्त्याची गरज भासणार नाही. जोपर्यंत आपण आधुनिक व्हीजन तथा दृष्टिकोन ठेवणार नाही तोपर्यंत आपल्याला पुढचे पाऊल टाकताच येणार नाही. जो समाज

हे सार काही स्वीकारणार तो पुढे पुढेच जात राहणार. मध्ययुगीन मानसिकतेला कवटाळून अथवा स्वीकारून नव्या युगात आपला टिकाव लागणार नाही. या परिस्थितीची जाणीव करून देण्याबरोबरच त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आणि आशावादही लेखकाने विविध लेखांच्या माध्यमाद्वारे प्रगट केला आहे. प्रस्तुत पुस्तक हे केवळ वर्णनात्मक नाही, तर दलित प्रश्न आणि वास्तवाचे विवेकी विश्लेषण करते. यामुळे हे पुस्तक केवळ 'वर्णनात्मक' न राहता 'स्पष्टीकरणात्मक' आणि 'सिद्धांताधारित' बनते. दलित अकॅडमीक क्षेत्रात या पुस्तकांने नवी भर घातली असून हे पुस्तक जिज्ञासू वाचकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञान कक्षा रुंदावण्यास निश्चितच मदत करेल. या ग्रंथाच्या अनेक बाजू जमेच्या असल्या तरी मुद्रण पातळीवर प्रकाशकाने अधिक लक्ष द्यायला हवे होते.

**पुस्तकाचे नाव : दलितस् ॲट क्रॉसरोडस्**
**लेखक : पी. जी. जोगदंड**
**प्रकाशन : एबीडी पब्लीशर्स, जयपूर / मूल्य : १६४५**

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशनाचा अहवाल

**डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित श्रीमती मीनलबेन महेता महाविद्यालय, ता. पांचगणी, जि. सातारा आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी **लिंगभाव, शिक्षण आणि विकास** या विषयावर दोन दिवसीय मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ वे अधिवेशन उत्साहात पार पडले. या परिषदेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख व प्रस्ताविक करताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा इतिहास, महाविद्यालयाची प्रगती व लिंगभाव शिक्षण आणि विकास यावर विचार मांडले. यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब (कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर), उद्घाटक मा. नानासाहेब कासुर्डे (माजी नगराध्यक्ष पाचगणी), मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक, परिषदेचे सचिव प्रा. डॉ. कालिदास भांगे, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे व इतर मान्यवर मान्यवर उपस्थित होते. यानंतर प्रा. ऋषिकेश इनामदार यांनी मराठी समाजशास्त्र परिषद व श्रीमती मीनलबेन मेहता महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्काराचे वाचन केले. हा जीवनगौरव पुरस्कार ३० वर्षापेक्षा जास्त समाजशास्त्र विषयाची सेवा करणारे प्रा. वेदव्यास गजेंद्रगड (माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज) यांना देण्यात आला.

प्रा. वेदव्यास गजेंद्रगड व प्राचार्य डॉ सतीश देसाई यांनी लिहिलेल्या भारतीय समाजशास्त्रज्ञ: व्यक्ती आणि परिचय या पुस्तकाचे प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. मा. नानासाहेब कासुर्डे (माजी नगराध्यक्ष, पाचगणी) यांनी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब (कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर) यांनी अध्यक्षीय भाषण करताना महाराष्ट्र व देशभरातून आलेल्या प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन हा शैक्षणिक वसा पुढे नेण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. आभा चौहाण (प्राध्यापिका, हिमाचल प्रदेश केंद्रीय विद्यापीठ धर्मशाळा, अध्यक्ष, इंडियन सोशॉलॉजिकल सोसायटी) यांनी बीज भाषण करताना लिंगभाव शिक्षण आणि विकास या संकल्पना व सद्यस्थिती यावर भाष्य केले. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये लिंगभाव शिक्षण आणि विकास या विषयावरील वेगवेगळी सहा सत्रे पार पडली व त्यामध्ये तज्ञ मार्गदर्शकांनी आपले विचार मांडले. या दोन दिवसीय परिषदेसाठी महाराष्ट्र व देशभरातून २५० पेक्षा जास्त प्राध्यापक, प्राध्यापिका, संशोधक विद्यार्थी उपस्थित राहिले. या परिषदेमध्ये २०० पेक्षा जास्त शोधनिबंध सादर करण्यात आले.

दि. १८ फेब्रुवारी रोजी या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप समारंभ पार पडला. या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून मा. जगन्नाथ शिंदे, गुरूजी (आदर्श शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त) उपस्थित राहिले. श्री. किशनशेठ भिलारे (अध्यक्ष, महाबळेश्वर सहकारी फळे फुले भाजीपाला खरेदी विक्री संस्था) यांनी पाचगणी व महाबळेश्वर परिसरातील अर्थव्यवस्था, पर्यावरण, शेती यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार व प्रा. रेशमा देवरे मॅडम यांनी केले. मराठी समाजशास्त्र परिषदेमार्फत या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये वर्षभर केलेल्या कार्याचा आढावा घेऊन विविध पुरस्कार देण्यात आले. यामध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने सौ. प्रतिमा कुलकर्णी 'उत्कृष्ट महिला प्राध्यापक पुरस्कार' - प्रा. रंजना हेमराज लाड यांना देण्यात आला. डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट प्राध्यापक / संशोधक पुरस्कार' डॉ. अरुण डी. चव्हाण यांना देण्यात आला. 'जय जोशी संदर्भ ग्रंथ / क्रमिक ग्रंथ पुरस्कार' डॉ. सुरेंद्र ठाकूर व डॉ. श्वेतांबरी कंनकदंडे यांना विभागून देण्यात आला. 'डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार' डॉ. बाबुराव जाधव यांना देण्यात आला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार (प्राध्यापकांसाठी) प्रा. डॉ. सिमा शेटे यांना व डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार (विद्यार्थ्यांसाठी) विशाखा विलास भिल्लारे यांना देण्यात आला. तसेच याप्रसंगी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीवर कार्य केलेल्या सर्व

कार्यकारिणी सदस्यांना व संशोधन समितीच्या सर्व समन्वयकांना विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमधून लिंगभाव शिक्षण आणि विकास याविषयावर विचारमंथन झाले. प्रा. नरेंद्र फडतरे यांनी उद्‌घाटन कार्यक्रमाचे तर डॉ. बाळासाहेब कोकरे यांनी समारोप समारंभाचे आभार प्रदर्शन केले. सदर परिषद करण्यासाठी यशस्वी करण्यासाठी परिषदेचे समन्वयक प्रा. शरद संघवी आणि महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मराठी समाजशास्त्र परिषद

**(नोंदणी क्रमांक: महाराष्ट्र / २७-८३ औरंगाबाद)**

**कार्यालाचा पत्ता**

**अध्यक्ष मराठी समाजशास्त्र परिषद**

द्वारा, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००१

## कार्यकारी मंडळ

**अध्यक्ष :** **प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक**
प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**सचिव :** **प्रा. डॉ. कालिदास भांगे**
प्राध्यापक, श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

**कोषाध्यक्ष :** **प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे**
प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

**सदस्य :**
**डॉ. प्रशांत नारगुडे**, मुंबई विद्यापीठ, मुंबई
**डॉ. प्रकाश काळवणे**, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई
**डॉ. वाल्मिक इंदासे**, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**डॉ. सतिश देसाई**, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
**डॉ. अनिल वानखेडे**, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
**डॉ. जयमाला लाडे** (महिला प्रतिनिधी), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
**डॉ. राजू बुरीले**, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
**डॉ. प्रशांत सोनवणे**, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**डॉ. प्रवीण घोडेस्वार**, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
**डॉ. पंढरी वाघ**, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
**डॉ. चंद्रकांत कांबळे**, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर
**डॉ. नानासाहेब पाटील**, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
**डॉ. दिगंबर तंगलवाड,** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा